माझे दूरदूरचे प्रवास.

३।२८

माझे दूरदूरचे प्रवास

लेखक व प्रकाशकः

गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए.,

लाईफ मेंबर, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणें.

२७७, नारायण पेठ, पुणें शहर.

मुद्रकः

केशव रावजी गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, ४३२ शनवार पेठ, पुणें.

सन १९१९

किंमत २॥ रुपये.

सौ. गजराबाई गोविंद भाटे

यांस

त्यांच्याकरितां प्रारंभ केलेल्या

प्रवासांचा

हा वर्णनात्मक ग्रंथ

—सप्रेम अर्पण केला आहे.—

प्रस्तावना.

ज्या माझ्या दूरदूरच्या प्रवासांचीं सचित्र वर्णनें मीं मासिकमनोरंजनांत लिहिलीं त्या माझ्या प्रवासांना प्रारंभ झाल्यास आतां आठांवर वर्षें होऊन गेलीं. जेव्हांपासून हे वर्णनात्मक लेख त्या मासिकांत प्रसिद्ध होऊं लागले तेव्हांपासून ते बरेच लोकप्रिय झाले. याचें एक प्रत्यंतर म्हणजे मासिकांतील कांहीं कांहीं लेखांची दुसऱ्या भाषेंत भाषांतरें झालीं. दुसरें प्रत्यंतर असें कीं, या लेखांचें ताबडतोब अनुकरण होऊं लागलें, व अलीकडे तर सचित्र-प्रवास-वृत्तपर लेख हें मराठी मासिकांचें एक आवश्यक अंग होऊन बसलें आहे. माझे लेख कांहीं लोकांस तरी प्रवास–प्रोत्साहक झाले इतकेंच नाहीं तर अशा प्रवाशी लोकांना ते उत्तम मार्गदर्शक ही झाले हें मला खालीं लिहिल्याप्रमाणें अचानकपणें कळून आलें. मी एकदां मुंबईस सरदारगृहांत उतरलों असतांना एक गृहस्थ आमच्या खोलींत राहावयास आले. कोठून आलां म्हणून चवकशी करितां ते गृहस्थ म्हणाले. " मी नुकताच हरिद्वार–मथुरा–वृंदावनादि यात्रा करून आलों. मला हीं तिर्थें पाहण्याची स्फूर्ति मासिकमनोरंजनाच्या लेखांवरून झाली व त्या लेखांच्या साहाय्यानें मला सर्व प्रेक्षणीय स्थळें चांगलीं पहातां आलीं, मला पंड्यांची गरज लागली नाहीं किंवा वाटाड्याची जरूर भासली नाहीं. प्रो. भाटे यांनीं खरोखरीं फार हुबेहुब वर्णनें लिहिल्यानें व माहिती बिनचुक दिल्यामुळें प्रवाशांची फार सोय झाली आहे. " मीच त्या लेखांचा लेखक आहें हें अर्थात् त्या गृहस्थाला कळविणें मला भाग पडलें व मग त्यांनीं आणखी एकदां माझे आभार मानले.

हे प्रवासवृत्तपर लेख लागलीच स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा माझा मानस होता. पण तेव्हांपासून लढाईची बिकट परिस्थिति उत्पन्न होऊन कागदाची व छपाईच्या सामानाची विलक्षण महर्गता झाली व माझा मनोदय मनांतल्या मनांतच राहिला. त्याला मूर्तस्वरूप देण्याचें श्रेय

अंमळनेरचे दानशूर पुढारी व अध्यात्मविद्याव्यासंगी व्यापारी श्रीमंत प्रतापशेट यांच्या उत्तेजनपर आश्वासनाला आहे. तेव्हां या पुस्तकप्रकाशनाचे कामीं प्रथमतः मला श्री. प्रतापशेट यांचे आभार मानले पाहिजेत. त्यानंतर मासिक मनोरंजनाचे मालक रा. मित्र यांनीं आपल्या मासिकांत प्रसिद्ध झालेले लेख स्वतंत्र पुस्तकरूपानें छापण्यास परवानगी दिली व आपल्या जवळचे चित्रांचे छापही या पुस्तकाच्या उपयोगाकरितां दिले याबद्दल त्यांचेहि आभार मानणें आवश्यक आहे. या पुस्तकाच्या तिसऱ्या भागांत छापलेल्या कांहीं चित्रांचे छाप नवयुगाच्या व्यवस्थापकांकडून मिळाले त्याबद्दल त्यांचेंहि आभार मानणें रास्त आहे. शेवटीं जगद्धितेच्छु छापखान्याचें मालक रा. नानासाहेब गोंधळेकर यांनीं या पुस्तकाच्या छपाईचें काम सुबक व जलद करून दिल्याबद्दल त्यांचेहि आभार मानल्याखेरीज माझ्यानें राहवत नाहीं.

या पुस्तकाचे एकंदर तीन भाग आहेत व त्यांत अठरा प्रकरणें आहेत. हे भाग नुकतेच स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले आहेत. आतां ही त्या भागांची संकलित वाचनालय आवृत्ति प्रसिद्ध होत आहे. पहिल्या भागांत दोन जुन्या व दोन नव्या प्रेक्षणीय स्थळांचें वर्णन आहे व शिवाय एका शिक्षणसंस्थेचा व एका फार पुरातनकाळापासून चालत आलेल्या भक्तिपंथाचा इतिहास सांगितला आहे. दुसऱ्या भागांत दहा प्रेक्षणीय स्थळांचें वर्णन आलें असून दोन शिक्षणसंस्थांचा इतिहास व बुद्धकालीन वास्तुकलेची माहिती दिली आहे. तिसऱ्या भागांत काश्मीर प्रांतांतील पांचसात प्रेक्षणीय स्थळांचें वर्णन आहे व काश्मीर संस्थानच्या उत्पत्तीची व विस्ताराची सामान्य माहिती दिली आहे. काश्मीरसारख्या मोठ्या प्रांताचें समग्र वर्णन देण्यास त्या ठिकाणीं कांहीं तरी महिन्यांचा वास घडला पाहिजे. माझा काश्मीरांतील वास तर आठवड्यांनीं सुद्धां मोजण्याइतका नव्हता. तरी पण अल्पावधींत मला ज्या काय गोष्टी त्या निसर्गरमणीय देशांत पाहतां आल्या त्यांचें वर्णन मीं दिलें आहे.


येणें प्रमाणें हिंदुस्थानच्या आंतल्या बाहेरच्या दुर्मिळ प्रेक्षणीय स्थळरूपी रत्नांचा हा हार बनविला आहे. इतस्ततः पसरलेल्या या रत्नांना

ग्रथित करणारें सूत्र म्हणजे अर्थात् या प्रवासवृत्त लेखकाचें मन होय म्हणूनच या लेखांत आत्मवृत्तपर प्रसंग पुष्कळ आलेले आहेत. कांहीं जणांना हे प्रसंग विषयांतरासारखे वाटण्याचा संभव आहे. पण या सूत्रामुळेंच हा प्रवासवृत्तपर ग्रंथ भूगोलविषयक क्रमिक पुस्तकासारखा किंवा जंत्रीवजा प्रवाशी मार्गदर्शक पुस्तकासारखा अगदींच नीरस न वाटतां तो वाङ्मयात्मक ग्रंथासारखा मनोरंजक वाटेल अशी लेखकालाआशा आहे.


१४ जानेवारी १९१९
२७७ नारायण पेठ, पुणें शहर. } गोविंद चिमणाजी भाटे.

G.C. Bhate

अनुक्रमणिका.




नैनिताल—तळ्याचा देखावा.



नैनिताल—दांडी वाहन.



नैनिताल—बड्या बाजाराचा व तळ्याचा देखावा.



नैनिताल—शहराचा देखावा.



माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास.

— १ —

नैनिताल.



कविकुलगुरु कालिदास यानें आपल्या कुमारसंभव व मेघदूत या काव्यांत हिमालय पर्वत आणि त्याच्या आसपासचा व अलीकडलापलीकडला प्रदेश यांच्या वर्णनाचे प्रसंग आणिले आहेत, व त्याचीं हीं वर्णनें मोठीं मनोहर व बहारदारीचीं आहेत हें त्या काव्यांचा परिचय असलेल्यांना नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. शिवाय तीं वर्णनें बरींच हुबेहूबहि आहेत. यावरून कालिदासानें हिमालय पर्वत प्रत्यक्ष पाहिला होता किंवा नाहीं हें जरी खात्रीनें सांगतां येणार नाहीं तरी इतकें खास, कीं, कालिदासानें हीं वर्णनें रचण्यापूर्वीं हिमालयाबद्दल उपलब्ध माहिती मिळविली असली पाहिजे. हिमालय पर्वताच्या प्रचंड-तेची, त्याच्या भव्यतेची व तेथल्या एकंदर सृष्टिसौंदर्याची कालिदासास

बरोबर कल्पना झालेली होती हें त्यानें कुमारसंभवाच्या प्रारंभींच केलेल्या हिमाचलाबद्दलच्या एका विधानावरून स्पष्ट होतें. "**पूर्वापरौ तोयनिधीवगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्डः**" हिमालयाचें हें वर्णन खरोखरीच यथार्थ आहे. हिमालय हा हिंदुस्थानचाच नव्हे तर सर्व पृथ्वीचाच मानदण्ड होय. हा पर्वत ही एक अद्वितीय चीज आहे यांत शंका नाहीं. आर्यलोक उत्तरध्रुवाकडून ह्मणा, किंवा कास्पीयन समुद्राच्या किनाऱ्यावरून ह्मणा, खालीं दक्षिणेकडे आले. त्यांना या पर्वताची सर्व शोभा व तेथील सृष्टिसौंदर्य हें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहावयास सांपडलें. हा पर्वत ओलांडूनच ते प्रथमतः उत्तर हिंदुस्थानांत आले व तेथच्या सपाट प्रदेशावर त्यांनीं कायमच्या वसाहती केल्या. तरी पण उत्तरप्रदेशाबद्दल व हिमालयाबद्दल त्यांचें प्रेम व आदर कायमच राहिला. म्हणूनच त्यांनीं हिमालयाला सृष्टिसौंदर्यप्रिय शिवाचें वसतिस्थान बनविलें. हिमालयाच्या पलीकडे देवगंधर्वयक्षादिक मनुष्यापेक्षां श्रेष्ठ जीवकोटीचें वसतिस्थान आहे अशी त्यांनीं कल्पना केली; हिमालयाच्या पलीकडे असलेलें मानस सरोवर, हें सर्व सौंदर्याचें, सर्व सुखविलासांचें, सर्व प्रेक्षणीय वस्तूंचें आगर आहे असें त्यांनीं वर्णन केलें; व हिमालयावर जाऊन तेथें तपश्चर्या करून ब्रह्मानंदीं विलीन होणें हेंच सर्व आयुष्याचें इतिकर्तव्य आहे असें त्यांनीं प्रतिपादन केलें.

अशा या अद्वितीय व अपूर्व पर्वताचें व त्याच्या आसपासच्या प्रदेशाचें प्रत्यक्ष दर्शन घडणें हें पूर्व काळीं फारच दुर्घट काम होतें व म्हणूनच त्या दर्शनाला इतकें धार्मिक पावित्र्य आलें होतें. परंतु अर्वाचीन काळीं आगगाड्यांच्या प्रसारानें सर्व हिंदुस्थानवासीयांना हा दर्शनलाभ सुलभ झालेला आहे. हिमालयाच्या दक्षिणेकडील पायथ्याच्या बाजूच्या पर्वतराजीवर इंग्रज सरकारनें या गेल्या शंभर वर्षांत निरनिराळीं थंड हवेचीं ठिकाणें शोधून काढून तेथें वस्ति वसविली आहे. अशीं ठिकाणें म्हणजे सिमला, मसूरी, नैनिताल व दार्जिलिंग हीं होत हें सर्वश्रुतच आहे. जरी हीं सर्व ठिकाणें हिमालयाच्या मानानें त्याच्या पायथ्याशींच आहेत तरी तीं समुद्रसपाटीपासून फारच उंच आहेत. सिमला समुद्र-

सपाटीपासून सात हजार फूट उंच आहे. मसूरी व नैनिताल सहा हजार फूट उंच आहेत. यावरून हीं हवेचीं ठिकाणें महाराष्ट्रांतील हवेच्या ठिकाणांपेक्षां अधिक उंच आहेत, असें दिसून येईल. कारण मुंबई प्रांतांतील सर्वांत उंच ठिकाण म्हणजे महाबळेश्वर हें होय; परंतु त्याची उंची फार तर पांच हजार फूट असेल. या उत्तर हिंदुस्थानांतील चार प्रसिद्ध ठिकाणांपैकीं नैनिताल हें ठिकाण या मे महिन्यांत पाहण्याचा आह्मांस सुदैवानें योग आला. तेव्हां या सुंदर ठिकाणाची माहिती वाचकांना या माझ्या उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासवर्णनांत प्रथमतः देण्याचें योजिलें आहे.

मुंबई इलाख्यांतील लोकांना हिमालयांतील हवाशीर ठिकाणांपैकीं नैनिताल हेंच सर्वांत जवळचें ठिकाण आहे. हल्लीं मुंबईहून नैनितालला दोन मार्गांनीं जातां येतें. सर्वांत जवळचा मार्ग म्हणजे बांबे-बडोदा लाईननें आहे. ह्या लाईननें कुलाब्याहून निघालें म्हणजे पंजाबएक्सप्रेस गाडीनें मुंबई, बडोदा, गोध्रा, रतलाम, नागडा या ठिकाणांवरून थेट मथुरेस गाडी येते. मुंबईहून मथुरा या लाईननें सातशें सत्याहत्तर मैल आहे. येथून पुढें नॅरोगेज लाईन आहे. ती हथरस कासगंज बरेलीवरून कथगोडमपर्यंत जाते. मथुरेपासून कथगोडम १९३ मैल आहे. नैनितालचें रेलवेस्टेशन हेंच होय. येथून नैनिताल २२ मैल आहे. म्हणजे या मार्गानें मुंबईहून नैनिताल ९९२ मैल होतें. दुसरा मार्ग जी. आय्. पी. रेलवेकडून आहे. या मार्गानें आग्र्यास पंजाबमेलनें जावयाचें. मुंबईहून आग्रा ८३५ मैल आहे. व येथून आग्रा कथगोडम पॅसेंजर निघते. आग्र्यापासून कथगोडम सुमारें अडीचशें मैल आहे. अर्थात् या मार्गानें नैनिताल हें सुमारें शंभर मैल जास्त लांब आहे. मेलनें सर्व प्रवास केल्यास जी. आय्. पी. मार्गानें सुमारें वीस रुपये पडतात. तिसऱ्या वर्गानें बारा रुपये पडतात. बांबे-बडोदा मार्गानें आल्यास मेलनेंच जी. आय्. पी. च्या तिसऱ्या वर्गाइतक्या खर्चानें कथगोडमला पोंचतां येतें.

आह्मी मुंबई–बडोद्याकडून नागडा–मथुरा–मार्गानें मुरादाबादेस आलों. मुरादाबादेहून नैनितालला दोन मार्गांनीं जातां येतें. मुरादाबादेहून

बरेलीला जावयाचें व बरेलीहून कथगोडमला यावयाचें. या प्रवासाला तिसऱ्या क्लासानें २। रुपये पडतात. दुसरा मार्ग यापेक्षां जवळ आहे. परंतु गाडी दोन ठिकाणीं बदलावी लागते. मुरादाबादेहून रामपूरपर्यंत एक फांटा आहे. रामपूरचे आधीं काशीपूर ह्मणून एक गांव लागतें. मुरादाबादेहून काशीपूर हें थेट उत्तरेला आहे. काशीपुराहून थेट पूर्वेकडे एक फांटा जातो. त्यानें लालकुवा जंक्शनला जावयाचें व लालकुव्या-पासून कथगोडमला पोहोंचावयाचें. या मार्गानें तिसऱ्या क्लासचें भाडें सुमारें एक रुपया चार आणे पडतें. आम्ही जातांना काशीपुराकडून गेलों व परत येतांना बरेलीच्या मार्गानें आलों.

ज्यांनीं उत्तरहिंदुस्थानचा कांहीं भाग तरी पाहिला असेल त्यांना त्या प्रदेशाची सामान्य कल्पना असेलच. हा प्रदेश फारच सपाट आहे. चारी बाजूंच्या क्षितिजांवर कोठेंहि उंचवटा किंवा टेंकाड दृष्टीस पडाव-वयाचें नाहीं. अशा तऱ्हेचा देखावा महाराष्ट्रांतहि देशावर दिसतो. परंतु खानदेश, वऱ्हाड किंवा दक्षिण महाराष्ट्र इकडील सपाट प्रदेश काळ्या मातीचा आहे, तर गंगा व यमुना या नद्यांच्या कांठचा हा प्रदेश पांढु-रक्या मातीचा आहे. इकडील दगडहि पांढऱ्या मातीचेच आहेत. मधूनमधून कालवे दृष्टीस पडतात व त्या ठिकाणचीं शेतें भर उन्हा-ळ्याच्या दिवसांतहि हिरवीं गार दिसतात. काशीपुरापर्यंत अशा तऱ्हेचा देखावा दिसतो. परंतु काशीपूर सोडून पूर्वेकडे लालकुव्याच्या मार्गाला वळलें म्हणजे तेव्हांपासून सर्व देखावा बदललेला दिसतो. आधीं झाडी फारच गर्द होते. आगगाडी अत्यंत गर्द अशा रानांतून जाते व या झाडांचा विशेष म्हणजे त्यांच्या पानांची टवटवी व सतेजपणा हा होय. लालकुव्यापासून डोंगरांची रांग दूर दिसूं लागते. लालकुव्यापासून निघालें म्हणजे हल्डवानी म्हणून एक स्टेशन लागतें. या ठिकाणचा व्यापार बराच मोठा आहे. हल्डवानीहून कथगोडमपर्यंतचा देखावा फारच मनो-हर आहे. आधीं जंगल खूब दाट व उंच असलेलें दिसतें व जमिनीचा रंग व विशेषतः दगडाचा रंग तर फारच बहारदारीचा दिसतो; येथें काळा दगड औषधालासुद्धां दिसावयाचा नाहीं. येथले बहुतेक दगड

पांढरे, कांहीं निळसर पांढरे, व कांहीं तर तांबडे असतात. अशा तीन मिश्र रंगाच्या दगडांचे ढीगचे ढीग व ग्रासचे ग्रास आगगाडीच्या बाजूनें घातलेले दृष्टीस पडतात व ते दुरून फारच चांगले दिसतात. इकडील इमारतीहि याच त्रिरंगी दगडाच्या केलेल्या असतात व यामुळें त्यांना कोणताहि कृत्रिम रंग दिलेला नसतांना या छोट्या इमारती शहरांतील मोठमोठ्या सुंदर इमारतींपेक्षांहि मनोहर दिसतात.

हें आपण पहाण्यांत गर्क झालेले असतांनाच आपल्याला आश्चर्यानें चकित करून सोडण्यासारखा देखावा दिसूं लागतो.हिमालयाच्या पायथ्याच्या पहिल्या हिरव्यागार टेंकड्या आपल्या अगदीं समोर दिसूं लागतात व त्या टेंकड्यांना लागून एक स्फटिकाप्रमाणें शुभ्र अशा नदीचें रुंद पात्र दिसूं लागतें. वरच्या बाजूस हिरवेंगार रान, त्याच्या पायथ्याशीं पांढऱ्या शुभ्र दगडांनीं भरलेली नदी, हा देखावा फारच आश्चर्यकारक भासतो. दुरून पाहणाराला तर प्रथमतः हा एक मोठा समुद्रच आहे कीं काय, असा भास होतो. ही नदी फार उथळ परंतु अत्यंत रुंद आहे. हिचें नांव गोला नदी. कथगोडम याच नदीच्या किनाऱ्याला आहे. ही नदी म्हणजे या पांढऱ्या, निळ्या व तांबुस रंगाच्या दगडांची मोठी खाणच आहे. उन्हाळ्याचे दिवसांत नदीमध्यें पाणी मुळींच नसतें. परंतु सर्व नदी अशा चित्रविचित्र रंगाच्या गोट्यांनीं भरलेली असते. हा देखावा म्हणजे नैनिताल व हिमालय या सृष्टिसौंदर्याच्या आगरांचें प्रसादचिन्हच वाटतें व कथगोडमचा हा देखावा पाहून मनुष्याचें मन फार प्रसन्न होतें व लवकरच आपल्याला सृष्टिसौंदर्याचें मूलस्थानच पहावयास सांपडणार आहे हें पाहून मन जास्त उल्हासित होतें.

आह्मी कथगोडम येथें सायंकाळीं ७ वाजतां पोंचलों. इकडल्या भागाला आल्यावर आपल्याला दिवस किती तरी मोठा झाला आहे असें दिसून येतें. येथें हल्लींच्या दिवसांत पहाटेस ४॥ वाजल्यापासून संधिप्रकाश पडतो व पांच साडेपांच वाजतां तर अगदीं फटफटीत उजाडतें. तसेंच सायंकाळीं सुमारें ८ वाजेपर्यंत संधिप्रकाश रहातो. कथगोडमहून नैनिताल २२ मैल आहे हें मागें सांगितलेंच आहे. टांगे, व एक्के हे रात्रीचे प्रवास

करीत नाहींत. ह्मणून आह्मांला रात्रभर कथगोडमच्या धर्मशाळेंत राहावें लागलें. परंतु या प्रांताला धर्मशाळेची सोय फार चांगली असते. आधीं प्रत्येकाला स्वतंत्र खोली मिळूं शकते. यामुळें सामान ठेवून खोलीला कुलूप लावून बाहेर जातां येतें. तसेंच प्रत्येक धर्मशाळेला एक रखवालदार असतो. ह्मणून धर्मशाळाहि स्वच्छ राहतात. तसेंच या प्रांतांत पुरी व भाजी हीं सर्व ठिकाणीं व बहुतेक सर्व स्टेशनवर मिळतात व हे पदार्थ एकंदरींत चांगलेहि असतात. अतएव इकडे प्रवास करणें सोईचें होतें. मात्र पुरी व भाजी या पदार्थांवर राहण्याची संवय पाहिजे.

कथगोडमहून आह्मीं घोड्याचा एक्का केला. टांग्याला इकडे फार पैसे पडतात. सबंध तीन माणसांच्या टांग्याला १२ रुपये पडतात, तर दोन माणसांच्या एक्याला फक्त ३॥ रुपये पडतात. एक्याचें वाहन इकडे फार स्वस्त दिसतें. हा एक्का फारच हलका असतो व त्याला पूर्वींच्या रथासारखे चार बारीक खांब व त्यावर एक घुमट असतो व पाहिजे तर बाजूनें पडदे टाकतां येतात. हे एक्के एका तासांत पांच सहा मैल जाऊं शकतात. कथगोडमापासून ब्रीरभट्टी (ब्रुअरीपर्यंत) टांगे व एक्के जातात. ही बीरभट्टी कथगोडमपासून तेरा मैल आहे. पुढें सामानाच्या गाड्या जाण्यासारखा ९ मैलांचा रस्ता आहे. परंतु त्यानें माणसें जात नाहींत. माणसें जवळच्या रस्त्यानें पायीं, घोड्यावर किंवा दांडीनें जातात. बीरभट्टीपासून नैनिताल या पायवाटेनें सुमारें तीन मैल आहे. दांडी हें एक इकडील विशेष प्रकारचें माणसांनीं नेण्याचें वाहन आहे. मुंबईच्या बाजूला ज्याप्रमाणें सिंहगडास किंवा माथेरानला जावयाला खुर्च्या असतात त्याप्रमाणें या दांड्या असतात. परंतु त्यापेक्षां या बसावयास सोईच्या असतात, व त्यायोगें माणसांनांहि उचलून नेण्यास फार सुलभ जातें. या दांडीचें भाडें, दांडी उचलणारांची मजुरी व म्युनसिपल टॅक्स मिळून दर माणशीं २॥ रुपये पडतात. आह्मी कथगोडमहून साडेपांच वाजतां निघालों ते बीरभट्टीला ८॥ वाजतां आलों. तेथून पायींच वर गेलों. वर जाण्यास सुमारें १॥ तास लागतो. नैनितालास नैनिहाटेल आणि रेसहाटेल या नांवाचीं हिंदूंकरितां दोन हाटेलें आहेत. येथें फक्त उतरण्यास जागा

मिळते. जेवण्याखाण्याची व्यवस्था स्वतः स्वयंपाक करून किंवा बाजारांतील पुऱ्या व भाजी आणून करावी लागते. येथें दूधहि चांगलें मिळतें. प्रत्येक खोलीस आठ आण्यांपासून दीड दोन रुपयेपर्यंत रोजचें भाडें पडतें.

नैनिताल व इतर थंड हवेचीं ठिकाणें यांमध्यें पुष्कळ बाबतींत फरक आहे. आपल्या इकडील महाबळेश्वर घ्या, माथेरान घ्या, किंवा इकडील मसुरी घ्या किंवा सिमला घ्या, हीं ठिकाणें फक्त उन्हाळ्याच्या दिवसांतच गजबजलेलीं असावयाचीं. पावसाळ्यांत किंवा हिवाळ्यांत तीं बहुतेक शुकच असतात. कारण, तीं वास्तविक खेडींच असतात. नेहमींच्या राज्य-व्यवस्थेचा महत्त्वाचा कार्यभाग तेथें घडत नसतो. परंतु नैनितालची गोष्ट तशी नाहीं. नैनिताल हें नैनिताल जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे व शिवाय उन्हाळ्यांतील संयुक्त प्रांताच्या सरकारचें थंड वसतिस्थानहि आहे. यामुळें येथें बाराहि महिने वस्ती असते. जिल्ह्याच्या पोलीसचें हें मुख्य ठाणें आहे. तसेंच येथें गुरख्या शिपायांची एक, इतर हिंदी शिपायांची एक, व युरोपियन शिपायांची एक अशा तीन पलटणी कायमच्या रहातात. आणखी येथें फॉरेस्टच्या डिव्हिजनचें कायमचेंच ऑफीस असतें. यामुळें नैनिताल हें एका लहानशा जिल्ह्याच्या शहराप्रमाणें दिसतें व वस्तिहि शहराप्रमाणें वसलेली आहे.

इतर थंड हवेचीं ठिकाणें व नैनिताल यांमधील दुसरा फरक म्हणजे त्याची रचना. मुंबईकडील दोन्हीं थंड हवेचीं ठिकाणें हीं पर्वताच्या पठारावर वसलेलीं आहेत. आपण वाईहून महाबळेश्वरावर चढूं लागलों म्हणजे पर्वताच्या राजीच्या राजी चढून आपण अगदीं वरवर जातों व महाबळेश्वर अगदीं वर चढून जाईपर्यंत मुळींच दिसत नाहीं. माथेरानची हि तीच स्थिति आहे. एखाद्या माणसाला डोळे बांधून किंवा पूर्वींच्या कादंबऱ्यांत वर्णन केल्याप्रमाणें नकळत एकदम महाबळेश्वरीं मालकम पेठेंत नेऊन उभें केलें तर आपण एखाद्या सपाट प्रदेशावर आहों, असें त्याला वाटेल. त्याच्या सभोंवार त्याला तांबड्या मातीची सपाट जमीनच जमीन दृष्टीस पडेल, व आपण सह्याद्रिपर्वताच्या एका प्रचंड टेंकाडाच्या माथ्यावर आहों अशी शंकासुद्धां त्याला येणार नाहीं. परंतु त्या मनुष्याला

मालकम पेठ सोडून एखाद्या पॉइंटच्या टोंकाशीं आणिलें म्हणजे त्याला सह्याद्रि पर्वताची शोभा व आपण उभे असलेल्या पर्वतराजीची उंची व भव्यता दृग्गोचर होईल. परंतु नैनितालची तशी गोष्ट नाहीं. नैनिताल हें शहर दोन टेंकड्यांच्या उतारावर वसलेलें शहर आहे. यामुळें नैनितालच्या कोणत्याहि ठिकाणीं उभें राहिलें तरी तेथून सर्व पर्वताची व शहराची शोभा दिसल्यावांचून रहात नाहीं. या वसतिस्थानाला म्हणण्यासारखी सपाट जागा मुळींच नाहीं. येथें घरें व बंगले हे एकाच्या डोकीवर दुसरा अशा तऱ्हेचे आहेत. यामुळें शहरांत या बंगल्यावरून त्या बंगल्यावर जाण्याचें वाहान म्हणजे दांडी हेंच होय. येथें एकहि गाडी किंवा बायसिकल दृष्टीस पडावयाची नाहीं व येथें सपाट रस्तेहि नाहींत.

नैनितालच्या रचनेचा तिसरा विशेष ह्मणजे येथला तलाव किंवा सरोवर हें होय.या तलावावरूनच या ठिकाणाला हें नांव मिळालेलें आहे.नैनादेवीचा तलाव हा नैनिताल या शब्दाचा अर्थ आहे. हा तलाव पूर्वपश्चिम जाणाऱ्या दोन समांतर टेकड्यांच्या मिलाफानें झालेला आहे. या दोन टेंकड्या पश्चिमेस अगदीं एकमेकांनां भिडलेल्या आहेत व पूर्व बाजूला त्या दोन रांगा सारख्या कथगोडमपर्यंत गेल्या आहेत असें ह्मटलें तरी चालेल व या दोन दरींमधूनच तलावांतील फाजील पाणी वाहत जाऊन त्याची बलिया नदी बनून ती कथगोडमच्या किंचित् वर गोला नदीला मिळालेली आहे. याच नदीच्या कांठावर कथगोडम आहे हें मागें सांगितलेंच आहे. नैनितालची सर्व वस्ति या तलावासभोंवार टेंकड्यांच्या उतारावर दक्षिणोत्तर आहे व पश्चिमेकडच्या टोंकाला बडा बझार, युरोपियन लोकांची वस्ति, त्यांचीं दुकानें व त्यांच्या खेळण्याच्या जागा आहेत. खेळण्याची जागा तर तलावाचा थोडासा भाग बुजवून कृत्रिम तऱ्हेनें बनावलेली आहे. नैनादेवीचें लहानसें देऊळ तलावाच्या याच कांठावर आहे. पूर्वेच्या बाजूला हिंदूलोकांची वस्ति व बाजार आहे. याच टोंकाला गंधकाच्या पाचक पाण्याचा एक चांगला स्वच्छ झरा आहे. या झऱ्याचें पाणी फार गार आहे. बहुधा गंधकाच्या पाण्याचे झरे हे उष्ण पाण्याचे झरे असून त्यांना उन्हाळी म्हणतात. परंतु हा झरा अत्यंत गार पाण्याचा असून हें पाणी

पिण्यास फार चांगलें लागतें. पहिल्यांदाच पिणाराला थोडा गंधकाचा वास येतो; परंतु एकदोन दिवसांच्या सवईनेंसुद्धां तो वास भासत नाहींसा होतो.

नैनितालच्या तलावाचा पृष्ठभाग समुद्रसपाटीपासून ६३५० फूट आहे व सभोंवारच्या टेंकड्यांची, सरासरी उंची १००० फूट आहे. यावरून येथले बंगले ६५०० पासून ७००० फूट उंचीवर आहेत असें दिसून येईल. तलाव लंबवर्तुळाकार आहे. परंतु तलावाच्या मधोमध एका टेकडीचा भाग जरा पुढें आला आहे व या ठिकाणीं तलावाची रुंदी बरीच कमी आहे. यामुळें या तलावाला कांहींसा दोन डोळ्यांचा किंवा त्यावर घालण्याच्या आरशीचा आकार आला आहे असें ह्मणणें शोभेल. या तलावाची सर्वांत जास्त लांबी १५६७ यार्ड आहे व सर्वांत जास्त रुंदी ५०६ यार्ड आहे. या तलावाचा परिघ दोन मैल आहे व यानें व्यापिलेली जागा १२० एकर आहे. सर्व तलावासभोंवतीं एक सुंदर रस्ता आहे. दक्षिणेच्या बाजूला टेंकडी अगदीं तलावाला लागलेली आहे व रस्ता टेंकडीचीं टोंकें फोडून करावा लागलेला आहे. उत्तरेच्या बाजूला टेंकडी किंचित् कमी भिडलेली आहे व यामुळें या बाजूनें एकाखालीं एक असे दोन समांतर रस्ते नेलेले आहेत. या तलावाची सर्वांत जास्त खोली ९३ फुटांची आहे तर सर्वांत उथळ भागीं २० फूट पाणी आहे. तलावामध्येंसुद्धां एक गंधकाच्या पाण्याचा झरा आहे. या तलावाला पाण्याचा पुरवठा होण्याची मुख्य मोरी पश्चिमेला आहे. परंतु दोन्ही समांतर टेंकड्यांचें सर्व पाणी लहान लहान मोऱ्यांनीं याच तलावांत येऊन पडण्याची व्यवस्था केली आहे.

खरोखरीं हा तलाव म्हणजे या ठिकाणचें एक अद्वितीय भूषण होय यांत शंका नाहीं. या तलावाच्या सभोंवतीं हिंडलें म्हणजे सर्व शहराची निरनिराळ्या ठिकाणांहून निरनिराळी शोभा दिसते. लोकांचा सहल करण्याचा हाच एक रस्ता होय. यामुळें संध्याकाळीं या रस्त्यानें बरीच गर्दी दिसते व त्या वेळचा देखावा फारच प्रेक्षणीय असतो. बाकी शहरांत कोठेंहि चारपावलेंसुद्धां सपाट रस्ता नाहीं. सारखी चढउतर आहे.

या सुंदर तलावाचा व्यायामप्रिय युरोपियन लोकांनीं व्यायामाकडेहि उपयोग करून घ्यावा हें उचितच आहे. येथें पुष्कळ बोट क्लबस् आहेत. एक खुद्द लेफ्टेनेंट गव्हर्नरचें बोट हौस आहे. दोन युरोपियन लोकांचे बोट क्लबस् आहेत. शिवाय यंग मेन्स क्रिश्चन असोशिएशनचाहि एक बोटक्लब आहे. युरोपीयन ऑफिसरांच्याहि सहल करावयाच्या व व्यायामाच्या होड्या आहेत. रामपुरच्या नबाबाचें एक बोट-हौस आहे. सकाळीं व सायंकाळीं बोटी वलवीत जातांना पुष्कळ लोक दृष्टीस पडतात. या तलावांत संध्याकाळीं मासेमारी करण्यामध्येंहि पुष्कळ लोक गुंतलेले दिसतात. शिडें लावून वाऱ्याच्या जोरानें चालणाऱ्या बोटीहि पुष्कळ असतात. अशी व्यायामाची व सहल करावयाची सोय थोड्याच ठिकाणीं असते व त्यांतल्या त्यांत उंच थंड ठिकाणीं तर बहुतेक अशक्यच आहे. आपल्या इकडे मुंबईस व डेक्कन कॉलेजांतच फक्त बोटींच्या व्यायामाची सोय आहे. ज्यांना त्या व्यायामाची मौज व आनंद ठाऊक असेल त्यांना नैनितालच्या या विशेषाचें महत्त्व कळून येईल. माझें शिक्षण चार वर्षें डेक्कन कॉलेजांत झाल्यामुळें व त्या चार वर्षीं दररोज बोटीचा व्यायाम घेण्याचा सराव असल्यामुळें या ठिकाणची ही व्यवस्था पाहून मनाला फारच आनंद झाला व या सरोवरांत बोटींत बसून सहल करण्यास सांपडेल तर काय बहार होईल असें वाटलें. परंतु येथले सर्व क्लब सभासदांकरितां असून बोटी भाड्यानें मिळण्याची येथें मुळींच सोय नाहीं, असें समजलें. यामुळें बोटींत बसून वल्हाविण्याची प्रबल इच्छा मनांतल्यामनांत दाबावी लागली.

वरील वर्णनावरून नैनितालच्या रचनेची साधारण कल्पना वाचकांस येईल. हें ठिकाण वस्तीनें वाढणें शक्य नाहीं. कारण, आणखी घरें किंवा बंगले बांधावयास येथें सोय नाहीं. एकंदर ठिकाण स्वाभाविक चतु:सीमांनीं मर्यादित झालेलें आहे. तसेंच येथें दूर दूर जाऊन सृष्टिसौंदर्य पहाण्यासारखे पाइंट्स्हि ह्मणण्यासारखे नाहींत. कारण, वर लिहिल्याप्रमाणें शहराची रचना या ठिकाणचें सर्व सौंदर्य एकदम दृग्गोचर करणारी

अशीच आहे. तरीपण येथल्या कांहीं थोड्या प्रेक्षणीय स्थळांची माहिती देणें आवश्यक आहे.

हें ठिकाण पूर्वपश्चिम जाणाऱ्या समांतर अशा दोन टेंकड्यांच्या रांगांनीं झालेलें आहे. टेंकड्यांपैकीं दक्षिणेकडील टेंकडीवरून हल्लीं कथगोडमपासूनचा रस्ता आहे. हा रस्ता पूर्वीं उत्तरेकडील टेंकडीवरून होता. उत्तरेकडील टेंकडीकडून हल्लीं आलमोऱ्याला जाण्याचा रस्ता आहे व या रस्त्यानें जरा पुढें गेलें म्हणजे कथगोडमपर्यंतची अवर्णनीय शोभा दिसते. डोंगरांच्या सारख्या रांगाच्या रांगा अगदीं सपाटीपर्यंत गेलेल्या दिसतात व त्यांवरून आपण किती उंच ठिकाणावर उभे आहों याची चांगली कल्पना येते. नागमोडीसारखा वांकणें वांकणें घेऊन गेलेला शुभ्र रस्ताहि फार रमणीय दिसतो.

येथली दुसरी प्रेक्षणीय गोष्ट म्हणजे शिपाईधारा ही होय. हा एक उत्तम पाण्याचा झरा आहे. तो दक्षिणेकडील टेंकडीच्या टोंकाला बैलगाडीच्या रस्त्यावर शहरापासून थोड्याच अंतरावर आहे. या ठिकाणीं मनुष्य गेला म्हणजे त्याला कल्पनातीत आनंद होतो. या झऱ्याच्या पाण्याच्या मुसळधारा सारख्या वाहतांना दृष्टीस पडतात. पाणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ व निर्मल आहे व तें इतकें थंड आहे, कीं, आपण बर्फाचेंच पाणी पितों आहों कीं काय, असा भास होतो. पाणी मधुरहि फार आहे. हें पाणी बारा महिने तेरा काळ सारखें वहात असतें. हें पाणीच या ठिकाणच्या सर्व पाण्यांत उत्तम होय. पुष्कळ लोक प्यावयास हेंच पाणी वापरतात. या झऱ्याचें पाणी खालीं सर्व रस्त्यांच्या बाजूनें खेळविलेलें आहे व यामुळें घाटाच्या सर्व रस्त्यावर फारच कमी खर्चानें पाणी शिंपडतां येतें. बीरभट्टीपासून दीड मैल चढत आल्यावर या मोठ्या वाहत्या झऱ्याचें प्रथम दर्शन होतें. येथें झाडी फार आहे व येथें एक संगमरवरी गायमुख बांधलें आहे. बीरभट्टीहून चढून दमून मनुष्य वर येत असतांनाच या झऱ्याचें एकदम त्याला दर्शन घडतें व गायमुखांतलें तें अमृततुल्य पाणी पिऊन मनुष्याचा सर्व थकवा नाहींसा होऊन त्याला वर चढण्यास जास्त

उमेद व हुशारी वाटते व नैनितालच्या सौंदर्यांची व सुखदायकत्वाची चांगली कल्पना येते.

परंतु नैनितालमधील सर्वांत अत्यंत प्रेक्षणीय स्थळ म्हटलें म्हणजे चायनापीक हें होय. हें नैनितालच्या उत्तरेस आहे व त्याची उंची समुद्र-सपाटीपासून ८५६८ फूट आहे. म्हणजे नुसत्या तलावाच्या सपाटी-पासूनच तें २२ शें फुटांच्या वर आहे. आजुबाजूच्या सर्व डोंगरांत हेंच सर्वांत उंच ठिकाण होय. येथें जाऊन परत येण्यास सुमारें पांच तास लागतात. दांडीवाले जाण्यायेण्याचे अडीच रुपये घेतात. या टोंकावर सकाळचें जाणें सोईचें असें आम्हाला कळलें होतें. म्हणून आम्हीं एका सकाळीं जाण्याचा विचार केला होता. परंतु आदल्या दिवशीं सायंकाळीं फार मोठें वादळ झालें. मृच्छकटिक नाटकांत वर्णन केल्याप्रमाणें '**जल-धरसंघें नभ भरलें तें !**' अशी आकाशाची स्थिति झाली. विजाहि लवूं लागल्या. यामुळें आमचा चायनापीकवर जाण्याचा बेत रहित करावा लागतो कीं काय अशी भीति पडली. परंतु सुदैवानें कांहीं तासांनीं आकाश निरभ्र झालें व ठरल्या बेताप्रमाणें आम्हांला पहाटेस चायनापीकला जाण्यास सांपडलें.

चायनापीकला जाण्याचा रस्ता तलावाच्या पूर्वेकडील टोंकापासूनच निघतो व तो सारखा चढत चढत जातो व जसजसें आपण वरवर जावें तसतसा त्याच तलावाचा व शहराचा देखावा '**नवोनवोऽयमक्ष्णोः**' याप्रमाणें प्रत्येक उंचीच्या रस्त्यावरून निरनिराळा दिसतो. चायनापीकचा रस्ता जुन्या गव्हर्मेंट हौसच्या बाजूनें जातो व पुढें अलाहाबादचे ऑनरे-बल मुनशी माधवलाल यांचा बंगला लागतो. हा बंगला बहुतेक नैनि-तालमध्यें सर्वांत उंच जागीं आहे. बंगला छोटासा असून टुमदार आहे. चायनापीकचा रस्ता थेट या बंगल्यावरून जातो व येथें तो टेंकडीच्या मागें वळल्यामुळें नैनिताल दिसेनासें होतें. येथपासून चढ बराच कठीण व बिकट आहे. कांहीं ठिकाणीं रस्ता सरासरी दोन मनुष्यें जाण्याइतकाच आहे. एका बाजूला उंच व सुळक्यासारखें टेंकाड, तर दुसऱ्या बाजूला भयंकर खोल दरी, असाच बहुतेक हा मार्ग आहे. यामुळें चालतांनासुद्धां मनुष्याला पडण्याची भीति वाटते. इकडे रानहि फार दाट आहे व वृक्ष

खरोखरीच गगनचुंबी आहेत कीं काय असें वाटतें. या ठिकाणीं इंग्लंडांतील थंड प्रदेशांत होणारे सायप्रस वृक्ष पुष्कळ आहेत. आम्ही नैनितालहून निघाल्यापासून बरोबर १॥ तासानें चायनापीकवर आलों. वर जाऊन पोहोंचतों तों विलक्षण थंडी वाजूं लागली. वाराहि फार सुटला होता. तासदीडतासाच्या पूर्वीच्या हवेंतील व येथें येतांच लागणाऱ्या हवेंतील फरक आश्चर्यजनक होता. पुण्यांत गुदस्त सालीं ज्या दिवशीं बर्फ पडलें होतें त्या दिवशीं जितकी थंडी वाजली तितकी थंडी वर वाजूं लागली. अगदीं हुडहुडी भरल्यासारखी झाली. आवाज कांपरा कांपरा येऊं लागला. म्हणून तेथें वाळलेल्या पानांची शेकोटी करण्याचा प्रयत्न केला परंतु पानावर दंव पडलेलें असल्यामुळें पानें लवकर पेट घेईनात व शिवाय येथें विस्तव पेटविण्याची मनाई आहे असें दांडीवाल्यांकडून कळल्यामुळें शेकोटी करण्याचा प्रयत्न आम्हीं सोडून दिला. इतक्यांत सूर्यनारायणहि क्षितिजाच्या बराच वर आला व वाराहि कमी झाला. यामुळें थंडी कमी झाली व आमचें लक्ष्य येथल्या सृष्टिसौंदर्याकडे वेधूं लागलें. आम्ही गेलेल्या दिवशीं धुकें फार पसरलेलें होतें, व ह्मणून आमच्या सभोंवतीं सर्व समुद्र असून आम्हीं एखाद्या लहानशा बेटावर उभे आहों कीं काय असा भास होत होता. परंतु सूर्यकिरणांनीं धुकें वितळूं लागलें. आम्ही फारच उंचावर उभे असल्यामुळें धुकें व ढग आमच्या खालीं आहेत असे दिसत व धुक्याचे लोटच्या लोट दरींतून बाहेर पडतांना अवर्णनीय शोभा दिसे. चायनापीक हें एक अगदीं अरुंद पण थोडें लांबट असें पर्वताचें टोंक आहे व तें दक्षिणोत्तर आहे. आम्ही प्रथमतः दक्षिणेच्या टोंकाला आलों व तेथूनच नैनितालची सर्व शोभा दिसते. परंतु वर लिहिल्याप्रमाणें धुक्याचे सारखे लोटच्या लोट वर येत असल्यामुळें क्षणार्धांत सर्व नैनिताल स्पष्ट दिसत असे तर पुन्हां क्षणार्धांत तें अदृश्य होऊन जाई. जणूं कांहीं एखादा जादुगार आपल्या भारलेल्या कांडीनें तें शहर गुप्त करीत आहे व पुन्हां ते प्रगट करीत आहे ! आम्ही या चायनापीकवर पुरे दोन तास घालविले. त्या दिवशीं सर्वत्र धुकें फार पसरलेलें असल्यामुळें सभोंवारचा प्रदेश जितका स्पष्टपणें दिसावयास पाहिजे तितका

मनांत फार भीति असे. कारण, हें ठिकाण भूतांखेतांचें ठिकाण आहे अशी समजूत होती. यामुळें शेतकरी एका ठरलेल्या दिवशीं त्या ठिकाणीं आपल्या कळपासकट जमत. कारण, एकट्याला तेथें जाण्याची छाती नसे व मध्यें आपली झोंपडी व सभोंवार गुरांचा गोठा अशा तऱ्हेनें ते रहात. तरीसुद्धां पुष्कळ गुरें व केव्हां केव्हां माणसेंहि व्याघ्रमुखीं पडत असत. तेथें आल्यावर शेतकरी पहिल्या प्रथम नैना देवीला संतुष्ट करीत असत. वर्षांतून पर्वणीच्या दिवशीं या तलावांत लोक स्नानास येत. परंतु यापलीकडे या ठिकाणची मुळींच माहिती नव्हती. १८३९ च्या मार्च महिन्यांत आपले मेहुणे बॅरन यांच्याबरोबर मिस्टर बॅटन नांवाचे साहेब हाल्डवानी येथें शिकार करीत होते. ते वाटाड्यांना घेऊन भीमतालला गेले व तेथून नैनितालला आले व रामनगरच्या बाजूनें परत आले. १८४१ मध्यें नैनिताल या तलावाच्या शोधाबद्दल व त्याच्या सौंदर्याबद्दल व त्याच्या भावी वसतिस्थानक्षमतेबद्दल वर्तमानपत्रांत एक पत्र प्रसिद्ध झालें. त्या ह्मणण्याची पुष्टी मिस्टर बॅरन यांनीं केली. लंगेच बारा बंगल्यांबद्दल कान्ट्रॅक्टरला कंत्राट दिलें. १८४२ मध्यें लोकांना वार्षिक कर घेऊन जमिनीवर घरें बांधण्यासंबंधाचे सरकारी नियम प्रासिद्ध झाले. कमिशनरनें एक बंगला आपल्याकरितां बांधला. बाजार व इतर सार्वजानिक इमारती यांची जागा आंखण्यांत आली. बंगल्याचें काम पुरें होतांच त्यांत लोक राहूं लागले. पहिले पहिले बंगले तलावाच्या पूर्व बाजूस बांधले गेले. १८४९ पर्यंत हल्लींच्या बड्या बाजाराच्या ठिकाणीं अजून जंगलच होतें. या तलावांत पहिली होडी मिस्टर बॅरन यांनीं वल्हविली. १८४६ मध्यें १५ हजार रुपये वर्गणी करून युरोपियन रहिवाशांनीं पहिलें ख्रिस्ति देऊळ बांधलें व त्याचें 'जंगलांतील सेंटजॉन' असें अन्वर्थक नांव ठेविलें. १८५७ सालच्या बंडाच्या वर्षीं नैनितालची थंड हवेचें ठिकाण ह्मणून ख्याति झाली होती व त्या धामधुमींत बरेली व त्याच्या आसपासचे भाग येथले पुष्कळ लोक आश्रयाकरितां नैनितालाला जाऊन राहिले होते. नंतर लौकरच नैनिताल हें संयुक्त प्रांताच्या सरकारचें उन्हाळ्यांतील विश्रांतिस्थान बनलें. १८६५ मध्यें त्या वेळच्या लेफ्टेनेंट गव्हरनरनें आपल्याकरितां

उत्तरेच्या टेकडीच्या पूर्वटोंकाला एक बंगला बांधविला व आपण पेनशन घेतल्यावर तो बंगला एका मनुष्यास विकला व तेव्हांपासून पुढें झालेले लेफ्टेनेंट गव्हरनर हे तो बंगला दरवर्षास ३६०० रुपये भाड्यानें घेत असत. १८९५ पर्यंत लेफ्टेनेंट गव्हरनरचें राहण्याचें ठिकाण याच टेकडीवर होतें. परंतु १८८० च्या घरकोसळीनंतर ही टेकडी धोक्याची आहे असें ठरलें व ह्मणून सरकारनें समोरच्या टेकडीवर मोठी जागा घेतली व तेथें हल्लींचा भव्य व सुंदर राजवाडा बांधला. हा वाडा १९०० मध्यें पुरा झाला. या सर्व वर्षांत नैनितालची सारखी भरभराट होत होती व जिकडे तिकडे वस्ति वाढत होती. यामुळें शाळा, दुकानें, खाणावळी, घरें बंगले सारखे वाढत चालले. प्रथमतः या ठिकाणाला येण्यास चांगले रस्ते नसून मुरादाबादेवरूनच्या लांबच्या रस्त्यानें यावें लागे. परंतु पुढें बरेलीहून एक सरळ रस्ता झाला. १८८२ मध्यें कथगोडमपर्यंत रेलवे झाली. तेव्हांपासून तर हें ठिकाण जास्त महत्त्वाचें झालें व त्याला शहराचें स्वरूप आलें. मागें सांगितलेंच आहे कीं, १८९१ मध्यें हें जिल्ह्याचें ठिकाण बनलें. तेव्हां येथली वस्ति हंगामी न राहतां कायमचीच झाली. या शहराची वस्ति कमजास्त होणारी आहे. परंतु येथें कायमची वस्ति १० हजारां जवळजवळ आहे व उन्हाळ्यांत तर ती १६।१७ हजारपर्यंत वाढते.

नैनितालबद्दलची सांगण्यासारखी सर्व हकीकत आतां सांगून झालीच. परंतु इकडील पर्वताच्या भूगर्भविषयक स्थितीचा व त्यापासून घडलेल्या अनर्थांचा उल्लेख केल्यावांचून हें वर्णन अपुरें राहील ह्मणून तेवढें देणें येथें वावगें होणार नाहीं.

इकडील पर्वतांच्या टेंकड्या या फार ढिसूळ अशा दगडाच्या झालेल्या आहेत. सह्याद्रि पर्वताचा कणखर काळाभोर खडक इकडे मुळींच नाहीं. येथला खडक पांढऱ्या रंगाचा मुरमासारखा भुसभुशीत आहे व कांहीं ठिकाणीं स्लेटीच्या दगडासारखा पत्र्यापत्र्याचा झालेला आहे व थराथरामधून माती आहे. या कारणानें येथें पावसाळ्यांत पाणी खडकांत मुरतें व असें पुष्कळ पाणी मुरलें म्हणजे कडेच्या कडे कोसळून पडतात. अशा प्रकारची कडेकोसळ अगर घरकोसळ या टेकड्यांवरून

पुष्कळ वेळां झालेली आहे. १८६६ मध्यें एक मोठा कडा कोसळला होता. पुढें १८६९ मध्यें ती धरकोसळ जास्त मोठी झाली. परंतु सर्वांत भयंकर व हानिकर धरकोसळ १८८० मध्यें झाली. ही धरकोसळ प्रत्यक्ष पाहिलेल्या माणसानें तिचें खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

"१६ सप्टंबर गुरुवार १८८० या दिवशीं सारखा अहोरात्र मुसळधार पाऊस पडूं लागला. शुक्रवार व शनिवार या दोन दिवसांतच ३३ इंचांवर पाऊस पडला. पाणी जाण्याचे सर्व मार्ग बंद झाले. सर्व टेकडी पाण्यानें डुबडुबून गेली व पाणी टेकड्यांच्या भेगांतून शिरून टेकडीच्या कांहीं भागाचा धर सुटला. शनिवारीं दहा वाजतां पहिली धरकोसळ झाली व तिनें व्हिक्टोरिया हॉटेलचीं बाहेरचीं घरें व हॉटेलच्या पश्चिमेचा भाग ढांसळून खालीं आला. परंतु यापेक्षां फारच मोठ्या भागाचा धर कोसळला व त्यायोगें सर्व हॉटेल, असेंबली रूम्स व इतर आणखी पुष्कळ घरें यांसकट सर्व टेकडी धाडकन् तलावांत येऊन कोसळली. या धरकोसळींत एकंदर १५१ मनुष्यें दगावलीं व कित्येक इमारती अजिबात नाहींशा झाल्या."

ही धरकोसळ झाल्यावर सरकारनें हजारों रुपये खर्च करून संरक्षक कामें बांधिलीं. जागोजाग पावसाचें पाणी टेकडींत न मुरतां खालीं निघून जाण्याकरितां मोऱ्या बांधल्या व कोसळलेल्या भागाचा फायदा घेऊन त्या ठिकाणीं खेळाची मोठी जागा तयार केली. या धरकोसळींत जुन्या नैनादेवीच्या देवालयालाहि जलसमाधि मिळाली होती. हल्लींचें देवालय हें त्यानंतर बांधलेलें आहे. १८९८ सालीं पूर्वेकडील टेंकड्यांची बीरभट्टीच्या बाजूला धरकोसळ झाली व त्यानें जुना रस्ता बहुतेक वाहून गेला. म्हणून हल्लींचा रस्ता दक्षिणबाजूच्या टेकडीवरून नेलेला आहे. उत्तरेकडील टेकड्यांपेक्षां दक्षिणेकडील टेकड्या कमी धोक्याच्या आहेत असा तज्ज्ञांनीं अंदाज केलेला आहे. यामुळें हल्लीं लोकवस्ती व बंगले वगैरे दक्षिणेच्या बाजूला जास्त होत आहेत.

परंतु सरकारनें या थंड हवेच्या ठिकाणाच्या महत्त्वाच्या मानानें अतोनात पैसा खर्च करून या ठिकाणाला मानवी प्रयत्नांनीं जितकी



— ३ —

हरिद्वार किंवा गंगाद्वार.

शिरः शार्वं स्वर्गात्पशुपतिशिरस्तः क्षितिधरम् ।
महीध्रादुत्तुंगादवनिमवनेश्चापि जलधिम् ।
"अधो गंगा सेयं पदमुपगता लोकविसुदे"



मागल्या लेखाच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें आह्मी मुरादाबादेस पांच सहा दिवस मुक्काम केला. मुरादाबाद हें बऱ्याच मोठ्या वस्तीचें शहर असून तें तीन चार रेलवेंचें जंक्शन स्टेशन आहे. तेथूनच नैनितालकडे जाणारा रेलवेचा एक फांटा निघतो. दुसरा फांटा मुसलमान लोकांच्या कॉलेजामुळें प्रसिद्धीस आलेल्या अलीगडकडे जातो. औंदरोहिलखंड रेलवेची एक मोठी शाखा—सहारहाणपुर ते मोगलसराई—इजवर मुरादाबाद आहे. येथून लकसरपर्यंत या मुख्य शाखेनें हरिद्वारला जाण्याकरितां जावें लागतें. लकसरपासून डेहराडून या शीतळ निवासस्थानापर्यंत एक रेलवेची शाखा जाते. तिच्यावरच हरिद्वार आहे. लकसरपासून प्रथमतः हरिद्वारपर्यंत रेलवेचा फांटा तयार केला गेला. तो १८८६ मध्यें पुरा झाला, व तोच पुढें १९०० सालीं डेहराडूनपर्यंत नेण्यांत आला. डेहराडूनहून मसुरीला (हिमालयांतील दुसरें उंच ठिकाण) वाट जाते. मुरादाबादेपासून हरिद्वार शंभर मैल लांब आहे. सोईस्कर गाडी मुरादाबादेहून रात्रीं निघून हरिद्वारास सकाळीं पोहोंचते. लकसर जंक्शनला मात्र बराच वेळ थांबावें लागतें.

आह्मीं हरिद्वारास जाण्याकरितां रात्रीं अकरा वाजतां निघालों तों लकसरला सुमारें ४ वाजतां येऊन पोहोंचलों. तेथें दोन अडीच तास थांबावें लागलें. परंतु पुढल्या प्रवासास अर्धा तास सुद्धां लागला नाहीं. प्रवास रात्रीचाच असल्यामुळें मुरादाबादेपासून लकसरपर्यंतचा प्रदेश दिसला नाहीं. परंतु राहून राहून मनाला एक प्रकारचा संतोष वाटत होता. हरिद्वार, गंगोत्री, बदरिकेद्वार हीं उत्तरेकडील अत्यंत पवित्र स्थानें; यांचीं नांवें मी लहानपणीं आमच्या वडील मंडळीच्या तोंडून ऐकलीं होतीं. या यात्रा घडण्यास फारच मोठी पूर्वपुण्याई लागते, अशा प्रकारचे उद्गार मीं ऐकलेले होते. त्यांचें मला आतां स्मरण झालें. या पूर्वकाळीं अत्यंत बिकट अशा यात्रांपैकीं हरिद्वार तरी अर्वाचीनकाळीं थोडें जास्त सुलभ झालें आहे. तरी पण असें पवित्र स्थान एका दीड वर्षाच्या आंत मला दोनदां पाहावयास मिळालें, हें पाहून माझी पूर्वपुण्याई खरीच फार मोठी असली पाहिजे, असें वाटून मला एक प्रकारचा आनंद झाला. कारण, मी हरिद्वारला दोन वेळां गेलों. पहिल्यांदां गेलों तो १९१० च्या आक्टोबरमध्यें गेलों होतों. त्या वेळीं फक्त दोन दिवसच मी तेथें वास केला होता. या खेपेला आह्मीं तेथें सुमारें एक आठवडा काढला. यामुळें या सुंदर व पवित्र स्थानाची निरनिराळ्या ऋतूंतील शोभा मला पहाण्यास मिळाली. या लेखांत माझ्या पहाण्यांत आलेल्या त्या स्थळाच्या दोन्ही स्थितींचें मी वर्णन देणार आहें.

वर लिहिलेंच आहे, कीं, आह्मीं लकसरला सुमारें चार वाजतां येऊन पोंचलों. या दिवसांत इकडे संधिप्रकाश फार वेळ असल्यामुळें चार साडेचार वाजतां चांगलें दिसूं लागतें. या ठिकाणापासून हरिद्वारचे पंडे दृष्टीस पडूं लागतात. यात्रेकरूंच्या शोधार्थ ते प्लॅटफार्मावर सारखे हिंडत असतात; व भेटेल त्याला "हरिद्वाराला जावयाचें आहे? कोठें उतरणार? तुमचें नांव काय? तुमचा येथें पंड्या आहे?" वगैरे प्रश्न विचारण्याचा सपाटा लावतात. मी पहिल्या खेपेला हरिद्वाराला गेलों होतों, तेव्हां एका पंड्याचे घरींच उतरलों होतों, परंतु तेथली जागा फार कोंदट व गैरसोईची होती. ह्मणून या खेपेला आह्मीं मुरादाबादेहून, गांवा-

बाहेरील एका चांगल्या धर्मशाळेच्या व्यवस्थापकांला पत्र घेतलें होतें. लकसरपासून बऱ्याच झाडीच्या प्रदेशाला सुरवात होते व उत्तरेच्या बाजूला टेकड्या टेकड्या दिसूं लागतात. "**अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा। हिमालयो नाम नगाधिराजः।**" असें ज्या पर्वताचें वर्णन केलेलें आहे, त्या पर्वताच्याच पायथ्याशीं आपण चाललों आहों, असें या लहानशा टेकड्या पाहून वाटत नाहीं. ज्याप्रमाणें नदाच्या उगमाशीं नद लहानशा झऱ्यासारखा असतो, व त्याचाच पुढें प्रचंड नद बनतो, तशांतली या टेकड्यांची स्थिति आहे. ढेंगभर वाटणाऱ्या या थोड्या टेकड्यांचाच वर जातां जातां अलंघ्य पर्वत बनून, त्यांचींच कांचनगंगा धवलगिरी वगैरे सारखीं अठ्ठावीस एकुणतीस हजार फूट उंचीचीं शिखरें झालेलीं आहेत, हें मनांत आलें ह्मणजे सृष्टिकर्त्याचें कौतुक केल्यावांचून रहावत नाहीं.

याप्रमाणें विचार मनांत येत आहेत नाहींत तोंच हरिद्वारचें स्टेशन आलें व आमची उतरण्याची घाई झाली. स्टेशनवर तर काय पंड्यांची गर्दीचगर्दी होऊन गेली. या पंड्यांचा पोशाख अगदीं साधा असतो. नेसूं धोतर, अंगांत एक शुभ्र तालिमबाजी सदरा व डोक्यास पांढऱ्या विरविरीत कापडाची तीन चार पैशांची टोपी. कांहींजणांजवळ वह्यांचीं पुडकीं असतात. हे लोक यात्रेकरूंना आपल्या घरीं येण्याबद्दल सारखा लकडा लावीत असतात. स्टेशनच्या बाहेर पंड्यांच्या आंतल्यापेक्षां मोठाल्या झुंडीच्या झुंडी दृष्टीस पडतात. यात्रेकरूगणिक येथें पंड्ये आहेत कीं काय, असा भास होतो व एका दृष्टीनें हें खरेंहि आहे. या गांवची वस्ती म्हणजे मुख्यतः पंड्यांचीच आहे. पंडे, यात्रेकरूंना लागणारे मिठाई व इतर जिन्नस विकणारे पुरभय्ये, आणि परान्नपुष्ट बैरागी व याचक या त्रिवर्गानें या गांवची सर्व वस्ती झालेली आहे. या प्रत्येकाचा धंदा ह्मणजे यात्रेकरूंना लुटण्याचा! प्रत्येक पंड्याला असें वाटतें, कीं, आपण यात्रेकरूजवळ किती मागूं आणि किती नाहीं. बाकी या पंड्यांमध्यें बरेच लोक चांगले सधन असतात. कांहीं तर फारच श्रीमान् झालेले आहेत. तरी यांचा धनलोभ मात्र कमी झालेला नाहीं. बैराग्यांची व तपस्व्यांची तर गोष्टच

बोलूं नका. हे लोक यात्रेकरूंच्या पैशावर सारखी चैन करीत असतात. बाजारांतून आपण जाऊं लागलों ह्मणजे हे तुंदिलतनु लोक सारखे पाठीस लागतात. एक ह्मणतो " बाबूजी हमकू दूध लाव ! " दुसरा ह्मणतो " बाबूजी हम मलई चाहते हमकू मलई देव ! " तिसरा तिसरेंच कांहीं मागतो ! सारांश, या लोकांना याचना व भोजन यांखेरीज दुसरा विषयच ठाऊक नाहीं. याप्रमाणें येथले लोक पाहून व त्यांची दिनचर्या व एकंदर वृत्ति आणि वागणूक पाहून मनुष्याला एक प्रकारचा खेदच होतो. काय या लोकांचें जीवित! **वक्त्रंहि याचनकृते क्षुदर्थेंच जिव्हा** अशी यांची वृत्ति व कृति ! अशा माणसांबद्दल आदर वाटण्याऐवजीं तिरस्कार मात्र उत्पन्न होतो. याप्रमाणें येथल्या वस्तीकडे पाहिलें ह्मणजे धर्मप्रवृत्ति जागृत न होतां उलट मावळूनच जाते. तरी या ठिकाणचें सृष्टिसौंदर्य पाहिलें ह्मणजे मात्र याच्या अगदीं उलट परिणाम होतो व या स्थानाचें इतकें माहात्म्य व पावित्र्य सतत कायम कां राहणार हें ध्यानांत येतें. असो.

वर सांगितलेंच आहे, कीं, आह्मांला या खेपेला पंड्याच्या साहाय्याची जरूरी नव्हती. ह्मणून आह्मीं एक दोन-घोड्यांची: गाडी करून त्यांत सर्व सामान भरलें व आमच्या ठरलेल्या ठिकाणीं जाण्यास निघालों. तरी एक पंड्या आमच्या गाडीच्या बॉक्सवर बसलाच ! गांव लहानच असल्यामुळें आमची धर्मशाळा आह्मांला तेव्हांच सांपडली. अर्थात्, आह्मांला पंड्याची मुळाच गरज लागली नाहीं. तरी पण आह्मीं हरिद्वाराहून निघण्याचे आधीं, आमचेबरोबर आलेल्या पंड्यास एक रुपया दिला !

आह्मीं ज्या धर्मशाळेंत उतरण्यास गेलों होतों, ती धर्मशाळा साधारण गांवाबाहेर असून चांगली प्रशस्त व स्वच्छ होती; व तेथील व्यवस्थापकहि फार चांगला माणूस असल्यामुळें व त्याला थोडें फार इंग्रजी येत असल्यामुळें आह्मांला भाषाव्यवहाराची अडचण भासली नाहीं व आमची सर्व सोय उत्तम झाली. प्रथमतः जेव्हां मी हरिद्वारास आलों होतों तेव्हां जेवणाखाणाचे बरेच हाल झाले. ह्मणून या खेपेला आह्मीं बरोबर अलीकडे प्रचारांत येऊं घातलेला 'कुकर' घेतला होता. प्रवासांत या 'कुकर'पासून

फारच सोय व सुख होतें. कारण त्याला लाकूडफाटें किंवा चूल लागत नाहीं. एक प्रायमस स्टोव्ह बरोबर असला म्हणजे सर्व काम भागतें. या कुकरनें आह्मांला पुराणांतरींच्या द्रौपदीच्या स्थालीचीच आठवण झाली. त्या स्थालींत ज्याप्रमाणें इच्छेप्रमाणें आपोआप अन्न तयार होत असे, तसाच येथेंहि प्रकार होतो. भाजी, भात, वरण हे पदार्थ 'कुकर' मध्यें घालून 'कुकर' स्टोववर ठेवून खुशाल बाहेर जावें व तास दीड तासानें परत यावें, तों स्वयंपाक्यानें तयार केल्याप्रमाणें सुंदर अन्न तयार होतें. अशी आमची व्यवस्था असल्यामुळें आमचा हरिद्वार येथील आठवडा फारच सुखानें व आनंदानें गेला; व तो इतक्या जलद गेला, कीं, आमचें हरिद्वारचें रहाणें स्वप्नांतील तर नव्हे, असें आह्मांला केव्हां केव्हां वाटे.

हरिद्वार या पवित्र स्थानाचा विशेष म्हणजे येथील गंगा होय. बाकी, हें गांव काशी, प्रयाग, मथुरा किंवा द्वारका यांप्रमाणें मोठें नाहीं. येथली वस्ती अवघी चार हजार आहे. येथें मोठमोठ्या इमारती नाहींत. येथें भव्य देवळें नाहींत. येथें मोठा व्यापार आहे असाहि प्रकार नाहीं. प्रत्यक्ष गांव मोठ्याशा खेड्यासारखें आहे. घरेंहि सामान्यच आहेत. परंतु या गांवची रचना, ठेवण व येथली गंगा हीं मात्र अप्रतिम आहेत. म्हणूनच या गांवाला फार प्राचीन काळापासून इतकें पावित्र्य आलेलें आहे.

हें पवित्रस्थान निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या नांवानें प्रसिद्ध होतें. प्रथमतः शिवभक्त व विष्णुभक्त यांचेमध्यें या गांवाच्या नांवासंबंधानें मोठा वाद आहे. शिवभक्त म्हणतात या गांवाचें नांव हरद्वार. विष्णुभक्त म्हणतात या गांवाचें खरें नांव हरिद्वार. या दोन पंथांच्या लोकांमध्यें मोठमोठ्या मारामाऱ्या या स्थळीं होत व त्या अगदीं अव्वल इंग्रजीपर्यंत चालत असत. या गांवाचें फार जुनें नांव कपिल हें होय व अजूनहि कपिलस्थान ह्मणून एक जागा दाखविण्यांत येते. कपिल हा एक फार प्रख्यात तपस्वी होता. या कपिल शहरालाच तैमुरलंगानें आपल्या इतिहासांत कुटिल म्हटलें आहे असें म्हणतात. प्रसिद्ध चिनी प्रवासी हुएनसंग हा या ठिकाणीं आला होता. त्यानें या गांवाचें नांव मोयुलो असें दिलें आहे.

मोयुलो म्हणजे मयापुर किंवा मयूर असावें. मयापुर या नांवाचें फार जुनें ठिकाण हरिद्वारच्या दक्षिणेस फारच जवळ आहे. अकबराच्या कारकीर्दीतील प्रसिद्ध इतिहासकार अबुल फाजल यानें या गांवाला मय अथवा हरिद्वार असें म्हटलें आहे. अकबराच्या काळीं येथें तांब्याच्या नाण्यांची एक टांकसाळ होती व अकबर आपल्याला प्यावयाला पाणी नेहेमीं या ठिकाणाहून नेत असे, असें म्हणतात. या ठिकाणाला गंगाद्वार असेंहि नांव आहे व मुसलमान इतिहासकार या स्थळाचा निर्देश गंगाद्वार ह्मणूनच करतात; व पुढील वर्णनावरून हेंच नांव अन्वर्थक आहे असें दिसून आल्याखेरीज राहणार नाहीं.

या पवित्र स्थानाचें येवढें पूर्वचरित्र वस्स आहे. आतां आपण त्याच्या सांप्रतच्या स्वरूपाकडे वळूं. हरिद्वार हें गांव गंगेच्या दक्षिण तीरावर शिवालिक नांवाच्या हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या टेकड्यांच्या बाजूला वसलेलें आहे व गंगानदी थेट गांवाला व टेकड्यांना लागून गेली आहे. नदीच्या दोन्ही तीरांस टेकड्यांची रांग आहे व मध्यें एक दरी झाली आहे. यामुळें हिमालयानें जणूं काय आपल्या लहान लहान टेकड्यांचें एक दार बनवून त्यांतून गंगेला जाण्यास वाट दिली आहे कीं काय असा भास होतो. कारण, दोन टेकड्यांमधला भाग खिंड किंवा द्वार यासारखाच खरोखरी दिसतो व ह्मणून गंगाद्वार हें नांव जास्त अन्वर्थक आहे असें आम्हीं वर म्हटलें आहे. गांवच्या वरच्या बाजूला नदीकिनाऱ्यावर उभें राहून उत्तर दिशेकडे दृष्टि फेंकली म्हणजे अद्वितीय देखावा दिसतो. दृष्टि पोंचत नाहीं येथपर्यंत सारखी टेकड्यांची रांगची रांग लागलेली दिसते. या टेकड्या एकावर एक अशा सारख्या चढत चढत गेलेल्या आहेत. व आपण दृष्टि कितीहि उंच केली तरी या टेकड्या ह्मणून संपत नाहींत. अगदीं दूरवर डोळे ताणून ताणून पाहिलें म्हणजे पांढऱ्या शुभ्र रंगाची पर्वतराजि दिसूं लागते. ही पर्वतराजि आहे किंवा पांढऱ्या ढगाचा समुदाय आहे, याबद्दल भ्रांति उत्पन्न होते. परंतु बर्फाच्छादित ह्मणूनच सदाधवल अशा हिमवानाचा हा धवलध्वज होय, अशी खात्री झाली म्हणजे मन सानंदाश्चर्यांत निमग्न होतें. या पर्वतराजींच्या खालीं

पाहिलें म्हणजे स्फटिकाप्रमाणें शुभ्र असा गंगाप्रवाह दूरपर्यंत दिसतो. गंगेच्या पाण्याइतकें शुभ्र व निर्मल पाणी दुसऱ्या कोणत्याहि नदीचें नसेल. मी पहिल्यानें हरिद्वारास गेलों तो आक्टोबरमध्यें. तो ऋतु हरिद्वारास जाण्यास सर्वांत उत्तम. त्या ऋतूंत येथील हवा फारच चांगली असते. फार थंडीहि नाहीं, फार उष्णताहि नाहीं. पाणी तर इतकें निर्मळ व स्वच्छ असतें, कीं, गळाभर खोल पाण्यांतसुद्धां एकादी सुई किंवा टांचणी स्पष्टपणें दिसते. या नदीच्या प्रसन्न पाण्याकडे पाहून प्राण्याचें मन प्रसन्न झाल्याखेरीज राहतच नाहीं. एकीकडे त्या हिरव्यागार टेकड्या, व त्यांचेच पायथ्याशीं शुभ्र दगड, व तो स्फटिकाप्रमाणें शुभ्र पाण्याचा प्रवाह, हा देखावा एकसमयावच्छेदेंकरून पाहिला म्हणजे कसाहि मनुष्य असो त्याचा अंतरात्मा गारीगार झाल्याखेरीज रहात नाहीं. त्या पवित्र स्थानीं क्षणभर उभें राहिल्यावर आमचीहि तीच अवस्था झाली. हिमालयाचा शुभ्र विस्तार, जणूं कांहीं स्वर्गापर्यंत पोंचलेला दिसत होता व त्याची एक सोपानपरंपरा झाली आहे, असा भास होई. गंगा स्वर्गांतून आली ती याच सोपानपरंपरेनें आली. ती प्रथम स्वर्गांतून शंकराच्या डोक्यावर पडली, तेथून हिमवानाच्या माथ्यावर पडली व तेथून अवनितलाला पोंचून खालीं खालीं जात शेवटीं सागराला मिळाली, असें भर्तृहरीनें वर्णन केलें आहे तें अत्यंत यथार्थ आहे असें मला वाटलें. तसेंच, सृष्टिदेवीचे अद्वितीय देखावे पाहिल्यावर त्यांचें रूपकात्मक वर्णन करण्याची कवीला स्फूर्ति होऊन त्या रूपकात्मक वर्णनाच्याच पुढें पुराणांतील कथा होतात असें जें म्हणतात, त्याचीहि सत्यता माझ्या डोळ्यांपुढें उभी राहिली. व असलाच एकादा गंगेचा देखावा पाहून महाभारतांतील किंवा रामायणांतील गंगावतरणाची कथा एकाद्या कवीच्या डोक्यांत आली असावी, असें मला त्या वेळीं वाटलें व त्या देखाव्यानें मला माझ्या लहानपणच्या एका अदृष्टपूर्व अनुभवाचें स्मरण झालें. मीं लहानपणीं पुण्यांत इंग्रजी शिकण्यास होतों, त्या वेळीं आम्हांला पुण्यास कोंकणांतून येण्याजाण्यास बैलगाडीच्या रस्त्यानें जावें लागत असे. एका मे महिन्यांत आम्ही पुण्याहून निघून आमच्या गांवीं जात होतों. वाटेंत आह्मांला प्रचंड सह्याद्रि ओलांडावा

लागतो. आम्हीं पहाटेच्या सुमारास सह्याद्रीच्या पुष्कळ उंच उंच टेकड्या उतरून एका पर्वताच्या शेवटाला आलों, तों तेथें मीं एक अद्वितीय देखावा पाहिला. त्या दिवशीं धुकें फार आलें होतें. आम्ही समोर दिसणारे डोंगर ओलांडून कोंकणाच्या बाजूकडील डोंगरांच्या माथ्यावर आलों मात्र, तों आमच्यापुढें एक अफाट समुद्र पसरला आहे असें आम्हांला वाटलें! तें सर्व जग व्यापणारें धुकें थेट समुद्राप्रमाणें भासत होतें. ज्या ठिकाणीं धुकें किंचित् कमी दाट होतें तेथें थोडा भूमिभाग दृग्गोचर होत होता. असे भूमिभागाचे लहान लहान तुकडे समुद्रांतील लहान लहान बेटांप्रमाणें दिसत होते. हा विलक्षण देखावा पहात आम्ही किती वेळ तरी उभे होतों. इतक्यांत आमच्यामागें पूर्व दिशेला सूर्यानें आपलें डोकें उदयाचलाच्या माथ्यावर काढल्याबरोबर त्याचे किरण त्या हिमतुषारमय समुद्रावर पडूं लागले, तसतसें तें धुकें वितळून आह्मांला समुद्राच्या ठिकाणीं जमीन दिसूं लागली, व या समुद्राचा हा पालट एका क्षणांत झाला. हा विलक्षण देखावा पाहून कोंकणप्रांत निर्माण झाल्याची कथा कशी उत्पन्न झाली असेल, याची मला उत्तम कल्पना आली. पूर्वीं सह्याद्रिपर्यंत समुद्र होता, म्हणजे सर्व कोंकणाचा भाग जलमय होता. पुढें परशुरामानें आपल्या बाणानें समुद्राचें पाणी मागें हटवून कोंकणाचा भूमिभाग निर्माण केला, अशी दंतकथा आहे. ही दंतकथा मीं पाहिलेल्या देखाव्यावर उत्तम रूपक आहे. तेव्हां माझ्यासारख्या प्रत्यक्ष अनुभव आलेल्या एकाद्या कवीनें ही दंतकथा रचली असावी, असें मला त्या वेळीं वाटलें. हरिद्वारच्या गंगाकिनाऱ्यावरील अलौकिक देखावा अवलोकन करून गंगावतरणाची कथा अशीच रूपकानें निर्माण झाली असावी, असें मला वाटतें. ही कथा रामायणांत व महाभारतांत बहुतेक सारखीच आहे. महाभारतांत गंगावतरणाचा अगस्त्य ऋषीनें समुद्र प्राशन करून टाकल्याच्या कथेशीं संबंध जोडला आहे येवढेंच. इक्ष्वाकु वंशांत फार प्राचीन काळीं सगर ह्मणून मोठा राजा होऊन गेला. त्याला दोन बायका होत्या. एकीपासून त्याला असमंज म्हणून चिरकालिक कीर्ति मिळविणारा मुलगा झाला, व दुसरीपासून साठ सहस्र मुलगे झाले. सगरानें एकदां अश्वयज्ञास प्रारंभ

केला. परंतु त्याचा अश्व असूयाप्रेरित इंद्रानें पळवून नेऊन पाताळांत कपिलमहामुनि तप करीत होते तेथें ठेवला. सगरानें आपल्या साठ सहस्र मुलांना अश्वशोधार्थ पाठविलें. त्यांनीं अश्वाचा दशादिशा शोध केला तरी त्याचा सुगावा लागला नाहीं. तेव्हां त्यांनीं पित्राज्ञेनें पृथ्वी खणण्यास प्रारंभ करून ते पाताळापर्यंत खणीत गेले. तेथें त्यांनीं कपिल महामुनि व त्यांचे शेजारीं आपला यज्ञाश्व पाहिला. हाच चोर समजून ते त्याच्या अंगावर धावले. कपिल महामुनींना राग येऊन त्यांनीं या साठसहस्र सगर पुत्रांना भस्मसात् करून टाकिलें. इकडे सगर आपले मुलगे अजून कां येत नाहींत अशा विवंचनेंत होता. शेवटीं फार काळ लोटला म्हणून त्यानें आपला नातू अंशुमान याला त्यांचे शोधार्थ पाठविलें. तो शोध करीत करीत कपिल महामुनि ज्या ठिकाणीं होते त्या ठिकाणीं आला व त्यानें त्या मुनीला प्रणाम करून त्यांना कुशल प्रश्न केले व आपल्या चुलत्यांची माहिती विचारली. तेव्हां कपिल महामुनि संतुष्ट होऊन त्यांनीं त्याला अश्व परत दिला व सगराच्या भस्मसात् झालेल्या मुलांच्या उद्धाराकरितां गंगा पातालाप्रत आणण्यास सांगितलें. अश्व परत आल्यावर सगरानें आपला यज्ञ पुरा केला. अंशुमानाला गंगा खालीं कशी आणावी हें समजलें नाहीं. पुढें त्याला दिलीप म्हणून मुलगा झाला, त्यानेंहि गंगा आणण्याची खटपट केली, परंतु त्याचेहि हातून सगरपुत्रांचा उद्धार झाला नाहीं. परंतु दिलीपाचा मुलगा भगीरथ म्हणून होता. हा फार धार्मिक व दृढनिश्चयी होता. त्यानें आपल्या पूर्वजांचा उद्धार करण्याचा निश्चय केला व त्या-करितां त्यानें घोर तप आरंभलें. त्या तपानें प्रसन्न होऊन गंगेनें पाता-लामध्यें जाण्याचें कबूल केलें. परंतु "स्वर्गाहून खालीं पडतांना माझा वेग पृथ्वीला सहन होणार नाहीं. तरी तूं शंकराची आराधना करून त्यांना आपल्या डोक्यावर मला घेण्यास विनंति कर." असें गंगेनें सांगितलें. गंगेच्या सांगण्याप्रमाणें भगीरथानें पुनः तप करून शंकराला प्रसन्न करून घेतलें. शंकरहि त्याच्या तपानें प्रसन्न होऊन त्यानें गंगेला धारण कर-ण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें प्रथमतः गंगा स्वर्गातून शंकराच्या डोक्या-वर पडली, तेथून हिमालयाच्या माथ्यावर पडली, तेथून जमिनीवर फार

वेगानें आली व पुढें भगीरथाच्या रथाचे मागोमाग समुद्रापर्यंत जाऊन पुढें पाताळांत गेली. तेथें भगीरथानें आपल्या पूर्वजांच्या भस्मावर गंगाजल शिंपडलें व त्यांना जलदान केलें. व त्या योगानें ते सर्व स्वर्गाप्रत गेले. गंगावतरणाची ही कथा म्हणजे स्वाभाविक दिसणाऱ्या सृष्टीच्या देखाव्यावर एक प्रकारचें कविकृत रूपक आहे असें कोणास वाटणार नाहीं ! असो.

आतां आपण हरिद्वारच्या प्रेक्षणीय स्थळांकडे वळूं. येथलें पहिलें प्रेक्षणीय स्थळ व अत्यंत पवित्र स्थान म्हणजे 'हरीकी पायरी' होय. हा स्नानाचा घाट आहे व याच्या एका भिंतीच्या एका कोनाड्यांत विष्णूच्या पादुका असलेला एक दगड बसविलेला आहे. हा घांट पूर्वी फार लहान होता. त्याला ३९ पायऱ्या होत्या व तो ३४ फूट लांब होता. सर्व यात्रेकरूंची इच्छा या घांटावर येऊन स्नान करण्याची असते. यामुळें येथें अत्यंत गर्दी होते. १८२० मध्यें मोठ्या यात्रेच्या प्रसंगीं अत्यंत गर्दीनें ४३० माणसें मेलीं. तसेंच पुष्कळ माणसें वारंवार बुडून मरत; ह्मणून सरकारनें हा घांट साठ पायऱ्यांचा व शंभर फूट लांबीचा केला. १८९२ मध्यें येथें कालराही फार झाला होता. याकरितां हरिद्वार इंप्रुव्हमेंट सोसायटी काढण्यांत आली व तिनें पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. सर्व नदीकिनारा व नदीचा तळ फरसबंदी केला. या घांटावर नेहमीं पाण्याचा सारखा व बेताचा प्रवाह येईल, अशी तजवीज केली. गंगानदी पर्वत सोडून मैदानावर या ठिकाणीं एकदम पसरते; यामुळें तिचे येथें पुष्कळ फांटे झालेले आहेत. पश्चिमेकडच्या फांट्यावर हरिद्वार आहे. आक्टोबरमध्यें जेव्हां मी हरिद्वारास गेलों होतों, तेव्हां या घांटाजवळ मुळींच पाणी नव्हतें. हा सर्व भाग पांढऱ्या दगडांनीं युक्त दिसत होता. नदीचा प्रवाह या ऋतूंत अत्यंत कमी होतो. पण या दिवसांत गंगेचें पाणी फारच सुंदर दिसतें. या ऋतूंत स्नान करण्याकरितां घाटाजवळचा किनारा सोडून जरा पलीकडच्या प्रवाहाकडे जावें लागतें. परंतु या खेपेला जेव्हां मी हरिद्वारला आलों, तेव्हां सर्व फांटा तुडुंब भरून चालला होता. ज्याप्रमाणें वर्षाकालांत आपल्या इकडे नद्या दुथडी भरून वेगानें जातात,

तशी या वेळीं गंगानदी भरून चालली होती. हा देखावा पाहून मला विलक्षण आश्चर्य व कौतुक वाटलें. ज्या वेळीं सर्व ठिकाणीं पाण्याची टंचाई होते, ज्या कालांत सर्व नद्यांना पाण्याचें दारिद्र्य येतें, त्याच भर उन्हाळ्याच्या दिवसांत या नदीला मोठा पूर आलेला पाहून प्रथमच उत्तर हिंदुस्थानांत जाणाराला याचें फारच आश्चर्य वाटतें. पण या पुराचें कारण उघड आहे. उष्णतेमुळें हिमालयावरील बर्फ भराभर वितळूं लागतें व त्यामुळें या नदीला मोठा पूर येतो. हिमालयांतून निघणाऱ्या सर्व नद्यांचा हाच विशेष आहे. हरिद्वारच्या ऋतुभेदामुळें झालेल्या विपर्यासाकडे पाहून मला सानंद आश्चर्य वाटलें व उत्तररामचरित्रांतील **'पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरिताम्'** या श्लोकाची आठवण झाली. मात्र या ठिकाणीं **'पुरा यत्रारोधः सलिलमधुना तत्र सरिताम्'** असा प्रकार झाला होता. हरिद्वारच्या देवळांमधील सर्वांत मोठें व महत्त्वाचें देऊळ गंगाद्वार हें या शेजारींच आहे. हरीकी पायरीचा देखावा खरोखरच अवर्णनीय आहे. प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज त्याच्या सौंदर्याची कल्पना करतां येणार नाहीं.

याच्या दक्षिणेस सारखा विटांची फरशी केलेला अर्वाचीन तऱ्हेचा प्लॅटफॉर्मसारखा घांट आहे व त्याचे एका बाजूला नदीचा प्रवाह व एका बाजूला धर्मशाळा व देवळें लागतात. काशी किंवा मथुरा या ठिकाणींहि असाच देखावा आहे खरा, तरी पण तेथें घांटाघांटाचा संबंध नाहीं; यामुळें नदी किनाऱ्याला सारखें फिरतां येत नाहीं. हरिद्वारचा हा एक विशेष आहे. या ठिकाणीं सायंकाळीं फिरावयास येण्याची फार मौज वाटते. आमचा येथें मुक्काम असेपर्यंत रोज सायंकाळीं येथें सहल करण्यास येण्याचा आमचा परिपाठ असे. एकीकडे तुडुंब भरून वेगानें धांवणारी प्रचंड नदी व दुसरीकडे निरनिराळ्या तऱ्हेच्या सारख्या लागलेल्या इमारतींचा देखावा व उत्तरेस तो हिमाच्छादित धवलगिरी! हा देखावा अद्वितीय दिसतो व या ठिकाणापासून केव्हांहि हलूं नये असें वाटतें. इतर सर्व पवित्र स्थानांपेक्षां हरिद्वारचा हाच विशेष आहे कीं, त्या ठिकाणीं धार्मिक पावित्र्य व सृष्टिसौंदर्य यांचा पूर्ण मिलाफ झालेला आहे आणि

यामुळें हें स्थान केवळ धर्मश्रद्ध लोकांनाच प्रिय होतें असें नाहीं, तर तें आमच्यासारख्या माणसासहि अत्यंत प्रिय वाटतें व अशा ठिकाणीं वर्षांचे कांहीं दिवस घालवितां आले, तर ती महद्भाग्याची गोष्ट होय, असें वाटूं लागतें. असो.

हरिद्वारमधलें दुसरें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे गांवावरून उत्तरेच्या बाजूला जाणारा रस्ता व तेथील सृष्टिसौंदर्य होय. हाहि देखावा अवर्णनीय आहे. गांवाला लागूनच टेकड्या आहेत हें वर सांगितलेंच आहे. या टेकड्यांना लागूनच केव्हां केव्हां टेकड्यांचा भेद करून व केव्हां केव्हां बोगदा पाडूनच डेहराडूनचा रस्ता गेला आहे. एकीकडे हा नागमोडीचा रस्ता व त्याच्या पलीकडे प्रचंड टेकड्या आणि दुसऱ्या बाजूला गांव व दुथडी भरून वहात जाणारी नदी हा देखावा प्रेक्षणीय आहे. गांवाजवळ रेलवेचा एक लहानसा बोगदा आहे, त्यामुळें रस्ता सुंदर दिसतो. टेकड्या सर्व खडकाच्या आहेत. या सर्व डोंगरांत लहान लहान गुहा व पर्णकुटिका बांधलेल्या आहेत. या ठिकाणीं बैरागी व तपस्वी लोक राहतात. हा देखावा पाहून पुराणांतरींच्या ऋषींची व त्यांच्या पर्णकुटिकांची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं व या ऋषींची पूर्वीची राहणी किती साधी असे याची थोडीशी कल्पना येते. जरा पुढें गेलें म्हणजे रेलवेचा एक पूल लागतो व या पुलाखालून गेलें म्हणजे भीमघोडा तलाव लागतो, येथें टेकड्या जरा आंत गेल्यासारख्या आहेत व त्या पोकळींत हा तलाव व जवळचीं देवळें बांधलेलीं आहेत. अशी दंतकथा आहे, कीं, पांडवांपैकीं भीमाला गंगावतरणाचे वेळीं येथें घोड्यावर उभें राहण्यास सांगितलें होतें. त्याच्या घोड्याची लाथ लागून तेथें टेकड्यांमध्यें खांच पडली व तिचा तलाव झाला. या दंतकथेला महाभारतांत किंवा रामायणांत मुळींच आधार नाहीं. आपल्या लोकांना निव्वळ नांवावरून दंतकथा बनविण्याची फार संवय आहे, त्याचेंच हें उदाहरण आहे. हा रस्ता आगगाडीच्या रस्त्याचे बाजूनें डेहराडूनपर्यंत गेला आहे. याच रस्त्यानें बद्रीकेदारला जातात. हरिद्वारहून बदरिकेदारास जाण्यास सुमारें दहा दिवस लागतात. प्रवास पायींच करावा लागतो. या रस्त्यानें मैल सव्वा मैल गेल्यावर गंगेच्या

कालव्याचें काम लागतें. तेथें मोठें धरण वगैरे आहे, अशांतला प्रकार नाहीं. गंगेचे दोनतीन फांटे होतात. त्या निरनिराळ्या फांट्यांत पाणी विभागून न जातां एकाच पश्चिमेकडच्या फांट्याकडे ओघ वळावा अशी तजवीज केलेली आहे. नदीचें पाणी आणखी उंच व्हावें ह्मणून सध्यां कांहीं बांधकाम चाललें आहे तें आम्ही पाहिलें. याप्रमाणें पाण्याचा ओघ हरिद्वारच्या फांट्यांत आणून हरिद्वारच्या खालीं नदीच्यापासून कालवा वेगळा करून घेतला आहे. असो.

परंतु हरिद्वारचें सर्वांत प्रेक्षणीय स्थळ म्हणजे कनखल तीर्थ हें होय. कनखल हें गांव हरिद्वारपासून दीड मैलावर आहे. या गांवांत दगडाची फरशी आहे, घरें बऱ्या प्रकारचीं आहेत. बाजारहि मोठा असून दिसण्यांत बरा आहे. हरिद्वारपासून कनखलला जाण्यास एक्के मिळतात. ते माणशीं एक एक आणा घेतात. येथें दक्षप्रजापतीचें मोठें देऊळ आहे व नदीच्या तीराला एक लहानसा घांट आहे. किनाऱ्यावर मोठमोठे वडाचे वृक्ष आहेत. या घांटाच्या पायथ्याशींच प्रसिद्ध कनखल तीर्थ आहे. येथल्या गंगेचा देखावा हरिद्वारापेक्षां अगदींच निराळा आहे. येथें नदीचें पात्र फारच रुंद झालेलें आहे व त्यांचे निरनिराळे प्रवाह बनलेले दिसतात. येथून टेकड्या बऱ्याच दूर अंतरावर गेल्या आहेत व हरिद्वारप्रमाणें येथें नदीच्या किनाऱ्याला भिडलेलीं अशीं देवळें किंवा घरें नाहींत. मी पहिल्यांदां या क्षेत्रीं जेव्हां आलों, त्या वेळचा देखावा मी आजन्मांत विसरणार नाहीं. नदीच्या घांटाला लागून प्रवाह जोरानें वाहत होता व त्यामुळें पाण्याला फेंस येत होता. आधींच गंगेचें पाणी शुभ्र. त्यांतच तो फेंस मिसळलेला. बरें किनाऱ्याच्या बाजूला असलेले दगड व गोटेहि शुभ्रच. या प्रवाहाच्या समोर व आम्ही ज्या घाटावर बसलों होतों त्याच्या समोरच नदीला एक उंचवटा होता. तो उंचवटा सर्व शुभ्र दगडांनीं व गोट्यांनीं भरलेला होता व त्यामधून सारख्या शुभ्र पाण्याच्या हजारों धारा खालीं कनखल तीर्थांत सळसळ करीत पडत होत्या. यामुळें त्या प्रवाहाला विशेषच शोभा आली होती. सर्व पाण्याकडे नजर ठरत नव्हती. ते हजारों झरे किंवा धारा तर इतक्या वेगानें मुख्य प्रवाहांत

पडत होत्या कीं त्या ठिकाणीं लहरींचा भास होत होता. हें स्थान पाहून माझें मन थक्क होऊन गेलें. या ठिकाणीं गडबड किंवा मनुष्यवस्तीचा गंधहि दिसून येत नाहीं.सर्व ठिकाण शांततामय भासतें.अशा प्रकारचें ठिकाण समाधीला व मनाच्या एकाग्रतेला फार उत्तम असें वाटतें. आम्ही घांटावर गेलों तेव्हां तेथें कोणीहि माणूस नव्हतें. आम्ही त्या देखाव्याकडे किती वेळ पहात होतों याचें आम्हांला भानच राहिलें नाहीं. इतक्यांत आमचा गाडीवाला फार उशीर झाला म्हणून आमचा शोध करीत आला व मग आम्हांला निरुपाय म्हणून तेथून पाय काढावा लागला. परंतु तें ठिकाण सोडतांना प्रियजनाचा वियोग होतांना ज्या प्रकारची मनाची स्थिति होते तशी आमच्या मनाची स्थिति झाली. दुसऱ्या खेपेला जेव्हां आम्ही कनखल तीर्थाला आलों तेव्हां तो पूर्वींचा देखावा गुप्त झाला होता. आक्टोबरमध्यें 'हरिकी पायरी' चा घाट शुष्क व जलविहीन होता, तर कनखल तीर्थ जलपूर्ण व आपल्या पूर्ण वैभवांत होतें. मेमध्यें आम्ही गेलों तों 'हरिकी पायरी' जलमय झालेली व आपल्या पूर्ण वैभवांत होती, तर कनखल तीर्थ अगदीं शुष्क जलहीन होतें. तेव्हां या असल्या पवित्र स्थानांनासुद्धां **'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण'** याप्रमाणें वागविणाऱ्या दैवाच्या फेऱ्यानें सोडिलें नाहीं, हें पाहून एक प्रकारचा खेद वाटला व ऋतुमानानें या प्रेक्षणीय स्थळांत होणाऱ्या विपर्यासाचें सखेदाश्चर्य वाटलें. तरी पण कनखल तीर्थाचे ठिकाणीं गेलें म्हणजे आपण मूर्तिमंत शांततेच्या ठिकाणीं आलों आहोंत, असें वाटल्याखेरीज रहात नाहीं.

येथील तिसरें पाहण्यासारखें ठिकाण म्हणजे मयापूर हें होय. येथें एकदोन फार जुनीं देवळें आहेत. एक देऊळ बुद्धदेवाचें स्थान म्हणून सांगतात. हें दुसऱ्या एका बाजूनें येणाऱ्या मोठ्या ओढ्याच्या कांठीं आहे व येथला देखावा बरा आहे. परंतु देऊळ फारसें जुनें आहे असें आम्हांला वाटलें नाहीं. असो.

अशीं निरनिराळीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्यांत व रोज सायंकाळीं गंगेच्या किनारीं सहल करण्यांत आमचा आठवडा मोठ्या आनंदानें गेला. येथें

आमची जेवणाची सोय उत्तम जमत असे हें वर सांगितलेंच आहे. येथला बाजार बराच मोठा आहे व सर्व जिन्नस येथें चांगले मिळतात. दूधदहीं तर फारच चांगलें असतें. दक्षिणेंतून इकडे प्रथमच येणाराला येथल्या बाजारांतील एका चालीचें आश्चर्य वाटतें. येथें सर्व जिनसा वजनी मापानें विकतात. तांदूळ तोलून घ्यावे लागतात! डाळ तोलून घ्यावी लागते! आटा तोलून घ्यावा लागतो! हिरवे आंबेसुद्धां तोलून घ्यावे लागतात! सारांश, या बाजारांत मापीवजन किंवा संख्यामोजणी ठाऊकच नाहीं, असें वाटतें. या ठिकाणीं साधुसंत असल्यामुळें म्हणा किंवा प्रघात आहे म्हणून म्हणा, येथें खडावा फार चांगल्या मिळतात. एका पांढरट तांबूस दगडाच्या दगड्या वगैरे पदार्थहि पुष्कळ मिळतात. बाकी म्हणण्यासारखा व्यापार या गांवाला नाहीं.

कनखल, हरिद्वार व ज्वालापुर हीं तीन गांवें मिळून 'हरिद्वार युनियन' म्हणून एक म्युनिसिपालिटी आहे. हीं तिन्हीं गांवें आरोग्याच्या दृष्टीनें फार चांगलीं आहेत. मथुरा किंवा काशीसारखी येथें घाण किंवा दुर्गंधी मुळींच नाहीं. सर्व घरें अगदीं स्वच्छ आहेत व गांवांत किंवा नदींत कोठेंहि घाण नाहीं. येथें नदीचा प्रवाह जोराचा असल्यामुळें नदींत घाण राहूं शकत नाहीं. बारा वर्षांनीं येथें मोठा कुंभमेळा भरतो, त्या वेळीं फार मोठी यात्रा भरते. बाकी या ठिकाणीं बाराहि महिन्यांत निरनिराळ्या प्रांतींचे यात्रेकरू दृष्टीस पडतात. उत्तर हिंदुस्थानांत सर्व पवित्र स्थानांत स्वच्छता व सृष्टिसौंदर्य या बाबतींत या क्षेत्राचा पहिला नंबर लागेल, असें मला वाटतें.

या ठिकाणचें शब्दांनीं यथार्थ वर्णन करणें अशक्य आहे. हें ठिकाण प्रत्यक्ष पाहिल्यावांचून त्याचें महत्त्व कधींहि कळावयाचें नाहीं. तरी वाचकांना अशा पवित्र स्थानाचें दर्शन पूर्ववयांत घेण्याची बुद्धि होवो अशी इच्छा प्रदर्शित करून हें हरिद्वारचें वर्णन संपवितों.

— ४ —

गुरुकुल

मी उत्तर हिंदुस्थानांतील प्रवासास सुरुवात केली तेव्हांपासून 'गुरुकुल' ही संस्था पहाण्याचा माझा मानस होता; परंतु पहिल्या प्रथम मी हरिद्वारला गेलों तेव्हां तेथें मी फक्त दोनच दिवस होतों. ते दोन दिवस तेथील अवर्णनीय सृष्टिशोभा पाहण्यांत केव्हांच निघून गेले. तेव्हांसुद्धां मी गुरुकुलाबद्दल चवकशी केली; परंतु मी एका फक्त हिंदी जाणणाऱ्या जुन्या तऱ्हेच्या पंड्याकडे उतरलों असल्यामुळें मला आधीं बरोबर माहिती मिळाली नाहीं; शिवाय जी मिळाली त्यांत हरिद्वारपासून गुरुकुल पांच मैल आहे असें कळलें; तेव्हां इतक्या लांब जाऊन येण्यास व ती संस्था सावकाशपणें अवलोकन करण्यास सवड सांपडणार नाहीं, असें दिसून आलें. म्हणून मनांतील उत्कंठा दाबणें भाग पडलें; पण ती संस्था उभ्या उभ्या व अगदीं तांतडीनें पाहून जाणें बरोबर नव्हे, असेंहि मनाला वाटलें. कारण, या संस्थेबद्दल व तिच्या उत्पादकाच्या आत्मत्यागाबद्दल वर्तमानपत्रांत किती तरी वेळां मीं वाचलें होतें. शिवाय, पंजाबांतील आर्यसमाजाची ही संस्था असल्यामुळें या पंथांतील लोकांमध्यें तिच्याबद्दल विलक्षण उत्साह, अभिमान व आदर वसत आहे; गुरुकुलाच्या वार्षिक उत्सवप्रसंगीं हजारों स्त्रीपुरुष तेथें जमतात व दरवर्षीं अर्धा अर्धा लाख रुपये रोख जमा होतात, असें मीं ऐकिलें होतें. तेव्हां अशी महत्त्वाची संस्था ज्या वेळीं मला वेळ अगदीं थोडा होता त्या वेळीं पाहिली नाहीं, हें एका अर्थीं बरें झालें.

एके दिवशीं सायंकाळीं आम्ही एक्क्यांत बसून कनखल तीर्थाला गेलों होतों. तेथील सर्व देवळें पाहिल्यावर आम्ही थोडा वेळ घांटावर जाऊन बसलों, व गंगेच्या प्रचंड पात्राकडे, त्याचप्रमाणें दृष्टि पोहोंचेपर्यंत हिमालयाच्या उंचउंच पर्वतराजींकडे पाहत होतों. याप्रमाणें थोडा वेळ गेल्यावर मुक्कामाला परत फिरण्याचे आधीं आम्ही "गुरुकुल कोठें आहे, त्याला रस्ता कोणता, तेथें केव्हां जावें, गाडी वगैरे जाते किंवा नाहीं ?" वगैरे गोष्टींची चवकशी आमच्या मोडक्यातोडक्या हिंदी भाषेंत करीत होतों; इतक्यांत एक तद्देशीय गृहस्थ आमच्याकडे आले व त्यांनीं "तुम्हांला गुरुकुल पहावयाचें आहे काय ?" असा इंग्रजींत प्रश्न केला.

हा प्रश्न ऐकून आम्हांला स्वाभाविकच आनंद झाला व भाषेसंबंधीं अडचणहि दूर झाली. आम्हीं त्या गृहस्थाला म्हटलें कीं, "आम्हांला गुरुकुलास जावयाचें आहे व आम्ही त्याबद्दलच चवकशी करीत आहों."

ते गृहस्थ म्हणाले "गुरुकुलांतील एक प्रोफेसर आतां येथेंच आहेत, व ते दक्षिणी गृहस्थ असून त्यांनीं मला आपल्याला विचारण्यास पाठविलें आहे. तेच आले असते, परंतु आपल्याला बरें वाटेल किंवा नाहीं ही शंका येऊन ते आले नाहींत."

हें ऐकून आम्हांला फारच आनंद झाला. विशेषतः इतक्या दूरच्या प्रदेशांत आपली भाषा बोलणारे व आपल्याच देशांतील गृहस्थ येथें शिक्षक आहेत, हें ऐकून तर आमचा आनंद गगनांत मावेना ! आतां आपल्याला गुरुकुलाची सर्व माहिती मिळून पाहण्यासंबंधीं कांहींएक अडचण राहणार नाहीं असें वाटून, आह्मी फार सुदैवी ह्मणून सहजगत्या असा योग आला, असें आह्मीं ह्मटलें. इतकें बोलणें झाल्यावर आह्मी त्या गृहस्थाबरोबर देवळाच्या लतामंडपानें सुशोभित केलेल्या एका ओरी-कडे गेलों. तेथें एका साधारण ठेंगण्या, पण तेजस्वी व पाणीदार गृह-स्थाला पाहिलें. त्यांचा आमचा परिचयविधि झाला. प्रो. व्ही. जी. साठे

हे मुंबईकडील राहणारे आहेत व ते स्वतः एम्. ए., असून त्यांचे बंधु पूर्वी आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेचे प्रिन्सिपाल होते व हल्लीं मुंबईस वकिलाचा धंदा करतात, असें समजलें. शिवाय, प्रो. साठे यांनीं मला मुंबईस एकदोन वेळां पाहिलें होतें. याप्रमाणें ओळख निघाल्यानें विशेषच आनंद झाला, व आह्मांला सर्व गोष्टी आपल्याच भाषेच्या द्वारें ठरवितां आल्या. प्रो. साठे यांनीं दुसऱ्या दिवशीं सकाळींच गुरुकुल पाहण्यास येण्याबद्दल व तेथें सबंध दिवस राहून सायंकाळीं परत फिरण्याबद्दल आह्मांला सांगितलें, व सात आठांच्या सुमारास आपला मनुष्य वाटेवर ठेवतों, असें आश्वासन दिलें. इतकी आमच्याकरितां तसदी घेतल्याबद्दल व सुदैवानें अशी अचानक गांठ पडून ओळख झाल्याबद्दल आनंद प्रदर्शित करून व प्रो. साठे यांचे आभार मानून आह्मी प्रमुदित मनानें आमच्या निवासस्थानास परत आलों. मुक्कामाला येतांच आमच्या अर्वाचीन स्थालीची आराधना करून तींत अन्न शिजण्यास लावून नित्य क्रमाप्रमाणें आह्मी गंगेच्या घांटावर सहल करावयास गेलों.

या वेळची घांटाची शोभा अवर्णनीय असते. आधीं सर्व घांट माणसांनीं फुललेला असतो. निरनिराळ्या देवळांतून देवांची पूजा व आरती चालू असते. व निरनिराळ्या आवाजाच्या घंटांचा नाद चालू असतो. सर्व ठिकाणीं यात्रेकरूंची सारखी गर्दी असते. 'हरीकी पायरी'च्या घांटावरील गर्दी तर विचारूंच नका ! आरतीच्या दीपावलीचा प्रकाश प्रवाहावर पडून त्या प्रवाहाला जास्तच शोभा आली होती. आह्मी हरिद्वारास होतों ते दिवस चांदण्याचे नव्हते; परंतु चांदण्याच्या दिवसांत व विशेषतः पौर्णिमेच्या सुमारास नदीवरील व घांटावरील देखावा यापेक्षांहि सुंदर दिसतो, असें आह्मांला सांगण्यांत आलें व त्याचें थोडेंसें प्रत्यंतर आह्मांला आमच्या हरिद्वारच्या आठवड्यांतील शेवटच्या एकदोन दिवशीं आलें. कारण, त्या दिवसांत थोडासा चंद्रप्रकाश पडूं लागला होता. घांटावर बसून धो धो वाहणाऱ्या गंगाप्रवाहांत पाय सोडून बसण्याची फारच मौज वाटते. ते उन्हाळ्याचे दिवस, तरी पण अशा तऱ्हेनें फार वेळ पाण्यांत पाय सोडून बसवत नाहीं. अर्धापाव तास बसलें कीं, सर्व उष्मा नाहींसा

होई व दिवसाचा सर्व थकवा जाऊन मन फार प्रसन्न होई. घांटावर इकडे तिकडे सहल करून मग थोडा वेळ पाण्यांत पाय सोडून बसण्याचा आमचा रोज परिपाठ पडला होता. अशा वेळीं नानातऱ्हेचे विचार मनांत येत व पूर्वींच्या ऋषींनीं हिमालयासारखीं ठिकाणें तपाला उत्तम ह्मणून कां पसंत केलीं, हें सहज ध्यानांत येई. मनुष्याचें मन धर्मपरायण व ईश्वरपरायण बनण्यास, मनाची एकाग्रता साधण्यास, आत्म्याची समाधी लागण्यास, हीं शांत, गंभीर स्थानें फारच अनुकूल होत, यांत मुळींच शंका नाहीं.

याप्रमाणें बराच वेळ गंगानदीची शोभा पाहून व तिचा सुखस्पर्श अनुभवून आह्मी परत येतों, तों आमच्या दिव्य स्थालीनें आमची पाकनिष्पत्ति उत्तम तऱ्हेची करून ठेविली होती. लवकरच भोजन आटोपून आह्मी गच्चीवर निजण्यास गेलों. इकडल्यातिकडल्या गोष्टी बोलत असतांना व उद्यां आपल्याला गुरुकुल पहावयास जावयाचें आहे या आनंदमय विचारांत असतांना, आह्मांला निद्रादेवीनें मोहून टाकलें व लवकरच आह्मांला गाढ झोंप लागली.

आदल्या दिवशीं ठरल्याप्रमाणें आह्मीं पहांटेस पांच वाजतां उठलों, व गुरुकुलास जावयाचें तें स्नान करूनच जावें ह्मणजे बरोबर कपडालत्ता नेण्याचा त्रास नको, असा विचार करून लागलीच गंगेवर स्नानास गेलों. स्वच्छ गंगास्नान करून आणि निवळ दुधाचा चहा घेऊन आह्मी एक्क्यामधून सुमारें सहा साडेसहांला कनखल तीर्थाला आलों. गुरुकुलचा रस्ता या तीर्थाच्या खालच्या बाजूनेंच जातो, व तो सर्व नदीच्या वाळवंटांतून जात असल्यामुळें आह्मीं सर्व रस्ता पाहत पाहत व चालत चालत जाण्याचा बेत केला होता. ह्मणून एक्का देवळाशींच सोडला, व आह्मी वाट चालूं लागलों.

कनखलापासून गुरुकुलाचें ठिकाण तीन मैल आहे. परंतु बहुतेक सर्व रस्ता नदीच्या पात्रांतूनच जातो. कारण, हरिद्वारच्या खालीं गंगानदीचें पात्र फारच रुंद झालेलें आहे व तिचे निरनिराळे प्रवाह बनलेले आहेत. ज्याप्रमाणें एकादी अल्लड हरणी अथवा कालवड

गोट्यांतून बाहेर पडली ह्मणजे सैरावैरा धावूं लागते, त्याप्रमाणें येथें गंगेची स्थिति होते. हरिद्वाराजवळ तिला दोन टेकड्यांचा प्रतिबंध आहेसा दिसतो; परंतु हिमालयाच्या पर्वतराजींच्या कोंडवाड्यांच्या शेवटाच्या दारांतून मोकळ्या मैदानावर गंगा आली ह्मणजे ती सैरावैरा धांवत आहे कीं काय, असा भास होतो. कनखल तीर्थाच्या खालींच गुरुकुलची वाट नदीच्या पात्रांतून लागते. गंगेच्या पात्रांत बहुतेक दगड शुभ्र आहेत. परंतु मधून मधून निरनिराळ्या रंगांचे दगडहि दृष्टीस पडतात. तांबडा, पिंवळा, हिरवा, निळा, काळा, वगैरे निरनिराळ्या रंगांच्या व त्यांच्या निरनिराळ्या छटांच्या गोट्यांनीं भरलेलें पात्र पाहून प्रथमतः पहाणाराला आश्चर्य वाटतें. कारण, आपल्या इकडे सर्व नद्या एकाच काळ्याकुट्ट गोट्यांनीं भरलेल्या असतात. त्यांत वैचित्र्य फारच क्वचित् असतें. अशा प्रकारची मौज व दगडांचें वैचित्र्य नर्मदा नदीच्या पात्रांत व विशेषतः जबलपुरनजीक मार्बल रॉक्स ह्मणून जो नर्मदेचा भाग आहे, त्यामध्यें दिसून येतें. लहान मुलांना वाळूंतील शिंपा वेंचण्याची जशी हौस वाटत असते, त्याप्रमाणें गंगेच्या या पात्रांतून जातांना मोठ्या माणसांनांहि हौस वाटते. निरनिराळ्या रंगांचे गोटे गोळा करण्याची तशी हौस आह्मांलाहि वाटली, व खरोखरीच आह्मीं प्रत्येकानें हातरुमालांत मावतील इतके गोटे गोळा केले. परंतु फार जड झाल्यामुळें आह्मांला त्यांतले बरेच 'समुद्रास्तृप्यंतु' नव्हे 'नदास्तृप्यंतु' करावे लागले. तरी पण, सरासरी हातरुमालभर गंगेंतील गोटे आह्मीं पुण्यास आणलेच !

गंगेच्या पात्राची शोभा पाहात, व उत्तरेची दिशा भरून टाकणाऱ्या हिमालयाची दूरस्थित रांगची रांग निरखीत आणि नकळत भूगर्भशास्त्रज्ञाप्रमाणें निरनिराळ्या जातींचे दगड जमवीत चालल्यामुळें आमचा प्रवास फार धीरेंधीरें होत होता. कनखलपासून गुरुकुलाला पोहोंचेपर्यंत वाटेंत लहान मोठे असे नदीचे पांच प्रवाह लागतात. त्या पांचांवरहि लहान मोठे पूल केलेले आहेत. पूल कच्चे आहेत. दोन पूल जरा मोठे आहेत. ते होड्या एकापुढें एक ठेवून, त्या होड्या दोरखंडांनीं जखडून त्यांवर लांकडाचे ओंडे टाकून, त्या ओंड्यावर आडव्या फळ्या व वांसे बांधून

त्यांवर गवत पसरून वर मातीचा थर देऊन सरासरी गाडी जाण्यापुरते कच्चे पूल केलेले आहेत. कांहीं पूल तर दोन चार लांकडाचे ओंडे टाकूनच केलेले आहेत. कारण, प्रवाहाची धार फारच लहान आहे.

हे सर्व कच्चे पूल पाहिले ह्मणजे पुढें येणाऱ्या गुरुकुलाच्या साधेपणाचीच साक्ष पटते, व आपण सृष्टिकृतींत अवश्य तितक्याच भर घातलेल्या स्थळाकडे जात आहों असें वाटतें. गंगेचा सर्वांत मोठा जो प्रवाह आहे, व ज्यावर बराच लांब पण कच्चाच पूल आहे, तो ओलांडल्यावर तरीचें नाकें लागतें. व तेथें दरमाणशीं एक पैसा तरभाडें द्यावें लागतें. या ठिकाणींच प्रो. साठे यांनीं वाट दाखविण्याकरितां पाठविलेला मनुष्य आह्मांला भेटला.

हा प्रवाह टाकल्यावर नदींत बनलेलें एक बेट लागतें. या बेटावर जंगल साधारणच आहे. फार उंच किंवा फार दाट झाडी नाहीं. पुढें लवकरच शेवटचा प्रवाह ओलांडून आपण गुरुकुलाच्या मर्यादेंत प्रवेश करतों. परंतु गुरुकुल जवळ आल्याचें एकहि चिन्ह दिसत नाहीं. फक्त एक दूरवर निशाण दिसतें. त्या खुणेनेंच जावयाचें असतें. थोड्याच वेळानें आपण तीनशें साडेतीनशें मनुष्य वस्तीच्या खेड्यासारख्या ठिकाणीं जाऊं असें वाटत नाहीं. कारण, आतां सर्व भाग जंगलाप्रमाणें भासतो. झाडेंहि जास्त दाट दिसूं लागतात. हा देखावा गुरुकुलाच्या अगदीं बाहेरच्या कवाडाशीं येईपर्यंत सारखा दिसतो. हें कवाड दिसलें ह्मणजे आपण मनुष्य वस्तींत आलों, असा विश्वास पटतो.

आह्मीं कवाडांतून आंत शिरलों तों दोन्ही बाजूंना एकेरी खोल्याखोल्यांसारख्या जागा दिसल्या. याच विद्यार्थ्यांच्या जागा कीं काय, असा प्रथमतः आह्मांला संशय आला; परंतु त्या गोशाळेच्यापैकीं होत, असें पुढें समजलें. हें पहिलें कवाड टाकून बरेंच आंत गेल्यावर गुरुकुलाचें दुसरें फाटक लागतें. वाटेनें जातांना संस्कृत शब्दांनीं व्यक्त केलेल्या इंग्रजी खेळाच्या निदर्शक पाट्या लागतात. या खेळण्याच्या जागा दाखविणाऱ्या पाट्या होत्या.

दुसऱ्या फाटकाच्या आंत गेल्याबरोबर गुरुकुलाची बाग लागते. ही

बाग नीटनेटकी, पण अगदीं साधी दिसते. येथेंच एक मोठी विहीर असून तिला भला थोरला एक बैलरहाट जोडलेला आहे. या रहाटाच्या योगेंच सर्व बागेला पाणी दिलें जातें व स्नानशाळेला येथून पाणी जातें. जरा पुढें गेलें कीं स्नानशाळा लागते. या शाळेंत लांबच लांब व अगदीं अरुंद असा मोठा थोरला हौद आहे. आपल्या इकडे गुरांना पाणी पिण्याकरितां ज्या तऱ्हेचा लांबच लांब हौद बांधतात, तशा तऱ्हेचा हा बांधलेला आहे. येथें पन्नास मुलें एकदम स्नान करूं शकतात. बहुधां नदीवर स्नान करण्याचा परिपाठ आहे; परंतु ज्या वेळीं नदीवर जाणें शक्य नाहीं त्या वेळीं या स्नानशाळेचा उपयोग करतात.

ही शाळा टाकून जरा पुढें गेलें म्हणजे गुरुकुल महाविद्यालयाची इमारत लागते. ही दोन मजली पण अगदीं साध्या परंतु पक्क्या बांधणीची इमारत आहे. शहरांतील कॉलेजच्या इमारतींप्रमाणें भव्यता, सौंदर्य किंवा अवाढव्यपणा या इमारतींत मुळींच नाहीं. पण ही इमारत गुरुकुलासारख्या पूर्वकालीन संस्कृतीचें पुनरुज्जीवन करणाऱ्या संस्थेला साजेशीच आहे. इमारत दुमजली आहे व त्यांत २२ वर्ग बसण्याची जागा असून एक मोठा पुस्तकालयाचा दिवाणखाना आहे व दुसरा शास्त्रीय शिक्षणाचा दिवाणखाना आहे. दुसऱ्या मजल्यावर महाविद्यालयाकडील ब्रह्मचारी रहाण्याची सोय केलेली आहे. या इमारतीस चाळीस हजार रुपये खर्च आलेला आहे. ही इमारत कॉलेजच्या शाखेची होय.

शाळेच्या शाखेकरितां अजून कायमच्या पुऱ्या इमारती बांधलेल्या नाहींत. सर्व ब्रह्मचारी तात्पुरत्या बांधलेल्या एका भव्य चौकांत राहतात. हा चौक फारच मोठा असून त्याचे मधोमध एक मोठी यज्ञशाळा आहे. ती शहरांतील एकाद्या उपवनांतील बँडस्टँडसारखी हुबेहुब दिसते. मात्र ही फार मोठी आहे व मधोमध एक यज्ञकुंड आहे. यांत सकाळीं होम होतो व त्या वेळीं सर्व ब्रह्मचारी एके ठिकाणीं जमून हवन करतात. सायंकाळचा होम वर्गवारीनें व निरनिराळ्या ठिकाणीं होतो. या इमारतीला एकंदर पसतीस हजार रुपये लागले आहेत. येथें विद्यार्थ्यांच्या राहाव-

याच्या खोल्या, शाळेच्या खोल्या, दवाखाना, स्वयंपाकघर व भोजनशाळा, इतक्या इमारती आहेत. या इमारती एकमजली असून सोगा व त्याचेपुढें खुली पडवी, अशा धर्तीच्या आहेत. वर पत्रे घातलेले आहेत. भोजनशाळा फारच विस्तृत आहे. येथें अडीचशेंपासून तीनशें विद्यार्थी एकदम भोजनास बसण्याची सोय आहे. परंतु गुरुकुल विद्यालयाची ही चालचलाऊ व्यवस्था आहे. कायमची इमारत बांधण्याचा विचार आहे. त्यांत सहाशें विद्यार्थ्यांची सोय व्हावयाची आहे व त्याला पांच लाख रुपये खर्च येईल असा अंदाज केलेला आहे. गुरुकुलाच्या चालकांचा 'इमारतफंड' जमविण्याचा प्रयत्न चालू आहे.

या इमारतीपासून जरा दूर आनंदाश्रम ह्मणून एक लहानशी इमारत आहे. या ठिकाणीं अविवाहित शिक्षक राहतात. येथून थोड्या अंतरावर दिल्लीचे सुपरव्हायझर लाला परमेश्वरी दास यांनीं चार हजार रुपये खर्चून एक पक्की धर्मशाळा बांधलेली आहे. गुरुकुल पहाण्यास सहकुटुंब येणाऱ्या गृहस्थांस येथें उतरण्याची सोय आहे. शिवाय प्रोफेसर, शिक्षक, सुपरवायझर यांच्या कुटुंबांकरितां स्वतंत्र घरें बांधलेलीं आहेत. गुरुकुलाचे मुख्य आचार्य यांच्याकरितां एक स्वतंत्र आश्रम बांधलेला आहे.

गुरुकुलाचें आवार फारच विस्तृत आहे. हें एक लहानसें खेडेंच आहे. ही जागा पूर्वीं निवळ जंगल असून येथें पशूंचें वसतिस्थान होतें. परंतु या स्थळाचा देखावा मात्र सुंदर आहे. हें ठिकाण गंगेच्या डाव्या तीरावर आहे. येथें हवा फारच चांगली असून गंगेचा प्रवाह जवळच वाहत असल्यामुळें प्रवाहावरून नेहमीं गार वारा येत असतो. येथून हिमालयाच्या पर्वतराजि सारख्या दिसत असतात. सर्व जागा झाडांनीं आच्छादलेली आहे.

अशी शांत, एकीकडची आणि हवाशीर जागा पाहून महात्मा लाला मुनशीराम हे बारा चवदा वर्षांपूर्वीं आपल्या दोन मुलांना घेऊन येथें राहण्यास आले व निवळ जंगलांत त्यांनीं गुरुकुलास आपल्या एकट्याच्या हिमतीवर सुरुवात केली. गुरुकुलाची ही जागा, व आपली सर्व इष्टेट श्रीमन्मुनशी अमेनसिंहजी यांनीं गुरुकुलास बक्षीस दिलेली आहे. या

इष्टेटीची किंमत तीस हजार रुपयांची आहे. याप्रमाणें प्रथमारंभींच या थोर गृहस्थांनीं गुरुकुल महाविद्यालयाला आपल्या विलक्षण औदार्यानें स्थैर्य व शाश्वती आणली, व त्यामुळें गुरुकुलाचे उत्पादक महात्मा मुनशीराम यांना इतक्या थोडक्या काळांत या विद्यालयाची इतकी प्रगती करून दाखवितां आली. या गृहस्थांचा आत्मत्यागहि अलौकिक आहे. यांनीं आपली दरमहाची हजार रुपयांची प्राप्ति सोडून व आपली सर्व इष्टेट शिक्षणाला अर्पण करून पंडित दयानंद सरस्वतीच्या इच्छेनुरूप गुरुकुल काढण्याचा निश्चय केला, व ते आपल्या दोन लहान मुलांसह वर सांगितल्याप्रमाणें या निर्जन प्रदेशीं प्रथमतः आले; व अवघ्या एका तपामध्यें त्यांनीं तेथें मोठें अवाढव्य विद्यामंदिर निर्माण करून ज्या ठिकाणीं माणुसहि फिरकावयाचा नाहीं तेथें रात्रंदिवसची तीनचारशें माणसांची वस्ती बनविली! बारा वर्षांतील ही कृति महान् पराक्रमासारखी आहे, यांत कांहीं एक शंका नाहीं. एकंदर गुरुकुलाचा विस्तार, त्याची वाढ व त्याची सांप्रतची स्थिति पाहून आह्मांला महात्मा मुनशीराम यांचें सादर कौतुक वाटलें.

येथपर्यंत गुरुकुलाच्या पूर्वपीठिकेचें, पूर्वरंगाचें व सद्यःकालीन आणि भावी बहिरंगाचें वर्णन झालें; परंतु गुरुकुल ही एक शिक्षणसंस्था होय व या संस्थेची योग्यता तिच्या अंतरंगावर अवलंबून आहे हें उघड आहे. तेव्हां त्या अंतरंगाकडे आतां वळूं.

गुरुकुल ही आर्यसमाजपंथी लोकांची शिक्षणसंस्था आहे. लाहोर येथें त्यांचें अँग्लो वेदिक दयानंद सरस्वती कॉलेज आहे. परंतु त्या कॉलेजाच्या चालकांत व कांहीं दुसऱ्या समाजपंथी लोकांत मतभेद झाल्यामुळें गुरुकुल ही संस्था अस्तित्वांत आली, असें आह्मांला समजलें. जरी तिला महात्मा मुनशीराम यांनीं प्रथम जन्म दिला, तरी लवकरच ही संस्था पंजाबच्या आर्यप्रतिनिधीसभेनें दत्तक घेतली, व हल्लीं तिच्यावरील सर्व देखरेख व तिची सांपत्तिक जोपासना, या प्रतिनिधिसभेनें नेमलेल्या एका बोर्ड ऑफ् कंट्रोल नांवाच्या कमिटीकडेच आहे. या ठिकाणीं दरवर्षीं आर्यसमाजपंथी लोकांचें संमेलन भरतें, व या संस्थेच्या सद्यः व भावी स्थितीची वाटा-

घाट होते, व पुढील सालच्या खर्चाची तजवीज केली जाते. गुरुकुलाच्या आंतील व्यवस्थेकरितां अंतरंगसभा म्हणून एक लहान कमेटी आहे, व तीच गुरुकुलाचा आचार्य व गव्हरनर यांची नेमणूक करते. सर्व रोजची व्यवस्था आचार्यांकडे असते.

गुरुकुल विद्यालय ही शिक्षणसंस्था प्रायः वेदाच्या व संस्कृत भाषेच्या अध्ययनाकरितां आहे; परंतु त्यांत इंग्रजी वाङ्मय व अर्वाचीन शास्त्रें आणि तत्त्वज्ञान यांचेंहि अध्ययन केलें जातें. इंग्रजी व शास्त्रें शिकणें न शिकणें हें पालकाच्या मर्जीवर असतें. तेव्हां या तीन विषयांपैकीं वेद व वेदांग यांनाच प्राधान्य दिलेलें आहे. इंग्रजी व शास्त्रें शिकवितांना या प्रधान अध्ययनाला धोका किंवा अडचण येतां कामा नये, असा निर्बंध आहे. या शिक्षणाबरोबरच शारीरशिक्षण अवश्यमेव दिलें जातें. बऱ्याच वयाच्या विद्यार्थ्यांना कांहीं धंद्याच्या शाखांचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली जावयाची आहे. या विद्यालयांतील शिक्षकांना दयानंद सरस्वती यांनीं स्थापन केलेल्या आर्यसमाजाचीं तत्वें मान्य असलीं पाहिजेत, व त्यांची वेदावर श्रद्धा असून वेदधर्मांतील ५१ कलमांवर त्यांचा भरंवसा पाहिजे. एकाद्या शिक्षकासंबंधीं या अटींपैकीं एकादी अगर अधिक अटी काढून टाकण्याचा अधिकार अंतरंगसभेस आहे. परंतु गुरुकुलाच्या आचार्याला मात्र सर्व अटी पूर्णपणें मान्य असल्या पाहिजेत

ज्यांचा वेदारंभ अथवा उपनयनविधि झालेला आहे, अशा सर्व ब्रह्मचारी विद्यार्थ्यांस गुरुकुलांत घेतलें जातें. मात्र विद्यार्थ्यांचें वय सहा वर्षांचे आंत व आठ वर्षांच्या वर नसावें. दश वर्षांच्या वरचा विद्यार्थी गुरुकुलामध्यें केव्हांहि घेतला जात नाहीं. विद्यार्थी शरीरानें व मनानें सुदृढ पाहिजे. विद्यार्थ्यांच्या पालकानें 'मुलाचें पंचवीस वर्षेपर्यंत लग्न किंवा वाङ्निश्चय करणार नाहीं,' असा करार लिहून दिला पाहिजे. सर्व विद्यार्थ्यांना विद्यादान फुकट दिलें जातें. सर्व ब्रह्मचाऱ्यांना खाण्यापिण्यांत, कपड्यालत्त्यांत, बसण्याउठण्यांत सारख्या तऱ्हेनें वागविलें जातें. जातीजातींमध्यें कोणताहि भेद ठेविला जात नाहीं. सर्वांना निरामिष अथवा शाकाहार मिळतो. ब्रह्मचाऱ्यांनीं आपल्या ब्रह्मचर्यनियमाप्रमाणें राहिलें पाहिजे असा निर्बंध आहे.

सर्वांना ब्रह्मचर्याश्रमाला योग्य असाच साधा पोषाख दिला जातो. अध्ययनास लागणारी सर्व सामुग्री गुरुकुलच पुरवितें. ब्रह्मचाऱ्यांनीं शहरांत किंवा आपल्या घरीं जाण्यास परवानगी नसते. निकट पालक विशेष आजारी असल्यास, किंवा ब्रह्मचारी स्वतःच आजारी पडल्यास, त्याला घरीं जाऊं दिलें जातें. पालकानें महिन्यांतून एक वेळेपेक्षां जास्त वेळां विद्यार्थ्यास भेटतां कामा नये. वर्षांतून एकाद्या सुटीला ब्रह्मचाऱ्यांना जवळपासच्या यात्रांना शिक्षकांसमवेत पाठविलें जातें. महिन्यांतून एकदां पालकास पत्र लिहिण्याची परवानगी ब्रह्मचाऱ्यास दिली जाते. ब्रह्मचर्याचे नियम मोडल्यास, किंवा दुसरें जबर गैरवर्तन झाल्यास, किंवा पालकानें लेखी करार मोडल्यास, ब्रह्मचाऱ्यास विद्यालयांतून काढून टाकितात.

गुरुकुलविद्यालयाचा शिक्षणक्रम १६ वर्षांचा आहे. त्याच्या तीन पायऱ्या आहेत. पहिला क्रम दहा वर्षांचा आहे. त्याचे शेवटीं अधिकारी-परीक्षा होते. या शिक्षणक्रमानंतर महाविद्यालयांत ब्रह्मचाऱ्याला घेतलें जातें. येथें चार वर्षांचा शिक्षणक्रम आहे. याचे शेवटीं परीक्षा घेतली जाते व त्यांत पसार होणाराला 'स्नातक' ही पदवी मिळते. यापुढें आणखी दोन वर्षांचा क्रम आहे. यांत विद्यार्थ्यानें स्वतः नवीन शोध करून निबंध लिहावा लागतो. या कसोटीला जो उतरेल त्यालाच 'वाचस्पति' ही पदवी मिळते.

'अधिकारी' परीक्षेचा अभ्यासक्रम कांहींसा मॅट्रिक परीक्षेसारखा असतो. संस्कृताचा अभ्यास पुष्कळच होतो. विद्यार्थ्यांस संस्कृत व हिंदी भाषा चांगल्या येऊं लागतात. वेदांगांपैकीं व्याकरण व ऋग्वेदादीची भाष्य-भूमिका होते. दर्शनांपैकीं न्याय, वैशेषिक, सांख्य व योग इतकीं शिकविलीं जातात, व सोपीं उपनिषदेंहि सार्थ पढवितात. पुढें हिंदुस्थानचा इतिहास, गणितशास्त्रें, व सहाव्या यत्तेचें इंग्रजी किंवा ड्राईंग, इतके विषय शिकविले जातात. सर्व विषय हिंदी भाषेच्या द्वारें शिकविण्यांत येतात. 'स्नातक' परीक्षेला वैदिकवाङ्मय, अर्वाचीन संस्कृत, आणि इंग्रजी वाङ्मय, हे तीन विषय आवश्यक असतात; आणि ऐच्छिक विषय एक असतो, व इंग्रजी तत्वज्ञान व नीतिशास्त्र, इतिहास व अर्थशास्त्र, आणि

रसायनशास्त्र या तिहींपैकीं, विद्यार्थ्यांच्या इच्छेप्रमाणें घ्यावयाचा असतो. ‘वाचस्पती’च्या पदवीला दोन निबंध लिहावे लागतात. मुख्य मोठा निबंध वेदासंबंधीं असला पाहिजे, व त्यावरून विद्यार्थ्यानें चारी वेदांचें उत्तम अध्ययन केलें आहे असें दिसून आलें पाहिजे; व दुसरा कोणत्याहि खालील एका विषयावर असला पाहिजेः– संस्कृत व्याकरण, संस्कृत वाङ्मय, महाभारताच्या पूर्वींचें तत्वज्ञान, महाभारतानंतरचें तत्वज्ञान, वेदकालीन हिंदुस्थान, बुद्धकालीन हिंदुस्थान, हिंदुस्थानचा धार्मिक इतिहास, हिंदुस्थानविषयक समाजशास्त्र, तत्वज्ञान, तुलनात्मक व्याकरण, जुने कायदे, प्राचीन युरोपियन तत्वज्ञान, अर्वाचीन युरोपीय तत्वज्ञान, हिंदुस्थानच्या जमिनी, आणि आयुर्वेदिक औषधिक्रिया.

वर त्रोटक तऱ्हेनें दिलेल्या अध्ययनक्रमावरून गुरुकुलविद्यालयाचें अंतरंग दिसून येईल. या विद्यालयांत प्राधान्येंकरून संस्कृत व हिंदी भाषा, आणि विशेषतः वेद व वेदांगें यांचेवर जास्त जोर दिला जातो, हें उघड दिसतें. मात्र येथलें अध्ययन आपल्या इकडच्या जुन्या शास्त्रीवैदिकांसारखें अगदींच एकांगी व पंगू नाहीं. पूर्वींच्या वैदिकांना फक्त वेद व वेदांगें मुखोद्गत येत असतात. शास्त्र्यांना संस्कृत वाङ्मयाच्या एक दोन तीन शाखांचें पूर्ण ज्ञान असतें; परंतु या विद्यालयांत तसा प्रकार नाहीं. येथें जुन्या विद्यांबरोबर पाश्चिमात्य संस्कृतीचाहि थोडाफार अभ्यास विद्यार्थ्यांकडून करविला जातो. येथील अभ्यासक्रमांत जुन्यानव्याचा मिलाफ झालेला आहे. यामुळें येथील विद्यार्थी एकदेशीय, संकुचितवृत्तीचे व अंधश्रद्धाप्रेरित न राहतां उदार विचारांचे, विस्तृत मनाचे, व सारासार विचार करणारे, असे विद्वान् निपजण्याचा जास्त संभव आहे. शिवाय, विद्यालयाचा विशेष म्हणजे येथें दानत व शरीरसामर्थ्य, हीं बनविण्याकडे उत्तम लक्ष पुरविलें जातें. यामुळेंहि येथील विद्यार्थी नुसते विद्वान् न निपजतां शीलवान्, बलवान्, सद्गृहस्थ निपजतील यांतहि शंका नाहीं. कारण, या विद्यालयांत विद्याशीलबलनिर्मितीस अनुकूल परिस्थितीच आहे. आधीं कोंवळ्या वयांत व बालपणीं मुलांना विद्यालयांत घेतलें जातें. या वयांत कोंवळ्या झाडाप्रमाणें किंवा ओल्या मातीप्रमाणें

जसा आकार शरीराला, मनाला, व आत्म्याला द्यावा, तसा तो सहज देतां येतो. शिवाय, मुलें बारान्‌बारा चोवीस तास गुरुसहवासांत असतात. शहरांतील मुलांना मोह उत्पन्न करणाऱ्या गोष्टी येथें मुळींच नाहींत. हवापाणी व खाणेंपिणें शरीरबल वाढविण्यास योग्य असेंच असतें. शिक्षक-वर्ग उत्साही कर्तव्यदक्ष व या गुरुकुलप्रचाराचा अभिमानी असून पैशाच्या साधनाची मुबलकता आहे. इतकी अनुकूल परिस्थिति असतां या संस्थें-तून वाईट विद्यार्थी बाहेर पडले तरच आश्चर्य. उत्तम निर्माण झाले तर त्यांत विशेष नवल करण्यासारखी गोष्ट नाहीं. आतां हा अभ्यासक्रम कितपत अमलांत आलेला आहे हें दाखवून, येथल्या महाविद्यालयांतील प्रोफेसरांची थोडी ओळख करून द्यावयाचें शेवटचें पण आवश्यक काम राहिलें.

मागें सांगितलेंच आहे कीं, आम्ही गुरुकुलांत सकाळीं आठ साडे-आठच्या सुमारास जाऊन पोहोंचलों. आम्ही आल्याची वर्दी गेल्याबरोबर प्रो० साठे बाहेर आले व त्यांनीं प्रथमतः आह्मांस गुरुकुलचे असिस्टंट गव्हरनर महाशय नंदलाल यांचे कचेरींत नेलें व तेथें महाशयांची ओळख करून दिली. लाला नंदलाल यांनीं मोठ्या प्रेमानें आमची विचारपूस करून गुरुकुलाच्या साध्या व शुद्ध राहणीचें पूर्वचिन्ह ह्मणूनच कीं काय, एकएक पेला ताजें गाईचें दूध आणून देवविलें. दूध पिऊन नंदलालचे आभार मानून आम्ही काय करावयाचें तें ठरविलें. उन्हाळ्यामुळें गुरु-कुलांतील सर्व वर्ग सकाळींच भरत असत. तेव्हां सर्व वर्ग प्रत्यक्ष पाह-ण्याची संधि मिळाली. आमच्या सुदैवानें तो दिवस बुधवार होता व तो गुरुकुलांतील वादविवादसभेचा दिवस असल्यामुळें त्या दिवशीं संस्कृत भाषेंत वादविवाद व्हावयाचा होता. तेव्हां सर्व वर्ग पाहून आम्हीं या वादविवादास हजर रहावयाचें व अकरा साडेअकराच्या सुमारास महात्मा मुनशीराम यांचें दर्शन घेऊन प्रो० साठे यांचे घरीं भोजनास जावयाचें असा कार्यक्रम ठरला. लागलीच आम्हीं महाविद्यालयांत आलों. तेथें प्रो० साठे यांनीं आमची प्रो० रामदेव यांच्याशीं ओळख करून दिली.

प्रो० साठे यांना दुसरें काम असल्यामुळें प्रो० रामदेव यांनीं आह्मांला सर्व वर्ग दाखविण्याचें काम केलें.

प्रथमतः आम्ही कॉलेजांतील वर्ग पाहिले. हे वर्ग अर्थातच लहान होते. एखाद्यांत पांचसात मुलें, एखाद्यांत चारपांच, तर एखाद्यांत दोनतीनच होतीं. कोठें अर्थशास्त्र हा विषय चालला होता, तर कोठें पूर्वमीमांसा, कोठें इंग्रजी, तर कोठें गणित. सर्व वर्गाची व्यवस्था मात्र अगदीं अर्वाचीन पद्धतीची होती. ब्रह्मचाऱ्यांस बसण्याकरितां डेडले पॅटर्नसारख्या जोड डेस्काच्या खुर्च्या होत्या. वर्गाला लागणारें इतर सामानहि नवीन पद्धतीचेंच होतें.

कॉलेज क्लासेस पाहून झाल्यावर आम्ही १० व्या वर्गापासून खालीं सारखे वर्ग पहात गेलों. या वर्गातून मुलें ज़ास्त होतीं. कोठें दहा, कोठें पंधरा, कोठें वीस. वीसपंचवीसच्यापेक्षां कोणत्याही वर्गात मुलें जास्त नव्हतीं. येथेंही निरानिराळ्या ठिकाणीं निरनिराळे विषय चालू होते. प्रो० रामदेव आमच्याकरितां हिंदीमध्यें कांहीं प्रश्न विचारीत. मुलें चांगल्या तऱ्हेनें उत्तरें देऊं शकतात, असें आमच्या दृष्टोत्पत्तीस आलें. अर्वाचीन पद्धतीला अनुसरून खालच्या वर्गात किंडरगार्टन पद्धतीनेंच शिक्षण चालत होतें, व प्रत्येक क्लासांत चित्रें, नकाशे व इतर शिक्षणाचीं उपकरणें नीटनेटकीं मांडलेलीं होतीं. त्यांत पुण्याच्या चित्रशाळेंतील चित्रें पाहून आम्हांला फार नवल वाटलें. कोठें पुणें आणि कोठें हरिद्वार! कोठें जुन्या विद्येच्या उद्धारार्थ काढलेलें गुरुकुल व कोठें चित्रकलेचा प्रसार करण्याकरितां काढलेली पुण्याची चित्रशाळा! परंतु अर्वाचीनकाळच्या सुलभ साधनांनीं सर्व हिंदुस्तान देश एकरूप करून टाकल्यामुळें, व सर्व देशभर पाश्चिमात्य शिक्षणानें देशाभिमान उत्पन्न केल्यामुळें, देशी धंद्यांस उत्तेजन देण्याची प्रवृत्ति देशांतील कोनाकोपऱ्यांतहि दिसून येऊं लागली आहे, हें पाहून आह्मांला सानंद कौतुक वाटलें.

एकंदर विद्यालयांतील टापटीप, लहान मुलांचीं हस्तकौशल्याचीं कामें व शिकण्याची पद्धति हीं पाहून आह्मांला फार आनंद झाला व या विद्यालयांत जुन्याचा व नव्याचा खरोखरी संगम घडवून आणलेला आहे, यांत

संशय नाहीं, अशी आमच्या मनाची खात्री झाली. वर्ग पाहून झाल्यावर आम्ही वाचनालय व शास्त्रीय उपकरणगृह पाहिलें. नव्या संस्थेच्या मानानें दोन्हींचा संग्रह बरा आहे.

परंतु गुरुकुल विद्यालयांतील अध्ययनविषयक पाहिलेली शेवटची गोष्ट म्हणजे तेथील संस्कृत वादविवाद ही होय. त्या दिवशीं प्रो० साठे हे कामचलाऊ अध्यक्ष होते. पंडित काशीनाथ शास्त्री संस्कृतचे नेहमींचे उपाध्यक्ष हेहि अग्रस्थानीं बसले होते. परंतु त्यांनीं वादविवादाला हात-भार लाविला नाहीं. 'वादविवादसभे'चे सेक्रेटरींनीं आदल्या वादविवादा-चा वृत्तांत वाचला व तो सर्वांना पसंत झाल्यावर त्यावर अध्यक्षांनीं सही केली. नंतर त्या दिवशींच्या कामास सुरुवात केली. पहिल्या वक्त्यास असुक वेळ दिला जाईल, उलट पक्षाच्या वक्त्यास इतका वेळ दिला जाईल व पुढील प्रत्येक वक्त्यानें अमुक वेळांत आपलें भाषण आटोपलें पाहिजे, वगैरे औपचारिक निर्बंध सांगून झाल्यावर वादविवादास सुरुवात झाली. त्या दिवशींचा विवादविषय 'लेखनी श्रेष्ठ कीं असि श्रेष्ठ?' हा होता. अर्थात् शरीरबल श्रेष्ठ कीं ज्ञानबल श्रेष्ठ हा विषय होता. विद्यार्थी संस्कृत अस्खलित बोलत हें पाहून आह्मांला फार नवल वाटलें. विद्यार्थी सुमारें पंचवीसतीस होते. त्यांचे ते ब्रह्मचाऱ्यांस योग्य असे पिंवळे पोशाख, धोतराचा उत्तरीयासारखा केलेला उपयोग, त्यांची ती सतेज, निरोगी व सुदृढ शरीरयष्टि आणि त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येणारा तेजःपुंजपणा व आनंद पाहून आणि त्यांची ती अस्खलित संस्कृत वाणी ऐकून, क्षणभर असा भास झाला कीं, आपण पूर्वकालच्या एकाद्या वसिष्ठवाल्मीकीच्या आश्रमाला आलों आहों कीं काय व तेथलेच हे ऋषिकुमार बोलत आहेत कीं काय? परंतु या ऋषिकुमारांच्या भाषणांतील शिवाजी, नेपोलियन, बुद्ध, दयानंदसरस्वती, शंकराचार्य वगैरे ऐतिहासिक नांवें ऐकलीं व एकंदर विचारसरणीचा झोंक पाहिला, तेव्हां मनाची खात्री झाली कीं, जरी बाह्य देखाव्यांत हे पूर्वकालीन ऋषिकुमार दिसले, तरी अर्वाचीन काल-च्या पाश्चिमात्य संस्कृतीनें ज्यांच्या मनांत देशाभिमानाची लाट उचंबळत आहे, अशा या देशांतील इतर शाळांत, कॉलेजांत शिकणाऱ्या तरुण हिंदी

विद्यार्थ्यांप्रमाणें हे अर्वाचीन काळचेच विद्यार्थी आहेत. या वादविवादांत शरीरबलाच्या श्रेष्ठपणाबद्दल बोलणारे थोडेच निघाले. बहुतेकांनीं ज्ञानबलाचेच पोवाडे गाइले. वादविवादाची मर्यादित वेळ संपल्यावर प्रो० साठे यांनीं औपचारिक समारोप केला व दुसऱ्या पंधरवड्याच्या वादविवादाचा विषय ठरून सभेचें काम संपलें.

या वेळीं अकरा साडेअकरा वाजून गेले होते. ह्मणून आम्ही महात्मा मुनशीराम यांचे आश्रमास आलों. महात्मा मुनशीराम हे शांत, गंभीर व पाहतांक्षणींच ज्यांच्याबद्दल अनुकूल ग्रह होतो अशा तऱ्हेचे गृहस्थ आहेत. हेच या गुरुकुलाचे उत्पादक व सध्यांचे आचार्य होत. महात्मा मुनशीराम यांचें दर्शन घेऊन त्यांच्याजवळ थोडेंसें संभाषण करून उशीर झाला, ह्मणून आम्ही प्रो० साठे यांच्या घरीं आलों. तेथें जेवण तयार होतें. आमचें जेवण आटोपतें आहे नाहीं तोंच प्रो० तुलशीराम मिश्र हे आमचे भेटीकरितां आले. यांनीं पूर्वीं दोनतीन कॉलेजांत इंग्रजी व तत्वज्ञान शिकविण्याचें काम केलें असून हल्लीं गुरुकुलांत ते तेंच काम करतात, असें आम्हांला कळलें. अर्थात् यांचा व माझा आवडता विषय एकच असल्यामुळें यांचें माझें लवकरच चांगलें जुळलें. प्रोफेसर मिश्र यांच्या भाषणावरून त्यांच्या मनांतील सात्विक भावाची मला चांगलीच कल्पना होत होती. त्यांच्या बोलण्यांत दुसऱ्याविषयीं बोलतांना बंधुभगिनी हे शब्द वापरण्याचा परिपाठ दिसला. त्यावरून मला इंग्रजी कादंबऱ्यांतील क्वेकरांची आठवण झाली. हे गृहस्थ चांगले बहुश्रुत, प्रोक्त, प्रेमळ व विचारी दिसले.

प्रोफेसर मिश्र यांच्याशीं आमचें बोलणें चाललें आहे, तोंच प्रोफेसर बालकृष्ण हे प्रोफेसर साठे यांचे घरीं आले. हे तरुण गृहस्थ एम्. ए. असून इतिहास व अर्थशास्त्राचे शिक्षक आहेत. अर्थशास्त्रावर त्यांची भक्ति दिसली व हिंदी भाषेंत एक स्वतंत्र ग्रंथ त्या विषयावर लिहिण्याचा त्यांचा मानस असल्याचें त्यांनीं मला सांगितलें. तेव्हां माझाही तो आवडता विषय असून मी या विषयावर एक पुस्तक मराठींत लिहिलें आहे, असें त्यांना सांगितलें व माझ्या पुस्तकाची एक प्रत त्यांना पाठवून

देण्याचें कबूल केलें. त्यांना महाराष्ट्राच्या इतिहासाचीहि आवड असल्याचें दिसून आलें. इकडल्या तिकडल्या गप्पा होत आहेत, तों प्रो॰ रामदेव हे गृहस्थ आले. प्रो॰ रामदेव हे प्रथमतः दिसण्यांत मद्रासकडील गृहस्था-सारखे वाटतात. हे गृहस्थ बी. ए. असून इंग्रजीचे प्रोफेसर आहेत. तसेच ते 'वैदिक मॅगेझिन'चे एडिटर आहेत व शिवाय डेप्युटी गव्हरनर आहेत. यांनींच आह्मांला सर्व विद्यालय दाखविलें व त्यासंबंधीं माहिती सांगितली. हे गृहस्थ फार बोलके व गुरुकुलपद्धतीबद्दल विलक्षण उत्साही व स्वमताबद्दल अत्यंत अभिमानी आहेत. यामुळें आह्मांला फारसे प्रश्न न विचारतां सर्व माहिती आपोआप व सहज जातां जातां मिळाली. दुसऱ्या प्रोफेसरांशीं आमचा फारसा वादविवाद झाला नाहीं. कदाचित् त्यांचीं व माझीं मतें जुळलीं असतील ह्मणा, किंवा आपल्या संस्था पाहण्यास आलेल्या पाहुण्याजवळ वाद घालीत बसणें बरें नाहीं असें त्यांना वाटल्यामुळें ह्मणा परंतु आम्हीं आतांपर्यंत असल्या वादग्रस्त विषयांत पडलोंच नाहीं. परंतु प्रो. रामदेव आल्यापासून वादविवादास सुरुवात झाली. कारण, थोड्याच वेळांत असें दिसून आलें कीं, प्रो. रामदेव यांच्या व माझ्या सर्व वाद-ग्रस्त विषयासंबंधींच्या मतांत बरेंच अंतर आहे. ज्यांना आपापल्या मताच्या खरेपणाबद्दल पूर्ण विश्वास आहे, व ज्यांचीं मतें भिन्न भिन्न आहेत अशीं दोन सुशिक्षित माणसें एके ठिकाणीं आल्यावर वादविवादास काय तोटा! कोणताहि वादग्रस्त विषय असो, आमच्या वादविवादाच्या योगें दोघांचें एकमत होण्याचा सुयोग येईना. एकाद्या मोठ्या जंक्शन स्टेशनवर रेल्वेच्या लाईनीच्या रुळांची विलक्षण तऱ्हेची गुंतागुंत झालेली असून त्यांचें एक जाळेंच बनलेलें असतें; पण स्टेशनच्या बाहेर पडल्या-वर दोन लायनी परस्पर भिन्न दिशांनीं जातात, त्याप्रमाणें आमच्या वाद-विवादाची स्थिति होई. प्रारंभीं प्रारंभीं एकमेकांना सामान्यतः पटतील अशीं विधानें व तत्वें यांनीं वादविवादास सुरुवात होई; परंतु शेवटीं परस्परविरोधी अशा प्रमेयांत वादाचा शेवट होई. आम्हीं कितीतरी निरनिराळ्या विषयांवर संभाषण केलें असेल. प्रो. रामदेवांना दुसऱ्यांना आपल्या मतांना आणण्याची फार हौस दिसली, व यामुळें कोणत्या तरी

एका विषयांत आमचें मतैक्य होतें कीं काय हें आम्हीं पहात होतों; परंतु तसा प्रसंग आलाच नाहीं ! एकाच शिक्षणपद्धतीखालून गेलेल्या सुशिक्षितांमध्यें अशा तऱ्हेनें मतवैचित्र्य कसें उत्पन्न होतें, हा प्रश्न मनापुढें उभा राहिला, व याचें कारण मानवी स्वभाववैचित्र्य हें होय, असें ह्मणून आम्हीं आपल्या मनाचें समाधान केलें. प्रो. रामदेव यांचा व आमचा वाद सर्व वेळभर—रात्रीं ११।१२ वाजतां निजेपर्यंत—चालला होता; परंतु तो विकोपाला न जातां आम्ही 'शिवरात्र' ह्मणून निजावयास जाऊं शकलों, हें नवल आहे.

सायंकाळीं बोर्डिंगची व्यवस्था पाहण्यास गेलों. कांहीं ठिकाणीं सायंकाळचें हवन चाललें होतें. सायंकाळीं वर्गावर्गांप्रमाणें हवन होतें, असें मागें सांगितलेंच आहे. मध्यें एक लहानसें होमकुंड असतें व त्याशेजारीं उपाध्याय शिक्षक बसतो, व लंबचौकोनांत ब्रह्मचारी लोकरीच्या आसनावर बसतात. शिक्षक मंत्र ह्मणतो त्याचा उच्चार सर्व ब्रह्मचारी करतात, व मग शिक्षक अग्निकुंडांत आहुती टाकतो. संध्याकाळीं लहान मुलांची भोजनाची पंगत जरा आधीं दिवसाउजेडींच होते. ब्रह्मचारी बाहेर मोकळ्या जागेंतच जेवावयास बसले होते. सर्वांचे पोषाख सारखे, सर्वांचीं भांडीं सारखीं व एकसारख्या पंक्ती बसलेल्या, हा देखावा मोठा मजेदार दिसे. ताट, वाटी व लोटा इतकींच भांडीं प्रत्येक ब्रह्मचाऱ्याला मिळतात. येथील भोजनहि ब्रह्मचाऱ्याच्या वृत्तीला योग्य असेंच होतें. रोटी, डाळ व भजीं इतकेच तीन पदार्थ भोजनास होते. या बाबतींत उत्तरहिंदुस्थानांत बराच सारखेपणा आहे. मी अग्र्यास एका कॉलेजच्या बोर्डिंगांत जेवावयास गेलों होतों तेथेंहि असाच प्रकार पाहिला होता. तिकडे भात खाण्याचा प्रघात नाहीं. तसेंच फारशा भाज्या खाण्याचाहि सराव नाहीं. रोटी, डाळ व तूप इतके पदार्थ असले म्हणजे झालें. गुरुकुलांत ब्रह्मचाऱ्यांनीं व शिक्षकांनींच वाढण्याचा प्रघात आहे. जेवण करण्यास मात्र आचारी लागतात. आपापला लोटा व वाटी प्रत्येकानें घांसून आपआपल्या खोलींत ठेवावयाची असते. यामुळें येथें जेवणाच्यां पंक्तींचा आमच्या इकडल्यासारखा रमणा पडत नाहीं. आमच्या इकडील भाज्या, दोन वेळां भात,

वरण, तूप, ताक, दूध, पोळी, साखर, शिवाय आमटी व चटणी वगैरे अवश्य भासणाऱ्या पदार्थांची व ते पदार्थ वाढण्याच्या आवृत्तीची मोजदाद केली, व उत्तरहिंदुस्थानांतील अवश्य वस्तूंची संख्या पाहिली म्हणजे तिकडील साधेपणाचें कौतुक वाटतें. शिवाय, या साधेपणानें व मसाल्याच्या अभावानें तिकडील भोजन जास्त पौष्टिक व जास्त हितावह असतें, हें निराळेंच. या भोजनास खर्च कमी येतो, हा आणखी एक फायदा आहे. येथील विद्यार्थ्यांचा पोषाख असाच साधा व ब्रह्मचर्याला शोभेसा असतो. एक सदरा व धोतर; धोतराचाच एक सोगा पदरासारखा अंगावर घेतलेला असतो. थंडीमध्यें बनातीचा वर आणखी एक कपडा घालण्यास देतात. धोतर व सदरा प्रत्येक ब्रह्मचाऱ्यानें आपला आपणच धुवावयाचा असतो. जास्त मळल्यावर परटाकडे देऊन आणतात.

ब्रह्मचारीपंक्तीचें जेवण पाहून आम्ही थोडे फिरावयास गेलों.आठनवांचे सुमारास आम्ही प्रो. साठे यांचे पर्णकुटिकेंत आलों व तेथें जेवणें आटोपल्यावर पुनः थोडा वेळ बोलणें चालणें झाल्यावर रात्रीं १२ वाजण्याच्या सुमारास आम्ही झोपीं गेलों. पहाटेस उठल्यावर आह्मांला सर्व गुरुकुलाची एकंदर व्यवस्था दाखविल्याबद्दल, आपल्या सहवासाचा व संभाषणाचा लाभ दिल्याबद्दल सर्वांचे, व विशेषतः प्रो. साठे यांचे, आभार मानून दिसूं लागतांच आम्ही हरिद्वाराची वाट चालूं लागलों.

वाटेनें माझ्या मनांत आदल्या दिवशीं पाहिलेल्या सर्व प्रकारांचें चित्र उभें रहात होतें. येवढी मोठी संस्था अस्तित्वांत आणून दहाबारा वर्षांत तिची अशी भरभराट घडवून आणणें, हें कांहीं लहानसहान काम नाहीं. येथील व्यवस्था व शिस्त फार चांगली आहे, हें पाहूनहि व्यवस्थापकांच्या कर्तृत्वाबद्दल सादर कौतुक वाटलें. या संस्थेंमध्यें घडवून आणलेल्या दोन सुधारणांमुळें तर मला विशेषच आनंद झाला. त्या सुधारणा म्हणजे जन्मावर जातिभेद न मानणें व ब्रह्मचर्य २४ वर्षेपर्यंत पाळणें. हल्लींच्या हिंदुस्थानच्या अवनतीच्या बुडाशीं पुष्कळ गोष्टी असतील; परंतु आमच्यांतील बालविवाह व जातिभेद या दोन गोष्टी राष्ट्रीयहानीला प्राधान्येंकरून कारणीभूत आहेत, अशी माझी ठाम समजूत असल्यामुळें, या दोन घातुक

चालींचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न गुरुकुलानें चालविला आहे, हें पाहून मला फारच आनंद वाटला, व येवढ्याकरितांसुद्धां गुरुकुलपद्धतीचा जितका प्रसार होईल तितका चांगला, असें मला वाटलें.

शिक्षणक्रमाबद्दल मात्र माझा तितका चांगला ग्रह झाला नाहीं, हें कबूल केलें पाहिजे. गुरुकुलविद्यालयांत जो शिक्षणक्रम आंखून दिला आहे, त्याप्रमाणें तो करवून घेतला जात नाहीं असें नाहीं. तरी पण संस्कृत भाषेवर घालविलेला वेळ वाजवीपेक्षां फाजील आहे, असें मला वाटलें. गुरुकुल ही संस्था आर्यसमाजाकरितां उपाध्याय व उपदेशक तयार करण्यास फार उत्तम आहे, युरोपमध्यें पूर्वीं जशीं बिशप, आर्च-बिशप व इतर उपाध्याय व उपदेशक तयार करणारीं कॉलेजें असत तसें हें विद्यालय आहे, असें मला वाटतें. या विद्यालयांत शिक-लेले विद्यार्थी उदार मनाचे, सच्छीलाचे व आपल्या वाङ्मयाचें व धर्माचें पूर्णज्ञान असलेले व संस्कृत भाषेवर विशेष व्यासंग असलेले असे वंदनीय उपदेशक बनण्याचा बराच संभव आहे खरा; परंतु सर्वांसच उपदेशक केल्यावर उपदेश ऐकणारे कोण राहणार, असें माझ्या मनांत आलें. सारांश, गुरुकुलांतील पद्धति व विशेषतः संस्कृतावरील भर हीं कांहीं थोड्या लोकांकरितां इष्ट असतील; परंतु सर्व सामान्यजनांना इतक्या संस्कृताच्या प्राविण्याची जरूरी नाहीं; त्यांना जास्त उपयुक्त विषयांवर परिश्रम करूं देणें श्रेयस्कर आहे, असें मला वाटलें.

असे गुरुकुलाबद्दल मिश्र विचार मनांत येत असतांना आह्मीं कन-खलला येऊन पोंचलों, तोंच आह्मांला महात्मा मुनशीराम पायीं हरिद्वारास जातांना भेटले. त्यांचा आह्मीं पुनः निरोप घेतला, व देवळांत शिरलों. मग माझें मन तेथील सृष्टिसौंदर्यानें पुनः वेधून घेतलें व आह्मीं त्या सुंदर स्थानाचें शेवटचें दर्शन घेऊन हरिद्वारास परत आलों. पुढें हरिद्वारास आणखी एक दोन दिवस राहून आह्मीं परत मुरादाबादेस आलों.



— ५ —


मथुरावृंदावन.

अर्धचन्द्रप्रतीकाशा यमुनातीरशोभिता ।
शोभिता गृहमुख्यैश्च चत्वरापणवीथिकैः ।
चातुर्वर्ण्यसमायुक्ता नानावाणिज्यशोभिता ।
इयं मधुपुरी रम्या मधुरा देवनिर्मिता ।
निवेशं प्राप्नुयाच्छीघ्रमेष मेऽस्तु वरः परः ॥

—रामायण.

या घर्मभानोस्तनयापि शीतलैः स्वसा यमस्यापि जनस्य जीवनैः ।
कृष्णापि शुद्धेरधिकं विधातृभिर्विहन्तुमंहांसि जलैः पटीयसी ॥

—माघः



माझ्या या पाळीच्या प्रवासाचा जो चित्रपट मी आपल्या मनांत रेखाटला होता तदनुरूप मथुरावृंदावन हीं पवित्र व प्रेक्षणीय स्थळें आह्मीं अगदीं शेवटीं देशीं परत येतां येतां पहावयाचीं, असें योजिलें होतें. प्रवासाच्या दृष्टीनें हा बेत सोईचा होता. बाकी मी आपल्या स्वाभाविक मनाच्या कलाकडे व सहज औत्सुक्याकडे लक्ष दिलें असतें, तर मी मथुरावृंदावनाला प्रथमतः गेलों असतों. कारण, हीं स्थळें माझ्या अत्यंत परिचयाचीं होतीं. अर्थात्, हा परिचय दृष्टिपरिचय नव्हता, तर फक्त

श्रुतिपरिचय होता. कां कीं माझें बालपण ज्या ग्रामांत व ज्या गृहांत गेलें त्याला लागूनच एक छोटेंसें सुंदर मुरलीधराचें देऊळ आहे. लहानपणीं हेंच आमचें क्रीडाभुवन होतें. येथें मी आपल्या बालमित्रांबरोबर निरनिराळे खेळ खेळत असें. या देवळांत गोकुळअष्टमीचा उत्साह मोठ्या थाटानें होत असे, व देवळाच्या पुढल्या उघड्या पटांगणांत दरसाल दहीहंडी फुटून गोपालकाला होत असे. या देवळांत दरसाल चातुर्मासांत बहुधा भागवताचें पुराण सुरू असे, व शाळा सुटल्याबरोबर पुराणाला जाण्याची मला फार हौस वाटत असे. या गोष्टीला आतां सुमारें तीस पसतीस वर्षें झालीं असतील. तरी पण मला अझूनहि त्या काळची चांगली स्मृति आहे. ती मुरलीधराची सुंदर मूर्ति, तो नवाच केलेला टुमदार सभामंडप, ते व्यासपीठावर बसलेले रेशीमकांठी धोतर नेसलेले व करवतीकाठीं कोरें उपरणें पांघरलेले तुंदिलतनु व 'जे हे ते कालाचे ठायीं' अशा कांहीं एका लकबीनें व घोगऱ्या आवाजानें पुराण सांगणारे पुराणीकबोवा, तो बायकापुरुषांचा श्रोतृसमुदाय, ते बायकांचे वाती काढण्याचे, डुलक्या घेण्याचे व भाविकपणें श्रवण करण्याचे व्यवसाय, ते चाकासारखें भलें थोरलें चक्रीपागोटें घातलेले अगडबंब भटजीबोवा, ते म्हातारे गांवांतले सुखवस्तु गृहस्थ; हा सर्व देखावा अझूनहि माझ्या डोळ्यांसमोर स्पष्टपणें दिसत आहे. जरी आमच्या पुराणिकबोवांना पुराण सांगण्याच्या कांहीं लकबी होत्या, तरी पण त्यांच्या पुराणास चांगला रंग येई व कृष्णचरित्रांतील आश्चर्यकारक गोष्टी जेव्हां ते सांगत असत तेव्हां मला फार मौज वाटत असे. आज काय पूतनावधाचा प्रसंग आहे तर उद्यां काय कालियामर्दनाची हकीगत आहे. पुढें कांहीं दिवसांनीं चाणूरमुष्टिक व कंसाचा वधप्रसंग आहे; या सर्व गोष्टी ऐकण्याची मला हौस असे, व पुराणिकबोवा आह्मां मुलांना त्यांना मिळणाऱ्या प्रसादापैकीं कांहीं प्रसाद केव्हां केव्हां देत असत. उद्यां अमक्या राक्षसाच्या वधाची कथा आहे, असें पुराणिकबोवांनीं सांगितलें ह्मणजे आह्मीं बोरूच्या पेराच्या बंदुकी व बोरूच्या गिराच्या गोळ्या करून त्या बंदुकींतून सोडीत असूं, किंवा दिवाळी जवळ आली असल्यास खरोखरीच्या केपाचीं पिस्तुलें आणून

त्याचे वार करीत असूं. अशा माझ्या बालपणच्या अनुभवामुळें कृष्ण-चरित्र, त्याचें जन्मठिकाण व त्याचें बालपण जेथें गेलें तीं गोकुल व वृंदावन हीं नांवें माझ्या फारच परिचयाचीं होतीं. यामुळें एकाद्या चिरपरिचित मित्राला भेटायला जातांना जशी मनाची उत्सुक व आनंदी वृत्ति होते, तशी माझ्या मनाची या वेळीं वृत्ति झाली. ज्या कृष्णाच्या मनोहर गोष्टी आपण आपल्या लहानपणीं ऐकल्या, त्या ज्या ठिकाणीं प्रत्यक्ष घडल्या अशा मथुरेला आपण जाणार, व तेथले फार पुरातन असे कृष्णलीलेचे देखावे पाहणार, तसेंच पवित्र यमुना नदीचें आपल्याला दर्शन होणार, ह्मणून माझें मन प्रमुदित झालें होतें. असो.

मागें सांगितल्याप्रमाणें गुरुकुल पाहून झाल्यावर आह्मी परत मुरादाबादेस आलों. तेथें आह्मांला एकदोन दिवसांपेक्षां जास्त दिवस राहतां आलें नाहीं. कारण, आमची परत येण्याची वेळ भरत आली; पण मुरादाबादेहून आह्मी पुष्कळजण बरोबर होतों व वाटेनें मथुरेस उतरावयाचें असल्यामुळें आह्मीं मोठ्या आनंदानें मुरादाबाद सोडलें. आह्मी मुरादाबादेहून दिल्लीपर्यंतचीं इंटर क्लासचीं तिकिटें काढलीं होतीं. लहान मुलांचीं धरून आमचीं एकंदर ९ तिकिटें होतीं. परंतु गाडीशीं येऊन पहातों तों इंटरक्लासचा एकच डबा व तो तर माणसांनीं चिकार भरलेला. आमच्यासारख्या सामान्य प्रवाशांना वरच्या वर्गांत कोण बसूं देतो ? तेव्हां आह्मांला तिसऱ्या क्लासच्या डब्यांत बसणें भाग पडलें. वरच्या वर्गाचें तिकिट काढलेलें असतांना जागेच्या अभावामुळें खालच्या वर्गांत बसावें लागल्यास भाड्याचे अधिक वर्गाकरितां भरलेले पैसे परत दिले जातील; मात्र गाडी निघण्यापूर्वीं गार्डापासून असें खालच्या वर्गानें प्रवास केल्याचें सर्टिफिकेट घेतलें पाहिजे. रेलवे कंपनीच्या गाईड बुक मधील हा नियम दाखवून आह्मी गार्डाजवळ तसें सरटिफिकेट मागूं लागलों. पण तो घड कांहींच बोलेना ! स्टेशनमास्तरकडे जा, पुढें पाहूं, वगैरे म्हणूं लागला. स्टेशनमास्तरकडे जाण्यास तर अवकाश नव्हता. कारण, गाडीची वेळ भरत आली होती. ह्मणून "तुम्हीं

नियमाप्रमाणें सरटिफिकेट दिलें पाहिजे, आह्मी पुढल्या स्टेशनवर आपल्यास भेटतों," असें गार्डास बजावून गाडीची निघण्याची शीळ झाल्यामुळें घाईघाईनें आह्मी डब्यांत जाऊन बसलों. उत्तरहिंदुस्थानांतील रेलवेनोकर फार लांचखाऊ असतात; व तिकिटाला सबंध रुपया दिला तर नाणें मिळण्याचीसुद्धां पंचाईत पडते, असें आह्मीं ऐकलें होतें, त्याचेंच प्रत्यंतर येण्याचा रंग दिसूं लागला. पण त्या गार्डाला कांहींएक न देतां कंपनीच्या कायद्याप्रमाणें अधिक भरलेले पैसे परत मिळवावयाचे असा आह्मीं बेत केला. पैसे कांहीं जास्त होते, अशांतला प्रकार नाहीं; तरीपण आपल्या हक्काला सुशिक्षित लोक जाणूं लागले आहेत हें दाखविण्याचा आह्मीं निश्चय केला, व त्याप्रमाणें गार्डाचा पिच्छा पुरविला. दुसऱ्या स्टेशनवर उतरून पुनः गार्डाजवळ मागणी केली. तो पुनः अळंटळं करूं लागला. त्याच्या हातावर आह्मीं कांहीं तरी ठेवावें, असा त्याचा उघड उघड मानस दिसला; परंतु आह्मांला तसें करावयाचें नव्हतें. मुरादाबादेहून अर्ध्या वाटेवर आलें ह्मणजे हप्पर ह्मणून एक बरेंच मोठें जंक्शन स्टेशन लागतें. तेथें गाडी बराच वेळ उभी राहते. ह्मणून आह्मीं खालीं उतरून तेथल्या स्टेशनमास्तराजवळ गार्डाच्या वर्तनाबद्दल गाऱ्हाणें गाइलें व सरटिफिकेट मागितलें व तो स्टेशनमास्तर सरटिफिकेट देण्याच्या विचारांत होता; इतक्यांत तो गार्ड तेथें आला व ह्मणूं लागला, कीं "आतां इंटरक्लासच्या डब्यांत जागा झाली आहे तेथें पाहिजे तर जा; तुह्मांला सरटिफिकेट देण्याचें कारण नाहीं." आह्मीं अर्ध्यापेक्षां जास्त रस्ता चालून आलों होतों; व येथें पुनः सामानाची फिरवाफिरव करावयाची ह्मणजे पोर्टरकरितां आठबारा आण्यांचा भूर्दंड भरावयाचा; ह्मणून आह्मीं तसें करण्याचें नाकारलें व कंपनीच्या नियमाप्रमाणें सरटिफिकेट मागूं लागलों. परंतु तो गार्ड आमच्या वर्तनानें चिरडीस गेल्यासारखा झाला व याप्रमाणें आह्मीं त्याच्याजवळ वादविवाद करीत असतां त्यानें गाडी चालू करण्याची शीळ फुंकली. त्याचा उद्देश आह्मीं मागें रहावें व आमचें सामान व मंडळी पुढें जावी व आह्मांला जास्त खर्च व त्रास पडावा असा दिसला; पण शिताफी करून मी व माझे

बंधू गाडी चालत असतां समोरच्या सेकंडक्लासच्या डब्यांत वर चढलों व दार उघडून आंत जाऊन बसलों व दिल्लीस गेल्यावर याबद्दल तकरार करण्याचा विचार केला. थोड्याच वेळांत दिल्ली स्टेशन आलें. आह्मीं आपलें सामान न काढतां स्टेशनमास्तरकडे गेलों व गार्डाच्या वर्तनाबद्दल तकरार केली. आनंदाची गोष्ट ही, कीं, स्टेशनमास्तर आमच्याशीं चांगल्या तऱ्हेनें वागला. " सरटिफिकेट नसलें तरी तुमचे पैसे तुह्मांला परत मिळतील; मात्र तुह्मीं तिसऱ्या क्लासांतच बसलां होतां याबद्दल तिकीटकलेक्टरची खातरी करा व डायरीबुकांत तुमच्या तिकिटाचे नंबर नोंदवून द्या." स्टेशनमास्तरच्या सांगण्याप्रमाणें तिकिटकलेक्टरला आह्मीं बसलों होतों त्या डब्याशीं आणून तिसऱ्या क्लासांत बसल्याबद्दल त्याची खातरी केली व त्याच्याकडून डायरींत तशी नोंद करविली. पुण्यास परत आल्यावर ट्रॅफिक मॅनेजरकडे अर्ज केला. आमचे पैसे परत मिळाले इतकेंच नाहीं, तर त्या गार्डाची अशा गैरशिस्त वर्तनाबद्दल कानउघाडणी केली आहे, असेंहि आह्मांला लिहून आलें. आपल्या हक्काला जागण्याची प्रवासांत केव्हां केव्हां कशी जरूर लागते हें समजावें व आपण आपल्या हक्काला जागल्यास या कायद्याच्या राज्यांत त्याचा उपयोगहि होतो, हें वाचकांच्या ध्यानांत यावें, ह्मणून वरील मजकूर लिहिला आहे. दिल्लीहून आह्मांला मथुरेस जाण्यास लागलीच गाडी होती. आतां वेळ रात्रीचीच होती. दिल्लीहून आह्मी निघालों ते सकाळींच मथुरा स्टेशनवर येऊन दाखल झालों.

स्टेशनवर पंड्यांची पुष्कळ गर्दी होती. सामान वगैरे खालीं उतरून आह्मी स्टेशनच्या बाहेरील वेटिंगरूममध्यें आलों. मुरादाबादेहून आह्मी निघालों तेव्हां मथुरेस अहिल्याबाई होळकरीण यांची चांगली धर्मशाळा आहे, तेथें उतरण्यास जावयाचें, असा बेत केला होता. परंतु तेथें आल्यावर कळलें, कीं, ती धर्मशाळा मथुरेंत नसून वृंदावनांत आहे व स्टेशनपासून वृंदावन पांचसहा मैल दूर आहे. तेव्हां तो बेत रहित करून आह्मीं एका पंड्याचे घरींच उतरावयास जाण्याचें ठरविलें, व दिसण्यांत जरा संभावित असा एक पंड्या गांठला व यात्रेकरितां किंवा धार्मिक

कृत्याकरितां आह्मांला कांहींएक त्रास देणार नाहीं असें त्याजपासून कबूल करून घेतलें व तीन एक्के करून आह्मीं पंड्याच्या बरोबर त्याचे घरीं येऊन दाखल झालों. आमच्या सुदैवानें आह्मांला जागा चांगली मिळाली. या पंड्याचें घर अगदीं यमुनेच्या कांठीं होतें. मध्यें फक्त फरसबंदी सडक होती. सडक टाकली कीं घाटच लागे. शिवाय आह्मांला राहण्यास दिलेली जागा दरवाज्याच्या माडीवर होती. यामुळें खिडकींतून यमुनेचा सर्व देखावा दिसत होता. यमुनेचा तो काळ्याभोर पाण्याचा शांत व गंभीर प्रवाह पाहून आह्मांला हरिद्वारची आठवण झाली. गंगेचें पाणी अत्यंत शुभ्र व स्फटिकवत् होतें तर यमुनेचें पाणी बरेंच काळसर नीळसर रंगाचें होतें. गंगा प्रचंड वेगानें व दुथडी भरून चालली होती तर यमुनेचें पाणी पुष्कळ कमी होतें व त्याचा लांबचलांब डोह बनलेला होता. मागें मीं प्रयाग पाहिलें होतें, तेव्हां गंगायमुनेच्या संगमावर थेट स्नानास गेलों होतों व या दोन निरनिराळ्या रंगांच्या प्रवाहाचा संयोग खरोखरच आल्हाददायक वाटला व त्या देखाव्याची या वेळीं मला आठवण झाली. बिऱ्हाडांत सामान वगैरे लावल्यावर मी व माझे बंधू बाजारांत जाऊन भाजीपाला व दूधतूप वगैरे अवश्य जिनसा आणून आमच्या कुकरच्या आराधनेस लागलों. जेवण झाल्यावर मथुरेंतील प्रेक्षणीय स्थळें पंड्याच्या सल्ल्यानें पहावयाचा कार्यक्रम ठरवूं असा विचार करून आह्मी यमुनेवर स्नानास गेलों. परंतु तेथें गेल्यावर आतांपर्यंतचा सर्व आनंद मावळला. घांटावर गेलों तों फार दुर्गंधी येऊं लागली. गांवांतील सर्व नाल्यांचा निकाल येथें घाटावरून उघड्या रीतीनें केला आहे. सर्व नदी घाटानें जणूं कांहीं मढविलेली आहे. घाट उत्तम बांधलेले आहेत; परंतु जेथें तेथें मोरीचें घाण पाणी घाटावरील पायऱ्यांवरून ओघळत येतें. नदीच्या पाण्यांत पाय टाकला तों पाणीसुद्धां वाईट झालेलें दिसलें. उन्हाळ्यामध्यें यमुनेचें पाणी पुष्कळ कमी होतें व प्रवाह बहुतेक बंद झाल्यासारखा होतो. यामुळें गांवांतून मोऱ्यांमधून येणारें सर्व पाणी या संथ पाण्यांत येऊन मिळतें व यामुळें पाणी खराब होतें, असें आमच्या नजरेस आलें. यासंबंधानें हरिद्वार व मथुरा यांतील फरक आश्चर्य

वाटण्यासारखा होता. हरिद्वार हें गांव लहान असल्यामुळें तेथली घाण या मोठ्या गांवाइतकी नाहीं. परंतु हरिद्वारला एकाच मोठ्या नाल्यानें गांवां-तलें घाण पाणी आणून तें बंद नाल्यानें नदीच्या दूरच्या वाहत्या प्रवाहांत सोडल्यामुळें तेथें नदीमध्यें व विशेषतः स्नान करावयाच्या जागीं तर स्वच्छ पाणी असतें. शिवाय, हरिद्वारास नदी गोट्यांनीं भरलेली आहे; तर मथुरेस बारीक वाळू व काळसर माती व चिखल यांनीं नदी भरलेली असल्यामुळें नदीचें पाणी जास्तच गढूळ व घाणेरडें होतें. यामुळें घांटाकडच्या बाजूला स्नान करण्यास मन अगदीं घेत नाहीं. नदीच्या पलीकडच्या तीराला जरा बरें पाणी असतें व त्या बाजूला पाणी बेताचें म्हणजे गळाभर असल्यामुळें पोहण्यासहि चांगलें सांपडतें, असें समजल्यामुळें मथुरेंत आह्मीं होतों ते दोन तीन दिवस रोज आह्मीं स्नानास पलीकडेच जात असूं. नदीच्या पलीकडे जाण्यास येथें नावा हव्या तितक्या मिळतात व त्या फक्त जाण्यायेण्याचा माणशीं पैसा घेतात. यामुळें ही सोय आह्मांला फार पसंत पडली व या बाबतींत हरि-द्वारपेक्षां आह्मांला बरें वाटलें. कारण हरिद्वारास गंगेच्या पाण्याला इतका विलक्षण जोर होता, कीं, मी पोहणारा आपला बेताबाताचा असल्यामुळें पाण्यांत सरळी टाकण्याचें केव्हांहि धैर्य झालें नाहीं. परंतु मथुरेस पाणी संथ असल्यामुळें व बहुतेक नदीला गळाभर पाणी असल्यामुळें पोहण्यास मुळींच भीति वाटली नाहीं. कारण दमल्याबरोबर खालीं पाय लावण्यास सोय होती व पाण्याला ओढहि मुळींच नव्हती. यामुळें माझ्यासारख्या नवशिक्या पोहणारास गंमत वाटली. नदीचें पाणी पिण्यालायक नव्हतें ह्मणून आह्मीं एका जवळच्या विहिरीचें पाणी पिण्याकरितां आणीत होतों. तरी पण त्या पाण्यांतहि फार घाण व कचरा होता. येथल्या अशा वाईट पाण्यामुळें यात्रेकरू आजारी पडतात.

जेवणखाण आटोपल्यावर आह्मीं आपल्या यात्रेचा कार्यक्रम ठरवूं लागलों. परंतु पंड्याच्या तोंडून यात्रेचा विस्तार ऐकून रात्र थोडी सोंगें फार अशी आमची स्थिति झाली. पंड्यानें सांगितलें “सर्व यात्रेला येथें बनजत्रा अगर वनयात्रा ह्मणतात. या यात्रेमध्यें कृष्णाच्या आयुष्यांतील बहुतेक सर्व

गोष्टींच्या सामक्षा पाहण्यास सांपडतात. मनुष्यानें विश्रामघाटापासून निघून प्रथमतः मधुवन पहाण्यास जावयाचें. हें मथुरेच्या दक्षिणेस चार मैल आहे, व येथें मधु राक्षसाचा शत्रुघ्नानें पराभव करून तेथें मधुपुरी स्थापिली. येथून तालबनास जावयाचें. या ठिकाणीं बलरामानें धेनुक राक्षसास मारिलें. नंतर गोवर्धनास १६ मैल जावयाचें. हें मथुरेच्या बरोबर पश्चिमेस आहे. तेथून पुढें उत्तरेकडे कोटबनापर्यंत ३४ मैल जावयाचें व तेथून परतावयाचें व वृंदावनास यावयाचें. तेथें पवित्र यमुना नदी उतरून पलीकडे जाऊन किती तरी वनें, राया, तलाव विहीरी—व या सर्वांचा कृष्णाच्या आयुष्यांतील एकाद्या गोष्टीशीं संबंध असतोच—पहावयाच्या, व शेवटीं कृष्णाचें बालवय जेथें गेलें त्या गोकुळीं जावयाचें व तेथून पुन्हां यमुना ओलांडून परत मथुरेस विश्राम घाटीं यावयाचें." येवढ्या मोठ्या विस्तीर्ण प्रदेशाची एक यात्रा आहे व ही पुरी होण्यास कितीक तरी दिवस लागणार, असें पाहून आमची प्रथम फारच निराशा झाली. परंतु विचारांतीं अंथरुण पाहून पाय पसरणें बरें असा विचार करून आह्मीं मथुरा व पांच मैलांवर असलेलें वृंदावन येवढींच पाहण्याचें ठरविलें. मला गोकुळ पाहण्याची अत्यंत इच्छा होती. परंतु वृंदावन मथुरेच्या थेट उत्तरेस तर गोकुळ थेट दक्षिणेस, अशी भूगोलविषयक परिस्थिति असल्यामुळें हीं दोन स्थानें पाहण्यास दोन निरनिराळे दिवस पाहिजेत असें दिसून आलें. परंतु दोन दिवसांची तर आह्मांला सवड नव्हती. यामुळें मथुरा व वृंदावन हीं दोन स्थळेंच पाहून त्यांत समाधान मानणें आह्मांला प्राप्त झालें.

याप्रमाणें कार्यक्रम ठरल्यावर आह्मीं पंड्यास घोड्यांच्या गाड्या आणावयास सांगितलें. तो लवकरच गाड्या घेऊन आला. तेव्हां विशेष पुरातन व कृष्णाच्या जन्मासंबंधाचीं पवित्र स्थळें व चांगलीं देवळें आह्मांला दाखविण्याबद्दल त्याला सांगून आह्मीं गाडींत बसलों, व मथुरेच्या मुख्य बाजार रस्त्यानेंच चाललों. या सर्व रस्त्यावर दुतर्फा दुकानेंच आहेत. रस्ता फरसबंदी आहे. घरें बरींच दगडी आहेत व कांहीं कांहीं कळाकुसरीच्या कामानें शृंगारलेलींहि आहेत. या बाजारामधून आह्मीं 'हार्डिंग गेट'

ह्मणून दगडाची भव्य कमान १८७० मध्यें मथुरा म्युनिसिपालिटीनें बांधली आहे तिचे खालून बाहेर आलों. हा देखावा बराच प्रेक्षणीय आहे.

येथून आह्मांला आमच्या पंड्यानें येथील मुख्य देऊळ केशव-देव येथें नेलें. हें देऊळ साधारण चांगल्यापैकीं आहे; परंतु हें अर्वाचीन आहे. केशव-देवाचें फार प्राचीन देऊळ औरंगझेबानें नाहींसें करून त्या ठिकाणीं मोठी जुम्मा मशीद बांधली. ही मशीद अझूनहि जुन्या देवळाच्या चवथ-ऱ्यावर आहे व एकंदरींत पूर्णपणें हिंदु असलेल्या या शहराच्या मध्यभागीं औरंगझेबाच्या धर्मवेडाची साक्ष ती सतत देत आहे. या देवळाच्या जवळच पोतारकुंड ह्मणून एक तलाव आह्मांला दाखविण्यांत आला व पंड्यानें आह्मांला सांगितलें, कीं, या तळ्यांत कृष्णाचीं लहानपणचीं चिरगुटें धूत असत. याच्याजवळ वसुदेव-देवकीचें कारागृह व कृष्णाची जन्मभूमि दाखविण्यांत आली. परंतु ती एकंदर जागा व तिची परिस्थिति पाहून त्याचें ह्मणणें सत्य दिसलें नाहीं. पुढें तर आह्मांला असें दिसून आलें, कीं, मथुरावृंदावनांत कोठेंहि तलाव असो, येथें कृष्णाचीं चिरगुटें धूत असत ह्मणून आपलें सांगत. कृष्ण ज्याप्रमाणें आपल्या सोळा सहस्र गोपींच्या मनोरंजनाकरितां सोळा सहस्र रूपें धारण करीत असे त्याप्रमाणें भावी पिढींतील भाविक भक्तांच्या समाधानाकरितां जन्मल्यापासून त्यानें हजारों रूपें धारण केलीं होतीं व ह्मणून त्याचीं चिरगुटें धुतल्याची साक्ष पटविणारीं कुंडें मथुरावृंदावनांत असंख्य असून तीं हल्लीं पंड्यांना दाखवितां येतात! हें देऊळ व ही जागा मातीच्या एका उंचवट्यावर आहे. मथुरेच्या बाहेर असे मातीचे ढिगारे जागोजाग आहेत. पूर्वींच्या शहराच्या तटापैकीं हा कांहीं भाग आहे, किंवा यमुना नदीचा प्रवाह पूर्वकाळीं इकडे असून त्याच्या तीराचे हे भाग आहेत हें सांगतां येत नाहीं. हें पवित्र स्थान दाखविल्यावर पंड्यानें आह्मांला त्याच्या बुद्धीनें जास्त पवित्र व पुरातन अशा ठिकाणीं नेलें व तेथें कृष्णाचीं वडील माणसें व इतर त्याचे संबंधी दृष्टीस पडतील ह्मणून सांगितलें. आह्मीं आतां बऱ्याच आपल्याला पुरातन काळच्या मूर्ति पाहण्यास सांपडतील अशा मोठ्या आशेनें व औत्सुक्यानें एका सोप्यावजा दालनांत शिरलों व तेथें आह्मांला वसुदेव,

देवकी, बालकृष्ण, कंस, नंद, यशोदा व बलराम वगैरे कृष्णाचीं सख्खीं व दत्तक वडील माणसें यांचीं चित्रें दाखविण्यांत आलीं. तीं चित्रें पाहून आह्मांला भक्तीचा उमाळा येण्याऐवजीं दुसराच कसलातरी उमाळा आला. आपल्या इकडे शिराळशेटाच्या सणाच्या दिवशीं किंवा नागपंचमीचे दिवशीं जशीं ओबडधोबड, अगडबंब, कुरूप व ओंगळ मातीचीं चित्रें करतात, तशाच तऱ्हेच्या त्या मूर्ति पाहून आशाभंग व हास्य असे मिश्र मनोविकार एकसमयावच्छेदेंकरून मनांत उद्भूत झाले. मथुरा पाहण्यास यावयाचा बेत केल्यापासून या ठिकाणच्या पुरातनपणाबद्दल व येथल्या कृष्णाच्या आयुष्याबद्दल बऱ्याच साक्षी आपल्याला दृग्गोचर होतील ह्मणून मोठ्या औत्सुक्यानें आह्मीं या यात्रेला आलों. परंतु आतांचा हा देखावा पाहून आमच्या मनांतील तें औत्सुक्य पार नाहींसें झालें व आमच्या लोकांच्या अंधश्रद्धेबद्दल व मूर्ख भोळसटपणाबद्दल हंसूं येऊं लागलें. आतांपर्यंत पाहिलेल्या सर्व देखाव्यांवरून आमची अशी खातरी झाली, कीं, मथुरा कृष्णाचें खरें जन्मस्थान असो वा नसो, त्याच्या गोष्टी खऱ्या असोत वा नसोत, परंतु हल्लीं जीं कृष्णचरित्रांतील स्थळें ह्मणून दाखवितात तीं स्थळें कृष्णाच्या गोष्टीनंतर भाविक लोकांना फसविण्या-करितां तयार केलेलीं आहेत व असल्या स्थळांबद्दल, येथल्या चित्रांबद्दल व मूर्तींबद्दल मनुष्याच्या मनांत आदर तरी कसा उत्पन्न होतो, याचेंच आह्मांला गूढ पडलें. परंतु ती वेळ पंड्याजवळ वादविवाद करण्याची नव्हती. या सर्व मूर्तींजवळ एक बुवा बसला होता व तो आह्मांला पिंवळ्या मातीचा अंश प्रसाद ह्मणून देत होता. आह्मीं पंड्याच्या मर्जी-खातर या सर्व विद्रूप चित्रांपुढें एक दोन आण्यांचे पैसे ठेवून तेथून पाय काढला.

पुढें आह्मांला कंसाचा वाडा व किल्ला ह्मणून एक मोडक्यातोडक्या तटांनीं व्यापृत असें एक आवार दाखविण्यांत आलें. तें जुनाट दिसत होतें. परंतु ३००० वर्षांपूर्वीचें असेल असें भासत नव्हतें. परंतु या सर्व ठिकाणच्या अर्वाचीनत्वाबद्दल एकदां मनांत जाणीव उत्पन्न झाल्यावर या असल्या भाविक लोकांना फसविण्याकरितां ठरविलेल्या जागा व

ठिकाणें पाहण्याची आमची हौस जागच्याजागींच जिरली व आह्मीं पंड्यास, आह्मांला आतां जुन्या जागा व देवळें नकोत, येथलीं उत्तम उत्तम नवीं देवळें दाखवा, ह्मणून सांगितलें. तेव्हां आह्मीं परत गांवाकडे फिरलों व येथें बरींच देवळें पाहिलीं. त्यानें मात्र आमचें मन पुन्हां प्रसन्न केलें. कारण मथुरेंतील देवळें फार सुंदर आहेत. या देवळांतील दगडाचें नक्षी-काम, जाळीदार खिडक्या, कोरीव खांब व देवळांचें एकंदर अंतरंग फारच सुबक आहे, यांत शंका नाहीं. एकेक देऊळ पहावें तों मागच्या-वर ताण; परंतु मथुरेंतील देवळें अगदीं दाट वस्तींत व भर बाजारांत बांधलेलीं असल्यामुळें व त्यांच्या सभोंवार खुली जागा फारच कमी अस-ल्यामुळें हीं देवळें प्रथमतः मनांत भरत नाहींत. पहिल्या पायऱ्या चढ-तांना आपण एखाद्या सुंदर आणि फारच विस्तीर्ण व सुबक देवळांत शिरत आहोंत असें वाटत सुद्धां नाहीं. परंतु आंत गेल्यावर देवळांचें काम पाहून तेथल्या कारागिरीबद्दल मनुष्य आश्चर्यानें तोंडांत बोटेंच घालतो. मात्र या सर्व देवळांत फारशीं जुनीं देवळें मुळींच दिसत नाहींत. बहुतेक सर्व देवळें अलीकडील तीन चारशें वर्षांतील आहेत. हें असें कां? याचा उलगडा या पुस्तकाच्या शेवटल्या भागावरून होईल.

याप्रमाणें मथुरेंतील बहुतेक पाहण्यासारख्या ठिकाणांचें दर्शन घेऊन तीन चार तासांनीं आह्मीं आपल्या बिऱ्हाडाला आलों व मग नित्याप्रमाणें आमच्या अर्वाचीन स्थालीची आराधना करून पाकनिष्पत्ति केली व भोजनोत्तर संध्याकाळपर्यंत विश्रांति घेतली.

वर लिहिल्याप्रमाणें मथुरेच्या प्रथम दर्शनानें जरी आमची थोडीशी निराशा झाली, पण पुढें देवळांच्या दर्शनानें ती नाहींशी होऊन आनंद वाटला; तरी जी गोष्ट हरिद्वारला शक्य नव्हती ती येथें शक्य झाल्यामुळें माझें मन अधिक आनंदित झालें. हरिद्वारच्या नजिकच्या गंगा-प्रवाहांत बोटींतून सहल करून सर्व शहराची शोभा पाहण्याची किती वेळां तरी इच्छा झाली असेल; परंतु इच्छेनें जर होड्या तयार होत्या तर आमची इच्छा तृप्त झाली असती! परंतु ती गोष्ट शक्य कोटींतील नसल्यामुळें मनींची इच्छा मनांत दाबावी लागली. परंतु मथुरेस ज्या

विन्हार्डी आह्मीं उतरलों होतों त्याच्या समोरचे घाटावरच पुष्कळ नावा दिसल्या व त्या पाहून आह्मांला आनंद झाला व येथें असेतोंपर्यंत रोज सायंकाळीं नावेंत बसून सहल करावयास जावयाचें असा आह्मीं बेत केला होता. तदनुरूप सायंकाळ होतांच आह्मीं एका नाववाल्यास बोलावून आह्मांला सर्व नदीभर सहल करण्यास घेऊन जाण्यास फर्माविलें. माणशीं दोन पैसे आह्मांला स्वस्तच वाटले. नावेंतून शहराचा देखावा फारच मनोहर दिसतो. गांवाच्या एका बाजूला तो रेलवेचा लांबच लांब पूल; दुसऱ्या बाजूला तो कंसाचा किल्ला; समोर सर्व शहरांतील घाटांची रांगची रांग, त्या मागें घरांच्या ओळीच्या ओळी, देवळांचीं शिखरेंच शिखरें व मागच्या बाजूला एक काळसर मृत्तिकामय वाळवंटचे वाळवंट, हा देखावा चित्ताकर्षक आहे यांत संशय नाहीं. काशीमध्यें नावेंत बसून सर्व शहर पाहिलें ह्मणजे असाच चित्ताकर्षक देखावा दिसतो. मात्र काशीस गंगेचें पात्र फारच प्रचंड आहे व प्रवाह खोल असून शीघ्रगामी आहे. यमुनेचें पात्र त्या मानानें लहान आहे व यमुनेचा प्रवाहहि लहान असून मंदगति आहे. परंतु दोन्ही शहराची रचना अगदीं सारखीच आहे. यामुळें यमुनेंतून नावेंत बसून कंसाच्या किल्ल्यापासून रेलवेपुलापर्यंत वल्हवीत गेलें ह्मणजे आपण छोटेखानी काशीच पहात आहों कीं काय, असा भास होतो. जरी आह्मीं पाहिली त्या वेळीं यमुना नदी आपल्या वर्षाकाळांतील पूर्ण ऐश्वर्यांत नव्हती, उलट उन्हाळ्यामुळें तिला कांहींसें जलदुर्भिक्ष आलेलें होतें, व वाळूचीं मैदानें उघडीं पडलीं होतीं, तरी सुद्धां यमुना नदी तिच्या पाण्याच्या रंगामुळें गंभीर व भव्य दिसली. नावेंतून सायंकाळीं नदींतून जात असतांना निरनिराळ्या घाटांची व त्यांवरील देवळांची शोभा अवर्णनीय दिसते. मथुरेंतील सर्वांत प्रेक्षणीय व पवित्र घाट ह्मणजे विश्रामघाट होय. हा शहराच्या बहुतेक मधोमध आहे. कंसाला मारल्यावर कृष्णानें याच घाटावर विश्रांति घेतली, अशी दंतकथा आहे. ह्मणूनच या घाटाला विश्रामघाट असें ह्मणतात. सात साडेसातांच्या सुमारास या घाटावर आरती होते. तीं दीपावलीचीं पाण्यांत पडलेलीं प्रतिबिंबें, तो मंजुळ घंटानाद व ते भाविकांचे सुस्वर आलाप, वगैरे

प्रकार पाहून व ऐकून मनाला फार आनंद होतो व नदीच्या पात्रांतून बाहेर येऊंच नये, असें वाटतें; परंतु नावाडी उशीर झाल्यामुळें परतण्याची घाई करतो. नाइलाज ह्मणून त्याच्या ह्मणण्याला रुकार देऊन परत आपल्या बिऱ्हाडीं यावें लागतें. आह्मीं मथुरेस तीन दिवसच होतों. परंतु या तीन्ही दिवशीं सायंकाळीं आह्मीं नावेंतून सहल करावयास जात असूं.

दुसरे दिवशीं सकाळीं वृंदावनास जावयाचें असल्यामुळें आह्मीं लवकरच उठलों व आदल्या दिवसाप्रमाणें दोन घोड्यांच्या गाड्या आणवून पंड्यास बरोबर घेऊन वृंदावनास गेलों. वाटेनें जातां जातां छोट्या छोट्या बागा व बंगलेवजा लहान लहान घरें लागतात. केव्हां यमुना नदी रस्त्याच्या अगदीं नजिक येते तर केव्हां दूर जाते. इकडील प्रदेश सपाटीचाच आहे. डोंगर किंवा उंचवटा फारसा दृग्गोचर होत नाहीं. अशी सभोंवतालची शोभा पहात पहात सुमारें तास दीड तासानें आह्मीं वृंदावनास येऊन पोहोंचलों. या गांवाला मथुरेपेक्षांहि देवळें जास्त आहेत. सर्व देवळें अर्थात् कृष्णाचींच आहेत. परंतु त्यांना कृष्णाच्या निरनिराळ्या नांवांवरून राधारमण, मदनमोहन, राधावल्लभ, राधागोपाळ, रंगज़ी, गोविंदज़ी, गोविंद-देव, गोपीनाथ, द्वारकाधीश वगैरे नांवें आहेत; किंवा बांधणारांच्या नांवावरून तरी तीं पडलेलीं आहेत. जसें 'लालाबाबूका देवल,' 'शेटसाहेबका देवल,' 'ग्वालेर महाराजका देवल' 'राणी निकारीका देवल.' पंड्यानें आह्मांला सांगितलें, कीं, येथें हजारों देवळें आहेत. तेव्हां सगळीं देवळें पाहणें अशक्यच होतें. तरी जीं प्रख्यात देवळें आहेत तेवढीं आह्मांला दाखीव असें आह्मीं त्याला सांगितलें.त्यानें आह्मांस सरासरी दहा बारा देवळें दाखविलीं. तीं खरोखरीच सुंदर, भव्य व हिंदु शिल्पकलेची साक्ष पटविणारीं आहेत. या देवळांपैकीं पुष्कळशीं बंगाली बाबूंनीं बांधलेलीं आहेत, याचें प्रथमतः आह्मांला मोठें गूढ वाटलें; परंतु बंगाल्यांत चैतन्य ह्मणून जो साधु झाला, त्यानें राधाकृष्णाच्या भक्तिपंथाचा बंगाल्यांत प्रसार केला व तो वृंदावनांत शेवटीं येऊन राहिला होता. यामुळें बंगाल्यांतील भाविक लोकांनीं येथें कृष्णाचीं फारच सुंदर देवालयें बांधलीं आहेत. ह्मणूनच वंगश्री वृंदावनांत येऊन राहिली आहे, अशी येथें ह्मण

पडली आहे. वृंदावनांतील जीं देवळें आह्मीं पाहिलीं त्यांच्या सभोंवर्ती खुली जागा बरीच असल्यामुळें तीं मथुरेच्या देवळांपेक्षां जास्त उठावांत दिसतात. बाकी कलाकौशल्याच्या दृष्टीनें मथुरेंतील देवळें कांहीं कमी नाहींत. पण तीं भर बाजारांत व संकुचित जागेंत असल्यामुळें त्यांची शोभा कमी होते यांत शंका नाहीं. येथील देवळांना उत्पन्नें दांडगीं आहेत व भाविक लोकांकडून देणगीच्या रूपानेंहि दरसाल फार मोठी रक्कम मिळते. वीसवीस हजार रुपयांच्यावर वार्षिक मिळकत असणारीं देवळें येथें पुष्कळ आहेत.महाराष्ट्रामध्यें अशा प्रकारचीं श्रीमंत देवळें व देव फारसे नसल्यामुळें प्रथमतः इकडल्या देवळांचा थाट पाहून आह्मीं अगदीं थक्क होऊन गेलों. कृष्ण हा देव विलासी असल्यामुळें त्या देवाचीं देवळेंहि एकाद्या राजविलासी राजाच्या राजवाड्याप्रमाणें, किंवा अन्तःपुराप्रमाणें शृंगारलेलीं असावीं, हें स्वाभाविक आहे. तरी पण येथल्या देवांच्या एकंदर पूजा-अर्चाबद्दलच्या हकीगती पाहून व ऐकून आह्मांला लोकांच्या भाविकपणाचें हंसूच आलें. येथल्या बहुतेक देवांची एकाद्या विलासी राजाप्रमाणें रात्रं-दिवस तरतूद केली जाते. येथील देवांचे मनुष्याप्रमाणेंच सर्व आहार-विहारादि व्यवहार चालतात. आधीं देवळाच्या गाभाऱ्यांत सर्व सुखसोई व विलासांचे प्रकार असतात. प्रत्येक देवाच्या मूर्तीवर सुंदर पंखा असतो. तिकडे उन्हाळा फार असल्यामुळें देवालाहि ऊष्मा भासत असावा. या पंख्याची एक दोरी गाभाऱ्याबाहेर देवदर्शनाला येणाऱ्या भक्ताच्या उभें राहण्याच्या ठिकाणापर्यंत आणलेली असते व प्रत्येक भक्तानें दोरी दोन चार वेळ तरी हालवून देवाला वारा घालून त्याची सेवा करण्याचा परिपाठ आहे. देवळासमोर बहुधा गार पाण्याचें सुंदर कारंजें असावयाचेंच, व कारंज्यांतून उडणारे जलतुषार मूर्तीपर्यंत जावेत, अशी योजना केलेली असते. येथें देवाच्या गाभाऱ्याला सुवासिक फुलांच्या माळा घालण्याचा फारच प्रघात दिसला. यामुळें देवळांत गाभाऱ्याजवळ गेलें, कीं, त्या फुलांच्या माळांच्या सुवासानें, त्या मनोहर कारंज्याच्या फवाऱ्यानें, चंदनाच्या उटीच्या वासानें भक्ताचें मन गारीगार होतें, यांत शंका नाहीं. येथल्या देवाचे सर्व सुखसोहाळे दररोज व विशेषतः निरनिराळ्या सणाच्या वेळीं

करण्याची रीत आहे. रोज देवाचें न्हाणें व्हावयाचें; पुढें त्याचा पोषाख व्हावयाचा; नंतर त्याचें जेवणखाण व्हावयाचें; पुढें वामकुक्षी व्हावयाची; पुनः मधल्या वेळचें खाणें; सायंकाळीं फिरणें; पुढें रात्रीचें जेवण व तदनंतर निद्रा वगैरे सर्व व्यवहार देवाचे होतात. यामुळें येथें गाभाऱ्यांना पडद्याची सोयहि केलेली असते. देवाला निजावयाची इच्छा झाली, कीं, सर्व बाजूचे पडदे टाकून काळोख केला ह्मणजे दिवसासुद्धां झोंप घेण्यास हरकत नाहीं! यामुळें या गांवांत सर्व देवांचें दर्शन होणें कठीण जातें. आह्मीं एका देवळांत गेलों तेथें आह्मांला समजलें, कीं, देव निद्रा घेत आहेत व अर्धा तास देवाचें दर्शन किंवा भेट होणार नाहीं! त्या देवळांत तमाम लोक उभे! कारण, त्यांना देवाचें दर्शन घेण्याची इच्छा. परंतु आह्मीं इतका वेळ तेथें उभें राहावें किंवा नाहीं हा आह्मांला विचार पडला. आह्मांला तर तिष्ठत बसण्यास सवड नव्हती. तेव्हां आह्मीं मनांत ह्मटलें, कीं, " जर येथले देव निजतात, तर ते वेळींच उठतीलसा काय नेम! तेव्हां ज्याप्रमाणें अर्वाचीन काळीं एकादे गृहस्थ घरीं भेटले नाहींत, तर आपण आपल्या नांवची कार्ड ठेवून जातों, त्याप्रमाणेंच आपण करावें." असें मनांत ह्मणून आह्मीं नमस्काररूपी आमच्या नांवाची कार्ड देवाजवळ ठेवून दुसरें देऊळ पहावयास गेलों. दुसऱ्या देवळांत गेलों तों तेथेंहि देव भोग भोगीत आहे असें समजलें! पुनः आम्हांला पंचाईत येऊन पडली. परंतु आमच्या सुदैवानें देवाचें भोग भोगणें संपलें व पडदा एकीकडे झाला व आम्हांला देवाचें दर्शन घडलें. तिसऱ्या एका देवळांत गेलों तेथें देवळाच्या प्रशस्त आवारांत पालखींत बसून देव फिरावयास निघाले आहेत, असें आमच्या दृष्टीस पडलें! याप्रमाणें वृंदावनांतील देवळांत आमच्या हिंदुसमाजांतील एका धार्मिक पंथाच्या अंधश्रद्धेबद्दलचे बरेच मासले दोन तीन तासांच्या अवधींत पाहण्यास सांपडले.

येथें सर्वांत प्रचंड, भव्य व शिल्पकलेच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीचें देऊळ ह्मणजे रंगजीचें देऊळ होय. हें देऊळ येथील शेट गोविंददास व राधाकृष्ण यांनीं रंगाचार्य नांवाच्या आपल्या गुरूच्या सांगण्यावरून बांधलेलें आहे. याला एकंदर ४५ लाख रुपये खर्च झालेला आहे. याचा

बाह्य प्राकार फार विस्तीर्ण असून प्रचंड आहे. हें देऊळ मद्रासी पद्धतीवर बांधलेलें असल्यामुळें दरवाज्यावर उंच गोपुरें आहेत. हीं गोपुरें प्रथमतः दृष्टीस पडलीं, तेव्हां आम्हांलाहि आश्चर्य वाटलें. परंतु तेथले ते मद्रासी पोषाखाचे पुजारी पाहून व देवळाच्या उत्पत्तीची वरील हकीगत ऐकून आमचें आश्चर्य कमी झालें. या देवळाच्या आवाराचें पश्चिम प्रवेशद्वार ९३ फूट उंच असून तें मथुरेच्या धर्तीवर आहे. हें महाद्वार फार भव्य दिसतें. यामुळें आंत जातांना देवळाच्या प्रचंडतेची साक्ष पटते. देवळाचें काम व एकंदर देखावा फारच प्रेक्षणीय आहे. देवळाच्या समोर एक सोन्याचा ध्वजस्तंभ आहे. येथलीं दुसरीं चांगलीं प्रेक्षणीय देवळें म्हणजे लालाबाबूचें देऊळ. याचेंहि काम फारच सुबक आहे. मदनमोहन व गोपीनाथ हीं देवळेंहि चांगलीं आहेत. राधारमणाचें देऊळ अर्वाचीन आहे. तें सर्व संगमरवरी दगडाचें आहे. त्याच्या सभामंडपाचे खांब पीळ दिलेल्या दोरखंडाप्रमाणें केलेले असून एक एक खांब एका एका सबंध संगमरवरी दगडाचा आहे. हें देऊळ पाहून दागदागिन्यांनीं भरगच्च भरलेल्या श्रीमंत बाईची आम्हांला आठवण झाली. दागिन्यांच्या अतिरिक्त हौसेनें ज्याप्रमाणें केव्हां केव्हां सौंदर्यहानि होते, तसेंच या देवळाचें झालेलें आहे. या लहानशा देवळाला दहा लाख रुपये खर्च झालेला आहे. यापेक्षां राधाइन्द्रकिशोर हें देऊळ जास्त साधें, पण अधिक सुंदर दिसतें. गिरिधारीदास या नांवाच्या आपल्या गुरूच्या देखरेखीखालीं बांधलेलें ग्वालेरच्या महाराजांचें राधागोपाळाचें देऊळहि प्रेक्षणीय आहे. या देवळाला सुमारें चार पांच लाख रुपये लागलेले आहेत.

इतकीं देवळें पाहणें झाल्यावर आम्हीं आपल्या घड्याळांत पाहिलें तों फारच उशीर झाला असें दिसलें व भुकेनेंहि आपल्याकडे आमचें लक्ष्य वेधलें. तेव्हां 'आधीं पोटोबा, मग विठोबा' या म्हणीप्रमाणें आम्हीं वर्तन करण्याचें ठरवून गाडींत बसून परत आमच्या बिऱ्हाडाला येऊन पोंचलों; भोजनादि विधि उरकले व आदल्या दिवसाप्रमाणें सायंकाळपर्यंत करमणुकींत व विश्रांतींत वेळ घालवून सायंकाळीं नौकेंत बसून सहल करावयास गेलों.

तिसरे दिवशीं सकाळीं आह्मीं जमनाबाग पहावयास गेलों. तेथील एका प्रसिद्ध व्यापाऱ्याचें हें रहाण्याचें ठिकाण आहे. हें मथुरेच्या दक्षिणेस रेलवेपुलाच्या पलीकडे परंतु यमुनेच्या कांठींच आहे. आह्मीं गेलों ते दिवस भर उन्हाळ्याचे असल्यामुळें यमुनेला पाणी फार कमी झालें होतें, व तिला मधून मधून खांडवे पडले होते. यामुळें नावेंतून जाण्यास सवड नव्हती. बाकी इतर ऋतूंत या बागेस नावेंतून जातां येतें व तसें गेलें म्हणजे शहराची शोभा पहात पहात जातां येतें, असें आम्हांला सांगण्यांत आलें. परंतु सध्यां तें शक्य नसल्यामुळें आम्हांला गाडी करूनच जाणें भाग पडलें. आवारांत शिरण्याचा दरवाजा भव्य असून प्रेक्षणीय आहे. दरवाजापासून थोड्या अंतरावर एक कारंजें आहे व कारंजांतील पाणी लांबचलांब पाट बांधून त्यांतून बागेला जाण्याची तजवीज केली आहे. बाग बरीच विस्तीर्ण आहे, व तींत मोठमोठे वृक्ष पुष्कळ आहेत. झाडांच्या फांद्या वळवून केलेले वृक्षमंडपहि दोन तीन आहेत. यंदां आपल्या इकडील आंब्यांचें पीक फारच कमी होतें; परंतु या बागेंतील सर्व आंबे फलभारानें नम्र झालेले पाहून आम्हांला आनंद झाला. बागेच्या मध्यभागीं बंगलेवजा शेटसाहेबांची कोठी अगर राहतें घर आहे. त्यांत एक चांगला शृंगारलेला दिवाणखाना असून त्यामध्यें या घराण्यांतील दोनचार पुरुषांच्या तसबिरी आहेत. बंगल्या शेजारींच व नदीच्या अगदीं कांठीं एक लहानसें देऊळ व एक छत्री आहे. या दोन्ही इमारती दगडाच्या असून त्यांचें काम सुबक आहे. एकंदर ठिकाणची रचना व व्यवस्था पाहून आम्हांला मालकाच्या अभिरुचीचें कौतुक वाटलें.

आमच्या मथुरावासाचा हा शेवटचा दिवस होता. त्या दिवशीं आमच्यापैकीं कांहीं मंडळी दोनप्रहरच्या गाडीनें मुरादाबादेस जावयाची होती, व बाकीचे आम्हीं परत देशीं येण्याकरितां रात्रीच्या गाडीनें निघणार होतों. यामुळें लवकरच जेवणें आटपून आम्हीं स्टेशनवर गेलों व परत आल्यावर आम्हीं दिवसाउजेडींच जेवणखाण करून सामानाची बांधाबांध करून मथुरेचें शेवटचें दर्शन घेण्याकरितां बाहेर पडलों. मथुरेचे पेढे फार प्रसिद्ध, म्हणून बाजारांत जाऊन पेढे घेतले. हे पेढे कांहीं तरी

विशेष प्रकारचे असतील, अशी आमची कल्पना होती. परंतु आमची निराशा झाली. पण या पेढ्यांचा मुख्य गुण म्हणजे त्यांचा विलक्षण टिकाऊपणा होय, असें आम्हांला सांगण्यांत आलें. नंतर आम्हीं विश्रामघाटावर आलों व तेथें क्षणभर विसावा घेतला. सायंकाळीं तेथें एक मौज दिसते. घाटावरील यात्रेकरू पीठ किंवा दुसरें कांहीं खाद्य यमुनेंत टाकतात व तें खाण्याकरितां तेथें कांसवें जमतात. इतक्या कांसवांचा तांडा आम्हीं आजन्म पाहिला नव्हता. यांतील पुष्कळ कांसवें बरींच मोठीं होतीं. या ठिकाणीं माकडेंहि फार आहेत. हीं माकडें सुद्धां येथें या वेळीं येतात. एका माकडानें तर एका कांसवाच्या पाठीवर उडी मारून त्यावर पडलेलें खाद्य पटकन् मटकावून टाकलें व न घाबरतां त्या कांसवाच्या पाठीवर तें मोठ्या ऐटीनें बसलें! हा देखावा पाहून आम्हांला फारच मौज वाटली. ही जशी कांसवाची येथें मौज पहावयास सांपडते, तशीच सायंकाळीं हरिद्वारास माशांची मौज पहावयास सांपडते. यात्रेकरू भाविक लोक, दररोज सायंकाळीं पीठ विकत घेऊन त्याच्या लहान लहान गोळ्या करून गंगेंत फेंकतात व माशांच्या झुंडीच्याझुंडी प्रवाहाच्या अगदीं कडेला येतात. ही मौज आम्हीं हरिद्वारास पाहिली, त्याची आतां आम्हांला आठवण झाली.

झालें. येथें मथुरा वृंदावनाचें दृष्टिगम्य वर्णन संपलें. परंतु मथुरा हें शहर फार जुनें आहे; यानें किती तरी राजकीय, व धार्मिक स्थित्यंतरें पाहिलीं आहेत. तसेंच हल्लीं तरी तें शहर कृष्णभक्तीचें व वैष्णवपंथाचें आद्यस्थान आहे. तरी आतां मथुरेच्या कृष्णभक्तीच्या व वैष्णवपंथाच्या श्रुतिगम्य भागाकडे वळूं.



— ६ —

कृष्णकथा व वैष्णवपंथ.



मागल्या लेखांत मथुरेंतील प्रेक्षणीय स्थळांचें वर्णन दिलें. दोनचार दिवस येथें येणारास व वरवर पाहणारास मथुरेची हल्लींची वस्ती, मथुरेंतील देवळें, व इतर प्रेक्षणीय स्थळें जरी अर्वाचीन दिसलीं—व तीं तशीं आहेत--तरी पण पुराणवस्तुसंशोधकांच्या दृष्टीनें मथुरेचें फारच महत्त्व आहे. कारण येथेंच कित्येक फार जुनीं जुनीं नाणीं सांपडलेलीं आहेत. येथेंच खुद्द बुद्धाच्या वेळच्या वस्तु व मूर्ति सांपडलेल्या आहेत, आणि मथुरेंत सांपडलेल्या शिलालेखांनीं व नाण्यांनीं हिंदुस्थानांतील पुरातन इतिहासांतील कांहीं कांहीं दुवे जुळवून आलेले आहेत. शिवाय फार प्राचीनकाळीं आलेले चिनी प्रवासी फेहेअन व ह्युएनसंग हे दोघेहि या शहरीं येऊन बरेच दिवस तेथें राहिले होते. व त्यांनीं या शहराचें आपल्या ग्रंथांत वर्णन करून ठेवलेलें आहे. यावरून मथुरा हें शहर जरी हिंदुस्थानांतल्या अत्यंत प्राचीन शहरांपैकीं नसलें, तरी त्याचा पुराणत्वांत दुसरा नंबर लागेल, यांत शंका नाहीं. या शहराचा दुसरा एक विशेष हा आहे कीं, काशी व गया या क्षेत्राप्रमाणेंच हिंदुधर्माच्या लोकांना हें जितकें पवित्र स्थान वाटतें, तितकेंच ते बुद्ध धर्माच्या लोकांनाहि पवित्र वाटतें. कारण, स्वतः बुद्ध या नगरींत पुष्कळ दिवस राहिले होते, असा दाखला सांपडतो. ऐतिहासिक काळाच्या मागें जाऊन जर पुराणांकडे पाहिलें तर मात्र एक चमत्काराची गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते. ती

अशी कीं, मथुरा व त्याच्याशीं संलग्न अशी कृष्णकथा याचा मागमूसही महाभारतांत लागत नाहीं. पण मथुरा स्थापनेची कथा रामायणांत मात्र सांपडते.

यमुनेच्या कांठीं 'मधुवन' ह्मणून एक मोठें वन होतें व त्या वनांत 'मधुराक्षस' राहत असे. त्यानें शंकराला प्रसन्न करून एक यशस्वी शूल मिळविला होता. त्याच्या पश्चात् तो लवण नांवाच्या मधुराक्षसाच्या मुलाच्या ताब्यांत आला. हा लवण राक्षस यमुनातीरवासी तपस्व्यांना फार त्रास देऊं लागला, ह्मणून ते श्रीरामचन्द्राकडे अयोध्येस दाद मागण्याकरितां गेले. रामानें शत्रुघ्नास लवणाचें पारिपत्य करण्यास व तेथें राज्य स्थापन करण्यास धाडलें. त्याप्रमाणें शत्रुघ्न तेथें आला व लवणास शूलाखेरीज गांठून त्यानें त्याचा वध केला; व सर्व मधुवन तोडून टाकून यमुनेच्या कांठीं मधुपुर, मधुरा किंवा मथुरा ह्मणून शहर वसविलें. तेथेंच त्यानें राज्य स्थापन केलें व बारा वर्षांनंतर तो अयोध्येस रामास भेटावयास गेला. कालिदासानें रघुवंशांत इंदुमतीच्या स्वयंवराच्या सहाव्या अध्यायांत ज्याची राजधानी मथुरा यमुनाकांठीं आहे, असा शूरसेनाधिपति सुषेण याला स्वयंवरसभेंत राजाच्या मालिकेंत आणिलें आहे, व त्याच्या वैभवाचें व यमुनानदीच्या प्रदेशाच्या सौंदर्याचें वर्णन केलें आहे. रामायणांतील वरील गोष्टीचा व कालिदासानें दिलेल्या वरील गोष्टीचा मेळ बसत नाहीं. पण कालिदासाच्या कविवर्णनास इतकें महत्त्व देतां येत नाहीं.

इतकें खास कीं, बुद्धाच्या वेळीं हें शहर फारच भरभराटींत होतें; व त्याच्या काळापासूनच तेथें बुद्धधर्माचें प्राबल्य झालें व तें सुमारें सन ७०० वर्षेंपर्यंत कायम राहिलें. खिस्ती शकाच्या सुमारें ५०० व्या वर्षीं फेहेअन हा चिनी प्रवासी मथुरेस आला होता; तेथपर्यंत मथुरेस बुद्धधर्म बराच जोरांत होता. परंतु सन ४०० पासून ७०० पर्यंत त्याचा पूर्ण बीमोड झाला व मथुरा पुनः हिंदुलोकांचें पवित्र स्थान होऊं लागली.

मथुरेंतील सर्वांत जुन्या इमारती ह्मणजे बुद्धधर्मीयांचा एक विहार व एक स्तूप या आहेत. या स्तूपांत बुद्धाचीं नखें होतीं. उपगुप्त या नांवाच्या

मथुरेच्या राहणाऱ्या अत्यंत पूज्य अशा बुद्धभिक्षूनें हा विहार बांधला होता व त्यानेंच अशोक मौर्याला बुद्धधर्माची दीक्षा दिली होती. याप्रमाणें मौर्य राजांच्या काळीं मथुरा ही फार प्रख्यात नगरी होती असें दिसतें. बुद्धधर्माचा प्रसार-कर्ता अशोक हा बहुधा इसवी शकापूर्वी २३२ च्या सुमारास निवर्तलेला असावा. अशोकानंतर मौर्यवंश आणखी शंभरदीडशें वर्षे चालला. परंतु बृहद्रथ मौर्याचा सेनापति पुष्यमित्र यानें मगधदेशाचें राज्य बळकावलें. इसवी सनापूर्वी १८४ या वर्षापासून संग वंश राज्य-पदारूढ झाला. तेव्हां मथुराप्रांत व हें शहर संगवंशाच्या ताब्यांत गेलें. इकडे काबूल व पंजाब येथें ग्रीक राजे राज्य करीत होते. त्यांपैकीं मिलिंद किंवा ग्रीक भाषेत ज्याला मीनांडर ह्मणतात हा फार पराक्रमी निघाला. त्यानें बुद्धधर्माचा स्वीकार केला होता, असें दिसतें. कारण 'मिलिंदाचे प्रश्न' या नांवाचा बुद्धधर्मांतील एक प्रख्यात ग्रंथ आहे. या मिलिंदानें हिंदु-स्थानावर स्वारी करून काठेवाड व मथुराप्रांत काबीज केले व तो यमुना-कांठच्या मथुरेंत राहिला होता, असा दाखला सांपडतो. तेव्हांपासून मथु-रेच्या आसपासचा मुलूख व तें शहर ग्रीक राजांच्या ताब्यांत गेलें व मथुरेस त्यांच्या वतीनें सेट्रप किंवा क्षत्रप राज्य करूं लागले. हे क्षत्रप पुढें पुढें स्वतंत्र राजे बनले असावे. या क्षत्रपांपैकीं सोदास याची थोडीशी माहिती मिळते. हा रजुवलाचा पुत्र होता. हा इसवी सनापूर्वी ७२ च्या सुमारास क्षत्रप झाला. मथुरेंत याच्या नांवाचा व याच्या काळचा एक शिलालेख सांपडलेला आहे. पुढील वर्षांसंबंधीं कांहीं माहिती मिळत नाहीं. परंतु काबूल, काश्मीर व पंजाब येथील हिंदुग्रीक राज्य नाहींसें होऊन तेथें दुसऱ्या राष्ट्राचें राज्य झालें, व त्यामध्यें कुशन घरा-ण्यास वर्चस्व आलें. या घराण्यांतील राजांनीं प्रचंड राज्य स्थापून हिंदु-स्थानाकडे आपला मोर्चा फिरविला, व उत्तरेकडील बराच भाग आपल्या ताब्यांत आणला. या घराण्यांपैकीं कानिष्क राजाची दिगंत कीर्ति झाली. यानें सुमारें पंचेचाळीस वर्षे राज्य केलें. याच्या वेळचीं नाणीं मथुरेस व उत्तरहिंदुस्थानांत अतोनात सांपडलीं आहेत, व त्या नाण्यांवरून त्याच्या राज्याचा विस्तार व वाढ यांची कल्पना होते. तसेंच कानिष्काची राज-

धानी पुरुषपुर—अर्वाचीन पेशावर—ही होती. परंतु त्यानें खुद्द पाटली-पुत्रावर हल्ला केला. याच्या पहिल्या पहिल्या नाण्यांवर ग्रीक देवता व विशेषतः सूर्य व चंद्र यांचीं चित्रें आहेत, व भाषा ग्रीक आहे. पुढील नाण्यांमध्यें ग्रीक अक्षरें मात्र आहेत. भाषा पराशियन आहे. ग्रीक, हिंदु व पराशियन देवतांच्या मूर्ति आहेत. शेवटच्या नाण्यांवर बुद्ध शाक्य-मुनीची मूर्ति आहे. यावरून कनिष्कानें शेवटीं बुद्ध धर्म स्वीकारला होता असें दिसतें. कनिष्कानें इसवी सन ७८ ते १२३ पर्यंत राज्य केलें असावें. त्याचा मुलगा हुविष्क अगर हुष्क हा त्याच्यामागून गादीवर आला. यानें मथुरेस फार मोठ्या विहाराची स्थापना केली व त्याला आपलें नांव दिलें. याच्यानंतर वसुष्क अगर जष्क हा गादिवर आला. यालाच वासुदेव म्हणत असत. या नांवावरून या राजावर हिंदुधर्माचा पगडा बसत चालला असें दिसतें. याच्या नाण्यावर त्रिशूलधारी नंदीवर बसलेल्या शिवाचें चित्र आहे. या राजाच्या वेळचे कांहीं शिलालेख मथु-रेस सांपडले आहेत. या राजानेंहि पंचवीस वर्षें राज्य केलें, असें नाण्यां-वरून दिसतें. मथुरेसंबंधीं विचार करतां या कुशन घराण्याच्या कार-कीर्दींत मथुरा हें शहर फार भरभराटींत होतें यांत शंका नाहीं. येथें बुद्ध व जैनधर्मी व्यापारी फार होते, व यांनीं दिलेल्या देणग्यांचे शिलालेख येथें पुष्कळ सांपडले आहेत. संस्कृतांतील प्रसिद्ध ग्रंथ पंचतंत्र याच्या प्रारंभींच दक्षिणेंतील महिलरोप्य या शहरांतून आपल्या बैलगाडींत माल भरून मथुरेस जाणाऱ्या गाड्यांच्या तांड्याला जाऊन मिळणाऱ्या वर्धमानक नांवाच्या वा-ण्याच्या मुलाची गोष्ट आहे. मथुरेस पोंचल्यावर त्याचा एक बैल यमुनेंत नदीच्या तीराला गेला व चिखलांत बुडून मेला, अशा प्रकारचें वर्णन आहे. यावरूनहि मथुरेची व्यापाराकरितां त्या वेळीं प्रख्याति होती असें दिसतें. कनिष्क राजाच्या वेळचे ७१ शिलालेख सांपडले आहेत. त्यांतले खुद्द मथुरेंत ४३ सांपडले आहेत. या शिलालेखांवरून व मथुरेंत सांपडलेल्या दुसऱ्या इमारतींच्या भागांवरून, तसेंच कठडे, मूर्ति वगैरे गोष्टींवरून कुशन कारकीर्दींत व त्याच्यापुढें बरींच शतकें मथुरा शिल्पकलेकरितां प्रसिद्ध होतें, व मथुरेची शिल्पपद्धति म्हणून एक शिल्पपद्धति होती असें

दिसतें. तिच्यावर ग्रीक शिल्पाचा परिणाम झाला होता. तरी पद्धति पूर्णपणें हिंदू होती. या कलेचा ऱ्हास सहाव्या शतकांत झाला.

इसवी सनाच्या ३२० च्या सुमारास पाटलीपुत्रास प्रसिद्ध गुप्त घराणें उदयास आलें. चंद्रगुप्त हा पहिला राजा झाला. त्याचा मुलगा समुद्रगुप्त हा फारच पराक्रमी निघाला, व त्यानें सर्व गंगेच्या कांठचा मुलुख आपल्या ताब्यांत आणला व दक्षिणेपर्यंत राजांना मांडलिक केलें. या गुप्तघराण्याचें साम्राज्य बंगालच्या उपसागरापासून तों थेट सिंधूनदी व काठेवाड येथपर्यंत सर्व उत्तरहिंदुस्थानभर झालें. अर्थात् मथुरा व मथुराप्रांत गुप्त राजांच्या ताब्यांत आला. याच काळीं चिनी प्रवासी फेहेअन हा हिंदुस्थानांत आला होता. तो तिबेटांतून निघून काश्मीर, काबूल, कंदाहार व पंजाबमधून मध्य–हिंदुस्थानांत आला, व मथुरेंत एक महिना राहिला. मथुरा व त्याच्या आसपास एकंदर वीस विहार होते, व त्यांत तीन तीन हजार बुद्ध भिक्षु रहात असत; तसेंच तेथें सहा स्तूप होते, असें त्यानें लिहून ठेविलें आहे. यावरून मथुरेस अजून बुद्धधर्माचें पुष्कळ प्राबल्य होतें असें दिसतें. परंतु इसवी सनाच्या ५०० च्या सुमारास हूण लोकांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्या, व त्यांनीं गुप्तघराण्याचें साम्राज्य मोडून टाकलें. परंतु पुढें हूणांची सत्ता फार दिवस टिकली नाहीं. ठाणेश्वरच्या हर्षवर्धनानें मोठें साम्राज्य स्थापिलें, परंतु त्याच्या पश्चात् त्याचाहि नायनाट झाला, व सन ७०० पासून १०२४ पर्यंत कनोजच्या घराण्याचें साम्राज्य चालू झालें. सुमारें ७०० पासून मथुरेंतून बुद्ध व जैनधर्म पार नाहींसा झाला व मथुरा हें कृष्णाच्या भक्तीचें मोठें स्थान झालें, व तेव्हांपासून तें हिंदु लोकांचें काशीप्रमाणेंच फार मोठें पवित्र स्थान बनलें; व ह्मणून मुसलमानी स्वाऱ्या येऊं लागल्यापासून सोमनाथप्रमाणें मथुरा हेंहि एक मुसलमानांचें मोठें छलस्थान बनलें. सर्व मुसलमानी अंमलांत मथुरेची अवस्था मोठी कठिण होती. कारण, आग्रा व दिल्ली या दोन मुसलमानी राजधान्या बनल्यामुळें मथुरा या हिंदु पवित्रस्थानाची कैचीच्या दोन पातींत सांपडल्याप्रमाणें हुबेहुब स्थिति झाली.

गिझनीच्या महमदानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी १००१ मध्यें केली. त्यानें एकंदर अशा बारा स्वाऱ्या केल्या, हें इतिहासज्ञांस महशूरच आहे. त्यांपैकीं नववी स्वारी त्यानें १०१७ मध्यें केली. या स्वारींत त्यानें मथुरा शहर लुटलें व तेथलीं हिंदु देवळें उध्वस्त केलीं. या लुटीमुळें शहराची फारच नासाडी झाली. पुढें अकबराच्या काळापर्यंत या शहराची फारशी माहिती मिळत नाहीं. परंतु मुसलमानी धर्मवेड्या राजांचा हिंदुधर्माचें एक ठिकाण ह्मणून या शहरावर नेहमीं डोळा असे; यामुळें शहराची भरभराट होऊं शकली नाहीं. परंतु अकबराच्या कारकीर्दींतील सहिष्णुतेच्या धोरणानें मथुरा व वृंदावन या शहरांना पुन्हां धार्मिक महत्त्व आलें व त्या शहराची व तेथील गोसाव्यांची कीर्ति इतकी वाढली, कीं, अकबराला त्यांना भेटण्याची इच्छा झाली, व अकबराचे डोळे बांधून त्याला वृंदावनांतील अत्यंत पवित्र अशा तुळशीवृंदावनाच्या राजीमध्यें आणिलें, व तेथील आश्चर्यकारक देखावा पाहून त्या स्थानाच्या पवित्रपणाबद्दल अकबराची खातरी झाली. या गोष्टीचें स्मारक ह्मणून तेथील लोकांनीं बादशहाच्या परवानगीनें गोविंददेव, गोपीनाथ, युगलकिशोर व मदनमोहन या नांवानें प्रसिद्ध असणारीं देवळें बांधलीं. जरी हीं शहरें व हा प्रांत मोंगलांच्या ताब्यांत होता, तरी औरंगझेबापर्यंत या शहराला त्रास पोंचला नाहीं. परंतु औरंगझेबाच्या कारकीर्दींत मात्र या पवित्र स्थानाचा फार छल झाला. औरंगझेबाचा थोरला मुलगा मथुरा शहरांत जन्मला, व त्यानें राज्यावरील आपला हक्क मथुरेमध्यें प्रथमतः जाहीर केला. मथुरेस एक मुसलमान अधिकारी नेमला गेला. यानें हल्लीं मथुरेंत असलेली प्रसिद्ध मशीद बांधली. येथें जाट लोकांचें बंड झालें. औरंगझेबाला आपल्या हिंदुधर्माविरुद्ध मोहिमेस ही एक आणखी बरी सबब झाली असें वाटलें. त्यानें स्वतः मोठ्या सैन्यानिशीं मथुरेस येऊन मथुरा व वृंदावन येथील उत्तम उत्तम देवळें पाडलीं. विशेषतः त्याचा डोळा केशवदेव या फार पवित्र मानलेल्या देवळावर होता. तें देऊळ पार पाडून त्याच्याच पायावर औरंगझेबानें मोठी मशीद बांधविली. औरंगझेबाचें धर्मवेड इतकें वाढलें, कीं, त्यानें मथुरावृंदावन हीं नांवेंच इतिहासांतून

नाहींशी करण्याचा बेत केला. मथुरेला कागदोपत्रीं इसलामाबाद व वृंदावनास मुमीनाबाद अशीं नांवें ठेविलीं. परंतु ज्याप्रमाणें औरंगझेबाच्या पश्चात् मोंगलांचा अंमल नामशेष झाला, त्याप्रमाणें या शहरांचीं हीं नांवेंहि कागदोपत्रींच राहिलीं. औरंगझेबाच्या पश्चात् जाट व मराठे यांनीं आग्र्यादिल्लीपर्यंतच्या मुलुखावर आपलें वर्चस्व स्थापलें व त्यामुळें कांहीं दिवस मथुराप्रांत जाटांच्या ताब्यांत होता, तर कांहीं दिवस मराठ्यांच्या ताब्यांत होता. पुढें इंग्रजांचीं व मराठ्यांचीं उत्तरहिंदुस्थानांत पुष्कळ वेळां युद्धें झालीं व मथुराप्रांत १८५० मध्यें इंग्रजांच्या ताब्यांत आला. १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं मथुरेसहि या बंडाचा थोडाफार प्रादुर्भाव झाला होता. परंतु तेथल्या मुख्य शेटजींच्या घराण्याच्या राजनिष्ठेमुळें मथुरेचा बराच बचाव झाला, व मथुरा शहराला फारसें कडक प्रायश्चित्त भोगावें लागलें नाहीं. तेव्हांपासून या शहराची सारखी भरभराट होत आहे.

आतां मथुरावृंदावनासंबंधीं एका गोष्टीचा विचार करावयाचा राहिला. तो हा कीं, मथुरावृंदावन आणि कृष्णजन्म व कृष्णलीला यांचा आपल्या पुराणाप्रमाणें जो फार निकट संबंध मानिला आहे, व ह्मणून मथुरा हें राधाकृष्णाच्या भक्तिपंथाचें जें फार मोठें पवित्र स्थान मानिलें आहे, त्या गोष्टी कितपत खऱ्या आहेत.माझ्या बालपणापासून कृष्णजन्माच्या व कृष्ण-लीलांच्या कथा मला चिरश्रुत असल्यामुळें मला मथुरावृंदावन पाहण्याची विलक्षण जिज्ञासा होती. परंतु प्रत्यक्ष मथुरेंतील पवित्र स्थानें पाहून, तसेंच त्यांचें व तेथील देवळांचें अर्वाचीनत्व पाहून, माझी फार निराशा झाली, व हल्लींचें मथुरा शहर व हल्लींची कृष्णभक्ति हीं बरींच अर्वाचीन असावीं अशी माझी कल्पना झाली. ह्मणून यासंबंधानें मी चवकशी करूं लागलों, तों मला समजलें, कीं, माझे पूज्य गुरुवर्य डॉ. सर रामकृष्ण भांडारकर यांनीं वैष्णव पंथाच्या उदयाबद्दल एक ग्रंथ लिहिला असून तो जर्मनीमध्यें छापला जात आहे+. त्यांत कृष्णाची कथा व कृष्णभक्ति यांची उत्पत्ति व

+ हा ग्रंथ वैष्णव, शैव व इतर धार्मिक पंथाचा इतिहास ह्मणून आतां प्रसिद्ध झाला आहे.

व्रांढ यांचा इतिहास सांगितला आहे; ह्मणून मी डॉक्टरसाहेबांकडे जाऊन त्या ग्रंथाची एक हस्तलिखित प्रत मागून घेतली. डॉक्टरसाहेबांनीं ती मोठ्या आनंदानें मला दिली व त्यांतील माहितीचा उपयोग करण्याची परवानगी दिली, याबद्दल मी डॉक्टरसाहेबांचा फार ऋणी आहें. या पुढील मजकुरांत त्यांच्या ग्रंथांतील पुष्कळ माहितीचा उपयोग केलेला आहे, हें निराळें सांगावयास नकोच.

कृष्णचरित्राबद्दल आपण विचार करूं लागलों, म्हणजे किती तरी गोष्टींबद्दल शंका उत्पन्न होतात. प्रथमतः ही चमत्काराची गोष्ट वाटते, कीं, महाभारतामध्यें जो सूत्रधार वाटतो, महाभारतांतील प्रचंड युद्धामध्यें ज्याच्या कारस्थानाला एक प्रकारें प्रमुख स्थान मिळालें आहे, त्या कृष्णाची जन्मकथा व त्याच्या बालपणाच्या आयुष्याची हकीगत महाभारतांत कोठेंहि दिसत नाहीं. शांतिपर्वाच्या नारायणीय प्रकरणांत कृष्णाच्या अवताराचा व कंसवधाचा भविष्यत्काळीं होणाऱ्या गोष्टींप्रमाणें मात्र उल्लेख आहे. कृष्णजन्म व त्याचा बालपणचा गोकुळांतील वास व तेथील गोपींशीं त्याची क्रीडा, वगैरे भाग सविस्तरपणें हरिवंशांत व भागवतांत मात्र दिसून येतात. परंतु हे ग्रंथ महाभारतापेक्षां बरेच अर्वाचीन आहेत. तसेंच भगवद्गीतेंतील उदात्त तत्वज्ञान शिकविणारा, महाभारतांतील राजकीय कारस्थानांत गुंतलेला, व केव्हां केव्हां कुटिल नीतीनें कां होईना, परंतु सत्पक्षाच्या बाजूनें भांडणारा कृष्ण, व सोळा सहस्र बायका असणारा, गोपींशीं अनिर्बंध व्यवहार करणारा, अत्यंत विलासी व विषयलंपट असा गोकुळींचा कृष्ण हे एकच असावे याबद्दल शंका येते. थिऑसॉफिक पंथी लोकांनीं गोपींच्या व्यवहाराला कितीहि आध्यात्मिक स्वरूप दिलें असलें तरी हा मागूनचा विचार आहे, यांत शंका नाहीं. या सर्व शंकांचें निरसन डॉक्टर सर भांडारकरांनीं काढलेल्या कल्पनेनें उत्तम तऱ्हेनें होतें. डॉक्टर भांडारकरांचें ह्मणणें असें आहे, कीं, हल्लीं जी कृष्णाच्या आयुष्याची गोष्ट हरिवंशांत व भागवतांत दिसते, ती दोन गोष्टींच्या भेसळीनें झालेली आहे. विशेषतः भगवद्गीतेचा कृष्ण व गोकुळींचा कृष्ण या दोन निरनिराळ्या व्यक्ति असाव्या. पहिलीला त्यांनीं वासुदेवकृष्ण व दुसरीला

गोपालकृष्ण ह्मटलें आहे. कृष्णाला कृष्ण हें नांवहि मागाहून मिळालेलें दिसतें. मूळचें नांव वासुदेव हेंच असावें. यादवकुळांतील वृष्णिवंशांत उत्पन्न झालेले वासुदेव व बलदेव या नांवानें प्रसिद्धीस आलेले दोन क्षात्रियकुमार असावे, त्यांनीं आपल्या मामाला मारून मथुरेचें राज्य मिळविलें असावें व पुढें कालयवन या नांवाच्या म्लेंच्छ राजानें मथुरेवर स्वारी केली असावी, व ह्मणून त्यांना मथुरा सोडून द्वारकेस जावें लागलें असावें. अशा प्रकारची ऐतिहासिक पुरुषांची मूळची गोष्ट असावी, व पुढें या पुरुषांना देवाचे अवतार असें मानण्यांत आलें असावें, व मग वासुदेवभक्ति सुरू झाली असावी. कृष्णाच्या जन्माची कथा व त्याचा गोकुळांतील वास या गोष्टी आबालवृद्धांना ठाऊकच आहेत. तेव्हां त्यांची येथें पुनरुक्ति करण्याची गरज नाहीं. परंतु ही एक ऐतिहासिक घडलेली गोष्ट असावी, अशाबद्दल पालीभाषेंतहि दाखला सांपडतो. ऐकींव गोष्टीमध्यें ज्याप्रमाणें थोडाफार फरक होत जातो, तेवढाच फरक या दोन गोष्टींत दिसून येतो. पालींतील या गोष्टीला घटजातक ह्मणतात. ती गोष्ट थोडक्यांत अशी आहे:—

पूर्वीं एकदां उत्तरापथ देशांत कंस प्रांतांत असितंजना नांवाचें शहर होतें. तेथें महाकंस नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला कंस आणि उपकंस या नांवाचे दोन मुलगे व देवगर्भा नांवाची एक मुलगी झाली. मुलीच्या जन्मकालीं ब्राह्मणांनीं 'या मुलीच्या पोटीं झालेल्या पुत्रापासून कंसकुलाचा नाश होईल.' असें भविष्य वर्तविलें. राजाला मुलगी प्रिय असल्यामुळें त्याच्यानें तिला मारवलें नाहीं. आपले मुलगे काय पाहिजे तें करोत, असें ह्मणून तो मेला. त्याच्यानंतर कंस राज्यावर आला व उपकंस एका प्रांताचा अधिकारी झाला. आपल्या बहिणीस ठार मारल्यास आपल्याबद्दल फार गवगवा होईल, असें जाणून त्यानें तिला अविवाहित ठेवण्याचा विचार करून व तिच्याकरितां एक वाटोळा मनोरा तयार करून त्यांत तिला कोंडून ठेविलें. नंदगोपा व तिचा पति अंधकवेणू हीं देवगर्भेच्या तैनातीस होतीं. उत्तरमथुरेंत महासागर या नांवाचा राजा होता. त्याला सागर व उपसागर नांवाचे दोन मुलगे होते. महा-

सागराच्या पश्चात् सागर राज्यावर आला व उपसागर एका प्रांताचा अधिकारी झाला. उपकंस व उपसागर यांची फार मैत्री होती. उपसागरानें सागराच्या राणीमहालांत कांहीं खटपट केली, व ती उघडकीस आल्यावरून उपसागरास तेथून हाकलून देण्यांत आलें. तो उपकंसाच्या प्रांतांत आला. उपकंसानें आपल्या मित्राची राजाशीं ओळख करून दिली. राजाच्या भेटीला जात असतां त्यानें तो मनोरा पाहिला, व त्याबद्दल हकीगत विचारली; आणि देवगर्भेबद्दल हकीगत कळल्यावर तिच्यावर त्याचें प्रेम जडलें. एके दिवशीं देवगर्भेनें राजाकडे जातांना उपसागरास पाहिलें व तिनें त्याच्याबद्दल नंदगोपेजवळ चवकशी केली; व हा महासागराचा मुलगा आहे असें समजल्यावर तिचेंहि त्याच्यावर प्रेम जडलें. उपसागरानें नंदगोपेजवळ देवगर्भेला भेटण्याबद्दल गोष्ट काढली, व तिनें दोघांची मनोऱ्यांत एकांतांत गांठ घालून दिली. पुढें देवगर्भेला गर्भ राहिला. ही गोष्ट कंसाच्या कानावर गेली. देवगर्भेला क्षमा करण्याचें वचन घेऊन नंदगोपेनें खरा प्रकार त्या दोघां भावांना सांगितला. तो ऐकिल्यावर भावांनीं विचार केला कीं, 'आपल्या बहिणीला आपल्याला मारतां येत नाहीं; हिला मुलगी झाली तर बरेंच; मुलगा झाला तर मारूं' असें म्हणून त्यांनीं देवगर्भेचा उपसागराशीं विवाह करून दिला. पूर्ण दिवस झाल्यावर देवगर्भा कन्यारत्न प्रसवली. त्या भावांना आनंद झाला. मुलीचें नांव अंजना ठेवून त्यांनीं देवगर्भा व उपसागर यांना गोवद्धमान नांवाचें खेडें राहण्यास दिलें, व तेथें तीं आनंदानें राहूं लागलीं. देवगर्भा पुन्हा गरभार राहिली, व त्याच वेळीं नंदगोपाहि गरभार राहिली. पूर्णमास झाल्यावर एके दिवशीं देवगर्भेला मुलगा व नंदगोपेला मुलगी झाली. आपल्या मुलाला आपले भाऊ मारतील या भीतीनें देवगर्भेनें गुप्तपणें आपला मुलगा नंदगोपेकडे पाठविला, व तिची मुलगी आपल्याकडे आणविली. याचा त्या भावांना मागमूसहि लागला नाहीं. याप्रमाणें देवगर्भेस दहा मुलगे झाले, व नंदगोपेस दहा मुली झाल्या. देवगर्भेचे मुलगे अंधकवेणूच्या घरीं वाढत चालले. हे मुलगे मोठे बलवान् निपजले. त्यांच्यापैकीं पहिल्या दोघांचीं नांवें वासुदेव व बलदेव अशीं होतीं. हे

मुलगे मोठे झाल्यावर खेड्यांतील लोकांशीं दांडगाईनें वागूं लागले. व त्यांच्या मालमत्तेची लुटालूट करूं लागले. याबद्दल कंसाकडे तक्रार नेण्यांत आली. राजानें अंधकवेणूस बोलावून मुलांच्या अत्याचाराबद्दल त्याची कानउघाडणी केली. आणखी एकदोनदां तक्रार आल्यामुळें राजानें अंधकवेणूस मरणाची भीति घातली. अंधकवेणूनें राजाकडून अभयवचन घेऊन हे मुलगे आपले नव्हत, हे देवगर्भेचे मुलगे आहेत, असें सांगितलें. राजानें आपल्या मंत्र्यांना विचारलें, "आतां यांना कसें धरावें ?" मंत्र्यांनीं सांगितलें "ते मोठे मल्लयोद्धे आहेत, तेव्हां शहरांत मल्लयुद्धाचा आखाडा तयार करावा व ते आले म्हणजे त्यांना पकडून ठार करावें." राजानें त्यांच्या सांगण्याप्रमाणें शहरांतील चाणूर व मुष्टिक या दोघां मल्लयोध्यांना आपला बेत कळविला व "आज पासून सात दिवसांनीं मल्लयुद्धाचा खेळ होईल," म्हणून सर्व शहरांत द्वाही फिरविली, व आपल्या राजवाड्यासमोर प्रचंड आखाडा तयार करविला. लोकांच्या झुंडीच्या झुंडी पाहण्यास जमल्या. वासुदेवबलदेवप्रभृति सर्व बंधु त्या खेळाला आले. वाटेंत त्यांनीं शहरांतील शिंप्यांपासून, माळ्यांपासून, गंध्यापासून, कपडे माळा व सुगंधी सामान हिसकावून घेऊन तें अंगावर घालून ते आखाड्यांत येऊन सज्ज झाले. चाणूर व मुष्टिक हे मल्लयोद्धेहि आखाड्यांत आले. इतक्यांत बलदेवानें एक दोरी घेऊन ती चाणूराच्या कमरेभोंवतीं गुंडाळून ती दोरी घट्ट आवळून त्यानें चाणूरास पटकन् उचलून गरगर फिरविलें व त्याला जमिनीवर आपटलें व मग आखाड्याच्या बाहेर फेंकून दिलें. नंतर मुष्टिक आला. त्यालाहि बलदेवानें मुष्टिप्रहार केला. "मी मल्लयोद्धा नाहीं!" असें तो ओरडूं लागला. "मल्लयोद्धा अस अथवा नस–मला सारखेंच आहे!" असें म्हणून बलदेवानें त्यालाहि जमिनीवर आपटून त्याचा प्राण घेतला. मुष्टिक मरतां मरतां ह्मणाला, "मी भूत होऊन यांचा घात करीन." इतकें झाल्यावर राजा ह्मणाला, "या दहाजणांना येथून घेऊन जा." इतक्यांत वासुदेवानें त्या दोघां भावांवर एक चक्र फेंकलें व त्याच्या योगेंकरून त्यानें दोघां भावांचीं डोकीं उडविलीं. याप्रमाणें आपल्या मामांना मारून त्या भावांनीं तेथलें राज्य मिळविलें व

आपल्या मातापितरांना असितंजना शहरीं आणिलें. पुढें त्यांनीं सर्व हिंदुस्थान जिंकण्याचा बेत केला. ते कालसेन राजाच्या अयोध्या शहरीं आले व राजाचा पराभव करून त्यांनीं तें राज्य मिळविलें. पुढें ते द्वारावतीस आले. त्या शहराच्या एका बाजूस समुद्र व दुसऱ्या बाजूस पर्वत होता व त्या शहरांत एक भूत होतें; कोणी शत्रु आल्यास तें भूत गाढवाचें रूप घेऊन ओरडत असे, आणि असें झालें म्हणजे ती द्वारावती हवेंत उडून जाऊन समुद्रांतील एका बेटावर जाई, व शत्रु परत गेल्यावर परत आपल्या जागेवर येई. यामुळें तें शहर काबीज करणें अशक्य होतें; म्हणून ते बंधु कण्हदीपायन कडे गेले. त्यानें त्यांना त्या गाढवाला प्रसन्न करण्याची युक्ति सांगितली, व गाढवानेंहि शहराच्या चार द्वारांजवळ चार लोखंडी खांब पुरून त्यांना चार लोखंडी नांगर सांखळदंडांनीं बांधाल, तर मी ओरडलों तरी शहर उडणार नाहीं, असें सांगितलें." बंधूंनीं सांगितल्याप्रमाणें केलें व म्हणून शहर त्यांच्या ताब्यांत आलें.

क्रमाक्रमानें त्यांनीं सर्व हिंदुस्थान जिंकलें व सर्व राज्याचे दहा भाग करून त्यांनीं आपसांत वांटून घेतले. ते बहिणीला विसरले होते, परंतु शेवटच्या भावानें आपला वांटा त्या बहिणीस देऊन तो व्यापार करून आपलें पोट भरूं लागला. या सर्व भावांना पुढें पुत्रपौत्र झाले. एकदां वासुदेवाचा पुत्र वारला. त्यामुळें त्याला अत्यंत दुःख झालें व तें आवरेना, परंतु घटपंडित म्हणून त्या भावांपैकीं जो शहाणा भाऊ होता, त्यानें अशक्य गोष्टीबद्दल शोक करणें बरें नव्हे, असें आपल्या भावाच्या मनांत बिंबवून त्याचें दुःख नाहींसें केलें.

पुष्कळ काळानंतर एकदां या भावांच्या पुत्रांना वाटलें, "कण्हदीपायन (कृष्णद्वैपायन) यांना दिव्यदृष्टि आहे असें म्हणतात. तर त्यांची आपण परीक्षा करूं या." तेव्हां त्यांनीं एका तरुण मुलास बायकोचा वेष देऊन त्याच्या पोटावर उशी बांधून त्याला गरभार बाई बनविलें, व कण्हदीपायनापुढें त्याला उभें करून " ही बाई बाळंत केव्हां होईल ? " म्हणून विचारलें. कण्हदीपायनानें अन्तर्दृष्टीनें पाहिलें, कीं दहा भावांचा नाश समीप आला आहे, व आपणहि आजच मरणार. तेव्हां तो म्हणाला,

" आजपासून सातवे दिवशीं या मनुष्याला एक खदीर झाडाची गांठ मूल होईल. व ती गांठ जरी तुम्ही जाळून तिची राखरांगोळी केलीत, तरी ती वासुदेवाच्या कुळाचा नाश करील."

या ह्मणण्याबद्दल त्या साधूची थट्टा करून त्या मुलांनीं कण्हदीपायनास फांस घालून ठार केलें. भावांना जेव्हां हें वर्तमान कळलें तेव्हां ते घाबरले व त्यांनीं त्या बायकोचें सोंग दिलेल्या पुरुषावर पहारा ठेवून जेव्हां तो तो खदीराची गांठ प्रसवला, तेव्हां ती गांठ त्यांनीं जाळून त्याची राख नदींत फेंकून दिली; पण ती राख मागच्या एका फाटकाजवळ अडकून राहिली व तेथें लव्हाळें उगवलें.

एके दिवशीं सर्व भावांना जलक्रीडा करण्याची इच्छा झाली म्हणून त्यांनीं मोठा मंडप तयार करून ते मागच्या फाटकाला आले. तेथें ते यथेच्छ खाल्ले-प्याले व आपापसांत दोन टोळ्या करून धिंगामस्ती करूं लागले व हातघाईवर आले. एकानें एक लव्हाळा मोडला. परंतु त्या लव्हाळ्याचें लागलेंच एक मुद्गल बनलें व याप्रमाणें सर्वांच्या हातांत मुद्गल झाले व ते एकमेकांना ठार करूं लागले. शेवटीं वासुदेव, बलदेव, त्यांची बहीण अंजना व एक उपाध्याय इतकी मंडळी राहिली. ते एका रथांत बसून पळून गेले. ते कालमरीका या वनांत गेले. तेथें मुष्टिक भूत होऊन राहिला होता. त्यांना पाहण्याबरोबर त्या भुतानें तेथें एक खेडें बनवून आपण मल्लयोद्धा होऊन पुढें आला. बलदेवानें त्याच्याशीं युद्ध खेळण्या-करितां रथाखालीं उडी टाकली, त्या भुतानें बलदेवास आपल्या मुठींत धरून त्याचा प्राण घेतला. बलदेवाचा मृत्यु पाहून, वासुदेव बाकी दोघां-सह रथांत बसून, तसाच पुढें गेला व एका खेडेगांवीं आला. तेथें तो एका झुडुपांत विश्रांतीकरितां थांबला. त्यानें आपल्या बहिणीला व उपा-ध्यायाला अन्न आणण्यास गांवांत पाठविलें. इकडे झुडुपांत हालचाल पाहून जरा या नांवाच्या शिकाऱ्यानें एक बाण मारिला. तो वासुदेवाच्या पायाला लागला. जरेनें जखम केली म्हणजे मनुष्य जगत नाहीं, या ह्मणी-प्रमाणें आपण आतां मरणार असें वासुदेवास वाटलें, व त्यानें मी आतां

मरणार असें आपल्या बहिणीस सांगून व तिच्या व उपाध्यायाच्या उपजीविकेकरितां त्यांना एक विद्या शिकवून वासुदेवानें प्राण सोडला.

ही गोष्ट हरिवंश व भागवत यातील गोष्टीशीं पुष्कळ तऱ्हेनें जमते, हें वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल. या गोष्टींत जरी नंदगोपा हें नांव आलेलें आहे, तरी गोकुळांतील गोष्टीचा यांत फारसा संबंध नाहीं, असें दिसून येईल. या गोष्टींत कृष्ण हें नांवहि नाहीं. वासुदेव व बलदेव किंवा त्याचें दुसरें नांव संकर्षण हीं नांवें मात्र फार जुनीं आहेत.

वासुदेव या शब्दाचा पाणिनीनें व पतंजलीनें पूजार्ह असा अर्थ दिला आहे. यावरून वासुदेवाची भक्ति फार जुनी दिसत आहे. यदुवंशांतील वासुदेव व बलदेव यांना त्यांच्या पश्चात् लवकरच अवतार मानूं लागले असावे. वासुदेव व संकर्षण व त्यांनीं स्थापिलेला भागवतधर्म यांचा उल्लेख खिस्ती शकापूर्वी २०० वर्षांपूर्वींच्या शिलालेखांत आहे. तसेंच मौर्य घराण्याचा पहिला राजा चंद्रगुप्त याच्या कारकीर्दींत मेगास्थेनीस म्हणून एक मॅसिडोनियाचा वकील चंद्रगुप्ताच्या दरबारीं आला होता, त्यानें मथुरा व यमुना यांचा व भागवतधर्माचा आपल्या ग्रंथांत उल्लेख केला आहे. भागवत हा धर्म सातवत या लोकांमध्यें प्रचलित होता. हा एकेश्वरी धर्म असून भक्ति किंवा देवावर अनन्यभावेंकरून प्रेम करणें, हें या धर्माचें मुख्य अंग होतें. या धर्माला यज्ञ करणें व यज्ञामध्यें पशु मारणें पसंत नव्हतें. हाच धर्म शांतिपर्वांत नारायणीय प्रकरणांत नारायणानें वसुउपचार या राजाला प्रथम सांगितला, असें म्हटलें आहे. पुढें वासुदेव व नारायण हे एकच आहेत व ते देवाधिदेव आहेत असा समज झाला. वासुदेव हा विष्णूचाच अवतार होय, असें लोक मानावयास लागले. यावरून खिस्ती शकाच्या ४०० वर्षांपूर्वींपासूनचा हा भागवत धर्म आहे, असें दिसतें. वासुदेवाला कृष्ण हें नांव पुढें मिळालें. कृष्ण हें गोत्राचें नांव असावें, व त्यावरून कार्ष्णायन असा, त्या गोत्रांतला अशा अर्थी शब्द झाला. कृष्ण हें ऋग्वेदांतील मंत्रद्रष्टया ऋषीचें नांव आहे. तो आंगिरस गोत्रापैकीं होता. पुढें वासुदेवाला कृष्ण म्हणूं लागले असावे. तेव्हां या देवाचें नांव वासुदेव–कृष्ण असें झालें. हा धर्म बौद्ध धर्माइतकाच

जुना आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ख्रिस्ती शकानंतर अभीर म्हणून एक जातीचे लोक हिंदुस्थानांत आले+. हे गोपाळवृत्ति लोक होते. हे गुरेंढोरें ठेवून नेहमीं चारा मिळेल तिकडे फिरत असत. अजूनहि उत्तर-हिंदुस्थानांत अहीर नांवानें हे प्रसिद्ध आहेत. या लोकांनीं गवळयाच्या लहान बालदेवाच्या दैवी पराक्रमाची एकादी गोष्ट आपल्याबरोबर आणली असावी, व अभीर लोकांचा मथुरेस व इतरत्र प्रसार झाल्यावर व त्यांना राजकीय वर्चस्व आल्यावर मूळचा वासुदेवकृष्ण व हा अभीरांचा गोपाल-कृष्ण व त्याचा गोपींशीं झालेला व्यवहार, या गोष्टींची भेसळ होऊन हल्लींचें उपलब्ध कृष्णचरित्र बनलेलें असावें, असें डॉक्टर भांडारकरांचें म्हणणें आहे.

ही कल्पना युक्तीला पुष्कळ पटते, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. दोन निरनिराळ्या रंगांच्या नदीच्या ओघांचा एकजीव झाला, तरी ज्याप्रमाणें सूक्ष्म दृष्टीनें पाहणारास प्रवाहांतील रंगभेद दिसून येतो, त्या-प्रमाणें श्रीकृष्णाची गोष्ट जरी आतां एकजीव झालेली दिसते, तरी त्या गोष्टीमध्यें सूक्ष्म तऱ्हेनें पाहिल्यास दोन परस्पर भिन्न गोष्टींचा मिलाफ दिसल्याखेरीज रहात नाहीं. डॉक्टर भांडारकरांची ही कल्पना जरी पूर्णपणें सिद्ध झाली आहे, असें म्हणतां येणार नाहीं, तरी तिचा शांतपणें विचार करण्यासारखी तरी ती आहे, यांत शंका नाहीं. निदान, माझ्या मनाला तरी ती पटली, असें मला कबूल करणें भाग आहे. जरी याप्रमाणें भागवतधर्म बुद्धकालीन असला, तरी गोपालकृष्णाची गोष्ट त्यांत मागून शिरली असावी. बौद्धधर्माला राजाश्रय मिळून त्याचा झपाट्यानें सर्व हिंदु-

+ अभीर हे ख्रिस्ती शकापूर्वींच हिंदुस्थानांत आले असावेत, असें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'इंडियन अँटिक्वेरी'च्या अंकांतील एका लेखांत दाखविण्यांत आलें आहे व मनुस्मृतींतहि अभीरांचा उल्लेख आहे. त्यावरून हें विधान खरें ठरतें. तरी पण या दाखल्यानें डॉ० भांडारकर यांचा मुख्य मुद्दा जो कृष्णकथेंत दोन कथांची भेसळ आहे, हा खोटा ठरत नाहीं. त्याचा काळ ख्रिस्ती शकाच्या पूर्वी येतो इतकेंच.

स्थानभर प्रसार झाला. परंतु हा राजाश्रय कमी होतांच हिंदुधर्मानें पुनः डोकें वर काढलें. परंतु तो हिंदुधर्म यज्ञयागादिकांचा वैदिकधर्म नव्हे, तर भगवद्गीतेंत सांगितलेला भागवतधर्म होय. याचा उत्तरेकडून हळु हळू दक्षिणेंत प्रवेश होत गेला, व बौद्धधर्मास उतरती कळा लागल्यानंतर दक्षिणेंत जे मोठमोठे धर्मप्रवर्तक झाले, त्यांनीं या भागवतधर्माचा पुनः सर्व हिंदुस्थानभर प्रसार केला. या धर्मप्रसारकांपैकीं शंकराचार्य हे पहिले होत. परंतु हे विशेषतः ज्ञानमार्गी होते. त्यांनीं मायावाद व अद्वैतमत प्रतिपादल्यामुळें भक्तीच्या भागवतधर्माला त्यांच्या कडून फारसें प्रोत्साहन मिळालें नाहीं. असें प्रोत्साहन रामानुजाचार्यांकडून मिळालें. यांचा जन्म १०१७ मध्यें झाला व यांनीं भक्तिमार्ग अथवा भागवतधर्माचा प्रसार केला. परंतु यांच्या धर्मामध्यें विष्णु या नांवानेंच परमेश्वराचा उल्लेख येतो. कृष्ण व विष्णु एकच असेंहि ते म्हणत. परंतु यांच्या उपदेशांत अजून राधाकृष्णाचें नांवहि दिसून येत नाहीं. मथुरेंतील दोघां श्रीमान् शेटजींनीं या पंथाचा स्वीकार करून वृंदावनास छत्तीस लाख रुपये खर्चून श्रीरंगजींचें देऊळ बांधल्यापासून या पंथाचे कांहीं लोक मथुरेंत झाले, व हा एक कृष्णभक्तीचाच पंथ आहे, असें मानण्यांत येऊं लागलें. मध्वाचार्य हे ११९९ मध्यें जन्मले. यांनीं द्वैतमताचा प्रसार करून कृष्ण व विष्णूची भक्ति करणें हेंच खरें मोक्षाचें साधन आहे, असें प्रतिपादन केलें, व त्यांनीं मथुरा व वृंदावन या ठिकाणांस जास्त पावित्र्य व महत्त्व आणलें; तरी पण गोकुळांतील राधाकृष्णांच्या कथेवर त्यांचा भर नसे.

गोकुळांतील राधाकृष्ण व विशेषतः राधेची व गोपींची भक्ति करणें व कृष्णाप्रमाणें गोपींशीं लीला करणें हेंच मोक्षाचें साधन आहे, अशा प्रकाच्या धर्माचा प्रसार निंबार्क, वल्लभाचार्य व चैतन्य या अर्वाचीन धर्मप्रवर्तकांनीं केला व हल्लीं मथुरेंत व वृंदावनांत याच पंथाच्या लोकांचा फार भरणा आहे.

निंबार्काचें मूळचें नांव भास्कराचार्य असें होतें. यानें एकदां एका साधुपुरुषाला सायंकाळीं भोजनास बोलाविलें. परंतु त्या पुरुषास सूर्य मावळल्यावर भोजन करावयाचें नाहीं, हें विसरून त्यानें त्याला बोलाव-

ण्यास उशीर केला. परंतु सूर्यनारायण भास्कराचार्यांवर उपकार करण्याकरितां निंब झाडावर उतरला व भोजन आटपेपर्यंत तेथें थांबला म्हणून त्याला निंबार्क म्हणूं लागले, अशी एक दंतकथा या पंथाच्या उत्पादकाविषयीं सांगतात! हा निंबार्क मथुरावृंदावनास पुष्कळ दिवस होता. राधाकृष्णाची भक्ति करणें, नंद व यशोदा याप्रमाणें त्यावर प्रेम करणें, गोपालकृष्णाची सेवा करणें, व त्याला आपलें सर्वस्व अर्पण करणें, हेंच मोक्षाचें खरें साधन, असें त्यानें शिकविलें.

वल्लभाचार्य यांचा पंथ फारच मोठा आहे. वल्लभ हा लक्ष्मणभट्ट या नांवाच्या तेलगू ब्राह्मणाचा मुलगा होता. याचा जन्म १४७९ मध्यें झाला. हा वृंदावनांत रहात असतां श्रीनाथजीनें त्याच्या स्वप्नांत येऊन असें सांगितलें, कीं, "माझें देऊळ तूं बांध व माझ्या भक्तीच्या धर्माचा प्रसार कर." त्याप्रमाणें वल्लभानें वृंदावनास श्रीनाथजीचें देऊळ बांधून वल्लभ पंथाचा प्रसार केला. या पंथाच्या मताप्रमाणें कृष्ण हाच खरोखरी परमात्मा आहे, व या कृष्णपरमात्म्याबरोबर क्रीडा करण्यास मिळणें हाच खरा मोक्ष आहे. जे कृष्णाची भक्ति करतात त्यांनाच कृष्ण आपल्या सहवासांत व आपल्या खेळांत घेतो. ही भक्ति ईश्वरच मनुष्याच्या मनांत उत्पन्न करतो. प्रथमतः मनुष्याच्या मनांत ईश्वराविषयीं आवड उत्पन्न होते. यामुळें मनुष्य ईश्वराविषयीं ज्ञान मिळवूं लागतो. यालाच प्रेमभक्ति म्हणतात. हिची पहिली पायरी प्रेम होय; दुसरी पायरी आसक्ति होय; तिसरी पायरी व्यसन होय. या व्यसनानें मनुष्याला परमेश्वर जिकडे तिकडे दिसूं लागतो. अशी अवस्था प्राप्त झाली म्हणजे कृष्णपरमात्मा त्या भक्ताला आपल्या खेळांत निरनिराळ्या स्वरूपांत घेतो, व ही स्थिति धर्मार्थकाममोक्ष या चाऱ्ही अर्थांपेक्षां श्रेष्ठतर आहे. कृष्णानें गोपींशीं ज्याप्रकारें क्रीडा केली त्याच तऱ्हेची या भक्तांशीं त्याची क्रीडा होते व या क्रीडेमध्यें सामील होणें हेंच प्राण्याचें इतिकर्तव्य आहे. ही भक्ति उत्पन्न होण्यास वल्लभानें सांगितलेला मार्ग म्हणजे श्रीकृष्णाची व वल्लभाचार्यांची पूजाअर्चा करणें हा होय. मनुष्यानें प्रातःकाळीं उठावें, भागवत हें नांव उच्चारावें, व प्रातर्विधि करून देवाच्या

पायांचें थोडें पाणी प्यावें, व मग पूर्वेस तोंड करून गुरूचें नांव घ्यावें; नंतर कृष्णाला नमस्कार करावा, नंतर यमुना व गोपी यांना वंदन करावें, कृष्णानें खाल्लेल्या तांदुळाचें सेवन करावें व स्नान वगैरे करून व चंदन अंगाला लावून मग देवळाचें दार उघडून देवाच्या शय्येवरील माला वगैरे बाहेर आणून त्याची निजावयाची खोली साफ करावी, मग एक गाणें म्हणून कृष्णाला उठवावें, नंतर राधाकृष्णाला नमस्कार करून त्यांना स्नान वगैरे घालून त्यांना नैवेद्य दाखवावा, मग पुनः कृष्णाला पाळण्यांत घालून निजवावा, नंतर दोन प्रहरचें जेवण आणावें. याप्रमाणें देवाचे सर्व विधि लहान मुलाप्रमाणें करावयाचे, हीच देवाची पूजा व भक्ति. या पंथामध्यें विषयविरोधाचा उपदेश कमीच आहे. उलट विलासांतच मोक्ष आहे, अशा प्रकारची कल्पना या पंथाच्या उपासनाक्रमांत आहे, व आम्हीं मागें मथुरेच्या वर्णनांत देवाची याचप्रमाणें पूजाअर्चा चालते, व भाविक लोक हे सर्व विधि अंधश्रद्धेनें अजूनहि करतांना दिसतात याचें वर्णन दिलेंच आहे.

वल्लभाच्याच सुमारास बंगाल्यांत चैतन्य उदयास आला. याचा जन्म १४८७ मध्यें झाला. याचा लहानपणींच विवाह झाला होता. पुढें मोठेपणीं यानें संन्यासाश्रम स्वीकारला व आपल्या पंथाचा प्रसार केला. वल्लभानें कृष्णभक्तीमध्यें विधि व बाह्य पूजा यांचें बंड माजविलें; चैतन्यानें भक्ति अंतरंग पाहिजे व ती भजनानें व कीर्तनानें उत्पन्न होते, असें प्रतिपादन केलें. दोघांचीहि मोक्षाची कल्पना सारखीच होती. परलोकांमध्यें श्रीकृष्णपरमात्म्याबरोबर खेळावयास मिळणें हाच खरा मोक्ष होय, असें दोन्ही पंथांचें मत आहे. चैतन्य पंथांत कृष्णाइतकाच किंबहुना एक कांकणभर मात्र जास्त मान राधेला आला. राधेची भक्ति करणें हेंच मोक्षाचें साधन बनलें.

या पंथांच्या वरील हकीकतीवरून गोपालकृष्णाची भक्ति ही गेल्या चार पांचशें वर्षांच्या आंतील आहे, हें स्पष्टपणें दिसून येईल. मथुरावृंदावन पाहणाराच्या हीच गोष्ट प्रथमतः मनांत येते. येथील सर्व प्रकार फार जुने भासत नाहींत. देवळें तर अगदीं नव्यासारखीं दिसतात. मथुरावृंदा-

वनांत या चारी प्रकारच्या वैष्णवपंथांचे पुष्कळ लोक आहेत. इतर जातींचे व सामान्य हिंदुधर्मावर भरंवसा ठेवणारेहि पुष्कळ हिंदु आहेत.


हें मथुरावृंदावन-वर्णन फारच वाढलें. परंतु वाचकांना ही हकीकत वाचून कांहीं तरी करमणूक होईल, व आपल्या हिंदुधर्माच्या कित्येक पंथांचा किती लांबवर इतिहास पोंचतो हें ध्यानांत येईल, म्हणून ही हकीगत थोड्या विस्तारानें दिली आहे.

संकल्प केल्याप्रमाणें माझ्या उत्तरहिंदुस्थानच्या प्रवासाच्या षडध्यायी पुराणाचा शेवट आला. या पुराणश्रवणानें वाचकांना प्रवासाची प्रबल इच्छा होऊन त्यांना आपल्या देशांतील निसर्ग-रमणीय व धर्म-पुनीत स्थानांचें दर्शन घडो, अशी इच्छा करून वाचकांची रजा घेतों.


संपूर्ण.



रघुनाथराव पेशवे.



बरातलाव शहर—भोपाळ.



मोती मसजिद–भोपाळ.



अजबखाना—भोपाळ.



माझा अटकेपार प्रवास.

१

भोपाळ.

कोणत्यादि गोष्टीचें चिरंतन चिंतन, सर्वदा निदिध्यास व सारखी तळमळ एकाद्याला लागली, म्हणजे त्याला त्या गोष्टीचा नाद लागला, असें आपण म्हणतों. हा नाद सुपरिणामी असला, म्हणजे तो सद्गुण बनून प्रशंसनीय होतो; हाच नाद दुष्परिणामी असला, म्हणजे तो व्यसनरूप पाहून गर्हणीय होतो. माझीच गोष्ट घ्याना! मला हा प्रवासाचा सुखदायी व सुपरिणामी नाद ब‍ऱ्याच प्रौढ वयांत लागला. वर्षादोन वर्षांतून दूरच्या प्रांताचा प्रवास केल्यावांचून मला चैन पडत नाहीं; मन अगदीं चुळबूळ करूं लागतें.

प्रवासाला अनुकूल परिस्थिति पाहिली तर ती माझ्या पूर्ववयांत हल्लीपेक्षां जास्त होती. माझे वडील इंग्रजी फारसे शिकलेले नसूनसुद्धां मोठे कॉंग्रेसभक्त होते; यामुळें ते पुष्कळ वेळां कॉंग्रेसच्या बैठकांना जात असत. तेव्हां त्यांच्याबरोबर मला सहज जातां आलें असतें. शिवाय, माझ्या

वडिलांची सांपत्तिक स्थिति बरी असल्यामुळें व मला माझ्या विद्यार्थिदशेंत शिष्यवृत्ति नेहमीं मिळत असल्यामुळें मनांत असतें तर मला त्या वयांत पुष्कळ प्रवास करावयाला सांपडला असता. पण त्या वयांत मी फार घरकोंबडा होतों! शाळेची किंवा कॉलेजची सुटी झालीरे झाली, कीं, घरीं पळावयाचें, असा माझा क्रम असे. एकदां तर या माझ्या आतुरतेबद्दल माझे पूज्य गुरु प्रि. सेलबीसाहेब यांच्या किंचित् रोषाला मला पात्र व्हावें लागलें होतें. पण त्यांच्याशीं केलेल्या सरळ वर्तनानें मला त्या वेळीं परवानगी मिळाली. आमच्या कॉलेजच्या परीक्षा वगैरे सर्व आटोपल्या होत्या. माझें कामहि संपलें होतें. कॉलेजच्या सुटीला फक्त दोन दिवस अवकाश होता. तेव्हां येथें आतां उगीच राहून काय करावयाचें, असा मनांत विचार करून मी घरीं जाण्याची तयारी केली; वडिलांना निघण्याचें मुकरर पत्र लिहिलें; क्लबाचीं व इतर खर्चाचीं बिलें दिलीं; सामानाची बांधाबांध केली, व सर्व तयारी झाल्यावर प्रवासाचा पोषाख करून प्रि. सेलबीसाहेबांच्या बंगल्यावर त्यांची परवानगी मागावयाला गेलों. तेव्हां ते किंचित् रागावल्यासारखे दिसले, व "सुटीच्या आधीं जाणें चांगलें नाहीं; विशेषतः कॉलेजांतल्या प्रौढ विद्यार्थ्यांनीं तर जाऊं नये. कारण, यायोगें इतर विद्यार्थ्यांच्या मनांत शिस्तीबद्दल शिथिलता उत्पन्न होते." असें ते मला ह्मणाले. तेव्हां मलाहि त्यांचें म्हणणें पटलें, व मी आपली चूक त्यांच्या-पाशीं प्रांजलपणें कबूल केली. पण "मीं जाण्याची सर्व तयारी केली आहे; घरीं मुकरर येण्याचा दिवसहि कळविला आहे, व खरोखरीं माझे सर्व अभ्यास आणि काम संपलें आहे." असें मीं तितक्यांत म्हटलेंच. हें ऐकून प्रि. सेलबीसाहेबांनीं मला एकदांची परवानगी दिली, व मी घरीं गेलों.

त्या काळच्या घरकोंबडेपणामुळें त्या वयांत मजकडून प्रवास घडला नाहीं; याबद्दल एका दृष्टीनें मला वाईट वाटत नाहीं. कारण, त्या वेळीं मी बहिर्दृष्टिच होतों. मी प्रवासाला गेलों असतों, तर इतर पुष्कळ प्रवाशांप्रमाणें जडदृष्टीनेंच मीं प्रवास केला असता. आतां पुष्कळ दिवसांच्या अनुभवानें, व्यासंगानें व वाचनानें मला एक प्रकारची अन्तर्दृष्टि आली

आहे; यामुळें हल्लींच्या माझ्या प्रवासापासून मला स्वतःला पुष्कळ आनंद व फायदा होतो; इतकेंच नव्हे, तर माझ्या प्रिय वाचकांनाहि माझ्या प्रवासवृत्तापासून थोडाबहुत आनंद व फायदा होतो, असें माझ्या ऐकिवांत आलें आहे. ह्मणून या बऱ्याच प्रौढ वयांत मला प्रवासाचा नाद लागला हें एका अर्थी बरें झालें, असें मला वाटतें. असो.

सन १९१२ च्या मे महिन्यांत मीं माझ्या बंधूसह उत्तरहिंदुस्थानांत तिसऱ्यांदां प्रवास केला होता. तेव्हांपासून कांहींनाकांहीं अपरिहार्य अड-चणी उपस्थित होऊन या सालपर्यंत विशेष लांबचा प्रवास करावयाला मला मिळालें नाहीं. या खेपेचा माझा प्रवासाचा बेत मात्र फारच महत्त्वाकांक्षेचा होता. अटकेपार प्रवास करून ब्रिटिश हिंदुस्थानाची ईशान्यमर्यादा जो खैबरघाट, तेथपर्यंतचा प्रदेश पहाण्याचा मीं विचार केला होता; इतकेंच नव्हे, तर तेथून परतून पुढें हिंदुस्थानचें नंदनवन असा जो काश्मीरदेश, तेथेंहि जाण्याचा मीं निश्चय केला होता, व या इतक्या लांबच्या प्रवासाला प्रोत्साहन मिळण्यासारखी स्थितिहि उत्पन्न झाली होती. माझे एक जवळचे नातेवाईक काश्मीरच्या कॉलेजांत गणि-ताचे प्रोफेसर झाले होते. ते तेथें गेल्यावर त्यांनीं माझी प्रवासप्रियता जाणून मला तिकडे येण्याबद्दल आग्रहाचें निमंत्रण केलें होतें. अर्थात् अशी राहण्याची सोय झाल्यानें माझा प्रवासाचा बेत अधिकच दृढ झाला; पण हा बेत तडीला जाणें बरेंच कठिण होतें, यांत संशय नाहीं. कारण, कोठें अटक आणि कोठें पुणें ! तरी पण हल्लींच्या सुलभ प्रवाससाधनांमुळें हा बेत सिद्धीला जाणें फारसें अशक्य मात्र नव्हतें.

'अटक' हा शब्द उच्चारल्याबरोबर प्रत्येक खऱ्या महाराष्ट्रीयाला अभि-मानाचें भरतें येतें, व राघोबादादा भरारी याचें स्मरण झाल्याखेरीज रहात नाहीं. भिमथडीच्या घोड्यांना सिंधू नदीचें* पाणी दाखवून मराठ्यांचा

* श्रीमन्त राघोबादादा पेशवे खुद्द अटकेपर्यंत गेले होते किंवा नाहीं याबद्दल कागदोपत्रीं पुरावा सांपडत नाहीं. अटकेपर्यंत झेंडे नेल्याची ह्मण मात्र महाराष्ट्रांत प्रचलित होती, ही गोष्ट ग्रँड डफच्या खालील वाक्यां-

झेंडा अटकेला नेणारा पहिला महाराष्ट्रवीर राघोबाच होय. राघोबादादाच्या पुढील आयुष्यक्रमामध्यें बुद्धिपुरस्सर म्हणा किंवा दुर्बलतेनें म्हणा, कितीहि देशबुडव्या चुक्या झालेल्या असोत-त्यांबद्दल महाराष्ट्रीयांस वारंवार रागहि येतो परंतु-राघोबादादांच्या या पूर्ववयांतील अपूर्व कामगिरीबद्दल मनाला सानंद आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. पण त्याबरोबरच आमच्या देशाभिमानी ह्मणविणाऱ्या नाटककाराच्या एका कृतीकडे पाहिलें, ह्मणजे दुःख झाल्यावांचून रहात नाहीं. राघोबादादांचें किती विकृत स्वरूप या नाटकांत दाखविलें आहे! आपल्या रंगमहालामध्यें चोरून पेशवाईचीं वस्त्रें

वरून दिसतेः—

"The preeminence to which the Mahrattas had attained was animating and glorious; their right to tribute was acknowlodged on the banks of the Coleroon and the Deccan horse had quenched their thirst from the waters of the Indus."

तरी पण मराठ्यांच्या साम्राज्याच्या वाढींत श्री० राघोबादादा यांची पूर्ववयांतील कामगिरी आश्चर्यकारक होती यांत शंका नाहीं. कारण सन १७५० पासून सन १७५८ पर्यंत बहुतेक प्रत्येक वर्षी श्री० रघुनाथराव उत्तरहिंदुस्थानांत मोहिमेस जात असत व या मोहिमांत त्यांनीं गुजराथ, माळवा, व राजपुतानाहि काबीज केला. दिल्लीस ते सन १७५४ व सन १७५७ मध्यें गेले होते. दिल्लीस असतांनाच पंजाबांतील सरदारांच्या आपसांतील कलहामुळें त्यांना पंजाबांत मोहिम करण्याची संधि आली व त्या संधीचा फायदा घेऊन श्री० रघुनाथराव सन १७५८ मध्यें लाहोरापर्यंत मुलुख काबीज करीत गेले व लाहोरच्या किल्ल्यावर त्यांनीं मराठ्यांचा झेंडा रोंविला व तेथें ते एप्रिल ते जूनपर्यंत राहिले. तेव्हां पंजाबची राजधानी लाहोर येथें 'विजेते' ह्मणून गेल्याच्या योगानें पंजाबची मर्यादा जी सिंधूनदी व अटक प्रांत येथपर्यंत त्यांनीं मराठ्यांचे झेंडे लावले, असें अलंकारिक भाषेनें म्हणतां येईल. प्रत्यक्ष सिंधूनदीपर्यंत दादासाहेब गेले होते असें हल्लीं उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरून दिसत नाहीं.

अंगावर घालून आपलाच चेहरा आरशांत पाहणारा, सहज लडिवाळपणें "मी 'ध'चा 'मा' करते," असें ह्मणणाऱ्या आनंदीबाईला आपल्याच हुकुमांत बिनदिक्कत असला भयंकर फरक करूं देणारा, आणि नारायण-रावाच्या वधानंतर त्याच्याच रक्तानें माखलेल्या तरवारीवरील त्याच्या रक्ताचा तिलक आपल्या व आपल्या बायकोच्या कपाळावर लावणारा राक्षसी, भ्याड, बाईलबुध्या, नटवा, नाटकी राघोबा कोणकिडे, आणि भोळा सांब, शिपाईबाण्याचा, संकुचित मनाचा, बराच महत्त्वाकांक्षी, 'नारायणरावाला धरावा' इतकाच हुकूम जिकिरीनें देणारा, दाक्षण्यातिशयशील व नारायण-रावाच्या खुनाची बातमी ऐकल्याबरोबर त्या क्षणीं तरी दुःखावेगानें 'हाय! हाय!' करणारा खरा ऐतिहासिक राघोबा कोणीकडे! पहिल्याबद्दल तिरस्कार उत्पन्न होतो, तर दुसऱ्याबद्दल अनुकम्पा उत्पन्न होते. असो.

या खेपेच्या माझ्या प्रवासांत मला आनंद वाटण्याला आणखी एक कारण झालें होतें. ज्यांनीं युरोपांतील नंदनवन जें स्वित्झरलंड येथील वनश्री प्रत्यक्ष पाहिली होती; ज्यांनीं युरोपांतील कलाकौशल्याचें जें माहेर-घर इटली देश, तेथील सुंदरसुंदर इमारती, उत्कृष्ट पुतळे वगैरे कामें अवलोकन केलीं होतीं; व ज्यांच्यामध्यें युरोपांतील प्रवासामुळें, बहुश्रतपणा मार्मिकता व सूक्ष्म अवलोकनशक्ति हीं आलीं होतीं, असे माझे '**चक्कर-मालें**'तील मित्र माझ्याबरोबर या प्रवासाला यावयाचे होते. याप्रमाणें आमच्या जंगी प्रवासाची सारी सिद्धता झाली. या प्रवासाचें मला इतकें वेड लागलें, कीं, '**अटकीं जावें नित्य वदावें**' व केव्हां केव्हां '**काश्मिरीं जावें नित्य वदावें**' हें पालुपद मी सारखें गुणगुणूं लागलों!

पण आमचा प्रवासाचा काळ जसजसा जवळ येत चालला, तसतसें हे सर्व 'मनचे मांडे'च होतात कीं काय, असें वाटूं लागलें! प्रथमतः माझ्या काश्मीर येथील नातेवाइकांनीं एकाएकीं तिकडील नोकरी सोडली; यामुळें आमचा तेथला राहण्याचाच आधारस्तंभ नाहींसा झाला! दुसरें माझ्या मित्रांना कांहीं अपरिहार्य कारणामुळें माझ्याबरोबर येणें अशक्य झालें. तेव्हां मला फारच वाईट वाटलें, व मी आपला बेतहि सोडून द्यावयाच्या तयारीला लागलों. पण माझे मित्र मला म्हणाले, "तुम्ही

आपला बेत कशाला बदलतां ? पुढेंमागें दुसऱ्या एकाद्या प्रवासाला आपण बरोबर जाऊं." तेव्हां '**सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः**' या न्यायानें, व पुढील सहप्रवासाच्या आशेवर मी व माझे बंधु असा दोघांनींच–दिवस फार थोडे राहिले असतांनासुद्धां आणि प्रवासाची आह्मांला फार घाई होईल हें दिसत असतांनासुद्धां–प्रवासाला जाण्याचा दिवस मुकरर केला.

शेवटीं एकदां तो दिवस उजाडला. मागल्या खेपेला आह्मी तारीख ६ मेला पुण्याहून निघालों होतों. व मौजेची गोष्ट ही, कीं, या वेळीं मुकरर केलेला दिवसहि ६ मेच होता ! आह्मी पूना एक्सप्रसनें निघून मुंबईला वसतीला गेलों, व दुसऱ्या दिवशीं सकाळीं दिल्ली एक्सप्रेसनें जाण्याकरितां बिऱ्हाडाहून निघालों. मागील खेपेला ज्या वेळीं आह्मी प्रवासाला निघालों होतों, त्या वेळीं बोरीबंदरवर थर्ड क्लासच्या उतारूंची सेकंड क्लासच्या उतारूपासून फारकत झालेली नव्हती. एकाच ठिकाणाहून सर्वांना जातां येत असे. पण राजेसाहेबांच्या मुंबईच्या भेटीचा आह्मां तिसऱ्या वर्गाच्या उतारूंना जो प्रसाद मिळाला, तो म्हणजे भिकार थर्ड क्लासचा निराळा मार्ग! तेव्हां आह्मी तिसऱ्या वर्गाच्या–म्हणजे क्राफर्ड मार्केटच्या–बाजूकडे गेलों.

अत्यंत दूरच्या व बऱ्याच त्रासाच्या प्रवासाला जात असल्यामुळें आह्मीं सामान अगदीं आटपसर असें घेतलें होतें. दोघां मिळून एक ट्रंक, एक हँडबॅग, दोन बिछाने आणि एक फराळाचा डबा, इतकें आमचें सामान होतें. हें सामान दोन माणसांच्या तिकिटांत जावयाला अडचण पडूं नये अशा बेतानें घेतलें होतें, आणि ह्मणूनच आह्मीं हमालाच्या डोक्यावर सामान देऊन त्याला थेट जिना चढावयाला सांगितलें, व आह्मीं बरोबर गेलों. अर्ध्या जिन्यांत गेल्यावर एका गौरकाय तिकिटकलेक्टरनें आह्मांला अडविलें, व 'ट्रंक वजन केली पाहिजे,' ह्मणून सांगितलें. आह्मीं ह्मटलें "दोघां मिळून आमची एकच ट्रंक आहे, तेव्हां वजन करण्याची गरज नाहीं." तें त्यानें ऐकलें नाहीं, व आह्मी परत फिरूं लागलों; इतक्यांत जवळ उभ्या असलेल्या काळ्या डगल्याच्या पोलिसशिपायानें "साहेबाला चार आणे द्या, म्हणजे जाऊं देईल," असें आह्मांला सांगितलें; परंतु

असला प्रकार करण्याची आमची इच्छा नसल्यामुळें आह्मी परत सामान वजन करण्याच्या ठिकाणीं गेलों, व तेथें आमची ट्रंक वजन करून घेतली तों ती दोन तिकिटांत जाणाऱ्या वजनाच्या आंतच भरली. तेव्हां तसा तिकिटावर दाखला घेऊन आह्मी पुनः जिना चढून तिकिटें दाखवून गाडींत येऊन बसलों. सेकंड क्लास व थर्ड क्लास यांच्या जागा निरनिराळ्या करण्यामध्यें असला हा सांवळागोंधळ करावयाला सांपडावा, हा तर एक हेतु नाहीं ना, असें आमच्या मनांत आलें. पूर्वींच्या व्यवस्थेंत थर्ड, सेकंड वगैरे सर्व उतारूंच्या सामानाचें वजन जास्त दिसल्यास तोलण्याची पद्धत असे. आतां फर्स्ट व सेकंड क्लासच्या बाजूला कोणी बघतच नाहीं, व थर्ड क्लासच्या बाजूला मात्र कसोशीचा कडकपणा! या गोष्टीकडे आमच्या एकाद्या नामदाराचें लक्ष्य जाईल का? पण तो तिकडे थर्ड क्लासकडे जातो कशाला?

सामानाच्या वजनाच्या बाबतींत याप्रमाणें आह्मांला त्रास झाला खरा; पण गाडींत बसल्याबरोबर गाडींतील माणसांच्या पातळाईमुळें आह्मीं तो त्रास पार विसरून गेलों. कारण दिल्लीएक्सप्रेसमध्यें या वेळीं फारशी गर्दी नव्हती. आह्मीं या आनंदांत आहोंत, तोंच गाडी फू फू करीत चालू झाली.

आमचा प्रवास मनमाडपर्यंत मोठ्या सुखानें झाला; पण त्या स्टेशनवर गाडी येऊन पोहोंचते, तोंच भलें थोरलें एक मारवाडमंडळ गाडींत घुसलें! ती चांगली तेराचौदा मंडळी असावी. पांचसहा बायका, दोन तीन मुलें व चारपांच पुरुष. त्यांचें सामान तर पर्वतप्राय होतें! ट्रंका, बोजे, पोतीं यांची शीग डब्याच्या छतापर्यंत लागली! ही मारवाडी मंडळी बरीच श्रीमंत असल्याचें दिसत होतें. पुरुष, बायका, मुलें यांच्या सर्वांच्या अंगावर दागिनेच दागिने होते. एक बाई तर नखशिखांत नव्हे—नखकेशकलापांत—दागिन्यांनीं मढविलेली होती! पायाच्या आंगठ्यांत एक वळ्यासारखें जोडवें होतें, बाकीच्या चार बोटांत जोडविरवल्या होत्या. पायांत तोरड्या, त्याच्यावर शिंदेशाई तोडे, व त्याच्यावर दोन वाळे. या दागिन्यांनीं सहा इंच पाय तरी अडला असेल! वर वर पहात गेलें असतां या बाईच्या कंबरेंत चांगला जाड असा चांदीचा गोफ होता. पुढें गळ्यांत

पिंपळपान, पुतळ्यांची माळ वगैरे पुष्कळसे दागिने होतेच. दोन्ही हातांच्या बोटांत आंगठ्या होत्या. हातांमध्यें मारवाडी तऱ्हेच्या हस्तिदन्ती, वरखी, चपट्या, जाड अशा बांगड्या होत्या. त्यांनींहि हातांची सहा इंच तरी जागा अडली असेल! बाईच्या कोपरांत वेळा होत्या. कानांत नेहमींचे दागिने होते, आणि कपाळावर एक सोन्याचें फूल होतें. वेणीमध्यें आणखी किती फुलें होतीं, कोण जाणे! मारवाडी लोकांच्या पद्धतीप्रमाणें तिनें पदराचें टोंक खालपर्यंत आणिलें होतें, व त्यांतून ती चोरून चोरून पहात होती. हा थाट पाहून '**काय दिसे हें ध्यान!**' असे उद्गार माझ्या अगदीं ओंठावर आले! पण मीं आपलें मन आंवरलें.

या एका भगिनीच्या वर्णनानें माझ्यावर माझ्या वाचकभगिनी रागावतील; पण हें स्त्रीवर्गाची हेटाळणी करावी या हेतूनें मीं लिहिलें नाहीं. पुरुषांनींच जर स्त्रियांना अज्ञानांधःकारांत ठेविलें आहे, तर त्यांची दागिन्यांसंबंधाची अशी वेडी हौस असावी यांत नवल काय? ही सर्व मारवाडी मंडळी व या सर्व बायका पाहून माझ्या मनांत असें आलें, कीं, देशांत आह्मीं सुधारक 'सुधारणा झपाट्यानें चालली आहे.' असें ह्मणतों खरें; पण तिची गति गोगलगायीच्या गतीपेक्षांहि मंद आहे, व प्रांतचे प्रांत व जातीच्या जाती आपल्या जुन्या चालीरीतींप्रमाणें वागण्यांत अगदीं गढून गेलेल्या आहेत. त्यांना नवीन कल्पनांचा गंधहि नाहीं! सुधारकांना अद्यापि किती तरी प्रचंड काम करावयाचें आहे.

ही मारवाडी मंडळी आल्यापासून अर्थात्च गाडींत फार गर्दी झाली, व उष्माहि भयंकर होऊं लागला. आतां सबंध रात्र अशाच त्रासांत घालवावी लागते कीं काय, अशी आह्मांला भीति पडली; पण चवकशी करितां तें मारवाडमंडळ खांडव्याला उतरावयाचें होतें, व त्याप्रमाणें ती मंडळी खांडव्याला उतरलीहि. आमच्या सुदैवानें नवीन माणसांची भरती झाली नाहीं; त्यामुळें आह्मांला थोडें लवंडावयाला सांपडलें, व चांगली झोंप लागली. पुनः उठतों, तों पहांट झाली होती. आमचें पहिल्या मुक्कामाचें ठिकाण भोपाळ, हें जवळ आलें असलें पाहिजे, असें वाटून

आह्मीं आपलें टाइमटेबल हुडकूं लागलों, तों इतक्यांत गाडी थांबली, व आह्मीं भोपाळ स्टेशनावर येऊन पोहोंचलों.

भोपाळला माझी मुळींच ओळख नव्हती; ह्मणून माझ्या एका मध्यप्रांतांतील मित्राकडून मीं भोपाळ येथील एका स्नेह्याला पत्र लिहविलें होतें, व आह्मीं केव्हां निघणार, हेंहि त्या गृहस्थांना कळविलें होतें. हे गृहस्थ पोलीसखात्यांतील एक बडे अंमलदार होते. त्यांनीं स्टेशनावर आपला जमादार पाठविला होता. तो आह्मांला स्टेशनावर भेटला, व आमची उतरण्याची सर्व काळजी दूर झाली. या जमादारानें आमचें सामान हमालाकडून घेवविलें, व आह्मीं टांग्यांत बसून डाकबंगल्यांत गेलों.

आम्हांला येथें एक स्वतंत्र खोली देण्यांत आली. अजून पहांट असल्यामुळें आह्मीं आपले बिछाने पसरून त्यावर झोंपीं गेलों. सुमारें सात वाजतां आम्हीं जागे झालों, व बाहेर व्हरांड्यांत येऊन पहातों, तों दोन गौरकाय स्त्रीपुरुष आमच्याच खोलीच्या पलीकडच्या खोलीच्या पुढच्या व्हरांड्यांत निजले आहेत! या संस्थानांत युरोपियन व इंडियन यांमध्यें डाकबंगल्याच्या बाबतींत तरी पंक्तिप्रपंच होत नाहीं, हें पाहून आम्हांला आनंद वाटला. हा आनंद हा डाकबंगला सोडतांना पार नाहींसा झाला, ही गोष्ट निराळी!

आम्हीं उठल्यावर डाकबंगल्याच्या खानसाम्यानें चहा तयार असल्याची वर्दी दिली, व चहा आला. आम्हीं येथें आल्याबद्दल खानबहादुरांना (हे पोलीस अधिकारी खानबहादूर होते) चिठ्ठी लिहून 'आम्हांला भोपाळ पहावयाचें आहे,' असें कळविलें. त्यांच्याकडून दोन घोड्यांची संस्थानची गाडी आमचा चहा आटोपतो तोंच येऊन उभी राहिली. ताबडतोब पोषाख करून आम्हीं भोपाळ शहरांतील प्रेक्षणीय स्थळें पहावयाला निघालों.

प्रथमतः आम्हीं या शहरांतील प्रेक्षणीय स्थळांतील सर्वांत उत्तम स्थळ पहावयाला गेलों. हें स्थळ म्हणजे येथला 'बरातलाव' हा होय. हा तलाव धारच्या भोजराजाच्या प्रधानानें बांधला, असें म्हणतात. या तलाव्याच्या खालच्या अंगाला दुसरा एक लहान तलाव बांधण्यांत आला आहे; तो बराच अर्वाचीनकाळचा आहे. तो सन १७९४ मध्यें छोटेखान नांवाच्या

भोपाळच्या प्रधानानें बांधविला. मोठा व लहान तलाव एका पाटानें जोडलेले आहेत. याच तलावांतून एन्जिननें शहराकरितां पाणी वर चढविलें जातें. हें एन्जिन थोरल्या तलावाच्या कांठावर आहे. या तलावापासून दिसणारा देखावा खरोखरच फार रमणीय आहे. हा तलाव पाहून मला नैनितालच्या तलावाची आठवण झाली. नैनितालचा तलाव लंबवर्तुलाकार आहे, तर हा तलाव साधारण चौकोनी आहे. नैनितालच्या सभोंवारचे डोंगर फारच उंच आहेत, तर या तलावाच्या बाजू टेकड्यावजाच उंच आहेत. दोन्ही तलावांसभोंवतीं वसती आहे. मात्र भोपाळची वसती दाट आहे, तर नैनितालची पातळ आहे. भोपाळचा तलाव नागपुरच्या तलावापेक्षां बराच मोठा आहे. आम्हीं गेलों, तेव्हां वारा बराच असल्यामुळें तलावाच्या पाण्याला साधारण समुद्रासारख्या लाटा मारीत होत्या. या तलावाच्या बाजू दीड दीड मैलाच्या आहेत. यानें व्यापिलेली जागा सवादोन चौरस मैल आहे.

या तलावाचा सुंदर देखावा पाहून झाल्यावर आह्मीं जवळच असलेला 'फत्तेगड' पहावयाला गेलों. हा किल्ला तलावाच्या उत्तरेच्या टेंकाडावर आहे. किल्ल्याला दोन तट आहेत. आंतल्या तटांत सध्यां जाण्याची परवानगी नाहीं असें कळलें. त्यामुळें पहिल्या तटावरून जेवढा भाग दिसला तेवढाच आम्हीं पाहिला. हा किल्ला भुईकोट आहे. तो भोपाळ संस्थानचा प्रस्थापक दोस्त महंमद यानें बांधला. किल्ला फारसा मोठा किंवा दुर्घट नाहीं.

या तलावाच्याच कांठाला पुष्कळसे जुन्या राजांचे राजवाडे आहेत; पण या इमारती अगदींच सामान्य असल्यामुळें आम्हीं येथें फारसा वेळ न घालवितां मुसलमानी शहरांतील प्रमुख इमारती ज्या मशिदी, त्या पहावयाला गेलों. येथें मशिदी पुष्कळच आहेत; पण त्यांत पहाण्यासारख्या दोनच आहेत. एक 'जुम्मामशीद' व दुसरी 'मोतीमशीद.' दोन्हींचीं कामें चांगलीं आहेत. या प्रांतांत विपुल असलेल्या तांबड्या दगडाच्या या मशिदी आहेत. ज्याप्रमाणें ताजमहालाची लहान प्रतिकृति औरंगाबादच्या मुकाबऱ्यांत दिसून येते त्याप्रमाणें मोतीमशीद ही दिल्लीच्या जुम्मा-

मशीदीची हुबेहुब लहान प्रतिकृति आहे. ही मोतीमशीद लहान, पण सुबक आहे; नक्षीचें काम नाजुक असून कौशल्याचें आहे. तसेंच मशिदींतील खुला चौक प्रमाणबद्ध असल्यामुळें फारच मनोहर दिसतो. एकंदरींत ही इमारत फारच सुंदर आहे, यांत संशय नाहीं. पण दिल्लीच्या मशीदीची भव्यता किंवा प्रचंडता हिच्यांत अर्थात् नाहीं.

या मशिदी पाहून झाल्यावर आम्हीं येथील 'अजबखाना' पहावयाला गेलों. या अजबखान्याची इमारत मनोरेयुक्त अशी मुसलमानी थाटाची आहे. इमारती पुढील बाग सदभिरुचीस पटेल अशीच असल्यामुळें अजबखान्याच्या आवारांत शिरल्याबरोबर अजबखान्याबद्दल प्रथमदर्शनींच अनुकूल ग्रह होतो. हा अजबखाना हरतऱ्हेच्या पुष्कळ प्रेक्षणीय वस्तूंनीं भरलेला आहे. विशेषतः या अजबखान्यांत जुन्या काळच्या निरनिराळ्या हत्यारांचा संग्रह फार चांगला आहे.

याखेरीज शहरांत दुसरें कांहीं फारसें पहाण्यासारखें नाहीं, असें जमादारानें सांगितल्यामुळें आम्हीं थोडेसें शहरांतील बाजारांत चक्कर मारून आमच्या डाकबंगल्यांत परत आलों. शहराबाहेर बेगम बाग पहाण्यासारखा आहे असें मागाहून कळलें. पण आम्हीं भोपाळास फार वेळ न राहिल्यामुळें तिकडे जातां आलें नाहीं.

हल्लींच्या बेगमसाहेबांनीं बांधलेला राजवाडा नवीनच असल्यामुळें पहावयाची फार इच्छा होती, ह्मणून, व शिपाई–जमादारापेक्षां खानबहादुर पोलीस इनस्पेक्टर जनरल भेटले तर त्यांच्याकडून आणखी कांहीं प्रेक्षणीय स्थळांची माहिती मिळेल या आशेनें, आह्मीं खानबहादुरसाहेबांना आमची इच्छा कळवून भेट देण्याबद्दल विनंति केली; पण बेगमसाहेब येथेंच असल्यामुळें राजवाडा पहावयाला मिळणार नाहीं, व कामामुळें मला भेटण्याला सवड नाहीं, असें खानबहादुरांकडून उत्तर आलें. यामुळें आमची थोडी निराशा झाली, व आतां येथें जास्त वेळ रहाण्यांत अर्थ नाहीं, असा विचार करून आम्हीं दोनप्रहरच्या गाडीनें पुढल्या मुक्कामाला जाण्याचा बेत केला, व हें आमच्या हिताचेंच झालें. कारण, या डाकबंगल्यांत रहाणें म्हणजे आमच्यासारख्या मध्यम स्थितीच्या माणसांच्या

आहाराबाहेरचें आहे, असें आमच्या अनुभवाला येऊं लागलें. आम्हांला सरकारी गाडी मिळाली होती, तींतून परत आल्यावर प्रवाशांच्या नेहमीं-च्या रीतीप्रमाणें आम्हीं गाडी हांकणाराला आठ आणे बक्षिसी देऊं लागलों, तोंच त्या हाकणारानें ते पैसे रागानें फेंकून दिले, व तो म्हणाला "येथें येणारे पाहुणे आम्हांला रुपयाच्या खालीं कधींच बक्षिसी देत नाहींत !" अर्थात् हांकणाराला आम्हांला एक रुपया द्यावा लागला. पण तेवढ्यानेंच भागलें नाहीं ! गाडीच्या मागें उभा राहणारा मनुष्य निराळी बक्षिसी मागूं लागला. आम्हीं विचार केला, कीं, भाड्याच्या गाडीला दोन-अडीच रुपये पडलेच असते; ह्मणून त्या माणसालाहि आम्हीं आठ आणे दिले, व या सरकारी गाडीची पाठवणी केली, आणि 'आम्हीं दोन प्रहरच्याच गाडीनें जाणार,' असें खानसाम्याला सांगितलें. त्यानें त्या वेळेच्या आधीं चहा वगैरे तयार करून दिला, व आमच्या सामानाकरितां हमाल पाहून आणला. 'डाकबंगल्यांत रहाण्याबद्दल काय द्यावयाचें या-संबंधीं कांहीं दराचें पुस्तक असल्यास दाखव म्हणजे त्याप्रमाणें आम्हीं बिल चुकतें करतों,' म्हणून आम्हीं त्याला सांगितलें; पण तो 'माझ्या-जवळ पुस्तक नाहीं,' असें ह्मणूं लागला. तेव्हां 'स्टेशनवर खानसाहेब येणार आहेत, त्यांना विचारून पैसे देतों,' असें सांगून आम्हीं स्टेशनावर आलों. आह्मांला खानसाहेबांकडून जें उत्तर आलें होतें त्यांत 'मी आप-णाला स्टेशनवर भेटतों,' ह्मणून त्यांनीं लिहिलें होतें. तेव्हां आम्हीं त्यांची गाडी येईपर्यंत वाट पाहिली. इकडे खानसामा पैशांकरितां तगादा करूं लागला. तेव्हां शेवटीं काय द्यावयाचें तें त्याला विचारतां तो म्हणाला, "माणशीं चार रुपये."

हें बिल ऐकून आमचें धाबें दणाणलें! यूरोपियन प्रवाशांच्या खोलीच्या शेजारीं जागा मिळाल्याचा आमचा सर्व आनंद मावळला ! यासंबंधांत तो खानसामा आम्हांला फसवीत आहे, अशी आमची खात्री झाली; पण शेवटीं त्याला पांच रुपये देऊन (हा आमच्या दोघांचा अर्ध्या दिवसाचा चार्ज ह्मणून) आम्हीं डाकबंगल्यांत उतरावयाला गेल्याबद्दल कानाला खडा

लावून घेतला, व पुन्हां असल्या फंदांत पडावयाचें नाहीं असा निश्चय करून गाडींत जाऊन बसलों.

आतां भोपाळ संस्थानच्या उत्पत्तिचें व इतिहासाचें थोडेसें दिग्दर्शन करून हा लेख संपवितों.

भोपाळ हें मुसलमानी संस्थान शिंदे, होळकर, पवार, नागपूरकर भोसले इत्यादि मराठी सरदारांनीं मराठामय केलेल्या मध्यहिंदुस्थानांत तुळशींत भांगेप्रमाणें (किंवा सब्जाप्रमाणें असें म्हणणें अधिक बरें. कारण, हिंदूस ज्याप्रमाणें तुळस, त्याचप्रमाणें मुसलमानांस सब्जा हा पवित्र वाटतो.) उदयास आलेलें दिसतें. पण मराठ्यांइतक्याच शूर धाडशी व पराक्रमी अशा एका मुसलमान सरदाराच्या कर्तृत्वाचें तें संस्थान दृश्यफल होय. भोपाळ संस्थानचा प्रस्थापक दोस्त महंमद हा औरंगझेब बादशहाच्या अर्धशतकाच्या लांब कारकीर्दीतील शेवटच्या अंदाधुंदीच्या व गडबडीच्या काळांत अफगाणिस्थानांतून हिंदुस्थानांत येऊन त्यानें दिल्लीस लष्करीपेशा पत्करला. ज्याप्रमाणें मारवाडांतील मारवाडी आपला लोटा, रशी, मारवाडी कावा व मारवाडी काटकसर इतक्या पुंजीवर पांचपंचवीस वर्षांत लक्ष्मीपति बनतो, त्याप्रमाणेंच दोस्त महंमद आपली ढाल, तरवार, काबुली धाडस व काबुली धोरण इतक्या सामुग्रीवर पंचवीस तीस वर्षांत भोपाळचा भूपति बनला. लष्करी पेशांत कांहीं काळ काढल्यावर दोस्त महंमदानें एका जिल्ह्याचा कारभार एका जमीनदाराकडून आपल्या हातीं घेतला व हळू हळू त्या भागाचा तो मालक झाला. त्यानें रजपूत राजांच्या भांडणांत शिरून मुलुख मिळविण्याचा सपाटा चालविला. प्रथमतः त्यानें इसलामपूर (भोपाळपासून सहा मैलांवर असलेलें गांव) आपलें ठाणें केलें. तेथून त्यानें भिलशाच्या ठाणेदारावर हल्ला करून त्याचा मुलुख काबीज केला. सन १७२० मध्यें दोस्त महंमदाचें व हैदराबादच्या निजामाचें वैमनस्य आलें. पण लवकरच त्यानें यार महंमद नांवाच्या आपल्या अनौरस पुत्रास ओलीस ठेवून निजामशीं सख्य करून घेतलें. सन १७२२ मध्यें त्यानें भोपाळ हें आपल्या राजधानीचें ठिकाण ठरवून त्याच्या संरक्षणार्थ त्यानें फत्तेगड हा किल्ला बांधविला व तो आपल्याला नबाब म्हणवूं लागला. १७२३ मध्यें

दोस्त महंमद वारला. पण त्यानें पंचवीस वर्षांत वीसपंचवीस लाखांचें संस्थान निर्माण केलें. त्याच्या मरणानंतर त्याचा औरस पण अज्ञान पुत्र महमदखान गादीवर आला. पण हैदराबादेहून सुटून आल्यावर यार महंमद यानें गादी बळकावली. याच सुमारास बाजीराव पेशवे यांनीं उत्तरहिंदुस्थानावर स्वारी केली. त्या स्वारींत भोपाळचा अर्धा अधिक भाग बाजीरावानें काबीज केला. यार महंमदामध्यें बापाचे गुण नव्हते व त्याचे कारकीर्दींत संस्थान संपुष्टांत आलें होतें. पण यार महंमद १७५४ मध्यें वारल्यावर त्याची मासुल्ला ह्मणून एक बायको होती, तिनें संस्थानचा सर्व कारभार आपल्या हातीं घेतला. ही बाई फार धोरणी, हुषार व दयाळू स्वभावाची होती. तिला माजीसाहेब असें म्हणत असत. कित्येक ग्रंथकारांनीं तिची अहिल्याबाईशीं तुलना केलेली आहे व ती यथार्थही आहे. तिच्या देखरेखीखालीं भोपाळ संस्थान सुमारें पन्नास वर्षें होतें.

यार महंमदाचे मुलगे फैज महंमद, याशीन महंमद व हयात महंमद असे होते. ते तिघेही एकामागून एक गादीवर आले. पण ते कारभारांत लक्ष घालीत नसत. सर्व कारभार मासुल्लाच्या देखरेखीखालीं प्रधानामार्फत चाले. यांपैकीं छोटेखान प्रधान फार कर्तबगार होता. १७७८ मध्यें कर्नल गाडर्ड हा बंगाल्याहून मुंबईस येत असतां त्याला भोपाळच्या गादीनें दाणा गल्ल्याची व इतर सामानाची फार मदत केली; तेव्हांपासून इंग्रज सरकार व भोपाळ संस्थान यांचें सख्य सुरू झालें व त्यामुळेंच भोपाळ संस्थान हें आजतागायत टिकलें. कारण नागपुरकर भोसले व शिंदे यांच्या मुलखाच्या दरम्यान हें संस्थान असल्यामुळें त्या दोघांनीं त्याचा नायनाट करण्याचा घाट घातला होता. पण दोस्त महंमदाच्या वंशांतील वजीरखान नांवाच्या प्रधानाच्या शौर्यानें संस्थान वांचलें. भोपाळ शहराला नऊ महिने वेढा पडला असतां वजीरखानानें मोठ्या धैर्यानें शहराचें संरक्षण केलें त्यामुळें व शिंद्याच्याच मुलखांत गडबड सुरू झाल्यानें त्यांना भोपाळचा वेढा उठवावा लागला. यानंतर लवकरच भोपाळचा अधिपति नाझर महंमद यानें सन १८१७ मध्यें इंग्रज सरकारशीं कायमचा तह केला, व पेंढाऱ्यांची पीडा काढून टाकण्यांत इंग्रजांस मदत केली. नाझर महंमदास मुलगा नव्हता.

शिकंदर या नांवाची एक मुलगी होती, ही गादीवर आली आणि नाझर-ची बायको कुडशिया ही कारभार पाहूं लागली. कुडशिया बेगम ही बाई भोपाळच्या माजीसाहेबाप्रमाणेंच फार धोरणी व हुषार होती; परंतु फार महत्त्वाकांक्षी होती. तिला सर्व कारभार आपल्या हातांत पाहिजे होता. आपली मुलगी शिकंदर बेगम किंवा तिचा नवरा यांचेकडे तो अधिकार जाऊं नये, असें तिला वाटे. पण शिकंदर बेगम मोठी झाल्यावर तिनें आपल्या आईकडून कारभार काढून स्वतःच्या हातीं घेतला. हिनें आपल्या कारकीर्दींत भोपाळची अंतर्व्यवस्था उत्तम लाविली. ही बेगम १८५७ चे बंडांत इंग्रज सरकारच्या फार उपयोगी पडली. ह्मणून बंडांत खालसा केलेला भैरसिया प्रांत इंग्रज सरकारनें शिकंदर बेगमेस दिला व तिचा मोठा बहुमान केला. शिकंदर बेगम सन १८६८ मध्यें मरण पावली, व तिच्या मागून तिची एकुलती एक मुलगी शहाजहान बेगम गादीवर आली. हिनेंहि आपल्या आईप्रमाणेंच संस्थानचा कारभार उत्तम तऱ्हेनें चालविला. ती सन १९०१ मध्यें वारली व हल्लींच्या नबाब सुलतान शहान बेगम-साहेब यांना संस्थानचा अधिकार मिळाला. या बेगमसाहेब चांगल्या सु-शिक्षित असून त्यांनीं संस्थानांत शिक्षणादि बाबतींत फार सुधारणा घड-वून आणलेल्या आहेत.

वर सारांशानें दिलेल्या भोपाळ संस्थानच्या इतिहासांत एक विलक्षण गोष्ट दिसून येते ती ही कीं, या संस्थानच्या शेंदोनशें वर्षांच्या काळांत पांच उत्तम मुत्सद्दी, धोरणी, राजकार्यधुरंधर अशा बायका उदयास आल्या व त्यांनीं संस्थानाची भरभराट करून दाखविली. बायकांच्या कर्तबगारीचें, त्यांच्या बुद्धिमत्तेचें व त्यांना प्रसंग आणि संधि मिळाल्यास त्यांच्या हातून काय होईल, याचें जर प्रमाण द्यावयाचें असेल, तर भोपाळ संस्थानच्या इतिहासाकडे बोट दाखविलें म्हणजे पुरे.



२

साची-भिलसा-उदयगिरी.

ज्याप्रमाणें भोपाळला आम्ही आमच्या स्नेह्यामार्फत तजवीज केली होती, त्याप्रमाणेंच भिलसा येथेंही आम्ही तेथल्या सरसुभ्यांना ओळखीचें एक पत्र घेतलें होतें. भोपाळहून तावडतोब निघण्याचा बेत झाल्यामुळें मी सरसुभेसाहेबांना आमच्या निघण्याबद्दल तार केली, आणि दोन तासांनीं म्हणजे दिवसां चारांच्या सुमारास आम्ही भोपाळहून निघालों.

भोपाळपासून भिलसा हा सुमारें दोन तासांचाच रस्ता आहे. अर्थात आम्हीं भिलसा स्टेशनावर दिवसा उजेडींच आलों. स्टेशनवर सरसुभेसाहेबांचा माणूस आला असावा, अशी माझी अटकळ होती; पण तेथें आमची कोणी विचारपूस केली नाहीं. तेव्हां 'येथें कोठें सराई किंवा धर्मशाळा आहे किंवा काय,' ह्मणून स्टेशनमास्तरजवळ चौकशी करूं लागलों व माझे बंधु सामान आणण्याच्या तजविजीला लागले.

इतक्यांत गाडीहि पुढें निघून गेली, व एका गृहस्थांनीं माझ्या बंधूंना 'आपण भाटे का?' ह्मणून हटकलें.

त्यांनीं 'होय' असें उत्तर देतांच ते गृहस्थ ह्मणाले, "सरसुभेसाहेबांना आपली आलेली तार त्यांनीं मला आतांच दिली. ते कांहीं कामाकरितां लष्करला जात आहेत. ह्मणून आपली सर्व सोय करण्यास त्यांनीं मला सांगितलें आहे, तरी आपण चलावें."

त्यांच्या या भाषणानें आमची उतरण्याची काळजी दूर झाली. हमालाच्या डोक्यावर सामान देऊन त्या गृहस्थांबरोबर आम्ही त्यांच्या बिऱ्हाडीं गेलों. असो.

भिलसा हें ग्वाल्हेरसरकारचें जिल्ह्याचें ठिकाण आहे. गांवापासून दूर व रेलवेलाईनच्या पलीकडे सरसुभ्याची कचेरी व इतर सरकारी कचेऱ्या आहेत. अंमलदारांना राहण्याकरितां तिकडेच बंगले आहेत. अर्थात् आह्मी अशा एका बंगल्यांत गेलों.

ज्या गृहस्थांनीं आह्मांला आपल्याबरोबर नेलें, त्यांनीं आमची तजवीज उत्तम ठेविली होती. आमचा बराच वेळ इकडल्या तिकडल्या गप्पा मारण्यांत गेला. हे गृहस्थ बरेच बोलके असल्यामुळें साहजिकच त्यांनीं आपल्या घराण्याची हकीकत आह्मांला सांगितली. हे गृहस्थ ग्वाल्हेरच्या प्रसिद्ध आपटे नांवाच्या सरदार घराण्यापैकीं होते. हे स्वतः एल्. एल्. बी. उपपदधारी होते; व त्यांनीं ग्वाल्हेर संस्थानांत बरींच वर्षे नोकरी केली होती. भिलशाला त्यांची बदली नुकतीच झाली असल्यामुळें त्यांना या भागाची फारशी माहिती नव्हती. त्या गृहस्थांच्या बोलण्यावरून या सरदार घराण्यावर शिंदे सरकारची फार मेहेरनजर दिसली. या घराण्यांत दुसऱ्या बाजीरावाची मुलगी दिलेली असून ती फार वर्षे जगली होती असें आम्हांस कळलें.

गप्पागोष्टी झाल्यावर आमचें जेवणखाण आटोपलें व रात्रीची विश्रांति घेण्याकरितां आम्ही निद्रादेवीची आराधना करूं लागलों, आणि तीहि आमच्या सबंध दिवसाच्या श्रमांमुळें आमच्यावर ताबडतोब प्रसन्न झाली, हें सांगावयाला नकोच.

रात्रींच्या बोलण्यांत आमचें असें ठरलें होतें, कीं, पहांटेला उठून साची—हें भिलशापासून पांचसात मैल असून भिलशाअलीकडचेंच पहिलें स्टेशन आहे—पाहून येऊन चारांच्या गाडीनें परत फिरावें. आपटेसाहेबांनीं आपला एक शिपाई आमच्याबरोबर दिला होता. साची गांवांत जमल्यास व वेळ असल्यास स्वयंपाक करतां यावा म्हणून आम्ही आपला कुकर व स्टव्ह घेतला होता; जेवण करण्याचें न जमल्यास निदान त्या गांवांत दूध मिळवून स्टव्हवर चहा करून वेळ भागवून न्यावी असें आम्ही मनांत ठरविलें होतें, व म्हणून आपटेसाहेबांचे घरून फराळाचें घेण्याचे भानगडींत आम्ही पडलों नाहीं.

ठरल्याप्रमाणें आम्ही पहांटेला उठलों, व स्टेशनवर आलों. सुमारें अर्ध्या तासाच्या आंत गाडी स्टेशनवर आली, व आम्ही गाडींत बसलों. बसल्यापासून वीसपंचवीस मिनिटांत साची स्टेशनवर उतरलों. स्टेशन-मास्तर तेव्हां तेथें नव्हते. कारकुनाजवळ चवकशी करतां साचीची टेकडी फारच जवळ आहे, व थोड्याच वेळांत जाऊन परत येतां येईल, असें समजलें. आमची हँडबॅग व कुकर स्टेशनमास्तरच्या खोलींत ठेवण्याची परवानगी मिळवून, व तें सामान तेथें ठेवून आम्ही वाट चालूं लागलों.

स्टेशनांतून बाहेर आल्यावर लवकरच साचीस येणाऱ्या युरोपियन प्रवाशांच्या सोयीसाठीं बांधलेला सरकारी डाकबंगला उजव्या बाजूस लागतो. हा सर्व भाग बराच हिरवागार आहे. सभोंवार लहानलहान टेकड्या आणि त्यांवर भुरटें रान अशी या भागाची ठेवण आहे. साची टेकडीहि फारशी मोठी नाहीं. आम्हांला ती पुण्याच्या पर्वतीच्या टेकडीपेक्षांहि लहान वाटली.

थोड्याच वेळांत आम्ही ही लहानशी टेंकडी चढूं लागलों. येथपर्यंत फक्त पायवाट होती. इतकें चढल्यावर आपल्याला समोरच साची गांव दिसूं लागतें व उजव्या हाताला एक लहानसा तलाव लागतो. येथें रस्ता उजव्या बाजूस वळतो व वळल्यापासून रस्ता पायऱ्या बांधून केलेला आहे. कांहीं पायऱ्या खडकांतच खोदलेल्या होत्या, व कांहीं तेथें विपुल असलेल्या तांबड्या दगडाच्या होत्या. टेकडीच्या माथ्याजवळ आम्ही जाऊं लागलों, तेव्हां त्या सर्व पठारासभोंवतीं सारखा तट आहे असें दिसून आलें. तटाच्या दारांतून आंत प्रवेश केल्याबरोबर जिकडे तिकडे स्तूप, विहार, मंदिरें, उंच खांब, पडक्या इमारती व त्यांचे अवशेष इत्यादि वास्तुकलेचे मासले एक-समयावच्छेदेंकरून दृग्गोचर झाले. या पठारावर एकावर एक अशा मजग्या आहेत. या पठारावर एकंदर लहान मोठ्या मिळून पन्नासांवर प्रेक्षणीय इमारती आहेत. त्या सर्व सावकाशपणें पाहणें आम्हांला शक्य नव्हतें. जे मुख्यमुख्य वास्तुकलेचे मासले आम्ही पाहिले त्यांचें थोडक्यांत यथाक्रम वर्णन करूं. अर्थात् पहिली पहावयाची वस्तु म्हणजे साचीचा स्तूप. तटांतून आंत शिरल्यावर हाच स्तूप प्रथमतः दृष्टि आकर्षून घेतो.

पहातां पहातां आम्ही त्या स्तूपाच्या एका तोरणाजवळ आलों. हीं तोरणें चार दिशांना चार आहेत, व या तोरणांची मौज ही आहे, कीं, हीं पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण या खऱ्या दिशा साधून बरोबर बांधलेलीं आहेत. हीं तोरणें ह्मणजे स्तूपाला जमिनीवरून घालावयाच्या प्रदक्षिणा-मार्गाच्या सभोंवतालच्या कठड्याच्या आंत प्रवेश करण्याचीं प्रवेश-द्वारेंच होत. हीं पोरबंदरी दगडासारख्या पांढऱ्या दगडांचीं बनविलेलीं आहेत. हे दगड उदयगिरीवर व आसपास पुष्कळ आहेत. स्तूप साचीला सांपडणाऱ्या तांबड्या दगडांनीं बनविलेला आहे. तोरण दोन चौरस खांबांचें केलेलें असून त्यांमध्यें सुमारें सात फूट अंतर आहे, व खांब बारा फूट उंच आहेत. खांबांवर चार फूट उंचीचें चौरस दगडाचें उथाळें आहे, व त्यावर चार बाजूंना निरनिराळ्या प्राण्यांचीं चित्रें आहेत. दोन तोरणांच्या खांबांवर हत्तींचीं चित्रें आहेत, तिसऱ्यावर सिंहाचीं चित्रें आहेत, व चवथ्यावर खुज्या माणसांचीं चित्रें आहेत. या मूर्ति फार हुबेहुब आहेत. त्यांचें कोरींव काम दोन हजार वर्षांनंतरसुद्धां अगदीं रेखलेलें दिसतें. या उथाळ्यांवर दगडाचीं आडवीं बहालें टाकून एकावर एक असे तीन मजले केले आहेत. खांबांच्या बाजूंवर व तोरणांच्या बहालांवर जिकडे तिकडे इतकीं चित्रें, लेख व इतर कमळांसारखें सौंदर्यपोषक खोदीव काम केलें आहे, कीं, हीं चार तोरणें ह्मणजे साची येथील एक अपूर्व देखावा आहे; इतकेंच नाहीं, तर सर्व हिंदुस्तानांत इतकें खोदीव काम केलेलीं प्रवेशद्वारें फारच थोड्या ठिकाणीं असतील.

मनुष्याला थक्क करून टाकणाऱ्या या प्रवेशद्वारांतून आंत गेल्याबरोबर बुद्धाची, व त्याच्या मुख्य शिष्यांच्या प्रशांत व सत्त्वधीर मूर्ति दृग्गोचर होतात. या मूर्तींना नमस्कार करून मनुष्य स्तूपाच्या चबुतऱ्यावर दगडी जिन्यानें चढूं लागतो. हा चबुतरा चौदा फूट उंच आहे, व सुमारें पांच फूट सोडून स्तूपाचा घुमट सुरू होतो. या चबुतऱ्यांवरील पांच फुटांच्या वाटेनें स्तूपाला प्रदक्षिणा करतां येते. बुद्धाच्या अवशेषाची पूजा करणाऱ्या लोकांना प्रदक्षिणा घालण्याकरितां ही वाट ठेवलेली आहे. या वाटेनें चाललें म्हणजे स्तूपाच्या रचनेची चांगली कल्पना होते.

या स्तूपाच्या मध्यभागीं दगडी पेटींत बुद्ध व त्याचे मुख्य शिष्य यांचे सांपडलेले दांत आणि शरीराच्या हाडांचे भाग किंवा त्यांच्या शरीरांची राख वगैरे स्मारकें ठेवण्याची चाल असे, व त्यावर मातीचा अर्धवर्तुलाकार घुमट करून त्यावर दगडी भिंत घालीत, आणि त्यावर चुन्याचा गिलावा करीत. स्तूपाचा बराच गिलावा आतां पडून गेला आहे, व पुष्कळ ठिकाणीं नव्या दगडांनीं घुमटाचा भाग भरून काढला आहे. पण दोन हजार वर्षें पाऊस, थंडी, वारा आणि उष्णता वगैरे नाशक कारणांना न जुमानतां हा चुन्याचा पातळ गिलावा राहिला कसा, याचें आह्मांला राहून राहून आश्चर्य वाटत होतें, व त्या काळच्या कलांच्या आणि ज्ञानाच्या प्रगतीचें अभिमानपूर्वक कौतुक वाटत होतें.

सर्व स्तूपाच्या भोंवतीं दोन फेऱ्या घालून आम्ही खालीं उतरलों, व बौद्ध लोकांच्या वास्तुकलेचा अपूर्व मासला जो सुंदर कठडा, व तोरणें हीं बारकाईनें पाहूं लागलों. हा कठडा सुंदर पांढऱ्या दगडांचा केलेला आहे. या कठड्याचे खांब अष्टपैलू असून सुमारें दहा फूट उंच व दोन फूट जाड आहेत, व ते अडीच अडीच फुटांच्या अंतरानें बसविलेले आहेत. स्तूपाभोंवारचा हा कठडा लंबवर्तुलाकार केलेला आहे. या खांबांच्यावर कलाकुसरीचें उत्तम काम केलेलें आहे. खांबांच्या मधल्या अंतरामध्यें तीन तीन लंबवर्तुलाकार दोन दोन फुटांचे दगड या खांबांत तशाच खोबण्या करून त्यांत बसवून दिले आहेत; व खांबांच्या माथ्यावर तीन तीन खांबांवर एक अशीं दगडाचीं वहालें घातलेलीं आहेत. हा कठडा प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज त्याच्या सौंदर्याची कल्पना होणें शक्यच नाहीं.

अशा तऱ्हेचे सुंदर कठडे व तोरणें आम्ही आजपर्यंत पाहिलीं नसल्यामुळें आह्मांला तीं पाहून फारच आश्चर्य वाटलें. आम्ही बुद्धाच्या अनुयायांनीं बांधलेलीं दक्षिणेंतील पुष्कळ लेणीं पाहिलीं होतीं. त्यांवरून बौद्धाच्या वास्तुकलेची व मूर्तिकलेची चांगली कल्पना आम्हांला होती; पण तीं लेणीं खडकांत खोदलेलीं असल्यामुळें कठडा व तोरणें यांचा त्यांत मासला आलेला नव्हता; पण साची येथील बौद्धधर्मीयांच्या इमारती सपाट पठारावर बांधलेल्या आहेत, व त्यांत हा कठडा व तोरणें म्हणजे

एक अद्वितीय चीज होय. तोरणाच्या व कठड्याच्या पुष्कळ खांबांवर मूर्तिचित्रें व लेख कोरलेले आहेत.

या खांबावर व इतर दगडांवर जीं चित्रें खोदलीं आहेत त्यांचे एकंदर पांच वर्ग करितां येतील. पहिल्या वर्गांत गौतमबुद्धाच्या आयुष्यांतील प्रसंगाचीं व अशोकाच्या कारकीर्दीतील गोष्टीचीं चित्रें येतात. बुद्धाच्या जन्माचें चित्र म्हणजे बुद्धाची आई माया ही कमलावर बसलेली व तिच्या दोन्ही बाजूंला दोन हत्ती जणूकांहीं नूतन जन्मलेल्या बालकावर अभिषेक करीत आहेत असा देखावा आहे. बुद्धगया येथील अश्वत्थवृक्षाखालीं बसलेला असतांना बुद्धाला पूर्ण बोध झाला. या प्रसंगाचें निदर्शक चित्र साची येथें पिंपळाच्या वृक्षाखालीं सिंहासन काढून केलेलें आहे. बुद्धानें वाराणाशी येथें प्रथमतः आपल्या धर्मांचा उपदेश मृगवनांत केला. या उपदेशाचें विशिष्ट नांव धर्मचक्रप्रवर्तन असें होतें. यावरून चक्र हें बुद्ध-धर्माची मोठी खूण झाली. सिंहासनावर बसविलेल्या धर्मचक्राचीं पुष्कळ चित्रें साचीच्या खांबांवर आहेत. बुद्धाच्या आयुष्यांतील शेवटला प्रसंग म्हणजे त्याच्या महानिर्वाणाचा.याचें निदर्शन स्तूपाच्या चित्रांनीं केलेलें आहे.

सांचीच्या कामांत दिसून येणाऱ्या खोदीव चित्राचा दुसरा वर्ग म्हणजे यक्षयक्षीणींचीं चित्रें होत. या चित्रांचें कामही उच्च दर्जाचें आहे. तिसरा वर्ग प्राणी चित्रांचा होय. खऱ्या व काल्पनिक प्राण्यांचीं चित्रें पुष्कळच आहेत. त्यांतील खऱ्या प्राण्यांचीं चित्रें फार हुबेहुब आहेत. विशेषतः सिंह व हत्ती या जनावरांचीं चित्रें फार उत्तम साधलेलीं आहेत. चित्रांचा चवथा वर्ग म्हणजे वृक्ष पानें फुलें इत्यादि वनस्पतिसृष्टींतील वस्तूंच्या चित्रांचा होय. साची येथील चित्रांत हीं चित्रें फारच उच्च दर्जाचीं आहेत व त्यांची विविधताही वाखाणण्यासारखी आहे. त्यांतल्यात्यांत द्राक्षांच्या वेलांचीं चित्रें निरनिराळ्या जातीच्या कमळांचीं चित्रें व त्यांचीं पानें व वेली यांचीं खोदीव चित्रें फारच सुबक साधलेलीं आहेत. या लतावेलां-वर व वृक्षांवर मधून मधून मनुष्यें बसलेलीं दाखविलीं आहेत. या जातीं-च्या चित्रांचा उत्तम मासला पश्चिमद्वाराच्या उजव्या खांबावर आहे. हें खोदीव काम हिंदूमूर्तिकलेच्या उच्च दर्जाची उत्तम साक्ष पटवील असें

आहे. पांचव्या वर्गांत जातककथांचीं चित्रें येतात. येथील तोरणाच्या खांबावर व बहालावर अशा किती तरी कथा खोदीव मूर्तींच्या योगें कथन केल्या आहेत. कांहीं कांहीं कथांचे दोनदोन भिन्नभिन्न चित्रपट आहेत. उदाहरणाकरितां च्छदंत जातक घेऊं. या कथेचा चित्रपट दक्षिण तोरणाच्या मधल्या बहालावर आहे व पश्चिम तोरणाच्या खालच्या बहालावर आहेत. दोन्हीही चित्रपट मूर्तिकलेचे उत्तम मासले आहेत. पण दक्षिण तोरणावरील चित्रपटांत कारागिराची जास्त प्रतिभा व कल्पकता दिसून येते; तर पश्चिम तोरणावरील चित्रपटांत जास्त कौशल्य व सफाई दिसून येते. जातककथा थोडक्यांत अशी आहे.

बोधिसत्वानें (पूर्वजन्मांतील बुद्ध) एकदां हत्तीच्या कळपाचा राजा या रूपानें जन्म घेतला. त्या राजहत्तीला सहा दांत होते व त्याची उंची ही प्रचंड होती. तो हिमालयांतील च्छदंत नांवाच्या सरोवरानजीक एका वडाच्या झाडाखालीं रहात असे. त्याला च्छूल्लसुभद्रा व महासुभद्रा या नांवाच्या दोन बायका होत्या. च्छूल्लसुभद्रा महासुभद्रेचा हेवा करूं लागली. व तिनें आपला पुनर्जन्म होऊन आपण वाराणशीच्या राजाची पट्टराणीं व्हावें म्हणजे आपल्या हल्लींच्या पतीला मारून महासुभद्रेचा सूड घ्यावयास सांपडेल अशी देवाची प्रार्थना केली. तदनुरूप ती वाराणशीच्या राजाची पट्टराणी झाली. नंतर तिनें आपल्या राज्यांतील सर्व शिकारी लोक बोलाविले व त्यांपैकीं सोनुत्तर नांवाच्या शिकाऱ्याला पसंत करून त्याला षड्दंत राजहत्तीला मारण्याकरितां च्छदंत सरोवराकडे पाठविलें.

राजहत्ती आपल्या कळपासह चालला आहे. राजहत्तीवर इतर हत्तींनीं छत्री व चौरी धरलेली आहे व खडकाआड लपलेला सोनुत्तर बाण मारण्याची तयारी करीत आहे असा या चित्रपटावर देखावा आहे. वडाचें झाड, कमलामधून चाललेला हत्तींचा कळप वगैरे देखावा फार सफाईनें खोदलेला दिसतो.

स्तूप व त्या सभोवारचा कठडा व तोरणें पाहून झाल्यावर आम्हीं दक्षिण प्रवेशद्वाराजवळ असलेला मोठ्या स्तंभाचा अवशेष पाहिला. हा स्तंभ अशोकानें आपल्या धर्माच्या आज्ञा त्यावर खोदून उभारलेला होता.

स्तंभ मोडलेला आहे पण त्याचे मोडके तुकडे शेजारींच पडलेले आहेत. सबंध असतांना तो बेचाळीस फूट उंच होता व त्याच्या माथ्यावर पाठीला पाठ लावून चार सिंहाचीं चित्रें होतीं. हीं मोडकीं चित्रें शेजारच्याच एका देवळाजवळ पडलेली आहेत. मुख्य स्तूपाच्या तोरणाजवळ व त्याच्या आसपास पडकीं देवळें दृग्गोचर होतात व बुद्ध भिक्षूंना राहण्याकरितां बांधलेले पडके विहार दृष्टीस पडतात.

हा स्तूप गौतमबुद्धाच्या निधनानंतर लवकरच बांधलेला असावा, असें त्यांतील शिलालेखांवरून ठरविण्यांत आलेलें आहे. या स्तूपांत गौतमबुद्धाच्या पट्टशिष्यांचीं स्मारकें सांपडलीं आहेत, त्यांवरून या स्तूपाचें प्राचीनत्व दिसून येतें. या स्तूपासभोंवारचा सुंदर कठडा व तीं सुंदर तोरणें हीं मात्र मागून बांधलेलीं असावीं, असेंहि शिलालेखांवरून शाबीद झालेलें आहे. या प्रचंड स्तूपाच्या चारहि बाजूंना लहान लहान आणखी चार स्तूप होते; पण आतां ते पार पडलेले आहेत. त्यांच्या ऐवजीं नव्या दगडांनीं बनविलेला एक नवा स्तूप दिसत होता. यावरून पूर्वीं घुमटावरहि एक कठडा असून वर एक छत्रीसारखें दगडी छत्र होतें, असें दिसतें.

या स्तूपाच्या आसपास किती तरी मोडलेल्या खांबांचे तुकडे, कठड्याचे तुकडे, फुटलेल्या मूर्ति वगैरे हजारों वास्तुकलेच्या चिजा पडलेल्या आहेत. या स्तूपाच्या शेजारींच एक दगडी देऊळ आहे. हें बुद्धधर्माच्या र्‍हासानंतर हिंदुराजांनीं बांधलेलें आहे. बुद्धकालाच्या चैत्यविहाराचा सभामंडप मोडक्या स्थितींत पडलेला आहे. या मंडपाचे प्रचंड खांब पाहून मन थक्क झाल्याखेरीज रहात नाहीं. खांबाचा एक एक दगड बारा बारा फूट लांबीचा आहे.

साचीच्या टेंकडीवर सारखा पठार आहे, व या सर्व पठारभर जिकडे तिकडे इमारतींचे अवशेष जागोजाग दृष्टीस पडतात. यावरून या ठिकाणीं पुष्कळ वसती असली पाहिजे, असें अनुमान करतां येतें. या पठाराच्या बरेंच खालीं उतरल्यावर आणखी एक स्तूप लागतो. हा स्तूपहि बराच पुरातन असून त्याचें कामहि मुख्य स्तूपासारखें आहे. पण त्याला प्रवेश-

द्वाराचीं तोरणें नाहींत, व याचा आकारहि वरच्या स्तूपापेक्षां थोडा लहान आहे.

हा स्तूप पाहून आम्हीं पुनः वर टेंकडीवर आलों, व सांची टेंकडीवरील बौद्धधर्मीयांच्या वास्तुकलेच्या त्या प्रचंड स्मारकांकडे पुनः एकदां दृष्टि फेंकून आम्हीं आल्या वाटेनें परतलों.

आतां सुमारें दहा वाजले होते. स्टेशनवर आलों तेव्हां स्टेशनमास्तर आम्हांला भेटले. त्यांनीं आमची विचारपूस केली, व '**मनोरंजनां**' तील प्रवासवृत्त लिहिणारे या नात्यानें माझी ओळख त्यांना पटली. मास्तरसाहेब स्टेशनावर रहाणाऱ्या नेहमींच्या मास्तरांसारखे नव्हते. त्यांनीं आह्मांला जेवून जाण्याचा आग्रह केला, व या आग्रहाचें पूर्वचिन्ह ह्मणून गरम चहा आमच्याकरितां आपल्या घरून आणविला. आम्हींहि भुकेनें व्याकुळ झालेले होतों, तेव्हां फारसे आढेवेढे न घेतां त्यांचा पाहुणचार स्वीकारण्याचें आम्हीं कबूल केलें, व जवळच असलेल्या विहिरीवर स्नानें करून मास्तरसाहेबांच्या बिऱ्हाडीं भोजनाला गेलों.

भोजन झाल्यावर आम्हीं परत स्टेशनवर आलों, तों बारांचा सुमार झाला होता. गाडी चार वाजतां होती. आतां येथें बसून काय करावयाचें, असा विचार करून 'एकादी मालगाडी किंवा रोडव्हॉन आली, तर आमची भिलशाला रवानगी करा,' अशी आम्हीं मास्तरसाहेबांना विनंति केली, व ती त्यांनींहि कबूल केली. आम्हीं रोडव्हॅननें भिलशाला सुमारें एक वाजतां परत आलों.

आतां या ठिकाणीं सांचीच्या इतिहासाकडे थोडी नजर देणें वावगें होणार नाहीं. त्यायोगें सांचीच्या वस्तुकलेच्या उदयावर प्रकाश पडेल. या इतिहासाचे तीन भाग होतात.

पहिला भाग अशोकापासून दुसऱ्या चंद्रगुप्तानें क्षत्रपअंमलाचा नायनाट करीपर्यंतचा म्हणजे सन ४०० पर्यंतचा. दुसरा गुप्ताच्या अंमलापासून हर्षाच्या कारकीर्दीपर्यंतचा व तिसरा मुसलमानांच्या आगमनापर्यंतचा.

सांचीचें जुनें नांव काकनाद होतें असें शिलालेखावरून दिसतें; पण तें वाङ्मयांत आलेलें नाहीं. पण बुद्धवाङ्मयांत सांची हें चेतीयगिरि या

नांवानें ओळखलें जात असें. सिलोनमधील बुद्धधर्मीय इतिहासांत असें लिहिलें आहे कीं, अशोक हा युवराज असतांना उज्जयनीला राजप्रतिनिधि म्हणून जात असतां तो विदिशा नगरींत राहिला. तेथें त्यानें एका श्रेष्ठीच्या देवी नांवाच्या मुलीशीं लग्न केलें. तिच्यापासून त्याला उज्जेनीय व महेन्द्र असे दोन मुलगे व संघमित्रा नांवाची मुलगी झाली. अशोक राज्यावर बसल्यावर त्यानें महेन्द्राला लंकेस धार्मिकप्रसाराकरितां पाठविण्याचें ठरविलें. तेव्हां तो आपल्या आईस भेटण्याकरितां चेतीयगिरीस आला व तेथें त्याला त्याच्या आईनें बांधाविलेल्या मोठ्या एका विहारांत ठेवण्यांत आलें होतें. ही लंकेंतील बुद्धधर्मीय इतिहासांतली गोष्ट खरी मानल्यास चेतीयगिरि म्हणजे सांची असावी असें म्हणावें लागतें. कारण या सर्व प्रदेशांत सांचीस अशोकाचा स्तंभ व मौर्यकालीन वस्तु सांपडल्या आहेत. ही गोष्ट सर्वस्वीं खरी असो वा नसो इतकें खरें कीं, अशोकाच्या कारकीर्दींत सांचीस बुद्धधर्माच्या अनुयायांनीं संघ स्थापला व या संघावर अशोकाचें प्रेम होतें. म्हणून अशोकानें आपल्या धर्माच्या आज्ञा खोदलेला एक स्तंभ व स्तूप साचीस बांधला. अशोकाचें सर्व आयुष्य आपल्या धर्माच्या प्रसारांत गेलें. अशोक खिस्ती सनापूर्वीं २३२ या वर्षीं वारला. त्याचे पश्चात् मौर्य साम्राज्य मोडकळीस आलें व मगधाचें राज्य सुंगराजाच्या हातीं आलें. याचा प्रस्थापक पुष्यमित्र हा राजा होता. त्याचा मुलगा अग्निमित्र हा राजप्रतिनिधि म्हणून विदिशा राजधानींत राज्य करूं लागला. या सुंगराजाच्या कारकीर्दींत सांचीच्या मुख्य स्तूपाला हल्लीं असलेल्या दगडी कामाची जोड झाली. तसेंच दुसरा व तिसरा स्तूप बांधण्यांत आला. या काळची शिल्पकला व मूर्तिकला अझून पूर्णावस्थेंत आली नव्हती.

सुंगाची सत्ता खिस्तीशकापूर्वीं सत्तर वर्षांच्या सुमारास अस्तास गेली. त्यानंतर माळव्यांत आंध्र राजे झाले व त्यांच्या कारकीर्दींत सांचीचीं अपूर्व तोरणें व कठडे बांधण्यांत आले. या काळीं शिल्पकला व मूर्तिकला अपूर्व उच्च दर्जाला येऊन पोचली होती असें दिसतें. आंध्रांनंतर माळवा सन ४०० पर्यंत क्षत्रपांच्या ताब्यांत होता. पण क्षत्रपांचा पराभव करून माळव्यावर गुप्त घराण्याच्या राजांनीं अंमल बसविला. गुप्तांचें साम्राज्य दीडशें वर्षें

टिकलें. याच काळांत बुद्धधर्माचा पाय मागें जाऊन हिंदूधर्माचें पुनरुज्जीवन होऊं लागलें. या हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाच्या काळचीं कांहीं देवळें सांचीस आहेत. पण गुप्तकाळांत विदिशा नगरीचा नायनाट झाला व बुद्धधर्माच्या अवनतीमुळें सांचीची वस्ती नाहींशी होऊन सांची हें ठिकाण नामशेष झाल्यासारखें झालें. तें एका बाजूस असल्यामुळें मुसलमानांच्या स्वाऱ्यांपासून तेथल्या बुद्धकालीन वास्तुकलेचे मासल्यास इजा न होतां ते तसेच राहिले व ह्मणून ते आजतागाईत प्रवाशांच्या आनंद व आश्चर्य या मनोविकारांना उद्‌भूत करण्यास समर्थ आहेत. कालानें या अपूर्व कारागिरीच्या कामावर पडलेला मातीचा गाळ दूर करून या बुद्धकालीन शिल्पकलांच्या अवशेषाचें वैभव पुन्हां जगाच्या निदर्शनास आणण्याचें काम इंग्रजी अंमलांत इंग्रज पुराणवस्तुसंशोधनकारांनीं केलें आहे. ह्मणून हें स्थान आतां प्रेक्षणीय स्थानांत अग्रगण्यत्व पावलें आहे. असो.

सांची पाहून येण्यांत आमचा सबंध दिवस मोडेल, असा आह्मी अदमास केला होता, व ह्मणून भिलशाला दोन दिवस काढावयाचे, असा आमचा बेत होता. पण वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें अर्ध्या दिवसांतच आमचें काम झाल्यामुळें या मुक्कामांत एक दिवस वांचविण्याचा आम्ही विचार केला. कारण, आह्मांला अटकेकडे जाण्याची उतावळी होती. म्हणून आह्मी उदयगिरि, बेसनगर व भिलसा हीं दोनप्रहरीं पाहून पहांटेच्या गाडीनेंच पुढें प्रयाण करण्याचा बेत केला, व तो आह्मी सरदार आपटे यांना सांगितला. त्यांनीं आमच्याबरोबर आपला एक मनुष्य दिला, व दोनप्रहरचा चहा झाल्यावर आह्मी पायींच उदयगिरीकडे निघालों.

वाटेनें आम्हांला बेटवा किंवा वेत्रवती ही नदी उतरावी लागली. नदीला चांगलें वहातें पाणी होतें, व नदीचा देखावा फार प्रेक्षणीय होता. नदी उतरून पुढें गेल्यावर व बरींच शेतें ओलांडल्यावर उदयगिरीचा पहाड आह्मांला दिसूं लागला. सांचीपेक्षां या पहाडावर थोडी अधिक झाडी दिसत होती. पायथ्याशीं एक लहानसें खेडेगांव आहे. तेथल्या पाटलाला एक गाडी तयार करावयाला आमच्या बरोबरच्या शिपायानें ताकीद दिली. आह्मी सरदार आपटे यांचे पाहुणे, मग गाडी

मिळावयाला काय उशीर ? आह्मी लेणीं पाहून येतों, तोंपर्यंत गाडी तयार ठेवावी, असें पाटलास बजावून शिपाई आह्मांला उदयगिरीच्या लेण्याकडे घेऊन गेला.

हीं लेणीं टेकडीच्या खालच्या भागांत आहेत. दक्षिणप्रांतांतील लेण्यांप्रमाणें डोंगराच्या उंच भागीं नाहींत. पहिलें मोठें लेणें तर अगदीं पायथ्यालाच आहे, व त्याच्यापुढें लहानसें तळें आहे. पण हल्लीं हें तळें ओहोरलेलें आहे. या लेण्यांत कोरींव चित्रें अतिशय काढलेलीं आहेत, व तीं विष्णु आणि कृष्ण यांच्या चरित्रांतल्या देखाव्यांचीं आहेत. लेण्यांच्या डाव्या बाजूच्या खडकावर वराहावताराचा एक प्रचंड चित्रपट आहे. प्रथमतः आह्मांला हा चित्रपट काय आहे, याची कल्पना होईना! एक भला थोरला पुरुष उभा असून तो आपल्या पायानें नागावर बसलेल्या एका मूर्तीला खालीं लोटीत आहे, असा देखावा आह्मांला दिसला; पण या पुरुषाचें तोंड मात्र मनुष्यासारखें नव्हतें—एकाद्या पशूसारखें होतें. तोंडाचा भाग थोडासा फुटला असल्यामुळें हें चित्र कशाचें आहे, हें आह्मांला समजलें नाहीं; पण तो प्रचंड प्राणी व त्या चित्रपटांतील इतर खोदीव काम पाहून आह्मी थक्क झालों, यांत संशय नाहीं.

गंगा व यमुना या नद्यांचें स्वर्गापासून अवरोहण एका बाजूला दाखविलें आहे. गंगा सुसरीवर बसलेली स्त्री, व यमुना कांसवावर बसलेली स्त्री, या रूपानें काढल्या असून खालीं पाण्याच्या लाटा दिसतील असें खोदीव काम केलें आहे. या लेण्यावर गुप्त घराण्यांतील चंद्रगुप्ताच्या काळचा एक शिलालेख आहे. या लेण्यांपैकीं दुसऱ्या एका लेण्यांत—याला 'तवालेणें' म्हणतात, कारण याच्यावर तव्याच्या आकाराचा खडक आहे—चन्द्रगुप्त आपल्या प्रधानासह या ठिकाणीं आला असतांना हें लेणें खोदलें आहे, असा स्पष्ट शिलालेख सांपडतो. हें लेणें शिवाला अर्पण केलेलें आहे. उदयगिरीचीं बाकीचीं सर्व लेणीं विष्णूच्या भक्तीचीं दर्शक आहेत; हें एकच मात्र शिवभक्तिदर्शक आहे.

या तवालेण्याच्या बाजूला खडकाला खिंड पडली असून त्यांतून टेकडीच्या माथ्यावर जाण्याला मार्ग आहे. या खिंडीच्या दोन्ही बाजूंला लहान

लहान लेण्यांसारखे कोनाडे काढले आहेत. डाव्या बाजूच्या खडकांत शेषशायी विष्णूची निजलेली प्रचंड मूर्ति आहे. ही बारा फूट लांब आहे. ही मूर्ति खडकाच्या अगदीं वरच असल्यामुळें पाऊसवाऱ्यानें फार खराब झाली आहे.

टेकडीच्यावर गेलें म्हणजे सांचीच्या टेकडीप्रमाणें जिकडेतिकडे दगड, चबुतरे, मोडकेतोडके खांब व मूर्ति दिसतात. यांमध्यें एका खांबाच्या उथळ्यावर काढलेलें सिंहाचें चित्र फारच पहाण्यालायक आहे. उदयगिरीचीं लेणीं हीं सर्व बौद्ध धर्माला उतरती कळा लागल्यावर जें ब्राह्मणधर्माचें पुनरुज्जीवन झालें, त्या काळचीं—म्हणजे खिस्तीशकाच्या चारशें-पांचशें वर्षांच्या सुमाराचीं—आहेत, असें शिलालेखांवरून दिसतें.

सहज पाहणारालासुद्धां सांची व उदयगिरि येथील खोदीव चित्रपटांमध्यें तेव्हांच फरक दिसून येतो. सांची येथें बुद्धाच्या आयुष्यांतील प्रसंगांचीं चित्रें काढलेलीं आहेत. मूर्ति आहेत त्या बुद्धाच्या किंवा त्याच्या पट्टशिष्यांच्या आहेत. कांहीं घरगुती कामाचे देखावे आहेत, व सिंह, हत्ती, मोर इत्यादि प्राणी आणि वृक्ष वेली यांचीं चित्रें खोदलीं आहेत. या सर्व उत्कृष्ट खोदीव कामांत देवादिकांच्या मूर्ति कोठेंच नाहींत! उदयगिरीच्या टेकडींतील सर्व लेण्यांत विष्णु, गणपति, महिषासुरमर्दिनी देवी, सुर व असुर इत्यादि देवता व पुराणांतील प्रसंग यांचीं खोदीव चित्रें काढलेलीं आहेत. यांवरून या काळीं पुराणांचा व पौराणिक देवतांचा बराच प्रसार झाला होता, असें दिसतें.

उदयगिरीचीं सर्व लेणीं पाहून आम्ही पायथ्याच्या खेड्यांत आलों. तों गाडी तयार होती. आम्ही तेथें थोडें पाणी पिऊन गाडींत बसलों, तों पाटील आमच्यापुढें अदबीनें येऊन आम्हांला एक रुपया देऊं लागला. आम्हांला त्याचा अर्थच कळेना! तेव्हां या ठिकाणीं कोणी अंमलदार किंवा मोठा माणूस आला, म्हणजे पाटलानें याप्रमाणें नजराणा देण्याची रीत आहे, असें शिपायानें आम्हांला सांगितलें. आम्ही हा रुपया अर्थात्च घेतला नाहीं. उलट, पाटलाचे आम्ही फार आभार मानले, व मार्गस्थ

झालों. ही रीत पाहून येथे अजून संस्थानी अंमल आहे याचें आम्हांला प्रत्यंतर आलें.

या बैलगाडींतून आम्ही तास अर्धातास चालल्यावर आम्हांला जिकडे-तिकडे मोडलेल्या व पडक्या इमारतींच्या खुणा दिसूं लागल्या. चुना, विटा, जोतीं, भिंती, देवळें वगैरे किती तरी गोष्टी आमच्या दृष्टीला पडत होत्या. पूर्वी येथें मोठें अफाट नगर असावें, असें त्यांवरून दिसून आलें. यालाच 'बेसनगर अगर विदिशा' म्हणत. पण या नगरानें व्यापलेला सर्व भाग पहाणें शक्य नव्हतें. कारण, आतां सायंकाळ होत चालला होता; म्हणून आम्ही बेसनगरचीं पुरातन स्मारकें पाहण्याचें सोडून दिलें, व भिलशाच्या बाजूकडे वळलों, आणि पुनः वेत्रवती नदीच्या एका भागाला येऊन पोहोंचलों.

हें ठिकाण खरोखरीच फार रमणीय आहे. आधीं येथें नदीचें पात्र फार खोल असून बरेंच रुंदहि आहे. शिवाय, नदींत पाणीहि पुष्कळ आहे. नदी उतरून अलीकडच्या तीराकडे आल्यावर अर्ध्या नदींत बांधलेलीं दोन मोठमोठीं देवळें लागतात. नदीच्या पात्रापासून हीं कितीतरी उंच आहेत; पण पात्रापासून सारख्या घांटाप्रमाणें पायऱ्या बांधलेल्या आहेत; यामुळें तो देखावा फार उत्तम दिसतो. मात्र देवळाच्या गाभाऱ्यापर्यंत चढून जातांना पाय अगदीं भरून येतात. देवळाच्या सभोंवार प्रदक्षिणा घालतांना आसपासचा सर्व भाग दृग्गोचर होतो, व या ठिकाणाला तीर्थाचें महत्त्व कसें व कां आलें असेल, हें ध्यानांत येतें.

येथून एका बाजूला फार मोठा डोह आहे, व यामुळें नदी सारखी पाण्यानें तुडुंब भरलेली दिसते. देवळाच्या बाजूला उंच खडक असून त्यालाच बंधारा बांधून नदींत लहानसें एक खडकाचें बेट आहे तेथपर्यंत सारखा घांट बांधीत नेला आहे; यामुळें तेथला भाग चांगला दिसतो. घांटाच्या कडेला स्नानाची व पोहण्याची उत्तम सोय झालेली आहे. येथें नदीला पुष्कळ घांट आहेत, व नदीच्या थोडें वर पाहिल्यास देवळें व घांटच्या घांट दृष्टिपथांत येतात ! हें ठिकाण तीर्थ समजतात, व येथें लोक

मुंडन करून घेतात. वर्षाला एक यात्राहि येथें भरते, असें आमच्याबरोबरच्या शिपायानें आम्हांला सांगितलें.

येथें पोहोंचल्यावर आम्ही उदयगिरीहून आणलेली पाटलाची बैलगाडी परत पाठविली, व येथून आम्ही चालतच जाण्याचें ठरविलें. आतां संध्याकाळ होऊन काळोख पडण्याची वेळ येत चालली होती, म्हणून आम्ही या ठिकाणीं फार वेळ राहिलों नाहीं. नदी ओलांडून थोडेसे पुढें गेल्यावर भिलशाच्या नजीकचे घाट व देवळें हीं आमच्या दृष्टीला पडलीं. येथें वांईसारखा देखावा दिसत होता. नदीला सारखे घांट वरच्या अंगाला देवळें व त्यांत बैराग्यांना रहाण्याच्या ओऱ्या होत्या.

येथून निघून जरा पुढें गेलें, म्हणजे भिलसा गांवाचा तट लागतो. या सर्व गांवाला किल्ल्यासारखा तट असून त्याला तीन दरवाजे आहेत. या तटाच्या भिंतींत कितीतरी कोरलेले व शिलालेख असलेले दगड होते. अर्थात् बेसनगरच्या ऱ्हासानंतर तेथून हे दगड आणून हा तट तयार केला असला पाहिजे, असें उघड दिसत होतें.

आम्ही गांवांत शिरलों, ती गांवची वेस उंच व प्रशस्त होती. गांव साधारण जुन्या तऱ्हेचाच आहे. गांवामध्यें फारसें पहाण्यासारखें कांहीं नाहीं, असें शिपायाकडून आम्हांला कळल्यामुळें गांवांतून थेट स्टेशनकडे आम्ही निघालों, व तेथें रेल्वेचा रस्ता ओलांडून आमच्या मुक्कामाला सात-आठांच्या सुमाराला परत आलों.

झालें. आमचा येथला मुक्काम आतां एक रात्रीवरच आला होता. पण या सर्व वेळभर माझ्या मनांत पाहिलेल्या स्थळांवरून कितीतरी विचार सुचत होते.

खरोखरीच सांची, भिलसा, उदयगिरि, बेसनगर वगैरे आम्ही घाईघाईनें व वरवर पाहिलेलीं स्थळें आणि आसपासचीं इतर ठिकाणें हीं पुराणवस्तुशोधकांच्या दृष्टीनें किती तरी महत्त्वाचीं आहेत. या स्थळांमध्यें हिंदुस्तानचा हजार दीडहजार वर्षांचा इतिहास जणूं काय पुरलेला आहे! येथें सांपडणाऱ्या नाण्यांवरून, शिलालेखांवरून, खोदलेल्या चित्रांवरून, वास्तुकलेच्या पद्धतीवरून व इतर तऱ्हेनें राहिलेल्या दगडचुन्याच्या काय-

मच्या खुणांवरून हिंदुस्तानचा इतिहास बनविण्याचें काम बिकट आहे, हें माझ्या ध्यानांत आलें, व हें काम चांगल्या तऱ्हेनें पार पडण्यास या आणि अशासारख्या ठिकाणीं, महिनेच्या महिने घालविले पाहिजेत, अशी माझी खात्री झाली. आमच्यासारख्या एकाददुसरा दिवस येऊन हीं प्रेक्षणीय स्थळें पाहून जाणारांच्या हातून पुराणवस्तुशोधनाचें काम काय होणार असें माझ्या मनांत आलें. पण निदान हिंदुस्तानांतील पुराणस्थलांचें महत्त्व बहुजनसमाजाच्या मनांत बिंबविण्याचें मध्यम दर्जाचें काम माझ्या प्रवासवर्णनानें झालें, तरी सुद्धां थोडेंफार उपयुक्त कृत्य आपल्या हातून घडल्यासारखें होईल, असें म्हणून मी आपल्या मनाचें समाधान केलें.

येथलीं स्थळें पाहून बौद्धधर्म व ब्राह्मणधर्म यांबद्दलच्या किती तरी कल्पना माझ्या मनांत आल्या. गौतमबुद्धाचें मूळ ठिकाण कपिलवस्तु; त्याचें बहुतेक आयुष्य काशी, गया, मथुरा, राजगृह वगैरे उत्तरेच्या शहरांत व प्रदेशांत गेलें खरें; पण थोड्याच काळांत त्याच्या धर्माचा प्रसार केवढा झाला! आज अडीच हजार वर्षें गौतमबुद्धाला झालीं; तरी पण त्याचा धर्म अजून तिबेट, चीन, जपान, ब्रह्मदेश व सिलोन इत्यादि दूरदूरच्या देशांत प्रचलित आहे, व अजूनहि जगांतील एकषष्ठांश लोक या धर्माचे अनुयायी आहेत.

इतका पसरलेला धर्म हिंदुस्तानांत मात्र अगदीं नामशेष व्हावा, ही मोठी आश्चर्यकारक गोष्ट मला वाटली. या धर्माच्या अनुयायांचीं दृश्य स्मारकें हिंदुस्तानच्या कोनाकोपऱ्यांत पसरलेलीं आहेत. बौद्ध लोकांनीं कोरलेलीं लेणीं दक्षिणेंतील खेड्यापाड्यांतहि आहेत. जुन्नर, नाशिक, कार्ले, कान्हेरी, कुलाबा जिल्ह्यांतील महाड, बिरवाडी इतक्या भिन्नभिन्न ठिकाणच्यीं लेणीं मी प्रत्यक्ष पाहिलीं होतींच; पुस्तकांवरून इतर ठिकाणच्या लेण्यांचीहि मला माहिती झालेली होती. या दृश्य स्मारकांवरून या धर्माचा एका काळीं हिंदुस्तानांत केवढा विस्तार झाला होता, याबद्दल कोणाचीहि खातरी पटण्यासारखी आहे; पण मग प्रश्न असा उत्पन्न होतो, कीं, इतका देशांत रूढ झालेला धर्म अजिबात नाहींसा कसा व्हावा? हिंदुलोकांची प्रवृत्ति तर सर्वसंग्रही आहे. यामुळें वेदकालीन धर्मापासून निघालेले नाना-

पंथ व नानामतें या सर्वांचा हिंदु धर्मांत समावेश होऊन ते थोड्या फार अंशानें अजून अस्तित्वांतहि आहेत. बुद्धाच्या काळापासून प्रचलित असलेला जैन धर्म हिंदुस्तानांत राहिला. त्याच काळांत अस्तित्वांत आलेला भागवतधर्म अथवा वासुदेवभक्ति अजून देशांत चालू आहे. मग सर्व हिंदुस्तानभर पसरलेला—नव्हे, सर्व आशियाखंडांत पसरलेला-धर्म हिंदुस्तानांतून अगदीं नामशेष कसा झाला, हें मला मोठें गूढ वाटलें. हिंदुस्तानांतील या धर्माच्या विस्ताराच्या दृश्य खुणांवरून केलेला तर्क चुकीचा तर नाहींना, अशी उलट कल्पना माझ्या मनांत आली, व या दृष्टीनें मी विचार करूं लागलों. तेव्हां ही कल्पनाहि खरी असण्याचा संभव आहे, असें मला वाटलें. कारण, गौतमबुद्धानें आपला धर्म प्रचलित केल्यावर लवकरच त्याला राजाश्रय मिळून हिंदुस्तानांतील एका प्रचंड साम्राज्याचा तो धर्म बनला, व त्यांतच अशोकासारखा खरा धर्माभिमानी व धर्माचा प्रसार करण्याला पाण्यासारखा पैसा खर्च करणारा राजा त्या धर्माला लाधला. यामुळें जिकडे तिकडे बुद्धमठ, बुद्धविहार, बुद्धस्तूप व अशोकाचे स्तंभ बांधण्यांत आले. राजा आपल्या वैभवाच्या, सामर्थ्याच्या व संपत्तीच्या जोरावर जड दगडचुन्याच्या रूपानें बौद्धधर्माचा प्रसार करूं शकला; पण जनमनावर या धर्माचा फारसा पगडा बसला नव्हता. हिंदुस्तानांतील सामान्य जनता बौद्धधर्माच्या वैभवकाळींसुद्धां गुप्तपणें आर्यधर्मालाच चिकटून होती, व या नव्या राजाश्रयी धर्माबद्दल त्यांची म्हणण्यासारखी सहानुभूति नव्हती; म्हणूनच मगधाच्या साम्राज्याला उतरती कळा लागल्यावर व गुप्तघराण्याच्या राजांनीं पुनः ब्राह्मणधर्म स्वीकारल्याबरोबर बौद्धधर्माचा राजाश्रय नाहींसा झाला, व बौद्धधर्माच्या प्रसाराचें बाह्यकारण नाहींसें झाल्याबरोबर हा धर्म हिंदु जनतेच्या अन्तरंगांत खरोखरी भिनला नसल्यामुळें बौद्धधर्मीयांना जनतेकडून त्रास होऊं लागला, व निरनिराळ्या प्रांतांत व भागांत पसरलेल्या बुद्धमठांची व विहारांची आणि त्यांतील भिक्षूंची उपासमार होऊन त्या धर्माचे अनुयायी हळुहळू नाहींसे झाले; नवे अनुयायी मुळींच मिळाले नाहींत. ही कल्पना खरी धरली, तर बौद्धधर्माचीं पुष्कळ दृश्य चिन्हें अस्तित्वांत असलीं तरी त्यांवरून बहुजनसमाजांत

त्याचा फारसा प्रसार झाला नव्हता, असें ठरतें. याप्रमाणें परस्पर-विरोधी कल्पना मनांत येऊन माझ्या मनाचा फारच गोंधळ झाला. पण एवढें मात्र खरें कीं, बौद्धधर्मांचा उदय, त्याचा प्रसार व हिंदुस्तानांतील त्याचा नायनाट हा हिंदुस्तानच्या इतिहासांतील एक बिकट प्रश्न आहे, व हल्लीं उपलब्ध झालेल्या आणि होत असलेल्या पाली ग्रंथांवरून पुराणवस्तुसंशोधन खात्याच्या खटपटीनें व पुण्यांत नवीन होऊं घातलेल्या ' भांडारकर पुराणसंशोधन संस्थेनें ' या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावला, तर हिंदुस्तानच्या सुमारें हजार दीडहजार वर्षांच्या काळावर केवढा प्रकाश पडेल, असें माझ्या मनांत आलें. मात्र या बिकट प्रश्नाबद्दल आपल्या हातून व्यवसायभेदामुळें फारसें कांहीं होण्यासारखें नाहीं, हें पाहून मनाला थोडें वाईट वाटलें.

याप्रमाणें मनांत विचार घोळत असतांना मी भिलसा येथें आमच्या बिऱ्हाडीं निद्रावश झालों, व पहांटेला उठून आमच्या पुढच्या मुक्कामाच्या तयारीला लागलों. पूर्वीची कांहींएक ओळख नसतां आमच्याजवळ इतक्या मोकळ्या मनानें बोलल्याचालल्याबद्दल व आमचा पाहुणचार उत्तम तऱ्हेनें केल्याबद्दल सरदार आपटे यांचे आभार मानून आम्ही मोठ्या आनंदानें दिल्लीला जावयाला निघालों.



३

नवी व जुनी दिल्ली.

आम्ही भिलशाहून दिल्लीएक्स्प्रेसनें पहांटे पांच वाजतां निघालों. दिल्लीला पोहोंचावयाला सुमारें चवदा तास लागतात. हा सर्व प्रवास दिवसा व्हावयाचा होता. यामुळें उन्हाचा फार त्रास होईल, हें आह्मांला ठाऊक होतें. पण या त्रासाच्या मोबदल्यांत भिलशापासून दिल्लीपर्यंतचा चारशें मैल लांबीचा प्रांत—विहंगम दृष्टीनें कां होईना—पण डोळ्याखालून गेल्यासारखा होईल, अशी आम्ही आपल्या मनाची समजूत केली. बाकी, आगगाडींतून चाललें असतांना—विशेषतः मेल किंवा एक्स्प्रेससारख्या प्रचंड वेगानें जाणाऱ्या गाड्यांनीं प्रवास करीत असतां—कालिदासानें ' शाकुंतल'मध्यें म्हटल्याप्रमाणें **' न मे दूरे किंचित्क्षणमपि न पार्श्वे रथजवात् '** असा अनुभव वारंवार येतो.

आम्ही गाडींत बसून तास दीड तास झाला नाहीं, तोंच विना हें मोठें जंक्शनस्टेशन आलें. तेथें आम्ही चहा व दूध घेतलें. दहांच्या सुमाराला आम्ही झांशी स्टेशनला येऊन पोहोंचलों. येथें गाडी सुमारें पंधरा मिनिटें थांबली. येथून पुढें जाऊं लागलें म्हणजे दातिया म्हणून जुन्या इमारतींकरितां प्रसिद्ध असलेलें ठिकाण दिसतें. दातियाचा किल्ला व दुसऱ्या सुंदरसुंदर इमारती आपल्याला आगगाडींतून दृग्गोचर होतात, व या पहाण्याकरितां या ठिकाणीं उतरण्याची इच्छाहि होते. पण उपयोग काय ? गाडी झपाट्यानें चालत असते, व क्षणार्धांत हा सर्व देखावा दृष्टिआड होऊन जातो ! थोड्याच अवकाशानें आम्हांला ग्वालेरचा किल्ला दिसूं लागला. आमच्या मागच्या प्रवासांत आम्ही ग्वालेरचा किल्ला वर जाऊन स्वस्थपणें पाहिला असल्यामुळें आम्हांला आगगाडींतूनसुद्धां

किल्ल्यावरील इमारती व इतर स्थळें हीं स्पष्टपणें ओळखतां आलीं, व हा किल्ला दुरून पाहूनसुद्धां आम्हांला आमच्या पहिल्या प्रवासाची आठवण होऊन आनंद झाला. किल्ल्यावरील निरनिराळ्या स्थळांचें निरीक्षण करण्यांत आम्ही गर्क असतां गाडीची वेळ होऊन ती फूं फूं करीत पुनः चालू झाली, व ग्वालेरचा किल्ला आम्ही मागें टाकून झपाट्यानें दिल्ली–आग्र्याच्या प्रदेशांत प्रवेश करूं लागलों.

या प्रदेशांत प्रवेश करण्यापूर्वी चंबळा नदीच्या दरींतून आगगाडी जाते. ही दरी अगदीं विचित्र आहे. ही खोल आहे अशांतला भाग नाहीं. प्रांत सपाटच आहे; पण येथून पांढरी माती लागते, व मातीचे ढीगच्या ढीग मैलच्या मैल सारखे लागतात. या ढिगांमधून खोल खोल भेगा असतात. हा विलक्षण देखावा आपल्या इकडल्या नद्यांच्या तीरांना मुळींच दृष्टीला पडत नाहीं. अर्थात् हा सर्व भूमिभाग उत्पन्नाचा नाहीं. अशा तऱ्हेच्या उंचसखल मातीच्या ढिगांच्या राशीच्या राशी मागें टाकल्यावर चंबळा नदीचें प्रचंड पात्र व त्यावरील रेलवेचा प्रचंड पूल लागतो. या नदींत गोटे किंवा दगड मुळींच नाहींत. पांढरी वाळू व पांढरी माती यांनींच सर्व पात्र भरलेलें असतें. खरोखरीं पाहतां नर्मदेपासून चंबळा नदीपर्यंत एक तऱ्हेचा प्रदेश वाटतो. यांत माती तांबडसर असून तांबडा दगड फार आहे. पण चंबळेच्या पलीकडील प्रांत पांढऱ्या मातीचा असून त्यांत दगड फारच कमी आहे.

चंबळा नदीची दरी व आसपासचा ओसाड प्रदेश टाकला, ह्मणजे आपण गंगा व यमुना या नद्यांच्या मधील सुपीक प्रदेशांत येतों, व याचें प्रत्यंतर सभोंवारच्या हिरव्या गार शेतांवरून येतें. कारण, या भागांत कालवे पुष्कळ असून त्यांचें पाणी शेतांना मिळतें, यामुळें उन्हाळ्यांतसुद्धां हिरवींहिरवीं शेतें दृग्गोचर होतात.

हा सुपीक व सुंदर प्रांत पहाण्यांत आह्मी गुंतलों आहोंत, तोंच गाडी आग्रा स्टेशनला येऊन पोहोंचली, व आग्र्याचीं सुंदर मातीचीं चित्रें, ताजमहालाचे व इतर वस्तूंचे पांढऱ्या दगडांचे नमुने पाटींत घेऊन फेरीवाले उतारूंना त्या वस्तु विकत घेण्याबद्दल विनवूं लागले. येथलीं मातीचीं चित्रें

खरोखरींच फार सुंदर असतात व त्या मानानें त्यांच्या किंमतीहि फार नसतात. आग्र्याचीं दोन स्टेशनें सोडून गाडी निघाली, कीं, ती एकदम मथुरेला येते, व त्या स्टेशनवर उतारूंची व पंड्यांची अशी एकच गर्दी दृष्टीला पडते.

आम्ही मथुरेला पोहोंचलों, तों चार वाजून गेले होते. आतां दिल्ली फक्त तीन तासांवर आली, असें पाहून आम्हांला आनंद झाला, व प्रवासाचा त्रास या आनंदांत आम्ही पार विसरून गेलों.

मथुरा टाकून पुढें गेलें ह्मणजे कोसीकालम म्हणून एक मोठें स्टेशन लागतें. यापुढें मात्र अगदीं लहान लहान स्टेशनें लागतात, व प्रांतहि ओसाड व नापीक भासतो, आणि आपण हिंदुस्तानच्या राजधानीकडे जात आहों, असें वाटतहि नाहीं. ज्याप्रमाणें विजापुराला जातांना स्टेशननजीक आल्यावर पडक्या इमारती व ओसाड जागा लागतात, तसाच प्रकार दिल्लीजवळ गेलें म्हणजे होतो.

शेवटीं एकदांचें दिल्लीचें स्टेशन आलें, व आपल्या मुक्कामाला येऊन पोहोंचलों म्हणून आम्हांला बरें वाटलें. माझे मित्र स्टेशनवर आम्हांला न्यावयाला आले होते, ते आम्हांला भेटले, व आम्ही स्टेशनांतून बाहेर मुशाफरखान्यांत आलों. आमच्या मित्राचें बिऱ्हाड स्टेशनपासून फारसें दूर नसल्यामुळें आम्ही हमालाच्या डोकीवर सामान देऊन पायींच तिकडे निघालों.

भोजन झाल्यावर आम्ही दिल्लींतील प्रेक्षणीय स्थळें पहाण्याचा बेत ठरवूं लागलों, तों 'रात्र थोडी, सोंगें फार' अशी आमची स्थिति होऊं लागली. आमचा बेत नवी व जुनी अशा दोन्ही दिल्ली पाहण्याचा होता. पण 'नवी दिल्ली' हेंच नांव तीन ठिकाणांना लागतें, असें आम्हांला समजलें. हल्लींचें दिल्ली शहर—ज्याला शहाजहान बादशाहाच्या नांवावरून 'शहाजहानाबाद' म्हणतात,—यालाच पूर्वींच्या दिल्लीच्या तुलनेनें 'नवी दिल्ली' म्हणण्याचा तेथें प्रघात आहे. शिवाय जॉर्ज बादशहांनीं हिंदुस्तानची राजधानी म्हणून ठरविलेली तात्पुरती दिल्ली एका ठिकाणीं आहे, तर त्यानंतर युरोपांतील नगररचनाशास्त्रज्ञांनीं पसंत केलेलें ठिकाण निरा-

ळ्याच ठिकाणीं आहे ! शिवाय 'सात किल्ले व बावन दरवाजे' या हिंदी म्हणीप्रमाणें सात जुन्या दिल्ल्या आहेत, त्या निराळ्याच.

खरोखरींच माझ्या मनांत असें आलें, कीं, जर कोणत्याहि शहराशीं हिंदुस्तानच्या बऱ्याच काळचा इतिहास निगडित झाला असेल, तर तो दिल्ली शहराशींच होय. महाभारतांतील पांडवांपासून तों थेट हल्लींच्या इंग्रज सरकारापर्यंत दिल्लीशीं महत्त्वाच्या गोष्टींत हिंदुस्तानच्या इतिहासाचा संबंध पोहोंचतो. ज्याप्रमाणें रोम शहराशीं यूरोपच्या बऱ्याच काळच्या इतिहासाचा संबंध पोहोंचतो, दंतकथेंतील रोम्युलसपासून तों थेट अर्वाचीन काळापर्यंत या शहराला फार महत्त्व होतें, तीच स्थिति दिल्ली शहराची आहे. तेव्हां अशा या शहरांतील सर्व प्रेक्षणीय स्थळें पहाण्याला किती तरी दिवस लागणार ! तेव्हां आम्हांला प्रेक्षणीय स्थळांची निवडानिवड करावी लागली, व दोन दिवसांतच पहाणें शक्य होता तितकाच भाग पहाण्याचा आम्ही बेत ठरविला.

दुसऱ्या दिवशीं आम्ही प्रथमतः हल्लींच्या दिल्लींतील प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. हीं स्थळें म्हणजे चांदणीचौक, जुम्मामशीद व यमुनानदीवरील रेलवेचा प्रचंड पूल हीं होत. चांदणीचौक हा दिल्लीसारख्या हिंदुस्तानच्या राजधानीला शोभेल असाच प्रशस्त रस्ता आहे, यांत शंका नाहीं. हा रस्ता फारच रुंद असून त्याचे उजवी बाजू व डावी बाजू असे दोन भाग आहेत. दोन बाजूंच्यामध्यें दुहेरी झाडांची रांग व भाजीपाला, फळफळावळ, फुलें इत्यादि विकणारांना बसण्याकरितां कट्टे आहेत. बादशहांच्या काळीं हा कट्टयाचा भाग यमुनेच्या कालव्याच्या पाण्यानें तुडुंब भरलेला असे. त्या वेळीं तर या रस्त्याची शोभा जास्तच असली पाहिजे. आतांसुद्धां हा लांबच्यालांब व इतका प्रशस्त रस्ता पाहून मनाला आनंद झाल्यावांचून राहत नाहीं.

या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं सर्व दुकानेंच आहेत, व तीं साधारणतः एकाच तऱ्हेचीं बांधलेलीं आहेत. बहुतेक सर्व घरांना पुढच्या बाजूला खोदीव दगडी कामाचे सुंदर सज्जे काढलेले आहेत. या चांदणी चौ-

काऱ्या एका अंगाला मोठ्या घड्याळाकरितां एक मनोरा केला आहे तो अर्वाचीन आहे.

चांदणीचौक पाहून झाल्यावर आम्ही शहराच्या टोंकावर व यमुना नदीच्या कांठाजवळ असलेल्या दिल्लीच्या किल्ल्यानजीकच्या खुल्या जागेंतील जुम्मामशीद पहावयाला गेलों. या मशिदीसभोंवार कितीतरी खुलीं पटांगणें आहेत. यामुळें ही सर्व भव्य व प्रचंड इमारत फारच उठावांत दिसते. खुल्या मैदानाच्या उंचवट्यावर ही बांधलेली असून वर चढण्याला प्रशस्त व ऐसपैस अशा तांबड्या दगडाच्या पायऱ्या बांधलेल्या आहेत. मुंबईतील एलफिन्स्टन हायस्कूलला जशा पायऱ्या आहेत, त्यापेक्षांहि जास्त लांब, रुंद व उंच पायऱ्यांचा हा प्रचंड जिना चढतांना मशिदीच्या भव्यतेची कल्पना मनांत उभी राहते. पुढल्या दरवाजांतून आंत पाऊल टाकलें कीं, समोरची मशीद व त्याच्या पुढचा ऐसपैस चौक पाहून मनुष्य थक्क होऊन जातो. सर्व चौकभर तांबड्या पांढऱ्या दगडाची फरसबंदी केलेली आहे.

हा चौक ४५० फूट लांबीचा चौकोन आहे. म्हणजे हल्लीं आपलीं क्रिकेटचीं मैदानें जेवढीं लांब रुंद असतात, इतका हा चौक मोठा आहे. चौकाच्या तीनहि बाजूंना खुल्या कमानींचे, पण वरून फरसबंदी गची केलेले प्रशस्त सोपे बांधलेले आहेत. येथून सर्व शहराचा मनोहर देखावा दिसतो. या चौकासमोरच शुभ्र संगमरवरी दगडाची मशीद आहे. हिला तीन घुमट असून दोन बाजूंना कोंपऱ्यांत दोन उंच मनोरे आहेत. मनोऱ्यांवर चढून गेल्यावर शहराची दाट वस्ती, यमुनेचा प्रशांत प्रवाह व दूरदूरच्या जुन्या इमारतींचा देखावा हीं सर्व पाहिलीं, म्हणजे अतिशय आनंद झाल्यावांचून राहत नाहीं. सर्व मशिदीभर निमाज पढणाऱ्या मंडळीकरितां काळ्या दगडाच्या महिरपी हारीनें संगमरवरी फरसबंदींत बसविलेल्या आहेत.

या मशिदीचें सर्व काम फारच सुबक व भव्य आहे. हिंदुस्थानांतील सर्व मशिदींमध्यें या मशिदीचा सर्वांत वर नंबर लागेल, यांत शंका नाहीं. ही मशीद शहाजहान बादशहानें आपल्या कारकीर्दीच्या

चवथ्या वर्षीं सुरू करून ती दहाव्या वर्षीं पुरी केली. या मशिदीपासून दिल्लीचा किल्ला स्पष्टपणें दिसतो. लढाईपासून या किल्ल्यांत जावयाला परवानगी मिळण्यास पंचाईत पडते असें कळल्यामुळें आम्ही किल्ला पहाण्याच्या फंदांत पडलों नाहीं.

जुम्मामशीद पाहून झाल्यावर आम्ही येथून जवळच असलेला यमुनेवरील रेल्वेचा पूल व तेथून दिसणारा यमुनेचा प्रवाह पहावयाला गेलों. हा रेल्वेचा पूल सालीमगडाच्या तटाला अगदीं खेटून बांधलेला आहे. येथला देखावा फार भव्य आहे. एकीकडे तो गड, तर त्यालाच लागून रेल्वेचा मोठा थोरला पूल व खालीं वालुकामय यमुनेचा किनारा आणि काळसर निळसर रंगाच्या पाण्याचा यमुनेचा प्रवाह हीं एकसमयावच्छेदेंकरून पाहिलीं, म्हणजे सृष्टि व मनुष्य या दोघांच्याहि कर्तृत्वाबद्दल सानंद आश्चर्य वाटतें. यमुनेच्या अलीकडे भली मोठी लांबचलांब खुली जागा लागते, व तिच्या अलीकडे घांट दिसतात. यावरून पूर्वीं यमुनेचा प्रवाह अलिकडे असून अगदीं घांटाजवळून जात असावा, पण कालेंकरून तो दूर गेला असावा, असा सहज अंदाज करतां येतो. या घांटावर अश्वमेध झाल्यावर युधिष्ठिरानें यज्ञ केला होता अशी दंतकथा आहे.

सालीमगड रेल्वेचा पूल व त्या शेजारचा घांट हीं हल्लींच्या दिल्ली शहराच्या उत्तरेला आहेत. येथून यमुना नदी दक्षिणवाहिनी झालेली आहे, आणि नदीचा प्रवाह व पलीकडे लहानलहान टेंकड्यांची असलेली एक ओळ यांच्या दरम्यान हल्लींचें शहर वसलेलें असून येथून खालीं दक्षिणेकडे जुन्याजुन्या दिल्ल्या वसत गेलेल्या होत्या. शेवटची हिंदू दिल्ली जेथें कुतुबमिनार आहे तेथें होती, व ही हल्लींच्या दिल्लीहून सुमारें अकरा मैल दक्षिणेला आहे. जॉर्ज बादशहांनीं जेव्हां दिल्ली राजधानी करण्याचें जाहीर केलें, तेव्हां नव्या दिल्लीला जी जागा पसंत करण्यांत आली ती या टेंकडीच्या रांगेपलीकडे आहे. तात्पुरती दिल्ली तेथेंच आहे.

ही तात्पुरती दिल्ली पहावयाला आम्ही दोन प्रहरीं गेलों. या टेंकड्यांच्या रांगेच्या माथ्यावरून एक रस्ता गेला आहे. त्यावर गेलें ह्मणजे सगळें दिल्ली शहर एकदम दृग्गोचर होतें, व यमुना नदी आणि टेंक-

ड्यांची रांग यांच्यामध्यें खोलांत शहर वसलेलें आहे, असें आपल्याला आढळून येतें. या टेंकड्यांच्या रांगेच्या माथ्यावरच फत्तेगड नांवाच्या बंडांत कामास आलेल्या किल्ल्यावर इंग्रजांच्या स्मरणार्थ उंच चबुतऱ्यावर एक लहानसा मनोऱ्यासारखा स्तंभ बांधला आहे. याच्या चारहि बाजूंना शूर शिपायांचीं नांवें खोदलेलीं आहेत. याच्या शेजारींच अशोकाच्या काळचा एक स्तंभ उभा आहे. हे दोन्ही स्तंभ पाहिले म्हणजे हिंदुस्तानच्या इतिहासाची प्राचीन व अर्वाचीन दोन टोंकेंच आपण पहात आहों कीं काय असा भास होतो !

या टेकड्यांच्या पलीकडे चालचलाऊ राजधानीच्या पुष्कळशा पांढऱ्या शुभ्र इमारती दिसतात. जरी या तात्पुरत्या आहेत, तरी त्याचें काम सुबक आहे. विशेषतः व्हाइसरायांचा राहावयाचा बंगला व सेक्रेटरिएट या इमारती प्रेक्षणीय आहेत.

नव्या राजधानीचा पाया घातल्यानंतर ही जागा राजधानीला अयोग्य असें ठरविण्यांत आलें व दुसरी जागा पसंत करण्यांत आली. ही जागा हल्लींची दिल्ली व जुनी हिंदु दिल्ली यांच्या दरम्यान आहे. तेव्हां ती पहावयाला आम्हांला स्वतंत्रपणें जावयाची कांहीं जरूर नव्हती. कारण, दुसऱ्या दिवशीं आम्ही कुतुबमिनारपर्यंत जाऊन येण्याचा बेत केला होता.

ठरल्याप्रमाणें आम्ही दुसऱ्या दिवशीं पहांटेला आमच्या मित्रासह एका घोड्याच्या गाडींत बसून जुन्या दिल्ल्यांतील प्रेक्षणीय स्थळें पहावयाला निघालों.

आमचा मार्ग उत्तरदक्षिण होता. म्हणजे आम्ही उत्तरेकडून दक्षिणेकडे जात होतों. आम्ही हल्लींच्या दिल्लीच्या तटाच्या दरवाज्यांतून बाहेर येऊन थोडेसे पुढें आलों, तों आम्हांला जिकडेतिकडे जुन्या पडक्या इमारती दिसूं लागल्या. थोड्याच वेळांत आम्ही दिल्लींतील वेधशाळा पहावयाला उतरलों. हिला तेथले लोक ' जंतरमंतर ' म्हणतात ! हें नांव पडण्याचें कारण आम्हांला कळलें नाहीं. या वेधशाळेकडे जातांना वाटेनें लहानलहान रूळ घातलेल्या सडका लागत होत्या, व पुष्कळ ठिकाणीं पाडापाड करून सपाट जागा करण्याचें काम चाललें होतें.

येथपासून नव्या भावी राजधानीची मर्यादा सुरू होते. यामुळें या भागांतील मोडक्यातोडक्या इमारती वगैरे पार पाडून चांगली सपाटी करून रस्ते आंखण्याचें काम चाललें होतें. कांहीं इमारतींवर ' P ' हें अक्षर दिसलें. नव्या दिल्लीला घेतलेल्या सर्व जागेची पहाणी होऊन त्यांत जुन्या म्हणून ठेवण्याला योग्य व आवश्यक अशा ठिकाणांची यादी करून त्यांवर ' P ' असें अक्षर घातलें आहे, असें आमच्या मित्रानें सांगितलें.

आम्ही लवकरच वेधशाळेशीं आलों, व दरवाजांतून आंत गेलों, तों वेधशाळेचा रखवालदार आम्हांला दिसला. त्यानें आम्हांला सर्व वेधशाळा दाखविली. मात्र त्याला त्या ठिकाणच्या निरनिराळ्या योजनांची व ज्योतिषसंबंधींच्या साधनांची कांहींच माहिती दिसली नाहीं. आम्ही कांहींहि विचारलें, तरी ' तारे पहाण्याचें हें यंत्र आहे, ' एवढेंच तो उत्तर देई ! ही वेधशाळा म्हणजे एकादी मोठी इमारत आहे, असें मुळींच नाहीं. आपल्याइकडल्या आर्य ज्योतिष्यांनीं ग्रहांची व ताऱ्यांची प्रत्यक्ष गतिस्थिति समजण्याकरितां जीं साधनें शोधून काढलीं होतीं, त्यांचा या ठिकाणीं संग्रह केलेला आहे. या साधनांना आपल्या ज्योतिषांत ' यंत्र ', म्हणतात. साधारणतः हीं यंत्रें धातूचीं व लहान प्रमाणावर करीत असत. पण या वेधशाळेंत तीं सर्व दगड चुन्याचीं कायमचीं केलीं असून फार प्रचंड प्रमाणावर आहेत. तरी पण तीं इतकीं नाजूक आहेत, कीं, त्यांच्याकडून सूक्ष्म काम व्हावें ! आम्ही पक्क्या चुन्याच्या कामांत केलेलीं निरनिराळीं वर्तुळें पाहिलीं; त्यांवर अंशाच्या सूक्ष्म खुणा दिसत होत्या. पुढें गेल्यावर एक वर चढतचढत गेलेली साधारण चालण्याइतकी रुंद दोनतीन पुरुष उंच अशी भिंत लागली. तिच्या शेजारीं एक लहानसा तलाव होता, व त्याला पायऱ्या असून त्यावरहि अक्षांश घातलेले होते.नंतर निरनिराळ्या उंचीच्या खांबांची एक रांग आम्ही पाहिली. पुढें एक चक्राकार भिंत आम्हांला दिसली. याप्रमाणें उत्तम चुन्याच्या बांधकामांत केलेलीं पुष्कळ यंत्रें आम्ही पाहिलीं; पण तेथला रखवालदार अगदींच अडाणी दिसला. आमच्यापैकीं कोणालाच ज्योति-

षाची व विशेषतः आर्य ज्योतिषाची माहिती नसल्यामुळें आम्ही ही वेधशाळा पाहिली ती निवळ जडदृष्टीनें पाहिली. ज्याप्रमाणें एकाद्या अजबखान्यांत गेल्यावर कांहीं वस्तु काय आहेत, कशाकरितां आहेत वगैरे आपणाला कळत नाहीं, त्याप्रमाणें येथें माझी स्थिति झाली. या वेळीं माझे मित्र व सहाध्यापक श्रीयुत प्रो. नाईक यांची मला फार आठवण झाली. त्यांनीं युरोपियन व आर्य ज्योतिषांचा चांगला अभ्यास केला आहे. ते जर माझ्याबरोबर असते, तर त्यांनीं या सर्व विचित्र यंत्रांची रचना व उपयोग हीं आम्हांला समजावून सांगितलीं असतीं; पण त्या ठिकाणीं आम्हांला या यंत्रांबद्दलची माहिती मिळविण्याला कांहींएक साधन नव्हतें. ही दिल्लीची वेधशाळा जयपुरचा राजा दुसरा जयसिंह यानें सन १७०० च्या सुमाराला बांधली एवढें आम्हांला तेथें समजलें.

घरीं येऊन गॅझीटियरमध्यें पाहतां हिंदुस्तानांतील पॅरिस असें जें जयपुर शहर, तें वसविणाऱ्या व स्वतः मोठा गणिती व ज्योतिषी असलेल्या दुसऱ्या जयसिंगानें ही वेधशाळा बांधली, असें मला कळून आलें. तो सन १६९३ मध्यें गादीवर आला. ग्रहांच्या गतिस्थितींचें सूक्ष्मज्ञान मिळविण्याकरितां त्यानें जयपुर, दिल्ली, उज्जयनी, काशी व मथुरा इतक्या ठिकाणीं वेधशाळा बांधल्या, व ज्योतिषी ठेवून या सर्व ठिकाणीं ग्रहांच्या गतिस्थितींचे वेध घेववून त्यांची तुलना करून ‘ झीजमहमद ’ नांवाचा ग्रंथ आरबी भाषेंत व ‘ सिद्धांतसम्राट् ’ नांवाचा ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिला. युरोपांत ग्रहस्थितिगति जितकी सूक्ष्म काढतां येत होती, त्यापेक्षांहि अधिक सूक्ष्मता जयसिंहानें साधली. असो.

वेधशाळा पाहून झाल्यावर आम्ही गाडींत बसून पुढें चालू झालों. वाटेनें लहानमोठीं थडगीं व इमारतींचे अवशेष दृग्गोचर होत होते. नवीन दिल्लीकरितां सपाट जागा करण्याचें ठरल्यापासून अशा पुष्कळ इमारती व थडगीं पाडण्यांत येऊन सपाट जागा करण्याचा सपाटा चालू आहे, असें आम्हांला आमच्या मित्रानें सांगितलें.

जरा पुढें गेल्यावर आह्मांला आमच्या डाव्या बाजूला पुराणा किल्ला किंवा इंद्रप्रस्थ दिसूं लागलें. या किल्ल्याच्या समोरून एक मोठा रस्ता

काढून तो नव्या दिल्लीच्या मुख्य रस्त्यांपैकीं एक करण्याचें ठरलें आहे, व नवीन दिल्लींतील मुख्य मुख्य इमारती या किल्ल्याच्या अगदीं समोर येतील अशा तऱ्हेनें बांधण्याचें ठरलेलें आहे, असें आमच्या मित्राच्या बोलण्यावरून कळलें. लढाईमुळें हल्लीं काम अगदीं बेताबातानें चालू आहे, असेंहि त्याच्याकडून आह्मांला समजलें. जरा पुढें गेल्यावर डावी-कडे हुमायुनाच्या थडग्याची प्रचंड इमारत व उजवीकडे मनसूर अल्ली सफदारजंग यांच्या थडग्याची इमारत दिसूं लागली. हुमायुनाचें थडगें आम्ही परत येतांना पहाणार होतों पण सफदारजंगाचें थडगें लागलीच पाहून घेतलें. कारण, परत जातांना आम्ही दुसऱ्या रस्त्यानें जाणार होतों.

या थडग्याचें काम प्रेक्षणीय आहे. मुसलमानी इमारतींचे दोन प्रकार आहेत. एक मशीद व दुसरें थडगें. प्रत्येकाचा आकार ठरलेला असे. तुम्ही कोणतीहि मुसलमानी मशीद पहा, तिचा प्लॅन अगदीं ठरींव ! फरक काय तो आकार, बांधकामाला उपयोजिलेला दगड व कमीजास्त खोदीव काम यांतच असावयाचा ! तीच स्थिति थडग्यांची ! सफदारच्या थडग्याची इमारत भव्य असून दरवाज्यांतून आंत गेल्यावर मोठें थोरलें खुलें, फरसबंदी अंगण आहे, व पुढें थडग्याची इमारत आहे. अशा जातीच्या पुष्कळच इमारती आम्ही पाहिलेल्या असल्यामुळें फारसा वेळ येथें न घालवितां आम्ही पुढें गेलों.

नंतर आम्ही निझामउद्दीन नांवाच्या साधूच्या ठिकाणीं गेलों. बाहे-रून हें ठिकाण अगदींच मोडकळीला आल्यासारखें दिसतें; पण आंत गेल्यावर संगमरवरी दगडाचें सुंदर काम पाहून मन थक्क होतें. येथें पुष्कळ बादशहांचीं लहानलहान थडगीं आहेत, व संगमरवरी दगडाच्या जाळ्यांचें काम फार प्रेक्षणीय आहे.

तेथून आम्ही निघालों तों थेट कुतुबमिनारला जाईपर्यंत कोठेंहि थांबलों नाहीं. जुन्यानव्या दिल्लीच्या प्रेक्षणीय स्थळांचें कुतुबमिनार हें एक नाक आहे. ज्याप्रमाणें आग्र्याचा ताजमहाल हा एक जगांतील सात आश्चर्यांपैकीं गणलेला आहे, त्याप्रमाणेंच दिल्लीचा कुतुबमिनार हाहि एक सात आश्चर्यांपैकींच गणलेला आहे. हा मिनार किंवा मनोरा रायपिठोरा

व लालकोट या दोन किल्ल्यांच्या आंत आहे. यामुळें आंत जाण्याला दोन दरवाजे लागतात.

खरोखरींच या मनोऱ्याचें काम इतकें मनोहर आहे, कीं, त्याचें शब्दांनीं वर्णन करणें शक्यच नाहीं! हा मनोरा तांबड्या दगडांचा बांधलेला आहे, व निरनिराळ्या मजल्यांच्या तांबड्या दगडांतहि थोडाफार फरक आहे; यामुळें निरनिराळ्या मजल्यांच्या तांबडेपणांत निरनिराळी छटा भासमान होते. पहिले तीन मजले तांबड्या दगडाचे आहेत. चवथा संगमरवरी दगडाचा आहे, व पांचव्यांत तांबड्या व पांढऱ्या दगडांचें मिश्रण आहे. हा मनोरा २३८ फूट उंच असून त्याला ३७९ पायऱ्या आहेत. कुतुबमिनारचा चबुतरा चोवीसकोनी असून त्याचा घेर १४७ फूट आहे. पहिला मजला ९५ फुटांचा असून त्याला एक अर्धवर्तुलाकार व एक तिकोनी असे पैलू पाडलेले आहेत. बहुतेक मुसलमानी इमारतींतील मनोरे हे निवळ वर्तुलाकार असतात. कुतुबमिनारची ही पैलूची कल्पना अपूर्व आहे व या त्याच्या विशेषामुळेंच हा मनोरा इतका सुंदर दिसतो. शिवाय प्रत्येक मजल्याची घटना निराळी आहे. दुसरा मजला पन्नास फूट उंच असून मजल्याचे सर्व पैलू अर्धवर्तुलाकार आहेत. तिसरा मजला चाळीस फूट असून त्या मजल्याचे सर्व पैलू तिकोनी आहेत. चवथा मजला पंचवीस फूट असून तो नेहमींच्या मनोऱ्यांप्रमाणें अगदीं साधा बिन पैलूदार आहे, व पांचवा बावीस फूट असून त्या मजल्याला पुनः अर्धवर्तुलाकार पैलू थोड्या थोड्या अंतरावर केलेले आहेत. पांचव्या मजल्याच्या वर गेल्यावर मनोऱ्यासभोंवतीं कमानीचा घुमट आहे. प्रत्येक मजल्यावर आल्यावर सभोंवारचा देखावा पाहण्याकरितां व विश्रांति घेण्याकरितां मनोऱ्याच्या सभोंवार सुंदर सज्जे काढलेले आहेत.

या सज्जांचें खोदीव काम व कठड्यांचें नक्षीकाम फार उच्च दर्जाचें आहे. हा मनोरा खालपासून वरपर्यंत सारख्या आकाराचा नाहीं. जोत्याजवळ त्याचा व्यास ४७ फूट आहे तर माथ्यावर त्याचा व्यास फक्त ९ फूट आहे. म्हणजे जसजसें वर जावें तसतसा हा मनोरा निमुळता होत गेलेला आहे. सर्व मनोऱ्याला आंतून वर्तुलाकार जिना आहे. त्याला

एकंदर ३७९ पायऱ्या आहेत. मी प्रत्येक मजल्याच्या पायऱ्या मोजीत वर गेलों. प्रत्येक सज्जावर गेलें म्हणजे सभोंवतालचा सुंदर देखावा दिसत असे, व ज्या दोन किल्ल्यांच्या मध्यें कुतुबमिनार आहे त्या किल्ल्यांची तटबंदी स्पष्ट दिसून किल्ल्यांचा आकार एकदम दृग्गोचर होई. मनोऱ्याच्या अगदीं वरून तर फार दूरवरचा देखावा दिसे. हा मनोरा तयार करणाराच्या मार्मिकतेबद्दल फार आश्चर्य वाटतें !

हा मनोरा कोणी बांधला याबद्दल अजूनहि पुराणवस्तुसंशोधनकारांमध्यें वाद आहे. कांहीं लोकांचें म्हणणें असें आहे कीं, हा मनोरा पृथ्वीराज चव्हाण यानें आपल्या मुलीला यमुना नदीचें रोज दर्शन व्हावें म्हणून बांधला. कांहीं लोक तर असें म्हणतात, कीं, तेथून गंगा नदी दिसावी असाहि बांधतांना हेतु होता; पण तो या मनोऱ्यानें साधला नाहीं, म्हणून कुतुबमिनारच्या दुप्पट आकाराचा दुसरा मनोरा बांधण्याला त्यानें सुरुवातहि केली होती. पण तें काम मुसलमानांच्या स्वारीनें आणि त्यांच्या विजयानें बंद पडलें. दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें आहे, कीं हा मिनार कुतुबुदिननें बांधण्याला सुरुवात केली, व तो त्याचा जांवई आलतमशहा यानें पुरा केला. या मताप्रमाणें कुतुबमिनारचें काम सन १२०० मध्यें सुरू होऊन तें १२२० मध्यें पुरें झालें असलें पाहिजे. या मनोऱ्याच्या बहुतेक प्रत्येक मजल्यावर आरबी भाषेंत व देवनागरी भाषेंत लेख आहेत; या लेखांवरून हा मनोरा पृथ्वीराज चव्हाणानें बांधला असें शाबीद होत नाहीं. उलट कुतुबुदिन व त्याचा धनी महमद यांचीं नांवें पहिल्या मजल्यावर कोरलेलीं आहेत, यावरून तो मुसलमानांनीं बांधलेला असावा असें दिसतें, व दंतकथेला फारसा आधार सांपडत नाहीं, असें म्हणणें भाग आहे. तरी पण सर्व पक्षाला इतकें कबूल आहे, कीं, कुतुबमिनार कोणीहि बांधला असो, त्याचें नक्षीकाम व कोरीव काम हें हिंदुपद्धतीचें आहे. यावरून बहुतेक कामकरी व कारागीर हिंदू असावे, असें अनुमान करतां येतें.

ही गोष्ट मनोऱ्याच्या शेजारींच बांधलेल्या जुम्मामशिदीवरून स्पष्टपणें दिसून येते. ही मशीदहि कुतुबुदिनानें ११९१ मध्यें सुरू केली. म्हणजे

दिल्ली सर केल्याबरोबर या कामाला सुरुवात झाली. ही मशीद हिंदु देवळाच्या जोत्यावर व पुष्कळशा देवळांच्याच दगडांनीं बांधलेली आहे. या गोष्टीला हवा तेवढा पुरावा आहे. मशीद फार मोठी आहे. दर्शनी भिंतीमध्यें पांच मोठमोठ्या कमानी आहेत. या कमानींतून आंत गेल्यावर मनुष्य मोठ्या मंडपांत येतो. या मंडपाचें छप्पर हिंदु देवळांच्या उंच खांबांवर बांधलेलें आहे. सर्व भिंतींवर व खांबांवर हिंदु देवांचीं व इतर चित्रें कोरलेलीं अजून दृष्टीला पडतात. पूर्वीं हीं चित्रें मुसलमानांच्या दृष्टीला पडूं नयेत म्हणून त्यांवर चुन्याचा गिलावा केलेला होता. पण आतां तो पडून गेला आहे, व यामुळें जुनीं चित्रें व लेख दृग्गोचर होऊं लागले आहेत. यावरून या मशिदींत बरेंच काम हिंदु देवळांच्या दगडांचें केलेलें आहे, असें निर्विवाद सिद्ध होतें.

या मशिदीच्या अंगणांत दिल्लीचा प्रसिद्ध लोहस्तंभ आहे. हा स्तंभहि कुतुबमिनाराप्रमाणें एक अजब चीज आहे. हा लोखंडाचा खांब ओतीव आहे. याचा व्यास सोळा इंच आहे, व त्याची जमिनींत पुरल्यासकट उंची साठ फूट असावी. म्हणजे त्यांत एकंदर पावणेपांचशें मण लोखंड आहे. इतक्या वजनाचा स्तंभ ओतला असेल कसा, याबद्दल अत्यंत आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं ! या स्तंभावर सर्वांत जुना जो शिलालेख आहे, त्यांत त्या स्तंभाला ' कीर्तिभुज ' असें म्हटलें असून तो 'भाव' नांवाच्या राजानें उभारला, असें लिहिलें आहे. या लेखाचीं अक्षरें गुप्त काळच्या अक्षरांसारखीं आहेत. यावरून हा शिलालेख व हा स्तंभ गुप्त घराण्याचा पाडाव करणाऱ्या एकाद्या राजाचा असावा, म्हणजे तो सन ३१९ मधला असावा, असा अंदाज केलेला आहे. हा लोहस्तंभ दिल्लीच्या तुवर घराण्याचा संस्थापक अनंगपाल या राजानें उभारला, व ' हा लोहस्तंभ वासुकी सर्पाच्या डोक्यापर्यंत भिडला आहे; हा लोहस्तंभ अचल आहे तोंपर्यंत तुझें राज्य राहील,' असें एका विद्वान् ब्राह्मणानें राजाला सांगितलें; पण त्याला तें खरें वाटलें नाहीं, म्हणून त्यानें तो स्तंभ उकरून पाहिला, तों त्याला त्या खांबाचा बुंधा वासुकीच्या रक्तानें भरलेला दिसला ! आपल्या कुशंकेबद्दल राजाला वाईट वाटलें, व त्यानें तो स्तंभ

पुनः उभारविला; पण तो पहिल्यासारखा अचल झाला नाहीं; ढिला राहिला म्हणून या शहराला ' दिल्ली ' किंवा ' ढिली ' हें नांव पडलें, अशी दंतकथा आहे. ही दंतकथा निरनिराळ्या बखरकारांनीं निरनिराळ्या तऱ्हेनें सांगितली आहे, तरी तिचा मथितार्थ सामान्यतः एकच आहे. ही दंतकथा कशी व केव्हां निघाली असेल, हें समजणें आतां कठिण आहे. असो.

कुतुबमिनार व त्या शेजारची मशीद ज्या आंतल्या किल्ल्यांत आहे, त्याला लालकोट म्हणतात. आतां हा बहुतेक पडला आहे; पण हा किल्ला दुसऱ्या अनंगपालानें सन १०६० मध्यें बांधला. याच्यासभोंवार आणखी एक किल्ल्याचा तट आहे. त्याला रायपिठोऱ्याचा किल्ला म्हणतात. हा किल्ला पृथ्वीराज चव्हाणानें मुसलमानांच्या स्वाऱ्यांपासून दिल्लीचें संरक्षण करण्याकरितां बांधला असावा, असा अंदाज आहे. या दोन्ही किल्ल्यांचे आतां मोडक्यातोडक्या तटाखेरीज फारसे अवशेष राहिले नाहींत.

इतकें पाहून झाल्यावर आम्ही या ठिकाणाहून परत फिरलों. परत येतांना आम्ही आल्या मार्गानें गेलों नाहीं, तर दुसऱ्याच रस्त्यानें जाऊन प्रथमतः हुमायुनाचें कबरस्थान पाहिलें. ही कबर हुमायून बादशहाच्या बेगमेनें त्याच्या मरणानंतर सन १५५४ मध्यें बांधली. अर्थात् मोंगल-घराण्याच्या वास्तुकलेचा हा अगदीं प्रारंभींचा मासला आहे. या कबरेभोंवतीं मोठी बाग असून तिच्या सभोंवार तट आहे. याला एकंदर चार दरवाजे आहेत. ही इमारत तांबड्या दगडाची आहे. मात्र मधला घुमट शुद्ध संगमरवरी आहे. इमारतीच्या चार कोनांना चार मनोरे आहेत. हें कबरस्थान दिल्लीच्या पहाण्यालायक इमारतींपैकीं एक आहे यांत शंका नाहीं.

येथून निघून आम्ही पुराणा किल्ला पहावयाला गेलों. हा किल्ला पूर्वीं अगदीं मातींत गडदून गेला होता. पण आम्ही गेलों त्या वेळीं सर्व किल्ल्यांत जारीनें काम चालू होतें. किल्ल्याचा तट वगैरे सर्व भाग मोकळे करण्यांत आले होते, व किल्ल्याच्या आंत उंच सखल भागाची सपाट जागा बनविण्याचा क्रम चालू होता. या किल्ल्यांतील आवार फारच मोठें आहे. या सर्व आवारांत नव्या दिल्लीकरितां मोठा थोरला पार्क करावयाचा

आहे, व म्हणूनच सर्व जागा साफसुफ व सपाट करण्यांत येत आहे, असें आम्हांला कळलें.

या किल्ल्याला इंद्रप्रस्थ म्हणतात. हा किल्ला हुमायून बादशहानें सन १५३३ मध्यें दुरुस्त केला. या किल्ल्याच्या भिंती व बुरूज फारच प्रचंड असून पूर्वकाळीं त्यासभोंवतीं यमुना नदीचा कालवा आणिलेला होता. या किल्ल्याची पुढें शीरशाहा बादशहानें आणखी दुरुस्ती केली. या किल्ल्यांत शीर मंदिर व एक मशीद इतकींच जुनीं कामें पाहण्यासारखीं आहेत.

हा किल्ला पाहून होतो तों बारांचा सुमार झाला म्हणून आम्ही तेथून निघालों, तों दिल्लीच्या दुसऱ्या बाजूच्या वेशीनें आंत शिरून आमच्या बिऱ्हाडीं सुमारें एक वाजतां जाऊन पोहोंचलों.

जेवणखाण झाल्यावर आम्ही सायंकाळपर्यंत विश्रांतीच घेतली, व अगदीं संध्याकाळीं शेजारच्या एका बागेंत हवा खाण्याकरितां गेलों. या बागेंत बंडामध्यें मर्दुमकी गाजविलेल्या निकलसनसाहेबाचा पुतळा उभारला आहे.


येथें बसलों असतांना दिल्लीच्या पुराणकाळापासूनच्या स्थित्यंतराची हकीकत मनांत येऊन एक प्रकारचा चमत्कार वाटला. काय असेल तें असो; पण या ठिकाणचा हिंदुस्तानाशीं त्याची राजधानी म्हणून किती तरी दिवसांचा संबंध आहे. इंद्रप्रस्थ हें या ठिकाणचें मूळचें नांव. ही पांडवांची राजधानी. पांडव कोणत्या काळीं झाले, व महाभारतांतील कौरव पांडवांचें युद्ध कधीं झालें याबद्दल अजूनहि विद्वानांत वाद आहे. कांहींजण या युद्धाला ख्रिस्तीशकापूर्वीं पांचसातशें वर्षें इतक्या काळांत आणून सोडतात, तर कांहींजण तो काळ तीन हजार वर्षें मागें ढकलतात. यांपैकीं खरें कोणतें, हें समजणें कठीण आहे. पण अगदीं अलीकडे पुराणांतील निरनिराळ्या राजांच्या वंशावळींच्या साहाय्यानें व पुराणांत असलेल्या परीक्षिताच्या जन्माच्या काळापासून नंदाच्या कारकीर्दीपर्यंतच्या उल्लेखावरून भारतीययुद्ध ख्रिस्तीशकापूर्वीं पंधराशेंच्या सुमाराला झालें असावें, असा जो अंदाज करण्यांत आला आहे तो खरा असावा, असें




२ कन्यामहाविद्यालय—वीणावादन—जलंदर.



कन्यामहाविद्यालय, पाकशास्त्रवर्ग—जालंदर.



सुवर्णमंदिर—अमृतसर.



शीखपंथाचे गुरु—अमृतसर.

मला वाटतें. पांडवांच्या कालच्या खुणांना दंतकथेखेरीज आणि इन्द्रप्रस्थ व महाभारतांत आलेलीं इतर नांवें याखेरीज पुरावा नाहीं. दिल्ली हें नांव प्रथमतः इसवीसनापूर्वी पाऊणशें वर्षांच्या सुमाराला पडलें असावें. पुढें ७९२ वर्षें दिल्ली ही राजधानी नव्हती, असा उल्लेख आहे, व दिल्लीला महत्त्व त्या काळीं नसावें, असें फेहायन व हुएनसांग या दोन्ही चिनी प्रवाशांच्या प्रवासांत दिल्लीचा उल्लेख नाहीं, यावरून खरें ठरतें. तुवर घराण्याचा प्रस्थापक अनंगपाल यानें पुनः दिल्ली शहर वसविलें, तेव्हांपासून हिंदु दिल्लीच्या वैभवाला सुरुवात झाली. याच घराण्यांतला दुसरा अनंगपाल यानें १०६० मध्यें लालकोट हा किल्ला बांधला, व जुन्या दिल्लीचें पुनरुज्जावन केलें. पुढें तुवर घराण्याचा चव्हाण घराण्यांतील विशालदेव यानें पराभव केला. या विशालदेवाचा नातू पृथ्वीराज हाच चव्हाण आणि तुवर या दोन्ही घराण्यांचा नातू होता. कारण, पृथ्वीराजाची आई अनंगपालाची मुलगी होती. हा पृथ्वीराज मोठा पराक्रमी राजा होता. त्यानें सर्व उत्तरहिंदुस्तानभर आपलें साम्राज्य केलें. या पृथ्वीराजाचा पराभव ११९१ मध्यें कुतुबुदिन घोरी या मुसलमानानें केला, व तेव्हांपासून दिल्ली ही मुसलमान बादशहांची राजधानी झाली. पुढें बहुतेक प्रत्येक मुसलमानी बादशहानें नवें शहर वसविलें, व या शहरांचा व किल्ल्यांचा क्रम दक्षिणेकडून उत्तरेकडे होता. शेवटचें दिल्ली शहर म्हणजे हल्लींचें दिल्ली शहर शहाजहान बादशहानें बांधिलें. औरंगजेबापासून दिल्लीच्या बादशहांचें महत्त्व कमी झालें, व हिंदुस्तानांत मराठे, शीख वगैरेंची सत्ता होऊन शेवटीं इंग्रजांचें साम्राज्य स्थापन झालें, व या दर्यावर्दी लोकांनीं कलकत्ता हिंदुस्तानची राजधानी केली. पण काय नेमानेम असेल तो असो; कांहीं अकल्पित कारणांनीं पुनः दिल्ली हेंच ठिकाण हिंदुस्तानची राजधानी बनलें, व इंग्रजांच्या वैभवाला साजे अशी राजधानी जुन्या इंद्रप्रस्थासमोर होऊं घातली आहे. या शहराचीं हीं स्थित्यंतरें मनांत येऊन मला विलक्षण आश्चर्य वाटलें.



४

जलंदर कन्यामहाविद्यालय.

माझ्या प्रवासाच्या कार्यक्रमांत ज्या संस्थेची माहिती व इतिहास यांचें शब्दचित्र रेखाटण्याचा माझा मानस होता, त्या जलंदर कन्यामहाविद्यालयाची कांहीं शिष्य शिक्षक मंडळी मुंबई इलाख्यांतील बडोदें, मुंबई व पुणें या तीन ठिकाणीं एकदां येऊन गेली आहेत, व त्यांचीं या तीनहि ठिकाणीं संस्कृतांत व हिंदींत व्याख्यानें झालेलीं आहेत. मंडळीचा तो सफेत, साधा व समान पोषाख, संस्कृतांत व हिंदींत अस्खलित बोलण्याची पद्धति, आणि उदार व देशाभिमानी विचार यांचें प्रत्यक्ष दर्शन ज्यांना झालें आहे, त्यांच्या मनांत या कन्यामहाविद्यालयाच्या योग्यतेविषयीं उत्तम कल्पना आल्यावांचून राहिली नाहीं. या मंडळीच्या स्वारीच्या निमित्तानें या विद्यालयासंबंधीं बरेच लेख व उल्लेख वर्तमानपत्रें आणि मासिकपुस्तकें यांमध्यें येऊन गेले आहेत. यामुळें महाराष्ट्रीयांना हें कन्यामहाविद्यालय थोडेंफार श्रुतिपरिचित आहे असें धरून चालण्यास हरकत नाहीं. आतां या विद्यालयांत जाऊन तेथली जी प्रत्यक्ष स्थिति व व्यवस्था मी पाहिली, त्यांचें थोडक्यांत वर्णन देण्याचा माझा या लेखांत विचार आहे.

आम्ही कन्यामहाविद्यालय सकाळींच पहाण्यास गेलों. कारण, उन्हाळ्यामुळें येथें मेपासून जुलै–आगष्टपर्यंत सकाळची शाळा भरवावी लागते. पहिल्यानें आम्ही गांवाबाहेर असलेल्या मुख्य विद्यालयाकडे गेलों. गांवाबाहेर विद्यालय नुकतेंच नेलें आहे, व अजून तेथें मुख्य इमारती व्हावयाच्या आहेत. मुख्य इमारतीच्या सभोंवार चौकाकार असे एकमजली सोपे बांधण्यांत आले आहेत. तेथेंच सध्यां वर्ग बसतात. पुढें या सोप्यांचा रहाण्याकरतां उपयोग व्हावयाचा आहे.

आम्ही अगदीं खालच्या वर्गापासून तों थेट संस्कृत कॉलेजच्या वर्गापर्यंत सर्व वर्ग पाहिले. कोठें गणित चाललें होतें, तर कोठें इतिहास चालू होता; कोठें संस्कृताचें अध्ययन सुरू केलें होतें, तर कोठें इंग्रजीचा तास चालू होता; कोठें गायनाची लकेर ऐकूं येत होती, तर कोठें सतारवादनाचा नाद ऐकूं येत होता; कोठें शिवणकाम सुरू होतें, तर कोठें चित्रांचें काम चालू होतें. याप्रमाणें बौद्धिक, ललित व शारीरिक व्यापारांत व्यग्र असलेल्या लहानमोठ्या—पण सारख्या पोषाखाच्या—कन्यांचे वर्ग पाहून आम्हांला फार कौतुक वाटलें.

सर्व ठिकाणीं शिक्षण हिंदी भाषेंतून चालू होतें. एका झाडाखालीं दोनतीन मुली संस्कृत शिकत होत्या. त्यांना एक पंडित संस्कृतांत कांहीं भाग समजावून देत होता. मुली संस्कृतांतच उत्तर देत होत्या. या मुली पंजाब युनिव्हर्सिटीच्या ' शास्त्री ' परीक्षेकरितां तयारी करीत आहेत, असें मला सांगण्यांत आलें. तेथील विद्यार्थिनींची ती संस्कृतांतील पारंगतता पाहून मला उत्तररामचरित या नाटकामधील तमसा व मुरला यांच्या संवादाची आठवण झाली, व पूर्वकालीन ऋषिपत्नींचें स्मरण झालें, आणि असें मनांत आलें, कीं, आर्य लोकांच्या प्रभातिकाळांत स्त्रियांना विद्येची जी मुभा होती, ती जर हल्लीं आमच्या सर्व स्त्रियांना मिळेल, तर स्त्रिया आपलें बुद्धिसामर्थ्य पुरुषांप्रमाणेंच प्रगट करतील, यांत संदेह नाहीं. ' बायका संस्कृत बोलावयाला लागल्या, ह्मणजे नुकत्याच वेसण घातलेल्या बैलाप्रमाणें सूं सूं करतात, ' ही मृच्छकटिकांतील टीका फक्त विदूषकी आहे, व ज्या वेळीं स्त्रियांना संस्कृतवाङ्मयोपवनांत मज्जाव झाला, त्या काळची ही हेटाळणी आहे, असें या विद्यार्थिनी पाहून माझ्या प्रत्यक्ष अनुभवाला आलें.

सर्व वर्ग पाहून झाल्यावर आम्ही, मुली बागेंत काम करीत होत्या तेथें गेलों. प्रत्येक मुलीला जमिनीचा एक लहान तुकडा देतात, व त्यांत मुली बागबगीचा बनविण्याचें काम शिकतात. कांहीं मुली खुरपीत आहेत, कांहीं कुदळीनें जमीन उखळीत आहेत, तर कांहीं ताटव्याला पाणी घालीत आहेत, असें आमच्या दृष्टोत्पत्तीला आलें. नंतर आम्ही मुलींच्या जेवणाच्या

व रहाण्याच्या जागा पाहिल्या. सर्व ठिकाणीं आम्हांला टापटीप, नीटनेटके-पणा, व व्यवस्थितपणा दिसून आला. स्वभावतःच मुलांपेक्षां मुलींमध्यें टापटीप अधिक असते, व या प्रवृत्तीला शाळेंत उत्तेजन दिलें गेलें म्हणजे मुलींचा तो स्वभावच बनतो. असो.

हें गृहोद्यान पाहून होतें आहे, तोंच शाळेचे संस्थापक लाला देवराज यांनीं कांहीं मुलींना अंगणांत बोलावून आणलें, व त्यांना एक अभिनय-गीत म्हणावयाला सांगितलें. गीत हिंदी भाषेंत असल्यामुळें आम्हांला सर्व समजलें नाहीं; तरी पण साधारण गोषवारा कळत होता. त्या गीतांत वर्णिलेल्या कामाचा व कृत्याचा अभिनय मुली करीत होत्या. असलीं अभि-नयगीतें अगदीं खालच्या वर्गांतील मुलींकडून म्हणवून घेण्याचा परिपाठ आहे, असें आम्हांला समजलें. या पद्धतीपासून सर्वांना एक तालांत म्हण-ण्याची संवय होते. शिवाय अभिनयापासून थोडासा व्यायामहि होतो. याप्रमाणें ज्ञान, आनंद व व्यायाम या तिहींचा लाभ या अभिनयगीतां-पासून होतो.

आमचें वर्ग पहाणें चालू असतां लाला देवराज यांनीं " सर्व मुलींना अंगणांत एके ठिकाणीं जमवून आपली ओळख करून देण्याची माझी इच्छा आहे; त्या वेळीं आपण मुलींना चार उपदेशपर शब्द सांगावे अशी आपणाला माझी विनंति आहे. " असें मला म्हटलें. " इतकें करण्याची जरुरी नाहीं, " असें मी म्हटलें तरी ते ऐकेनात ! तेव्हां हा आदर व बहुमान श्रीयुत प्रो. कर्वे यांचा (कारण त्यांनीं माझ्याबद्दल लाला देवराज यांना लिहिलें होतें.) व फर्ग्युसन कॉलेजचा आहे, असें मनांत समजून आणि तो आदर व बहुमान ज्याचा त्याला मनांतल्या मनांत पोहोंचता करून मी लालाजींच्या म्हणण्याला रुकार दिला; तेव्हां त्यांनीं सर्व मुली अंगणांत आणून उभ्या केल्या.

दीडशें पावणेदोनशें मुलींचा तो समुदाय पाहून मला या विद्यालयाच्या कामगिरीबद्दल सानंद कौतुक वाटलें. जो प्रांत इंग्रजी अंमलाखालीं बऱ्याच उशीरानें आला, जेथें पुरुषांचेंहि शिक्षण इतर प्रांतांचे मानानें कमी आहे, व ज्या प्रांतांत पडद्याचा अंमल जारीनें चालू आहे, त्या प्रांतांतच पड-

द्याची चाल बाजूला सारून इतक्या मुली विद्यार्जनासाठीं पुरुष शिक्षक असलेल्या शाळेंत गोळा होतात, हें पाहून आर्यसमाजाच्या कर्तृत्वशक्ती-बद्दल कोणाला आनंद वाटणार नाहीं ? शिवाय या शाळेंत विद्यार्थिनींचा सारखा पोषाख ठरविलेला आहे. ठरीव पोषाखाची पद्धति मी गुरुकुलां-तहि पाहिली होती. येथेंहि तशीच समान पोषाखाची रीत दिसली. जी समान पोषाखाची गोष्ट आमच्या इकडे मोठमोठ्या शाळांना करतां आली नाहीं व येत नाहीं, ती गोष्ट मुलींसंबंधींसुद्धां पंजाबांत घडून येते; यावरून पंजाबांत प्रगतिप्रियता इतर प्रांतांपेक्षां अधिक आहे, अशी खात्री पटल्या खेरीज रहात नाहीं.

सर्व मुली याप्रमाणें जमल्यावर लाला देवराज यांनीं माझ्याबद्दल चार शब्द सांगून मला बोलण्यास विनंति केली. येथपर्यंत सर्व ठीक झालें पण या वेळीं माझ्या मनाला किती वाईट वाटलें, याची वाचकांना कल्पनाहि येणें अवघड आहे. आपल्या समोर असलेल्या मुली आपल्याच देशांतील आहेत; त्या सर्व हिंदु आहेत; नवीन आर्यसमाजपंथी आहेत; त्यांचे धर्म-ग्रंथ व आपले धर्मग्रंथ एकच आहेत; रामायण, महाभारत हीं पुराणें व त्यांतील थोर स्त्रीपुरुषांचीं चरित्रें हीं दोघांनाहि परिचित आहेत. सारांश, जुनी संस्कृति एकच असून आपलें हृद्गत या मुलींना सांगण्याकरितां मला परक्या ' इंग्रजी ' भाषेचा आश्रय करावा लागला, हें पाहून माझी मलाच लाज वाटली ! आपल्या देशांत जर एकराष्ट्रीयत्व चांगलें बद्धमूल व्हाव-याचें असेल, आमच्या मुलांबाळांमध्यें लहानपणापासून राष्ट्रीय भावना उद्भूत व्हावयाच्या असतील, तर हिंदुस्तानवासीयांना एक भाषा अवश्यक आहे, व ही एक भाषा इंग्रजी होणें शक्य नाहीं. देशांतील तेहतीस कोटि प्रजेला बोलण्यासारखें किंवा समजण्यासारखें इंग्रजी येणें दुरापास्त आहे. हिंदी भाषाच हिंदुस्तानची एकराष्ट्रीय भाषा होण्याला कांहीं अंशानें तरी पात्र आहे, असें मला वाटलें. यांत अडचणी अतिशय आहेत व विशेषतः ही गोष्ट शक्यकोटींत येण्यास दक्षिणहिंदुस्तानची मोठी धोंड वाटेंत आहे हें खरें आहे. पण त्या क्षणीं तरी आपल्याला हिंदी येत नाहीं, याबद्दल मनाला थोडासा खेद झाला. पण आयत्या वेळीं अशा वाईट वाट-

ण्याचा उपयोग काय ? भाषा आयत्या वेळीं थोडीच येते आहे ! अर्थात् सर्व लाज बाजूला ठेवून मला जें काय त्या मुलींना सांगावयाचें होतें, तें मी इंग्रजींत सांगितलें, व त्याचा गोषवारा लालाजींनीं पुनः हिंदींत सांगितला, आणि मग त्यांनीं ' **शिष्टागमनेऽनध्यायः** ' या न्यायानें मुलींना ' आतां सुटी आहे ' म्हणून जाहीर केलें; तेव्हां सर्व मुली आनंदानें आपापल्या खोल्यांत गेल्या.

याप्रमाणें कन्यामहाविद्यालयाचा मुख्य भाग पाहून झाल्यावर आम्ही या विद्यालयाची गांवांतली शाखा पहावयाला गेलों. ही इमारत विद्यालयाच्या मालकीची आहे, व ती वाढविण्याला विद्यालयांतून शिकून गेलेल्या एका श्रीमान् बाईनें पैसे दिले, असें आम्हांला समजलें. त्या देणगीच्या स्मारकासंबंधीं संगमरवरी दगडावरील लेख आम्ही पाहिला. हल्लीं या ठिकाणीं फक्त प्राथमिक शाळा होती. या सर्व मुली गांवांतून येतात. या मुलींचेहि पोषाख एकसारखेच होते. लालाजींनीं असें सांगितलें, कीं, विद्यालयाच्या अनुकरणानें पंजाबांत लहान मुलींचा पोषाख आतां बहुतेक एक तऱ्हेचाच झाला आहे. लहानशाच बाबतींत पण केवढी क्रांति या विद्यालयानें घडवून आणली आहे, हें आम्हांला दिसून आलें. येथेंहि आम्ही सर्व वर्ग हिंडलों, मुलींच्या शिवण–विणकामाचे मासले पाहिले, व शाळेच्या शिक्षकमंडळीचे आभार मानून आम्ही लालादेवराज यांच्या घरीं आलों. आतां या महाविद्यालयाच्या उत्पत्तीचें, वाढीचें व त्याच्या विशेषांचें थोडें दिग्दर्शन करून हा लेख संपवूं.

जलंदरचें कन्यामहाविद्यालय ही संस्था या नांवानें चालू झाल्यास फार वर्षें झालेलीं नाहींत. पण तिची पूर्वपरंपरा बरीच जुनी आहे. जलंदरच्या आर्यसमाजाच्या मुख्य सभेनें १८८६ मध्यें ' झनाना शाळा ' नांवाची एक शाळा काढली. त्यांत १२ मुली शिकत होत्या. पण शिक्षकिणींच्या दुर्भिक्षामुळें व पैशाच्या अभावामुळें शाळा रडतकडत चालली होती. पुढें [illegible]९० मध्यें याच शाळेचें ' Girls School ' मध्यें रूपांतर झालें. पुढें श्रीमंत ला[illegible]देवराज हे या शाळेची व्यवस्था पाहूं लागले, व त्यांच्यासारखा [illegible] पण स्त्रीशिक्षणाचा खरा कैवारी–शाळेला लाभल्यामुळें शाळेला

१६

चांगलें स्वरूप येणार, असा रंग दिसूं लागला. यामुळें परकीय नांव जाऊन ' कन्यापाठशाळा ' असें देशी नांव या शाळेला मिळालें. १८९२ सालीं या शाळेंत ५५ मुली शिकूं लागल्या. पडद्याची चाल जारीनें चालू असलेल्या प्रांतांत ही प्रगति कांहीं कमी नव्हे, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

ता. १५ जून १८९६ या दिवशीं या शाळेला ' कन्यामहाविद्यालय ' असें अन्वर्थक नांव देण्यांत आलें. कारण लहानशा प्राथमिक शाळेला आतां मोठ्या विद्यालयाचें रूप येत चाललें होतें. या विद्यालयाची स्वतंत्र संस्था बनली, व ती रजिस्टर करण्यांत आली. शिक्षणक्रमांतहि पुष्कळ सुधारणा करण्यांत आली. या संस्थेचे नियम व ध्येय ठरविण्यांत आलें. याप्रमाणें संस्थेला कायमपणा येऊन तिच्याबद्दल लोकांचा विश्वास वाढत चालला. त्यामुळें दूरदूर ठिकाणाहून मुली विद्यालयांत येऊं लागल्या.

पुढें कन्यामहाविद्यालयाला जोड म्हणून विधवाभवनहि काढण्यांत आलें, व नंतर दुष्काळांत अनाथ झालेल्या मुलींकरितां एक अनाथालय काढलें होतें त्या मुलींची व्यवस्थाहि याच संस्थेकडे देण्यांत आली. अशा तऱ्हेनें या संस्थेचा कारभार वाढत चालला. प्रथमतः हें कन्यामहाविद्यालय गांवांतील एका घरांत होतें. पुढें तें संस्थेच्या मालकीचें घर झालें. पण मुली–विशेषतः बाहेरगांवच्या मुली–वाढूं लागल्या तसतशी बोर्डिंगाची आवश्यकता वाढत चालली, व गांवाबाहेर विद्यालय नेण्यांत आलें. गांवांतल्या घरांत प्राथमिक शाखा मात्र ठेवण्यांत आली. गांवाच्या बाहेरच्या शाळेंत एकंदर दोनशेंच्या वर विद्यार्थिनी आहेत, व गांवांतील प्राथमिक शाळेंत सुमारें १७५ मुली आहेत.

शाळेच्या गांवांतील व बाहेरील इमारती, जागा, पुस्तकालय, सामानसुमान वगैरे सर्व मालमत्ता साठ हजारांच्या वर गेली आहे. नव्या मुख्य इमारतीकरितां लाखदीडलाख रुपये जमविण्याची खटपट चालू आहे. एकंदर शाळेंत शिक्षक व शिक्षकिणी मिळून सुमारें पंचवीस लोक आहेत. यांपैकीं कांहीं शिक्षकिणी विद्यालयांतच तयार झालेल्या आहेत, व त्या मोफत काम करतात, ही प्रशंसनीय गोष्ट आहे.

येथपर्यंत विद्यालयाच्या उत्पत्तीचा व वाढीचा इतिहास आणि सामान्य

आंकडेमोडी माहिती दिली. आतां या संस्थेच्या विशेषांकडे वळूं.

या विद्यालयाचा पहिला विशेष म्हणजे ही शाळा आर्यपंथी लोकांनीं आपल्या धर्माचा प्रसार करण्याच्या हेतूनें काढलेली आहे. यामुळें धार्मिक-शिक्षण व विशेषतः आर्यसमाजी धार्मिकशिक्षण हें एक शिक्षणांतलें मुख्य अंग आहे. व्यावहारिकशिक्षण हें दुसरें अंग आहे. म्हणूनच या शाळेंत प्रथमतः सर्व मुली जमून एक देवाची प्रार्थना करतात, व मग शाळेच्या शिक्षणक्रमाला सुरुवात होते. ही आर्यसमाजाची धार्मिकशिक्षणाची शाळा असल्यामुळें अर्थातच या शाळेच्या शिक्षणक्रमाचा सरकारी विद्याखात्याशीं कांहींएक संबंध नाहीं, व विद्याखात्याचा ताबाहि या शाळेवर नाहीं. या शाळेंत अगदीं पहिल्या इयत्तेपासून तों थेट कॉलेजच्या 'शास्त्री' परीक्षेला तयार करणाऱ्या वर्गापर्यंत धार्मिकवाङ्मय हा एक आवश्यक विषय आहे. इयत्तेच्या मगदुराप्रमाणें भजनापासून तों थेट गीतेच्या सार्थ अध्ययनापर्यंत धार्मिक शिक्षण दिलें जातें.

या शाळेचा दुसरा विशेष म्हणजे येथें चार वर्षांचें प्राथमिक शिक्षण संपल्यापासून संस्कृत हा विषय आवश्यक आहे, व तो सर्व इयत्तांमध्यें शिकविला जातो. मुलींना थोडेंफार संस्कृत बोलतां येईल, अशी तजवीज केली जाते. म्हणजे आठवड्याच्या वादविवाद सभेंत कधीं संस्कृतांत, तर कधीं इंग्रजींत व सामान्यतः हिंदी भाषेंत वादविवाद चालतात. यामुळें कांहीं मुलीना तरी संस्कृत बोलण्याचा सराव होतो.

या शाळेचा तिसरा विशेष म्हणजे येथें सर्व शिक्षण हिंदी भाषेच्या द्वारें देण्यांत येतें. इतिहास, भूगोल, गणित, आधिभौतिक शास्त्रें वगैरे सर्व विषय वरच्या इयत्तेपासून तों खालच्या इयत्तेपर्यंत हिंदी भाषेंतच शिकविले जातात. यामुळें मुलींना विषय समजण्याला सोपें जातें; कालाचा व मुलींच्या स्मरणशक्तीचा उगाच अपव्यय होत नाहीं, व म्हणूनच थोड्या वर्षांत मुलींना अधिक ज्ञान संपादन करतां येतें.

या शाळेचा चवथा विशेष म्हणजे येथें मुलींना व स्त्रियांना अवश्य असें गृहशिक्षण व ललितकलांचें शिक्षण देण्यांत येतें. गृहशिक्षणांत शारीरज्ञान, आरोग्यविज्ञान, शुश्रूषाशास्त्र, पाकशास्त्र वगैरे शास्त्रांचीं मूलतत्वें व सोपीं

सोपीं प्रमेयें यांचा अन्तर्भाव होतो व या सर्व गोष्टींचें सप्रयोग शिक्षण या विद्यालयांत दिलें जातें. त्याचप्रमाणें ललितकलांमध्यें गायनवादन, चित्रकला, विणकला वगैरेचा अन्तर्भाव होतो व या बद्दलचेंहि प्रत्यक्ष शिक्षण येथें देण्यांत येतें.

या शाळेचा पांचवा विशेष म्हणजे येथें इंग्रजी हा ऐच्छिक विषय आहे. प्रत्येक मुलीनें इंग्रजी शिकलें पाहिजेच, असा सक्त नियम नाहीं. साधारण इंग्रजी समजण्याकरितां पुष्कळ मुली हा विषय घेतात, हें खरें आहे; पण पुष्कळ मुलींना हा विषय न घेतांसुद्धां आपला शिक्षणक्रम पुरा करतां येतो. उदार व उच्च शिक्षणांत इंग्रजी हा विषय आवश्यक असावा किंवा नाहीं व स्त्रीशिक्षणांत त्याची आवश्यकता आहे किंवा नाहीं हा थोडा वादग्रस्त प्रश्न आहे. या विद्यालयांत संस्कृत मात्र सर्वत्र आवश्यक व इंग्रजी मात्र ऐच्छिक ही व्यवस्था निदान मला तरी फाजील पुराणप्रियतेची द्योतक वाटली.

या शाळेचा सहावा व शेवटचा विशेष म्हणजे येथें स्त्रियांच्या शिक्षणाचा क्रम स्वतंत्र रीतीनें ठरविलेला आहे. येथें एकंदर दहा वर्षांचा शिक्षणक्रम आहे, व त्याचे चार भाग केले असून त्यांना जुनीं संस्कृत नांवें दिलीं आहेत, तीं अशीं:-प्राथमिक क्रमाला ' सभ्य ' म्हणतात; मध्यक्रमाला ' शिक्षित ' म्हणतात, उच्चक्रमाला ' दीक्षित ' म्हणतात, व विश्वविद्यालयीन क्रमाला ' स्नातक ' म्हणतात. अभ्यासाच्या व पुस्तकांच्या यादीवरून या दहा वर्षांत आपल्या इकडच्या इंटरमिडिएट (इंग्रजी शिवायकरून) इतकें ज्ञान विद्यार्थिनींना मिळत असावें, असें दिसतें. मुली सरासरी सहाव्या वर्षीं शिकावयाला लागल्या, तर त्यांचा शिक्षणक्रम सोळाव्या वर्षीं पुरा होईल. या वयानंतर बऱ्याच मुली लग्न होऊन सासरीं जातात. या हिशोबानेंच असा शिक्षणक्रम येथें आंखण्यांत आला आहे, असें उघड दिसतें.

जलंदर कन्यामहाविद्यालय पाहिलें, म्हणजे पुणेंकरांना अर्थात् श्रीयुत प्रो. कर्व्यांच्या संस्थांची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं. पंजाबांतील व महाराष्ट्रांतील या दोन आदर्शभूत संस्थांमध्यें पुष्कळ बाबतींत साम्य

आहे. दोन्ही संस्थांचा आरंभ नदीच्यां उगमाप्रमाणें अगदीं लहान प्रमाणावर होऊन कालेंकरून त्या संस्था वाढून त्यांनीं प्रचंड स्वरूप धारण केलें. दोन्ही संस्थांच्या प्रथमावस्थेंत त्यांना लोकापवाद व लोकनिंदा सहन कराव्या लागून नंतर त्या लोकप्रिय झाल्या. दोन्ही संस्थांच्या प्रगतीचें श्रेय दोन व्यक्तींच्या विलक्षण उत्साहाला आहे. ज्याप्रमाणें आमच्या इकडल्या संस्थांचा आत्मा प्रो. कर्वे होत, त्याप्रमाणें जलंदरच्या संस्थांचा आत्मा म्हणजे लाला देवराज हे होत. हे गृहस्थ या संस्थेचे प्रिन्सिपॉल आहेत. यांची या संस्थेबद्दलची कळकळ विलक्षण आहे. हे आपलें घरचें काम संभाळून या संस्थेकरितां जिवापाड मेहनत करतात. यांना प्रत्येक मुलगी ठाऊक आहे. ते सर्व मुलींजवळ पितृप्रेमानें वागतात, त्यांच्या बरोबर खेळतात, त्यांच्याबरोबर गातात, त्यांच्याबरोबर काम करतात. यामुळें सर्व मुलींचें लालाजींवर विलक्षण प्रेम आहे.

या दोनहि संस्था सर्वस्वीं लोकाश्रयावर चालू आहेत. यांना सरकारी मदत नाहीं, किंवा विद्याखात्याचा ताबा यांवर नाहीं. यामुळें अभ्यासक्रमांत फेरबदल करण्याची या संस्थांना पूर्ण मुभा आहे.

या दोनहि संस्थांत कुमारिका व विधवा यांचें सध्यां शिक्षण चालतें. मात्र या शिक्षणाची वाढ निरनिराळ्या क्रमानें झाली आहे. पंजाबांत कुमारिकांच्या शिक्षणाची संस्था आधीं निघून मग त्याला विधवाभवनाची जोड मिळाली. महाराष्ट्रांत अनाथबालिकाश्रम आधीं निघाला, व मग त्याला महिलाविद्यालयाची जोड देण्यांत आली. कांहीं दिवस या संस्था निरनिराळ्या चालल्या पण अलीकडे त्यांचा एकजीव होऊन दोन्ही संस्थांची एकच मोठी संस्था झाली आहे.

येथपर्यंत या दोन संस्थांतील साम्याचा विचार झाला. आतां त्यांतील वैषम्याचा विचार करूं. कन्यामहाविद्यालय हें एका प्रगतिपर पण विशिष्ट धर्मपंथाचें विद्यालय आहे. यामुळें अर्थातच येथें विशिष्ट धार्मिक व संस्कृत शिक्षण यांवर फार भर आहे व इंग्रजी केवळ ऐच्छिक विषय आहे. प्रो. कर्वे यांची संस्था ही कोणत्या एकाहि धर्मपंथाची संस्था नाहीं, यामुळें

येथें सामान्य धर्मविषयक व नीतिविषयक शिक्षण देण्यांत येतें व संस्कृतवर फार भर देण्यांत येत नाहीं व इंग्रजी विषय आवश्यक आहे.

याप्रमाणें कन्यामहाविद्यालय पाहिल्यामुळें माझ्या मनांत वरील प्रकारचे तुलनात्मक विचार येत होते. प्रो. कर्वे यांनीं नुकतेंच भारतमाहिलाविद्यापीठ स्थापन करून स्त्रीशिक्षणाच्या कामाला कळसच चढविला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पंजाबांत अझून अशा प्रकारचा उपक्रम झाला नाहीं हें खरें पण कालेंकरून जलंदर कन्यामहाविद्यालयांतूनच स्त्रियांचें विश्वविद्यालय निघणार नाहीं कशावरून असें माझ्या मनांत आलें. असो.

आम्ही जलंदर येथें एक दिवसच होतों. सायंकाळ जलंदरच्या प्रमुख मंडळीची ओळख करण्यांत व त्यांच्याशीं संभाषण करण्यांतच आम्हीं घालविला, व पहाटेला निघून आमच्या पुढच्या मुक्कामाला गेलों.

५

अमृतसर व लाहोर.

माझ्या प्रवासाच्या कार्यक्रमांत पंजाबांतील अमृतसर व लाहोर हीं दोन प्रमुख शहरें पहाण्याचा पहिल्यापासून माझा बेत होता. माझे पुण्यांतील एक जुने स्नेही थोड्या दिवसांकरितां लाहोरला गेले होते, त्यांच्या येथेंच उतरण्याचा माझा विचार होता, आणि त्याप्रमाणें त्यांना दिल्लीहून मी पत्र लिहिलें होतें. मात्र अमृतसराला कोठें उतरावयाचें हें नक्की ठरलें नव्हतें. जलंदरला लाला देवराजांच्या येथें पुढील प्रवासाचा बेत ठरवीत असतां असें समजलें, कीं, अमृतसरला शीख लोकांच्या सुवर्णमंदिराखेरीज व तेथल्या प्रसिद्ध गालीच्यांच्या कारखान्याखेरीज विशेष कांहीं पाहण्यासारखें नसून हीं दोन्ही आम्हांला दोन तासांच्या आंत पाहतां येतील, व गाड्यांच्या वेळाहि अशा बेताला फार सोयीच्या आहेत. हें ऐकून अमृतसरला रहाण्याचा एक दिवस व उतरण्याच्या खटाटोपाचा त्रासहि वांचला, ह्मणून अर्थात्च आह्मांला आनंद वाटला व अमृतसरला दोनतीन तासांपेक्षां जास्त वेळ न थांबतां लाहोरास जाण्याचा आह्मी बेत कायम केला. अमूक गाडीनें आह्मी लाहोरास येतों, याबद्दल आमच्या मित्राला तार केली, व आह्मी गाडींत बसलों.

हल्लींची दिल्ली ही इंग्रजांच्या राजकीयप्रांतांच्या व्यवस्थेमध्यें जरी पूर्वी पंजाबांत मोडत असे (आतां दिल्ली व त्या लगतचा भाग यांचा एक स्वतंत्रच प्रांत झाला आहे,) तरी पण आर्य लोकांच्या फार जुन्या व्यवस्थेमध्यें या शहराचा अंतर्भाव मध्यदेशांत होत असे. कारण, गंगा व यमुना यांच्यामधल्या व यांच्या कांठच्या प्रदेशाला ‘ मध्यदेश ’ म्हणत. व सप्तसिंधूंनीं व्यापलेला प्रदेश म्हणजे पंजाब होय, व या प्रदेशाची दक्षिण-

मर्यादा म्हणजे सतलज ही नदी होय. कारण, या प्रांताच्या दक्षिणभागांतून ही नदी वहात गेली असून सात नद्या किंवा अर्वाचीन शब्दाप्रमाणें पंजाबांतील पांच नद्यांपैकीं ही पहिलीच नदी होय. जसजसा मनुष्य येथून उत्तरेला जातो, तसतशा त्याला इतर नद्या लागतात, व पंजाबच्या उत्तरसीमेला प्रचंड सिंधूनद लागतो. दिल्लीहून मुंबईच्या गाडीनें निघालें म्हणजे प्रथमतः सहारहाणपुरापर्यंत आपण संयुक्त प्रांतांतून उत्तरेला जातों, व मग ईशान्य दिशेला वळून पंजाबांत प्रवेश करतों.

दिल्लीस आम्ही रात्रीं नऊ वाजतां गाडींत बसल्यामुळें पंजाबप्रांतांत आम्ही केव्हां प्रवेश केला, हें आह्मांला समजलें नाहीं. पण पांचसाडेपांचांच्या सुमाराला लुधियाना व फिलेर या स्टेशनांच्या दरम्यान आम्हांला सतलज नदीवरील पूल लागला. ती समुद्रासारखी भासणारी–पण संथ प्रवाहाची–नदी पाहून मनाला फार आनंद झाला, व पूर्वींच्या आर्यांनीं या सर्व नद्यांना ‘ सिंधु (समुद्र)’ व या प्रांताला ‘ सप्तसिंधु ’ असें कां म्हटलें, याचें मर्म ध्यानांत आलें. ज्या प्रांतांत प्रथमतः आमचे आर्य पूर्वज येऊन त्यांनीं तेथें वसाहत केली, ज्या ठिकाणीं पूर्वऋषींनीं सृष्टचमत्कारांना देव कल्पून इंद्र, वरुण, वायु, द्यावापृथिवी, उषस् वगैरे नांवांनीं त्या देवतांची प्रार्थना व स्तुति केली, व त्या देवतांकरितां यजनहवन केलें, ज्या प्रांतांतील नद्यांवरून त्यांनीं या प्रांताला ‘ सप्तसिंधु ’ असें नांव दिलें, ज्या नद्यांचें त्यांनीं कौतुकानें वर्णन केलें, त्या प्रांतांत पाऊल टाकल्यानें कांहीं एक अवर्णनीय मिश्र भावना मनांत उभी राहिली. आम्ही आर्यलोक निदान पांच हजार वर्षें तरी या भरतभूमींत सारखे रहात आलों आहोंत, व इतक्या जुन्या काळापासून ज्यांची संस्कृति सारखी चालत आली आहे, असे दुसरे लोक जगांत नाहींत, हें मनांत येऊन एक प्रकारच्या अभिमानाची मनोभावना उद्भूत झाली, तोंच हल्लींच्या आमच्या अवनत स्थितीचें चित्र डोळ्यांपुढें उभें राहून लज्जेची छटा मनांत उद्भवली. आमच्या वेदकालीन पंजाबांतील ऋषिकाळची ती स्वातंत्र्यप्रियता, ती विजिगीषा, या आयुष्याची ती आवड, ती समाजाची एकजीवता हीं मनांत येऊन सानंद आश्चर्य वाटलें, तर हल्लींच्या आमच्या देशबांधवांची

लांगूलचालनपरायणता, ती समाधानी वृत्ति, या संसाराची ती विरक्तता, ती समाजांतील दुही आणि जातिभिन्नता हीं मनांत येऊन सखेद निराशा वाटली.

या मिश्र भावनांनीं मन व्यग्र असतां जलंदर स्टेशन आलें, व आह्मी पंजाबांतील या पहिल्या शहरीं मुक्काम केला. जलंदर येथें आम्ही चोवीस तासच होतों. दुसऱ्या दिवशीं सकाळच्या सहा वाजतांच्याच गाडीनें आम्ही मार्गस्थ झालों.

आजचा आमचा सगळा प्रवास दिवसाचा झाल्यामुळें पंजाब प्रांताची भूगोलविषयक स्थिति आम्हांला सहजच दृग्गोचर झाली. गंगा–यमुनाकांठच्या प्रदेशाप्रमाणें हा प्रांतहि अगदीं सपाट आहे. सर्व क्षितिजावर कोठेंहि डोंगर किंवा पर्वत दृष्टीला पडत नाहींत. जिकडे पहावें तिकडे सपाट व सफेत जमीनच्या जमीन! माझ्यासारख्या कोंकणांत व पुण्यानजीकच्या मावळ प्रांतांत सर्व आयुष्य गेलेल्या मनुष्याला हा सपाटच्या सपाट जमिनीचा देखावा अदृष्टपूर्वच वाटतो यांत शंका नाहीं. पंजाबांत पांच-सहा मोठमोठ्या नद्या व त्यांचे नवेजुने कालवे यायोगानें हा प्रांत चांगला लागवडीला आलेला दिसतो. वाटोवाट लहानलहान कालवे व त्यासभोंवार हिरवींगार शेतें दृग्गोचर होत होतीं.

पंजाबांत हिंदू व मुसलमान यांच्यामध्यें बरीच चुरस व तेढ आहे, असें मी ऐकलें होतें, व याचें बाह्य प्रत्यंतर या प्रांताच्या प्रत्येक स्टेशनवर दिसूं लागलें. गाडी स्टेशनवर आली नाहीं तोंच 'हिंदु पाणी,' 'हिंदु चहा,' 'हिंदु दूध,' हिंदु मेवा,' 'मुसलमान पाणी,' 'मुसलमान चहा,' 'मुसलमान दूध,' 'मुसलमान मेवा' वगैरे आरोळ्या ऐकूं आल्या व त्याच अर्थाच्या पाट्याहि पहाण्यांत आल्या. दक्षिणी माणसाला हा प्रकार चमत्कारिक वाटतो. आपल्या इकडे सुद्धां 'बामणीया पाणी' हा ध्वनि कोठें कोठें ऐकूं येत असे; पण अलीकडे ही ओरडण्याची पद्धत बंद झाल्यासारखीच आहे. एका दृष्टीनें पंजाबांत हिंदूंमध्यें जातिभेदाचें बंड कमी आहे. तर या हिंदू-मुसलमानांच्या तेढीच्या दृष्टीनें इकडे हें बंड फार जोरांत आहे, असें ताब-

डतोब ध्यानांत आलें. सर्व हिंदुस्थानवासीयांनीं आपापले धर्मभेद व जातिभेद हे गौण करून आपण सर्व या अर्वाचीन भारतवर्षाचे बांधव आहोंत, अशी विस्तृत देशाभिमानाची भावना–अर्थात् हिंदु किंवा मुसलमान यापेक्षां ' मी हिंदी आहें, ' ही भावना–जोरानें वाढण्यानेंच आपल्या देशाचें खरें कल्याण होणार आहे, अशी माझी दृढ समजूत असल्यामुळें हा द्वैधीभावाचा उच्चैर्घोष माझ्या कानांना अर्थातच फार कटू लागला. हा उच्चैर्घोष ऐकून मला वाटलें, कीं, आम्हांमध्यें द्वैधीभावाची कमाल झाली आहे. आम्ही समाजांत व माणसांत कृत्रिम भेदभाव निर्माण करूनच राहिलों नाहीं, तर हा कृत्रिम भेदभाव आम्ही नैसर्गिक वस्तूंपर्यंत नेऊन ' **तीर्थोदकं च वन्हिश्च नान्यतः शुद्धिमर्हतः** ' या म्हणीला हरताळ लावून तिचें ' **तीर्थोदकं च वन्हिश्च स्पर्शेणाशुची भवतः** ' असें रूपांतर केलें आहे. तेव्हां अशा स्थितींत आमच्या देशाची धडगत कशी लागावी !

अशा प्रकारचे कांहींसे उद्विग्नतेचे विचार माझ्या मनांत येत असतांच आठांच्या सुमाराला अमृतसर स्टेशन आलें. येथून लाहोरास जावयाला आम्हांला साडे अकरा वाजतां गाडी होती. तेव्हां आम्हांला येथें तीनच तास थांबावयाचें होतें. म्हणून आमचें सर्व सामान आम्ही स्टेशनवर क्लोकरूममध्यें ठेविलें, व फक्त हँडब्याग हातांत घेऊन स्टेशनबाहेर पडलों. तेथलें सुवर्णमंदिर व स्टेशनजवळच असलेला गालीच्यांचा कारखाना पाहून परस्पर स्टेशनवर पोहोंचवावयाचा करार करून एक टांगा ठरवून आम्ही ताबडतोब निघालों.

स्टेशनपासून थोड्याच अंतरावर शहर सुरू होतें. शहरांतील रस्ते अरुंद व अस्वच्छच आहेत. वाटेंतच एका हलवायाच्या दुकानीं गरम दूध व चिनी (साखरेला इकडे ' चिनी ' म्हणतात) घेतली. या प्रांतांत मुंबई इलाख्याप्रमाणें चहाचा फारसा प्रघात दिसला नाहीं, ही आनंदाची गोष्ट आहे. वाटोवाट हलवायांचीं मात्र दुकानें आहेत, व तेथें ताज्या पुऱ्या व तर्कारी (भाजी) मिळते. इतर मेवामिठाईहि असते, व उकळत असलेलें उत्तम दूधहि मिळतें. अर्थात् हे पदार्थ जास्त पौष्टिक आहेत. या प्रांतांत गहूं हेंच गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांचें सामान्य अन्न आहे. पंजा-

यांतील बहुतेक सर्व जाति मांसाहारीहि आहेत. यामुळेंच या प्रांतांतील लोक धिप्पाड, उंच, मजबूत व बांधेसूद दिसतात. वाटेनें जातांना मुसलमानांपासून हिंदु ओळखणें जरा कठिण जातें; पण शीख मात्र तेव्हांच ओळखतां येतो. त्याचे ते डोक्याचे पूर्णपणें वाढविलेले लांब केंस, भव्य दाढीमिशा, शुभ्र पोषाख, सतेज व शुभ्रवर्ण हीं पाहिलीं, म्हणजे हे लोक खरे लढवय्ये आहेत, याबद्दल खात्री पटते.

याप्रमाणें शीख व पंजाबांतील इतर लोक यांचें यदृच्छया निरीक्षण करीत आम्ही चाललों, तोंच सुवर्णमंदिराचें पिवळेंपिवळें जरद शिखर दिसूं लागलें व आम्ही प्रवेशद्वाराशीं आलों. प्रवेशद्वाराचा मनोरा व घड्याळ हीं अर्वाचीन आहेत. तेथल्या इतर देखाव्याला तीं अनुरूप नाहींत, असा तो मनोरा पहातांक्षणींच माझा समज झाला.

सुवर्णमंदिर हें एका मोठ्या तलावाच्या मधोमध बांधलेलें आहे. तलाव चौकोनी असून त्याच्या सर्व बाजू उत्तम तऱ्हेनें बांधलेल्या आहेत. सभोंवार चालत जावयाला संगमरवरी पायऱ्या आहेत. हा सर्व विस्तीर्ण तलाव, त्याच्या सभोंवारच्या त्या स्फटिकवत् पायऱ्या, तलावाचें तें किंचित् हिरवट पाणी, आणि मध्यें—खालीं सफेत व वर पिवळें असें–तें मंदिर, पाण्यांत पडलेलें त्या मंदिराचें तें स्पष्ट प्रतिबिंब हा सर्व देखावा एकसमयावच्छेदेंकरून पाहिल्यानें या शीख धार्मिक स्थानाबद्दल फारच अनुकूल ग्रह होतो.


तलावाच्या कांठावरून देवळांत जाण्यास एक प्रशस्त पूल बांधलेला आहे. तोहि सर्व संगमरवरी दगडांनीं मढविलेला आहे व त्याच्या दोन्ही बाजूंना लहानसा संगमरवरी कठडा असून हारीनें सोनेरी मुलाम्याचे कंदील खांबांवर अडकविलेले आहेत. सुवर्णमंदिराचा अर्धा भाग संगमरवरी आहे, तर वरच्या अर्ध्या भिंतीपासून शिखरापर्यंत सोन्याच्या मुलाम्याचें काम केलेलें आहे. या विशेषावरूनच या मंदिराला ‘ सुवर्णमंदिर ’ असें नांव पडलें आहे. मंदिराच्या बाहेरच्या व आंतल्या भिंतींवर निरनिराळ्या रंगांच्या दगडांच्या जडावाचें नक्षीकाम केलें आहे, तें प्रेक्षणीय आहे. पण या मंदिराला त्या नक्षीचा थोडा अतिरेक झाला आहे, असा भास होतो. यामुळें हें मंदिर फार श्रीमंतीथाटाचें दिसतें खरें, पण अभिरुचीच्या




३ दयानंद अँग्लो-वैदिक कॉलेज--लाहोर.



जहांगिराची कबर–लाहोर.



दयानंद वैदिक कॉलेज वसतिगृह—लाहोर.




जहांगिराची कबर, अंतर्भाग—लाहोर.


दृष्टीनें थोडी सौंदर्यहानि होते, असें म्हणणें प्राप्त आहे. या मंदिरांत कोणतीहि मूर्ति नाहीं. कारण शीख धर्म हा मूर्तिपूजेविरुद्ध आहे. शीख धर्माचा आद्यग्रंथ जो 'ग्रंथसाहेब', त्याची एक प्रत मंदिराच्या मधोमध एका सिंहासनावर ठेवलेली आहे.

मंदिराच्या वरच्या मजल्यावर शीख पंथाचे उपाध्याय 'ग्रंथसाहेबां'तील कांहीं भाग वाचून त्याचें विवरण करतात. आम्ही मंदिरांत गेलों, तेव्हां बराच स्त्रीपुरुष समाज जमलेला होता. त्यांचा तो एक तऱ्हेचा शुभ्र पोषाख पाहून आम्हांला कौतुक वाटलें. आपल्या इकडे एकाद्या देवळांत पुराण चाललें असतां जसा देखावा दृष्टोत्पत्तीला येतो, तसाच तेथला देखावा होता. आम्ही या ठिकाणीं क्षणभर उभे राहिलों, आणि मग सभोंवारच्या ग्यालरींतून तलावाची व पलीकडच्या इमारतीची शोभा पहातपहात मंदिराला प्रदक्षिणा घातली. आमच्या मागें दक्षिणा मागणाऱ्या शीख भटांची टकळी लागली होती. येथें सुद्धां इतर पवित्रस्थानांप्रमाणें पंड्यांचा सुळसुळाट आहेच, असें आम्हांला दिसून आलें.

हें शीखपंथी सुवर्णमंदिर शीखधर्माचा प्रवर्तक गुरु नानक याच्या काळचें नाहीं. पण या पंथाचा जसजसा प्रसार होत चालला, तसतसें हा धर्म मूर्तिपूजक नसतांनासुद्धां नवपंथीय सर्व लोकांना एके ठिकाणीं आणण्याचें साधन पाहिजे असें या पंथाच्या तिसऱ्या गुरूला वाटूं लागलें, व त्यानें हल्लींची अमृतसर येथील जागा पसंत करून विकत घेतली. पूर्वीं येथें सर्व जंगल असून तलाव वगैरे मुळींच नव्हता. पण या ठिकाणाला 'अमृतसर' हें नांव पडण्याचें कारण, एका झाडाखालीं एक लहानसें पाण्याचें कुंड असून त्याचें पाणी अमृतासारखें होतें, हें होय. या त्याच्या अमृतत्वाबद्दल एक आख्यायिका या प्रांतांत प्रसिद्ध आहे. ही आख्यायिका ग्वालेर किल्ल्यांतील तलावाच्या आख्यायिकेसारखीच आहे. अमृतसर जिल्ह्यांत पट्टी या गांवीं एक वजनदार गृहस्थ रहात असे. त्याला पुष्कळ सुंदर मुली होत्या. त्यांपैकीं एक फार धार्मिक व भाविक होती. या गोष्टीचा तिच्या बापाला फार राग येई. पुढें रागाच्या भरांत त्यानें या मुलीचें एका पायानें पांगळ्यालुळ्या मनुष्याशीं लग्न करून दिलें, व 'तुझा



दयानंद वैदिक कॉलेज वसतिगृह—लाहोर.



जहांगिराची कबर–लाहोर.

देव आतां काय करतो तें पाहूं ', असें म्हटलें. त्या मुलीनें ही स्थिति समाधानानें पतकरली, व आपल्या नवऱ्याला पाटींत घालून डोक्यावर घेऊन ती भिक्षा मागून दोघांचें पोट भरूं लागली. एकदां आपल्या नवऱ्याची पाटी झाडाच्या बुंध्याशीं ठेवून ती गांवांत भिक्षा मागण्यास गेली. तिचा नवरा पाटींत बसलेला असतांना त्यानें एका लंगड्या कावळ्याला झाडाच्या बुंध्याशीं असलेल्या कुंडांत बुडी मारतांना पाहिलें. कावळा त्या पाण्यांतून वर येतो, तों त्याचा पाय साफ होऊन त्याचा वर्ण शुभ्र झाला ! हें पाहतांक्षणींच त्या पाण्यापर्यंत खुरडत जाऊन त्यानें त्या कुंडांत स्नान केलें, व त्या दिव्य पाण्याच्या गुणानें त्याचीं सर्व शारीरिक व्यंगें नाहींशीं होऊन तो एक तेजःपुंज पुरुष बनला. ती मुलगी गांवांतून परत आली, तों तिला हा अद्‌भुत प्रकार पाहून सानंद आश्चर्य वाटलें. यामुळें या ठिकाणाला ' अमृतसर ' नांव पडलें व याच ठिकाणीं मोठा तलाव बांधून तेथें शीखपंथी मंदिर तयार करण्याचा निश्चय झाला. रामदास या नांवाच्या चवथ्या गुरूनें थोडेंसें कच्चें काम केलें. पण तें काम पुरें होण्याच्या आधींच त्या गुरूचा अंत झाला.

येथला भव्य तलाव व मंदिर हीं शीख लोकांचा पांचवा गुरु अर्जुनदेव यानें बांधविलीं. देवळाचा पाया घालण्याच्या आरंभाला मोंगल बादशाहाचा प्रतिनिधि मियान मीर हा आला होता. यावरून या धर्मपंथाचें महत्त्व किती वाढलें होतें, हें दिसून येतें. या मंदिराचें ' हरिमंदिर ' असें नांव ठेवण्यांत आलें, व शीख लोक याला हरिमंदिरच म्हणतात. पण या मंदिराच्या श्रीमंतीवरून व त्याच्या सोन्याच्या मुलाम्याच्या कामावरून त्याला ' सुवर्णमंदिर ' म्हणण्याचा प्रघात पडलेला आहे.

या मंदिरानंतर दुसऱ्या गुरूंनीं शेजारीं दुसरीं मंदिरें बांधलीं आहेत. पण त्यांना या मंदिराचें महत्त्व आलें नाहीं.

हल्लीं या मंदिरांची व्यवस्था शीख सरदारांच्या कमेटीकडे असून त्यांच्या वतीनें एक व्यवस्थापक सरकार नेमतें. हरिमंदिराचें उत्पन्न दांडगें आहे. उत्पन्नाच्या तीन बाबी आहेत. ग्रंथसाहेबासन्निध रात्रंदिवस कोणी ना कोणी तरी एक इसम उभा असतो, त्याला ' ग्रंथी ' म्हणतात. दर-

रोज तीन ग्रंथींच्या पाळ्या असतात. या ग्रंथींच्या हातावर जी दक्षिणा दररोज लोक टाकतात, ती पहिली बाब. दुसरी बाब म्हणजे पवित्र ग्रंथापुढें जें कांहीं द्रव्य ठेवतात, ती होय. तिसरी बाब म्हणजे इमारतीकरितां किंवा मंदिराची शोभा वाढविण्याकरितां विशेष प्रकारच्या दिलेल्या देणग्या ही होय. या सर्वांचा रोज चोख हिशेब ठेवला जातो. मंदिराचा पुजारी, गवई, ग्रंथी वगैरेसारख्या सर्व आश्रितांना ठराविक तनखा मिळतो व मंदिराचा इतर खर्च चालतो.

हें हरिमंदिर पाहून होतें तों बराच वेळ झाला, व आमचा गाडीवालाहि तगादा करूं लागला, म्हणून आतां अधिक न रेंगाळतां आम्ही गाडींत पाऊल ठेवलें, व स्टेशनजवळ असलेल्या मोठ्या गालीच्याच्या कारखान्यांत गेलों. तेथें व्यवस्थापकांची परवानगी घेऊन कारखाना पहावयाला गेलों. कारखाना अगदीं जुन्या तऱ्हेचाच आहे. सर्व काम हातमागांवर चालतें. मात्र येथलें काम फार उंची तऱ्हेचें असतें. आम्ही येथें गालीच्यांचे ढीगच्या ढीग पाहिले. बहुतेक गालीच्यांची किंमत शेंकड्यांनीं व हजारांनींच सांगण्यांत आली. असले उंची गालीचे बहुतेक युरोपांतच खपतात, असें आम्हांला समजलें. येथें सर्वांत लहान गालीचा अठ्ठावीस रुपयांच्या खालीं नाहीं, असें व्यवस्थापक म्हणाले. गालीच्यावर काढावयाच्या नक्षीचे नमुने कागदावर काढलेले असतात व कारागिरांतील कुशल कारागीर कसें व कोणत्या रंगाचें काम करावयाचें किंवा टांके घालावयाचे हें कामकऱ्यांना सांगतो, व त्याप्रमाणें इतर कामकरी मागांवर काम करतात. अशा तऱ्हेची कारखान्यांतील पद्धति दिसली.

कारखाना पाहून झाल्यावर आम्ही लगेच स्टेशनवर आलों व थोडा फराळ करून गाडीची वाट पहात बसलों. बारांच्या सुमारास गाडी प्लॅटफॉर्मवर आली. तींत बसून सुमारें दीड तासानें म्हणजे दीड वाजण्याच्या सुमाराला लाहोर स्टेशनवर येऊन पोहोंचलों. लाहोरला ज्या स्नेह्यांकडे उतरण्याचें आम्ही ठरविलें होतें, त्यांना स्टेशनवर बिनचूक मनुष्य पाठविण्याविषयीं आम्ही तार केली होती. म्हणून आम्ही स्टेशनवर उतरल्यावर बराच वेळ मनुष्याची वाट पाहिली. पण स्टेशनवर आमचा

कोणीहि तपास करतांना दिसला नाहीं. आमच्या स्नेह्याचा फक्त सरकारी हुद्दा व पत्ता आम्हांला ठाऊक होता. पण बिऱ्हाडाचा पत्ता माहीत नव्हता. स्टेशनजवळच चांगली धर्मशाळा आहे, असें तपास करतां आम्हांला कळलें. तेव्हां तूर्त तरी तेथेंच उतरण्याचा निश्चय करून हमालाला धर्मशाळेकडे सामान घेऊन जाण्याला फर्माविलें.

ही धर्मशाळा चांगली तीन मजली प्रशस्त इमारत होती. सोप्याच्या पुढील व्हरांडा चांगला संगमरवरी फरशीचा होता. एका माणसाच्या, किंवा दोन माणसांच्या अशा स्वतंत्र खोल्या मिळतात. दोन माणसांची एक खोली आम्ही घेतली, व तेथें सामान आणून टाकिलें. इतकें होते आहे तों सुमारें दोन वाजले. तेव्हां प्रथमतः पोटोबाची तजवीज केली. या धर्मशाळेच्या मागच्याच बाजूला हलवायाचें दुकान आहे, तेथून ताज्या पुऱ्या, भाजी व थोडी इतर मेवामिठाई आणवून स्वस्थपणें फराळ केला, व आतां पुढें येथें राहण्याची काय तजवीज करावी, या विवंचनेंत पडलों. ज्यांना मी एक उत्तम चित्रकार, मराठींतील एक चांगले लेखक व एक कृतिसुधारणाभक्त म्हणून ओळखत होतों, व ज्यांची माझी एकदां ओझरती गांठ पडली होती, ते गृहस्थ लाहोर येथें राहतात हें मला ठाऊक होतें. तेव्हां त्या गृहस्थांचा शोध करावयाचा आम्ही निश्चय केला. पण जी संस्था पहाण्याकरितां आम्ही लाहोरला मुख्यतः उतरलों होतों, ती आर्यसमाजाची संस्था आधीं पाहून येऊं असा बेत करून आम्ही पोषाख करून आमच्या धर्मशाळेच्या खोलींतून बाहेर पडलों, व दयानंद कॉलेजला पोहोंचते करण्याचा करार करून टांग्यांत बसलों.

टांगेवाल्यानें आह्मांला नेमकें कॉलेजाजवळ आणिलें. पण सुपरिंटेंडेंट किंवा प्रिन्सिपॉल यांचें नांव ठाऊक नव्हतें, तेव्हां कॉलेजच्या वसतिगृहांत जाऊन एका मुलाजवळ चौकशी केली. त्यानें आम्हांला वसतिगृहाच्या सुपरिंटेंडेंटकडे नेऊन पोहोंचविलें. मी आपल्या नांवाची कार्ड दिल्यामुळें ओळखीची कांहीच अडचण पडली नाहीं. पण कॉलेज सध्यां सकाळचें असल्यामुळें वर्ग पहावयाला सांपडणार नाहींत, असें त्यांनी सांगितलें. आम्ही म्हटलें " निदान इमारती, प्रयोगशाला, पुस्तकालय,

वसतिगृह वगैरे तर सर्व पहावयाला मिळेल ?" तेव्हां आम्हांला त्यांनीं कॉलेजच्या प्रिन्सिपॉलकडे नेलें.

प्रिन्सिपॉल हे इकडले एक एम्. ए. असून केंब्रिज युनिव्हर्सिटीचेहि पदवीधर आहेत. गृहस्थ फार साधे व मोठे उत्साही दिसले. त्यांनीं आमचें उत्तम आदरातिथ्य केलें. कॉलेजची व्यवस्था आणि व्याप यांबद्दल थोडीशी माहिती देऊन ते आम्हांला कॉलेज दाखविण्याकरतां घेऊन गेले, व शेवटीं आपण लाला हंसराज यांच्याकडे जाऊं असें त्यांनीं सांगितलें.

प्रथमतः आम्ही कॉलेजची मुख्य इमारत पाहिली. येथल्या सर्व इमारती तांबड्या विटांच्या व चुन्याच्या आहेत. इमारतीवर सरस्वतीचें चित्र असून ॐ हें अक्षरहि कोरलेलें आहे. इमारत एकंदरींत सुंदर दिसते. कॉलेजचा हॉल चांगला आहे. नंतर आम्ही निरनिराळे वर्ग पाहून कॉलेजचें पुस्तकालय व प्रयोगशाळा पाहिली. पहिल्या दोन वर्षांचींच भौतिकशास्त्रें शिकविण्याची कॉलेजला परवानगी आहे, असें प्रिन्सिपॉलनीं सांगितलें.

नंतर आम्ही कॉलेजचें वसतिगृह पहावयाला गेलों. येथें एकंदर सुमारें चारपांचशें म्हणजे कॉलेजांतील अर्ध्याअधिक विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय करण्यांत आली आहे असें समजलें. कॉलेजच्या त्या पुष्कळशा लहानमोठ्या इमारती पाहून कॉलेजच्या विस्ताराबद्दल सानंद आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. मात्र कॉलेजच्या शेजारीं फारशी खुली जागा नाहीं, व कॉलेजचें क्रीडांगण कॉलेजपासून जरा दूरच आहे हें ऐकून ही थोडी गैरसोय आहे, असें मनांत आलें.

कॉलेजलाच जोडून तीन धंदेशिक्षण संस्था लहान प्रमाणावर काढलेल्या दाखविण्यांत आल्या. पहिला एंजिनियरिंगचा वर्ग. हा मुंबई इलाख्यांतील सब-ओव्हरसियरच्या क्लासाच्या दर्जाचा आहे. दुसरा हिंदु वैद्यक शिकविण्याचा वर्ग व तिसरा शिवणकामाचा वर्ग. हे वर्ग कॉलेजच्या मानानें लहानच आहेत. पण आमच्या तरुण विद्यार्थ्यांमध्यें हातकामाबद्दल जी एक तिरस्कारबुद्धि आहे, ती घालविण्याचा व लहानसा स्वतंत्र धंदा करून पोट भरण्यास शिकविण्याचा हा एक

प्रयत्न आहे, असें मला वाटलें. चालकांचा मुख्य भर अर्थात्च हें एक उत्तम आर्ट्स् कॉलेज करण्याचा आहे.

सर्व कॉलेज पाहून झाल्यावर आम्ही जवळच असलेली या कॉलेजची इंग्रजी शाळा पहावयाला गेलों. या शाळेंतहि हजारांच्या वर मुलें आहेत. येथें 'लाला हंसराज हॉल' या नांवाची नवीन बांधलेली व बांकें, खुर्च्यादि सामानसुमान नुकतेंच व्यवस्थेनें मांडलेली एक टुमदार इमारत पाहिली. या इमारतीला पंचवीस हजारांच्यावर खर्च आला असें कळलें. ही सर्व रक्कम विद्यार्थ्यांनीं लोकांकडे जाऊन जमविली असून पंचवीस तीस वर्षें शाळेच्या व कॉलेजच्या चालकत्वाचें फार कठिण काम केल्याबद्दल लाला हंसराज यांचें स्मारक म्हणून हा हॉल बांधण्यांत आला, असें ऐकून या संस्थेंतील विद्यार्थ्यांच्या गुरुभक्तीबद्दल आह्मांला फार कौतुक वाटलें, व इकडल्या मुलांमध्येंसुद्धां केवढी कर्तृत्वशक्ति आहे हें पाहून या प्रांतांतील तरुण पिढीबद्दल आमचा अनुकूल ग्रह झाला.

आम्ही शाळेच्या सुपरिंटेंडेंटचे आभार मानून शेवटीं लाला हंसराज यांच्या मठीकडे गेलों. हे गृहस्थ दिसण्यांत मोठे भव्य किंवा धिप्पाड नाहींत; मूर्ति अगदीं लहान आहे. पण यांनींच या कालेजाला इतक्या नांवारूपाला चढविलें आहे. कॉलेजाच्या स्थापनेपासून जवळजवळ तीस वर्षें हे कॉलेजचे प्रिन्सिपॉल किंवा प्रेसिडेंट आहेत. हे त्या कॉलेजची सेवा कांहींएक पगार न घेतां निवळ निरपेक्षबुद्धीनें करीत आले आहेत; इतकेंच नव्हे, तर पंजाबांतील आर्यसमाजाच्या एका शाखेचे ते अध्वर्यु आहेत हें ऐकून 'मूर्ति लहान पण कृति मोठी,' या म्हणीची आठवण झाली. लाला हंसराज यांच्याजवळ थोडेंफार सभाषण करून व दयानंद कॉलेजच्या भरभराटीबद्दल आनंद प्रदर्शित करून आम्ही तेथल्या मंडळीचा निरोप घेतला.

तेथून आम्ही चालतच निघालों, व शहराच्या अनर्कली नांवाच्या मुख्य रस्त्यावर आल्यावर दक्षिणी चित्रकाराच्या बिऱ्हाडाची चौकशी केली, व सुदैवानें तें बिऱ्हाड आम्हांला लवकरच सांपडलें. यामुळें आमची उतरण्याची व येथलीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्याची अडचण दूर झाली. आम्ही लगेच

आपलें सामान धर्मशाळेंतून घेऊन आलों, व लाहोरांतील पहाण्यासारख्या ठिकाणीं केव्हां जावयाचें तें ठरविलें. श्रीयुत सातवळेकरांच्या घरीं माझ्या ओळखीचे आणखी एक गृहस्थ भेटले. त्यांची एम्. ए.ची परीक्षा नुकतीच संपली होती. अर्थात् ते सर्वस्वीं मोकळे होते, व त्यांच्या बरोबरच आम्ही प्रेक्षणीय स्थळें पहावयाला जाण्याचें ठरविलें.

चहा घेऊन वेळ होता म्हणून प्रथमतः लाहोरचा अजबखाना व सार्वजनिक बाग पहावयाला गेलों. येथला अजबखाना चांगल्यापैकीं आहे. निरनिराळ्या कारागिरीचे नमुने व पेंढा भरून ठेवलेल्या निरनिराळ्या पशुपक्ष्यांचा बराच मोठा संग्रह आहे; तसेंच बुद्धकालीन वास्तुकलेचे व मूर्तिकलेचे बरेच नमुने येथें आहेत. या सर्व मूर्तींमध्यें बुद्धानें चाळीस दिवस उपवास केल्यानंतरच्या त्याच्या शरीराची अवस्था दाखविणारी दगडाची मूर्ति हुबेहुब आहे असें वाटलें. तें अगदीं बाखाळीस गेलेलें पोट, बरगड्यान् बरगड्या दिसणारी ती छाती, खोल खोल गेलेले ते डोळे व एकंदर जरत्कारूसारखी ती आकृति, हें पाहून त्या काळच्या मूर्तिकलेबद्दल आम्हांला फार आश्चर्य वाटलें. येथें मोंगलाईच्या व शीख लोकांच्या चित्रकलेचे चांगले नमुने आहेत. आधीं दहाहि शीखपंथी गुरूंच्या तेलाच्या रंगाच्या उग्र व भव्य तसबिरी आहेत. तो त्यांचा पोषाख व प्रचंड केशविस्तार व हत्यारें पाहिलीं म्हणजे हा धर्म पुढेंपुढें तरी लष्करी पेशाचा झाला होता, हें तेव्हांच ध्यानांत येतें.

अजबखाना पाहून झाल्यावर आम्ही सार्वजनिक बाग पाहण्यास गेलों. शहरांतील मुख्यमुख्य इमारती याच बाजूला असल्यामुळें आम्हांला त्यांतल्या बऱ्याच दुरून तरी पहावयाला सांपडल्या. बाग सुंदर तऱ्हेनें बनविलेली आहे. येथें निरनिराळे पशुपक्षी ठेवलेले आहेत. तेथून आम्ही बिऱ्हाडींच परत आलों, व सकाळींच उठून शालिमार बाग आणि जहांगीर व नूरजहान यांचीं कबरस्थानें पहाण्याचें ठरवून जेवणखाण झाल्यावर गप्पागोष्टी करीत गच्चीवर झोपीं गेलों.

सकाळींच ठरल्यावेळीं माझे मित्र आमच्या बिऱ्हाडीं आले, व चहाफराळ करून आम्ही एक गाडी ठरवून प्रथमतः शालिमार बाग पहाव-

याला गेलों. ही बादशाही बाग शहरापासून चार मैल दूर आहे. काश्मीरांत झेलम नदीच्या उगमाजवळ जहांगीर बादशहानें ज्या प्रकारची बाग बनविली होती, त्याच नमुन्यावर १६६७ मध्यें शहाजहान बादशहाचा प्रसिद्ध एंजिनीयर अलीमर्दनखान यानें ही बाग बनविली. मुसलमानी धर्मांत मानलेल्या सात प्रकारच्या स्वर्गलोकांना अनुरूप असे या बागेचे सात भाग होते. यांपैकीं आतां फक्त तीनच भाग नीट स्थितींत आहेत. तरी त्यांनीं ऐंशी एकर जागा व्यापिली आहे. यावरून या बागेची प्रचंडता ध्यानांत येईल. जागोजाग बसण्यास चबुतरे केलेले व त्यांच्या सभोंवार कारंजीं खेळण्याची व्यवस्था केलेली, याप्रमाणें दालनेंच्या दालनें लागत जातात. बागेच्या मध्यावर बराच मोठा हौद आहे. सर्व काम संगमरवरी दगडाचें व नक्षीचें आहे. या हौदांत तिरप्या संगमरवरी व त्यावर गालीच्याप्रमाणें कोरलेली नक्षी काढलेल्या एका प्रचंड शिळेवरून सारखा पाण्याचा प्रवाह चालेल अशी व्यवस्था केलेली आहे. पाणी त्या तिरप्या शिळेवरून सळसळ करीत सारखें वहात होतें, व त्या पाण्याला फेंस येत असल्यामुळें तें शुभ्रपणांत संगमरवरी शिळेशीं जणूं कांहीं स्पर्धाच करीत आहे, असें भासलें. हें वाहतें पाणी नुसत्या शोभेकरितां सोडून दिलेलें आहे, असें नाहीं; तर या तिरप्या शिळेवर पडून थंड व गारगार पाण्याचें स्नानहि करण्याची सोय आहे. आम्ही ही मजा पहात असतांना एक मनुष्य त्या सुंदर शिळेवर पडून स्नान करूं लागला. तें पाहून आम्हांलासुद्धां त्या ठिकाणीं स्नान करण्याची फार इच्छा झाली. पण दुसरे कपडे आणलेले नसल्यामुळें ती इच्छा मनांतल्या मनांत दाबणें भाग पडलें. हें ठिकाण इतकें रमणीय आहे, कीं, येथून हलूं नये, व त्या तिरप्या संगमरवरी शिळेवरून जाणाऱ्या पाण्याच्या शुभ्ररंगी लहरींकडे सारखी टक लावून पहात बसावें असेंच वाटतें. पण तेथेंहि फार वेळ घालविणें शक्य नव्हतें, म्हणून आम्ही बागेंत पुढेंपुढें चाललों.

सारखे फुलझाडांचे ताटवे व मध्येंमध्यें हिरवेंगार मैदान आणि फरसबंदी पायवाट अशी सारखी लागत राहिली. ही बाग जणूं काय अनंत आहे, असें आम्हांला वाटूं लागलें, तोंच बागेचा शेवटचा प्राकार दृग्गोचर

झाला. प्राकारावर जाण्याला जिना होता. त्यानें वर चढून वरूनच थोडे हिंडलों. त्यावरून बागेच्या विस्ताराची व बहुविधत्वाची चांगली कल्पना मनांत आली. नंतर खालीं उतरून दुसऱ्या फरसबंदी वाटेनें आम्ही परतलों. ही बाग पाहून व दिल्ली आग्रा येथील पाहिलेल्या बागांचें स्मरण होऊन मुसलमान लोकांना फार जुन्या काळापासून सुंदर बागांचा फार शोक आहे, असें ध्यानांत येऊन बगीचे बनविण्याची कलाहि त्यांना चांगली अवगत होती, असें दिसलें.

ही बाग पाहून आम्ही परतलों, व मग लाहोरच्या जवळ असलेल्या शहादरा नांवाच्या गांवीं असलेलीं जहांगीर बादशाह व नूरजहान राणी यांचीं कबरस्थानें पहाण्याला गेलों. लाहोर शहर हें रावी (पंजाबांतील तिसरी नदी) नदीच्या कांठीं आहे. हल्लीं या नदीचा प्रवाह शहरापासून जरा दूर गेला आहे; पण एका काळीं तो अगदीं थेट शहराला लागून गेलेला होता, असें समजलें. या नदीच्या पलीकडे शहादरा आहे. या नदीचा पूर्वींचा पूल मोडल्यामुळें नवा पूल बांधण्यांत आला आहे. आम्ही गेलों त्याच्या आधीं थोडे दिवस तो पूल रहदारीला चालू झाला होता. आम्ही जसजसे नदीच्या कांठाकडे जात चाललों, तसतसे मोठमोठ्या लांकडांचे ढीगच्याढीग दिसूं लागले. पंजाबांतील नद्या हिमालयांत निघून सपाटीवर येत असल्यामुळें त्यांना पाणी सारखें असून वेगहि पुष्कळ आहे. यामुळें हिमालयाच्या रानांतील लांकडें पंजाबांत आणणें इकडे अगदीं बिनखर्चीनें होतें. लांकडांच्या तुळयांवर नंबर घालून त्या नदींत ढकलून देतात. मग या प्रचंड तुळया वहातवहात खालीं येतात व त्यानंतर निरनिराळ्या सोयीच्या ठिकाणीं वर काढून घेतात, आणि तेथून खुष्कीच्या मार्गानें सर्व प्रांतांत पाठवितात. हा लांकडांचा व्यापार येथें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आहे, असें दिसलें. नदीच्या कांठाकडे जसजसें यावें, तसतशी उंच उंच झाडांची गर्द राई लागते. तो नवा कोराकरकरीत पूल व रावी नदीचें तें रुंद पात्र, शेजारींच असलेला तो पडावांचा पायवाटेचा पूल व किनाऱ्यावर पडलेल्या त्या लांकडांच्या राशीच्याराशी हा देखावा प्रेक्षणीय आहे, यांत शंका नाहीं.

नदी टाकली, कीं शहादरा लागतें. कबरस्थानाकडे जाण्यापूर्वी 'येथल्या मोठ्या गिरणीचे मॅनेजर एक दक्षिणी गृहस्थ आहेत, त्यांना भेटून पुढें जाऊं,' असें माझे मित्र म्हणाले. अर्थात् आपल्या प्रांताच्या गृहस्थाला भेटण्यापासून आनंद होईल असें वाटून आम्ही रुकार दिला, व आम्ही गिरणीमध्यें गेलों. माझ्या मित्रांनीं आमची दोघांची ओळख करून दिली. श्रीयुत फाटक हे गृहस्थ नगरकडील असून ते यूरोपांत जाऊन आलेले आहेत. त्यांचा स्वभावहि फार साधा, खुल्या दिलाचा व संगतिप्रिय दिसला, व त्यांचीं व माझीं मतेंहि जुळतीं दिसल्यामुळें मला त्यांची ओळख झाल्यानें विशेष आनंद वाटला. त्या गृहस्थांनाहि आम्ही आल्याबद्दल फार बरें वाटलें. त्यांनीं आह्मांला भोजनाला रहाण्याचा आग्रह केला; पण आम्ही बिऱ्हार्डी सांगितलें नाहीं, तेव्हां तेथें मंडळी आमची वाट पहात राहतील, असा विचार करून त्यांचें आमंत्रण आम्ही स्वीकारलें नाहीं. त्यांनीं ' सायंकाळीं तरी आलें पाहिजे व मग रात्रभर येथेंच राहून पहाटेच्या गाडीनें लाहोरास जावें,' असा आग्रह केला. तेव्हां ती गोष्ट आम्ही कबूल केली, व मग नूरजहान व जहांगीर यांच्या कबरस्थानाकडे गेलों.

नूरजहान राणीचें कबरस्थान लहानच आहे. त्याचें संगमरवरी दगडाचें नक्षीचें काम शीख लोकांनीं काढून नेल्यामुळें ही कबर आतां विशेष पहाण्यासारखी राहिली नाहीं. जहांगिराची कबर मोठी प्रशस्त असून त्यांतील संगमरवरी नक्षीच्या जाळीचें काम फार सुबक आहे. त्याची थोडीशी कल्पना छायाचित्रावरून येईल. पण याहि कबरेचा मुख्य घुमट काढून टाकलेला आहे. यामुळें ती फार भुंडी दिसते. जुन्या दिल्लींत अनंगपाल व पृथ्वीराज या राजांच्या काळच्या हिंदु देवळांचें सामान घेऊन तेथली मशीद बांधली आहे, मथुरेला हिंदु देवळांच्याच मशिदी औरंगजेबानें बनविल्या आहेत, त्याच्या उलट लाहोरची स्थिति झाली आहे. तेथल्या मोंगल बादशाहीच्या काळच्या इमारतींचें सामान शीख लोकांनीं घेऊन अमृतसरच्या सुवर्णमंदिराला व शीखांच्या इतर इमारतींना लावलेलें दिसलें. जहांगिराचें कबरस्थान पाहून झालें, तों बारा वाजून गेले; म्हणून आम्ही परत फिरलों, व बिऱ्हार्डी आलों. जेवणखाण

झाल्यावर थोडी विश्रांति घेतली व सायंकाळचा श्रीयुत फाटकांकडे जावयाचा व उद्ईक सकाळीं नऊ वाजतां येथून पुढें प्रयाण करण्याचा बेत श्रीयुत सातवळेकर यांना सांगितला, व त्याप्रमाणें करण्याचें ठरलें. बेताप्रमाणें आम्ही चारसाडेचार वाजतां निघालों, व प्रथमतः गांवाबाहेर असलेली जुम्मामशीद व त्यालाच लागून असलेली रणजितसिंगाची समाधि हीं पहावयाला गेलों.

आतां आम्ही जागोजागच्या जुम्मामशिदी पाहिल्या असल्यामुळें या मशिदी पाहण्यांत आम्हांला आनंद वाटेनासा झाला; तरी पण आम्ही मशिदींत जाऊन आलों, व मग त्याला लागून असलेल्या बागेंत थोडा वेळ विश्रांति घेतली. कारण, आतां रणजितसिंगाच्या समाधीखेरीज पहाण्याचें कांहीं राहिलें नव्हतें, व शहादऱ्याला साडेसातांच्या सुमाराला जावयाचें होतें. या बागेंत बरेच लोक हवा खाण्याकरितां येतात, असें आम्हांला दिसलें. त्यांत बहुतेक मुसलमानच होते. आमच्या मित्रांना विचारतां त्या शहरांत मुसलमानांचीच वस्ती जास्त आहे, असें आम्हांला कळलें. जवळजवळ सवा लाख मुसलमान, तर पाऊण लाख हिंदू व शीख मिळून आहेत. मुसलमानी अमदानींत कांहीं काळपर्यंत दिल्ली–आग्र्यापेक्षां लाहोरचें महत्त्व जास्त होतें; पण पुढें त्या शहराला उतरती कळा लागली. रणजितसिंगाच्या कारकीर्दींत पुनः त्याला महत्त्व आलें पण तें फार दिवस टिकलें नाहीं. पंजाबप्रांत १८४९ मध्यें इंग्रजांच्या ताब्यांत आला; तेव्हांपासून या शहराची भरभराट होत आहे, असें आमच्या मित्रांनीं सांगितलें. शिक्षणाच्या बाबतींत या शहराचा बराच वर नंबर लागेल, असें आमच्या मित्रांच्या माहितीवरून दिसून आलें. कारण, येथें सरकारी, खिश्चन, दयानंद, इसलामिया व दयाळसिंग अशीं पांच निवळ आर्टस कॉलेजें आहेत. शिवाय, कायद्याचें, वैद्यकीचें व मुख्य ट्रेनिंग कॉलेज अशीं तीन धंद्याचीं सरकारी कॉलेजें आहेत. बागेंतून मग आम्ही रणजितसिंगाची समाधि पहावयाला गेलों. ही इमारत किल्ल्याच्या तटाला लागूनच आहे. किल्ल्याच्या प्रचंड दरवाज्याच्या व तटाच्या मानानें ती लहान आहे. यामुळें ती मनांत भरत नाहीं. पायऱ्या चढून गेल्यावर आंत समा-

धीचा सभामंडप मोठा प्रशस्त दिसतो, व त्याचें नक्षीकामहि बरें आहे. कोठेंकोठें फाजील अलंकार आहेत. या इमारतीमध्यें मुसलमानी व हिंदु वास्तुपद्धतीचें कांहीं तरी विचित्र मिश्रण झाल्यामुळें ही समाधि जरी उंची मालमसाल्यानें बांधलेली आहे, तरी खऱ्या अभिरुचीचा त्यांत अभाव दिसून येतो, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. ही इमारत पाहून होते, तों शहादऱ्यास जाण्याची आमची वेळ झाली. म्हणून तेथें सोडून देण्याच्या बोलीनें टांगा ठरवून आम्ही शहादऱ्यास श्रीयुत फाटकांच्या बंगल्यावर गेलों. ते आमची वाटच पहात होते.

आम्ही तेथें सर्व रात्र काढली व किती रात्रपर्यंत तरी आमच्या गप्पा-गोष्टी चालल्या होत्या. समानशील व समानविचार अशीं माणसें एकत्र आल्यावर संभाषणास काय तोटा! रा. फाटकांनीं आपल्या विलायतेंतील अनुभवाच्या किती तरी गोष्टी सांगितल्या. आपल्याला मँचेस्टरच्या एकाद्या कारखान्यांत प्रत्यक्ष काम करून माहिती मिळविण्याची फार इच्छा होती; पण तेथें कारखान्यांत परकी माणसांचा शिरकाव होणें दुरापास्त असतें. एका सहजगत्या ओळख पडलेल्या इंग्रजांच्या साहाय्यानें शेवटीं एकदांचा शिरकाव झाला. कारखान्यांत शिरल्यावर मात्र सर्व कामकरी आपल्याजवळ अगदीं सलोख्याच्या नात्यानें वागत असत, व कारखान्यांतील कामाची माहिती आंत पडदा न ठेवतां सांगत असत, असें त्यांनीं सांगितलें. तसेंच मध्यमस्थितींतील इंग्रज कुटुंबांतील मनुष्यें आपल्याजवळ प्रेमानें वागत. एकंदर कुटुंबांतील मंडळीचें एकमेकांशीं फार खुल्या दिलाचें वर्तन असतें, घरांतील लहानमोठी सर्व मंडळी जेवणास एकत्र बसतात. घरांत जरी स्वयंपाकी वगैरे स्वतंत्र माणूस नसला, तरी-सुद्धां सर्व स्वयंपाक आटोपल्यावर तो एका मेजावर आणून ठेवून सर्वांनीं एकदम जेवण्याची इंग्रज कुटुंबांची रीत फार चांगली; त्यायोगें लहानथोर मंडळीचें एकमेकांशीं संघटन होऊन मनाचा खुलासपणा जास्त वाढतो वगैरे गोष्टी त्यांनीं सांगितल्या. विलायतेंतून परत आल्यावर इकडल्या लोकांनीं प्रायश्चित्ताबद्दल आपल्याला कसा आग्रह केला, आणि जाणूनबुजून केलेल्या कृत्याबद्दल प्रायश्चित घेणें आपल्या किती जीवावर आलें पण वडील मंड-

ळीच्या आग्रहानें आपल्या विवेकाला न पटणारें कृत्य आपणास करें करावें लागलें याबद्दलचा त्यांनीं आपला अनुभव सांगितला. याप्रमाणें आम्ही ती रात्र मोठ्या आनंदांत घालविली. रात्र संपली, पण आमच्या गोष्टी संपल्या नाहींत. पहाटेच्या गाडीनें आम्ही लाहोराला येऊन ९॥च्या गाडीनें अटकेकडे मार्गस्थ झालों.

६

तक्षशीला–अटक–पेशावर.

मागील लेखांत उल्लेख केल्याप्रमाणें दिवसा दहांच्या सुमाराला लाहोराहून निघालों. रात्रीं नवांच्या सुमाराला कँबेलपुराला मुक्काम करावा, असा आम्ही बेत केलेला होता.

कँबेलपुर हें अटक जिल्ह्याचें नवें वसलेलें शहर आहे. प्रथमतः मला असें वाटलें, कीं, एकाद्या इंग्रजाच्या नांवावरून या शहराला हें नांव पडलें असावें. पण पुढें मला कळलें, कीं, ' कमलपुर ' या जुन्या नांवाचा हा विलायती अपभ्रंश आहे! ज्याप्रमाणें ' मथुरे'चें ' मुत्रा ' झालें, ज्याप्रमाणें 'वाराणशी'चें ' बनारस ' झालें, ज्याप्रमाणें ' वांद्या 'चें ' बँड्रा ' झालें, ज्याप्रमाणें ' वसई 'चें ' बेसीन ' झालें, त्याप्रमाणेंच ' कमलपुर 'चा कँबेलपुर ' हा अपभ्रंश झाला आहे!

कँबेलपुर येथें आम्ही एका सरकारी वकिलाकडे उतरावयाचें ठरविलें होतें, व त्याप्रमाणें निघाल्यावर त्या गृहस्थांना तारहि केली होती. आजचाहि आमचा प्रवास बहुतेक दिवसाच होता, व त्या दिवसांत तिकडे रात्रीं आठ वाजेपर्यंत चांगला संधिप्रकाश असतो, यामुळें आमच्या मुक्कामापर्यंत बहुतेक सर्व प्रदेश आम्हांला दृग्गोचर होणार होता.

लाहोर स्टेशन सोडल्याबरोबर रावी नदीचा पूल ओलांडावा लागतो. पंजाबांतल्या पांच नद्यांपैकीं ही तिसरी नदी होय. आजच्या आमच्या मुक्कामापूर्वींच चिनाब व झेलम या राहिलेल्या नद्या आमच्या दृष्टीला पडणार होत्या. या एकाच दिवशीं पहावयाला सांपडणार, हें समजतांच आमच्या जलद प्रवासाची पुनः एकदां आम्हांला स्मृति झाली.

तक्षशीला–अटक–पेशावर.

लाहोरहून रावीचा पूल ओलांडल्याबरोबर गाडी शहादऱ्याला येते. या ठिकाणीं आम्ही आदल्या दिवशीं राहिलों होतों. श्रीयुत फाटक स्टेशनवर आम्हांला भेटण्याकरतां आले होते. त्यांचा निरोप घेऊन आम्ही भराभर पुढें चाललों.

मागें सांगितलेंच आहे, कीं, हा सर्व प्रांत अगदीं सपाट आहे. यामुळें क्षितिजापर्यंत जिकडेतिकडे सुपीक जमीनच जमीन दृग्गोचर होते. साडेबारांच्या सुमाराला आम्ही वजीराबाद या मोठ्या स्टेशनाला आलों. पंजाबच्या दक्षिणभागांतील मुलतान या मोठ्या शहराकडून जो रेल्वेचा फांटा येतो, तो येथें मिळून पुढें सियालकोट व जम्मु (काश्मीरच्या महाराजांची दुसरी राजधानी) कडे जातो. वजीराबाद स्टेशन टाकून थोडें पुढें गेलें नाहीं, तोंच चिनाब नदी लागते, व तीवरील पूल ओलांडून गुजरात या स्टेशनवार गाडी येते.

इकडल्या सर्व नद्यांचीं पात्रें फारच रुंद दिसतात. प्रदेश सपाट असून खडकाळ नसल्यामुळें नदीचें पात्र पुष्कळ रुंदावतें. पंजाबांतील सहा नद्यांपैकीं बियास ही सर्वांत लहान आहे, व सिंधु ही सर्वांत मोठी आहे. बाकीच्या चार बहुतेक सारख्याच मोठ्या आहेत. चिनाब नदी ओलांडल्यावर लवकरच लाला मुसा म्हणून एक जंक्शन स्टेशन लागतें. येथें चिनाब नदीच्या पश्चिमेच्या कांठाकडून आलेला रेलवेचा फांटा येऊन मिळतो. या स्टेशनवर आम्ही दोनप्रहरीं एक वाजतां येऊन पोहोंचलों.

आणखी एका तासानें आम्ही झेलम स्टेशनला आलों. नदीच्या नांवाचेंच हें स्टेशन आहे. ही नदी आह्मांला फारच प्रचंड भासली. हिच्यावर मोठा थोरला पूल आहे. ही नदी हिमालयांतून निघाली असून सुप्रसिद्ध श्रीनगर याच नदीच्या कांठीं आहे; या नदीच्या बाजूनेंच काश्मीरचा रस्ता आहे, एवढें आम्हांला प्रवासाच्या आधींच ठाऊक होतें. ज्या नदीचा आपणांला पुढील बिकट प्रवासांत पुष्कळ सहवास घडावयाचा आहे, जिचें उगमस्थानहि आपणांला पहावयाचें आहे, अशा या झेलम नदीच्या प्रथमदर्शनानें व तिच्या या प्रचंड स्वरूपानें आम्हांला फारच आनंद झाला. या नदीचा माझ्या प्रवासवर्णनांत पुढें पुष्कळच उल्लेख येणार

आहे; तेव्हां सध्यां ' ही नदी वेदकालापासून प्रसिद्ध आहे; व तिचें वेदकालीन नांव ' वितस्ता ' आहे, व म्हणूनच ' **बहुरूपाहि वितस्ता** ' इतकेंच तूर्त तिच्याबद्दल सांगून मी पुढील वर्णनाला लागतों.


झेलम स्टेशनावर गाडी बराच वेळ उभी राहते. झेलम स्टेशन दिल्लीपासून साडेचारशें मैल आहे. पुण्याहून दिल्ली साडेदहाशें मैल आहे. तेव्हां आमच्या घरापासून आम्ही सुमारें पंधराशें मैल प्रवास करून आलों, हें ध्यानांत येऊन व आतां पुढें फक्त दोनशें मैलच प्रवास राहिला, हें पाहून आम्हांला फार आनंद झाला. अशा प्रकारचे समाधानाचे व आनंदाचे विचार मनांत येत आहेत, तोंच गाडी स्टेशनांतून बाहेर निघाली.

झेलम स्टेशनांतून सुमारें अडीच वाजतां आम्ही बाहेर पडलों, ते रावळपिंडीला सहांच्या बेतानें पोहोंचलों. आमच्या प्रवासाच्या दुसऱ्या भागाला येथूनच प्रारंभ व्हावयाचा होता. तेव्हां आम्हांला पुढें येथें उतरावयाचें आहे, हें ठाऊक होतें; म्हणून आम्ही त्या वेळीं येथें न उतरतां तसेच पुढें गेलों.


ठरल्याप्रमाणें आम्ही सायंकाळीं नवांच्या सुमाराला कँबेलपुरला पोहोंचलों. ज्या सरकारी वकिलाकडे आम्ही उतरणार होतों, त्या गृहस्थांचे चिरंजीव टांगा घेऊन आम्हांला नेण्याकरितां स्टेशनवर आले होते. यामुळें स्टेशनांतून बाहेर पडल्याबरोबर थेट त्यांच्याच बंगल्यावर आम्ही गेलों.

जेवणखाण झाल्यावर अटक, तक्षशीला पेशावर इतकीं ठिकाणें पहाण्याचा आमचा बेत आम्ही वकीलसाहेबांना कळविला, तेव्हां त्यांनीं सांगितलें, कीं, ' तक्षशीला हें ठिकाण सराईकाला या स्टेशनपासून दीडदोन मैलांवर आहे, व तें रावळपिंडीला परत जातांना वाटेंत दोन अडीच तासांच्या अवकाशांत सहज पाहतां येईल. त्याप्रमाणेंच अटक हें कँबेलपुरच्या पुढचेंच स्टेशन आहे, तेथेंहि सिंधू नदी व तिच्या कांठावरील किल्ला यापेक्षां पाहण्यासारखें कांहींएक नाहीं. तेव्हां पेशावराला जातांना मध्यें दोन तास अटकेला थांबून पुढें गेलें म्हणजे झालें. ''

हा बेत आह्मांला फार सोयीचा वाटला. कारण, आमचीं मुंबईपासून पेशावर अशीं एकदम तिकिटें काढलेलीं होतीं, व शंभर मैलांना एक



४ जुम्मामशीद दिल्ली.



तक्षशीला.



जुम्मामशीद—लाहोरे.



रणजितसिंहाची कबर—लाहोर.

दिवस या प्रमाणापेक्षां आमचे जास्त दिवस मोडलेच नव्हते. तेव्हां सकाळीं साडेसातांच्या गाडीनें अटकेला जावें, व तेथून पुढें बारांच्या गाडीनें पेशावराला जावें, असा बेत करून आम्ही कँबेलपुराला रात्रीं विश्रांति घेतली.

कालक्रमानें जरी मी तक्षशीला हें पेशावराहून परत येतांना पाहिलें तरी भूमिभागक्रमानें अमृतसर लाहोरानंतर हेंच ठिकाण आधीं लागतें. म्हणून या तक्षशीलेचें वर्णन येथें करणेंच रास्त होईल. तक्षशीला पाहण्यास जाण्याकरितां सराईकाला नांवाच्या स्टेशनवर उतरावें लागतें. हें स्टेशन रावळपिंडीच्या पुढें वीसच मैल आहे. आम्ही पहाटेस पांचसाडेपांच वाजतांच सराईकाल्यास पोहोंचलों. सामान स्टेशनवर ठेवून लागलीच तक्षशीलेची वाट चालूं लागलों. वाटेनें जातांना पुराणवस्तुसंशोधन-खात्याची कचेरी लागते. येथेंच तक्षशीला पाहण्याचे पास मिळतात व मार्गदर्शकही मिळतात. पाहण्यास पास लागतो, हें आम्हांला ठाऊक नसल्यानें आम्ही थेट तक्षशीलेच्या जागीं गेलों. पण त्यामुळें आम्हांला कचेरीकडे पासाकरितां परत येऊन मग मार्गदर्शक घेऊन जावें लागलें.

ज्याप्रमाणें युरोपांत पांपे शहराचा मागमूसही ठाऊक नव्हता व तें अर्वाचीनकाळीं जमीन खोदतांना सांपडलें; त्याचप्रमाणें तक्षशीला शहराची स्थिति आहे. प्रसिद्ध विद्यापीठ या नात्यानें तक्षशीलेचा उल्लेख वाङ्मयांत पुष्कळ ठिकाणीं आलेला आहे.

" ब्रह्मदत्त कुमारानें तक्षशीलेंत शिल्पशास्त्र शिकून तिन्ही वेदांमध्यें पारंगत होऊन अठरा विद्यांचें पूर्ण अध्ययन केलें. नग्गाजि ह्या नांवाचा काश्मीर व गांधार या देशांचा राजा तक्षशीलेंत विद्येकरितां रहात असे. " वगैरे सारखे उल्लेख बुद्धधर्माच्या जातक–कथांतून वारंवार आलेले आहेत. तसेंच शिकंदर या शहरीं आला होता व त्या वेळचें या शहराच्या भरभराटीबद्दलचें वर्णन ग्रीक इतिहासकारांनीं केलेलें आहे. त्याचप्रमाणें प्रसिद्ध चिनी प्रवाशी फेहायन व हुएकसांग यांनींहि या शहराचा निर्देश आपल्या प्रवासवृत्तांत केला आहे. इतकी ज्या शहराची पूर्वकाळीं प्रसिद्धी होती त्या शहराचा अर्वाचीन काळापर्यंत ठाव ठिकाणहि नव्हता. हिंदु-

स्थानच्या पुराणवस्तुसंशोधनात्मक पहाणीचा वृत्तांत लिहितांना जनरल कनिंघाम यांनीं या शहराचा शोध लावला व गेल्या पांचसात वर्षांत हल्लींचे पुराणवस्तुसंशोधन खात्याचे डायरेक्टर सर जॉन मार्शल यांनीं खोदकाम जास्त मोठ्या प्रमाणावर केल्यापासून तर तक्षशीलेचीं शहरेंच्या शहरें मातींत गडदलेलीं आढळून आलीं आहेत; व हिंदुस्थानच्या पूर्वइतिहासावर प्रकाश पाडणाऱ्या किती तरी वस्तु सांपडलेल्या आहेत. नुकतेंच तक्षशीलेच्या संबंधीं मार्गदर्शक व वर्णनात्मक पुस्तक सर मार्शल यांनीं छापलें आहे. त्याचा उपयोग खालील वर्णनांत केलेला आहे हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं.

तक्षशीला हें खरोखरीं एक शहर नाहीं, तर निरनिराळ्या काळीं वसविलेल्या तीन नगरांचा समुदाय आहे. व हल्लीं या तिन्ही शहरांचे तट व तेथल्या इमारती व इतर वस्तु सांपडल्या आहेत.

अगदीं सर्वांत जुनें शहर हल्लीं ज्याला भीर टेकडी म्हणतात तेथें होतें. सराईकाला या स्टेशनकडून निघालें म्हणजे हीच टेकडी प्रथम लागते. हें शहर शिकंदराच्या स्वारीपूर्वीं किती तरी शतकें वसविलेलें असावें. या म्हणण्याच्या प्रत्यंतरास पुष्कळ वस्तु आतां सांपडल्या आहेत. शिकंदराच्या स्वारीनंतर व ग्रीक लोकांनीं या प्रांतांत आपलें राज्य स्थापल्यानंतर खिस्तीशकापूर्वीं दोनशेंच्या सुमारास हातियाल टेकडीवर व त्या टेकडीला लागून असलेल्या मैदानावर सिरकप नांवाचें नवीन शहर वसाविण्यांत आलें. या शहराच्या तटबंदीची सभोंवारची भिंत व शहरांतील रस्ते व दुतर्फी घरें हीं सर्व आतां सांपडलीं आहेत. या शहराच्या पूर्वेस आणखी एका शहराचा अवशेष सांपडला आहे. या शहराचें नांव सिरसुख असें होतें. हें शहर कुशन घराण्याच्या कनिष्क राजाच्या कारकीर्दींत वसविलेलें आहे, असें तेथें सांपडलेल्या वस्तूंवरून ठरत आहे. या तीन शहरांच्या अवशेषाखेरीज किती तरी बुद्धकालीन स्तूप व विहार वगैरे इमारती व देवळें या भागांत [illegible] सांपडलीं आहेत. अर्थात् हा सुमारें आठदहा मैलांच्या घेरांचा भाग [illegible] पुराणवस्तुसंशोधनाच्या दृष्टीनें फारच महत्वाचा आहे. व आतांपर्यंतच या सर्व भागांत सांपडलेल्या वस्तूंनीं हिंदुस्थानच्या पूर्वइति-

हासजुळणीस मदत केली आहे व जसजसें खोदकाम जास्त होऊन अधिक अधिक अवशेष सांपडतील तसतसा हिंदुस्थानच्या इतिहासाच्या हजार वर्षांच्या काळावर जास्तजास्त प्रकाश पडेल यांत शंका नाहीं.

इतका विस्तीर्ण प्रदेश सावकाशपणें पहावयाचा म्हटलें तर सहज दोन-चार दिवस पाहिजेत. आम्हांला दोनचार तासांपेक्षां जास्त अवधी नव्हती. तेव्हां येवढ्या थोड्या अवकाशांत इमारती व शहराचे अवशेष वगैरे जें कांहीं आम्ही पाहिलें तेवढ्यांचेंच वर्णन येथें देणें योग्य आहे.

वर सांगितलेंच आहे, सराईकाला स्टेशनकडून निघालें म्हणजे प्रथमतः भीर टेकडी लागते. या टेकडीवर पुष्कळ ठिकाणीं खोलखोल खणलेलें होतें व त्यांत बुद्धकालीन स्तूप विहार व इतर इमारती यांचे अवशेष व मोडके व अर्धवट स्थितींत राहिलेले भाग दिसत होते; पण या भागांत विशेष कांहीं पाहण्यासारखें नाहीं असें मार्गदर्शकाकडून समजल्यामुळें आम्ही तडक हतीयाल टेकडीच्या बाजूनें धर्मराजीका नांवाच्या प्रचंड स्तूपाकडे गेलों. हा स्तूप सांचीच्या स्तूपाप्रमाणें फार मोठा आहे. हा पूर्वीं मातींत गडदलेला होता पण आतां तो मोकळा केलेला आहे. सांचीच्या स्तूपाप्रमाणें याचे सभोंवतीं प्रचंड कठडा व तोरणें नाहींत. पण सांचीच्या स्तूपाप्रमाणें प्रदक्षिणेच्या मार्गाला चार दारें आहेत व तीं पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण या चार दिशा बरोबर साधून बांधलेलीं आहेत. मुख्य स्तूप व त्याचा प्रदक्षिणामार्ग याचे सभोंवतीं लहानलहान स्तूप किती तरी आहेत. यामुळें सांचीच्या स्तूपाच्या प्रदक्षिणामार्गाप्रमाणें हा मार्ग खुला वाटत नाहीं; तर हल्लींच्या काळच्या देवळाच्या गाभाऱ्याच्या सभोंवारच्या प्रदक्षिणामार्गासारखा तो वाटतो. मुख्य स्तूपाचे बाजूवर व प्रदक्षिणेच्या मार्गाच्या दुसऱ्या बाजूवर किती तरी दगडीनक्षीचें काम दृग्गोचर होतें. त्याप्रमाणेंच या स्तूपाच्या सभोंवारच्या दगडी भिंतीची रचना निरनिराळ्या पद्धतीची आहे. यामुळें निरनिराळीं बांधकामें केव्हां केव्हां रचलीं गेलीं याची अटकळ करतां येते. या बांधकामांत कमानी व तीनपानी महीरपी दृग्गोचर होतात. यावरून व ग्रीक वास्तुकलेच्या दुसऱ्या खुणांवरून या काळीं हिंदु वास्तुकलेचा व ग्रीक-वास्तुकलेचा संबंध घडून हिंदु वास्तुकलेवर ग्रीक-

कलेनें थोडाफार पगडा बसविला होता असें दिसतें. या मोठ्या स्तूपास-भोंवतीं व त्याचे आसपास इतके स्तूप, विहार व इतर इमारती आहेत कीं त्यांचें वर्णन करणें अशक्यप्राय आहे. पण तक्षशीलेच्या शोधापासून जुन्याकाळच्या इमारती व वास्तुकलेचे नमुने सांपडले आहेत इतकेंच नाहीं तर खोदकाम चालू असतां कित्येक नाण्यांनीं व इतर तत्कालीन वस्तूंनीं भरलेलीं भांडीं सांपडलेलीं आहेत; त्याप्रमाणें कित्येक फुटलेल्या स्तूपांमधून सोन्याच्या, रूप्याच्या व इतर धातूच्या पेट्या सांपडलेल्या आहेत व इमारती व वास्तुकलेचे नमुने यांपेक्षां या इतर वस्तूंचें ऐतिहासिकदृष्ट्या जास्तच महत्व आहे. कारण या वस्तूंनीं तक्षशीलेच्या व अप्रत्यक्षपणें हिंदुस्थानच्या जुन्या इतिहासावर किती तरी प्रकाश पडला आहे. या वस्तूंमध्यें खुद्द बुद्धाच्या दांताचे व हाडाचे अवशेषही सांपडलेले आहेत. मुख्य स्तूपाच्या पश्चिमबाजूच्या एका लहान स्तूपाच्या मध्यभागीं बुद्धाच्या हाडाचे अवशेष सांपडले. हे अवशेष इतके महत्त्वाचे होते कीं, ते अवशेष १८१७ च्या फेब्रूवारी महिन्यांत व्हाईसरॉय लार्ड चेम्सफर्ड यांनीं लंकेंतील बुद्ध लोकांना नजर केले व त्यांनीं ते अवशेष कँडी येथील बुद्धाच्या दांताच्या अवशेषाच्या मंदिरांत मोठ्या भक्तिभावानें ठेविले आहेत.

या लहान स्तूपाच्या पश्चिमेस पांचसहा लहानलहान खोल्या आहेत. त्यांपैकीं एका खोलींत एक लहानशी सोन्याची डबी सांपडली व तीमध्यें एक लेख सांपडलेला आहे. तक्षशीलेंत सांपडलेल्या पुराणवस्तूंमध्यें हा लेख म्हणजे एक अपूर्व शोध आहे. हा लेख खरोष्ट्री भाषेंत असून त्या लेखाचा काळ इसवी सन ७८ हा आहे. त्या लेखाचा सारांश असा आहे.

" आझीसच्या १३६ व्या वर्षी आषाढाच्या पौर्णिमेस नोच नगरांत राहणाऱ्या लोतप्रियाच्या मुलानें तक्षशीलेंतील धर्मराजिकास्तूपाच्या बोधिसत्व विहारांत बुद्ध देवाचे अवशेष राजाधिराज महाराज कुशन यांच्या आरोग्याकरितां ठेविले आहेत. "

या खोल्यांच्याहि पलीकडे असलेल्या एका खोलींत काळ्या, पांढऱ्या, पिवळ्या व निळ्या रंगाच्या काचेच्या विटांची फरशी केलेली मिळाली आहे. यावरून काचकामाची कला हिंदुस्थानांत फार पूर्व काळापासून

टाऊक होती असें सिद्ध झालें आहे. इतकेंच नाहीं तर चीनमध्यें काच कामाची कला उत्तरहिंदुस्थानांतून आली या परंपरागत समजाचें या शोधानें समर्थन होत आहे.

मुख्य स्तूपाला आम्ही प्रदक्षिणा घालून स्तूपाच्या उत्तरेच्या उंचवट्या-कडे गेलों. तेथून या सर्व भागांत खोदकाम करून सांपडलेले किती तरी वास्तुकलेचे नमुने दृग्गोचर होतात. तसेंच येथून बऱ्याच दूरचा भाग दिसून येतो व त्यावरून तक्षशीलेच्या प्राचीन विस्ताराची उत्तम कल्पना मनांत येते.

धर्मराजिका स्तूप व त्याच्या आसपासच्या इमारती पाहिल्यावर आम्ही डाव्या बाजूकडे वळलों व हत्तीयाल टेकडीकडे चाललों. इकडे जातांना साफ रस्ता नाहींच म्हटलें तरी चालेल. बहुतेक रस्ता दगडाळ व खांच-खळग्याचा आहे. पण हा रस्ता टाकून टेकडीच्या माथ्यावर आलें म्हणजे आणखी एक मोठा स्तूप लागतो. हा स्तूप एकटाच आहे. धर्मराजिका स्तूपाप्रमाणें याचे आसपास व सभोंवार इमारती नाहींत. हा स्तूप बराच उंच आहे व एकावर एक असे तीन चबुतरे केले असून मग त्यावर स्तूप बांधला आहे. या स्तूपाचें नांव कुनाल स्तूप असें आहे. हा स्तूप अशो-कानें आपल्या कुनाल नांवाच्या मुलाचें स्मारक म्हणून बांधला अशी दंत-कथा आहे. तक्षशीलेंत हुएन सँग राहिला होता तेव्हां त्यानें हा स्तूप पाहिला होता व त्याचें वर्णनहि त्यानें आपल्या प्रवासवृत्तांत दिलें आहे. तसेंच या स्तूपाच्या नांवाबद्दलची दंतकथाहि हुएनसंगनें दिली आहे. ही दंतकथा अशी आहे.

आपली पतिव्रता पत्नी असंधिमित्रा इच्या मरणानंतर अशोक राजानें आपल्या उत्तर वयांत तिष्यरक्षिता नांवाच्या दुर्वृत्त व उच्छृंखल तरुणीशीं लग्न केलें. अशोकाला पहिल्या पत्नीपासून झालेला कुनाल नांवाचा मुलगा होता. या मुलाचे डोळे फारच सुंदर होते. तिष्यरक्षिता या तरुण मुला-कडे कामुक दृष्टीनें पाहूं लागली. आपल्या सावत्र आईच्या त्या विषयी चेष्टांबद्दल त्या धर्मशील तरुणानें आपल्या सावत्र आईची चांगली कान-उघडणी केली. यामुळें तिष्यरक्षिता या मुलाचा द्वेष करूं लागली व तिनें

आपली प्रार्थना नाकारल्याबद्दल या मुलाचा सूड घेण्याचा कट केला. तिनें अशोकाशीं साखरपेरी भाषण करून दूरच्या तक्षशीला प्रांताच्या कारभारावर देखरेख करण्याकरितां कुनालाला पाठविण्याबद्दल राजाचें मन वळविलें. राजकुमारानें राजाची आज्ञा शिरसा वंद्य मानून तक्षशीलेस जाण्याचें ठरविलें. जातांना राजानें राजकुमारास सांगितलें कीं, मी जे हुकूम तुला पाठवीन त्यांवर माझ्या दाताचा ठसा उठवीन तरी असा ठसा पाहून हुकुमाच्या खरेपणाबद्दल आपली खातरी करून त्याप्रमाणें वागत जा. तिष्यरक्षिता आपला कट पार पाडण्याची संधि पहात होती.

तक्षशीलेंतील राजकुमाराच्या प्रधानाच्या नांवानें एक हुकूम तिष्यरक्षितेनें तयार केला. त्यांत हुकूम पोंचतांच राजकुमाराचे डोळे काढून टाकून त्याला व त्याच्या बायकोला रानांत सोडून द्यावें असा मजकूर होता. तिष्यरक्षितेनें तो हुकूम बंद करून त्यावर तांबडी लाख घातली व राजा निजला असतां चोरून त्याच्या दांताचा ठसा लाखेवर उठवून घेतला व ताबडतोब तो हुकूम तक्षशीलेस पाठवून दिला. प्रधानांना तो हुकूम मिळाल्यावर त्यांना काय करावें तें सुचेना. प्रधानांच्या मनाची चलबिचल पाहून राजकुमारानें त्यांना त्याचें कारण विचारलें. त्यांनीं हुकुमांतला मजकूर सांगितला व पुनः पाटलीपुत्र शहराकडे माणूस पाठवून राजाज्ञेच्या खरेपणाबद्दल चवकशी करूं व तेथपर्यंत रामकुमारानीं आमच्या ताब्यांत राहावें असें म्हटलें. परंतु राजकुमार म्हणाला " जर माझ्या वडिलांनीं मला मारून टाकण्याचा हुकूम केला आहे तर तो मान्य केलाच पाहिजे. या हुकूमावर माझ्या वडिलांच्या दातांचा ठसा आहे. तेव्हां या हुकुमाच्या खरेपणाबद्दल शंका कसली ? तरी तुम्ही हुकुमाप्रमाणें वागण्यास विलंब करूं नका. " नंतर राजकुमारानें एका अतिशूद्रास आपले डोळे काढण्याचा हुकुम केला. हुकुमाची ताबडतोब अंमलबजावणी झाली. आंधळा राजकुमार व त्याची पतिव्रता स्त्री भिक्षा मागत वाट फुटेल तिकडे चाललीं. जातांजातां ती पाटलीपुत्र शहराला येऊन पोंचलीं. तो आंधळा राजकुमार आपल्या मनाशीं म्हणाला " भूक व थंडीवारा यांपासून मला किती दुःख होत आहे. मी राजकुमार होतों; आतां भिकारी झालों आहें.

आपली ओळख पटवून आपल्यावर नाहक आलेल्या आरोपाचें परिमार्जन करतां येईल तर किती बहार होईल." त्यानें राजवाड्याच्या आंतल्या चौकांत आपला शिरकाव करून घेतला व तेथें पोंचल्यावर त्यानें वीण्यावर एक शोकरसात्मक गाणें गाईलें. राजानें तें गाणें ऐकलें व आपल्या मुलाचा तो आवाज आहे असें ओळखून राजानें गाणारास आपल्याकडे बोलावून घेतलें. राजानें जेव्हां आपल्या अंध झालेल्या मुलाला पाहिलें तेव्हां त्याला अतोनात दुःख झालें व त्यानें कोणाच्या कौटिल्यामुळें हें संकट तुझ्यावर आलें असें राजकुमाराला विचारलें. राजकुमारानें उत्तर दिलें. 'आपल्याच हुकुमानें हें घडून आलें.' अशोक राजानें तिष्यरक्षितेचें हें कौटिल्य आहे हें जाणलें. त्यानें तिष्यरक्षितेला जिवंत जाळण्याची शिक्षा दिली व या कटांतील इतर साथीदारांनाही कडक शिक्षा दिल्या. नंतर अशोक राजानें राजकुमारास बुद्धगया येथें महाबोधी वृक्षाखालीं राहणाऱ्या घोष नांवाच्या बुद्धभिक्षूकडे नेलें. व राजकुमाराचे डोळे परत आणण्याकरितां प्रार्थना केली. दुसऱ्या दिवशीं पुष्कळ मंडळी माझ्या धर्मप्रवचनाचें श्रवण करण्यास बोलवावी व प्रत्येकानें अश्रु साठविण्याकरितां एक भांडें बरोबर घेऊन यावें अशी घोष भिक्षुनें आज्ञा केली. दुसरें दिवशीं स्त्रीपुरुषांचा मोठा जमाव जमला व घोष भिक्षूच्या प्रवचनानें प्रत्येकाच्या डोळयास टिपें आल्यावांचून राहिली नाहींत. नंतर या सर्व अश्रूचें पाणी भिक्षुनें एका सोन्याच्या भांड्यांत घातलें व तो म्हणाला "जर मी आज सांगितलेल्या गोष्टी खोट्या असतील तर आहे या स्थितींत फरक होणार नाहीं. पण जर मी सत्यधर्म प्रतिपादन केला असेल तर या अश्रुजलानें धुतल्यावर राजकुमाराचे डोळे पूर्ववत होतील." या नंतर कुनालानें त्या अश्रुजलानें आपले डोळे धुतले व त्याची दृष्टि पूर्ववत् झाली.

हा कुनालस्तूप सिरकप शहराच्या तटाशींच आहे. या शहराचा तट हत्तीयाल टेकडी व त्याच्या जवळचें मैदान या सभोंवतीं आहे. आतां हा सर्व मोकळा करण्यांत आला आहे. टेकडी उतरून खालीं मैदानावर आलें म्हणजे शहराचें प्रवेशद्वार लागतें. या प्रवेशद्वारांतून बरेंच पुढें गेल्यावर

मोठा एक वाडा लागतो. यांत कितीतरी दालनें, दिवाणखाने व खोल्या दृष्टीस पडतात. हा या शहरांतला राजवाडा होता. जरा पुढें गेल्यावर एक लांबचलांब रस्ता लागतो व त्याच्या दुतर्फा घरें लागतात. हा रस्ता पाहून आम्हांला रायगड किल्यावरील वस्तीची आठवण झाली. तेथल्याप्रमाणें येथलीं घरें रस्त्यापासून फार उंच दिसलीं. या रस्त्यामधून जात जात आम्ही शहराच्या तटाच्या उत्तरेच्या दरवाजाकडे आलों व त्या दरवाजांतूनच आम्ही शहराबाहेर पडलों. तक्षशीलेचें सांपडलेलें सिरसुख नांवाचें तिसरें शहर व त्याच्याहि पलीकडे सांपडलेले वास्तुकलेचे मासले येथून बरेच दूर असल्याचें मार्गदर्शकानें सांगितल्यामुळें आम्ही तिकडे जाण्याच्या भानगडींत पडलों नाहीं.

तक्षशीला या पूर्वकालीन विद्यापीठाकरितां प्रसिद्ध असलेल्या शहराचें इतकें तरी दर्शन आपल्याला घडलें यांतच समाधान मानून आम्ही तडक सराईकाला स्टेशनवर आलों.

आतां आपण तक्षशीलेच्या पूर्वपीठिकेकडे पाहूं. मथुरेप्रमाणें तक्षशीला हें शहर फार पुरातन काळचें आहे असें दिसतें. तक्षशीलेचा उल्लेख महाभारतांतसुद्धां आहे. जनमेजय राजानें तक्षशीला काबीज केली असा उल्लेख जनमेजयाच्या सर्पसत्राच्या वर्णनाच्या ठिकाणीं आला आहे. रामायणांत तर तक्षशीला शहराच्या स्थापनेची हकीकत खालील श्लोकांत आली आहे.

हतेषु तेषु सर्वेषु भरतः केकयीसुतः ।
निवेशयामास तदा समृद्धे द्वे पुरोत्तमे ॥
तक्षं तक्षशीलायां तु पुष्कलं पुष्कलावते ।
गन्धर्वदेशे रुचिरे गान्धारविषये च सः ॥

" सर्व गन्धर्व मारल्यावर कैकयीचा मुलगा भरत यानें तक्षशीला व पुष्कलावत अशीं दोन समृद्ध शहरें वसविलीं व गन्धर्व देशांतील तक्षशीलेंत त्यानें आपल्या तक्ष मुलाची स्थापना केली व गान्धार देशांतील पुष्कलावतांत पुष्कलाची स्थापना केली."

कालिदासानें रामायणांतील ही हकीकत आपल्या रघुवंशांत खालील श्लोकांत थोडक्यांत पण खुबीदार रीतीनें ग्रथित केली आहे.

भरतस्तत्र गंधर्वान् युधिनिर्जित्य केवलान् ।
आतोद्यान् ग्राहयामास समत्याजयदायुधं ॥
स तक्ष-पुष्कलौ पुत्रौ राजधान्योस्तदाख्ययोः ।
अभिषिच्याभिषेकार्हौ रामान्तिकमगात् पुनः ॥

" त्या ठिकाणीं भरतानें लढाईत सर्व गन्धर्वांचा पराजय केला व आपलीं आयुधें त्यांना टाकून द्यावयास लावून आपलीं वाद्यें घ्यावयास लाविलें. त्यानें अभिषेकास योग्य अशा आपल्या तक्ष व पुष्कल या नांवांच्या मुलांची तक्षशीला व पुष्कलावत या राजधान्यांमध्यें प्रस्थापना करून तो परत रामाजवळ गेला. "

यापुढें इतिहासकाळाकडे पाहूं लागलें असतां असें दिसतें कीं, ख्रिस्तीशकापूर्वीं पांचशें वर्षांपूर्वीं तक्षशीला परशीयाच्या राजाच्या ताब्यांत आली होती. कारण परसीपोलीस येथील डरायस राजाच्या शिलालेखांत नव्यानें स्थापलेल्या हिंदुस्थानच्या सुभ्याचा उल्लेख आहे. हा सुभा म्हणजे सिंधप्रांत व सिंधुनदीच्या पूर्वेकडला थोडासा भाग यांमिळून झालेला असावा असें म्हणणें आतां प्राप्त आहे. कारण तक्षशिलेंत पुराणवस्तु खणून काढतांना ख्रिस्तीशकापूर्वींच्या चारशें किंवा पांचशें वर्षांच्या सुमाराचा एक शिलालेख सांपडला आहे व त्याची लिपी आरमईक म्हणजे परशीयन लिपीसारखी आहे. या लिपीवरून परशीयाचा अंमल तक्षशिलेंत झाला होता असें ठरून डरायसच्या शिलालेखाचा खरेपणा सिद्ध होतो; पण पुढील काळांत तक्षशीला एक मोठें विद्यापीठ या नात्यानें प्रसिद्ध होतें असें बुद्धजातककथांवरून दिसून येतें.

शिकंदर बादशहाच्या स्वारीच्या वेळीं आंभी नांवाचा राजा तक्षशीलेंत राज्य करीत होता. शिकंदराची स्वारी सिंधूच्या अलीकडे आल्यावर तक्षशीलेच्या राजानें शिकंदराचें मांडलिकत्व पतकरलें व शिकंदर इसवीसनापूर्वीं ३२६या वर्षीं पोरस राजावर मोहीम करण्यापूर्वीं तक्षशीलेंत कांहीं दिवस राहिला

होता हें इतिहासप्रसिद्धच आहे. परंतु पंजाबावरील शिकंदर बादशहाचा अंमल त्याच्या मरणानंतर लवकर नाहींसा झाला. कारण मगधाचें राज्य चंद्रगुप्त मौर्य यानें मिळविलें व त्यानें ग्रीक लोकांना हिंदुकुश पर्वतापलीकडे घालवून दिलें व तेथपर्यंतच्या मुलुखावर आपला सक्त अंमल बसविला. अर्थात् तक्षशीला व त्या सभोंवतालचा प्रदेश मगध साम्राज्यांत अन्तर्भूत झाला. चंद्रगुप्ताचा मुलगा बिंदुसार याचे कारकीर्दींत अशोक राजकुमार तक्षशीलेस त्या प्रांताचा सुभेदार होऊन आला. पुढें अशोकाच्या कारकीर्दींत तक्षशीलेस बुद्धधर्माचें फारच प्राबल्य वाढलें. अशोकाच्या मरणानंतर मगधाच्या साम्राज्यास उतरती कळा लागली व बकट्रिया येथें स्थाईक झालेल्या ग्रीक राजांनीं पुनः पंजाब प्रांत सर केला व तक्षशीला येथें ग्रीक राजे झाले. तक्षशीलेवर ग्रीक अंमल सरासरी शंभर वर्षें होता. याच काळांत भीरटेकडी नांवाच्या स्थळीं जें तक्षशीला शहर होतें तें मोडकळीस येऊन त्याचें हल्लीं सिरकप म्हणून शोध लागलेल्या ठिकाणीं स्थलांतर झालें व तेथें नवें शहर वसविलें गेलें. ग्रीक अंमलानंतर तक्षशीलेवर शक लोकांचा अंमल सुरू झाला. हाही सुमारें शंभर वर्षें टिकला. पुढें कुशन घराण्याचें मोठें साम्राज्य या भागांत झालें व तक्षशीला कुशन राजांच्या ताब्यांत गेली. कुशन घराण्यांतील सर्वांत पराक्रमी व बलाढ्य राजा जो कनिष्क याच्या कारकीर्दींत तक्षशीलेचें आणखी एकदां स्थलांतर होऊन त्यानें सिरसुख नांवाचें नवें शहर वसविलें. कुशन घराण्याचें राज्यवैभव सरासरी दोनशें वर्षें टिकलें. पण वासुदेव या नांवाच्या कुशन घराण्यांतील राजाच्या मरणानंतर कुशनांचे राज्यवैभव नष्ट झालें. वासुदेव कुशन याच्यावर हिंदुधर्माचा पगडा बसला व एव्हांपासून तक्षशीलेंत बुद्धधर्माचें वर्चस्व कमी झालें. पुढें मग यावर गुप्त घराण्याचे राजे झाले. त्यांनीं सर्व हिंदुस्थान काबीज केलें व हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें. त्यांच्या कारकीर्दींत फेहायन हा तक्षशीलेस आला होता. तेथें अजून बुद्ध धर्माचें बरेंच प्राबल्य होतें. गुप्त साम्राज्याचा व त्यांच्या संस्कृतीचा नायनाट हूण लोकांच्या स्वाऱ्यांनीं केला. व त्या लोकांनीं शहरांची जाळपोळ व नासधूस केली. तेव्हांपासून तक्षशीलेचें विद्यापीठ या नात्यानें महत्त्व कमी झालें व शह-

रहि मोडकळीस येऊन तें नामशेष झालें. हुएन संगाच्या काळीं तक्षशीलेचें वैभव नष्टप्रायच झालें होतें. पुढच्या काळांत तर या प्रसिद्ध विद्यापीठाचा जो मागमूस व ठावठिकाण नाहींसा झाला तो अगदीं अर्वाचीन काळापर्यंत टिकला. इंग्रज अंमलांतील पुराणवस्तुसंशोधनाच्या उद्योगानें या फार पुरातन शहराचा शोध लागला आहे व या स्थळीं सांपडलेल्या पुरातन वस्तूंनीं हिंदुस्थानच्या इतिहासावर नवा नवा प्रकाश पडूं लागला आहे. अशी तक्षशीलेची विविधस्थित्यंरांनीं युक्त पूर्वपीठीका आहे. असो.

पेशावराला श्रीयुत गोगटे या नांवाचे एक सबअसिस्टंट सर्जन तेथल्या मराठा पलटणींत होते, त्यांच्याकडे उतरावयाचें आम्ही ठरविलें होतें. 'पेशावराला तीन वाजतां आम्ही येऊं,' अशी तार त्यांना करून आम्ही गाडींत बसलों, व गाडी चालू झाली.

कँबेलपुर स्टेशन सोडल्यावर लागलीच टेकड्यांचीं रांगची रांग दृग्गोचर होऊं लागली; खडकाळ व उंचवट अशा भागांतून गाडी जाऊं लागली, व लवकरच अटक स्टेशनवर गाडी येऊन पोहोंचली. आम्ही गाडींतून खालीं उतरतों, तोंच गाडी फूं फूं करीत पुढें निघून गेली.

ज्या ठिकाणाचें नांव वयाच्या दहाव्या वर्षापासून मला अवगत होतें, ज्या ठिकाणीं पोहोंचून आपल्या भगव्या झेंड्याचें निशाण रोवल्याबद्दल सर्व मराठ्यांना अजूनहि अभिमान वाटतो, माझ्या प्रवासाचा बेत ठरल्यापासून ज्या ठिकाणचा मला सारखा निदिध्यास लागला होता, त्या ठिकाणीं एकदां आपण सुखरूप येऊन पोहोंचलों, हें पाहून आम्हांला किती आनंद झाला म्हणून सांगूं? आमच्याबरोबर कँबेलपुरच्या वकीलसाहेबांनीं आपले चिरंजीव पाठविले होते, व अटकेच्या किल्ल्यावरील कमांडरला चिठीहि दिली होती; तेव्हां आम्ही स्टेशनवर सामान ठेवून टांगा करून तडक अटक किल्ल्याकडे गेलों.

स्टेशनापासून किल्ला सुमारें पाऊण मैल आहे. अटकेचा किल्ला म्हणजे सिंधूनदीच्या तीराला ज्या टेकड्या आहेत, त्यांच्या सभोंवार एक तट बांधलेला आहे. नदीच्या प्रवाहापासून जी तटाला सुरवात होते ती टेकडीच्या थेट माथ्यापर्यंत जाते. यामुळें किल्ल्याच्या तटामध्यें उंचसखलपणा

अत्यंत आहे; शत्रु नदी उतरून अलीकडे येऊं लागल्यास त्याला प्रतिबंध करण्याकरितां हा किल्ला अकबरबादशाहानें सन १५८१ मध्यें बांधला. आम्ही कमांडरला चिठ्ठी दाखवून त्यावर परवानगीची सही घेऊन इंग्रज शिपायांच्या पाहाऱ्यांतून आंत गेलों. किल्ला कांहीं फार मोठा नाहीं. अटक गांवची वसती किल्ल्याला लागूनच नदीच्या कडेला आहे. टेकड्या व नदीचा तीर यांमध्यें खुली जागा फारच थोडी आहे. हें पूर्वीं जिल्ह्याचें ठिकाण होतें. पण संकुचित जागेमुळें येथें वसती वाढवावयाला अवसर नसल्यामुळें उघड्या जागेवर असलेल्या कॅंबेलपुर या गांवीं जिल्ह्याचें ठिकाण नुकतेंच करण्यांत आलें आहे.

आम्ही तटातटानें बहुतेक सर्व किल्ला फिरलों. किल्ल्याच्या तटावरून सिंधू नदीचा देखावा अवर्णनीय दिसतो. उजव्या हाताला टेकड्यांच्या पलीकडे सिंधुनदीचें पात्र फारच रुंद व म्हणूनच प्रवाह शांत आहे. अटकच्या शेजारींच सिंधु व काबूल या नद्यांचा संगम झाला आहे. ही नदीहि सपाट प्रदेशावरून येते. याप्रमाणें सपाट प्रदेशावरून संथपणें व प्रशस्तपणें या नद्या वहात येऊन मग तेथें एकमेकींना मिळून अटकेजवळच्या टेकड्यांत जणूं काय घुसत आहेत, असा येथें भास होतो. कारण, अटकेच्या दोनहि बाजूंना उंचउंच टेकड्या आहेत, व सिंधु नदी या उंचउंच टेकड्यांमधल्या अरुंद मार्गानें व म्हणूनच विलक्षण वेगानें जाऊं लागते. रुंद व मोकळ्या पाटानें वहाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाला अरुंद नळ लावला, म्हणजे जशी पाण्याची स्थिति होते, तशी येथें सिंधूची स्थिति झाली आहे. यामुळें या ठिकाणीं नदीचें पात्र अरुंद आहे, पण प्रवाहाचा वेग व पाण्याची खोली, हीं कल्पनातीत आहेत.

आम्ही तटावरून निरनिराळ्या बुरुजांवरून येथली शोभा पहातपहात खालीं येत होतों. अलकिडे व पलीकडे निर्वृक्ष व जांभळटकाळसर खडकांच्या त्या प्रचंड टेकड्या, आणि मध्यें नजर न ठरणाऱ्या वेगानें वाहणारी ती सिंधु नदी, हीं पाहिलीं, म्हणजे या ठिकाणाला 'अटक' हें नांव कां पडलें असावें हें तेव्हांच ध्यानांत येऊन आपल्या लोकांना अटक हें हिंदुस्तानचा शेवट असें कां वाटे, व अटकेला झेंडे नेणें म्हणजे सर्व

हिंदुस्तान काबीज करणें असें कां वाटें याचाहि सहज उलगडा होतो.

याच नदीच्या पर्शियन उच्चारावरून सिंधुनदीपलीकडील देशाला ' हिंदुस्तान ' असें नांव मिळालें, व हिंदुस्तानची ही स्वाभाविक मर्यादाच आहे. सिंधु नदी टाकली, कीं, पूर्वीचा गांधार देश लागे. आतां त्याला ' वायव्यसरहद्दीवरचा प्रांत ' म्हणतात. या टेकड्यांवर सैन्य ठेवून जर नदीचा मार्ग बंद केला तर हिंदुस्तानच्या वायव्य टोंकाची नाकेबंदी केल्याप्रमाणें आहे, व म्हणूनच अकबरबादशाहानें आपल्या साम्राज्याच्या संरक्षणाकरितां येथें हा किल्ला बांधला.

तटावरून खालीं येतांयेतां आम्ही अगदीं नदीच्या किनाऱ्याजवळ आलों. तेथें लहानसा घाट होता. त्याच्या पायऱ्या उतरून अगदीं पाण्याजवळ गेलों, व प्रवाहांत हात घातला, तों बर्फासारखें अगदीं थंडगार पाणी हाताला लागलें. पाणी धूसर रंगाचें दिसलें. कारण, वरून येतांना पाण्यांत रेती पुष्कळच मिसळलेली असते. आम्ही उभे होतों, त्यांच्या समोर नदींतील नाव लागण्याची जागा होती. येथें प्रवाह कांहीं फारसा रुंद नाहीं; पण पाण्याला ओढ फार असल्यामुळें समोरासमोर येणें शक्यच नाहीं. त्या तीरावरून या तीरावर यावयाचें म्हणजे किती तरी वांकडेंवांकडें यावें, तेव्हां पैलतीराला पोहोंचणें शक्य आहे, असें आम्हांला दिसून आलें.

या घाटावर आम्ही थोडा वेळ थांबलों; पण त्या सर्व वेळांत माझ्या मनांत किती तरी विचार येत होते ! हल्लींच्या आम्हां हिंदु लोकांचे फार जुने पूर्वज आर्यलोक ही नदी ओलांडून हिंदुस्तानांत आले, तेव्हांपासून त्यांना या नदीचें कौतुक वाटत आलें आहे. या नदीचा देखावाच असा आहे, कीं, तो पाहून तिच्याबद्दल आश्चर्य व आदर वाटण्याखेरीज गत्यंतरच नाहीं ! या नदीचा या ठिकाणचा जोर, तिचा धो धो आवाज व तिची एकंदर गति हीं अवर्णनीय आहेत. याच ठिकाणीं पूर्वऋषींनीं सिंधूच्या देखाव्यानें आश्चर्यचकित होऊन वेदांतील वर्णनें केलीं असलीं पाहिजेत असें मला वाटलें. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांतलें सिंधूच्या वर्णनाचें एक प्रसिद्ध सूक्त आहे.

या सूक्तांत पंजाबांतील बहुतेक नद्या, गांधार देशांतील दोन नद्या, आणि मध्यदेशांतील दोन नद्या इतक्यांचीं नांवें आलीं आहेत. यावरून त्या काळीं आर्य लोकांना हिंदुस्तानच्या कोणत्या भागाचें ज्ञान होतें, हें कळून येतें. हें सूक्त या नद्यांचीं स्तुति करण्याच्या उद्देशानें केलेलें आहे; पण त्यांत मुख्यतः सिंधूला आवाहन केलेलें आहे. त्याचें भाषांतर असें—

१. हे नद्यांनों ! यजमानाच्या घरीं कवि तुमच्या सर्वोत्कृष्ट महिम्याचें वर्णन करतो. सातसात अशा त्या तीन मार्गांनीं वहातात. वाहाणाऱ्या (नद्यां) मध्यें सिंधु आपल्या सामर्थ्यानें श्रेष्ठ आहे.

२. हे सिंधु, जेव्हां तूं अन्नाकडे वहात गेलीस, तेव्हां तुला जाण्याकरितां वरुणानें मार्ग खुले केले. तूं उंच व निमुळत्या मार्गानें भूमीवर येतेस, म्हणून तूं या सर्व जाणाऱ्यांच्या (नद्यांच्या) अग्रभागीं जातेस.

३. तुझा (घोंघो) आवाज जमिनीवरून आकाशांत जातो. ती सिंधु आपला अनंत असा जोर (लाटा) तेजस्वितेनें उसळविते. जेव्हां सिंधु डुरकणाऱ्या बैलाप्रमाणें येते, तेव्हां (तिचा आवाज) मेघांतून होणाऱ्या वृष्टीच्या गर्जनेप्रमाणें होतो.

४. हे सिंधु ! ज्याप्रमाणें आई मुलांकडे किंवा दुधासह गाई (वासरांकडे) जातात, त्याप्रमाणें शब्द करणाऱ्या (नद्या) तुझ्याकडे जातात. तूंच युद्धकुशल राजाप्रमाणें दोन्ही बाजू पुढें नेतेस व निमुळत्या जाणाऱ्या नद्यांच्या अग्रभागीं तूं जातेस.

५. हे गंगे, यमुने, सरस्वति शुतुद्रि (सतलज) परुष्णसिह (रावीसह) माझ्या स्तवनाचा स्वीकार करा. हे मरुद्वृधे (सिंधु?) असिकनी (चिनाव) सह वितस्ते (झेलम) सह व अर्जीकीये (बियास) सुषोमेसह माझें (स्तवन) ऐका.

६. हे सिंधु, तृष्टामा, रस, श्वेता सुसर्तू याच्याशीं वाहण्याकरितां प्रथमतः संगत होऊन मग कुभेसह (काबूल नदी) क्रुमुशीं (कुरम) व मेहत्नूसह गोमतीशीं संगत हो. नंतर तूं या सर्व नद्या घेऊन पुढें जातेस.

७–८. सरळ जाणारी आणि (एणी नांवाच्या हरणासारखी) चपलतेनें वहाणारी, देदीप्यमान, अशी सिंधु आपल्या महिम्यानें विस्तीर्ण प्रदेशचे प्रदेश भरून टाकते. अप्रतिहत कर्तृत्ववान् नद्यांमध्यें श्रेष्ठ घोडीसारखी चित्रविचित्र व युवतीसारखी दर्शनीय; अश्व, रथ, कार्पासवस्त्र, अन्न, सुवर्ण, लोंकर, सीलमा (नांगराचा फाळ बांधावयाच्या दोरीची वनस्पति) यांनीं संपन्न व सुकृति, तरुण, सुभग अशी सिंधु मधु पोषण करणाऱ्या (ओषधीं) नीं आपलें अवगुंठन करते.

९. सुखद अश्वांनीं युक्त असा रथ सिंधु जोडते. त्या रथांत बसून ती आम्हांला या युद्धांत अन्नधन देवो. अप्रतिहत स्वयंकीर्तिमान् शक्तिमान् अशा या रथाचा महिमा (लोक) गातात.

या सूक्तांत किती तरी नद्यांचीं नांवें आलेलीं आहेत. त्यांपैकीं सर्वांची हल्लींच्या नांवांशीं संगति जोडलेली नाहीं. तरी पण या सूक्तांत पंजाब, गांधार व मध्यदेश या प्रदेशांतील बहुतेक नद्यांचा उल्लेख आलेला आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे, व यावरून वेदकाळीं इतक्या प्रांतांत आर्यांची वसाहत झाली होती, असें दिसतें. असो.

आम्ही घाटावर बसून एकंदर देखावा किती तरी वेळ पहात होतों. आमच्या पावलांजवळच सिंधूचा तो विलक्षण वेगानें वहाणारा व दोन्ही बाजूंच्या टेकड्यांच्या काळसरजांभळट खडकाला भेदून जाणारा प्रचंड प्रवाह; अलीकडे टेकड्यांच्या माथ्यापर्यंत वरवर जाणारा तो किल्ल्याचा तट; पलीकडे टेकड्यांतून नागमोडीनें जाणारी रेलवे व पायरस्ता आणि खैराबादचें स्टेशन व त्याच्याहि पलीकडे उंच टेकड्यांची रांग; उजव्या हाताला काबूल व सिंधु या नद्यांचा संगम आणि त्यांचीं रुंद व संथ पात्रें; डाव्या बाजूला दोन्ही नद्यांचे मिळून एकच अरुंद-पण लांबवर तटासारख्या खडकाच्या आकुंचित मार्गानें जावें लागल्यामुळेंच जणूं कांहीं रागावून खडकावर धो धो आवाज करून लाटा आपटणारा तो सिंधूचा एकच प्रवाह, हा सर्व देखावा केवळ अदृष्टपूर्व आहे, असें माझ्या मनाला वाटलें;

व असा देखावा सुदैवानें दृष्टिगत करण्याचा सुयोग मला आला, म्हणून मनाला विलक्षण आनंद वाटला.

आतां बराच वेळ झाला, म्हणून परिचित मंडळीचा निरोप घेतांना इंग्रजी तऱ्हेनें हस्तांदोलन करतात, त्याप्रमाणें सिंधूच्या गारगार पाण्याला पुनः एकदां स्पर्श करून त्या स्पर्शसुखाचा अनुभव घेतघेत आह्मी मोठ्या नाखुषीनें परत फिरलों. परततांना आम्ही अटक गांवाहून आलों. हें गांव अगदीं खेडेवजा लहान आहे. वाटेनें मेवामिठाईचीं, कापडाचीं, किराण्या जिनसांचीं थोडीशीं दुकानें लागलीं, तेव्हां आम्ही त्या गांवच्या पेठेंतूनच बाहेर पडलों, असें वाटलें.

थोड्याच वेळानें आम्ही स्टेशनवर येऊन पोहोंचलों. सिंधुनदीच्या सभोंवतालच्या सर्व टेकड्या अगदीं उघड्या निर्वन आहेत, व खडकहि जांभळ्या रंगाचा आहे. स्टेशनच्या जवळच सिंधूवरील पूल आहे, तेव्हां तो पूलहि पहावयाला आम्ही गेलों. या पुलावर नेहमीं संत्रीपहारा असतो. पूल कांहीं फार लांब आहे, असें नाहीं. मात्र तो फारच उंच आहे. सर्व पूल लोखंडीच आहे, व तो दुमजली आहे. खालच्या मजल्यावर पायरस्ता व गाडीरस्ता आहे, आणि वरच्या मजल्यावरून आगगाडीचा रस्ता आहे. पूलाचे खांब लोखंडी आहेत. व त्या खांबांच्या पुढें दगडी लंबवर्तुलाकार दुसरे खांब बांधलेले आहेत. हे खांब जुन्या पुलाचे आहेत, किंवा पाण्याच्या प्रवाहाचा जोर लोखंडी खांबांवर पडूं नये, व प्रवाह त्या त्या ठिकाणीं दुभंगून जावा म्हणून ते मुद्दाम बांधलेले आहेत, हें समजलें नाहीं. पण येथें प्रवाहाचा जो विलक्षण वेग आहे, तो लक्ष्यांत घेतां दुसरीच कल्पना खरी असावी, असें वाटलें. आम्ही सर्व पूल ओलांडला. पुलाच्या मध्यावर आल्यावर सिंधूच्या दोन्ही बाजूंचा प्रवाह दूरवर दिसत होता. प्रवाह एकीकडे संथ, तर दुसरीकडे वेगवान्, असा तो त्याचा विरोध फार प्रेक्षणीय होता. सर्व पूल ओलांडल्यावर आम्ही परतलों, व स्टेशनवर आलों. तों आमची गाडी येण्याची वेळ झाली, थोड्याच वेळानें गाडी आली, व गाडींत बसून आम्ही आमच्या पुढील मुक्कामाकडे चालू झालों.

अटकपासून खैराबाद हें स्टेशन दोनच मैल असल्यामुळें तें लवकरच आलें. या स्टेशनच्या जरा पुढें गेल्यावर कँबेलपूर सोडल्यापासून जो डोंगराळ मुलुख लागतो, तो सरतो, व पुनः सपाट सुपीक प्रदेशाला सुरुवात होते. हा रेल्वेरस्ता काबूल नदीच्या कांठाकांठानेंच बराच वेळ गेलेला आहे. काबूल व तिला मिळणारी बांडा नदी यांचे कालवे या प्रांतांत दृग्गोचर होतात. व यामुळें ठिकठिकाणीं हिरवींगार शेतें दृष्टीला पडतात.

अटकपासून नवशेरा म्हणून जोडस्टेशन लागतें; येथून दरगाईपर्यंत चाळीस मैलांचा एक फांटा गेला आहे. नवशेऱ्यानंतर फारसें मोठें स्टेशन लागत नाहीं. साडेतीन वाजण्याच्या सुमाराला आम्हीं पेशावर कँटोनमेंट स्टेशनला येऊन पोहोंचलों. श्रीयुत गोगटे हे स्टेशनवर आले होते. स्टेशनवरून आम्ही तडक त्यांच्या बिऱ्हाडीं गेलों.

ज्या मार्गानें आमचे पूर्वज आर्यलोक प्रथमतः हिंदुस्तानांत आले व पुढेंहि त्यांच्या टोळ्यांवर टोळ्या आल्या, पुढें ऐतिहासिक काळांत ज्या मार्गानें हिंदुस्तानावर निरनिराळ्या स्वाऱ्या झाल्या, आशिया व हिंदुस्तान या मधला दळणवळणाचा जो जुना एकच मार्ग, तो खैबर घांट पहाण्याचें माझ्या मनांत होतें. पण या घांटानें मंगळवार व शुक्रवार या दोन दिवशींच सर्व दळणवळण चालतें, व त्या दिवशीं जामरुड (ब्रिटिश सरहद्दीवरील एक किल्ला) पासून तों लंडीकोटा (अफगाण सरहद्दीवरील एक किल्ला) येथपर्यंत २७ मैलांच्या एकंदर घांटांत शिपायांचा संगिनी पहारा रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ठेवून मग मधून गाड्या, टांगे, उंट, घोडे, बैल वगैरे सर्व तऱ्हेच्या वाहनांचा आणि पादचारी यांचा तांडा निघतो. इतर वेळीं सरहद्दीवरील पठाण केव्हां हल्ला करून मनुष्याला घेऊन जातील, याचा नेम नसतो. आम्ही पेशावरला पोहोंचलों, तो मंगळवारचा दिवस होता. अर्थात् खैबर घांट पहावयाचा तर आह्माला शनिवारपर्यंत पेशावरांत रहाणें भाग होतें. इतके दिवस रहावयाला आम्हांला सवड नसल्यामुळें मोठ्या नाखुशीनेंच नाइलाज ह्मणून आम्हांला तो घांट पाहण्याचा नाद सोडून द्यावा लागला. जामरुड पेशावरापासून दहाबारा

मैल आहे; पहांटेला निघून तेवढा पाहून येण्याचें आम्ही ठरविलें, व मग गांवांतील प्रेक्षणीय स्थळें पहावयाला बाहेर पडलों.

प्रथमतः आम्ही अजबखाना पहावयाला गेलों; पण तो बंद होता. त्यासभोंवतीं लहानशी पण सुंदर बाग होती. हल्लींचें पेशावर हें गांव अगदीं नवें आहे असें दिसतें. रस्ते प्रशस्त असून दोन्ही बाजूंना पायवाटा ठेवलेल्या आहेत, व रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना प्रचंड वृक्ष असून मुख्य रस्ता आणि पायवाट यांमध्यें लहानलहान ताटव्यांतलीं झाडें लावलेलीं आहेत; यामुळें सर्व रस्ताच उपवनाप्रमाणें दिसतो.

अजबखाना पहातां येत नाहीं, हें कळल्यामुळें आम्हांला वाईट वाटलें. पण त्याचा उपयोग काय ? मग आम्ही पंचतीर्थ नांवाचें एक ठिकाण पहावयाला गेलों. तेथें पुष्कळ लोक स्नानाला जातात, असें दिसलें. आवारांत गेल्यावर जिकडे जावें तिकडे पाणीच पाणी व झरेच झरे ! याप्रमाणें ती पाण्याची मजा पहातपहात आम्ही एका लहानशा विहिरी-जवळ गेलों. ही विहीर तोंडोतोंड भरली असून उकळणाऱ्या पाण्यांतून जशा वर उकळ्या येतात, तशा झऱ्यांच्या उकळ्या निघून विहिरीच्या सर्व कांठावरून सारखें पाणी वहात होतें. हा देखावा खरोखरच मनोहर होता. पाणीसुद्धां अत्यंत निर्मळ, गार व मधुर असें होतें. आम्ही तेथलें किती तरी पाणी प्यालों, तरी आमचें समाधान झालें नाहीं !

येथून आम्ही गांवांत एक गडासारखा भाग आहे, तिकडे गेलों. या भागाला कोनवाला म्हणतात. तेथेंच तहशील व इतर कचेऱ्या आहेत. येथें तटावरील बुरूजवजा असलेल्या उंच गच्चीवर गेलें, म्हणजे शहराचा विस्तार व शोभा एकदम दृष्टिपथांत येतात. या गच्चीवर उभें राहून आम्ही सभोंवार कितीतरी वेळ पहात होतों. हा प्रदेशहि पंजाबप्रमाणें सपाटच आहे. मात्र वायव्य दिशेला व उत्तरेला टेकड्याचटेकड्या दृष्टिगोचर होतात, व कांहींकांहींवर बरीच झाडीहि दिसते.

नंतर आम्ही बाजारांत हिंडलों. इकडे बहुतेक वसति मुसलमानांचीच आहे. हिंदू क्वचितच दिसतात. शहराचा जुना भाग अरुंद व कोंदट

आहे. पण म्युनिसिपालिटीची व्यवस्था चांगली असल्यामुळें कोठेंहि घाणकचरा वगैरे फारसा दिसला नाहीं.

रात्रीं बराच वेळ आम्ही गप्पा मारीत होतों. या ठिकाणीं सरहद्दीच्या पठाण टोळ्यांपासून मोठा धोका आहे, असें आम्हांला कळलें. रात्रीं बेरात्रीं एकटादुकटा मनुष्य सांपडला, तर हे पठाण लोक त्याला आपल्या गढी (लहान किल्ल्या) वर नेऊन अटकेंत ठेवतात, व त्याजकडून खंडणी घेतल्याशिवाय त्याला सोडीत नाहींत. येथें लष्कर मोठें असल्यामुळें येथें हे पठाण लोक बंदुका चोरण्याचा धंदा करतात. कारण, त्यांना यायोगेंच बंदुका मिळतात. या सरहद्दीवरील प्रांताच्या आसपास केव्हां केव्हां या टोळ्या हल्ले करतात, व मग लष्करी सैन्य पाठवून त्यांच्याशीं प्रत्यक्ष लढाई करण्याचाहि प्रसंग येतो. यामुळें या प्रांतांत जीविताची आणि मालमत्तेची सुरक्षितता जरा कमी आहे, असें म्हणावें लागतें. तरी पण सरकार बराच बंदोबस्त ठेवतें. या पठाणटोळ्यांनीं दंगेधोपे किंवा चोऱ्यामाऱ्या करूं नयेत ह्मणून त्यांच्या मुख्यमुख्य लोकांना सरकारांतून दरसाल थोडीफार रक्कम पोहोंचविण्यांत येते, व अशा तऱ्हेनें त्यांच्यापासून प्रजेच्या मालमत्तेचा व जीविताचा बचाव केला जातो.

आदल्या दिवशीं ठरल्याप्रमाणें आम्ही सकाळींच चहा वगैरे घेऊन टांगा करून श्रीयुत गोगटे यांचेसमवेत जामरुडच्या किल्ल्याकडे जावयाला निघालों. येथले घोडे फार चपळ असल्यामुळें टांगे फार चांगले चालतात. यामुळें दहाबारा मैल अंतर तोडावयाला आम्हांला तास सवातासाच्या वर वेळ लागला नाहीं.

पेशावराकडून हा भाग जरा चढताच आहे. जसजसे आम्ही जवळजवळ येऊं लागलों, तसतशी आम्हांला टेकड्यांची रांगचीरांग समोर भिंतीसारखी दिसूं लागली, व त्यांच्या पायथ्याशीं लहानसा भुईकोट किल्ला दिसूं लागला. टांगा बाहेर ठेवून आम्ही किल्ल्याच्या दरवाजांतून आंत गेलों. श्रीयुत गोगटे हे पूर्वी येथल्या पलटणींतील डॉक्टर असून या किल्ल्यावर राहिलेले होते. यामुळें सर्वांशीं त्यांची ओळख होती. अर्थात् किल्ला पहावयाला कांहींएक अडचण पडली नाहीं.

आम्ही किल्ल्याचा सर्व तट पाहून आलों. किल्ला फारसा मोठा नाहीं, व त्याच्या भिंती आणि बुरुज मातीविटांचेच आहेत. आपल्याकडे देशावरील कांहीं कांहीं गांवांत पाटलाची जशी गढी (लहान किल्ला) असते त्या तऱ्हेचाच हा किल्ला आहे. हा किल्ला पंजाबच्या रणजितसिंहाच्या कारकीर्दींत बांधलेला आहे. सरहद्दीवरील पठाण नेहमीं त्रास देत, म्हणून रणजितसिंहानें हा किल्ला बांधला, व त्याचा हरिसिंग म्हणून एक प्रख्यात सेनापति होता त्याला येथें ठेवलें. त्यानें या पठाण टोळ्यांची अगदीं खोडकी जिरविली, व रणजितसिंगाच्या अंमलाचा दरारा या प्रांतांत चांगलाच बसविला. पंजाबांत व या प्रांतांत हरिसिंगाचें नांव अजूनहि लहान मुलांना भेवडाविण्याला उपयोगीं पडतें, इतका त्याचा दरारा या प्रांतांत होता. हरिसिंग या किल्ल्यांतच मेला, व त्याचें लहानसें स्मारक येथें आहे.

हा किल्ला टेकड्यांच्या अगदीं पायथ्याशींच आहे. येथूनच खैबरघांटाला सुरुवात होते. दोन टेकड्यांच्या मधून खिंडीसारख्या भागांतून रस्ता अगदीं स्पष्ट दिसतो. या टेकड्याहि अटकजवळच्या टेकड्यांप्रमाणें अगदीं उघड्याबोडक्या आणि निर्वन आहेत; त्यामुळें त्या अधिकच भीषण दिसतात. या सर्व डोंगरांत जिकडेतिकडे लहानलहान गढ्या दिसल्या. गढ्यांत पठाण लोक रहातात, असें आम्हांला कळलें. ब्रिटिश राज्याच्या सरहद्दीपासून अफगाणिस्तानच्या सरहद्दीपर्यंतच्या मुलखावर याच टोळ्यांचा ताबा आहे. येथला गढीवाला पठाण म्हणजे एक स्वतंत्र राजाच आहे.

झालें, येथें ' माझा अटकेपार प्रवास ' संपला. जामरूड किल्ल्याशीं उभें असतांना हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याच्या विस्ताराची कल्पना माझ्या मनांत आली. रामेश्वरापासून पेशावरपर्यंत सुमारें दोन हजार आठशें मैल होतात. तसेंच द्वारकेपासून रंगूनपर्यंत दोन हजारांच्या वर मैल होतात. येवढें प्रचंड साम्राज्य पूर्वकालीं अशोकानें व पुढें समुद्रगुप्तानें स्थापन केलें होतें. पण हीं साम्राज्यें चिरकाल टिकलीं नाहींत. पण हल्लींचें साम्राज्य ब्रिटिशांच्या उदार धोरणानें हिंदुस्थान चिरस्थाई होणार यांत शंका नाहीं.

हिंदुस्तानचें नंदनवन.

१
नंदनवनाकडे.

काश्मीरच्या अपूर्व सृष्टिसौंदर्यावरून इंग्रज प्रवासी त्या प्रांताला 'हिंदुस्तानचें नंदनवन' म्हणतात. पण काश्मीरचा हा लौकिक नवा नसून फार पुरातन कालापासून चालत आलेला आहे. संस्कृतांतल्या प्रसिद्ध 'राजतरंगिणी' या ऐतिहासिक ग्रंथांत पहिल्याच सर्गांत या प्रांताची खालील श्लोकांत महती गाइली आहे, त्यावरून ही गोष्ट सिद्ध होते.

पुरा सतीसरः कल्पारंभात्प्रभृति भूरभूत् ।
कुक्षौ हिमाद्रेरर्णोभिः पूर्णा मन्वंतराणि षट् ॥
अथ वैवस्वतीयेऽस्मिन् प्राप्ते मन्वंतरे सुरान् ।
द्रुहिणोपेन्द्ररुद्रादीनवतार्य प्रजासृजा ॥
कश्यपेन तदन्तःस्थं घातयित्वा जलोद्भवं ।
निर्ममे तत्सरोभूमौ कश्मीरा इति मण्डलम् ॥

*　　*　　*　　*

चक्रभृद्विजयेशादिकेशवेशानभूषिते ।

तिलांशोपि न यत्रास्ति पृथ्व्यास्तीर्थैर्बहिष्कृतः ॥
विजीयते पुण्यवलैर्बलैर्यत्तु न शस्त्रिणाम् ।
परलोकात्ततो भीतिर्यस्मिन्निवसतां परम् ॥
सोष्मस्नानगृहाः शीते स्वस्थतीरास्पदा रये ।
यादोविरहिता यत्र निम्नगा निरुपद्रवाः ॥
असन्तापार्हतां जानन्यत्र पित्रा विनिर्मिते ।
गौरवादिव तिग्मांशुर्धत्ते ग्रीष्मेप्यतीव्रताम् ॥
विद्या वेश्मानि तुङ्गानि कुंकुमं सहिमं पयः ।
द्राक्षेति यत्र सामान्यमस्ति त्रिदिवदुर्लभम् ॥
त्रिलोक्यां रत्नसूःश्लाघ्या तस्यां धनपतेर्हरित् ।
तत्र गौरीगुरुः शैलः यत्तस्मिन्नपिमण्डलम् ॥

कल्पारंभापासून सहा मन्वंतराच्या काळांत हिमालयाच्या पोटांतील भूमि पाण्यानें तुडुंब भरलेली असल्यामुळें तिला सतीचें सरोवर म्हणत. पुढें हल्लीं चालू असलेला वैवस्वत मनू सुरु झाल्यावर प्रजापति कश्यपानें द्रुहिण, उपेन्द्र व रुद्र इत्यादि देवांना खालीं आणवून त्यांचे हस्तें त्या सरोवरांत राहणाऱ्या जलोद्भव (राक्षसाला) माराविलें व त्या भूमीवर कश्मीर या नांवाचा देश निर्माण केला.

* * * *

चक्रभृत् व विजयेश या रूपानें विष्णू व शंकर या देवांनीं विभूषित अशा त्या देशांत तीर्थ नाहीं अशी तीळभरसुद्धां जमीन नाहीं. तो देश पुण्याच्या सामर्थ्यानें जिंकला जाईल; पण सैन्याच्या सामर्थ्यानें जिंकला जाणार नाहीं. म्हणून त्या देशांतले लोक फक्त परलोकाला भितात. त्या देशांतील नद्यापासून धोका नाहीं; त्या देशांतील नद्यांमध्यें हिंस्र जलचरें नाहींत; त्या देशांतील नद्यामध्यें हिंवाळ्याकरितां उष्ण स्नानगृहांची सोय आहे; व त्या देशातील नद्यांना पाण्यापर्यंत जाण्यास सुलभ घाट आहेत. आपल्या बापानें निर्माण केल्यामुळें त्रास देण्यास योग्य नाहीं असें जाणून त्या देशाला

मोंगल बादशहांच्या काळीं तर हा प्रांत त्यांच्या साम्राज्याचा एक भाग असे, आणि जहांगीर व शहाजहान हे दोन्ही बादशाह त्या प्रांतांत वारंवार जात. काश्मीर हें त्यांचें आरोग्यालयच होतें म्हटलें तरी चालेल. जहांगिराची मरणकाळची शेवटची इच्छा मला काश्मीर पाहिजे, दुसरें कांहींएक नको, अशी होती ! ललितकलापराङ्मुख औरंगजेब बादशाहसुद्धां काश्मीरांत गेला होता. व त्याच्याबरोबरच प्रसिद्ध फ्रेंच प्रवासी बर्निअर हा काश्मीरांत गेला व त्यानें काश्मीरचें वर्णन आपल्या प्रवासवृत्ताच्या पुरवणींत दिलें आहे.

अगदीं प्राचीन काळापासून सृष्टिसौंदर्य, हवापाणी, फुलझाडें व फळझाडें यांकरितां नाणावलेला प्रदेश पहाण्याचा सुयोग आह्मांला येणार, हें पाहून आमचीं मनें सुप्रसन्न झालीं होतीं, हें सांगण्याची जरूरी नाहीं.

‘ माझा अटकेपार प्रवास ’ या पुस्तकांत वर्णन केलेला प्रवास संपवून आम्ही परत रावळपिंडीला बारांच्या सुमाराला आलों. लाला दिवाणचंद म्हणून एक खानदानीचे वकील तेथें आहेत. त्यांच्या घरीं आम्ही उतरलों होतों. आधीं तार पाठविली असल्यामुळें आमची सर्व व्यवस्था नीट लागली.

चारांच्या सुमाराला लालाजी कोर्टांतून आले, व त्यांनीं आमची विचारपूस करून पुढें केव्हां जाणार, याबद्दल चवकशी केली. ‘ आतां आह्मांला होतां होईल तितकें लवकर रवाना करा, ’ असें आम्ही त्यांना सांगितलें.

आदरानें उन्हाळ्यांतसुद्धां सूर्य प्रखरता भासवीत नाहीं. ज्या वस्तू स्वर्गांत सुद्धां दुर्मिळ अशा वस्तु म्हणजे विद्या, उंच घरें, केशर, बर्फमय पाणी व द्राक्षें त्या देशांत अगदीं सुलभ व विपुल आहेत. त्रैलोक्यामध्यें बहुरत्ना-वसुंधरा ही प्रशंसनीय आहे; त्या पृथ्वीवर कुबेराची उत्तर दिशा अधिक प्रशंसनीय आहे; त्या उत्तर दिशेकडील पार्वतीचा बाप हिमालय हा विशेषच प्रशंसनीय आहे व त्या हिमालयामधील काश्मीर देश तर सर्वांत प्रशंसनीय आहे.

रावळपिंडीहून काश्मीरची राजधानी श्रीनगर ही १९६ मैल आहे. हा सर्व प्रवास टांग्यानें करावा लागतो. टपालच्या टांग्यानें गेल्यास अडीच दिवस लागतात, व माणशीं भाडें ३३ रुपये पडतें. खासगी टांगा केल्यास पंचेचाळीसपासून पन्नासपर्यंत रुपये सबंध टांग्याला पडतात, व पांच दिवस लागतात. पण ' काश्मीरांतील सृष्टिशोभा स्वस्थपणें पहावयाची असेल, तर खासगी टांगा करून जाणें इष्ट आहे, ' असें लाला दिवाणचंदांनीं आह्मांला सांगितलें, व आह्मी खासगी टांग्यानेंच जाण्याचें ठरविलें. लागलीच लालाजींनीं आपला नोकर पाठवून एका टांगेवाल्याला बोलावून आणलें, व जकात, पट्टी वगैरे सर्व मिळून पन्नास रुपये त्याला देण्याचें ठरविलें. टांग्यांत तीन माणसें बसण्याची परवानगी असते; पण प्रवास थोडासा सुखाचा व्हावा म्हणून आम्ही दोघांनीं स्वतंत्रच टांगा केला, व रात्रीं नऊ वाजतां निघण्याचा बेत कायम ठरविला.

रावळपिंडींत आतां आमचा चारपांच तासांचाच मुक्काम होता. त्यांपैकीं थोडा वेळ आम्ही लालाजींशीं बोलण्यांतच घालविला.

सायंकाळीं आम्ही एका टांग्यांत बसून रावळपिंडीचें कँटोनमेंट पाहून आलों. पेशावरपेक्षांहि येथली छावणी मोठी आहे, व रस्ते वगैरे फार चांगल्या स्थितींत आहेत, असें आह्मांला दिसून आलें. दोनएक तास याप्रमाणें सहल करून आल्यावर आम्ही बिन्हाडीं परत आलों, व पुढल्या प्रवासाकरितां सामानाची बांधाबांध केली, आणि जेवणहि लवकरच उरकून घेऊन टांग्याची वाट पहात लालाजींच्या बगीच्यांत बसलों.

आतांपर्यंत आमचा हजारों मैलांचा प्रवास झाला; पण तो सारा आगगाडीचा होता. आतां मात्र सर्व प्रवास टांग्यानें व्हावयाचा असल्यामुळें या प्रवासाचा विकटपणा मनांत येऊन मला माझ्या लहानपणच्या प्रवासाची आठवण झाली. मी पुण्यास विद्याभ्यासाकरितां रहात असतांना कोंकणांतून घांटावर येण्यासाठीं बैलगाडीनें प्रवास करावा लागे, व कोंकणाच्या बाजूकडून येतांना मोठा थोरला सह्याद्रिपर्वत ओलांडून येणें भाग पडे. या प्रवासाला तीनचार दिवस लागत. आतांचाहि आमचा प्रवास या बैलगाडीच्याच प्रवासासारखा होता; पण टांग्याचा असल्यामुळें बैलगाडीपेक्षां थोडा जलद,

इतकाच काय तो फरक. आह्मांलासुद्धां प्रवासाला चारपांच दिवस लागणार होते. वेळाच्या मानानें असले प्रवास त्रासदायक असले, तरी सृष्टिसौंदर्य पहाण्याच्या उद्देशानें निघालेल्या माणसाला हा सावकाश प्रवासच अधिक चांगला, यांत शंका नाहीं.

अशा प्रकारचे विचार मनांत येत आहेत, तोंच आमचा टांगेवाला आला. आम्ही आपलें सर्व सामान टांग्यांत भरलें, व दिवाणचंदसाहेबांचा निरोप घेऊन नंदनवनाकडे जावयाला सिद्ध झालों.

आम्ही रावळपिंडीहून निघालों तो दिवस गुरुवार ता. २० मे १९१५ हा होता. रात्रीं नऊ वाजतां आम्ही मार्गस्थ झालों. त्या दिवशीं वैशाख शुद्ध षष्ठी ही तिथि असल्यामुळें आम्ही निघालों तेव्हां साधारण चांदणें होतेंच. यामुळें सभोंवार थोडेंफार दिसत होतें. इकडले टांगे चांगले चालणारे असतात, यामुळें ताशीं सहासात मैल सहज जाऊं शकतात.

आम्ही या वेगानेंच चाललों होतों. रावळपिंडीपासून जवळजवळ पंधरा मैल रस्ता साधारण सपाटीचाच आहे. पुण्याहून पायवाटेनें तळेगांवाला जातांना जसे लहानलहान चढउतार आहेत तशा प्रकारचे चढउतार येथें आहेत. सोळा मैलांपासून थोडा चढाव लागूं लागतो; पण टेकड्या फार उंच दिसत नाहींत. या लहानलहान टेकड्यांचा वरवर जातांजातां प्रचंड हिमालय बनतो, आणि आतां आपण लहानसा चढाव व टेकड्या चढत आहों त्या चढतचढत आपणांला जगांतला एक मोठा पर्वत ओलांडून जावयाचें आहे, याची कल्पनाहि त्या वेळीं होत नाहीं.

दोनचार मैल चढून गेल्यावर आह्मांला छत्तर म्हणून लहानसें खेडें लागलें. रात्रीचा बारांचा सुमार झाला होता; म्हणून टांगेवाला विश्रांतीकरितां येथें उतरला. आम्हांलाहि विश्रांतीची व झोंपेची जरूर होतीच. कारण, टांग्याच्या हादरण्यानें व टांग्यांत सारखें बसण्यानें पाठीला कड आले होते! इकडल्या प्रांतांत जामिनीवर निजणें हें अगदीं कमी दर्जाचें समजतात. टांगेवाले सुद्धां जामिनीवर निजावयाचे नाहींत! प्रत्येक माणसाला निदान 'चौपाई' (चार पायांची हलकी खाट) तरी पाहिजेच, अशी इकडे रीत असल्यामुळें असल्या चौपाया वाटोवाट भाड्यानें मिळतात. भाडेंहि

फार नसतें. येथें आम्ही एकएक आण्याला दोन चौपाया भाड्यानें घेतल्या व त्यांवर आंथरूणें टाकून पडलों. टांगेवाल्यानें घोड्याला खाणें विकत घेऊन घातलें. इकडे आपल्याप्रमाणें हरभरा घालण्याची रीत दिसली नाहीं. मक्याचें पीठ व गूळ यांचें मिश्रण करून तें पाण्यांत कालवून त्याचे लहान लहान गोळे करतात, व ते घोड्यांना देतात. घोड्याचें हें खाणें वाटोवाट मिळतें. यामुळें टांगेवाले जेथल्या तेथें घोड्याचें खाणें विकत घेऊन घोड्याला देतात, असें आमच्या दृष्टोत्पत्तीला आलें.

या ठिकाणीं आम्ही पहांटेच्या पांच वाजेपर्यंत विश्रांति घेतली. इकडे बहुतेक पांच वाजल्यापासून चांगलें दिसूं लागतें. यामुळें यानंतरचें सर्व मार्गक्रमण उजेडांत झालें. छत्तर या गांवापासून सारखा चढाव लागतो, व तो बराच कठिण आहे. यामुळें घोड्यांना मध्येंमध्यें थोडासा विसावा द्यावा लागतो. रावळपिंडीच्या बाजूला प्रथम लागणाऱ्या टेकड्यांवर फारसें रान नाहीं; पण आमच्या सकाळच्या मार्गक्रमणांत जिकडेतिकडे दाट झाडी व रान दृग्गोचर होत होतें. जिकडे पहावें तिकडे हिरवेंहिरवें गार रान, व उंचउंच पर्वतच्या पर्वत !

सकाळच्या सातसाडेसातांच्या सुमाराला आम्ही ट्रेट या ठिकाणीं आलों. येथें मेलटांगा बदण्याचें मोठें ठिकाण आहे. येथें कांहीं बंगलेवजा घरें दिसलीं, व येथें लहानसा बाजारहि होता. येथें टांगेवाल्यानें घोड्यांची थोडी चाकरी करून त्यांना दाणा दिला. आम्ही येथें मुखमार्जनादि विधि आटोपून गरमगरम दूध घेतलें. अर्ध्यापाऊण तासाच्या विश्रांतीनंतर आम्ही वाट चालूं लागलों.

रावळपिंडीपासून आतांपर्यंत आम्ही पंचवीस मैलांचा प्रवास केला, त्यांपैकीं दहा मैल सारखे चढावयाचेच होते. हा भाग वर म्हटल्याप्रमाणें सह्याद्रीच्या घांटासारखाच दिसतो, व झाडेंझुडपेंहि आपल्या इकडच्यासारखीं दिसतात; पण ट्रेट सोडून वरवर जाऊं लागलें म्हणजे वनसौंदर्य सर्व बदलतें. पूर्वीं कधींहि न पाहिलेल्या पाईन व देवदार या प्रचंड उंच झाडांचें रान लागतें. हीं झाडें सरळ सोटासारखीं वाढतात, व त्यांना बारीकबारिक पानें असतात. यांमुळें कांहीं अंशीं हे वृक्ष सुरूच्या झाडा-

सारखे दिसतात; पण सुरूच्या झाडापेक्षां पुष्कळ जाड, उंच व भव्य असतात. रस्ताहि आतां जास्त जास्त वांकणें घेऊन जात होता. यामुळें घोड्यांना भार कमी व्हावा म्हणून मधूनमधून आम्ही मधल्या पायवाटेनें चालत जात होतों. आतां दृष्टीला पडणारा सर्वच देखावा आपल्या इकडल्यापेक्षां निराळा. इकडे झाडें सर्वच निराळीं. त्यांची उंचीहि विलक्षणच ! पानें व फुलें विशेष सतेज व रमणीय. इकडील डोंगराची जमीन, खडक व दगड यांचा रंग निराळा. ज्याप्रमाणें नाटकांत एकदम एकादा देखावा बदलून अगदीं निराळाच देखावा दृग्गोचर होतो, त्याप्रमाणें येथें मनुष्याला भास होतो. हिमालयाच्या दक्षिणेकडील खालचा भाग व वरचा भाग यांमध्यें असेंच एकदम विलक्षण स्थित्यंतर होतें. आतां जिकडे पहावें तिकडे प्रचंड वृक्ष व जागोजाग पाण्याचे झरे. या झऱ्यांचें पाणीसुद्धां अगदीं स्फटिकवत् स्वच्छ व गार असावयाचें !

आम्ही आतां सारखे वरवर चढत होतों. आतां हा चढाव चढला म्हणजे आपण माथ्यावर येऊं असें वाटावें. आणि तो चढाव चढून वर यावें तों त्याच्यापुढें आणखीहि प्रचंड चढाव आहेच ! हा चढाव चढल्यावर तरी माथा येईल अशी अशा करावी, तरी पुनः पूर्ववत् निराशाच ! मला सह्याद्रीचा पुष्कळ परिचय. माझ्या लहानपणापासून मी बैलगाडीचा पुष्कळ प्रवास केलेला, व डोंगरावर डोंगर कसे सारखे चढत जातात याची मला बरीच कल्पना; तरी पण माझीसुद्धां या चढावांनीं फसगत होई. मग ज्यांचें सर्व आयुष्य सपाट प्रदेशावर गेलें आहे, व ज्यांनीं कधीं बैलगाडीनें घांट चढण्याचा अनुभव घेतला नाहीं, त्यांना या मार्गानें गेल्यास काय वाटेल याची मला कल्पनाहि होत नाहीं ! हा पर्वत अगदीं अनंत आहे, असेंच त्यांना वाटेल यांत शंका नाहीं.

असें सारखें चढतांचढतां व प्रत्येक वेळेला आतां चढाव संपेल अशी फसगत होतां होतां आम्ही अकरा वाजण्याच्या सुमाराला कोडागल्ली म्हणून ट्रेटपासून दहा मैलांवर एक गांव आहे तेथें आलों. येथें टांगेवाला दोनअडीच तास विश्रांति घेणार होता. अर्थात् आम्हांलाहि विश्रांति व त्याहिपेक्षां अन्नशांति पाहिजेच होती, म्हणून आम्ही येथें उतरलों. हा गांव

बराच मोठा आहे. येथेंहि उत्तम पाण्याचे झरे पुष्कळ आहेत. गांवांत विहिरीहि दिसल्या. आम्ही दोनतीन तासांकरितां एक खोली व दोन चौपाया घेतल्या, व त्याला एकंदर सहा आणे भाडें ठरविलें. नंतर पुरी, तर्कारी व आणखी थोडी मेवामिठाई विकत घेऊन हातपाय धुऊन यथेच्छ फराळ केला, व चौपायांवर पडून राहिलों.

दोन वाजण्याच्या सुमाराला आम्ही पुनः पुढें चालू झालों. अजून आम्ही वर चढतच होतों. आतां सर्व डोंगर हिरवेगार दिसत होते; पण कांहीं डोंगर मात्र बरेच उघडेबोडकेहि असल्याचें आढळून येई. सह्याद्रीच्या मुख्य डोंगरांत गेलें म्हणजे जसें निर्जन व भयाण वाटतें, तसें इकडे वाटत नाहीं. जागोजाग डोंगरांत वसती आहे, व डोंगरावर जिकडेतिकडे पाण्याचे पाटच्यापाट चालू असल्यामुळें इतक्या उंचउंच डोंगरांवरसुद्धां लहानलहान हिरवींगार शेतें दृष्टीला पडतात. येथला देखावा किंचित् रत्नागिरी-कोंकणांतल्या पाखाड्यांतल्यासारखा दिसतो. येथली मातीहि तांबडीच आहे, व डोंगराच्या उतारावरच ताली घालून लहानलहान सपाट पट्टे तयार करून भातशेतें केलेलीं दृष्टीला पडतात.

अशा प्रकारची अपूर्व शोभा पहातपहात शेवटीं एकदां आम्ही मरी या ठिकाणाशीं आलों. पंजाबसरकारचें हेंच उन्हाळ्याचें शीतल वसतिस्थान आहे. हें रावळपिंडीपासून चाळीस मैल आहे. म्हणजे वाठारपासून महाबळेश्वर जितकें दूर आहे, तितकाच हा पल्ला आहे, मात्र मरी समुद्रसपाटीपासून साडेसात हजार फूट उंच आहे तर महाबळेश्वर साडेचार हजार फूट आहे. अर्थात् महाबळेश्वरापेक्षां मरी तीन हजार फूट उंच आहे, व म्हणूनच मरीची चढण सरतां सरत नाहीं.

मरीपासून मात्र मनुष्य उतरण उतरूं लागतो, व हिमालयाचा दक्षिणभाग ओलांडून उत्तरभागांत प्रवेश करतो. हिमालयांतील विलक्षण वनश्रीला येथूनच खरी सुरुवात होते. हा हिमालय किती रुंद रुंद पसरत गेलेला आहे याची कल्पना आमच्या मार्गक्रमणवर्णनावरून वाचकांना कळून येईल. पण आतां वनसौंदर्य खरोखरीच अपूर्व आहे, असा क्षणोक्षणीं प्रत्यय येतो. डोंगर केव्हांहि उघडेबोडके दिसत नाहींत. जिकडे तिकडे पावसाळ्या-

सारखी वनशोभा भर उन्हाळ्यांत दिसते. कारण या प्रांतांत बहुतेक बाराहि महिने थोडाफार पाऊस पडतो, व उन्हाळ्यांत हिमालयांतील बर्फ वितळूं लागल्यामुळें भर मे महिन्यांत आपल्या इकडल्या पावसाळ्याप्रमाणें जिकडे तिकडे नदीनाले पाण्यानें भरून जातात. रस्ते व जमीन अगदीं लख्ख कोरडी; हवा अगदीं कोरडी; सूर्यप्रकाश अगदीं उन्हाळ्यासारखा; कोठेंहि चिखल अगर राड नाहीं; तरी पण जिकडे तिकडे हिरवी गार जमीन व शेतें हा देखावा खरोखरीच प्रथमतः मनुष्याला आश्चर्यचकित करून सोडतो. या वेळीं मला हरिद्वारची आठवण झाली. तेथेंहि भर उन्हाळ्यांतील तो प्रचंड पूर पाहून मनाला अत्यंत विस्मय वाटतो.

मरी सोडल्यापासून दोनएक तासांनीं आम्ही फुगवाडी म्हणून लहानसें गांव आहे तेथें आलों. हें मरीपासून बारा मैल आहे. मरीपासून सारखा उतार लागत रहातो, हें वर सांगितलें आहे. हें गांव सरासरी उत्तरेकडील उताराच्या अर्ध्यावर आहे. अर्थात् आम्हांला अजून अर्धा उतार उतरावयाचाच होता. फुगवाडीला टांगेवाल्याचा रात्रीची विश्रांति घेण्याचा विचार होता. इकडे रात्रीच्या प्रवासाची बंदी आहे. रावळपिंडीपासून पंधरा मैल सपाटीचा रस्ता असल्यामुळें पाहिजे तर तेवढा रात्रीचा प्रवास केला तरी चालतो. तेव्हां फुगवाडीला सर्व रात्र काढावयाची असल्यामुळें छत्तरप्रमाणें आम्ही येथें एक खोली व दोन चौपाया भाड्यानें घेतल्या, व सर्वांबद्दल भाडें आठ आणे ठरविलें.

आम्ही या प्रवासांत कुकररूपी आमची स्थाली बरोबर घेतली होती. घरापासून आजपर्यंतच्या तीन आठवड्यांच्या प्रवासांत या स्थालीचा उपयोग करण्याचें कारण पडलें नाहीं, तेव्हां तिचा उपयोग करण्याचा विचार करून आम्ही भात, भाजी व वरण इतके पदार्थ तयार केले, व सातसाडेसातांच्या सुमाराला जेवणखाण आटपून स्वस्थ पडलों. रावळपिंडीहून आम्ही गुरुवारीं रात्रीं निघालों, ते शुक्रवारीं सायंकाळीं ५२ मैलांचा मार्ग एकाच टांग्यानें आक्रमण केला, हें पाहून आह्मांला एक प्रकारचें समाधान झालें. पण या प्रवासांतला तिसरा हिस्साहि अजून पुरा झाला नाहीं, हें लक्ष्यांत येऊन आमच्या प्रवासाच्या लांबीची पूर्ण कल्पना आमच्या मनांत आली.

इतक्या दीड दिवसाच्या प्रवासाच्या दगदगीमुळें आम्हांला विश्रांतीची फार जरुरी होती, तदनुरूप आंथरुणावर पडतांक्षणींच आम्ही निद्रावश झालों.

पहांटेला साडेचार वाजतां आम्ही उठलों, व पांच वाजतां वाट चालूं लागलों. आदल्या दिवशीं आम्ही वरवर चढत असतां स्वर्गापर्यंत चाललों कीं काय, असा भास होत होता, तर आतां त्याच्या अगदीं उलट म्हणजे खोलखोल पाताळापर्यंत उतरत जातों कीं काय, असा भास होत होता. कारण, आम्ही सारखे उतरत, व म्हणूनच झपाट्यानें चाललों होतों. फुगवाडी टाकल्यापासून लवकरच प्रचंड खोल अशा दरींत अगदीं झऱ्यासारखी एक नदी दिसूं लागली. हीच नदी झेलम होय, व आतां हिच्याच कांठाकांठानें आपला पुढला सर्व रस्ता आहे, असें टांगेवाल्यानें आम्हांला सांगितलें. झेलम नदीचें प्रथम दर्शन आम्हांला झेलम स्टेशनवर लाहोरहून कँबेलपुरला जातांना झालें होतें. त्या वेळीं ती नदी समुद्रासारखी दिसत होती. आतांचें हें तिचें द्वितीय दर्शन होय. या वेळीं ती कितीतरी सूक्ष्म दिसत होती. कारण, आम्ही तिच्या हजारों फूट उंच अशा पर्वतराजीवरून खालीं खालीं येत होतों. जसजसे आम्ही खालीं खालीं येऊं लागलों होतों, तसतशी झेलम नदी जास्त जास्त स्पष्ट दिसूं लागली, आणि तिचा तो प्रचंड वेग व खळखळ आवाज हीं दिसूं व ऐकूं येऊं लागलीं.

या ठिकाणीं ही नदी आपल्या उजव्या हाताला असते. एकीकडे प्रचंड पर्वत तर एकीकडे खोल दरी व तिच्या तळाशीं प्रचंड वेगानें वहाणारी ती नदी ! हा देखावा विलक्षण वाटतो. खंडाळाघांटांतील खंडाळें स्टेशननंतरची दस्तुरी किंवा रिव्हर्सिंग स्टेशन टाकून जरा पुढें आल्यावर जसा देखावा दिसतो, तसाच येथेंहि देखावा दिसतो. पण त्या दरींतील नदी आपल्याच दिशेनें कर्जतकडे जातांना दिसते. येथें मात्र नदी उलट दिशेनें चालली आहे, असा भास होतो. आपण मरी येथील प्रचंड हिमालय ओलांडून उतरत असतों. अर्थात् या डोंगरांतून नदी निघून उत्तरेकडे जावी, असें आपणाला स्वाभाविकपणें वाटतें. पण ही नदी तर

मरीच्या बाजूच्या डोंगराकडे जातांना दिसते ! ही नदी अशी विचित्रपणें प्रचंड डोंगराकडे कोठें चालली आहे, असें वाटून मन अगदीं गोंधळून जातें. टांगा तर भराभर डोंगर उतरून खालीं खालीं जातो, व नदीच्या अगदीं जवळ येतो. पण ती प्रचंड तटासारखी नदीची दुथड पाहून मनुष्याला भय वाटल्याखेरीज रहात नाहीं. जरा का गाडीचें चाक उजव्या हाताला घसरलें, कीं, बघावयालाच नको ! एकदम ' **नद्यस्तृप्यन्तु** ' ची पाळी यावयाची, इतका डोंगर सुळक्याचा असतो, व वाट इतकी बिकट वाटते. हळूहळू आपण नदीच्या पातळीकडे येत आहों, असें दृष्टोत्पत्तीला येतें. शेवटीं अगदीं नदीकिनाऱ्याला खेटून सडक जाऊं लागते, व झेलम नदीचें तें अरुंद पात्र, तिचा तो वेग, व किंचित् धूसर पाणी पाहून मनाला एक प्रकारचा विलक्षण आनंद होतो, तोंच टांगा कोहाला गांवाला येऊन ठेपतो. कोहाल्याला आम्ही सातसाडेसातांच्या सुमाराला आलों.

झेलम नदी हीच पंजाब व काश्मीर संस्थान यांमधील मर्यादा आहे, व कोहाला हा गांव नदीपलीकडे असून तो संस्थानच्या हद्दींत आहे. येथें झेलम नदीवरील पूल ओलांडून पलीकडे गेलें म्हणजे डॉक्टरी तपासणी होते. तसेंच येथें माणसावर, टांग्यावर व व्यापारी मालावर कर द्यावा लागतो. या सर्व विधीला अर्धापाऊण तास लागतो.

कोहाला हा गांव नदी व पर्वत यांच्या अगदीं चिळणींत आहे. कोठें कोठें दुतर्फा घरें आहेत, तर कांहीं ठिकाणीं खडक खोदूनच घरापुरती सपाट जागा केलेली आहे. येथें या प्रांतांतील देवदाराचा विपुलपणा एकदम दृग्गोचर होतो. कारण, घराचें सर्व लांकूडकाम देवदाराचेंच दिसतें. खांब, लगी, तुळया, कड्या, कडीपाट, खिडक्या, दरवाजे वगैरे घराला लागणारें सर्व सामान एकाच लांकडाचें केलेलें दृष्टोत्पत्तीला येतें. ग्वाल्हेरीला ज्याप्रमाणें तांबड्या दगडाचींच सर्व घरें, त्याप्रमाणें येथें सर्व देवदाराचींच घरें दृग्गोचर होतात, व देवदाराचा तो सतेज पिंवळसर रंग मोठा मोहक दिसतो. कोहाला हा गांव कांहीं फारसा मोठा नाहीं. पंजा-

बचें शीतलनिवासस्थान जें मरी, तें सोडलें म्हणजे सारखा उतरत उतरत मनुष्य कोहाल्याला येतो. तेथें सभोंवार जिकडेतिकडे प्रचंड पर्वत दिसतात, व आपण खोल भुयारांत येऊन पडल्यासारखें वाटतें. तरी पण हें ठिकाण दोन हजार फूट उंच आहे. म्हणजे मरीपासून हें साडेपांच हजार फूट खोल आहे. येथून आतां झेलम नदी सारखी आपल्या डाव्या हाताला रहाते, आणि रस्ता व नदी यांची फारशी ताटातूट होत नाहीं. केव्हां-केव्हां यूरोपीयन युवयुवतींप्रमाणें रस्ता व नदी जणूं कांहीं हातांत हात घालून चालल्यासारखीं भासतात, तर केव्हां नदी रुसून, रस्त्यापासून दूर अगदीं कोपऱ्यांत जाऊन बसते, व रस्त्याला अगदीं दिसेनाशी होते. मग रस्ता जणूं काय अस्वस्थ होऊन धडाधड उड्या मारीत व सांदीकोंदींतून झपाझप पावलें टाकीत नदी असेल त्या कोपऱ्यांत येऊन पुनः तिला आलिंगन देतो कीं काय, असा भास होतो. असा हा नदीचा व रस्त्याचा संयोग विलक्षण आहे. केव्हांकेव्हां रस्त्याच्या समोर प्रचंड पर्वत असा खडा उभा येऊन रहातो, कीं, पुढें वाट असणें शक्य नाहीं, असें वाटतें; तोंच एक अगदीं अरुंद चीर दृष्टीला पडते, आणि त्या अरुंद चिळणींतून नदी व रस्ता अगदीं एकमेकांना खेंटून पुढें गेलेलीं दिसतात. असे विलक्षण चमत्कार या पुढल्या प्रवासांत वाटोवाट लागतात.

कोहाल्यापासून हळूहळू व नकळत आपण पुनः वरवर चढत जातों. कोहाल्याला एक तासभर थांबल्यावर आम्ही पुढल्या मार्गक्रमणाला लागलों. तेथून संस्थानचे निराळे मैल सुरू होतात. कोहाल्यापासून श्रीनगर एकशेंबत्तीस मैल आहे. इतका मार्ग अजून आम्हांला आक्रमावयाचा होता. कोहाल्याहून छत्तर म्हणून एक लहानसें गांव सात मैलांवर आहे. तेथें आम्ही साडेदहांच्या सुमाराला आलों, व दोनप्रहरची विश्रांति येथें घेतली. या ठिकाणीं नदीच्या दोन्ही बाजूंचे डोंगर जरा दुरावले असल्या-मुळें येथें सपाट जमीन बरीच असून ती सर्व शेतजमीन आहे, असें आम्हांला आढळून आलें. या सर्व प्रांतांत पाण्याची विपुलता विलक्षण आहे. एक फर्लांगहि सुंदर वाहत्या झऱ्याखेरीज मोकळा जात नाहीं. छत्तर गांवांत तर एक सुंदर पाण्याचा झरा एका छातीइतक्या उंच

नळाच्या तोंडांतून सोडलेला आहे. या झऱ्याचें तें धोधो वाहणारें शुभ्र व गार पाणी पाहून नैनितालच्या अशा एका ठिकाणची आम्हांला आठवण झाली. नैनितालला असे तीनचार झरे सारखे पडत आहेत. येथें एकच आहे. पण बाकी बाबतींत दोन्ही ठिकाणांमध्यें अगदीं साम्य आहे. या स्रोताखालीं उभें राहून जेव्हां आम्ही स्नान केलें, तेव्हां किती अनुकूल संवेदना उत्पन्न झाल्या, याचें वर्णन करणें केवळ अशक्य आहे. स्नान झाल्यावर आम्ही तेथें चहा घेतला व फराळ केला, आणि एका झाडाखालीं विश्रांति घेत पडलों. सुमारें दोन अडीच वाजतां पुनः आम्ही आपल्या मार्गाला लागलों.

हा सर्व मार्ग भयंकर दऱ्याखोऱ्यांतून व प्रचंड पहाडांच्या चिळणींतून गेला आहे, तरी तो निर्जन प्रदेशांतून गेला आहे असें मात्र नाहीं. वाटोवाट खेडीं व वसती लागते; इतकेंच नाहीं, तर खोल नदीच्या तीरापासून तों थेट उंच पर्वताच्या शिखरापर्यंत जागोजाग घरें, झोंपड्या व शेतवाड्या दृष्टीला पडतात. हीं घरें डोंगराच्या बाजूवरच असल्यामुळें व तीं सपाट धाब्याचीं असल्यामुळें दुरून आपल्याकडे असलेल्या डोंगरांतील लेण्यांप्रमाणें भासतात. तसेंच सर्व डोंगरभर शेती केलेली दिसते. हीं शेतें अगदीं अरुंद, लांब पट्ट्यांचीं व एकावरएक अशीं असल्यामुळें दुरून सोपानपरंपरेसारखीं दिसतात. आम्ही गेलों ते दिवस तिकडे भाताच्या लावणीचे होते. यामुळें कांहीं शेतें गालीच्यासारखीं हिरवींगार दिसत होतीं. यांत अर्थातच भाताचीं रोपें तयार झालेलीं असत. कांहीं लावणीकरितां पाण्यानें तुडुंब भरलेलीं असत. कांहींमध्यें नुकतेंच भात लावलेलें दिसे. यामुळें हा सर्व देखावा मोठा मनोहर दिसून तेथल्या शेतकांचें कौतुक वाटे. येथें शेती फार काळजीपूर्वक होत असावी, असें दिसलें. याची एक साक्ष म्हणजे येथले शेताचे बांध अगदीं नीटनेटके असतात ही होय. यामुळें हीं शेतें म्हणजे ड्रॉइंगच्या निरनिराळ्या आकृतींप्रमाणें सुबक व रेखलेलीं दिसतात.

येथल्या वसतीची दुसरी खूण म्हणजे वाटोवाट जेथेंजेथें पाण्याचे पाट वहातात, तेथेंतेथें लहान दळणाच्या पाणचक्क्या असतात, ही होय. यांचें

तर प्रथम जाणाराला फारच आश्चर्य वाटतें. एका लहानशा झोपडीखालीं पाण्याचा पाट आणलेला असतो, व त्याच्या जोरावर एक चक्की सुरू राहून त्यांतील जात्यानें धान्याचें दळण होतें.

छत्तरहून आम्ही निघालों, ते ताससव्वातासानें दुलाई गांवीं आलों, व तेथून लगेच पुढें चालू होऊन सहांच्या सुमाराला डुमेल गांवीं आलों. कोहाल्याप्रमाणें हा गांवहि झेलमच्या अगदीं कांठीं आहे, व येथेंच किशनगंगा नदीचा झेलमशीं संगम झालेला आहे. रावळपिंडीच्या उत्तरेला अपटाबाद म्हणून एक ठिकाण आहे. तेथून काश्मीराकडे जाणारा एक रस्ता असून तो येथें रावळपिंडीकडील रस्त्याला येऊन मिळतो. यामुळें येथेंहि पुनः प्रवाशांची फेरतपासणी होते. येथें कोहाल्याप्रमाणें झेलमला एक सुंदर पूल आहे; दोन नद्यांच्या संगमामुळें हें ठिकाण कोहाल्यापेक्षां अधिक रमणीय आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंना नदीपर्यंत लहानसे घांट बांधलेले आहेत. त्या घांटांवरून किशनगंगा व झेलम या दोन्ही नद्यांचीं तीं बिकट पहाडांतून येणारीं पात्रें आणि दोन्ही नद्यांचा वेग पाहून मनाला फार आश्चर्य व कौतुक वाटतें व सृष्टीच्या विविध रूपांची प्रचीति येते.

अपटाबादकडून येणारा मार्ग फारसा वाहता नाहीं, व तो रावळपिंडीच्या मार्गापेक्षां अधिकच भयंकर आहे, असें तेथें आम्हांला कळलें. डुमेल येथें तपासणी वगैरे आटोपेपर्यंत आम्हांला सहा वाजले.

रावळपिंडीपासून मरीपर्यंतचा देखावा एकप्रकारचा, तर तेथून डुमेलपर्यंत निराळ्या तऱ्हेचा; तसेंच डुमेलपासून पुढेंहि निराळाच देखावा दृष्टीला पडतो! येथलें रान फार दाट असून सभोंवतालचे पहाड फारच प्रचंड आहेत. येथून मधूनमधून बर्फानें आच्छादलेल्या हिमालयाचीं शिखरें डोकावतात, व मनाला विलक्षण आनंद देतात. झेलम स्टेशनशीं झेलम नदी लागते, तेथपासून डुमेलपर्यंत ती थेट दक्षिणवाहिनी आहे. अर्थात् काश्मीराकडे जातांना रस्ता अगदीं उत्तरेकडे जातो पण डुमेल या ठिकाणीं ती नदी विलक्षण वळण घेऊन आग्नेयदिशेला वळते. किशनगंगा ही पुढें सारखी उत्तरदिशेकडे लागते. यामुळें किशनगंगेला झेलम येऊन मिळते, असें म्हणणेंहि एका अर्थीं वावगें होणार नाहीं.

डुमेलहून पुढला एक मुक्काम गडी येथें आम्ही आलों, तों रात्रीचे साडेआठ झाले. येथेंहि आम्ही एका व्यापाऱ्याच्या दुकानीं उतरलों, व आमच्या स्थालीच्या साहाय्यानें स्वयंपाक करून रात्रीची विश्रांति घेतली.

इकडील प्रवासाच्या रीतीला अनुसरून आम्ही सकाळीं सहांच्या सुमाराला निघालों. झेलम नदीचीं तीं विलक्षण वांकणें फार विस्मयजनक वाटतात. या सर्व मार्गांत नदींतील भोंवरे जागोजागीं दिसतात. कारण एकाद्या वांकणाच्या पुढेंच खडकाचा तट येतो; यामुळें पाणी आघातानें मागें हटून मग अर्थात् वर्तुळ करून पुनः जोरानें पुढें जातें. या नदींत मोठमोठे लांकडाचे ओंडे वहातांना दिसतात. कारण नदीच्या प्रवाहाला कोठेंहि खंड नसल्यामुळें पंजाबांत या नदीच्या मार्गानें लांकडें रवाना करणें बिनखर्चाचें असतें. अशीं लांकडें वहात जात असतांना वाटोवाट दिसतात, व भोंवऱ्यांच्या ठिकाणीं तर या लांकडांची मोठी मौजच दिसते. हीं लांकडें भिंगऱ्यांसारखीं फिरत रहातात. कमीअधिक पाण्याच्या जोरानें तीं जेव्हां एकदां या भोंवऱ्यांतून निसटतात, तेव्हांच तीं पुढल्या प्रवाहांत जाऊन त्यांचा प्रवास चालू होतो. नाहींतर त्या भोंवऱ्यांत गटंगळ्या खात व गिरक्या मारितच तीं बसतात. मानवी जीवित व जीवात्मा असाच संसाररूपी भोंवऱ्यांत गटंगळ्या खात राहतो, ही कल्पना या लांकडांच्या वर्तनावरून चांगली मनांत बिंबते.


नदीचा प्रवाह फार खोलांतून ज़ातो, आणि यामुळें या नदीला मिळणारे ओढे व नालेहि भयंकर खोल असतात. असे नाले वाटोवाट लागतात, आणि नदीप्रमाणें तेहि निर्मल व स्वच्छ पाण्यानें धो धो वहात असतात. पण हे ओढे ओलांडण्याकरितां नदीजवळ पूल करणें अशक्य असल्यामुळें रस्ता पहाडांत खोलखोल जाऊन मग तेथें पूल ओलांडून ओढ्याच्या दुसऱ्या बाजूला जातो. यामुळें रस्त्याला विलक्षण वांकणें घ्यावीं लागतात. येथें एका ओढयाच्या रस्त्याचें वर्णन दिलें, म्हणजे सर्वांची कल्पना येईल.

आम्ही एका ओढयाच्या मुखाशीं आलों. येथें तो ओढा नदीला मिळाला होता. ओढा फार खोल, पण फार रुंद नव्हता. त्या ठिकाणीं

त्यावर पूल केला असता, तर तो कांहीं एका फलांगापेक्षां जास्त झाला नसता. समोरचा रस्ता आम्हांला चांगला स्पष्ट दिसत होता; म्हणून आम्ही तो सर्व रस्ता चालून जावयाचा बेत केला, व टांगेवाल्याला त्याप्रमाणें सांगून रस्त्यानें चालूं लागलों. आम्ही सारखे खोलखोल दरींतच चाललों. एक मैल झाला तरी पूल येईना ! दीड मैल झाला, तरीहि तेंच ! पुढें मात्र लवकरच पूल आला. तेथें ओढयांतून धो धो पाणी वहात होतें. पूल ओलांडल्यावर जेथून आम्ही निघालों त्या रस्त्याच्या समोर येतों, तों आम्ही साडेतीन मैल चालून आलों, असें आम्हांला दिसून आलें. अशीं विलक्षण वांकणें या रस्त्यांत शेंकडों आहेत ! असो.

काश्मीरच्या महाराजांच्या हद्दींत डांकबंगले व हिंदीलोकांकरितां स्वस्त अशा उतरण्याच्या जागा रस्तोरस्तीं आहेत. मुख्य मुख्य गांवीं महाराजांकरितां बांधलेलीं विश्रांतिगृहेंहि आहेत. त्या ठिकाणीं महाराजांच्या किंवा रोसिडेंटांच्या खास पाहुण्यांना उतरावयाला मिळतें. या सर्व सोयी कशा काय आहेत, त्या पहाण्याकरितां आम्ही एकदां या ठिकाणीं उतरण्याचा निश्चय केला. डांकबंगल्याच्या खर्चिकपणाचा आम्हांला मागें एकदां अनुभव आला होता, म्हणून येथें जेवावयाला उतरावयाचें नाहीं, असें आम्ही ठरविलें होतें. पण चहाची वगैरे सोय कशी आहे, हें पाहण्याकारितां जेव्हां साडेआठांच्या सुमाराला आम्ही हट्टी गांवीं आलों, तेव्हां डांकबंगल्यांत जाऊन चहा व पाव मागितला. डांकबंगला चांगला हवाशीर दिसला, व डांकबंगल्यांत असणाऱ्या सर्व सोयी तेथें होत्या. हातपाय धुतल्यावर आम्ही वाट पहात बसलों, तों चहा, लोणी व पाव हे जिन्नस आले. आपल्या इकडच्या रिफ्रेशमेंटरूमप्रमाणें येथें व्यवस्था असून किंमतीचा आकारहि त्या मानानेंच आहे. म्हणजे आम्हांला दोघांचा एक रुपया द्यावा लागला.


तेथें तासभर विसावा घेऊन आम्ही पुनः मार्गस्थ झालों, तों बारा वाजतां चकोटी या गांवीं आलों. येथें आम्ही हिंदु लोकांकरितां बांधलेल्या ' हिंदु स्वयंपाकगृहांत ' उतरलों. येथली व्यवस्था कमी खर्चाची असते; पण वाईट नसते. एक आचारी व एक नोकर तेथें असून आपल्याला पाहिजे त्या वस्तु आचारी करून घालतो. आम्ही तेथें उतरल्यावर ब्राह्म-




बारामुळा—काश्मीर.



बारामुळापुढचा एक रस्ता.



शंकराचार्य देऊळ-श्रीनगर.



पनरतन–श्रीनगर.

णाला डाळ व भात करावयाला सांगितलें. त्यानें विचारलें " मच्छीभात पकाऊं क्या ? "

हें वाक्य ऐकून आम्ही आश्चर्यचकित झालों, व त्याला म्हटलें " आम्ही ब्राह्मण आहों. "

तेव्हां तो म्हणाला " हम्‌भी बम्मन है; मच्छी भातको क्या हरज है ? "

तेव्हां आम्हांला समजलें, कीं, इकडले सर्व ब्राह्मणसुद्धां मांसाहारी आहेत ! " आम्हांला मच्छीभात नको; आम्ही शाकाहारी आहों. तरी डाळभातच कर, " असें आम्ही त्याला सांगितलें.

जेवण होऊन थोडी विश्रांति घेतल्यावर आम्ही पुढें मार्गस्थ झालों, तों पांच साडेपांचांच्या सुमाराला उरी या गांवीं आलों. रात्रीचा आमचा मुक्काम येथें व्हावयाचा होता. रावळपिंडीहून निघाल्याला आज तिसरा दिवस असून आज सकाळपासून संध्याकाळपर्यंत आम्ही सुमारें छत्तीस मैलांचाच प्रवास केला. कारण, कोहाल्यापासून आपल्या ध्यानांत न येतां मार्ग वरवरच जात असतो. कोहाला समुद्रसपाटीपासून दोन हजार फूट आहे तर उरी हें ठिकाण सुमारें पंचेचाळिसशें फूट उंच आहे. उरी हें गांव बरेंच मोठें आहे, व येथें सपाटीहि पुष्कळच असून तीमध्यें भातशेती रगड आहे. यामुळें येथें थोडें तरी खुलास वाटतें, व कोहाल्याकडे जातांना पाताळांतील तुरुंगाकडे जातों कीं काय, असा जो भास होतो, तसा इकडे होत नाहीं. ज्याप्रमाणें डुमेल येथें आपटाबादकडून येणारा रस्ता या रस्त्याला येऊन मिळतो त्याप्रमाणें झेलम स्टेशनपासून काश्मीराकडे येणारा एक रस्ता उरीस याच रस्त्याला येऊन मिळतो.

उरीलाहि आम्ही 'हिंदु स्वयंपाकगृहां' तच उतरलों होतों. जागेचें भाडें, चौपाईचें भाडें, दिवाबत्तीचें भाडें, व जेवणाखाणाचा खर्च सर्व मिळून सरासरी माणशीं रुपया दीड रुपया येतो. मुंबईच्या उपहारगृहांत ज्याप्रमाणें पदार्थांच्या किंमतीची यादी असते, त्याप्रमाणें या गृहांतून संस्थानच्या अधिकाऱ्याच्या सहीची यादी असते; यामुळें परकी माणसाला आकार देतांना सोयीचें पडतें.

दुसऱ्या दिवशीं पुनः आम्ही मार्गस्थ झालों. उरीच्या आसपास जी ऐसपैस सपाटी आहे, तिचा वचपा काढण्याकरितांच कीं काय, उरी टाकल्यावर वितस्ता नदी पुनः भयंकर पहाडाचा भेद करून आली आहे, असें दिसूं लागतें. दोन्ही बाजूंना देवदार व इतर प्रचंड वृक्ष यांनीं आच्छादित असलेले व सात-सात हजार फूट उंच असलेले कडे असून या अत्यंत चिंचोळ्या दरींतून नदीला जावें लागल्यामुळें नदी चवताळलेल्या वाघिणीसारखी डुरकण्या फोडीत व उड्या घेत जाते. कोठें कोठें तर किल्ल्याच्या तटाप्रमाणें दोहींकडे सारखे तुटलेले कडे असून फक्त लहानशा दरवाजाप्रमाणें असलेल्या एका भगदाडांतून नदीचा प्रवाह जातो. या ठिकाणचा देखावा विलक्षण भयप्रद वाटतो.

अशा या निबिड दरींत महोरा म्हणून काश्मीरच्या महाराजांच्या राज्यांतलें वीज उत्पन्न करण्याचें स्टेशन लागतें. अशा या भयंकर दरींत एका लहानशा दुकानांत विजेचा दिवा पाहिला, म्हणजे विलक्षणच अचंबा वाटतो, व अर्वाचीन सुधारणा आणि तिनें उत्पन्न केलेल्या सुखसोयी यांचा कोठेंकोठें शिरकाव झाला आहे हें पाहून मन एक प्रकारें थक्क होऊन जातें ! नैनिताल पाहिलें म्हणजे अशीच भावना मनांत येते; कोठें हिमालयांतील दऱ्याखोऱ्या व पहाड, आणि कोठें यूरोपांत तयार झालेल्या विजेच्या सोयी ! पण अशासारख्या ठिकाणीं त्यांचा हा संगम पाहून अर्वाचीन शांततेच्या काळाचा महिमा केवढा आहे, हें मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

महोरा टाकून पुढें गेलें म्हणजे रामपुर म्हणून एक गांव लागतें. येथें आम्ही फराळाकरितां थांबलों. फराळ आटोपून येथून अकरासाडेअकरा वाजतां आम्ही निघालों ते बारामुळा येथें दोनअडीचच्या सुमाराला आलों. रामपुर सोडल्यापासून आतां ही दरी संपेल, आतां ही दरी संपेल, असा कित्येक वेळां भास होई, पण प्रत्येक वेळेला आमची फसगत होई ! बारामुळाच्या आधीं एक खेडें लागून तेथें सभोंवतालच्या टेंकड्या लहानलहान होऊन संपत आल्या आहेत, असें आम्हांला दिसलें. तेव्हां "हेंच का बारामुळा ?" असें आम्हीं आमच्या टांगेवाल्याला विचारलें. पण

'जरा थांबा म्हणजे येईल,' असें त्यानें आम्हांला सांगितलें. लवकरच आम्ही बऱ्याच उंच अशा टेंकड्यांच्या बाजूकडे जाऊं लागलों, व आतां पुढें रस्ता नाहीं, असें आम्हांला वाटलें, तोंच त्या टेंकडयांचा भेद करून नदी चालली आहे, व तिच्याच कडेनें रस्ता चालला आहे, असें आम्हांला आढळून आलें. जणूं काय दारासारखा असलेला हा भाग मागें टांकून आम्ही आंत पाऊल टाकतों, तों वितस्तेचें पात्र केवढें तरी प्रशस्त व प्रशांत झालेलें दृग्गोचर होऊन आमच्या समोर सपाटच्यासपाट भूमिभाग दिसूं लागला. तेव्हां हाच काश्मीरचा सपाट प्रदेश, अशी आम्हांला प्रचीति आली. बारामुळा या गांवाला 'काश्मीरचें किंवा नंदनवनाचें द्वार' असें म्हणतात, तें यथार्थ आहे, असें तत्क्षणीं दिसून येतें. आजचा राहिलेला सर्व दिवस व रात्र आमचा मुक्काम येथें व्हावयाचा होता म्हणून आम्हीं येथील हिंदुस्वयंपाकगृहाचाच आश्रय केला, हें सांगावयाला नकोच.

याप्रमाणें पंजाबच्या सपाट, सुपीक पण अपादप व म्हणूनच कंटाळवाण्या प्रदेशांतून येऊन प्रचंड पर्वतराजि ओलांडून पुढें दऱ्याखोऱ्यांतून नदीनाल्यांतून, रानांवनांतून, झेलमनदीच्या नागमोडी प्रवाहाच्या बाजूबाजूनें बिकट मार्ग काढीतकाढीत, काश्मीरच्या सपाट, सुपीक, सुंदर व प्रच्छाय प्रदेशांत प्रवेश करून आह्मीं येथपर्यंत सुखरूप पोंचलों याबद्दल आमच्या मनाला फार आनंद झाला यांत नवल नाहीं.

आम्ही चहा वगैरे घेतों तोंच तेथें चेरी नांवाचीं फळें मिळतात तीं विकावयाला आलीं. काश्मीर प्रांत थंड देशांतील फुलें व फळें यांकरितां फार प्रसिद्ध आहे, याचें प्रत्यंतर आह्मांला रस्तोरस्तीं येत होतेंच पण त्या गोष्टीचें हें आणखी एक प्रत्यंतर आह्मांला मिळालें. चेरी हीं फळें आपल्या इकडच्या जांभळापेक्षां किंचित् लहान असतात, पण यांचा आकार लांबट नसून करवंदासारखा वाटोळा असतो. फळें गोडीला चांगलीं असतात. हीं फळें थोडींशीं खाऊन आम्हीं हा गांव पहावयाला निघालों.

हा गांव वितस्तेच्या दोन्ही तीरांवर वसलेला असून येथें नदीवर एक पूल आहे. त्या पुलांवरून आम्हीं पलीकडे गेलों. येथें नदीचें पात्र रुंदावलें असून ती अगदीं संथपणें चालली आहे असें दिसलें. आम्हीं झेलम

स्टेशनवर प्रथमतः ही नदी पाहिली, तेव्हां ती अशीच शांत होती; पण तिचें पात्र मात्र समुद्रप्राय दिसत होतें. झेलम स्टेशनापासून बारामुळा दोनशें मैलांच्या वर असेल. हा दोनशें मैलांचा नदीचा मार्ग प्रचंड हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यांतून व डोंगरपहाडांतून आलेला आहे. या सर्व भागांत या नदींतून नावा चालविणें अशक्य आहे. कारण नदीचा वेग विलक्षण आहे. पण ही नदी उगमापासून थोड्याच अंतरावर नावा चालण्याला योग्य होते, व तेथून बारामुळापर्यंत नावा चालतात; पुढें नावा बंद होतात. पण पुढें झेलम स्टेशनपासून नावा चालतात. अशीं या नदीचीं बहुविध रूपें पाहून आह्मांला ' बहुरत्ना हि वसुंधरा ' या ह्मणीची आठवण झाली, व ' बहुरूपा हि वितस्ता ' असें या ह्मणीचें रूपांतर मनांत आलें. बारामुळा हा गांव मोठा आहे; पण गांवांत घाण बरीच दिसली. बहुतेक वसती मुसलमानांची आहे असें दृष्टोत्पत्तीला आलें. गांवाच्या टोंकापर्यंत जाऊन आम्हीं परत बिऱ्हाडीं आलों.

येथून श्रीनगरला जावयाला दोन मार्ग आहेत. एक खुष्कीचा मार्ग. हा थेट पूर्वेकडे असून रस्ता अगदीं सरळ व सपाटच आहे. दुसरा जलमार्ग. हा मात्र अर्धलंबवर्तुळाकार आहे. बारामुळा येथें नावेंत बसलें, कीं, श्रीनगरांत थेट नावेनें जातां येतें. कारण, श्रीनगर या नदीच्या कांठावरच वसलें आहे. बारामुळापासून दहाबारा मैलांवर ही नदी वुलर नांवाच्या सरोवराला मिळते. या सरोवराचा परिघ तीस मैलांचा असून हिंदुस्तानांत एवढें मोठें सरोवर दुसरें नाहीं. येथील देखावा फारच रमणीय आहे. पण या मार्गानें श्रीनगरला जावयाला तीन दिवस लागतात. आम्हीं खुष्कीच्या मार्गानें गेलों.

गांव पाहून आल्यावर आम्ही श्रीनगराकडे जाणाऱ्या रस्त्यानें पहातपहात चाललों. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ' पॉपलर ' नांवाचीं झाडें सारखीं लावलेलीं आहेत. यामुळें रस्त्याची अपूर्व शोभा दिसते. पॉपलर (इकडे याला ' सफेदा ' म्हणतात.) हें झाड पोफळीच्या झाडाप्रमाणें अगदीं सरळ वाढत जातें. पण पोफळीच्या बुंध्याला करवे पडत जातात, तसे याला नसतात. याची साल पांढरी शुभ्र असते, व बुंध्यापासून दहाबारा

फूट उंचीपर्यंत याला पानें नसतात. तेथून वर पानें व खांद्या फुटतात. पण खांद्या आडव्या फुटत नाहींत, तर सुरूच्या झाडाप्रमाणें बुंध्याला चिकटून वरवर जातात. या झाडाचीं पानें कांहींशीं पिंपळाच्या पानांसारखीं असून त्यापेक्षां थोडीं लहान असतात, आणि नव्या पालवीप्रमाणें सतेज व पोपटी हिरव्या रंगाचीं असतात. हा वृक्ष विलक्षण म्हणजे पन्नासपासून शंभर फूट इतका उंच सरळसोट वाढत जातो. यांना फांद्या वगैरे वेड्यावांकड्या फुटत नसल्यामुळें हे वृक्ष जवळ जवळ लावतां येतात. आम्हीं मोजून पाहिलें, तों दोन वृक्षांमध्यें दोनदोन हातांचें अंतर होतें. अशा तऱ्हेनें अगदीं जवळजवळ व सारख्या अंतरानें रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हे वृक्ष लावल्यामुळें रस्त्याची शोभा कांहीं विलक्षणच दिसते. काश्मीरांत प्रथमतः प्रवेश करणाराला या रस्त्याची शोभा म्हणजे अदृष्टपूर्वच होय, यांत शंका नाहीं. या रस्त्याकडे खरोखरीच सारखें पहात रहावेंसें वाटतें.

आम्ही सारखे पुढेंपुढें चाललों. दोन्ही बाजूंना ते उंचउंच वृक्ष, समोर जाणारा रस्ता, अगदीं सपाट प्रदेश, रस्त्याच्या बाजूला केव्हांकेव्हां पाण्याचे पाट व त्यांत निरनिराळ्या रंगांचीं फुलें हा देखावा कितीहि वेळ पाहिला तरी मनाची तृप्ति होत नाहीं. जातांजातां आम्हांला एक लहानसा उंचवटा लागला, म्हणून सभोंवारची शोभा पहाण्याकरितां आम्ही त्यावर चढलों, तों दुसराच अपूर्व देखावा आमच्या दृष्टिपंथांत आला. सर्व भूमिभाग पांढऱ्या शुभ्र पर्वतराजींनीं वेष्टिलेला आहे, असें दिसून येऊन जिकडे दृष्टि फेंकावी तिकडे हे पांढरे शुभ्र पर्वतच दृग्गोचर होऊं लागले. चांदीचा मुलामा दिलेल्या वस्तु जशा चकाकतात, त्याप्रमाणें या टेंकड्या सायंकाळच्या वेळीं विशेषच चकाकतात. काश्मीर हा प्रदेश म्हणजे हिमालयांकित एक कोट आहे, याची प्रचीति या ठिकाणीं आम्हांला आली. हा देखावा आम्ही किती वेळ तरी पहात होतों; पण आतां उशीर झाल्यामुळें आम्ही परत फिरलों, व आमच्या उतरण्याच्या जागीं आलों.

आम्हीं बारामुळा येथें ता. २४ मे रोजीं दोन प्रहरीं पोहोंचलों हें मार्ग

सांगितलेंच आहे. येथून श्रीनगर चवतीस मैल म्हणजे टांग्याचा पांच तासाचाच प्रवास राहिला होता. तो प्रवास आह्मीं पंचवीस तारखेस सकाळींच करून श्रीनगरास जाणार होतो. श्रीनगरास आह्मीं संस्थानचे वीजेच्या खात्यांतील एंजीनीयर रा. बोस या नांवाच्या बंगाली गृहस्थाकडे उतरणार होतो. त्यांना तेथें बिजली बाबू म्हणतात. पंचवीस मे पासून आह्मीं देशीं परत येईपर्यंत पुढील हकीकत स्थल क्रमानें न देतां दिन क्रमानें देण्याचा विचार केला आहे. अर्थात् आमची रोजची रोजनिशीच वाचकास आह्मीं सादर करणार आहे व ती ता. २५ मे सकाळपासून देणार आहो. पण त्याचें आधीं श्रीनगरची सामान्य स्थिति व तेथल्या आमच्या राहण्याची सोय यांची हकीकत देणें वावगें होणार नाहीं.

२

श्रीनगर.

आमच्या आगमनाची बोसबाबूंना आधींच वर्दी असल्यामुळें आम्ही पोहोंचल्याबरोबर आमची स्नानभोजनादि सर्व व्यवस्था उत्तम झाली. आमचें जेवणखाण आटोपत आहे, तोंच बिजलीबाबू ऑफिसांतून घरीं आले, आणि त्यांनीं आमच्या प्रवासाबद्दलची चवकशी करून 'आपल्या रहाण्याची व्यवस्था श्रीयुत प्रोफेसर अप्रकाशचंद्र मेहता या नांवाच्या दुसऱ्या बंगाली बाबूंच्या बिऱ्हाडीं केली आहे,' असें आम्हांला सांगितलें. श्रीयुत मेहता व श्रीयुत घोष नांवाचे दुसरे एक बंगाली बाबू एकत्र रहात असत, आणि दोघेहि सडेच असल्यामुळें त्यांच्या बिऱ्हाडीं जागाहि पुष्कळ होती; शिवाय, ते शाकाहारीहि होते. पडदानशीन कुटुंबवत्सल बाबूंच्या बिऱ्हाडापेक्षां आमच्या रहाण्याची ही दुसरी व्यवस्थाच आम्हांला फार पसंत पडली, आणि अशी व्यवस्था केल्याबद्दल आम्हीं बिजली-बाबूंचे आभार मानले.

आमच्या प्रवासाबद्दल चवकशी करून मग बिजलीबाबूंनीं आमचा काश्मीरांत किती दिवस रहाण्याचा बेत आहे, याबद्दल विचारपूस केली. 'सात आठ दिवसांपेक्षां जास्त दिवस आम्हांला रहावयाला सवड नाहीं.' असें जेव्हां आम्हीं बाबूमजकुरांना सांगितलें, तेव्हां ते मोठ्या आश्चर्यानें उद्गारले "काय म्हणतां आपण ? आपल्या ठिकाणाहून दीडदोन हजार मैलांच्या पल्ल्यावर येऊन व इतका पैसा खर्च करून आपण आलांत, आणि आतां येथें सातआठ दिवसच मुक्काम करणार ! येथें येणारे लोक इतक्या श्रमाचा व दगदगीचा प्रवास करून आल्यावर निदान दीड महिना तरी राहिल्याखेरीज परत स्वदेशीं जात नाहींत. शिवाय, काश्मीर

हा एक मोठा प्रांत आहे. यामध्यें कितीतरी सुंदर सरोवरें आहेत; कितीतरी वनश्रीनें भरलेलीं दऱ्याखोरीं आहेत; येथें किती तरी स्फटिकासारख्या पाण्यानें तुडुंब वहाणाऱ्या नद्या आहेत, आठदहा हजार फुटांच्या वर उंच असलेल्या पुष्पवाटिका व शीतल निवासस्थानें कितीतरी आहेत; यांपैकीं तुह्मी सातआठ दिवसांत काय काय पहाणार ? ''

या आशयाचें बाबूसाहेबांचें भाषण ऐकून एकाद्या श्रीमंत मनुष्याच्या मनाची कुबेराची संपत्ति ऐकून जी स्थिति होईल, तीच आमच्या मनाची झाली. आम्ही काश्मीराला आलों, ते अर्थात् तो प्रांत वनश्रीचें माहेरघर असें समजूनच आलों; पण तो प्रांत निवळ झटकाफटकी पहावयालासुद्धां महिनापंधरा दिवस पुरणार नाहींत, असें ऐकून आह्मांला थोडेंसें वाईट वाटलें. पण आतां त्या वाईट वाटण्याचा उपयोग काय होता ? आह्मांला जास्त रहावयाला तर सवड नव्हती. तेव्हां आहे त्यांत जितकें पाहून घेतां येईल तितकें पाहून घ्यावयाचें, असा आह्मीं आपल्या मनाशीं निश्चय केला, आणि आमच्या मुक्कामाचे आह्मीं दोन भाग करण्याचें ठरविलें. पहिल्या भागांत श्रीनगर व त्याच्या आसपासचीं प्रेक्षणीय स्थलें पहावयाचीं, आणि दुसऱ्या भागांत श्रीनगराच्या बाहेरील कांहीं स्थलें पहावयाचीं, व मग लागलीच देशीं परतावयाचें असा आह्मीं कार्यक्रम ठरविला.

श्रीनगर हें काश्मीर संस्थानच्या राजधानीचें शहर आहे. हल्लीं काश्मीर हें जोडसंस्थान आहे. येथले महाराज काश्मीर व जम्मू या संयुक्त संस्थानांचे अधिपति आहेत. जम्मू हें ठिकाण हिमालयाच्या पायथ्याला व पंजाबच्या उत्तरेला आहे. जम्मू हा हल्लीं संस्थानचा एक परगणा आहे. काश्मीरचे महाराज जम्मू येथें हिंवाळ्याचे चार महिने रहातात, आणि बाकीचे आठ महिने श्रीनगराला रहातात.

काश्मीर हा या संयुक्त संस्थानांचा एक परगणाच आहे. हा परगणा हिमालयवलयांकित असा एक सपाट प्रदेश आहे. ही सुमारें ऐशीं मैल लांब व सुमारें तील मैल रुंद अशी एक सपाट पट्टी आहे, आणि या सपाट पट्टींतून झेलमनदी वाहत जाऊन बारामुळा येथें हिमालयाला फोडून

वांकणावांकणानें वहातवहात पंजाबांत उतरली आहे. या पट्टीच्या सरासरी मध्यावर श्रीनगर ही राजधानी वसलेली आहे.

ज्याप्रमाणें युरोपियन प्रवासी काश्मीरला ' हिंदुस्तानचें नंदनवन ' ह्मणतात, त्याचप्रमाणें ते श्रीनगराला यूरोपांतील व्हेनिस शहराची उपमा देतात. सकृद्दर्शनीं हें साम्य ह्मणजे ' कोठें इंद्राचा ऐरावत व कोठें शाम-भटाची तट्टाणी ' या ह्मणीसारखें भासतें. कारण, कोठें आड्रियाटिक-समुद्रवलयांकित व्हेनिस शहर, तर कोठें हिमालयवलयांकित श्रीनगरशहर! कोठें समुद्रसपाटीवर वसलेलें व नदीच्या प्रवाहानें समुद्रांत आलेल्या मातीच्या गाळाचें बनलेलें व्हेनिस, तर कोठें समुद्र सपाटीपासून पांच हजार फूट उंचीवर वसलेलें व सरोवराचें पाणी ओसरून बनलेलें श्रीनगर! कोठें एका काळीं आशिया व आफ्रिका या दोन खंडांच्या व्यापाराचें केन्द्र असलेलें व्हेनिस, तर कोठें हिमालयाच्या प्रचंड तटानें जगाच्या दळणवळणाला पारखें झालेलें श्रीनगर! कोठें यूरोपांतील वास्तुकलेचें माहेरघर मानलेलें व्हेनिस, तर कोठें झोंपड्यावजा साध्या व गलिच्छ घरांनीं भरलेलें श्रीनगर! सारांश, किती तरी बाबतींत या दोन शहरांत वैषम्य आहे. तरी पण एका बाबतींत या दोन शहरांत विलक्षण साम्य आहे, व त्यामुळेंच ही उपमा अयथार्थ वाटत नाहीं. ती बाब म्हणजे शहरांतील व शहराच्या आसपासचे दळणवळणाचे मार्ग आणि त्यांचीं साधनें हीं होत. व्हेनिस शहर हें समुद्राच्या कांठीं एका मोठ्या नदीच्या मुखाशीं सांचलेल्या गाळाच्या घनीभवनानें व दृढीभवनानें बनलेलें आहे. त्या शहराचे निरनिराळे जमिनीचे टापू अगर बेटें झालेलीं आहेत, आणि मध्येंमध्यें पाणी व पाण्याचे पाट आहेत. व्हेनिस शहराचे ' ग्रांदेकनाल ' या कालव्यानें दोन भाग झालेले असून या कालव्याला हजारों पाट काढलेले आहेत. यामुळें सर्व शहरभर कालवेच कालवे असून या कालव्यांचा रस्त्यांप्रमाणें उपयोग होतो. ह्मणजे ज्याप्रमाणें इतर शहरांत गाड्या, घोडे, ट्रामवे, हीं दळणवळणाचीं साधनें आहेत, त्याप्रमाणें व्हेनिसमध्यें ' गंडोला' नांवाच्या होड्या, जॉली बोटी, आगबोटी हीं दळणवळणाचीं मुख्य साधनें

आहेत, आणि यामुळें पहिल्यानें पहाणाराला हा एक अपूर्वच अनुभव येतो ! त्यासारखीच श्रीनगरची स्थिति आहे.

हें शहर झेलमनदीच्या दोन्ही तीरांवर सुमारें तीन मैल असें दुतर्फा वसलेलें आहे. या नदींत लहानमोठ्या नावा चालतात. शिवाय शहराच्या, उत्तरेला एक अर्ध्या मैलावर दाल नांवाचा मोठा सुंदर तलाव आहे, व हा तलाव झेलमनदीला एका काल्व्यानें जोडलेला आहे; तसेंच बऱ्याच मैलांवर मानसबल ह्मणून एक सरोवर आहे, त्याचाहि झेलमनदीशीं एका काल्व्यानें संबंध जोडलेला आहे. आणखी शहराच्या खालीं ' दुधगंगा ' नांवाची नदी झेलमला येऊन मिळाली आहे. शिवाय, झेलमनदीला पूर येऊन शहरांतील घरांत पाणी शिरतें, त्याचा बंदोबस्त करण्याकरितां शहराच्या वरच्या बाजूला झेलम नदीचा एक मोठा पाट काढून तो अर्धवर्तुलाकार घेऊन शहराच्या मधोमध नदींत मिळवून पुनः दुसऱ्या बाजूला काढून शेवटीं शहराच्या खालीं नदींत मिळविला आहे. या नागमोडी काल्व्याच्या योगानें येथें झेलमनदी आडव्या पाडलेल्या 'क' सारखी दिसते, व शहरांतील घरें याच्या आसपास वसलेलीं आहेत. यामुळें शहरांतील कोणत्याहि ठिकाणापासून नदी अगर कालवा आठदहा मिनिटांच्या चालीच्या आंत आहे. अर्थात् शहरांत निरनिराळ्या ठिकाणीं जाण्याचें मुख्य साधन ह्मणजे होडया होत. अशा हजारों होडया श्रीनगर शहरांत आहेत. ज्याप्रमाणें आपण इतर शहरीं गाडीच्या अड्ड्यावर गाडी ठरविण्याला जातों, त्याप्रमाणें येथें कोठें जावयाचें असल्यास होडयांच्या अड्यावर जावयाचें, व तेथून होडींत बसून इष्ट ठिकाणीं पोहोंचावयाचें ! या होड्यांना इकडे ' शिकारा ' ह्मणतात. घारापुरीस जावयाचें असल्यास मुंबईला ज्याप्रमाणें जॉलीबोटी असतात तशा तऱ्हेचे हे ' शिकारे ' असतात. मात्र या होडया फार लांबट असतात. नदीचें व काल्व्याचें पाणी संथ असल्यामुळें या होड्या खालीं सपाट असतात.

तारीख २५ मे १९१५ रोजीं पहांटेला पांच वाजतां निघून आह्मीं चवतीस मैलांचा प्रवास सुमारें सात तासांत आक्रमिला. हा सर्व प्रवास अगदीं सपाट अशा प्रदेशांतून होता. रस्त्याचे दोन्ही बाजूंना ' सफेदा '

या सुंदर व उंच वाढणाऱ्या झाडांची रांगचरांग सारखी लागलेली होती; यामुळें आपण एकाद्या लतांनीं व्याप्त अशा सुंदर मंडपांतूनच जात आहों, असा भास होत होता; पुष्कळ ठिकाणीं रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खंदकाप्रमाणें पाट दृष्टीला पडले, व त्यांत पुष्कळ पुष्पांनीं ओथंबलेलीं पाणझाडें आणि पाणवेली दृग्गोचर होत होत्या; ह्मणून सर्व प्रदेश जणूं काय एक बागच बाग आहे, असें मनाला वाटत होतें; श्रीनगरच्या जवळजवळ येऊं लागलों, तसतशा फळझाडांच्या बागा व फुलझाडांच्या बागा लागूं लागल्या.

बारांपासून तीनपर्यंत आमचें स्नान, भोजन वगैरे आटोपलें. बिजलीबाबूंच्या सांगण्यावरून राहिलेल्या तीनचार तासांत आह्मीं रेशमाचा कारखाना आणि जुम्मामशीद हीं पहावयाचें ठरविलें. त्याप्रमाणें टांगा ठरवून लागलेच निघालों, ते रेशमाच्या कारखान्याशीं आलों.

कारखान्याचें आवार मोठें आहे; पण कारखान्याची इमारत फारशी मोठी दिसली नाहीं. कारण, या कारखान्याचा बराच मोठा व तोहि विणण्याचा भाग अग्निनारायणाच्या भक्षस्थानीं पडला, व तो भाग अजून बांधला नाहीं, असें कळलें. सध्यां त्या कारखान्यांत रेशमाच्या किड्यांनीं तयार केलेल्या कोशापासून फक्त रेशमी सूत तयार होतें, व तें युरोपांत पाठविण्यांत येतें, असें आह्मांला सांगण्यांत आलें. आमच्या दुर्दैवानें आज कारखान्याला लवकर सुट्टी झाली होती, यामुळें आह्मांला कारखाना चालू असतांना पहावयाला मिळाला नाहीं. तरी पण आम्ही सर्व दालनें हिंडलों. व तयार झालेल्या रेशमाचे नमुने पाहिले. तसेंच, इटली देशांतून आलेल्या रेशमाच्या किड्यांच्या अंड्यांच्या पेट्यांच्या पेट्या आम्हीं तेथें पाहिल्या. या संस्थानचा रेशमाचा हा कारखाना फारच मोठा आहे, व त्यापासून संस्थानला वर्षाचें दहाबारा लाखांचें उत्पन्न होतें, असें समजलें.

हा कारखाना पाहून झाल्यावर आम्ही परतलों, आणि जुम्मामशीद पहावयाला निघालों. रेशमाचा कारखाना झेलम नदीच्या उजव्या तीराला आहे, तर जुम्मामशीद डाव्या तीराला असून ती श्रीनगरच्या जुन्या वस्तीच्या अगदीं मध्येंच आहे. यामुळें झेलमनदीवरचा पूल ओलांडून आह्मांला

यावें लागलें. आह्मी पूल ओलांडून शहरांतून जाऊं लागलों, तोंच आह्मांला जुन्या काशीची आठवण झाली. आतां रस्ते अगदीं बोळांडीवजा लागूं लागले. एक टांगासुद्धां जाण्याची मुष्कील, इतका रस्ता लहान होता. तसेंच, बोळ आडवेतिडवेहि फार होते. घरेंहि अगदीं भिकार, गलिच्छ असून जिकडेतिकडे रस्त्यावर घाण आणि केरकचरा पडलेला होता. त्यामुळें रस्त्यांतून जातांना वारंवार दुर्गंधिहि येत होती.

वाटेनें दृष्टीला पडणारे लोकहि बरेच गलिच्छ दिसले. येथें बहुतेक मुसलमानांचीच वसती आहे. मधूनमधून मुसलमानी थाटाचाच पोशाख केलेले, पण गंधावरून हिंदु असे ओळखतां येण्यासारखे पंडित दृग्गोचर होत होते. शहराचा हा गलिच्छ भाग पाहून नंदनवनांतहि मधूनमधून उकिरड्याच्या जागा असतात, असें वाटलें. हा सर्व प्रांत व हें शहर नैसर्गिक सौंदर्यानें व वनश्रीनें इतकें ओतप्रोत भरलेलें असतां मनुष्य आपल्या आळसानें, आपल्या अज्ञानानें, आपल्या गलिच्छ सवईनीं, आपल्या वेडगळ कल्पनांनीं व आपल्या दारिद्र्यानें ‘ नंदनवनाला ’ सुद्धां ‘ नरक ’ तुल्य करून टाकूं शकतो, हें पाहून मनामध्यें एक प्रकारचा उद्वेग उत्पन्न झाला. ‘ **नर करणी करे तो नरका नारायण हो जाय** ’ ही मनुष्याच्या कर्तृत्वाची साक्ष पटविणारी ह्मण जशी खरी आहे, तशी ‘ मनुष्य आपल्या दुष्कृत्यांनीं अधोगतीलाहि आपणाला नेऊं शकेल, ’ हें ह्मणणेंहि तितकेंच खरें आहे. एवढ्या सुंदर प्रदेशांत इतकें गलिच्छ शहर ! हा विरोध आमच्या मनांत सारखा घोळत होता. जरी हा शहरचा भाग इतका गलिच्छ होता, तरी येथेंसुद्धां विजेचे दिवे दृष्टीला पडत होते, या गोष्टीचा मात्र आह्मांला चमत्कार वाटला; पण या ठिकाणीं विजेचे दिवे रॉकेलच्या दिव्यापेक्षां स्वस्त पडतात, व ह्मणूनच गरीबगुरीबसुद्धां हे दिवे वापरतात असें आह्मांला समजलें.

या गलिच्छ भागांतून आमचा रस्ता सरतां सरेना ! पण शेवटीं आह्मी एका ठिकाणीं थांबलों, आणि खंदकासारख्या भासणाऱ्या खोलगट जागेंतून जुम्मामशीदीच्या दारापाशीं आलों. येथें पुष्कळ मुसलमान फकीर व मुल्ला बसलेले होते, त्यांनीं आमच्या भोंवतीं गर्दी केली. हिंदूच्या

तीर्थांचे ठिकाणीं जसे पंडये, तसेच हे लोक आम्हांला दिसले. पण त्यांच्या लगटीची पर्वा न करतां आह्मीं मशीदींत शिरलों.

ही सर्व मशीद लांकडी कामाची आहे, हा एक तिचा विशेष आहे. उत्तरहिंदुस्तानांतील सर्व मशिदी दगडी आहेत; पण येथली ही मुख्य मशीद लांकडी आहे. इमारत फार उंच आहे. लांकडी खांबांची रांगच रांग फार भव्य दिसते. वर छतहि लांकडी असून त्याचें नक्षीकाम सुंदर आहे. खांबांची उंची पाहून मात्र मनुष्य आश्चर्यानें अगदीं थक्क होतो. येथले खांब चाळीसपन्नास फुटांच्यावरच उंच असतील. हे खांब झाडाच्या एकाच सबंध खोडाचे आहेत, यावरून हिमालयांतील झाडांच्या प्रचंडपणाची कल्पना येते. परंतु या मशीदीचा बराच भाग पडका झाल्यामुळें एकंदर देखावा नयनमनोहर नाहीं, हें कबूल केलें पाहिजे.

ही मशीद प्रथम शिकंदर लोदीनें १४०४ सालीं बांधली. तारापीड नांवाच्या हिंदु राजानें इ. स. ६६९ मध्यें बांधलेल्या हिंदु देवळाच्या सामानानें ही मशीद बांधण्यांत आली. ही मशीद तीनदां अग्निनारायणाच्या भक्ष्यस्थानीं पडली होती. १४७९ मध्यें ती जळल्यामुळें पुनः बांधण्यांत आली. जहांगिराच्या कारकीर्दींत १६१९ सालीं पुनः तिला आग लागली, व पुनः ती बांधण्यांत आली. तिसऱ्यानें १६७४ सालामध्यें औरंगजेब बादशहाच्या कारकीर्दींत ती पुनः बांधली गेली. हल्लींची इमारत औरंगजेबाच्या वेळची आहे. इ. स. १८९३ मध्यें या मशिदीची दुरुस्ती करण्याकरितां काश्मीरच्या महाराजांनीं बारा हजार रुपये दिले असून पुनः १९१२ सालीं त्यांनीं या कामाकरितां चाळीस हजार रुपये दिले. मशीद आह्मी पहावयास गेलों, तेव्हां दुरुस्तीचें काम चालू होतें, असें दिसलें. कारण, ठिकठिकाणीं परांच्या दृष्टीला पडत होत्या. सर्व मशिदीचें आवार बरेंच मोठें आहे. मशिदीचें आंगण २५४--२४४ फूट आहे. हें सर्व आह्मी पाहतों, तों बरीच संध्याकाळ झाली, ह्मणून आह्मांला आमच्या बिऱ्हाडाकडे परत फिरणें भाग पडलें.

सुमारें साडेसात वाजतां आह्मी बाबू अप्रकाशचंद्र यांच्या बिऱ्हाडीं येऊन पोहोंचलों. रात्रीं जेवणखाण झालें, व दुसऱ्या दिवशींचा कार्यक्रम

ठरला. श्रीयुत घोषबाबू जपानांत जाऊन रेशमाच्या धंद्याची माहिती मिळवून आले असून सध्यां ते काश्मीरांत रेशमाच्या लागवडीच्या सुपरवायझरचें काम करीत होते. त्यांना त्यांच्या कामाकारितां हारवानपर्यंत जावयाचें होतें. तेव्हां त्यांच्याच टांग्यांत आह्मीं जाऊन तिकडील प्रेक्षणीय स्थळें पाहून एकदीडच्या सुमाराला बिन्हार्डीं परत यावें, असें ठरलें. याप्रमाणें बेत केल्यावर व इकडल्यातिकडल्या गप्पा मारल्यावर सुमारें दहा वाजतां आह्मी झोंपीं गेलों.

ता० २६ मे १९१५ रोजीं आह्मी सकाळींच उठलों, व चहापाणी घेऊन टांग्यांत बसलों. आम्ही एकंदर चार माणसें होतों. तिघे टांग्यांत बसलों, व श्रीयुत घोष यांनीं आपली पायगाडी बरोबर घेतली. कारण, त्यांना मध्येंच बाजूच्या एका खेड्याची तपासणी करावयाला जावयाचें होतें.

हारवान हें ठिकाण श्रीनगरच्या उत्तरेला ११ मैलांवर आहे. या ठिकाणाहून शहरांत नळाचें पाणी आणलेलें आहे. जातांना रस्तां बराच उंचसखल आहे. हारवान हा एक स्वाभाविक तलाव आहे. याच्या तिनहि बाजूंना प्रचंड पर्वत आहेत. ते इतके उंच आहेत, कीं, मे महिन्यांतसुद्धां डोंगराच्या घळींत अजून बर्फ दृग्गोचर होत होतें. बर्फाच्या घसरण्यानें व वितळण्यानें डोंगरांच्या बाजूंना पडलेल्या खुणा वर जागोजागीं दिसत होत्या. याप्रमाणें तीन बाजूंना स्वाभाविक भिंती असल्यामुळें फक्त दक्षिणेच्या बाजूला बंधारा बांधावा लागला आहे.

या तलावांत डोंगरांवरील बर्फाचें वितळलेलें पाणी सांठतें. येथून शहराकरितां डाल तलावामधून नळ नेले आहेत. तलावांत सांठणारें फाजील पाणी एका मोठ्या मोरींतून सोडून दिलें आहे. व या पाण्याचेच पाट डाल सरोवराच्या आजूबाजूच्या बागांना नेले आहेत. तलाव कांहीं फार मोठा नाहीं. पण येथला देखावा फार सुंदर आहे, व तो कांहींसा नैनितालच्या सरोवराच्या देखाव्यासारखा दिसतो. मात्र या डोंगरावर वसती मुळींच नाहीं. यामुळें प्रदेश निर्जन व भयाण वाटतो. तसेंच, हारवानच्या सभोंवारच्या डोंगरावर झाडीहि नैनितालच्या इतकी दाट नाहीं. हारवान-

ऱ्या दक्षिणेकडल्या बंधाऱ्यावर जिकडे तिकडे गुलाबाची रांगची रांग लावून दिली आहे. हे गुलाब कलमी आहेत. सर्व गुलाब फुलांनीं फुललेले होते. फुलांचा रंग, त्यांचा कोमलपणा व सतेजपणा हीं अवर्णनीय होतीं. व फुलेंहि हाताच्या वचकेइतकीं मोठीं होतीं. काश्मीर देशाला **'गुलाबाची भूमि'** म्हणतात, त्याची यथार्थता माझ्या ध्यानांत आली. कारण, या प्रांतांत रानटी व कलमी गुलाब रानोमाळ आहेत. गुलाबांचींच कुंपणें, गुलाबांचेच ताटवे, गुलाबांच्याच कमानी जिकडे तिकडे दृष्टीला पडतात.


हारवान तलावाचा सर्व बंधारा आम्ही ओलांडला. तलावाचें पाणी अत्यंत स्वच्छ व निर्मळ दिसत होतें. जेथून जास्त पाण्याला वाट करून दिली आहे, तेथपर्यंत आम्ही गेलों. तेथें रेड्याच्या अंगासारखें पाणी धोधो करून पाटांतून वहात जात होतें. ही शोभा बराच वेळ आम्ही पहात राहिलों, व मग नाइलाज म्हणून येथून परतलों.

परत येतांना घोषबाबूंना आपलें नित्य व्यवसायाचें काम—म्हणजे रेशमाच्या किड्यांची तपासणी—करावयाचें होतें. या संस्थानांत रेशमाचा सर्व धंदा सरकारचा आहे. ह्मणजे उपज सरकार करतें असें नाहीं. तर रेशमाच्या किड्यांचीं अंडीं सरकार इटलीमधून आणवितें, व तीं खेड्यांतील शेतकऱ्यांना फुकट दिलीं जातात. या अंड्यांपासून किड्यांची उपज कशी करावयाची, त्यांची वाढ कशी करावयाची, व किड्यांनीं कोशे घालीपर्यंत त्यांची जोपासना कशी करावयाची, याबद्दल सरकारी अंमलदारांकडून माहिती शेतकऱ्यांना देण्यांत येते. शेतकऱ्यांच्या मेहनतीनें तयार झालेले कोश सरकार एका ठरीव भावानें त्यांच्याकडून विकत घेतें. तयार होणारे कोश दुसऱ्या कोणालाहि विकतां कामा नयेत, असा शेतकऱ्यांवर निर्बंध आहे.


घोष बाबूंबरोबर आह्मी पुष्कळ घरें हिंडलों व रेशमाचे हजारों किडे पाहिले. घरांतील थंड अशा जागेंत शेल्फवजा खुल्या कपाटांत हे किडे ठेवतात. त्यांना तुतीचीं पानें खाऊं घालतात. या रानांत तुतीचीं झाडें हजारों आहेत. यामुळें किड्यांना लागणारें अन्न शेतकऱ्याला फुकट मिळतें. या किड्यांना जास्त उष्णता सोसत नाहीं, किंवा फार थंडीही

चालत नाहीं. तेव्हां उष्णतेचें कमीअधिक मान समजण्याकरितां प्रत्येक शेतकऱ्याला एक उष्णतामापक यंत्र देण्यांत येतें. या लोकांचीं घरें जरी झोपडीवजा आहेत तरी या घरांना वरचे मजले आहेत. व त्या घरांना कांचेच्या तावदानाच्या खिडक्या आहेत. त्यांचा उपयोग त्या खोलींतील हवा सारख्या प्रमाणांत ठेवण्यांत होतो. तसेंच, कदाचित् हवेंत उष्णता जास्त झाल्यास त्या खोलींत बेताचें पाणी शिंपडून त्या पाण्याचें बाष्पीभवन घडवून आणून उष्णता कमी करण्यांत येते. याप्रमाणें या किड्यांची जोपासना आणि वाढ बरोबर होत आहे किंवा नाहीं, शेतकरी आपल्या किड्यांची योग्य काळजी घेत आहेत किंवा नाहींत हें पाहण्याकरितां, तसेंच किड्यांना होणाऱ्या रोगांची परीक्षा करून त्यांचा प्रतिकार करण्याकरितां सरकारनें या शास्त्रांतल्या तज्ज्ञांना इन्स्पेक्टर नेमिलें आहे, व रोज खेड्यांत जाऊन तपासणी करून येण्याचें त्यांचें काम आहे. घोष बाबूंचें हेंच काम असल्यामुळें आह्माला अनायासेंच रेशमाच्या उत्पत्तीची सर्व कृति बारकाईनें पहावयास सांपडली.

याप्रमाणें खेडीं पहातपहात आह्मी परत येत असतांना घोष बाबूंनीं आह्मालां काश्मीरच्या महाराजांचा ट्राऊटमाशांचा मासेतलावाचा बाग दाखविला. काश्मीरांत ब्राह्मणसुद्धां सर्व हिंदु मांसाहारी व मत्स्याहारी आहेत. ट्राऊट हा मासा फार दुर्मिळ व अत्यंत स्वादिष्ट असल्यामुळें महाराजांनीं स्वतःकरितां व खाशा पाहुण्यांकरितां एका खेडेगांवांत या माशांच्या उपजेकरितां स्वतंत्र व्यवस्था केली आहे. या बागेंत दोनदोन फूट रुंदीचे व तीन चार फूट खोलीचे असे पाटच पाट बांधून काढलेले असून त्या पाटांतून पाणी खेळविलेलें आहे. यां पाटांत हे मासे इतस्ततः फिरतांना आह्माला दिसत होते. आमचे बंगाली मित्र मोठ्या कौतुकानें या माशांच्या स्वादिष्टपणाची तारीफ करीत होते. 'हे मासे फार महाग असल्यामुळें हे मासे खाण्याचें फारच थोड्यांच्या नशिबीं येतें,' असें ते ह्मणाले. कारण, या माशांना सहा रुपये पौंडप्रमाणें किंमत येते. अर्थात् एका माणसानें एक एका पौंडाचा मासा खाल्ला, तरी त्याच्या जेवणाची किंमत



व्हरनागचा बाग.



व्हरनागची पुष्करणी.

सहज सहा रुपये होते. 'असें सहा रुपये किंमतीचें जेवण आपण आयुष्यांत एकदांच केलें आहे,' असें बाबूसाहेबांचे मित्र ह्मणाले. असो.

याप्रमाणें घोष बाबूंचें स्वतःचें रोजचें काम संपल्यावर आह्मी आपल्या येथल्या मुख्य कामाच्या–प्रेक्षणीय स्थळें पहाण्याच्या–पाठीस लागलों. श्रीनगराचा विशेष ह्मणजे तेथल्या निरनिराळ्या बागा होत. शहराबाहेर व डाल सरोवरासभोंवतीं जिकडे तिकडे बागाच बागा आहेत; त्यांपैकीं 'शालीमार,' निषात,' व 'चष्मशाई' या विशेष प्रसिद्ध असून फार रमणीय आहेत. म्हणून तेवढ्याच पहावयाचें आह्मी ठरविलें होतें. व आजच्या कार्यक्रमांत त्यांपैकीं पहिल्या दोनच पहावयाचा आह्मी बेत केला होता. त्याप्रमाणें, हारवानकडून परत येतांना प्रथमतः शालीमार बाग लागते, म्हणून आह्मी तीच प्रथम पाहिली. बागेचें प्रवेशद्वार भव्य नाहीं. तसेंच बागेच्या सभोंवार असलेली भिंतहि फारशी मोठी किंवा उत्तम तऱ्हेची बांधलेली नाहीं. खेडेगांवांतील एकाद्या पाटलाच्या घराभोंवतीं जशा प्रकारची तटवजा भिंत असते, तशीच ही दिसत होती. या बाह्य परिस्थितीमुळें या बागेबद्दल प्रथमतः फारसा अनुकूल ग्रह पहाणाराच्या मनांत होत नाहीं. पण बागेची एकएक मजगी चढून जसजसें आपण आंत जावें, तसतसा या बागेचा प्रचंडपणा, त्यांतील सुखसोयी, त्याची रचना व सौंदर्य यांची साक्ष मनाला पटत जाते. ही बाग ५९० यार्ड लांब व २६० यार्ड रुंद आहे. हिच्या एकावर एक अशा चार मजगी आहेत. बागेच्या मधोमध प्रत्येक मजगींत एकएक तलाव असून सर्व तलाव पाटानें जोडलेले आहेत, व कारंजांची रांगची रांग लागलेली आहे. या बागेला हारवान तलावाचें पाणी आणलेलें असून तें सर्व बागभर खेळविलेलें आहे. या पाण्याचे एका तलावांतून दुसऱ्या तलावांत पडणारे लहानलहान धबधबे केलेले असून शेवटीं सर्व पाणी दाल तलावांत सोडन दिलेलें आहे.

चवथ्या मजगीवर एक सुंदर ६५ फूट लांब व रुंद असा चबुतरा असून त्यावर दगडी मंडप उभारलेला आहे. याचे खांब काळ्या संगमरवरी दगडाचे असून त्यांवर सुबक नक्षीकाम केलेलें आहे. या मंडपाच्या

सभोंवार पाण्याची पुष्करणी असून त्यांत एकंदर १४० कारंजीं आहेत. हीं सर्व कारंजीं चालू झालीं ह्मणजे या ठिकाणाहून फारच अद्वितीय शोभा दिसते. अशा तऱ्हेच्या किती तरी बागांनीं सुशोभित झालेल्या या शहराला ‘ नंदनवन ’ हें नांव अन्वर्थक आहे, असें वाटल्याखेरीज रहात नाहीं. या बागेंत ‘ चिनार ’ नांवाचीं पुष्कळच झाडें आहेत. श्रीनगरच्या बहुतेक सर्व बागांत हीं झाडें असून झेलमनदीच्या कांठीं तर ‘ चिनारबाग ’ या नांवाची एक स्वतंत्र बागच आहे. हें झाड मूळचें पराशियांतील आहे, व मोंगल लोकांनीं तें या प्रांतांत आणलें असें ह्मणतात. या झाडाचा प्रचंडपणा, त्याची गर्द सांवली, त्याच्या पानांचा नाजूकपणा, व सतेजता या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज समजणें शक्य नाहीं. परशियन भाषेंत सुंदर स्त्रीच्या नाजुक हाताला ‘ चिनार ’ झाडाच्या पानाची उपमा देतात, असें आह्मांला सांगण्यांत आलें, व ही उपमा यथार्थ आहे, असें त्या झाडाचीं सुंदर पानें पाहून माझ्या मनांत आलें.

शालीमारबाग जहांगीर बादशहानें १६१९ सालीं तयार करविली. इ० स० १६३० मध्यें शहाजहानाच्या कारकीर्दींत ही आणखी वाढविण्यांत आली. शालीमारबाग ही डालसरोवराला एका सुंदर कालव्यानें जोडलेली आहे. हा कालवा एक मैल लांब व बारा यार्ड रुंद आहे, व कालव्याच्या दोन्ही बाजूंना मोठमोठ्या वृक्षांनीं परिवृत अशा हिरव्या गार पायवाटा आहेत. यामुळें श्रीनगरांत ‘ शिकाऱ्यां ’त बसून या बागेपर्यंत जलमार्गानें जातां येतें.

ही बाग पाहून झाल्यावर आह्मी टांग्यांत बसलों, व शालीमारपासून अलीकडे दोन मैलांवर असलेल्या ‘ निषात ’ बागेशीं आलों. या बागेचें प्रवेशद्वार शालीमारपेक्षां जास्त मनोहर आहे, व ही बाग डालतलावाच्या अगदीं नजीक असल्यामुळें शालीमारपेक्षां येथें डालसरोवराचा देखावा फारच रमणीय दिसतो. ही बागहि शालीमारइतकी ह्मणजे ५९५ यार्ड लांब आहे. शालीमारपेक्षां या बागेची रुंदी थोडी जास्त म्हणजे ३६० यार्ड आहे. शालीमारला चारच मजगी आहेत, तर या बागेला सात मजगी आहेत. शेवटची मजगी फारच उंच असून तिच्या मागें हजारों फूट

उंचीचे कडे आहेत. यामुळें या मजगीवरून डालसरोवराच्या सर्व बागांचा व सभोंवारचा देखावा फार विस्तृत व विविध दिसतो. या बागेंत दोन मंडप आहेत. पहिला बागेच्या प्रारंभींच आहे, व दुसरा बागेच्या शेवटीं आहे. दोन्ही मंडप दुमजली असून त्यांचें सर्व काम लांकडी नक्षीचें आहे. दोन्ही मंडपांमध्यें पुष्करणी असून त्यांत कारंजीं आहेत. शालीमारप्रमाणें या बागेंतहि प्रचंड चिनारवृक्ष आहेत, व जिकडेतिकडे कारंजीं असून सर्व बागभर पाटाचें पाणी खेळविलेलें आहे. हें पाणी शालीमार बागेवरून इकडे आणलेलें आहे. या बागेच्या सौंदर्याबद्दलची एक मजेदार आख्यायिका येथें देणें अयोग्य नाहीं.

' निषात ' बाग जहांगीर बादशहाच्या नूरजहान राणीचा भाऊ आसफशहा यानें बांधविली, व तो याच बागेंत रहात असे. इ. स. १६३३ मध्यें शहाजहान बादशाह बाग पाहावयाला आला होता. शालीमार बागेपेक्षां सृष्टिशोभेच्या बाबतींत ही बाग सरस आहे, असें बादशहाला वाटलें, आणि ' ही बाग फारच आल्हादकारक आहे, ' असें बादशाह तीनदां आसफशहाला ह्मणाला. यांत बादशहाचा आशय असा होता, कीं, आसफशहानें ती बाग आपणाला नजर करावी. पण आसफशाहा मुग्ध राहिला. यामुळें बादशाहाला मनांतून राग आला, व शालीमार बागेंतून या बागेला पाणी येतें, असें पाहून रागाच्या भरांत 'शालीमार बागेंतून दुसऱ्या कोणत्याहि बागेला पाणी जातां कामा नये ' असा हुकूम बादशाहानें सोडला. यामुळें निषात बागेचें सौंदर्य व वैभव नष्ट झालें. ह्मणून आसफशाहाला फार वाईट वाटलें. पण त्याला कांहींच करतां येईना. आपल्या बागेची ही दुर्दशा पाहून त्याचें मन खट्टू झालें व दुःखाच्या उद्वेगानें तो सुसकारे टाकीत बागेच्या एका कोंपऱ्यांत झोपीं गेला. धन्याची अशी दुःखावस्था पाहून बागेंतल्या एका नोकराला त्याची कींव आली, व ज्या ठिकाणीं शालीमार बागेंतून येणाऱ्या पाटाला दट्टया घातला होता, त्या ठिकाणीं जाऊन तो दट्टया काढून टाकून त्यानें बागेंत पाणी सोडलें. त्याबरोबर बागेंत जिकडेतिकडे पाणीच पाणी झालें. सर्व कारंजीं जोरानें नाचूं लागलीं, व

धबधबे धो धो वाहूं लागले. आसफशाहा त्या आवाजानें जागा झाला, व आपल्या बागेचें पूर्ववैभव पाहून आश्चर्यानें थक्क झाला. पण नोकरानें केलेल्या कृत्याची बातमी लवकरच कळल्यामुळें तो घाबरला, व त्यानें तो दट्टया पुनः बसवून बागेचें पाणी बंद केलें. ही बातमी बादशाहाला कळली. तेव्हां बादशानें त्या नोकराला आपल्या समोर बोलाविलें. सर्वांना वाटलें, कीं, आतां त्या गरीब बिचाऱ्या नोकराचीं शंभर वर्षें भरलीं! याला कांहींतरी भयंकर शिक्षा होणार! बादशहानें त्या नोकराचें म्हणणें ऐकून घेतलें, व आपल्या धन्यावरील भक्तीबद्दल त्याची प्रशंसा करून त्यानें त्याचा बहुमान केला, व शालीमार बागेतून निशातबागेकरितां पाणी नेण्याच्या कायमच्या हक्काची सनद त्यानें आसफशाहाला करून दिली.

ही बाग पाहिल्यावर आम्ही लागलीच बिऱ्हाडीं परतलों. परत येतों तों एकाचा सुमार झाला होता. नंतर जेवणखाण आटपून संध्याकाळ-पर्यंत आह्मी विश्रांति घेतली.



३

शंकरपर्वत.

तारीख २७ मे--दुसऱ्या दिवशीं सकाळीं कायकाय पहावयाचें, याचा बेत आह्मी आदल्या रात्रीं ठरवीत असूं. त्याप्रमाणें ता. २६ रोजीं रात्रीं प्रो. अप्रकाशचंद्र मेहेता ह्मणाले “ डालसरोवराच्या दरवाज्यावर जणूं काय जयविजयांप्रमाणें हरिपर्वत व शंकरपर्वत ह्मणून दोन टेकड्या आहेत. त्यांपैकीं हरिपर्वत (सारिकादेवीच्या देवळावरून याला ‘ सारिका पर्वत ’ असेंहि म्हणतात.) ही टेकडी उत्तरेस आहे. व ती चारपाचशें फूटच उंच आहे. येथें एक लहानसा किल्ला आहे. हा किल्ला अकबर-बादशहानें इ. स. १५९० मध्यें एक कोट रुपये खर्च करून बांधला, असें तेथें असलेल्या पराशियन शिलालेखावरून कळतें; हल्लीं या किल्ल्याचा सरकारी तुरुंगासारखा उपयोग करितात. येथें एक देवीचेंहि देऊळ आहे; पण हें ठिकाण पहाण्यास परवानगी लागते, व हल्लीं तर परवानगी मिळण्यास बराच त्रास पडतो. दुसरी टेकडी शंकरपर्वत ही हजारअकराशें फूट उंच असून तिच्यावर एक शंकराचें देवालय आहे. येथून श्रीनगराचा व डालसरोवराचा देखावा उत्तम दिसतो. ”

अप्रकाशचंद्रबाबूंचें हें भाषण ऐकून आह्मी हरिपर्वत पहाण्याचा विचार सोडून दिला. आणि सकाळीं शंकरपर्वत व टेकडीच्या दुसऱ्या बाजूला खालींच पण गांवापासून दोनतीन मैलांवर असलेलें ‘ पनरतन ’ नांवाचें जुनें मोडकळीला आलेलें देऊळ पहाण्याचा निश्चय करून आम्ही झोपीं गेलों. त्याप्रमाणें पहांटेस उठून व चहापाणी करून शंकरपर्वताकडे जावयाला आह्मी निघालों.

ज्याप्रमाणें जुन्नर येथील लेण्याद्रि नांवाच्या डोंगराला ' लेण्याद्रि ' व ' सुलेमान डोंगर ' अशीं हिंदु व मुसलमानी दोन नांवें आहेत, त्याचप्रमाणें श्रीनगराजवळच्या या पर्वतालाहि ' शंकरपर्वत ' व ' तक्तई सुलेमान ' अशीं दोन नांवें आहेत. हा प्र्वत श्रीनगरच्या ईशान्येला असून डालसरोवराच्या एका टोंकाला लागून आहे. ही टेकडी श्रीनगरच्या वर हजार फूट आहे खरी; पण ती समुद्रसपाटीपासून वासष्टशें फूट उंच, ह्मणजे नैनिताल या शीतल निवासस्थानाइतकी उंच आहे.

या टेकडीचा चढ बराच विकट आहे. कांहींकांहीं ठिकाणीं तर वाट अगदीं अरुंद असून उभ्या चढाची आहे. प्रो. अप्रकाशचंद्र (हे आमच्याबरोबर आले होते.) यांनीं " तीनचार महिन्यापूर्वीं हा सर्व रस्ता बर्फाच्छादित असून सर्व डोंगर शुभ्र दिसत असे, " असें सांगितलें. त्यावरून या ठिकाणच्या ऋतुपरिवर्तनाचें आह्मांला आश्चर्य वाटलें. चढाव विकट असल्यामुळें आह्मांला चढतांना मधूनमधून विश्रांति घ्यावी लागे, आणि प्रत्येक वेळीं श्रीनगर व डालसरोवर यांचा मनोहर देखावा जास्त चांगल्या तऱ्हेनें दृष्टीला पडे. तो दृष्टिमनोहर देखावा आमच्या चढण्याच्या श्रमाचा आह्मांला विसर पाडी. वरवर चढतांचढतां आह्मी त्या टेकडीच्या माथ्यावर आलों, तों खरा माथा अजून दूरच आहे, असें आमच्या दृष्टोत्पत्तीस आलें. या टेकडीच्या माथ्यावरून जरा खालीं उतरून पुनः वर चढावयाचें होतें; ह्मणजे येथें उलट्या कमानीवजा रस्ता झाला होता. तो खोलगट भाग आह्मी लवकर चाललों, व पुनः टेकडीवर चढूं लागलों. थोड्याच वेळांत आम्ही शंकराच्या देवळाजवळ आलों. श्रीनगरपर्यंत, त्याला जाण्याची वाट व त्याच्या माथ्यावरील देऊळ हा सर्व देखावा कांहींसा श्रीमंत पंतप्रातिनिधींच्या औंध गांवाजवळील यमाईच्या देवळाच्या टेकडीसारखा भासतो. अर्थात् शंकरपर्वताची टेकडी यमाईच्या टेकडीपेक्षां जास्त उंच आहे; पण दोहोंपैकीं एक प्रथम पाहिलेल्या माणसाला दुसरीची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं, एवढें त्यांत साम्य आहे हें खास.

शंकरपर्वतावरील शंकराचें देऊळ हिरवट काळसर दगडाचें बांधलेलें आहे. देवळाच्या जवळजवळ गेलें ह्मणजे घडीव दगडाच्या पायऱ्या लाग-

तात. देऊळ चागल्याच स्थितींत आहे. देऊळ कांहीं फार मोठें नाहीं; पण त्याचें काम सुबक आहे. येथली शंकराची पिंडी मात्र शंकराच्या इतर पिंड्यांसारखी अगदीं लहान नाहीं; तर ती जवळजवळ कंबरभर उंच आहे. पिंडी काळ्या दगडाची आहे.

आह्मी देवदर्शन घेतलें, व गाभाऱ्याच्या चवथऱ्यावर क्षणभर बसलों. आह्मी देवळांत शिरलों, तेव्हां तेथें कांहींसा मद्रासी वर्णाचा व मद्रासी पोषाखाचा एक बैराग्यासारखा मनुष्य बसला होता. त्यानें आमच्या पोषाखावरून आह्मी दक्षिणी आहोंत असें ओळखलें असावें. कारण त्यानें "आपण कोठून आलां ?" असा मराठींत आह्मांला प्रश्न केला. श्रीनगरासारख्या दूरच्या प्रदेशांत आमच्या मातृभाषेंत बोलणारा मनुष्य भेटला, याबद्दल आम्हांला जरा आश्चर्य व आनंद वाटला. आह्मी मग त्या माणसाजवळ पुष्कळ चौकशी केली. त्यावरून तो मनुष्य मूळचा मद्रासी होता असें कळलें. पण त्यानें हिंदुस्तानांतील बहुतेक सर्व तीर्थें पाहिलीं होतीं; तसेंच तो महाराष्ट्रांतहि पुष्कळ ठिकाणीं हिंडलेला होता, व म्हणूनच त्याला थोडेंफार मराठीहि येत होतें, असें दिसलें. यात्रेच्या भावनेनें कां होईना, पण हे बैरागी लोक किती तरी फिरलेले असतात, व त्यांना किती तरी भाषा येत असतात, हें पाहून आह्मांला या वर्गाबद्दल एक प्रकारचें कौतुक वाटलें.

देऊळ पाहून झाल्यावर आह्मी देवळाच्या बाहेरील तटावर आलों. येथून दिसणारा देखावा अवर्णनीय आहे, यांत शंका नाहीं. आमच्या उत्तरेस व दक्षिणेस डोंगरांच्या रांगाच रांगा दिसत होत्या, व त्यांचीं शिखरें बर्फाच्छादित असल्यामुळें तीं पांढरीं शुभ्र दिसत होतीं. या पर्वतराजींच्या मध्यें काश्मीरच्या सपाट दरीची लांबच लांब पट्टी हिरवीगार दिसत होती. आमच्या समोर श्रीनगरशहर, त्याच्या आसपासच्या बागा, शहरांतील हवेल्या व वाडे दिसत होते. मध्यें संथपणें झेलम नदी वहात होती. या नदीला श्रीनगरच्या वर विलक्षण वांकणें आहेत. हीं वांकणें ह्मणजे नागाच्या चालीसारखीं नागमोडी आहेत. अशा सात नागमोडी आह्मांला स्पष्टपणें दिसत होत्या. या विलक्षण वांकणावांकणानें जाणाऱ्या

नदीची शोभा कांहीं अद्वितीय आहे. आमच्या उजव्या हाताला लंबवर्तुलाकार डालसरोवर दिसत होतें. त्याच्या सभोंवारची झाडी व कांठच्या बागा यांनीं या सरोवराची शोभा जास्तच खुलून दिसत होती. या ठिकाणावरून सभोंवारचा नयनमनोहर देखावा आम्ही किती तरी वेळ पहात बसलों, तरी नेत्रांची तृप्ति ह्मणून झाली नाहीं! पण उशीर फार होत चालल्यामुळें आह्मांला नाइलाजानें परत फिरावें लागलें.

शंकरपर्वतावरील शंकराचें देवालय फार जुनें आहे; निदान त्याचा कांहीं भाग तरी फार पुरातन आहे, असें आह्मांला सांगण्यांत आलें. हें देवालय प्रथमतः अशोकाचा पुत्र जलौक यानें इसवी सनापूर्वी २२०व्या वर्षी बुद्धाच्या अवशेषाकरितां बांधलें होतें; पुढें सहाव्या शतकांत या देवालयाचा जीर्णोद्धार गोपादित्य नांवाच्या राजानें केला, असें ह्मणतात. या देवळांतला जुना भाग कोणता व नवा भाग कोणता हें शोधून काढणें आतां कठीण आहे. पण एकंदर काम बरेंच जुनें दिसतें, यांत शंका नाहीं. तेव्हां तें जलौकाच्या वेळचेंसुद्धां असूं शकेल. असो.

शंकरपर्वताची टेकडी उतरतांना आम्ही आल्यावाटेनें परतलों नाहीं; तर शहराच्या थोडेंसें दक्षिणेच्या अंगास उतरलों, व एका उत्तम बैलगाडीच्या सडकेला येऊन मिळालों. ही सडक चांगली खडीची केलेली असून तिच्या दोन्ही बाजूंना झाडें लावलेलीं होतीं. पैकीं बरींच झाडें चिनाराचीं होतीं. खरोखरीच या झाडांच्या पानांची कोमलता, सतेजता, सुकुमारता, झाडांची दाट सांवली व त्यांचा प्रचंडपणा विलक्षण आहे. आम्ही वाटेनें एकदोन वेळां या झाडांचा परीघ मोजला, तो पंधरावीस फुटांवर भरला. या वृक्षांना बारीकबारीक फुलें व फळें येतात. कांहीं झाडांना फळें आलीं होतीं. फुलें तर पुष्कळांनाच आलीं होतीं. या सडकेला वॉलनट (आक्रोडाचीं) झाडेंहि पुष्कळ आहेत. हें झाडहि मोठें वाढतें, व दिसण्यांत सुबक दिसतें. या सर्व सडकेच्या बाजूला व सडकेच्या पलीकडील भागांत 'वुइलो' (वाळुंजी) या नांवाचीं झाडेंहि फार आहेत. दुरून हीं झाडें कांहींशीं आपल्या इकडील बांबूंच्या झाडांसारखीं दिसतात. मात्र बांबू फार जाड वाढत नाहीं, खूब उंच होतो; पण वुइलोचीं झाडें

ब्रींच जाड वाढतात, त्यांना फांद्या असतात व तीं बांबूसारखीं फार उंच वाढत नाहींत. वाटेनें आह्मांला या झाडांच्या राईच्या राई लागल्या. तसेंच या भागाला तुतीचीं झाडेंहि ब्रींच आहेत. दुसरींहि पुष्कळ झाडें आम्हांला वाटेनें लागलीं. पण त्यांची माहिती प्रो. अप्रकाशचंद्रबाबूंनाहि नव्हती. तेव्हां आम्हांला ते काय माहिती देणार ? पण इकडील सर्वच झाडें आपणांला अपरिचित असतात, हें मात्र खरें. असो.

आम्हांला ' पनरतन ' नांवाच्या देवळाला जावयाचें होतें. आम्ही सारखे पुढें चाललों होतों. आमच्या उजव्या हाताला झेलमनदी वहात होती. ती केव्हां आमच्या जवळ येई तर केव्हां दूर जाई. डाव्या बाजूला शंकरपर्वताच्या टेकडीची मागली बाजू लागलेली होती. पुढें जातांजातां आम्ही एका खेडेगांवाजवळ आलों. या ठिकाणीं नदी व पर्वत हीं अगदीं एकमेकांजवळ आलीं होतीं, व या दोहोंच्या सांधींत तें गांव वसलेलें दिसत होतें. आम्ही तें देऊळ टाकून पुढें आलों असूं, अशी आम्हांला शंका आली, ह्मणून आम्ही एका वाटसरूला विचारलें. " तुम्ही फार पुढें आलां. " असें त्यानें आम्हांला सांगितलें. तेव्हां आम्ही परत फिरलों व त्यानें सांगितलेल्या रस्त्यानें चाललों. हा रस्ता म्हणजे पाऊलवाट असून ती वुइलोझाडांच्या राईतून जात होती.

थोड्याच वेळांत आम्ही आमच्या इष्ट स्थलीं आलों, असें आम्हांला वाटलें. कारण, एक पडकें लहानसें देऊळ आम्हांला दिसूं लागलें. तें पाहून इतका त्रास करून कशाला येथें आलों असें आम्हांला प्रथम वाटलें. हें देऊळ फारच लहान आहे. याच्या चौथऱ्याची एक बाजू अवघी अठरा फूट आहे. देवळासभोंवतीं पूर्वीं तलाव असावा; पण आतां तो बहुतेक ओहरला आहे. देवळांत अजूनहि थोडें पाणी आहे. हें देऊळहि हिरवट निळसर रंगाच्या दगडाचें आहे. देवळाच्या चारहि बाजूंना कमानींचे दरवाजे असून कमानी चौकोनी दगडांच्या केलेल्या आहेत. देवळावर लहानसा घुमट आहे. घुमटाचें छत सर्व दगडाचेंच आहे. या देवळावर जिकडे तिकडे घडीव मूर्ति असून त्या उत्तम मूर्तिकलेची साक्ष पटवतात. देऊळ आंतून पाहिल्यावर तेथें गेल्याबद्दल आह्मांला वाईट वाटलें

नाहीं. उलट हें देऊळ पाहिलें नसतें तर काश्मीरांतील जुन्या देवळांची तितकी चांगली कल्पना आह्मांला आली नसती असेंच आम्हांला वाटलें. हें देऊळ बरेंच पडकें दिसतें. आसपास तलाव ओहोरल्यामुळें येथें घाणहि बरीच सांचली आहे.

या देवळाचें मूळ नांव ' पुराण आदिस्थान ' असें असून ' पनरतन ' हा त्याचाच अपभ्रंश आहे, असें आह्मांला सांगण्यांत आलें. जुनें श्रीनगर-शहर याच बाजूला होतें. पण तें शहर जळलें व तलावामुळेंच हें देऊळ शाबूत राहिलें, असें सांगतात. हें देऊळ ' पार्थ ' या नांवाच्या काश्मीरच्या राजाच्या कारकीर्दींत त्याचा प्रधान मेरु यानें सन ९१३ ते ९२१ च्या दरम्यान बांधलें असावें, असें म्हणतात.

हें देऊळ पाहून होतें, तों बारांचा सुमार झाला; म्हणून आम्ही बिऱ्हाडीं परत आलों, व जेवणखाण करून तीन वाजेपर्यंत विश्रांति घेतली. नंतर प्रो. अप्रकाशचंद्र मेहेता आपलें कॉलेजांतील काम संपवून परत आल्यावर ते व आह्मी ' चष्मशाही ' नांवाची बाग व प्रख्यात झरा पहाण्याकरितां बिऱ्हाडांतून बाहेर पडलों.

आमच्या बिऱ्हाडापासून कालवा पांच मिनिटांच्याच रस्त्यावर होता. तेथें जाऊन, चष्मशाई या बागेपर्यंत डालसरोवरांतून जाऊन परत यावयाच्या करारानें एक शिकारा आह्मी ठरविला, व त्यांत आसनस्थ झालों. बसावयाला गाद्या होत्या. ऊन लागूं नये म्हणून वर लहानसें छप्पर व बाजूनें पडदे सोडण्याची व्यवस्था केलेली होती. कांहीं वेळ कालव्यांतून गेल्यावर आह्मी डालसरोवराच्या दरवाज्यापाशीं आलों. येथें पाण्याला ओढ फार असते. होड्या जातांयेतांना उलट्यापालट्या होऊं नयेत, विशेषतः प्रवाहाच्या उलट वल्हवतांना मदत व्हावी म्हणून दरवाज्याच्या दोन्ही बाजूंना साखळदंड सोडले आहेत. या सांखळदंडाला धरून होडी डालसरोवरांत आली. डालसरोवराचें पाणी फार निर्मळ असून तें नीळसर रंगाचें आहे. झेलमचें व तिच्या कालव्याचें पाणी गढूळ असून धूसर रंगाचें आहे. यामुळें येथल्या या दोन पाण्यांचा भेद प्रयाग येथील गंगायमुना या नद्यांच्या पाण्याच्या भेदासारखा भासतो. तलावाचें पाणी अगदीं शांत आहे. तलाव

आठदहा फूटच खोल आहे; पण पाण्याच्या स्वच्छतेमुळें खालचा तळ स्पष्टपणें दिसतो. या तलावांत जिकडेतिकडे पाणवेली, पाणझाडें, कमळें, लव्हाळे, शिंगाडे, शेवाळ वगैरे उगवलेलीं आहेत. आह्मी शिकाऱ्यांतून जात असतां ' गग्रीबल ' या नांवाच्या सरोवराच्या टोंकावरून गेलों. येथला देखावा अद्वितीय आहे. येथें कांठाला प्रचंड खडक आहेत. व मधूनमधून एकाददुसरें झाड आहे. खडकाला काळा, तांबूस, हिरवट असे निरनिराळे रंग आहेत व खडक एकावर एक असे विलक्षण तऱ्हेनें चिकटलेले आहेत. येथून सरोवराचा देखावा चांगलाच दिसतो.

या सरोवरांत लहानलहान बेटें आहेत. एका बेटावर काश्मीरच्या महाराजांच्या गुरूकरितां एक स्वतंत्र बंगला बांधला आहे. त्याच्या कांठानें आमचा शिकारा चालला होता. या तलावाच्या बाजूबाजूंना तरत्या बागा केलेल्या आहेत. अशा बागा तर आह्मी आजन्मांत पाहिल्या नव्हत्या ! तलावाच्या उथळ भागावर लव्हाळे, लांब पसरणाऱ्या वेली वगैरेंच्या जुड्या आंथरतात; त्यांवर गवत पसरतात, व मग त्यावर माती पसरून त्यांत कलिंगडें, काकड्या यांच्या वेली व लहानलहान फुलझाडें लावतात. सरोवराचें पाणी अत्यंत संथ असल्यामुळें अशा बागा येथें होऊं शकतात. यांपासून चांगलें उत्पन्नहि होतें, असें समजलें.

आधींच त्या सरोवराचें शांत, स्फटिकवत् नीळसर पाणी; त्यांत तीं वेलींचीं सतेज पानें व फुलें; सभोंवार हिमालयपर्वताच्या रांगांचा तो तट व त्याची सरोवरांत पडणारी पडच्छाया; सरोवराच्या किनाऱ्यावरील तीं चिनार, सफेता, तुती वगैरे झाडें, हा सर्व देखावा केवळ अननुभूतपूर्व वाटतो, यांत शंका नाहीं.

सुमारें तासासवातासानें आम्ही डालसरोवराच्या किनाऱ्यावर उतरलों, व तेथून चष्मशाई या बागेंत गेलों. शालीमार किंवा निषातबाग इतकी ही बाग मोठी नाहीं. बागेंत गेल्यावर उजव्या हाताला एक अगदीं अर्वाचीन तऱ्हेचा बंगला लागला. पण तो कशाकरितां बांधला आहे, हें आम्हांला तेव्हां कळलें नाहीं. तो बंगला टाकून आम्ही आंत गेलों. या बागेला तीनच मजगी असून शालीमारप्रमाणें कालवे, धबधबे व कारंजींहि आहेत;

पण तीं फारशा मोठ्या प्रमाणांत नाहींत. शालीमारइतकी ही बाग चांगल्या स्थितींत ठेवलेली नाहीं; यामुळें ‘ मृच्छकटिकांत ’ वर्णिलेल्याप्रमाणें ती ‘ जीर्णशुष्कवाटिका ’ भासते. या बागेंत दोनचार तंबू दृष्टीला पडले. यावरून येथें वाटसरू येऊन उतरत असावे, असें आह्मांला वाटलें. पण बागेची प्रसिद्धि शालीमार किंवा निशातबाग याप्रमाणें पुष्पवाटिका किंवा कृत्रिम कारंजीं यांकरितां नसून तेथील स्वाभाविक झऱ्याकरितांच आहे. ‘ चष्मशाई ’ याचा शब्दार्थच मुळीं ‘ बादशाही झरा ’ असा आहे.

शेवटीं, एकदांचे आम्ही त्या झऱ्याजवळ येऊन पोहोंचलों. या झऱ्याच्या तीनहि बाजूंना दुमजली लांकडी इमारत असून खालच्या मजल्यांत तीन बाजूंना बसण्यास ओटे केलेले आहेत. झऱ्याचें पाणी चांगलें मांडीभर उंच उडत होतें. सरासरी चार इंची तोटींतून जोरानें पाणी आलें असतां जितकें येईल, तितका हा झरा होता, असें वाटलें. या झऱ्याला चांगलें दगडी कुंड बांधलें असून झऱ्याच्या तोंडावर ठेवण्याकरितां एक जस्ताचें नळकांडें ठेवलेलें आहे. यामुळें त्या नळकांड्यांतून पाणी येऊन तें वर्तुलाकार खालीं कुंडांत पडे. या झऱ्याचें पाणी इतकें निर्मळ व शुभ्र आहे कीं, वर्तुलाकार पडणारें तें पाणी दुरून कांचेच्या हंडीसारखें हुबेहुब दिसतें. पाणी हातांत घेतल्याबरोबर बर्फासारखें गार वाटलें. इतक्या शुभ्र, गार व निर्मळ पाण्याचा असा झरा दुर्मिळच आहे, यांत शंका नाहीं. तेव्हां ‘ झऱ्याचा राजा ’ हें नांव त्याला अन्वर्थक आहे, असें माझ्या मनांत आलें. पेशावरास अशा निर्मळ पाण्याची एक विहीर आह्मी पाहिली होती खरी; पण त्या विहिरीचें पाणी इतक्या जोरानें वर उडत नसे. झऱ्याचा देखावा अदृष्टपूर्वच खरा, असें आम्हांला वाटलें. कारण, अशी परिस्थिति दुसऱ्या ठिकाणीं नाहीं. ज्या ठिकाणीं हा झरा आहे, त्याला लागून गर्द छायेनें आच्छादित असा एक डोंगर आहे, व त्याच्या पलीकड बर्फाच्छादित डोंगरच सारखे लागत गेले आहेत. तेथलें बर्फ वितळतें, त्यामुळेंच या झऱ्याला पाण्याचा पुरवठा होतो. अर्थात् या झऱ्याचें पाणी बर्फासारखें निर्मळ व गार असतें यांत नवल नाहीं. या सुंदर झऱ्याचें पाणी पिण्याची आम्हांला इच्छा झाली; पण आमच्या-

जवळ भांडें नव्हतें. तेव्हां आम्ही ओंजळीनेंच पाणी पिऊं लागलों; इतक्यांत तेथें एक गृहस्थ बसले होते, त्यांनीं एक पाणी पिण्याचा ग्लास आम्हांला दिला, व आमची विचारपूसहि केली. आह्मी त्या भांड्यानें तें पाणी प्यालों. त्याच्या स्वच्छतेप्रमाणें व गारपणाप्रमाणें तें पाणी प्यावयाला फार गोडहि होतें. यामुळें हें खरोखरी अमृतच आहे कीं काय, असा आह्मांला भास झाला. पाणी प्याल्यावर आह्मी त्या गृहस्थाशीं आमच्या मोडक्यातोडक्या हिंदींत बोलूं लागलों; पण त्यांना इंग्रजी येत आहे, असें आह्मांला कळलें. अर्थात् आमची भाषेची अडचण दूर झाली. ते गृहस्थ कानपूरचे रहाणारे होते. त्यांनीं सांगितलें "मला नित्याजीर्णाचा विकार झाला होता, व त्यावर पुष्कळ उपाय केले; पण कांहीं एक गुण आला नाहीं. शेवटीं एका स्नेह्याच्या सांगण्यावरून मी श्रीनगरांत येऊन या चष्मशाईबागेंत राहिलों. येथल्या हवेनें व विशेषतः या झऱ्याच्या पाण्यानें माझा रोग पार नाहींसा झाला, व तेव्हांपासून मी दरवर्षीं या ठिकाणीं येऊन एक पंधरवडा तरी बागेंत घालविल्याशिवाय रहात नाहीं. एक अमेरिकन प्रवासी येथें आला होता, त्यानें मला सांगितलें, कीं, सर्व जगांत असें पाचक पाणी आपण पाहिलें नाहीं !"

त्या गृहस्थांच्या या सांगण्यांत थोडाफार अतिशयोक्तीचा भाग असेल, असें आह्मांला वाटलें. तरी पण त्या झऱ्याचें पाणी ह्मणजे एक विलक्षण चीज आहे, यांत शंका नाहीं. या झऱ्याच्या पाण्याची ही महती ऐकून मला पुरंदर किल्ल्यांतील एका विहिरीच्या पाण्याच्या हितावहपणाबद्दल अशीच एक गोष्ट ऐकल्याची आठवण झाली.

या झऱ्याशीं आम्ही किती वेळ तरी बसलों होतों. आतां परत फिरणार, इतक्यांत ते गृहस्थ म्हणाले "काश्मिरच्या महाराजांचे गुरु याच बागेंत त्यांच्याकरितां स्वतंत्र बांधलेल्या बंगल्यांत रहातात. कधींकधीं ते डालसरोवरांतील बेटावरील बंगल्यांतहि रहातात. पण आज ते चष्मशाईच्याच बंगल्यांत आहेत. त्यांची व आपली मी भेट करवितों."

त्या गृहस्थांच्या या सौजन्याबद्दल व मदतीबद्दल आम्ही त्यांचे आभार मानले, व त्यांच्या मागोमाग चाललों. थोड्याच अवकाशांत आम्ही त्या

नव्या बंगल्याशीं आलों. प्रथमत: बागेंत शिरतांना हाच बंगला आमच्या दृष्टीला पडला होता. त्याचा आतां उलगडा झाला.

आम्ही बंगल्यांत शिरलों; तों तो मुंबईच्या एकाद्या श्रीमंत भाट्याच्या बंगल्याप्रमाणें उत्तम तऱ्हेनें शृंगारलेला दिसला. आंत जिकडेतिकडे गालिचे, हंड्या, झुंबरें होतीं. शेवटीं, आम्ही एका उत्तम शृंगारलेल्या दिवाणखान्यांत आलों, तोंच एक तेज:पुंज, गोरीगोरीपान भव्य मूर्ति आमच्या दृष्टीला पडली. हेच ते गुरु असावे, असा आम्ही तर्क केला. आमच्याबरोबर आलेल्या गृहस्थांनीं आमची त्यांच्याशीं ओळख करून दिली. गुरुमहाराज एका चांगल्या गालिचावर विराजमान झाले होते. त्यांनीं इंग्रजी तऱ्हेनें कातरलेले केंस ठेवले होते; अंगांत तालीमबाजी सदरा होता; व नेसावयाला रेशीमकांठी धोतर होतें. गुरुमहाराज अर्थातच हुक्का पीत असत. त्यांचा हुक्काहि राजगुरूच्या दर्जाला साजेसा रुप्याच्या मुठीचा होता. मधूनमधून ते हुक्का ओढीत असत. त्यांना हिंदी चांगलें येत होतें; पण आह्मांला मात्र मोडकेंतोडकें येत होतें; यामुळें आमचें संभाषण बेताबातानेंच चाललें होतें; तरी पण हे गुरुमहाराज काश्मीरच्या महाराजांबरोबर बहुतेक सर्व हिंदुस्तान पाहून आलेले असून पुण्यामुंबईलाहि ते पुष्कळ दिवस राहिलेले आहेत, असें आह्मांला समजलें. आम्ही पुण्याकडचे आहोंत, असें जाणून त्यांनीं आमचें आदरातिथ्य चांगलें केलें. गुरुमहाराजांकडे नेहमीं फळांचीं पार्सलें येत असावीं, असें दिसलें. त्यांपैकीं 'चेरी' नांवाच्या फळांनीं भरलेली टोपली त्यांनीं आह्मांपुढें केली, व आम्हांला तीं खाण्याचा फार आग्रह केला. अर्थात् आम्हांलाहि त्यांच्या म्हणण्याला रुकार देणें भाग पडलें. इतक्यांत काश्मीरांतील एक बडे गृहस्थ आल्याची वर्दी आली. त्या गृहस्थांनीं आंत येऊन स्वामिमहाराजांच्या पायांवर डोकें ठेविलें. स्वामिमहाराज व ते गृहस्थ यांचें थोडा वेळ भाषण झालें. ही संधि आपणांला जावयाला बरी आहे, असें पाहून आम्ही जाऊं लागलों. पण स्वामिमहाराजांनीं आम्हांला थांबण्याचा आग्रह केला. अर्थात् आम्हांलाहि रहाणें भागच पडलें.

ते गृहस्थ गेल्यावर गुरुमहाराज आमच्याजवळ आणखी कांहीं विष-

यांवर बोलले; त्यांत त्यांनीं आम्हांला दोनतीन मजेच्या गोष्टी सांगितल्या. एकंदरींत गुरुमहाराज बरेच धोरणी, बहुश्रुत व व्यवहारदक्ष दिसले. त्यांची संभाषणशैली चांगली वाखाणण्यासारखी होती. यावरून काश्मीरच्या महाराजसाहेबांवर या गुरूंची छाप कां व कशी बसली असेल याची आम्हांला चांगली कल्पना आली. या गुरुमहाराजांजवळ आमचे दोन-अडीच तास गेले. अगदीं सायंकाळ होऊन गेल्यामुळें आम्हांला तांतडीनें परत जावें लागलें, म्हणून या चष्मशाईबागेजवळच असलेली ‘ परीमहाल ’ नांवाची जुनी इमारत पहाणें आह्मांला शक्य झालें नाहीं. ही इमारत चष्मशाईपासून चांगली दिसत होती. ती एका उंच पर्वताच्या बाजूवर असून तिच्या कमानीकमानींची रांगचीरांग स्पष्ट दिसत होती. ही इमारत शहाजहानचा मुलगा दाराशुक यानें आपला गुरु मुल्लाशहा याचे-साठीं ज्योतिषाचे वेध घेण्याकारितां बांधली होती असें म्हणतात. ही इमारत पहावयाला सांपडली नाहीं, म्हणून मला जरा वाईट वाटलें; पण या बाबतींत आमचा नाइलाज होता, म्हणून आम्हाला तसेंच परतावें लागलें.

परत येतांना आम्ही डालसरोवरांत जरा चक्कर मारून आलों, व त्या सरोवरांतील ‘ रूपलंका ’ नांवाचें बेट पाहिलें. हल्लीं येथें दोनचार चिनाराचीं झाडें आहेत; पण पूर्वीं येथें चांगला वाडा होता, असें ह्मणतात. या बेटावर जाऊन आम्ही क्षणभर सभोंवारची शोभा पहात होतों. आतां सायंकाळ होत चालल्यामुळें डालसरोवराची निराळीच शोभा दिसूं लागली होती. थोड्या वेळानें आम्ही पुनः शिकाऱ्यांत बसलों, व परत डालसरोवरांतून कालव्यानें परतलों. धक्क्यावर आल्यावर शिकारावाल्याला जास्त वेळ खोटी झाल्याबद्दल थोडे जास्त पैसे दिले, व आम्ही मोठ्या आनंदित मनानें बिऱ्हाडीं आलों. डालसरोवराचा देखावा व चष्मशाईची अपूर्वता हीं सारखीं आमच्या डोळ्यांपुढें उभीं रहात होतीं.

ता. २८ मे—आज सकाळीं आम्ही विश्रांतिच घेतली ह्मणाना ! कारण, आम्ही बिजलबाबूंच्या बिऱ्हाडाहून प्रो. अप्रकाशचंद्र मेहेता यांज-कडे आल्यापासून त्यांना भेटलों नव्हतों; म्हणून सकाळीं आम्ही त्यांच्या-

कडे गेलों, व पुढील कार्यक्रम ठरविला. आमच्या बिऱ्हाडाशेजारींच शाळांचे इन्स्पेक्टर रहात असत. त्यांचा व काश्मीरांत एका वेळीं असलेल्या माझ्या नातेवाईकाचा फार स्नेह झाला होता, ह्मणून त्यांच्याकडेही आम्ही भेटण्यास गेलों. त्यांनीं पुढील दोन दिवसांत आह्माला कायकाय पहातां येईल, याची बरोबर माहिती दिली, व त्यांच्या बेताप्रमाणें दुसऱ्या दिवशींच श्रीनगरापासून दूरचीं प्रेक्षणीय स्थळें पहावयास निघण्याचा आम्ही निश्चय केला. याप्रमाणें सकाळची वेळ इकडे तिकडेच निघून गेली. तेव्हां जेवण झाल्यावर आम्ही श्रीनगरचा अजबखाना पहावयास गेलों.

हा अजबखाना ‘ लालमंडी ’ नांवाच्या हल्लींच्या पूर्वींच्या महाराजांनीं बांधलेल्या अतिथिगृहामध्यें आहे. ही इमारत लांकडीच असून तिला मारवाडी तऱ्हेचा तांबडा, हिरवा, निळा असा दाट रंग दिलेला आहे. यामुळें इमारत फारशी मनांत भरत नाहीं; पण त्याचा वचपा लालमंडीच्या पुढील बागेनें मात्र भरून काढला आहे, यांत शंका नाहीं. या बागेंत गुलाबचगुलाब आहेत! कमानदार सांखळदंडाच्या व लोखंडी खांबांच्या कुंपणावर गुलाबांच्या वेली लावलेल्या आहेत. या वेली फुलांनीं फुललेल्या होत्या. त्यांत शिरतांना एक कमान केली आहे, त्यावरही गुलाबवेली सोडल्या आहेत. पायवाटेच्या दुतर्फा गुलाबांचें कुंपण आहे, व शिवाय कुंड्यांतहि निरनिराळ्या रंगांच्या फुलांचे गुलाब आहेत. यामुळें या इमारतीची पुढील बाजू फारच चित्ताकर्षक झाली आहे. नेहमींच्या जिनसांनीं अजबखाना भरलेला आहे. तेथें जुनीं नाणीं आहेत; जुनीं हत्यारें आहेत; जुन्या मूर्ति आहेत; शिल्पकलेचे मासले आहेत; काश्मीरच्या विशेष कारागिरीचे नमुने आहेत; त्यांतल्यात्यांत काश्मीरच्या शालींचा मोठा संग्रह आहे. येथें आम्ही दोनशें रुपयांपासून हजार बाराशें रुपयांपर्यंतच्या शाली पाहिल्या. शालींतील नक्षीचें काम वाखाणण्यासारखें आहे. एका शालीमध्यें श्रीनगरशहराचा सबंध नकाशाचा नकाशा नक्षीनें काढलेला आम्ही पाहिला. ती शाल पाहून आह्माला या कारागिरीचें आश्चर्य वाटलें. पण या कलेला हल्लीं पूर्वींसारखा आश्रय नसल्यामुळें ती बुडण्याच्या पंथाला लागत चालली आहे, हें ऐकून वाईटही वाटलें.

अजबखाना पाहून झाल्यावर आम्ही श्रीनगर येथील प्रताप कॉलेज पहावयाला गेलों. तेथें प्रो. अप्रकाशचंद्र बाबूंनीं इतर प्रोफेसर व प्रिंसिपॉल यांच्याशीं आमची ओळख करून दिली. प्रोफेसरमंडळींत प्रांतोप्रांतींचे लोक होते. हें पाहून हल्लीं उद्योगाकरितां सुशिक्षित मंडळी किती दूरदूर जातात, हें आमच्या लक्ष्यांत आलें. हें कॉलेज प्रथमतः आनी बिझांटबाईच्या थिऑसाफिकल सोसायटीनें काढलें, व तें त्यांनीं आठदहा वर्षें चालविलें. पुढें जेव्हां काश्मीरसंस्थानांत संस्थानचें कॉलेज काढण्याचें ठरलें, तेव्हां थिऑसाफिकल सोसायटीनें सामानसुमान, जागा, इमारती, पुस्तकें व उपकरणें यांसुद्धां सर्व कॉलेज संस्थानच्या हवालीं केलें. कॉलेज फारसें मोठें नाहीं. कारण या संस्थानांत अजून शिक्षणाचा फारसा प्रसार झाला नाहीं. तरी पण इमारती बऱ्यापैकीं आहेत, व सभोंवार पुष्कळ मोकळी जागाही आहे.

प्रो. अप्रकाशचंद्र बाबूंचें कॉलेजांतलें काम संपल्यामुळें तेही आमच्या बरोबरच बिऱ्हाडीं आले. मग आम्ही शिकाऱ्यांत बसून झेलमनदींतून फेरफटका केला व 'पेपरमॅची' नांवाच्या एकदोन कारखान्यांत गेलों. श्रीनगरांत हा एक मोठा धंदा आहे. लांकडी सामानावर निरनिराळ्या नक्षीचे कागद चिकटवून हें सामान केलें जातें. आम्ही एका मोठ्या दुकानीं गेलों, व तेथें सर्व तऱ्हेचें सामान पाहिलें. खुर्च्या, टेबलें, मेजें, कपाटें, शेल्फें, पेट्या, आलमायरें, खुंट्या, कलमदानें, कागद ठेवण्याच्या पेपररॅक्स अशा व्यवहारांत लागणाऱ्या किती तरी वस्तूंचे मासले आम्ही पाहिले. त्याचप्रमाणें मुलांचीं निरनिराळीं खेळणींही आम्ही तेथें पाहिलीं. येथें पेपरमॅचीचें काम फार सुबक करण्यांत येतें यांत शंका नाहीं. लांकडावरच नक्षी काढली आहे असा भास होतो, इतकें कागद चिकटवण्याचें काम बेमालूम केलेलें असतें. असो.

याप्रमाणें एकदोन दुकानें पाहून आम्ही नदीच्या मार्गानेंच परत आलों. श्रीनगरांतील घरें नदीकडे तोंड करून बांधलेलीं आहेत. यामुळें नदीमधून नावेंतून जातांना विविध प्रकारची शोभा दिसते. काशीस किंवा

मथुरेस होडीमधून गेलें म्हणजे जसा देखावा दिसतो, त्याच तऱ्हेचा येथेंही दिसतो.

आज सायंकाळीं आम्ही रेसिडेन्सीच्या पलीकडे लांबपर्यंत सहल करीत गेलों. श्रीनगरांत झेलमनदीचें पाणी येऊं नये म्हणून नदीच्या दोन्ही बाजूंना उंचउंच बंधारे घातले आहेत, व या बंधाऱ्यांवरून सुंदर रस्ता केला आहे. याच रस्त्यानें आम्ही तीन साडेतीन मैल म्हणजे शहराच्या वस्तीच्या पलीकडे सहल करीत गेलों. शहराच्या वर नदीचें फाजील पाणी दूर नेण्याकरितां नदीला कालवा काढला आहे. त्या कालव्याच्या दरवाज्यापर्यंत आम्ही चालत गेलों. यामुळें शहराची व नदीची अशी दुहेरी शोभा आह्माला पहावयाला सांपडली. नदींत जागोजाग नौकागृहें लागत असत; या नौका निरनिराळ्या आकाराच्या व सर्व सुखसोयींनीं युक्त असतात. या हजारों नौका पाहिल्या म्हणजे असें वाटतें कीं, श्रीनगर-शहराचे दोन भाग असून एक जमिनीवर स्थिर आहे, तर दुसरा पाण्यावर तरंगत आहे. या वाटेनें चालतांना आह्माला युरोपियन क्लब, त्यांचीं मोठमोठीं दुकानें, त्यांच्या खेळावयाच्या जागा वगैरे सर्व पहावयाला सांपडलें. रात्र झाल्यावर आम्ही बिऱ्हाडीं परतलों.

४

वितस्तेच्या उगमाशीं.

तारीख २९ मे—ज्या झेलमनदीचें (वेदांतील वितस्तेचें) प्रथम दर्शन झेलम स्टेशनवर होतें, काश्मीरला जातांना मरी हें शीतल निवासस्थान सोडल्यावर थोड्याच वेळानें जी नदी अगदीं पाताळांत गेल्यासारखी उजवीकडे दिसूं लागते, कोहाला या गांवीं जिच्या पुलावरून पलीकडे रस्ता जातो, व जी मग रस्त्याच्या डाव्या बाजूला रहाते, जी नदी सुमारें सवाशें मैलपर्यंत आपल्या डाव्याउजव्या हातांला पण नजीक असल्यामुळें आपणाला सतत दर्शन देत असते, जी कधीं शांत व गंभीर तर कधीं खळखळणारी व भीषणस्वरूप, कधीं रुंद पात्रांतून जाणारी तर कधीं अगदीं डोंगराच्या फटींतून वहाणारी, कधीं संथ तर कधीं वेगवती अशा बहुरूप वितस्तेच्या थेट उगमाशीं आज आपण जाणार म्हणून माझें मन फार उल्लसित झालें होतें.

नेहमींप्रमाणें आम्ही टांग्यांतून पहांटेला साडेपांच वाजतां निघालों. आमचा रस्ता साधारण दक्षिणेकडे जात होता. पहिले तीनचार मैल आमच्या ओळखीचेच होते.. पुढें आम्हांला पॅम्पपुर (पद्मपुर) गांव लागलें. येथें केशराच्या बागा पुष्कळ आहेत, असें समजलें. आमचा रस्ता अगदीं सपाटीवरून चालला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना निरनिराळीं सुंदर झाडें लावलेलीं होतीं. कोठें चिनार तर कोठें पॉपलर, कोठें तुती तर कोठें वुइलो अशीं नाना तऱ्हेचीं झाडें दुतर्फा लागतात. त्यांच्या पलीकडे हिरवींगार शेतें लागतात. उजवीकडे नदी सारखी सोबतीला असतेच. पलीकडे डोंगरांच्या रांगाचरांगा दिसतात. या सर्व नयनमनोहर

देखाव्यानें वाटेचा कंटाळा बिलकूल येत नाहीं. शिवाय, रस्ता चांगला व सपाट असल्यामुळें टांगाहि वेगानें जातो.

सुमारें अडीच तास चालल्यावर आम्ही अवंतिपुर या गांवीं आलों. हें गांव म्हणजे अगदीं लहानसें खेडें आहे. पण पूर्वकालीं हें एक राजधानीचें शहर होतें. हें शहर अवंतिवर्मा नांवाच्या काश्मीरच्या राजानें सन ८५२ ते ८८३ पर्यंतच्या आपल्या कारकीर्दींत वसाविलें; परंतु दोन जुन्या देवळांखेरीज या मोठ्या शहरापैकीं हल्लीं कांहींच शिल्लक नाहीं. मात्र जिकडेतिकडे जुन्या इमारतींच्या खुणा दृग्गोचर होतात. हीं दोन देवळेंहि मातींत पुरून गेलेलीं होतीं. पण पुढें तीं उकरण्यांत आलीं. आणि सर्व इमारतींचे भाग मोकळे करण्याचें काम आम्ही अवंतीपुराला गेलों तेव्हांसुद्धां चालूच होतें. या दोन देवळांची बांधणी एक प्रकारचीच आहे. मात्र एक देऊळ दुसऱ्यापेक्षां फार मोठें आहे. मुख्य देव्हारा किंवा गाभारा मधोमध असून सभोंवार सारखी चौकोनी इमारत बांधलेली आहे. यामुळें हीं दोन्ही देवळें फार प्रेक्षणीय दिसतात. दगड हिरवट काळसर आहे. मुख्य दरवाजावर फार नक्षीचें काम केलेलें आहे, व सभोंवार ओऱ्यांसारखें बांधकाम आहे, तेंहि सुबक आहे. पण हीं दोन्ही देवळें फार पडीत स्थितींत आहेत. हवेमुळें दगड फार खराब झाले आहेत; परंतु ज्या वेळीं हीं देवळें नवी कोरीं असतील, त्या वेळची त्यांची शोभा कांहीं विलक्षणच असली पाहिजे, असें वाटल्यावांचून रहात नाहीं. लहान देऊळ आधीं बांधलेलें आहे. व मोठें देऊळ मागाहून बांधलेलें आहे. दोन्ही देवळें महादेवाचींच आहेत. एकाचें नांव ' अवंतीश्वर ' व दुसऱ्याचें नांव ' अवंतीस्वामी ' असें आहे. या देवळांवरून काश्मीरांत मूर्तिकला व वास्तुकला यांची एका काळीं किती प्रगति झाली होती, याची अटकळ उत्तम बांधतां येते.

हीं दोन्ही देवळें पाहून झाल्यावर आम्ही पुढें मार्गस्थ झालों, ते अनंतनाग या गांवीं सुमारें ५ तासांनीं म्हणजे साडेदहांच्या सुमाराला येऊन पोहोंचलों; अर्थात् आमच्या टांग्याचा वेग खोळंबा धरून दरताशीं ७ मैल पडला. हा वेग आमच्या इकडच्या टांग्यांच्या मानानें पुष्कळच जास्त

आहे यांत शंका नाहीं. याचें कारण उत्तम सपाट रस्ता व थंड हवा हें होय. यामुळें घोडे दमत नाहींत, व त्यांना जलद चालतांहि येतें. असो.

'अनंतनाग' हें या शहराचें हिंदु नांव आहे. याचें मुसलमानी नांव 'इसलामाबाद' असें आहे. काश्मीरसंस्थानांत हें शहर श्रीनगरच्या खालोखाल आहे. येथें सुमारें वीस हजार वसती आहे, व तीपैकीं पुष्कळ मुसलमानी धर्मांचीच आहे, हें उघड आहे. श्रीनगराहून आह्मी एका शाळामास्तरांना पत्र घेतलें होतें, म्हणून आम्ही शाळेचाच शोध करीत गेलों. शाळा सकाळचीच होती. यामुळें मास्तर शाळेंतच भेटले. शाळा सुटावयाचीच वेळ झाली असल्यामुळें ते आमच्याबरोबर निघाले, व त्यांनीं आह्मांला आपल्या बिऱ्हाडीं नेलें. आमची जेवणाखाणाची व्यवस्था उत्तम झाली. आम्ही स्नानाकरितां या ठिकाणच्या मुख्य झऱ्याकडे गेलों. या ठिकाणाला तिकडील हिंदुलोक तीर्थ मानतात; यामुळें त्या ठिकाणीं आम्हांला तीर्थोपाध्याय दृष्टीला पडले, व ते आपल्या चोपड्या काढून पाहूं लागले. आम्हांला तीर्थविधि करावयाचा नव्हता. म्हणून आम्ही घुसळखान्यांत (झऱ्याजवळ आडोशाचें स्नानगृह) स्नान केलें. या झऱ्याच्या ठिकाणीं सुमारें ४० फूट औरसचौरस असें कुंड बांधलेलें आहे. तें तीनचार फूटच खोल व जमिनीपासून फूट दीड फूट उंच आहे. या झऱ्याच्या पाठीशींच मोठा डोंगर असून त्या डोंगराखालून झरा वहात आहे. या झऱ्याचें पाणी कुंडांत घेतलेलें असून कुंड सारखें एका बाजूनें वहात आहे. सुमारें चाळीस फूट लांबीच्या कुंडाच्या एका बाजूवरून पाणी वहातें. कुंडांतील पाणी डालसरोवराप्रमाणें हिरवट निळसर असून त्यांत पुष्कळ मोठमोठे निळे मासे आहेत. पाणी अगदीं निर्मळ असल्यामुळें कुंडाचा तळ व तेथले दगड, रेती स्पष्टपणें दिसतात. एवढा मोठा पाण्याचा प्रवाह धो धो वहातांना आपल्याकडे क्वचितच दृष्टीला पडतो. यामुळें हें ठिकाण आश्चर्यकारक भासतें. येथें पूर्वीं चांगली बाग होती; पण आतां तिचा कांहींएक मागमूस आम्हांला दिसला नाहीं.

येथून जवळच एक गार गंधकाचा झरा आहे तो पहावयाला आम्ही गेलों; तेथेंहि लहानसें कुंड केलेलें दिसलें. या गांवांत जिकडेतिकडे स्वच्छ

आणि गार पाण्याचे झरे आहेत. काश्मीरी भाषेंत ' नाग ' म्हणजे झरा व ' अनंतनाग ' म्हणजे ' अनंत झऱ्यांचें ठिकाण ' असा अर्थ आहे. या गांवाला हें नांव अन्वर्थक आहे. कारण, हा सर्व गांवच हिमालयाच्या एका टेकडीच्या पायथ्याशीं वसलेला आहे, व पलीकडे हिमाच्छादित डोंगर आहेत. त्या बर्फाचें वितळून पाणी होऊन डोंगरांत मुरतें, व त्याचे हजारों झरे पायथ्याशीं निघतात. अशी स्थिति असल्यामुळें अनंतनाग हें गांव जणूं काय झऱ्यांवर तरंगत आहे, असा भास होतो. गांवांत जातांना आम्हांला गटारांतून सारखें पाणी वहात असतांना दिसत होतें. बाकी हें गांवहि जुन्या श्रीनगराप्रमाणें आम्हांला गलिच्छच वाटलें, आणि घरेंहि सामान्य तऱ्हेचीं व घाणेरडींच दिसलीं. हें शहर व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. येथें गालीचे, मेजावरील नक्षीचें कापड वगैरे जिनसा चांगल्या होतात, व लीडर नदीची दरी, मार्तंडाचें देऊळ, अच्छाबलबाग वगैरे प्रेक्षणीय स्थळें पहावयाला जावयाच्या वाटा येथूनच फुटतात.

अनंतनाग येथें आम्ही चारपांच तास राहिलों. वितस्तेच्या उगमाकडे म्हणजे व्हरनाग या गांवाकडे जाण्याकरितां आम्ही सुमारें साडेतीन वाजतां टांग्यांतून निघालों. सकाळीं घोड्यांनीं पांच तासांत आह्मांला पसतीस मैल आणिलें होतें, पण आतां त्यांना पांच तासांची विश्रांति मिळाल्यामुळें ते ताजेतवाने व हुशार झाले होते. अजून आम्हांला सुमारें वीस मैल जावयाचें होतें. अनंतनाग सोडल्यापासून सपाटीचा रस्ता संपत चालला, व आम्ही उंचउंच डोंगराकडे जात आहों, असा भास होत होता. रस्ताहि एका टेकडीला वळसा घालून खोलखोल दऱ्यांकडे चालला आहे, असें वाटे. आतां रस्ताहि तितका चांगला नव्हता. आमच्या समोर प्रचंड डोंगर दिसूं लागले. त्या डोंगरांवर खूप झाडी व रान होतें. मधूनमधून बर्फ वितळण्याच्या पांढऱ्या खुणाहि दिसत असत, व डोंगरांच्या सांधींत पांढरें बर्फहि आढळून येई.

आतां काश्मीरची सपाट दरी संपून दक्षिणेकडील हिमालयाच्या हिमाच्छादित पर्वताकडे आम्ही चाललों होतों. हळूहळू आह्मी व्हरनाग गांवाकडे येऊं लागलों, असें स्पष्ट दिसूं लागलें; कारण, आम्ही डोंगराच्या

पायथ्याशीं जाऊं लागलों होतों. झेलम नदीहि आतां उथळ झाली, आणि मोठ्याशा ओढ्यासारखी दिसूं लागली. श्रीनगरपासून अनंतनागपर्यंत झेलम नदी पाण्यानें भरलेली असून त्या नदींत नावा चालतात. पुढें मात्र नदीला खांडवे पडल्यामुळें नावा नेणें शक्य नाहीं. व्हरनागच्या अलीकडे नदी ओलांडावी लागते, व मग नदी डावीकडे येते. या ठिकाणीं नदी गोट्यांनीं भरलेली असून पात्र फारच रुंद पण उथळ आहे. यामुळें नदीच्या प्रवाहाचे लहानलहान फांटे झाले आहेत.

आतां व्हरनाग अगदीं जवळ आलें असावें, असें वाटलें; कारण, जम्मूकडून श्रीनगरकडे येणारा रस्ता आम्हांला समोरच्या डोंगरांत दिसूं लागला. या घाटाला ‘ बानिहाल घाट ’ ह्मणतात, व तो व्हरनागपासूनच सुरू होतो. हा रस्ता अजून टांगे जाण्यासारखा नाहीं; पण हा चांगला करण्याची संस्थानची खटपट आहे, असें आम्हांला कळलें.

साडेसातआठांच्या सुमाराला आम्ही एकदांचे व्हरनाग गांवीं येऊन पोहोंचलों. येथील शाळा व पोस्ट यांच्या मास्तरांना आम्ही अनंतनागहून चिठी घेतली होती. म्हणून पोस्टाची चवकशी करीतकरीत आम्ही गांवांत शिरलों, व एका लहानशा झोंपडीवजा घराशीं आलों. तेंच पोस्ट ऑफीस असें समजलें. मास्तरनीं आम्हांला दुसऱ्या एका घरीं उतरण्यास नेलें. इतक्यांत एक तीर्थोपाध्याय आमच्याकडे आले. व त्यांनीं ‘ वितस्तेचा खरा उगम दाखवितों, ’ असें सांगितलें. त्यांच्या मागोमाग आम्ही बरेच लांब गेल्यावर त्यांनीं आम्हांला एका लहानशा घराच्या परसांत नेलें, व तेथें पाण्याच्या झऱ्याचें एक तोडींनीं ओबडधोबड बांधलेलें कुंड दाखविलें. आम्ही त्या उपाध्यायाच्या कृतीचा अर्थ समजलों. तें त्यांचेंच घर असावें, व अनंतनागप्रमाणें या गांवांतहि पुष्कळ झरे असल्यामुळें त्या उपाध्यायानें आपल्या परसांतील झऱ्याला ओबडधोबड कुंड बांधलें असून भोळसट प्रवाशांना ‘वितस्तेचा हा खरा उगम’ असें सांगून त्यांच्याकडून तो उपाध्याय पैसे उकळीत असावा, अशी आमची खात्री झाली; पण आम्ही त्याच्या युक्तीनें फसलों नाहीं. त्याच्या वाट दाखविण्याच्या मेहनतीबद्दल त्याच्या हातावर दोन आणे टाकून आम्ही आपल्या बिऱ्हाडीं परत फिरलों.

आजचा आमचा प्रवास आम्हांलासुद्धां आश्चर्यकारक व आनंदकारक वाटला. आम्ही सकाळीं निघून एकाच टांग्यानें व घोड्याच्या एकाच जोडीवर ५६ मैलांचा प्रवास सायंकाळपर्यंत केला. इतका प्रवास आमच्या इकडच्या घोड्यांना अशक्य आहे, असें आम्हांला वाटलें, व इकडल्या घोड्यांची ताकद व हवेचा थंडपणा पाहून आम्हांला आनंद वाटला.

तारीख ३० मे–ज्या मोठ्या झऱ्यापासून झेलम नदीचा उगम झाला आहे, तो झरा व त्याजवळची बाग पहाण्यास आम्ही सकाळींच गेलों. येथला देखावा खरोखरीच अद्वितीय आहे. आधींच व्हरनाग हें गांव 'पीरपंजाल' नांवाच्या हिमालयाच्या हिमाच्छादित पर्वतराजीच्या दुबेळक्यांत वसलेलें आहे; हे पर्वत इतर पर्वतांसारखे उघडेबोडके नसून ते झाडांझुडपांनीं आच्छादलेले आहेत. व्हरनागचा झरा अशा एका उंच व छायायुक्त टेकडीच्या पायापाशीं आहे. डोंगरांतून झरा धो धो करीत वहात आहे. या सुंदर ठिकाणीं जहांगिर बादशहानें सन १६१२ मध्यें एक अष्टकोनी पुष्करणी बांधविली, व त्याच्याच हुकुमानें सन १६१९ मध्यें, येथें बांधलेल्या पाण्याच्या पाटांनीं युक्त अशा कृत्रिम धबधब्यानें मंडित व कारंज्यांनीं सुशोभित असा एक सुंदर बाग बनविण्यांत आला. हा बाग निषात किंवा शालीमारइतका मोठा नाहीं; पण जिवंत झऱ्याची शोभा व एकंदर सृष्टिसौंदर्य हीं या बागेंत पूर्वोक्त बागेपेक्षां कितीतरी पटीनें अधिक आहेत. या बागेंतहि चिनार झाडें आहेतच. पाण्याचा प्रवाह मनाला विलक्षण आनंद देतो. अष्टकोनाकृति पुष्करणींत झरा आणून सोडलेला असून तेथून पाट काढलेला आहे. पुष्करणींत १० फुटांच्या वर पाणी असतें. पाण्याचा रंग किंचित् हिरवट दिसतो. या पुष्करणीभोंवतीं ओऱ्यांसारखी अष्टकोनाकृति कमानदार इमारत असून त्या इमारतीच्या भिंतीवर दोन पराशियन भाषेंतील शिलालेख† आहेत. या सर्व खाणाखुणांवरून

† या शिलालेखांसंबंधीं एक विस्तृत व वाचनीय निबंध डॉ. जीवनजी जमशेटजी मोदी यांनीं रॉयल एशिआटिक सोसायटीच्या मुंबईच्या शाखेच्या त्रैमासिकाच्या नुकत्याच निघालेल्या अंकांत (पुस्तक २५ वें अंक

हें ठिकाण मुसलमानी बादशहांचें विलासस्थान असावें, असें उघड दिसतें; पण येथेंसुद्धां एका ओरींत हिंदुदेवाची मूर्ति असून येथले लोक या ठिका-

---

१ ला) प्रसिद्ध केला आहे. मोंगल बादशहांनीं व मुसलमान इतिहासकारांनीं काश्मीरच्या महतीद्दबल व सृष्टिसौंदर्याबद्दल काढलेले उद्गार डॉ. मोदी यांनीं या निबंधांत एकत्र संकलित केले आहेत. त्याचप्रमाणें मोंगल बादशहांच्या काश्मीरच्या प्रवासांची तारीख–वर्षवार सविस्तर माहिती डॉक्टर मजकुरांनीं दिली आहे. अर्थात् या निबंधांत त्यांनीं व्हरनाग येथील पराशियन भाषेंतील शिलालेख मूळ जसेच्या तसे छापवून त्यांचा इंग्रजींत अर्थ दिला आहे. हे मूळचे पराशियन लेख पराशियन जाणणारे माझे नवे मित्र व सहाध्यापक रा. पटवर्धन यांना भाषांतराकरितां दिले व खालील भाषांतर त्यांनीं करून दिलें आहे, याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. त्या शिलालेखांचें शब्दशः भाषांतर असें:—

पहिल्या लेखाचें भाषांतर—

“ धर्मयोद्धा महाराज अकबर याचा पुत्र, सप्तद्वीपाधिपति, न्यायप्रसारक, राजाधिराज वीरपिता, धर्मप्रकाश, महाराज जहांगीर यांनीं (आपल्या) राज्यारोहणाच्या पंधराव्या वर्षी या विपुलतायुक्त झऱ्यावर उतरून त्याला मान दिला. हजरतांच्या हुकुमानें या मंदिरास पूर्ण स्वरूप आलें. अकबरशहच्या जहांगीरशाहमुळें या मंदिराचें शीर (शिखर) गगन (भेदून) वर चढलें. विवेक शिल्पकालास याचा काल (पुढील शब्दांत) मिळाला. व्हरनागच्या कालव्यावरील राजमहालाची समृद्धि असो.’ (सन १६१९). ”

दुसऱ्या लेखाचें भाषांतरः—

“ ईश्वरा तुझे आभार मानतों. पृथ्वीपति व कालाध्यक्ष यांच्या अनुज्ञेनें हय्दरानें हा जलनिपात व हा कालवा कसे (सुंदर) निर्माण केले आहेत. या कालव्यानें स्वर्गांतील कालव्याची कल्पना करून दिली आहे. या कालव्यामुळें काश्मीरच्या चेहेऱ्याला तेज आलें आहे. अव्यक्तांतल्या सरूष नांवाच्या देवदूतानें या कालव्याचा काल (पुढील शब्दांत) सांगितला आहे. स्वर्गांतल्या कालव्यापासूनच हा कालवा बाहेर आला आहे. (सन १६२६). ”

णाला मोठें तीर्थ मानतात व भाविक हिंदूंकडून येथें पैसे उकळण्यांत येतात. ज्या पुष्करणीमध्यें मुसलमानी स्त्रीपुरुषांचे जलविहार झाले असतील, ज्या धो धो वहाणाऱ्या झऱ्यांच्या कांठीं पाय टाकून मुसलमान युवयुवतींनीं शृंगारचेष्टा केल्या असतील, ज्या जलमंदिरांत स्त्रीपुरुषांचा नर्मपरिहास व जलक्रीडा घडल्या असतील, सारांश, ज्या सृष्टिकृत सुंदर स्थानाला मनुष्यांनीं आपल्या चैनीचें व विलासाचें ठिकाण बनविलें, त्या स्थानाला आमचे हिंदुलोक पवित्र तीर्थ समजतात, व लोकांना भूलथापा देऊन पैसे उकळतात. काय ही आमच्या धर्माची अवनति ! केवढा हा धर्मसमजुतीचा वेडगळपणा ! याप्रमाणें हें वितस्तेच्या उगमाचें ठिकाण पाहून आनंदाचे व खेदाचे परस्परविरोधी विचार मनांत उद्भवून, मुसलमानांच्या सृष्टिसौंदर्यप्रियतेबद्दल व त्यांच्या ललितकलाभक्तीबद्दल कौतुक वाटलें, तर आपल्या भोळसटपणाबद्दल वाईटहि वाटलें.

ही बाग पाहून झाल्यावर फराळ करून आम्ही ' अच्छाबल ' नांवाच्या प्रसिद्ध बागेकडे निघालों. व्हरनागपासून ती बारातेरा मैल आहे. आम्ही दोनच तासांत या ठिकाणीं आलों. येथून टांग्याला परत अनंतनाग येथें जाऊन विश्रांति घेण्यास सांगितलें, व आम्ही मार्तंडाचें प्रसिद्ध देऊळ पाहून पायवाटेनें अनंतनागाला येतों, तेथपर्यंत घोड्यांना चांगली विश्रांति मिळेल, व मग ताबडतोब श्रीनगराला जावयाला निघावयास सांपडेल, असें टांगेवाल्याला सांगून आम्ही अच्छाबल येथें आल्यावर टांग्याला लावून दिलें. येथें आम्ही सुमारें दहा वाजतां पोहोंचलों.

व्हरनागप्रमाणें येथेंहि डोंगरांच्या पायथ्यांतून फार मोठा झरा–झरा कसला लहानसा ओढाच म्हणाना–निघतो. या डोंगरावर प्रचंड देवदार आहेत. व्हरनागच्या मागच्या डोंगरांवर भुरटें रान आहे. पण येथें देवदाराचे उंच उंच वृक्ष असल्यामुळें येथली शोभा कांहीं विलक्षणच दिसते. हा झरा म्हणजे दिवलगांव येथें ' बृंगी ' नांवाच्या गुप्त झालेल्या नदीचा प्रवाह होय, असें म्हणतात. या डोंगराच्या पायथ्यापासून पुष्कळ झरे निघतात. त्यांपैकीं सर्वांत मोठा एक फूट जाडीचा असून तो कारंजासारखा

वर उडतो. एक मनुष्य सहज मावेल अशा डोंगराच्या फटींतून तो
जोरानें बाहेर येतो. हा देखावा विलक्षण दिसतो. अर्थात् या निसर्गरमणीय
ठिकाणीं हा बाग बनविलेला आहे. हा बाग शहाजहान बादशहाची मुलगी
जहानारा बेगम हिनें तयार करविला. या बागेला ' बेगमबाग ' ह्मणतात.
हा बाग ४६७ फूट लांब व ४६ फूट रुंद आहे. याच्या सभोंवार दगडी
भिंत असून या बागेच्या दोन मजगी आहेत. या बागेंत पुष्कळ फळझाडें
आहेत. येथले चिनारवृक्ष तर फारच मोठे आहेत. झऱ्याचें पाणी सर्व
बागेंत खेळविलें आहे. त्याचे तीन पाट बांधले असून मधला पाट सोळा
फूट रुंद आहे. बाजूचे दोन पाट सहासात फूट रुंदीचे आहेत. पाटांमधून
पायवाटा बांधून काढलेल्या आहेत. या पायवाटांनीं जातांना या त्रिधारी
पाटांची फार मौज दिसते. मधल्या पाटाच्या दरम्यान तलावासारख्या
दोन पुष्करणी बांधलेल्या आहेत. त्यांतली एक मोठी असून तिच्यामध्यें
दगडी कामावर एक लांकडाचा मंडप बांधलेला आहे. पाटाच्या पाण्याचे
तीन धबधबे केलेले असून त्यांचें पाणी बारा फूट उंचीवरून खालीं पडतें.
त्यांचें तें शुभ्र स्फटिकवत् पाणी व पाण्याची बारा फूट खालीं पडणारी
धार फार आल्हादकारक वाटते. निशात व शालीमार बागेप्रमाणें या
बागेंतहि मधूनमधून कारंजीं केलीं आहेत; पण तीं वरील बागेप्रमाणें वि-
स्तृत प्रमाणावर नाहींत. येथेंहि ट्राऊक माशाची उपज करण्याची युक्तीच
व्यवस्था करण्यांत आली आहे.

श्रीनगरच्या इतर बागांप्रमाणेंच ही बाग म्हणजे काश्मीरचा एक
अलंकार आहे, हा गोष्ट निर्विवाद आहे. आतां आमच्या मागें टांग्याचा
लकडा नव्हता म्हणून आम्ही या बागेंत चांगले दोनतीन तास घालविले,
व बागेंतील प्रेक्षणीय भाग दोनदोन तीनतीन वेळ पाहिले. बारांचा
सुमार झाला होता, तरी बागेंत गारच वाटत होतें; इतकी येथील हवा
थंड आहे. येथून मार्तंडाचें देऊळ सहा साडेसहा मैलांवर असून तेथून
अनंतनाग पांचसाडेपांच मैल होतें. इतका पायीं प्रवास करण्याचें आम्हांला
कांहींच वाटलें नाहीं; पण आमच्याबरोबर प्रो. अप्रकाशचंद्र बाबू होते. ते
थोडेसे स्थूल असल्यामुळें त्यांना इतका प्रवास पायीं झेपेल किंवा नाहीं,

याची शंका होती. म्हणून आम्ही तेथें भाड्यानें घोडीं मिळाल्यास पाहूं लागलों. त्याप्रमाणें एक घोडेवाला तीन घोडीं घेऊन आला. तीं साधारण भाड्याच्या घोड्यांसारखीं दिसत होतीं. माझ्या बंधूंना घोड्यावर बसण्याची सवय होती; परंतु मी घोड्यावर आजन्मांत कधीं बसलों नव्हतों. यामुळें माझ्या मनांत धाकधुकच वाटत होती. घोडेवाला एकएक रुपया मागूं लागला, व शिवाय ' सर्व पैसे आगाऊ द्या ' असें म्हणूं लागला. तेव्हां आम्ही तसें करण्याचें साफ नाकारलें, व पायींच जाण्याचें ठरविलें. यामुळें मला मनांतून आनंदच वाटून कधीं न अनुभवलेल्या संकटांतून आपली सुटका झाली, असें वाटलें. असो.

आम्ही पायींच वाट चालूं लागलों. हा गाडीचा रस्ता नसून पायवाट होती. यामुळें रस्त्यावर झाडी वगैरे कांहीं नव्हती. अच्छाबलकडून मार्तंडाच्या देवळाकडे जाणारा रस्ता चढावाचा आहे; कारण, अनंतनाग व अच्छाबल यांच्यामध्यें मोठा थोरला एक पठार आहे. अशा पठारजमिनीला काश्मीरी भाषेंत ' केरवा ' म्हणतात. हे केरवे फार सुपीक असतात. अच्छाबलकडून चढून आम्ही वर पठारावर आलों, तों जिकडेतिकडे पाणीचपाणी व सुंदर शेतें दिसूं लागलीं. कांहीं शेतांत भाताची लागवड चालली होती. कांहीं शेतें पाण्यानें भरून तुडुंब झालीं होतीं. कांहींत हिरवींगार लावणीच्या भाताचीं रोपें तयार झालीं होतीं. कांहीं शेतांत नांगरणी चालली होती. अशा तऱ्हेनें त्या सर्व पठारावर शेतकीचें काम जारीनें चालू होतें. या सर्व पठारावर ' लीडर ' नांवाच्या नदीच्या कालव्याचें पाणी खेळविलेलें आहे; मुख्य कालव्याचे लहानलहान पाट काढून सर्व पठाराच्या शेतीला पाणी दिलेलें आहे. असे लहानलहान कालवे आम्ही किती तरी ओलांडले. शेवटीं, आह्मांला लीडर नदीचा मुख्य कालवाहि लागला. हा एका डोंगराच्या धारेवरून आणलेला आहे. ती डोंगराची धार आह्मांला दूरवर दिसत होती. या पठारावरून हिमालयवलयांकित काश्मीरच्या दरीची चांगली कल्पना आली. या लांबट सपाट दरीच्या चाऱ्ही बाजूंना हिमालयाचा जणूं काय तटच बांधलेला आहे, असें वाटलें. जिकडे पहावें तिकडे हिरवे पांढरे डोंगरच डोंगर !

अशा तऱ्हेनें सृष्टिशोभा पहातपहात चालल्यामुळें आमचा प्रवास सावकाश झाला खरा; पण त्यामुळें थकवा मुळींच वाटला नाहीं.

अडीचाच्या सुमाराला आम्ही मार्तंडाच्या भव्य देवळाजवळ आलों. हें देऊळ लहानशा उंचवट्यासारख्या टेकडीच्या पायथ्याशीं आहे. आसपास झाडेंझुडपें किंवा वसती मुळींच नाहीं. थोडीशीं घरें आहेत; पण तीं देवळापासून बरींच दूर आहेत. अशा या निर्जन व निर्वन स्थळीं हें देऊळ कां बांधण्यांत आलें, याचें आम्हांला आश्चर्य वाटलें; पण असेंहि मनांत आलें कीं, जुन्या काळीं कदाचित् येथें मोठें शहरहि असेल. मात्र काळाच्या सपाट्यानें व भूकंपासारख्या सृष्टीच्या अनर्थानें शहर गडप होऊन गेलें असेल; किंवा धर्मवेडानें या शहराचा व देवळाचा नाश केला असेल. पंजाबांतील विद्यापीठाचा असाच नायनाट होऊन अर्वाचीन काळीं तेथील सर्व इमारती डोंगरांत गडद झालेल्या उकरून काढाव्या लागल्या. त्याच प्रकारचें स्थित्यंतर येथेंहि झालें असावें.

हे विचार मनांत येत आहेत तों आह्मी मार्तंडाच्या प्रवेशद्वाराजवळ आलों. त्या दाराचें तें प्रचंड काम पाहून आणि त्यावरील नक्षीचें व मूर्तींचें बारकाईनें निरीक्षण करून आम्ही थक्कच झालों. सातसात आठआठ फूट उंचीचे तीनतीन फूट लांबीरुंदीचे एकसंधी दगड दरवाजाला लावलेले आहेत! एवढाले प्रचंड दगड वर तरी कसे चढविले असतील, याचें आह्मांला आश्चर्य वाटलें.

प्रवेशद्वारांतून आम्ही आंत गेलों, तों फारच प्रशस्त असें खुलें चौकोनी पटांगण लागलें. त्याच्या मधोमध सूर्याचें देऊळ व गाभारा होता. पटांगणाभोंवतीं सर्व दगडी बांधकामाच्या कमानदार दरवाजाच्या व खिडक्यांच्या ओऱ्यांवजा इमारती होत्या. ज्याप्रमाणें मुसलमानी मशीदीचा घाट व आकार अगदीं ठरलेला, फरक काय तो मशिदीच्या विस्ताराचा, त्याला वापरलेल्या कमीअधिक उंची दगडांचा आणि कमी अधिक कलाकुशलतेच्या कामाचा, बाकी सर्व बांधणी ठरलेल्या धाटणीवर, तीच तऱ्हा काश्मीरांतील देवळांची दिसली. पनरतनसारखें छोटेखानी देऊळ असो,

किंवा अवंतिपुरच्या अवंतीश्वरासारखें विस्तीर्ण देऊळ असो, किंवा मार्तंडासारखें वास्तुकलेचा व मूर्तिकलेचा मूर्तिमंत मासला असलेलें देऊळ असो, सर्व देवळांचा घाट व तऱ्हा एकच! पाहिल्यानें एक विस्तीर्ण चौकोनी इमारत असावयाची, व मध्यें मुख्य देऊळ असावयाचें! मार्तंडाच्या देवळाचें वर्णन करावें तेवढें थोडेंच आहे. हिंदुस्तानच्या ललितकलेबद्दल–त्यांपैकीं विशेषतः वास्तुकला व मूर्तिकला यांबद्दल–ज्यांनीं ज्यांनीं म्हणून लिहिलें आहे, त्यांनीं त्यांनीं या देवळाच्या कामाची तारीफच केली आहे; इतकें या देवळाचें काम अपूर्व आहे. व्हिन्सेंट स्मिथसाहेबांनीं हिंदुस्तानच्या ललितकलांबद्दल मोठा सचित्र ग्रंथ लिहिला आहे. त्यांत या देवळाचें वर्णन आहे. तसेंच हिंदुस्तानच्या ललितकलांचे अभिमानी गृहस्थ बर्डवुड व फर्ग्युसन या दोन साहेबांनींहि या देवळाच्या कलेबद्दल तारीफ केली आहे.

या देवळाच्या भव्यतेची कल्पना शब्दांनीं देणें शक्य नाहीं. आतां हें देऊळ बरेंच मोडकळीला आलेलें आहे. देवळाच्या नुसत्या भिंतीच कांहीं ठिकाणीं उभ्या आहेत; बरेंच छप्पर पडून गेलें आहे. या देवळाचा गाभारा फार मोठा नाहीं; पण त्याला जोडून दोन्ही बाजूंना इमारती बांधल्यामुळें त्याला भव्यता आली आहे. देवळाच्या बाहेरच्या चौकाला दर्शनी खांब व कमानी यांची रांगच रांग आहे व त्यांची संख्या त्रवऱ्यायशीं आहे. चौकाची लांबीरुंदी दोनशें फुटांच्या वर आहे. पूर्वीं या चौकांत पाटाचें पाणी खेळविलें होतें, असें म्हणतात. हें देऊळ मूळचें बरेंच जुनें असावें. तें रामादित्य नांवाच्या काश्मीरच्या हिंदु राजानें बांधलें, असा समज आहे. पण रामादित्याच्या कारकीर्दीच्या काळाबद्दल निश्चयात्मक असें कांहींच सांगतां येत नाहीं. बाहेरच्या कमानदार चौकाचें काम ललितादित्य नांवाच्या राजानें केलें, असा राजतरंगिणींत स्पष्ट उल्लेख आहे. ललितादित्याची कारकीर्द इ. स. ६९९ पासून ७३५ पर्यंत होती, हें निश्चित आहे. तेव्हां हें देऊळ हजार वर्षांचें जुनें आहे, यांत शंका नाहीं.

या देवळाचा असा एक विशेष आहे, कीं, काश्मीरच्या इतर सर्व देवळांप्रमाणें हें देऊळ महादेवाचें नाहीं, तर तें सूर्याचें आहे. सूर्य ही

जरी हिंदुलोकांनीं देवता मानली आहे, संध्येंतील गायत्रीचा मंत्र जरी सूर्याच्या स्तुतिपर आहे, तरी सूर्याचीं देवळें हिंदुस्तानांत क्वचित् कोठें असतील.

आह्मी देऊळ पहा असतां आह्मांला शेजारच्या गांवांतले एकदोन ब्राह्मण भेटले. त्यांपैकीं एकानें 'येथें आसपास कॉलरा झाला आहे, तसेंच मटन या प्रसिद्ध तीर्थाच्या ठिकाणींहि हा वाखा थोडासा सुरू आहे,' असें सांगितलें. हें ऐकून आम्ही मटन झऱ्याला जावयाचा बेत रहित केला. तो येथून मैल दीड मैलच असल्यामुळें आमचा तेथें जावयाचा प्रथम विचार होता. त्या वेळीं आम्हांला फार भूक लागली होती, तरी अनंतनागाला जाईपर्यंत तोंडांत पाणीहि घालावयाचें नाहीं, असा आम्ही निश्चय केला.

मार्तंडाचें देवालय व त्याच्या आसपासचा देखावा पहाण्यांत आम्ही सुमारें दोन तास घालविले, आणि नंतर अनंतनागाला जावयास निघालों. आम्ही तेथून निघालों, तों दोन अडीचांचा सुमार झाला होता. येथून अनंतनाग फक्त पांचच मैल होतें. शिवाय, रस्ताहि उताराचा होता. तेव्हां आम्हांला फार वेळ लागण्याचें कारण नव्हतें. पण आमच्या बरोबर स्थूल-देही प्रो. अप्रकाशचंद्र बाबू होते, त्यांना आतां चालवेनासें झाल्यामुळें आम्हांला हे पांच मैल चालण्यास दोनअडीच तास लागले !

आम्ही पांचाच्या सुमाराला अनंतनाग येथें जाऊन पोहोंचलों. आम्ही पहिल्यानें ज्या बाजूनें गांवांत शिरलों, त्याच्या दुसऱ्या बाजूनें गांवांत शिर-ल्यामुळें आम्हांला मास्तरसाहेबांचें घर सांपडण्यास बराच त्रास पडला. शेवटीं, एकदांचें आम्ही त्यांचें घर तर गांठलें, परंतु मास्तरसाहेब घरीं नव्हते. मास्तरीणबाईंना तर पडद्याच्या चालीमुळें बाहेर येतां येईना. पण बाई फार चांगल्या होत्या. त्यांनीं एका लहान मुलाकडून आम्हांला बस-ण्यास सांगितलें, व मास्तरांना निरोप पाठविला.

थोड्याच वेळांत मास्तरसाहेब घरीं आले, व त्यांनीं आम्हांला फराळ करण्याचा आग्रह केला. पहातों तों त्यांनीं फराळाचें आणलेंसुद्धां ! हें

पाहून आह्मांला आश्चर्य वाटलें; पण आम्ही तर्क केला, कीं, आम्ही घरीं आल्याबरोबर त्यांच्या गृहिणीनें फराळाचें करण्यास प्रारंभ केला असावा. फराळाला सुंदर पोळ्या आणि तर्कारी होती. त्या पोळ्या मांड्यासारख्या पातळ व तलम होत्या. गाडगें चुलीवर उलटें टाकून त्यावर या पोळ्या करतात, असें आम्हांला सांगण्यांत आलें. मास्तरीणबाईचा सुग्रणपणा पाहून आम्हांला फार कौतुक वाटलें. आम्हांला सबंध दिवसाचा उपास असल्यामुळें आम्ही फराळाचा चांगलाच समाचार घेतला, हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं.

मास्तरांनीं केलेल्या आमच्या आदरातिथ्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून आम्ही मार्गस्थ झालों. व आल्या वाटेनें जाऊन रात्रीं सुमारें ११ वाजतां श्रीनगरांत आमच्या बिऱ्हाडीं सुखरूप येऊन पोहोंचलों.



५

काश्मीर संस्थानचा विस्तार.

तारीख ३१ मे–आज आमच्या नंदनवननिवासाचा शेवटला दिवस होता. तारीख १ जून रोजीं पहाटेलाच स्वदेशीं परत जाण्याकरितां निघावयाचा बेत ठरला होता. आज सर्व दिवसभर आमच्या मनाला वाईट वाटत होतें. इतक्या थोड्या मुदतीनें आम्ही या ठिकाणीं आलों, हा मोठा वेडेपणाच आम्ही केला, असें आम्हांला सारखें वाटत होतें. या प्रचंड व नैसर्गिक नंदनवनाचा एकशतांशहि आम्ही पाहिला नाहीं, असें आमच्या ध्यानांत आलें. सोनामार्ग, गुलमार्ग, यांसारखीं शीतलनिवासस्थानें; नंगापर्वत, हरमुख, अमरनाथ वगैरेसारखीं पंधरा हजार फुटांवर उंच असलेलीं हिमाच्छादित शिखरें; लिदर, सिंध, वृंगी यांसारख्या जलपूर्ण नद्या; वुलर, मानसबल, गंगाबल, नीडसार यांसारखीं सुंदर सरोवरें; बनिहल, पीरपंजाल, झोझीला यांसारखे निसर्गरमणीय घाट; गुप्तगंगा, सुखनाग, नीलनाग, गौतमनाग यांसारखे सतत वहाणारे निर्झर; निसर्गकृत वनराजि व मनुष्यकृत बागबगीचे; मनोहर फुलें फळें; हिममय गुहा व हिममय पर्वत; चित्रविचित्र पशुपक्षी, यांप्रमाणें कितीतरी गोष्टी या नंदनवनामध्यें पहाण्यासारख्या आहेत. पण कालाभावामुळें आम्हांला त्यांचें दर्शन घेतां आलें नाहीं.

परंतु आतां या विलापाचा काय उपयोग होता? दुसऱ्या दिवशीं निघणें आम्हांला भागच होतें. आणखी कांहीं दिवस तरी या नंदनवनांत आम्हांला रहावयाला सांपडलें असतें, तर किती बरें झालें असतें, असें आम्हांला राहूनराहून वाटत होतें; पण हें आमचें वाटणें 'पश्चात् बुद्धि बामणिया' या म्हणीपैकींच होतें. तेव्हां मी आपल्या मनाशीं निश्चय

केला, कीं, जर कधींकाळीं—अर्थात् या ‘ कधींकाळाचा ’ फारसा संभव नव्हताच—मला पुनः नंदनवनांत येण्याचा प्रसंग आला, तर आतां केली ही चूक न करितां येथें दोन महिने रहाण्याच्या बेतानें यावयाचें, नाहींतर इतका पैसा खर्च केल्याबद्दल आणि इतका त्रास व मेहनत केल्याबद्दल पश्चात्ताप मात्र व्हावयाचा. तसेंच काश्मीरच्या प्रवासाबद्दल माझी कोणी सल्ला घेतली, तर, ‘ तीन महिन्यांची तरी फुरसत असल्याशिवाय व तीन-चारशें रुपये तरी खर्चण्याची तयारी असल्याशिवाय हा प्रवास कोणीहि करूं नये, ’ असें त्याला निक्षून सांगण्याचा मी मनाशीं निश्चय केला. असो.

आज आमच्या येथल्या निवासाचा शेवटलाच दिवस असल्यामुळें आम्ही प्रथमतः येथें नवीन झालेल्या मित्रमंडळीच्या भेटी घेतल्या, व शेवटीं बिजलीबाबूंकडे गेलों. त्यांना धनजीभाईच्या डाकेच्या टांग्यांत दोन स्वाऱ्यांचीं तिकिटें विकत घेण्यास आम्ही सांगितलें, व त्यांनींहि तिकिटें आणवून ठेवण्याचें कबूल केलें. आम्हांला पैशांचा तोटा आला होता, म्हणून आम्ही घराकडून तारेनें पैसे मागितले होते. ती मनीऑर्डर बिजलीबाबूंना देण्याबद्दल पोस्टमास्तरांना पत्र लिहून तें बिजलीबाबूंजवळ दिलें, व त्यांच्याकडून मनीऑर्डरचे पैसे आगाऊ घेतले. इतकें काम झाल्यावर थोडा वेळ त्यांच्याशीं कांहीं संभाषण करून व आम्हांला आमच्या येथील प्रवासांत मदत केल्याबद्दल त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानून आम्ही बिजलीबाबूंचा निरोप घेतला, आणि बिऱ्हाडीं परत आलों.

काश्मीरच्या प्रवासाची व नंदनवनांतील निवासाची कायमची अशी कांहींतरी खूण आपल्याजवळ रहावी म्हणून तेथल्या कांहीं विशेष चिजा विकत घेण्याचा आम्ही बेत केला होता; म्हणून त्या खरेदी करण्याकरितां आम्ही नंतर अप्रकाशचंद्रबाबूंबरोबर बाजारांत गेलों. तेथें काश्मीरच्या नक्षीचे मासले म्हणून मेजावर घालण्याचे नक्षीदार रुमाल; उशांचे अभ्रे वगैरे थोडेसें कापड खरेदी केलें. नंतर लांकडाच्या नक्षीच्या कामाचे नमुने म्हणून दोन लांकडी पेट्या घेतल्या; तसेंच ‘ पेपरमॅची ’ नांवाच्या धंद्याचे मासले म्हणून लहान मुलांचीं खेळणीं व इतर उपयुक्त वस्तु खरेदी केल्या, व काश्मीरांतील शिकारे (होड्या) नौकागृहें यांचे निर-

निराळ्या प्रकारचे लहान प्रमाणावरचे नमुने विकत घेतले, व शेवटीं काश्मीरच्या देखाव्यांचे निरनिराळे फोटोहि घेतले ते फोटो तयार ठेवण्याबद्दल आम्ही एका फोटोग्राफरला आधींच सांगून ठेवलें होतें, व फोटोहि आम्ही पसंत करून ठेविले होते.

याप्रमाणें सामानाची खरेदी करून आम्ही बिऱ्हाडीं आलों, आणि अप्रकाशचंद्रबाबू व घोषबाबू यांच्यासह आम्ही भोजन केलें. त्यांनीं आज आमच्याकरितां थोडा मेजवानीसारखा बेत केला होता. जेवण झाल्यावर आम्ही थोडी विश्रांति घेतली. तितक्यांत अप्रकाशबाबू आपलें कॉलेजचें काम संपवून आले. आम्ही दोनप्रहरचा चहा घेऊन बाहेर पडलों, व शिकाऱ्याच्या अड्डयावर जाऊन बऱ्याच तासांच्या बोलीनें एक शिकारा ठरवून त्यांत बसलों, व झेलमनदींतून पुनः एकदां सर्व शहर पहाण्यास निघालों.

आम्ही झेलमनदीच्या कालव्याच्या ठिकाणीं शिकाऱ्यांत बसलों, व तेथून लवकरच झेलमनदीवरील ‘ अमीराकडाल ’ नांवाच्या पहिल्या पुलाखालीं आलों. हा पूल दगडी कमानीचा असून त्याचा वरचा सर्व भाग लोखंडी तुळयांचा व लोखंडी कठड्यांचा आहे. हा पूल अगदीं पक्का आहे. हा सन १८९६ मध्यें बांधून तयार झाला. आम्ही नदीच्या ओघाबरोबर खालीं चाललों होतों, यामुळें आमच्या शिकाऱ्याचा वेग बराच होता. नदीच्या दुतर्फा शहरांतील लहानमोठ्या इमारती दिसत होत्या, व नदीच्या कडेला मधूनमधून नौकागृहें दिसत होतीं. हा सर्व देखावा अपूर्व पण नयनमनोहर वाटला, यांत शंका नाहीं. घरांच्या मधूनमधून हिंदु देवळांचीं उंच शिखरें व मुसलमानी मशिदींचे मनोरे दृग्गोचर होत होते.

झेलमनदीवर शहराच्या भागामध्यें एकंदर सात पूल आहेत. ते सर्व लांकडी व कच्चे आहेत. आम्ही दुसऱ्या पुलाच्या कमानीमधून गेलों, तेव्हां आम्हांला त्याची बांधणी समजली. आपल्याइकडे कांहींकांहीं विहिरी ज्याप्रमाणें लांकडी तुळया चौकोनाकृति एकावर एक टाकून बांधतात, त्याप्रमाणें या पुलांचे खांब केलेले आहेत, व मधल्या चौकोनी पोकळींत

दगड रोडे भरलेले आहेत. या व्यवस्थेमुळें पूर आला असतां पाण्याला अडथळा न होतां पाणी खांबांच्या भेगांमधून निघून जातें. अशा तऱ्हेनें खांबांची बरीच उंची साधल्यावर तुळईच्या वरच्या चवकटीला आडवे मोठमोठे लांकडी धिरे देऊन त्यांवर मग सपाट तुळयांच्या रांगा टाकल्या आहेत, व मग त्यांवर तक्तपोशी केली आहे. अशा तऱ्हेचे हे लांकडी पूल हलके होऊन पुरांत वाहून जाण्याची भीति कमी असते. येथें कायमचे दगडी पूल बांधण्याचें काम विलक्षण खर्चाचें आहे. कारण, नदीला सतत पाणी असून जमिनीखालीं पुष्कळ खोलीपर्यंत खडक लागत नाहीं, यामुळें ही कमी खर्चाची पुलाच्या बांधकामाची युक्ति येथें योजलेली आहे. तिसऱ्या पुलाच्या शेजारींच काश्मीरच्या महाराजांचा राजवाडा आहे. येथें शहराच्या अगदीं वरच्या भागाकडे नदीच्या उजव्या बाजूला काढलेला फांटा नदींत येऊन मिळतो. तो राजवाड्याच्या तटाला अगदीं लागून जातो, व नदींत येऊन मिळतो. यामुळें येथें पाण्याला ओढ पुष्कळ आहे. राजवाड्यासमोरच चांगल्या दगडी पायऱ्यांचा घाट आहे. घाटाच्या जरा खालीं गेलें कीं, लागलीच नदीच्या डाव्या बाजूच्या कालव्याला सुरवात होते. यामुळें नदीचें पात्र येथें बरेंच रुंदावलेलें दिसतें, आणि नदीकडून व उजव्या बाजूच्या फांट्याकडून जोराचे दोन प्रवाह एकत्र येऊन हे डाव्या बाजूच्या फाट्यांत व नदीच्या खालच्या भागाकडे जोरानें जातात. येथला देखावा खरोखरीच फार रमणीय आहे, पण येथें शिकारा थांबविणें किंवा तो हलके हलके चालविणें बरेंच कठीण आहे.

तिसऱ्या आणि चवथ्या पुलांच्या दरम्यान ‘ शहामहादन ’ नांवाची लांकडी प्रचंड इमारत दृष्टिपथांत येते. ही चवदाव्या शतकांत परशियांतून काश्मीरला आलेल्या एका साधूच्या स्मरणार्थ बांधलेली मशीद किंवा मुसलमानी मंदिर आहे. याच साधूनें काश्मीरांत मुसलमानी धर्माचा फार प्रसार केला, असें ह्मणतात. ही मशीद याच ठिकाणीं असलेल्या ‘ कालीश्री ’ नांवाच्या हिंदु देवळाच्या सामानानें बांधलेली आहे, असें सांगतात. हिंदु लोक अजून या ठिकाणीं काली देवीची पूजा करतात. याच्या समोरच नदीच्या दुसऱ्या बाजूला ‘ पठार मशीद ’ नांवाची

नूरजहान राणीनें बांधलेली मोठी दगडी मशीद आहे. चवथ्या पुलाच्या खालीं नदीच्या उजव्या बाजूला ' महाश्री ' नांवाचें पांचमजली देवालय आहे. सहाव्या पुलाच्या जरा पलीकडे ' स्कंधभवनाच्या ' देवळाचा जीर्णभाग आहे. सातव्या पुलाच्या खालीं व जेथें दूधगंगानदी झेलम-नदीला येऊन मिळते तेथें ' क्षेमगौरीश्वर ' नांवाचें एक महादेवाचें देवालय आहे. या पुलाच्या पलीकडे शहर संपतें; म्हणून येथूनच आम्ही परत फिरलों, आणि पुनः सर्व शहराची, देवळांच्या व मशीदींच्या शिखरांची, व नदींतील लहानमोठ्या नौकागृहांची शोभा पहातपहात नदीच्या वर चाललों.

आतां आम्ही नदीच्या ओघाविरुद्ध जात असल्यामुळें आमचा शि-कारा फार सावकाश चालला होता. शेवटीं, आम्ही निघालों त्या ठि-काणीं आलों, व तेथून नदीच्या कालव्यांतून चिनारबागेकडे चाललों. नदीच्या मुख्य प्रवाहाच्या कडेला फारशीं नौकागृहें लागलीं नाहींत. पण आतां जिकडेतिकडे लहानमोठीं नौकागृहें लागूं लागली. कांहीं कांहीं नौकागृहें टेबलें, खुर्च्या, आरामखुर्च्या, खिडक्यांचे पडदे, आरसे वगैरे अर्वाचीन तऱ्हेच्या सुखसोयी व सामान यांनीं भरलेलीं दिसत होतीं. कांहींवर विजेच्या दिव्यांचीहि तजवीज केलेली पहाण्यांत आली. खरोखरीं नदीच्या या भागांत आलें म्हणजे सर्व शहरांतील घरें काय नदींत विहारा-करितां उतरलीं आहेत असा भास होतो.

थोड्याच वेळांत आम्ही चिनारबागेपाशीं आलों. या ठिकाणाला बाग कां म्हणतात हेंच आह्मांला समजेना. या ठिकाणाला बागेचा मुळींच आकार नाहीं. हें ठिकाण म्हणजे नदीच्या निरनिराळ्या फांट्यांमधली एक बेटवजा जागा आहे, व येथें प्रचंड चिनारवृक्ष आहेत, इतकेंच; पण हें ठिकाण फार थंड आहे. येथें चिनारांची खूब गर्दी असल्यामुळें येथें नेहमीं सावली असते. आम्ही थोडा वेळ येथें थांबलों. कांहीं युरोपियन स्त्रिया व पुरुष येथें बसलेलीं दृष्टीला पडलीं. येथें विवाहेच्छु युरोपियन युवयुवती प्रेमालापाकरितां व प्रेमविहाराकरितां येतात, असें अप्रकाशचंद्र बाबूंनीं

आम्हांला सांगितलें, व या स्थळाच्या शांत, निवांत, शीतल स्वरूपावरून बाबूसाहेबांचें म्हणणें खरें असावें, असें आम्हांलाहि वाटलें.

आतां बरीच संध्याकाळ होत चालली होती, व आम्ही शिकाऱ्याचा बराच वेळहि घेतला होता; म्हणून नाइलाजास्तव आम्ही शिकाऱ्यांत बसलों, व शिकाऱ्याच्या अड्डयावर परत आलों. शिकारावाल्याचे पैसे चुकते करून व शिकाऱ्यांत पुष्कळ वेळ राहिल्याबद्दल त्याला थोडी चिरीमिरी देऊन आम्ही आपल्या बिऱ्हाडीं आलों. झालें ! नंदनवनापैकीं एका आठवड्यांत जेवढें पहाणें शक्य होतें तेवढें आम्ही पाहून घेतलें, म्हणून आम्हांला समाधान वाटलें; पण आधिक पहाण्यास सवड नाहीं, म्हणून वाईट वाटल्याखेरीजहि राहिलें नाहीं.

अशा मिश्रविकारांच्या मनस्थितींत आम्ही आपलें तेथलें शेवटचें भोजन आटोपलें, आणि सामानाची बांधाबांध करून व बराच वेळपर्यंत बाबूद्र-यांजवळ आमच्या प्रवासाबद्दल व इतर खाजगीगोष्टींबद्दल बोलत बोलत झोंपीं गेलों. पहांटे पांच वाजतांच आमचा डाकेचा टांगा निघावयाचा होता. आमच्या प्रत्यागमनाच्या हकीकतीस लागण्यापूर्वीं या ठिकाणीं काश्मीराबद्दल कांहीं उपयुक्त सामान्य माहिती द्यावी, असा विचार आहे.

हिंदुस्तानांत म्हैसूर, ग्वालेर, इंदूर, बडोदा व दक्षिणहैदराबाद यांसारखीं जीं मोठीं व पहिल्या प्रतीचीं संस्थानें आहेत त्यांपैकीं काश्मीर हें संस्थान आहे. याचें एकंदर क्षेत्रफळ ऐशीं हजार मैलांपेक्षां जास्त आहे. म्हणजे हें संस्थान जवळजवळ निजाम हैदराबाद एवढें मोठें आहे. मात्र हें डोंगराळ मुलखांत असल्यामुळें येथली वसती पुष्कळ कमी आहे. संस्थानची एकंदर वसती सुमारें बत्तीस लक्ष आहे. संस्थानचें उत्पन्न एक कोटीवर आहे. संस्थानचा आकार साधारण चौकोनी असून त्याचे जम्मू, काश्मीर, लहान तिबेट व गिलजित हे मुख्य चार प्रांत आहेत. हे प्रांत म्हणजे एकावरएक चढत्या अशा पायऱ्या आहेत.

जम्मूप्रांत हा पंजाबला लागून असून त्यांतला कांहीं भाग झेलम, गुजरात, सियालकोट, आणि गुरदासपूर या पंजाबांतील जिल्ह्यांच्याच सपाटीवर आहे. पुढें मात्र हिमालयाची पहिली रांग चढावी लागते, व ही सात-

आठ हजार फूट आहे. या रांगेमध्यें या संस्थानांतील दुसऱ्या पायरीवजा प्रांत लागतात. या सर्व भागांतून चिनाब व झेलम या नद्या वहात गेल्या आहेत. या भागांत रान फार आहे.

नंतर हिमालयाची पीरपंजाल नांवाची ओळ ओलांडली, म्हणजे काश्मिरची सुंदर दरी लागते. हिलाच कोणी ' नंदनवन ' म्हणतात. कोणी या दरीला मोत्यांच्या हारामध्यें बसविलेल्या पाचूची यथार्थ उपमा देतात. कारण या दरीच्या चारहि बाजूंना शुभ्र मोत्यांसारख्या बर्फानें आच्छादिलेल्या पर्वतांचीं शिखरें आहेत. काश्मीरच्या पुढें अठरा हजार-पासून पंचवीस हजार फूटपर्यंत उंच असलेली हिमालयाची रांग लागते व ती ओलांडल्यावर संस्थानच्या तिसऱ्या पायरीवजा प्रांत लागतात. त्याच्यापुढें आणखी ' गिलजित ' नांवाचा प्रांत लागतो, व त्यानंतर तर सर्व जगांत उंच असलेले अठ्ठावीस हजार फुटांच्या उंचीचे काराकोरान पर्वत लागतात. ही या संस्थानची शेवटची पायरी होय, व ही पायरी ओलांडल्यावर पुनः सपाटीचा भाग लागतो.

याप्रमाणें संस्थानचे भाग म्हणजे वर वर चढणाऱ्या प्रचंड पायऱ्यांनीं झालेले प्रांत होत. दुसऱ्या तऱ्हेनें हें संस्थान ह्मणजे चिनाब, झेलम व सिंधु या नद्यां ऱ्या एकावरएक उंच असणाऱ्या दऱ्यांनीं झालेलें आहे असें ह्मणतां येईल. अर्थात् संस्थानच्या खालच्या पायरीमधून चिनाबनदी गेली आहे. या संस्थानच्या दुसऱ्या पायरीमधून झेलमनदी गेली आहे, तिसऱ्या पायरीमधून सिंधु नदी गेली आहे. या तीनहि नद्यांची वहाण्याची तऱ्हा सारखीच आहे. या नद्या या संस्थानच्या पूर्वभागांतील दक्षिणेकडच्या प्रचंड हिमालयाच्या पर्वतराजींत उगम पावून प्रथमतः उत्तरेकडे वहात जातात, व मग एकदम दक्षिणवाहिन्या होऊन संस्थानच्या पश्चिमभागा-कडून खालीं उतरतउतरत पंजाबच्या सपाट व सखल प्रदेशांत त्या वहात येतात. वरील वर्णनावरून, हें सर्व संस्थान पर्वतमय आहे, व जगांतील प्रचंड पर्वत जो हिमालय, त्यानें वेष्टिलेलें आहे, असें दिसून येईल. अर्थात् यांत जंगलें, रानें, मोठमोठे पहाड व घांट हीं च जिकडे तिकडे ीला पडावीं, यांत नवल नाहीं. नद्यांच्या दऱ्यांच्या आसपास कमी-

अधिक सपाटीचा भाग आहे. व तेथेंच शेतकीची जमीन आहे; तसेंच निरनिराळ्या डोंगरांच्या रांगांमध्यें ठिकठिकाणीं कांहीं भाग फार सुपीक आहेत, व तेथें वसतीहि बरीच दाट आहे.

या संस्थानचा हिंदुस्तान लगतचा भाग म्हणजे जम्मूप्रांत होय. या प्रांताचें सामान्यस्वरूप पंजाबासारखेंच आहे. या प्रांताचें क्षेत्रफळ काश्मीर प्रांताच्या दुप्पट आहे. या प्रांताची लोकसंख्या सुमारें सोळा लाख असून त्यांत मुसलमान सुमारें नऊ लाख आहेत. बाकीचे हिंदु आहेत. या प्रांताचें मुख्य शहर जम्मू असून, हें ब्रिटिश मुलखाच्या अगदीं नजीक व जम्मू प्रांताच्या दक्षिणेला आहे. पंजाबांतून पेशावरकडे जाणाऱ्या आगगाडीच्या रस्त्यावरील वजिराबाद या स्टेशनापासून निराळा आगगाडीचा फांटा लागतो. व तो जम्मू या शहरापर्यंत जातो. वजिराबादपासून जम्मू बावन मैल आहे. काश्मीरच्या महाराजांची जम्मू ही हिवाळ्यांतील राजधानी आहे. या शहराची वसती बत्तीस हजार आहे. हें शहर समुद्रसपाटीपासून सारें बाराशें फूट उंच आहे. येथून काश्मीरसंस्थानच्या दुसऱ्या प्रांतांत जावयाला साधारण रस्ता आहे. अजून तो झेलमनदीच्या रस्त्याप्रमाणें गाडी व मोटार जाण्यासारखा नाही; पण कांहीं कालानें हा रस्ताहि चांगल्यापैकीं होईल, असें दिसतें. काश्मीरसंस्थानची मुख्य राजधानी श्रीनगर शहर हें जम्मूहून सुमारें एकशें ऐशीं मैल आहे. अर्थात् हिमालयाची ' पीरपंजाल ' नांवाची ओळ ओलांडून हा मार्ग जातो. याला ' बानिहाल ' मार्ग म्हणतात. हा सर्व मार्ग काश्मीरसंस्थानांतूनच गेला आहे.

जम्मू प्रांताची हवा पंजाबाप्रमाणें उष्ण आहे. तेथें नियमित पावसाळा आहे, व पावसाची सरासरी ४१ इंच आहे. जम्मू प्रांतांत डोग्रा नांवाच्या जातीच्या लोकांची वसती विशेष आहे. हे लोक रुंद बांध्याचे, ठेंगणे व काळसर रंगाचे आहेत. हे लोक स्वाभिमान, शौर्य व इमानीपणा या गुणांबद्दल प्रसिद्ध आहेत. या प्रांतांत डोग्री व पंजाबी या भाषा बोलतात. संस्थानची अर्धी लोकसंख्या या एकाच प्रांतांत आहे.

काश्मीर संस्थानचा दुसरा प्रांत म्हणजे काश्मीरचा हिमालयवलयांकित सपाट प्रदेश होय. या प्रांताची बरीच माहिती या पुस्तकाच्या पूर्वीच्या

लेखांत येऊन गेली आहे. तेव्हां तिची पुनरावृत्ति करण्याचें कारण नाहीं. ही दरी पूर्वींच्या प्रचंड तलावांतील पाणी ओसरून झाली आहे, असें भूगर्भशास्त्रदृष्टया दिसतें. असें ठरविणारीं निदर्शकें पुष्कळ आहेत. या गोष्टीचें अप्रत्यक्ष प्रत्यंतर, कश्यपऋषीनें येथें असलेल्या 'सतीसार' नांवाच्या सरोवराचें पाणी ओसरवून हा प्रांत निर्माण केला, व म्हणूनच त्याला 'कश्यपपुर' 'कश्यपमार' 'काश्मीर' म्हणतात, या दंतकथेवरूनहि येतें. या प्रांताची लोकसंख्या सुमारें तेरा लाख आहे. त्यांपैकीं बारा लाख मुसलमान आहेत; पण हे मुसलमान हिंदूचे बाटून झालेले आहेत. या प्रांतांतील लोक शुद्ध आर्यवंशांपैकीं आहेत. त्यांचा रंग, सतेजपणा व एकंदर शरीराची ठेवण यांवरून ही गोष्ट खरी आहे असें वाटतें. या प्रांतांत काश्मीरी भाषा प्रचलित आहे. ही भाषा संस्कृत व परशियन या दोन भाषांच्या मिश्रणानें झाली आहे. येथें 'शारदी' नांवाची जुनी लिपी अजून चालू आहे. काश्मीरी लोक हुषार व उद्योगी आहेत. ते पाहुण्यांचा आदरसत्कार करणारे असून एकंदरींत सौम्य स्वभावाचे आहेत. त्यांच्याबद्दल युरोपीयन प्रवाशांनीं वाईट मत दिलेलें आहे; पण त्यांचें हें मत मजूरवर्गांतील लोकांच्या सहवासापासून बनलेलें आहे; कुलीन काश्मीरी लोकांचा त्यांच्याशीं फारसा संबंध न आल्यामुळें काश्मीरी लोकांचा खरा स्वभाव त्यांना कळत नाहीं; म्हणून यूरोपीयन प्रवाशांचें असें एकतर्फी मत बनलें आहे. पण ज्या यूरोपीयनांचा काश्मीरी लोकांशीं खरा निकट संबंध आला आहे, त्यांनीं त्यांच्याबद्दल अनुकूलच मत प्रदर्शित केलें आहे.

काश्मीर प्रांताचें हवापाणी उत्तम आहे. मात्र हिंवाळ्यांत तेथें अतोनात थंडी पडते. तेथें पाऊस साधारणपणें बाराहि महिने पडतो. यामुळें सर्वदा सृष्टीचा देखावा हिरवागार व म्हणून मनोहर असतो. काश्मीर प्रांतांत पावसाची सरासरी सत्तावीस इंच आहे. हा प्रांत सर्व बाजूंनीं पर्वतराजींनीं वेढिलेला असल्यामुळें येथें भयंकर वारे क्वचितच वहातात, आणि हवा एकंदर शांत व निवांत असते. हिंवाळ्याखेरीज येथील सर्व ऋतु सुखकर असतात. येथलें हवापाणी निरोगी असल्यामुळें येथें मनुष्यांची प्रकृति चांगली रहाते, व सुधारते. याचें प्रत्यक्ष उदाहरण आम्ही ज्या

बंगालीबाबूंकडे रहात होतों, त्यांचेंच होतें. हे गृहस्थ कलकत्त्याच्या कोंदट व हिंवतापी हवेंतून प्रथमतः काश्मीरांत आले, तेव्हां अगदीं किरकोळ, सडपातळ व फिकट होते. पण काश्मीरांतील वर्षदीडवर्षाच्या निवासानें त्यांचें वजन पन्नास पौंड वाढलें, आणि ते सतेज व लालबुंद झाले, असें त्यांनीं आम्हांला स्वतःच सांगितलें.

काश्मीरसंस्थानचा तिसरा प्रांत म्हणजे लहान तिबेट होय. हा प्रांत काश्मीर प्रांताच्या पूर्वेला व उत्तरेला पसरलेला आहे. त्याचे 'लडाक' व 'बाल्टिस्तान' असे दोन पोटभाग होतात. बाल्टिस्तान काश्मीर प्रांताच्या उत्तरेला आहे, व लडाक पूर्वेला आहे. या प्रांताचें क्षेत्रफळ जम्मू व काश्मीर या दोन प्रांतांच्या दुप्पट आहे; पण येथली वसती अत्यन्त पातळ आहे. यामुळें एवढ्या मोठ्या क्षेत्रफळाच्या प्रांतांत लोकसंख्या सुमारें दीडलाखच आहे.

लहान तिबेट हा प्रांत समुद्रसपाटीपासून फारच उंच म्हणजे सरासरीनें दहाबारा हजार फुटांच्या वर आहे, व इतक्या उंचावर मनुष्यवसती असलेलीं ठिकाणें पृथ्वीवर फारच थोडीं आहेत. हा प्रांत दिसण्यांत काश्मीर इतका मनोहर नाहीं. कारण, येथें झाडें व रान वाढत नाहीं. पण येथल्या प्रांताचा विशेष म्हणजे उत्तरेच्या व पश्चिमेच्या बाजूंना असलेले सर्व जगांतील अत्यंत उंच पर्वत व त्यांवरील प्रचंड हिमसंघ होत. या हिमसंघांचा देखावा केवळ अपूर्व आहे.

लडाक प्रांतांतील मुख्य शहर लेह हें होय. हें श्रीनगरपासून दोनशें त्रेचाळीस मैल आहे. हा रस्ता प्रथमतः 'सिंध' नांवाच्या नदीच्या कडेनें जातो. येथलें सृष्टिसौंदर्य अप्रतिम आहे, असें म्हणतात. याच वाटेनें 'सोना मार्ग' नांवाचें शीतल निवासस्थान लागतें, व 'झोझीला' ह्मणून घांट लागतो. लेह हें मोठें व्यापाराचें ठिकाण आहे. येथें हिंदुस्तानचे व्यापारी व मध्यआशियांतले व्यापारी एके ठिकाणीं जमतात. लडाकचे लोक बुद्धधर्मी असून ते मांगोलियन वंशाचे आहेत. त्यांच्यामध्यें हिंदुस्तानच्याप्रमाणें चतुर्वर्णांची व्यवस्था आहे. तसेंच तेथें नेपाळी लोकांप्रमाणें बहुपतित्वाचीहि चाल आहे. या प्रांतांत बुद्धधर्माचे पुष्कळ मठ असून

त्यांना ‘ गुप ’ ह्मणतात. लेह शहरापासून अठरा मैलांवर ‘ हेमी ’ नांवाचा प्रसिद्ध मठ आहे.

लहान तिबेटाचा दुसरा पोटभाग बाल्टिस्तान हा असून याचें मुख्य शहर स्कार्डु हें होय. हें शहर श्रीनगरपासून दोनशें पसतीस मैल आहे. सुमारें शंभर मैलपर्यंत श्रीनगर व लेह रस्ता आणि श्रीनगर-स्कार्डु रस्ता एकच आहे. पुढें मात्र एक उत्तरेला जातो, व एक पूर्वेकडे वळतो. बाल्टिस्तान हें लडाक प्रांतापेक्षां सखल आहे. स्कार्डु हें साडेसात हजार फुटांवर आहे. या पोटभागाची लोकवसती बहुतेक मुसलमानी असून तेथील लोक गिलजित प्रांतांतील लोकांसारखेच आहेत. या दोन्ही पोटभागांतून सिंधुनदी वहात गेली आहे. स्कार्डु येथें दोन्ही बांजूंचे डोंगर बरेच दुरावले असल्यामुळें सपाट मैदान पुष्कळ आहे. येथील शेतकीहि चांगली आहे.

काश्मीरसंस्थानचा शेवटचा प्रांत म्हणजे गिलजित हा होय. हा काश्मीर प्रांताच्या उत्तरेला आहे. या प्रांतांतील मुख्य शहर गिलजित हें होय. हें श्रीनगरपासून दोनशें अठ्ठावीस मैल आहे. हा प्रांत बाल्टिस्तानपेक्षांहि सखल आहे.

गिलजित शहर चार हजार आठशें फुटांच्या उंचीवर आहे. म्हणजे, श्रीनगरपेक्षांसुद्धां चारपांचशें फूट तें खालीं आहे. गिलजित हें सिंधुनदीच्या उत्तरेला आहे. दक्षिणेकडील हिमालयांत अठ्ठावीस हजार फुटांच्या उंच पर्वतांमधून निघून हळूहळू खालीं खालीं उतरत सिंधुनदी गिलजितच्या जवळ पांच हजार फुटांपर्यंतच्या सपाटीवर येते. येथपर्यंत ती नदी उत्तरवाहिनी आहे. येथेंच एकदम ती दक्षिणवाहिनी होते, व नंगापर्वताच्या उत्तरेकडच्या पायथ्यानें पश्चिमेकडे जाते, व मग स्वाटदरींतून थेट दक्षिणेकडे वळून, सारखी दक्षिणवाहिनी होऊन आरबी समुद्राला मिळते. हा प्रांत कांहींसा काश्मीर प्रांतासारखा आहे, व येथें काश्मीर प्रांतांत होणारीं सर्व पिकें व फळें होतात. येथें पाऊस मात्र थोडा पडतो. येथली पावसाची सरासरी साडेचार इंचच आहे.

हल्लींचें अवाढव्य काश्मीरसंस्थान हें भोपाळसंस्थानाप्रमाणें एका कर्तृत्ववान् पुरुषाच्या श्रमाचें फळ आहे. बाकी काश्मीरच्या चारहि प्रांतांत

साम्य कांहींच नाहीं. वर वर्णन केलेल्या प्रांतांची भूगोलविषयक परिस्थिति अगदीं निरनिराळी आहे. तेथील लोक आहेत निरनिराळे सर्व प्रांतांच्या भाषा व रीतरिवाज निरनिराळे आहेत. तरीपण हल्लीं हे प्रात एका राजछत्राखालीं आले आहेत. या संस्थानच्या कोंदणांत काश्मीर हा प्रांत पाचूप्रमाणें आहे. या प्रांताचा इतिहास व बऱ्याच काळची माहिती 'राजतरंगिणी' या ऐतिहासिक संस्कृत ग्रंथांत आहे. 'राजतरंगिणी' चा कर्ता कल्हण यानें तो ग्रंथ इ. स. ११४८ मध्यें लिहिला. त्यानें दंतकथा व इतिहास यांचा धागा आपल्या काळपर्यंत आणला. 'जोनराज' नांवाच्या कवीनें तो इतिहास इ. स. १४२० पर्यंत आणला. याच काळांत काश्मीरांतील हिंदु राज्य जाऊन मुसलमानी राज्य झालें. श्रीवर कवीनें हा इतिहास इ. स. १४८६ पर्यंत आणून पोहोंचविला, व शेवटच्या संस्कृत कवीनें तो इ. स. १५८६ पर्यंत आणिला. या वर्षीं अकबर बादशहानें हा प्रांत काबीज केला, व हरिपर्वतावर एक मजबूत किल्ला बांधला. तेव्हांपासून काश्मीर हा प्रांत मोंगल बादशाहीचा एक परगणा झाला व बादशहांचें श्रीनगर हें शीतलनिवासस्थान बनलें. जहांगीर व शहाजहान या दोन बादशहांचें तर तें आवडतें ठिकाण होतें. जहांगीराला तर हें ठिकाण इतकें प्रिय होतें, कीं, मरतांनासुद्धां काश्मीरची आठवण काढून त्यानें प्राण सोडला. काश्मीरांतील प्रसिद्ध बागबगीचे याच दोन बादशहांच्या कारकीर्दींतील आहेत. औरंगजेब हा काश्मीरांत एकदाच गेला होता, व प्रसिद्ध बर्नियर प्रवासी त्याच्याच बरोबर काश्मीरांत आला होता; परंतु औरंगजेबाच्या कारकीर्दींतच मोंगलबादशाहीची मोडतोड होत गेली. इ. स. १७५१ मध्यें काश्मीर स्वतंत्र राज्य बनलें; पण लवकरच अफगाण व दुराणी लोकांच्या ताब्यांत हा प्रांत गेला, व त्या काळीं लोकांवर फार जुलूम झाला, तेव्हां तेथील लोकांनीं पंजाबांत नवीन उदयाला आलेल्या शीख राष्ट्राच्या नायकाकडे मदत मागितली. रणजितसिंगानें काश्मीरवर प्रथम इ. स. १८१४ मध्यें स्वारी केली; पण ती यशस्वी झाली नाहीं. इ. स. १८१९ मध्यें पुनः आपला प्रख्यात सेनापति मिसर दिवाणचंद याला रणजितसिंगानें काश्मीरच्या स्वारीवर पाठ-

विलें. या स्वारींत जम्मूचा सरदार गुलाबसिंग—हल्लींच्या प्रचंड काश्मीर संस्थानाचा प्रस्थापक—हाहि होता. ही स्वारी यशस्वी झाली, व काश्मीर शीख लोकांच्या ताब्यांत आलें.

गुलाबसिंग हा डोग्राजातीचा रजपूत असून त्याचें जम्मू येथें लहान संस्थान होतें; पण त्यानें रणजितसिंगाकडे नोकरी धरली; व आपल्या शौर्यादि गुणांनीं तो पुढें आला. त्यानें आसपासच्या लहानलहान संस्थानिकांना पादाक्रांत केलें, व त्या प्रांतांत शांतता प्रस्थापित केली. १८२० सालीं रणजितसिंगानें ‘ जम्मूचा राजा ’ असा किताब देऊन गुलाबसिंगाचा गौरव केला. किस्तावर हा परगणा त्यानें घेतल्यावर त्याच्या मनांत लडाक हा मोठा—पण अज्ञात—प्रांत काबीज करण्याचा विचार आला, व त्यानें तो लवकरच तडीलाहि नेला. आणखी कांहीं वर्षांनीं म्हणजे १८४० सालीं त्यानें लडाक प्रांताला लागूनच असलेला बाल्टिस्तान हा प्रांतहि काबीज केला. याप्रमाणें इ. स. १८४० च्या सुमाराला काश्मीर प्रांताच्या तीनहि बाजूंना गुलाबसिंगाचें राज्य पसरलें. १८४५ सालांत शीख व इंग्रज यांचें युद्ध सुरू झालें. या युद्धांत गुलाबसिंग सामील झाला नाहीं. व यामुळेंच इंग्रजांना जय मिळाला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या अप्रत्यक्ष मदतीकरितां गुलाबसिंगाला काश्मीर प्रांत—जो तोंपर्यंत शीख लोकांच्या ताब्यांत होता—देण्यांत आला, या देणगीला बाह्यतः सामान्य देवघेवीचें स्वरूप यावें याकरितां गुलाबसिंगाकडून या प्रांताबद्दल पंचाहत्तर हजार रुपये इंग्रज सरकारनें घेतले; परंतु काश्मीर प्रांत गुलाबसिंगाच्या प्रत्यक्ष ताब्यांत येण्यास त्रास व मेहनत पडलीच. लवकरच काश्मीर त्याच्या ताब्यांत आला; पण गिलजित प्रांत जो शिखांच्या अंमलाखालीं गेला होता, तो ताब्यांत आला नाहीं. गुलाबसिंगानें तो ताब्यांत आणण्याचा प्रयत्न करून गिलजितचा किल्ला काबीज केला. पण इ. स. १८५२ मध्यें सैन्यांत फितुरी होऊन डोग्रा सैन्य मारलें गेलें, आणि गिलजित प्रांत गुलाबसिंगाच्या ताब्यांतून गेला. गुलाबसिंगाला आतां ‘ महाराजा ’ असा किताब देण्यांत आला होता. गुलाबसिंग इ. स. १८५७ मध्यें मृत्यु पावला. त्याचा मुलगा रणवीरसिंग हा

गादीवर आला, व त्यानें शिपायांच्या बंडाच्या वेळीं इंग्रजसरकारला उत्तम मदत केली. या बंडाची धामधूम व त्यामुळें संस्थानला आलेल्या अडचणी संपल्यानंतर रणवीरसिंग महाराजांनीं गिलजित प्रांत परत मिळविण्याचा प्रयत्न केला, व इ. स. १८६० मध्यें महाराजांनीं तो प्रांत आपल्या ताब्यांत आणला. तेव्हांपासून गिलजित प्रांत काश्मीर संस्थानचा एक भाग झाला. रणवीरसिंग हा फार चांगला राजा होता. पण गुलाबसिंगाची कर्तबगारी त्याच्यांत नव्हती. रणवीरसिंग १८८५ सालीं वारला, व त्याचा मोठा मुलगा प्रतापसिंग हा गादीवर आला. हेच हल्लींचे काश्मीर व जम्मू संस्थानचे अधिपति आहेत. यांच्या कारकीर्दींत संस्थानांत किती तरी सुधारणा झाल्या आहेत. त्यांतली मुख्य ह्मणजे उत्तम रस्ते ही होय. यामुळें व व्यवस्थित राज्यपद्धतीनें काश्मीर हिंदुस्तानला सुलभदर्शन झाला आहे, व दिवसेंदिवस काश्मीरांत जाणाऱ्या प्रवाश्यांची संख्या सारखी वाढतच आहे. अशीं काश्मीरांत प्रवास करण्याचीं सुलभ साधनें झाल्यामुळेंच आमच्यासारख्या मध्यम स्थितींतील माणसांनासुद्धां ‘ हिंदुस्तानचें ’ नंदनवन ’ पाहणें शक्य झालें आहे. असो.



६

शंभर तासांत स्वस्थानीं.

मागील लेखांत लिहिल्याप्रमाणें या शेवटच्या लेखांत मी माझ्या प्रत्यागमनाची हकीगत देऊन वाचकांची रजा घेणार आहें. ज्याप्रमाणें नंदनवनाच्या विस्ताराच्या मानानें आमचा तेथला निवास म्हणजे निमिषार्धाचाच झाला, त्याप्रमाणेंच आमचें प्रत्यागमनहि विलक्षण घाईचें झालें. श्रीनगरहून निघाल्यापासून आह्मी सारखे प्रवासच करीत होतों ! घरीं येईपर्यंत आमच्या प्रवासाला खळ म्हणून पडला नाहीं. इतका जलद, इतका एकसारखा व इतका दगदगीचा प्रवास आजन्मांत मी केला नव्हता. बाकी आह्मी सर्व महिनाभर प्रवासच करीत होतों. एका महिन्यांत जाऊन येऊन सुमारें साडेतीन हजार मैल लांबीचा आमचा प्रवास झाला. एक महिन्याच्या प्रवासाचें वर्णन देण्यास मला बारा लेख लिहावे लागले. आतां प्रस्तुत लेखांत प्रवासाची आरती करावयाची आहे. या प्रत्यागमनाच्या प्रवासांत आह्मांला इतक्या अडचणी आल्या, वेळेवर पोहोंचण्याकरितां आह्मांला आमच्या पैशाच्या पिशवीचें तोंड इतकें सैल करावें लागलें, व एकंदर इतका त्रास व दगदग सोसावी लागली, कीं, या प्रवासांत, लहानपणीं वाचलेल्या जूल्सव्हर्ने या फ्रेंच कादंबरीकाराच्या ‘ ऐशीं दिवसांत पृथ्वी–प्रदक्षिणा ’ या नांवाच्या कादंबरीची व त्यांतील प्रसंगांची राहूनराहून मला आठवण होत होती. त्या कादंबरींतील नायकाचा प्रवास प्रचंड व दुर्घट पृथ्वीप्रदक्षिणेचा होता; आमचा त्या मानानें किती तरी लहान ‘ कोठें इंद्राचा ऐरावत व कोठें शामभटाची तट्टाणी ’ अशांतला होता. पण जरी या दोनहि प्रवासांत इतकें जमीनअस्मानाचें अंतर होतें, तरी त्यांत आलेले अनुभव, अडचणी,

प्रसंग, त्यांतून निभावून जाण्याकरितां काढलेले मार्ग आणि विशेषतः वेळेवर पोहोंचण्याकरितां झालेली मनाची व शरीराची धडपड यांमध्यें पुष्कळच साम्य आहे, ह्मणून, आणि केंव्हांकेंव्हां कल्पनेंत आणि वस्तुस्थितींत नांवापलीकडे फारसें अंतर नसतें हें दाखविण्याकरितां, माझ्या प्रत्यागमनाच्या हकीकतीच्या आधीं उपरिनिर्दिष्ट कादंबरीचें कथानक थोडक्यांत येथें देण्याचें योजिलें आहे.

१८७२ सालीं [illegible] एक मनुष्य रहात असे. तो अविवाहित असून जरी एकटा [illegible] विलक्षणच व्यक्ति होती. तो फार व्यव[illegible] अत्यंत नियमित असे. त्याचा सर्व व्यवहार मिनि[illegible]ेकंडप्रमाणें मोजलेल्या असावयाचा. त्यानें पासेपार-टाऊट नांवाचा एक फ्रेंच नोकर ठेवतांना त्याला सांगितलें. " या क्षणापासून म्हणजे ता. २ आक्टोबर १८७२ रोजीं अकरा वाजून एकोणतीसाव्या मिनिटापासून मी तुला नोकरीवर ठेविलें आहे. "

या गृहस्थाला पत्ते खेळावयाचा फार नाद असून तो ' रिफॉर्म क्लब ' मध्यें जाऊन नियमितपणें पत्ते खेळत असे. तारीख २ आक्टोबर रोजीं तो नेहमींप्रमाणें क्लबांत गेला असतां एका विलक्षण चोरीबद्दल तेथें बोलणें चाललें होतें. लंडन ब्यांकेंतून चोरानें पंचावन हजार पौंडांच्या नोटा चोरल्या होत्या. पत्ते चालू असतां याच विषयावर खूब वादविवाद चालला होता.

" तो चोर कोठें जाणार ? सांपडलाच पाहिजे ! " एक गृहस्थ ह्मणाला.

दुसरा ह्मणाला " त्याला जगांत किती तरी जागा रिकाम्या आहेत ! "

मिस्तर फॉग ह्मणाला " पूर्वीं होत्या ! "

दुसरा एक गृहस्थ ह्मणाला " ह्मणजे काय ? आतां काय जग संकुचित झालें आहे ? "

तिसरा ह्मणाला " होय; प्रवासाच्या साधनांनीं जग लहान झाल्यासारखेंच आहे. कारण, हल्लीं पूर्वींपेक्षां दसपट जलद पृथ्वीप्रदक्षिणा करतां येते. "

पुनः दुसरा गृहस्थ ह्मणाला " तीन महिन्यांत हल्लीं पृथ्वीप्रदक्षिणा करतां येते; या दृष्टीनें पृथ्वी लहान झाल्यासारखीच आहे खरी ! "

मिस्तर फॉग ह्मणाला " तीन महिने कशाला ? ऐशीं दिवसांत पृथ्वी-प्रदक्षिणा करतां येईल ! "

दुसरा गृहस्थ आश्चर्यानें ह्मणाला " काय ऐशीं दिवसांत ? "

तिसरा गृहस्थ ह्मणाला " हिंदुस्तानांत रेलवे झाल्यापासून ऐशीं दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा करणें शक्य आहे, व त्याचा क्रम एका ठिकाणीं दिलाहि आहे. पण हा निवळ अगदीं हिशेब झाला; प्रत्यक्ष प्रवासांत किती तरी अडचणी येतात. त्या नको का हिशेबांत धरायला ? आणि असें केलें म्हणजे ही गोष्ट अशक्य कोटीपैकींच आहे ! "

मिस्तर फॉग ह्मणाला " या सर्व गोष्टी हिशेबांत धरूनहि ऐशीं दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा शक्य आहे. "

पाहिला गृहस्थ ह्मणाला " तुह्मी करतां कां ऐशीं दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा ? करीत असाल, तर मी चार हजार पौंडांची पैज लावतों. "

फॉग म्हणाला " कबूल आहे मला ! बँकेंत माझे वीस हजार पौंड आहेत. पैज हरल्यास ते मी तुह्माला देईन."

झालें ! पैज ठरली !

फॉग म्हणाला " आज बुधवार तारीख २ आक्टोबर आहे. या खोलींत मी तारीख २१ डिसेंबर रोजीं रात्रीं पावणेंनऊ वाजतां परत येईन. आलों नाहीं तर वीस हजार पौंड तुमचे ! हा घ्या त्याबद्दलचा चेक ! "

लागलीच अशा अटींच्या कराराचा कागद झाला. मिस्टर फॉग अगदीं शांत होता. तो सात वाजेपर्यंत क्लबांत खेळला, व घरीं जाऊन प्रवासाकरितां वीस हजार पौंड बरोबर घेऊन नोकरासह पावणेनवांच्या गाडींत बसला. अशा रीतीनें मिस्तर फॉगच्या पृथ्वीप्रदक्षिणेला प्रारंभ झाला.

त्यानें प्रवासाचें टिपण ठेविलें, व ठरल्यावेळीं आपण ठरल्या ठिकाणीं आलों किंवा नाहीं, लवकर आलों कीं, उशीरां आलों, याचेंहि कलमवार टांचण त्यानें ठेविलें.

मिस्तर फॉग याच्या विलक्षण पैजेची व त्याच्या प्रवासाची बातमी सर्व

वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. त्यांत मिस्तर फॉगचें स्वरूपवर्णनहि आलें होतें.

मिस्तर फॉग साडेसहा दिवसांनीं सुएझ येथें आला, व आपल्या पासपोर्टवर इंग्रज कॉन्सलची सही घेण्याकरितां बंदरावर गेला. तेथें दोन दिवस आधींच आलेल्या फिक्स नांवाच्या पोलिस डिटेक्टिव्हशीं त्याची गांठ पडली.

फॉगच्या एकंदर घाईवरून व चेहऱ्यावरून बँकेंतील पंचावन हजारांच्या नोटा चोरणारा हाच मनुष्य असावा, असें त्या डिटेक्टिव्हला वाटलें. ह्मणून फॉगला पकडण्याबद्दलचें वॉरंट मुंबईला पाठविण्याची लंडनला तार करून तो स्वतः त्याच बोटीनें मुंबईस निघाला.

तांबड्या समुद्रांतून व हिंदी महासागरांतून मिस्तर फॉगचा प्रवास जलद झाला, व ती बोट मुंबईबंदरांत ठरल्या वेळेच्या दोन दिवस आधीं, म्हणजे २० आक्टोबर रोजीं आली. चार तासांनीं कलकत्ता मेल निघावयाची होती. फॉग यानें सुएझप्रमाणें तेथल्या कॉन्सलची सही आपल्या पासपोर्टवर घेतली. इकडे पासेपारटाऊट मुंबई पाहण्याकरितां शहरांत गेला, तो नकळत एका देवळांत शिरला. यामुळें देवळांतल्या उपाध्यायांना त्याचा राग आला. पण पासेपारटाऊट आपली टोपी व जोडे तेथेंच टाकून धांवत धांवत स्टेशनवर आला. इकडे डिटेक्टिव्ह फिक्स यानें कॉन्सलकडे जाऊन वॉरंटाबद्दल चवकशी केली. पण तें येणें अशक्यच होतें. त्याला तेथले अधिकारी वॉरंट देईनात. ह्मणून या माणसाला तेथें कसा अडकवून धरावा, या विवंचनेंत तो आहे, तोंच त्याला फॉगच्या नोकराच्या आगळिकीची बातमी लागली. तेव्हां कलकत्त्याला जाऊन या मंडळीला अटक करण्याचा निश्चय करून तो मागें राहिला, आणि फॉग व त्याचा नोकर हे कलकत्त्याच्या गाडीनें पुढें चालले.

आगगाडी अलाहाबादेच्या मागें पन्नास मैलांवर थांबली, व गाडीच्या गार्डनें सगळ्यांना उतरण्यास सांगितलें. ' अलाहाबादेपर्यंत चालत किंवा दुसरी हवी ती व्यवस्था करून उतारूंनीं गेलें पाहिजे. कारण, अजून इतका रस्ता रूळ टाकून तयार झाला नाहीं, ' असें त्यानें सर्वांना कळविलें. असा प्रसंग आला, तरी फॉगनें आपली शांतता मुळींच ढळूं दिली

नाहीं, व चालत जाण्याचा त्यानें निश्चय केला. इतक्यांत त्याच्या नोकरानें जवळच हत्तीचें वाहन मिळण्यासारखें आहे, असें त्याला सांगितलें. म्हणून फॉग त्या हत्तीवाल्याकडे गेला; पण तो हत्तीवाला भाड्यानें हत्ती देण्यास तयार होईना. तेव्हां फॉगनें तो हत्ती दोन हजार पौंडांना विकत घेतला, व एका पारशी गृहस्थाला वाटाड्या महात म्हणून घेऊन व खाण्यापिण्याचें सामानहि बरोबर घेऊन मंडळी हत्तीवरून जाऊं लागली.

त्यांना एका मोठ्या रानांतून जावयाचें होतें. नऊ वाजतां निघून सायंकाळपर्यंत ते पंचवीस मैल चालून गेले, व रात्रीं एका बंगल्यांत विसावा घेण्याकरितां राहिले. दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं चारांच्या सुमाराला त्यांना एक मोठी मिरवणूक दिसली. त्या पार्शी गृहस्थानें तिच्याकडे निरखून पाहून म्हटलें "ही एक सतीची मिरवणूक आहे. ही स्त्री तरुण असून ती एका म्हाताऱ्या राजाला दिली होती. त्या म्हाताऱ्याच्या प्रेताबरोबर तिला जाळावयाला नेत आहेत. पहांटेला तिला व नवऱ्याला चितेवर ठेवून जाळतील!"

ही भयंकर गोष्ट ऐकून फॉगला त्या स्त्रीची दया आली, व त्यानें तिला सोडविण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें हत्तीवरील सर्व मंडळी ज्या देवळांत त्या स्त्रीला नेलें होतें तेथें चोरून गेली. फॉगचा बेत असा होता, कीं, त्या स्त्रीबरोबरचे शिपाई व उपाध्याय झोंपीं गेले, कीं, तिला पळवून न्यावयाची; पण त्याला तशी संधि मिळाली नाहीं.

कांहीं वेळानें लांकडाची चिता रचून त्यावर त्या प्रेतास ठेवून त्याजवळ त्या स्त्रीला जुलमानें बसविण्यांत आलें. उपाध्यायांनीं चिता पेटविली. ती सारखी धुरकटत होती. फॉगला त्या 'सती' बद्दल अत्यंत वाईट वाटत होतें. इतक्यांत त्याच्या धाडशी नोकरानें काळोखांतून हळूच चितेवर जाऊन त्या स्त्रीला उचलून धरलें. त्यामुळें प्रेत जिवंत झालें, असें जवळच्या माणसांना वाटलें, व तीं सैरावैरा पळत सुटलीं. इतक्या धांदलींत त्या नोकरानें त्या स्त्रीला फॉगजवळ आणलें, व तिला लागलीच हौद्यांत घेऊन फॉग सपाट्यानें पुढें सरसावला. फॉगच्या नोकराच्या विलक्षण धाडसानें ती अनाथ स्त्री वांचली, व आपल्या खटपटीला यश

आलें, हें पाहून फॉगला अत्यंत आनंद झाला. त्या स्त्रीला अफूसारखे कांहीं मादक पदार्थ चारल्यामुळें ती बेशुद्धच होती.

मिस्तर फॉग अलाहाबादला पोहोंचला. त्यानें तो हत्ती त्या पारशी वाटाड्याला इनाम दिला. त्या स्त्रीकरितां कांहीं कपडे घेऊन ती तीन मंडळी कलकत्त्याच्या गाडींत बसली, व तारीख २५ ऑक्टोबरला सकाळीं सात वाजतां कलकत्त्यास येऊन पोहोंचली. फॉग स्टेशनवरून उतरतो, तों एका पोलिसनें त्या मंडळीला पोलीसठाण्यावर नेलें, व तेथें अटकेंत ठेविलें! आतां दोनप्रहरीं निघणारी आगबोट मिळण्याची मुष्कील झाली! साडे-आठ वाजतां न्यायाधीश येऊन पासेपारटाऊट यानें मुंबईस केलेल्या देव-ळांत शिरण्याच्या अपराधाबद्दल चवकशी करून त्यानें त्याला पंधरा दिव-सांची शिक्षा दिली. हें सर्व कृत्य अर्थातच त्या डिटेक्टिव्हचें होतें. त्यानें फॉगला थांबविण्याकरितां ही घोरपड त्याच्यावर आणली होती; पण फॉगनें शांतपणानें न्यायाधीशाला आपल्या नोकराला जामिनावर सोडण्याची विनंति केली, व न्यायाधीशानेंहि दोन हजारांच्या जामिनावर त्याला मोकळें केलें. फॉगनें दोन हजार रुपये रोख काढून दिले, व ते त्रिवर्ग बोटीकडे गेले. हा सर्व प्रकार पाहून फिक्स मनांत भारीच चडफडला; पण ना-इलाज म्हणून त्यानें कलकत्त्याहून हॉंगकॉंगला जाण्याचा बेत केला, व त्याच आगबोटीनें तोहि निघाला.

'रंगून' या बोटीचा प्रवास प्रथम चांगला झाला; पण पुढें मोठें वादळ झालें, व त्यामुळें आगबोट वेळेवर जाईल असें दिसेना. या प्रवा-सांत 'सती'च्या अनर्थापासून सोडविलेली स्त्री—हिचें नांव मिसेस आवडा-व मिस्तर फॉग यांची चांगली ओळख झाली. तसेंच फिक्सनेंहि पासेपार-टाऊटचा स्नेह संपादला, व तो त्याच्यापासून फॉगबद्दल माहिती काढूं लागला. माहितीवरून फॉग हाच त्या नोटांचा चोर असला पाहिजे, अशी त्याची जास्त जास्त खातरी होत चालली. आपलें वॉरंट हॉंगकॉंगला तरी येईल, अशी त्याला आशा होती. पुढें वॉरंट येऊन उपयोग नव्हता. कारण, पुढें ब्रिटिश प्रांत कोठेंच लागणार नव्हता; म्हणून फॉगला कांहीं

तरी करून अडकविण्याचा त्याचा बेत होता. म्हणून तुफानामुळें त्याला आनंदच झाला.

पण लवकरच हें तुफान शांत झालें, व तारीख ६ नवंबर रोजीं सकाळीं सहा वाजतां हाँगकाँग बंदरांत बोट आली. हाँगकाँगहून याकोहामाला जाणारी बोट तारीख ५ नवंबर रोजीं निघावयाची होती. अर्थात् फॉगला बोट मिळणें शक्य नाहीं, म्हणून फिक्सला आनंदाचें भरतें आलें; पण या अडचणीमुळें फॉग घाबरला नाहीं. त्यानें शांतपणें "याकोहामाची बोट केव्हां निघणार ?" असें खलाशास विचारलें.

त्यानें उत्तर दिलें, "उद्यां सकाळीं. बोटीचा बॉयलर मोडला असल्यामुळें तिला काल निघतां आलें नाहीं."

फॉगचें काय जोरावर नशीब पहा ! या बाबतींत फिक्सचा मात्र तडफडाट झाला.

फॉगनें प्रथमतः बंदरावर उतरल्यावर मिसेस आवडाच्या नातेवाइकाची (तो हाँगकाँगला व्यापारी आहे, असें तिला ठाऊक होतें,) चवकशी केली; पण तो तेथून कोठें निघून गेला होता, असें त्यांना समजलें. तेव्हां मिसेस आवडाला फॉगनें यूरोपांत नेण्याचा निश्चय केला, व हाँगकाँगला जाणाऱ्या बोटीवर तीन जागा रिझर्व्ह करण्याकरितां आपल्या नोकराला सांगून फॉग व मिसेस आवडा एका हॉटेलांत उतरलीं.

फिक्सहि त्या नोकराबरोबर गेला; कारण, हॉंगहॉंग येथें कॉन्सलजवळ चवकशी करतां वॉरंट आलें नसल्याचें त्याला कळलें. बोटीवर गेल्यावर पासेपारटाऊटला कळलें, कीं, बोट अजमासापेक्षां लवकरच दुरुस्त झाल्यामुळें ती रात्रींच निघून जाणार ! ही बातमी फॉगला समजली तर तो आपल्या हातचा कायमचा निघून जाणार, असें फिक्सला वाटलें म्हणून कांहींहि करून बोटीच्या निघण्याच्या वेळेच्या बदलाची बातमी फॉगला कळूं द्यावयाची नाहीं, असा निश्चय करून त्यानें पासेपारटाऊटला आपल्या कटांत घेण्याचा बेत केला !

बोटीचीं तिकिटें घेतल्यावर ते दोघे एका चहाच्या दुकानांत गेले, व तेथें फिक्सनें, 'आपण कोण आहों, फॉग हाच कसा चोर असावा, पृथ्वी-

प्रदक्षिणा हें त्याचें निवळ ढोंग आहे, तेव्हां हाँगकाँग येथें त्याला अडकवून ठेवण्यास तूं मदत केल्यास बँकेनें चोर धरून देणाराला ठेवलेलें अर्धें बक्षीस तुला मिळेल, ' असें आमिष त्याला दाखविलें; पण तो इमानी नोकर धन्याचा विश्वासघात करण्यास तयार होईना. तेव्हां फिक्सनें त्या नोकराला नकळत बोलतांबोलतां शेजारींच पडलेली अफूची चिलीम त्याला ओढण्यास दिली, व तिचा थोडासा धूर पोटांत गेल्याबरोबर तो तेथेंच बेशुद्ध होऊन पडला.

सकाळीं, आपला नोकर जागेवर नाहीं ह्मणून फॉगला आश्चर्य वाटलें, पण सामानसुमान घेऊन तो बंदरावर आला, तों काय ? त्याला कळलें, कीं, ' कर्नाटक ' बोट रात्रींच याकोहामाला गेली ! फिक्साहि बंदरावर आला होता. त्यानें थाप मारली, कीं, आपलीहि बोट फॉगच्या प्रमाणेंच गैरसमजामुळें चुकली. कांहीं झालें तरी फॉग हा धैर्य सोडणारा मनुष्य नव्हता. त्यानें सर्व बंदरांत याकोहामाला जाणाऱ्या बोटीचा तीन तास शोध केला. शेवटीं एका लहान जॉलीबोटीचा मालक त्याला भेटला.

त्याला फॉग ह्मणाला, " माझी कर्नाटक बोट चुकली. मला याकोहामाला जावयाचें आहे, व तेंहि चार दिवसांत. "

त्या बोटवाल्यानें सांगितलें, " शांघाय हें बंदर जवळ असून अमेरिकेला जाणारी बोट तेथून निघते; तेथें चार दिवसांत जाणें शक्य आहे."

झालें ! फॉगनें त्याला शंभर पौंड रोज ठरवून बोटीनें जाण्याचा बेत केला, व फिक्सलाहि यावयाचें असल्यास त्यानें बरोबर बोलाविलें. एका तासांत ही तीन मंडळी त्या जॉली बोटींत येऊन बसली. फॉगनें आपल्या नोकराची चवकशी करण्याकरितां पोलीसजवळ कांहीं पैसे दिले.

लहानशा जॉली बोटींतून तुफानी समुद्रांतून प्रवास करणें म्हणजे बिकट काम होतें; पण फॉगनें तें तडीस नेलें. ते शांघायपासून एकदोन मैलांवर येत आहेत, तोंच अमेरिकेला जाणारी बोट त्यांना दिसली. तेव्हां फॉगनें तोफ उडविण्यास व संकटाचें निशाण उभारण्यास बोटीच्या मालकाला सांगितलें.

ही खूण त्या आगबोटीला समजली, व तिनें या जॉली बोटींतील मंडळीला वर घेतलें. फॉगनें जॉली बोटीच्या मालकाला भाडें व वर दोनशें पौंड बक्षीस दिले. तेथून ते याकोहामाला गेले.

इकडे पासेपारटाऊट अफूच्या चिलमीनें जो झिंगून पडला, तो जागा झाल्याबरोबर उशीर झाला म्हणून कर्नाटक बोटीवर गेला, व त्या बोटीनें तो याकोहामाला आला. आपल्या मूर्खपणानें धन्याची पैज हरणार, म्हणून त्याला अतोनात वाईट वाटलें; पण तो तेथें कफल्लकच गेला होता. तेव्हां त्यानें अमेरिकेला जाणाऱ्या एका सरकस कंपनींत नोकरी धरली. ती सरकस पहाण्यास फॉग व मिसेस आवडा हीं आलीं होतीं. त्यांना पाहिल्याबरोबर पासेपारटाऊटनें आपलें सरकशींतलें काम सोडलें, व तो आपल्या धन्याजवळ आला. फॉगला आपला नोकर परत आल्याबद्दल अर्थातच भारी आनंद झाला.

याकोहामाला उतरल्याबरोबर डिटेक्टिव्ह फिक्स इंग्रजी कॉन्सलकडे गेला. तेथें त्याला वॉरंट मिळालें. पण आतां त्याचा काय उपयोग होता? कारण, आतां इंग्रजी अंमलाखालील मुलूख पुढें सर्व प्रवासांत कोठेंहि लागावयाचा नव्हता. म्हणून त्यानें आतां फॉगबरोबर इंग्लंडांत जावयाचें व तेथें त्याच्यावर वॉरंट बजवावयाचें, असा निश्चय केला. आतां मात्र फॉग इंग्लंडला लवकर जाईल तितकें फिक्सला चांगलें असल्यामुळें त्याच्या प्रवासास अडथळा आणण्याचा त्यानें प्रयत्न केला नाहीं. उलट, जलद प्रवास होण्यास जितकी मदत होईल तितकी त्यानें त्याला केली, व फॉग ज्या बोटीनें अमेरिकेस जाण्यास निघाला, त्याच बोटीनें तोहि निघाला.

याकोहामा सोडल्यापासून नऊ दिवसांनीं फॉगची अर्धी पृथ्वीप्रदक्षिणा संपली होती. ऐशीं दिवसांपैकीं बावन दिवस संपले होते खरे; पण पुढचा प्रवास सारखा सरळ होता. म्हणून राहिलेल्या मुदतींत तो तडीस जाणार, असें फॉगला वाटलें. मिसेस आवडाला आतां फॉग फारच आवडूं लागला. त्याचे तिच्यासंबंधानें कोणत्याच तऱ्हेचे मनोविकार मात्र बाहेर पडले नाहींत.

या मंडळीचा अमेरिकेचा प्रवास सुखरूप झाला, व ठरलेल्या वेळीं बोट सॅनफ्रान्सिस्कोला आली. येथून न्यूयॉर्क तीन हजार मैलांवर होतें.

पण तेथपर्यंत सारखी रेलवे होती. हा प्रवास सात दिवसांत संपवून लिव्हरपूलला जाणारी बोट अकरा नव्हेंबरला आपणांला मिळेल, असें फॉगला हिशेबावरून कळलें, व आपण पैज जिंकणार, असें त्याला वाटूं लागलें.

या मंडळीचा रेलवेचा प्रवासहि सुरक्षित झाला; पण मध्यें जंगलांत रेड इंडियन्सनीं एके ठिकाणीं रेलवेवर हल्ला केला, व पासेपारटाऊटला बंदिवान करून नेलें. आपल्या नोकराला असा टाकून पुढें जाणें फॉगच्या मनांत येणें शक्य नव्हतें. ह्मणून गेटावरील कांहीं शिपाई घेऊन तो त्या इंडियनांचा पाठलाग करीत गेला, व त्यानें शर्थीनें लढून आपल्या नोकराला सोडवून परत आणलें; पण ते स्टेशनवर येतात; तों आगगाडी पुढें निघून गेलेली।

दुसरी गाडी सायंकाळपर्यंत यावयाची नव्हती. आतां फॉगला ठरलेल्या वेळापेक्षां वीस तास उशीर झाला होता. पण काय करणार? इतक्यांत फिक्सनें एक युक्ति सुचविली. अमेरिकेंत थंडीच्या दिवसांत जिकडे तिकडे बर्फ पडलेलें असतें, व त्यावरून शिडाच्या साहाय्यानें जलद चालणाऱ्या 'स्लेज' नांवाच्या गाड्या असतात, त्या केव्हां केव्हां आगगाडीपेक्षांहि जलद चालतात. अशा स्लेजनें पुढें जावें, असें फिक्सनें सुचविलें.

हें ऐकल्यावरोबर स्लेजनेंच जाण्याचा निश्चय करून फॉगनें ती ठरविली, व फिक्स धरून तीं चवघेंजणें या विलक्षण वाहनांतून निघालीं. वाटेनें त्यांना अत्यंत थंडी वाजली; पण याप्रमाणें त्यांनीं दोनशें मैलांचा प्रवास केला, व लागलीच आगगाडी गांठली. तेथून त्यांना अजून नऊशें मैल जावयाचें होतें. कोणत्याहि तऱ्हेचा अडथळा न होतां ते न्यूयॉर्कला अकरा डिसेंबर रोजीं रात्रीं अकरांच्या सुमाराला येऊन पोहोंचले.

पण काय नशीब! लिव्हरपूलला जाणारी बोट पाऊण तास आधीं सुटली होती! झालें! एक पाऊण तासाकरितां पैज हरण्याचा प्रसंग आला! पण फॉग निधड्या छातीचा माणूस होता! त्यानें सर्व डॉक फिरून, तावडतोब निघणाऱ्या आगबोटीची चवकशी केली. शेवटीं एक रिकामी बोट त्याला दिसली. ती तावडतोब निघावयाची होती; पण त्या बोटीचा मालक बोर्डोला जावयाचा होता, व तो उतारू नेण्यास तयार

नव्हता. " मला कोणी दोनशें डॉलर्स उतारूपाठीमागें दिले, तरी त्यांना मी नेणार नाहीं ! " असें तो ह्मणाला.

फॉगनें शांतपणें त्याला उत्तर दिलें, " दरमाणशीं दोन हजार डॉलर्स देतों. "

इतकें भाडें ऐकून त्या बोटीच्या मालकाच्या तोंडाला पाणी सुटलें, व त्यानें त्यांना नेण्याचें कबूल केलें; ते चौघे बोटींत ताबडतोब आले, व बोट सुरू झाली.

फॉगनें हळुहळू सर्व खलाशी अनुकूल करून घेतले, व त्या मालकाला बंदिवान करून त्यानें आगबोट लिव्हरपूलकडे विलक्षण जोरानें हांकण्यास सांगितलें. त्यांचा हा प्रवास झपाट्यानें झाला. ता. १६ डिसेंबर रोजीं अमेरिका व लंडन यांमधील त्यांचा अर्धा प्रवास संपला.

इतक्यांत एंजिनियरनें सांगितलें " कोळसा संपत आला ! "

फॉग म्हणाला " कांहीं हरकत नाहीं ! कोळसा असेपर्यंत जोरानें चालूं द्या. "

नंतर त्यानें त्या मालकाला त्याच्या कैदेच्या कोठडींतून बाहेर काढलें, व म्हटलें, " आगबोट मला विकत देतोस कीं काय, हें विचारण्याकरितां मी तुला इथें बोलाविलें आहे. "

मालक रागानें ओरडून म्हणाला " नाहीं, बोट मी विकणार नाहीं ! "

" तर मग मला सरपणाकरितां तिचा कांहीं भाग जाळला पाहिजे ! "

मालक उद्गारला " जाळली पाहिजे ! मला तिच्याकरितां पन्नास हजार डॉलर पडले आहेत ! "

" हे घे साठ हजार ! " असें म्हणून फॉगनें तितक्या किंमतीच्या नोटा मालकापुढें ठेवल्या.

यामुळें बोटीच्या मालकाचा राग कोठल्या कोठें गेला, व त्यानें जलद प्रवासाकरितां पाहिजे तें करण्याचा निश्चय केला.

लिव्हरपूलला बोटीनें जाण्यापेक्षां आयर्लंडला जाण्यानें कांहीं तास कमी लागतील, असें कळल्यावरून ते तेथें उतरले, व लगेच डब्लिनला जाऊन तेथें बोटींत बसून ते लिव्हरपूलला बारा वाजतां पोहोंचले.

येथून लंडन सहा तासांच्या पल्ल्यावर राहिलें होतें. पण मंडळी धक्क्या-वर उतरल्याबरोबर फिक्सनें वॉरंट काढलें, व फॉगला अटक केली. झालें! इतकी खटपट करून लंडनला जाण्याची वेळ असूनहि या अटकेमुळें पैज बुडणार असें फॉगला वाटलें. त्यानें आपल्या डायरींत ' शनिवार ता. २० दिजंबर बारा,' असें लिहून ठेवलें. अजूनहि त्याला लंडनला पोहोंचणें शक्य होतें.

इतक्यांत फिक्स परत आला, व त्यानें ' खरा चोर सांपडला; आपली अटक काढली आहे,' असें त्याला सांगितलें. त्याबरोबर फॉगनें त्याला एक गुद्दा लगाविला.

मिसेस आवडा, पासेपारटाऊट व फॉग ही मंडळी स्टेशनवर येऊन स्पेशलनें निघाली, व लंडनला नवांच्या आधीं दहा मिनिटें स्टेशनवर पोहोंचली.

फॉग घरीं आला, तों पांचच मिनिटें उशीर झाला. एवढीं संकटें सोसून सर्व पृथ्वीप्रदाक्षिणा करून तो आला पण पांचच मिनिटें उशीर झाला !

झालें ! फॉग पैज हरला ! प्रवासांत व पैजेंत त्यानें आपले बहुतेक पैसे घालविले ! अर्थात् ती रात्र सर्वांना अत्यंत दुःखांत गेली.

दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं त्यानें आवडाची भेट घेतली, व " माझी राहिलेली सर्व इस्टेट मी तुह्मांला दिली आहे, " असें तो तिला दुःखानें म्हणाला.

मिसेस आवडा ह्मणाली " तुह्मी पुढें काय करणार ? या दुःखांत तुह्माला कोणी वांटेकरी आहे काय ? "

फॉग ह्मणाला ' नाहीं ! मी जगांत एकटा आहें. मला कोणी स्नेही किंवा नातेवाईक नाहीं ! जिवलग मित्र असल्यास मनुष्याला दुःख सहन करण्यास धैर्य येतें."

मिसेस आवडा म्हणाली " मी आपली धर्मचारिणी होऊन आपल्या दुःखाची वांटेकरीण होण्यास तयार आहें !"

तिचें हें भाषण ऐकून अशा दुःखद स्थितींतहि फॉगला फार आनंद झाला, व तो म्हणाला " माझें तुमच्यावर प्रेम जडलें आहे. आपल्या ह्मणण्यास मी आनंदानें रुकार देतों."

फॉगनें ताबडतोब आपल्या नोकराला बोलावून आणलें, व आपण आठ वाजतां लग्न करणार, असें त्याला सांगून त्या प्रसंगीं शेजारच्या देवळांतील उपाध्यायाला वेळेवर येण्यास सांगण्याकरितां त्याला पाठविलें.

तो चाकर आनंदानें उड्या मारीतच गेला. देवळांत त्याला कळलें, कीं, उद्यां रविवार असल्यामुळें लग्न होणें शक्य नाहीं ! तत्क्षणीं ' आज शनिवार आहे,' असें त्याला कळलें. मग काय विचारतां ! त्याचा आनंद गगनांत मावेना ! तो धापा टाकीत फॉगकडे आला, व त्यानें ' आज शनिवार ' असें त्याला सांगितलें. फॉगला भारी आश्चर्य वाटलें; पण ती आश्चर्याची वेळ नव्हती. तो ताबडतोब क्लबांत जाण्यास निघाला.

इकडे क्लबांत फॉगची स्नेहीमंडळी त्याची वाट पहात होती. फॉग लिव्हरपूलला आल्याबद्दल कांहीं एक बातमी नव्हती. तेव्हां तो लंडनला येणें शक्य नाहीं, म्हणून पैज जिंकल्याबद्दल ती मंडळी आनंदांत गर्क झाली होती, तोंच नवांच्या ठोक्याला फॉग क्लबच्या दारांत आला, व म्हणाला "सद्गृहस्थहो! हा मी पृथ्वीप्रदक्षिणा करून ठरल्याप्रमाणें आलों!"

सर्व मंडळी आश्चर्यानें थक्क झाली. फॉगनें पैज जिंकली. त्याचे वीस हजार पौंड वांचले, व पांच हजार आणखी मिळाले.

त्यानें हजारों पौंड प्रवासांत खर्च केले होते. पण त्यानें पैशाकरितां पैज मारलीच नव्हती. आतां फॉगसारख्या व्यवस्थित माणसाची दिवस मोजण्यांत अशी चूक कशी झाली, हा प्रश्न उद्भवतो. याचें उत्तर असें आहे, कीं, फॉग पूर्वेकडे प्रवास करीत गेल्यामुळें त्याला नकळत एक दिवस त्याच्या पदरांत पडला होता. कारण, तो पूर्वेकडे जात असतांना प्रत्येक डिग्रीच्या मागें चार मिनिटें त्याला मिळालीं, व ३६० डिग्री ८० दिवसांत प्रवास केल्यावर बरोबर त्याला वीस तास मिळाले. म्हणजे त्याला जें आपण शनिवारीं रात्रीं लंडनला पोहोंचलों असें वाटलें, तें खोटें होतें. तो खरोखरी शुक्रवारीं पोहोंचला होता.

याप्रमाणें विलक्षण त्रास व दगदग करून व पैसे खर्च करून ठरल्या वेळांत फॉगनें आपली पृथ्वीप्रदक्षिणेची पैज सिद्धीस नेली.

वर वर्णिलेल्या पृथ्वीप्रदक्षिणेपेक्षां आमच्या प्रत्यागमनाचा प्रवास फारच लहान होता. तरी पण आह्मांला सुमारें सतराशें मैलांची वाट चालावयाची होती. त्यांपैकीं सुमारें दोनशें मैल तर टांग्यानें जावयाचें होतें. पैजेकरितां नव्हे, पण कामाकरितां आह्मांलाहि नियमित वेळांतच हा प्रवास संपवावयाचा होता. माझ्या बंधूचें कोर्ट ता० ७ जूनला उन्हाळ्याच्या सुटीनंतर उघडावयाचें होतें. तेव्हां मुंबईहून त्यांना निदान सहा तारखेच्या बोटीनें निघणें प्राप्तच होतें. ह्मणजे आह्मांला मुंबईला पांच तारखेला पोहोंचावयाला पाहिजे होतें. बिजलीबाबूंपाशीं या प्रवासाची चवकशी करतां त्यांनीं आह्मांला सांगितलें होतें, कीं, मेल टांग्यानें दोन दिवसांत रावळपिंडीला जातां येतें. आगगाडीनें मुंबईपर्यंत दोन दिवस लागतात. तेव्हां पहिल्या जूनला सकाळीं निघाल्यास दुसऱ्या जूनला रात्रीं आठदहापर्यंत रावळपिंडीला सहज पोहोंचतां येईल, व तेथून तिसऱ्या तारखेला सकाळच्या कलकत्ता मेलनें निघून लाहोरला दोनप्रहरीं जाऊन, तेथें चारएक तास विश्रांति घेऊन, आणि जेवणखाण आटपून, बॉंबे बरोडाच्या आगगाडींत रात्रीं आठ वाजतां बसलें ह्मणजे मुंबईला पांच तारखेस आठ नऊ वाजतां जावें, असा आम्ही मनाशीं बेत ठरविला होता. तो कसा व कितपत तडीला गेला, त्याचेंच आतां वर्णन करावयाचें आहे.

तारीख १ जून—आह्मी पहाटेला पाच वाजतां धनजीभाईच्या टांग्याच्या अड्ड्याशीं आलों. टपालाचीं पार्सलें व इतर सामान घेऊन तीन टांगे निघावयाचे होते. आह्मी एकएक एकएका टांग्यांत बसलों, व साडेपांच वाजतां टांगे चालू झाले. टपालाच्या टांग्याचे टप्पे दर पांच मैलांवर आहेत. सरासरी एक टप्पा चालण्यास चाळीसपासून पंचेचाळीस मिनिटें लागत, असें आमच्या दृष्टोत्पत्तीला आलें. प्रत्येक टप्प्याच्या ठिकाणीं घोडे बदलण्यास आठदहा मिनिटें लागत. तेवढा काय तो विसावा! बाकी या टपालाच्या टांग्यांत मनुष्य हादरूनहादरून त्याचे सांधे अगदीं दुखावयाला लागतात.

श्रीनगरपासून बारामुळ्यापर्यंत रस्ता सपाट आहे, व त्याच्या दोन्ही बाजूंना सफेद्याचीं झाडें आहेत, हें मागें सांगितलेंच आहे. आह्मी नंदनवन दूर टाकून भराभर पुढें चाललों होतों, याबद्दल मिश्र विकार माझ्या मनांत येत होते. सुदैवानें इतका सुंदर प्रदेश आपणाला पहावयास मिळाला, याबद्दल आनंद होत होता, तर पुनः कधीं या प्रांतांत येण्याला पैशाची व वेळाची आपणाला सवड व्हावयाची नाहीं; आतां त्या नंदनवनाचें पुनर्दर्शन दुर्लभ आहे, असें मनांत येऊन वाईट वाटत होतें.

सभोंवारची वनश्री व हिमश्री मधूनमधून मन आकर्षित होतीच. 'आज टांगे कोठपर्यंत जाणार ?' अशी हांकणारापाशीं सहज चवकशी करतां त्यानें सांगितलें, कीं 'टांगे साठपांसष्ट मैलांवर जाऊन थांबतील.' ही बातमी ऐकून आमचें धावें दणाणलें. कारण, टांगे सायंकाळीं सातसाडेसातपर्यंत तरी चालतील, व तसें झाल्यास एका दिवसांत निदान ऐशींनव्वद मैलांचा पल्ला आपण गांठूं, असा आमचा अंदाज होता. पण तो अंदाज ढांसळणार, व तसें झाल्यास आमचे पुढचे आगगाडी साधण्याचे बेत फसणार, असें आह्मांला वाटूं लागलें, व मनाला ही नवी हुरहूर लागली. अकरा साडेअकरांच्या सुमाराला आह्मी बारामुळा येथें पोहोंचलों ह्मणजे पसतीस मैल पल्ला आह्मी गांठला. 'आम्हांला रावळपिंडीला उद्यां रात्रीपर्यंत तरी जाणें आवश्यक आहे, तरी टांगा सायंकाळपावेतों चालविण्यास हांकणाराला सांगावें,' अशी आम्ही तेथल्या एजंटाला विनंति केली, व त्यानें टांगेवाल्याला तसें सांगतों, म्हणून कबूलहि केलें.

नवे घोडे जोडून झाल्याबरोबर आमचे टांगे निघाले. यानंतर आम्ही हिमालयाच्या प्रचंड दऱ्याखोऱ्यांत प्रवेश करणार होतों, यामुळें मनाला एक प्रकारची भीति वाटली. आतां दीडशें मैलपर्यंत सपाटी किंवा मैदान याचें नांवहि काढावयाला नको; आतां आमचे सोबती म्हणजे झेलम नदी, प्रचंड पहाड, गर्द रानें व हिमाच्छादित पर्वतशिखरें हीं होत, असें माझ्या मनांत येत आहे, तोंच आम्ही बारामुळ्याची सपाटी टाकून हिमालयाच्या प्रचंड रांगांच्या दरवाज्यांतून दरींत प्रवेश केला, व झेलमच्या नागमोडी रस्त्याला प्रारंभ झाला.

आणखी दोन टप्प्यांनीं आम्ही रामपुरला आलों. टांगा प्रत्येक टप्प्याला फारच थोडा वेळ रहात असे; यामुळें आम्हाला फराळसुद्धां टांग्यांतच करावा लागे. रामपुराहून श्रीनगरला जेथून वीज नेली आहे, तें ठिकाण –मोहरा–एका टप्प्यावरच आहे. येथें आम्ही आलों, तों दोन वाजले.

तेथून आणखी दीड तासानें म्हणजे साडेतीन वाजतां आम्ही उरी या मोठ्या गांवीं आलों. अजून तीन तास टांगा चालण्यास कांहींएक हरकत नाहीं, व इतक्या वेळांत आणखी वीसपंचवीस मैलांचा पल्ला गांठतां यावा असें आम्हाला वाटलें. त्याप्रमाणें आम्ही टांगा हांकणाराला सांगितलें, व त्याला पुढें चालण्याकरितां बक्षीसहि देऊं केलें. बारामुल्याप्रमाणें येथल्याहि एजंटाला, आम्हांला रावळपिंडीला लवकर पोहोंचण्याची किती निकड आहे याबद्दल आम्ही सांगितलें. पण तो एजंट म्हणाला "येथून पुढें टपाल आतां निघणें शक्य नाहीं. कारण, उरीस पंच या भागाकडून टपाल यावयाचें असतें तें सायंकाळीं येतें, व मग पहांटेस तेथून टपालाचा टांगा सुटतो. उद्यां मात्र टांगा जाईल तितका पुढें नेण्यास मी हांकणाराला सांगेन."

तेव्हां आमचा नाइलाजच झाला. पण पुढें तरी लवकर जाण्यास सांपडेल, यावर आम्ही समाधान मानलें. उरीस आम्ही हिंदू स्वयंपाकघरांत बिऱ्हाडास राहिलों. कारण, सबंध दिवसांत आम्हांला जेवण मिळालें नव्हतें. म्हणून तेथें भोजन करून लवकरच आम्ही विश्रांति घेतली, व बासष्ट मैलांच्या प्रवासाच्या दगदगीनें आम्हांला झोंपहि ताबडतोब लागली.

तारीख २ जून—उरीहून आम्ही पहाटेला पांच साडेपांच वाजतां निघालों. उरी येथें नदीपासून पहाड जरा दूर दूर गेले असल्यामुळें थोडी मोकळी जागा आहे, व त्यामुळें मनाला कोंडल्यासारखें किंवा सांधींत सांपडल्यासारखें वाटत नाहीं. हें ठिकाण श्रीनगरपेक्षां आठशें फूटच खालीं आहे. येथून मात्र रस्ता पुनः पहाडांच्या चिळणींतून चालला आहे, व आपण खोलखोल उतरत आहों, असें वाटतें, व तें खरेंहि आहे. कारण, येथून चाकोटी चवदाच मैल आहे; पण इतक्यांत आठशें फुटांचा उतार

आहे. चाकोटीला आम्ही साडेसातांच्या सुमाराला आलों, व थोडेंसें कांहीं खाऊन पाणी प्यालों.

येथून आम्ही निघालों, ते एका तासानें चिनारीस आलों. श्रीनगरला जातांना याच ठिकाणीं आम्ही विश्रांतीकरितां दोनअडीच तास थांबलों होतों. यामुणें हें ठिकाण ओळखीचें असें आम्हाला वाटलें.

चिनारीहून पुनः एका तासानें हट्टी या ठिकाणीं आम्ही आलों. आमच्या पहिल्या प्रवासांत या ठिकाणीं आह्मी रात्रीची वसती केली होती; पण आतां येथें आठदहा मिनिटांपेक्षां जास्त वेळ घालवितां येणें आह्मांला शक्य नव्हतें. आज आमचे खाण्याचे हालच चालले होते; पण आमचें लक्ष्य रावळपिंडीला आह्मी केव्हां जातों, इकडे लागलें होतें, यामुळें खाण्यापिण्याकडे लक्ष्य द्यावयाला आह्मांला सवडच नव्हती.

गढीला आह्मी बारा वाजतां येऊन गढीहून दोनअडीच तासांनीं डोमेल या ठिकाणीं आलों. येथेंच अपटाबादकडून येणारा रस्ता रावळ-पिंडीच्या रस्त्याला येऊन मिळतो. येथें किशनगंगानदी झेलमला येऊन मिळते. येथें संगमाच्या ठिकाणीं चांगला दगडी पूल बांधलेला आहे. येथला देखावा केवळ अद्वितीय आहे. तो पुनः एकदां निरखून पहाण्यांत आह्मी अगदीं गढून गेलों. येथपर्यंत झेलमनदी पश्चिमवाहिनी आहे, ती आतां एकदम दक्षिणवाहिनी होते. किशनगंगा थेट उत्तरेकडून येते. यामुळें किशनगंगा पुढें झेलम होते, असा येथें भास होतो. उरीपेक्षां डोमेल दोन हजार फुटांनीं सखल आहे.

येथून दोन टप्प्यांनीं डुलाई हें गांव आलें. येथें आह्मी चार वाजतां आलों. येथून एका टप्प्यानें आह्मी छत्तरला आलों. जातांना येथें आह्मी विश्रांतीकरितां थांबलों होतों. येथल्या धोधो वहाणाऱ्या झोताखालीं त्या वेळी आह्मी स्नानहि केलें होतें; पण आतां तितका वेळ नव्हता, तरी त्या सुंदर झऱ्याचें पाणी पिण्यास आह्मी विसरलों नाहीं.

येथून एका तासानें आह्मी कोहाल्यास आलों, तों साडेपांच होऊन गेले होते. येथें झेलमनदीचा पूल ओलांडला, कीं, ब्रिटिश हद्द लागते. आतांपर्यंत आह्मी काश्मीर संस्थानच्या हद्दींत होतों. नंदनवनाची हद्द

संपली, हें पाहून मनाला थोडेंसें वाईट वाटलें. आमच्या प्रवासांतील सर्वांत सखल ठिकाण म्हणजे कोहाला हें होय. हें समुद्रसपाटीपासून अवघें दोन हजार फूट उंच आहे. श्रीनगरपासून आम्ही आतां बत्तीसशें फूट खालीं आलों होतों, व तेथून १३४ मैलांचा पल्ला गांठला होता. येथून रावळपिंडी फक्त चवसष्ट मैल राहिली, ह्मणून आह्मांला आनंद झाला.

आतां साडेपांच झाले होते, व टांगेवाला येथेंच थांबावयाचें म्हणून म्हणत होता; पण आम्ही त्याला आणखी एक मुक्काम तरी पुढें चालण्याबद्दल आग्रह केला, व त्यानेंहि तें कबूल केलें. आम्ही पुढें निघालों, ते साडेसात वाजतां फुगवाडीस आलों. कोहाल्यापासून सारखा चढणीचा रस्ता लागतो. कारण, मरीपर्यंत साडेपांच हजार फूट चढावयाचें असतें. फुगवाडीला आह्मी वसती केली. पहिल्या प्रवासांत रावळपिंडीहून निघून सायंकाळीं आह्मी फुगवाडीलाच वसतीला आलों होतों. मागच्या खेपेला आह्मी येथें जेवण केलें होतें. पण आतां कांहीं हा त्रास आह्मांला होईना. तेथें मिळणाऱ्या पुऱ्या–भाजीवरच आह्मी भूक भागविली. दोन दिवस मिळून आमचा एकंदर एकशेंचवेचाळीस मैलांचा पल्ला पुरा झाला. आतां रावळपिंडीहून सकाळीं निघणारी कलकत्ता मेल मिळून आह्मी लाहोरला जेवणखाण करण्यास जाणार होतों, तो बेत सिद्धीला जाणें अशक्य झालें. मुंबईला ५ तारखेला पोहोंचावयाचें असल्यास रावळपिंडीला दोनप्रहरीं दीड वाजतां निघणारी गाडी गांठून थेट बी. बी. सी. आय.नें जाण्याचा आह्मी बेत केला; पण तो तरी साधतो कसा, अशी आम्हांला विवंचना होतीच; पण जास्त खर्च झाला तरी फिकीर न करतां तो तडीला नेण्याचा आह्मी निश्चय केला. आह्मांला मरीस लवकर नेऊन पोहोंचवण्याबद्दल टांगेवाल्याला बजावून आह्मी फुगवाडींत एका वाण्याच्या घरांत चौपाईवर झोंपीं गेलों.

तारीख ३ जून–सकाळीं साडेपांच वाजतां आह्मी टांग्यांत बसलों, व टांगेवाल्याला जलद टांगा हांकण्यास सांगितलें. कोहाल्यापासून मरीपर्यंत सारखा चढता रस्ता आहे. यामुळें टांग्याचा वेग तितका जोराचा असत नाहीं. तरीपण आह्मी दोन तासांत मरीला आलों. धनजीभाईच्या

टांग्याच्या अड्ड्यावर आह्मी येतों, तों साडेसात झाले. तेथून रावळपिंडी बरोबर चाळीस मैल राहिली होती. टपालाचे टांगे सायंकाळीं चारपांचच्या सुमाराला पोहोंचतील, असें आम्हांला समजलें. आह्मांला तर रावळपिंडीला दोनप्रहरची दीड वाजतांची गाडी गांठणें अवश्य होतें. ती साधली तरच आह्मी पांच तारखेला मुंबईला जाणें शक्य होतें. अजून रावळपिंडीहून आगगाडी सुटण्यास सहा तास अवकाश होता. तेव्हांच्या तेव्हां स्वतंत्र टांगा काढला तर आह्मी रावळपिंडीस वेळेवर पोहोंचूं, असें आह्मांला वाटलें. त्याप्रमाणें आह्मी एजंटाला विचारलें. तो म्हणाला "तुमचीं दोन तिकिटें आहेत. आणखी एक तिकीट काढीत असलां, तर ताबडतोब तुह्मांला स्वतंत्र टांगा देतों."

आह्मी लागलीच मरीपासून रावळपिंडीचें साडेसात रुपये देऊन आणखी एक तिकीट घेतलें, व टांगा घाईघाईनें जोडण्यास सांगितलें. आह्मांला थांबावयाला मुळींच वेळ नव्हता. ह्मणून थोडेंसें दूध व केळीं घेतलीं, व त्यांवर न्याहारी करून बरोबर आठ वाजतां टांग्यांत पाय ठेवला. आह्मांला आतां पांच तासच होते. चाळीस मैल जाण्यास ताशीं आठ मैल—टप्प्याच्या ठिकाणीं होणारा खोळंबा धरून—चालण्याचा वेग पडला पाहिजे, तरच आह्मी वेळेवर पोहोंचणार, हें उघड होतें. पण आतां सात हजार फुटांचा उतार होता, तेव्हां वेळेवर जाऊं, अशी आह्मांला बरीच आशा वाटूं लागली. टांगेवाल्यालाहि बक्षिसाचें आमिष आह्मी लावलेंच होतें. तेव्हां अर्थातच तोहि टांगा भरधांव चालवीत होता.

रावळपिंडीपर्यंत आठ टप्पे होते. अर्थातच आह्मांला सात ठिकाणीं घोडे बदलावयाचे होते. त्यांत सरासरी एक तास जाणार असल्यामुळें टांग्याचा प्रत्यक्ष वेग ताशीं दहा मैलांचा पाहिजे होता. त्याप्रमाणें एक टप्पा आह्मी पसतीस मिनिटांत गांठीत होतों. घोडे जोडण्यास सरासरी दहा मिनिटें मोडत; तेव्हां पाऊण तासानें पांच मैल, असा वेग पडत होता.

आह्मी आतां हिमालयाची शेवटची प्रचंड ओळ भराभर उतरत होतों. अजूनहि हिमालयांतील विशिष्ट झाडें व विशेषतः उंचउंच फर झाडें लागत होतीं. पण लवकरच तीं दृष्टीआड होत चाललीं, व पंजाबांतील

देखाव्यासारखा देखावा दिसूं लागला. आमचा पाऊण तासांत पांच मैल हा वेग अजूनहि कायम होता. याप्रमाणें सारखे दौडत आह्मी पंचवीस मैल पल्ला गांठला. आतां पुढें सपाटीचा रस्ता राहिला.

सर्व घाट संपला खरा; पण या टप्प्याला येतों, तों बारा वाजले. आतां फक्त दीड तास राहिला, आणि आह्मांला पंधरा मैल जावयाचें होतें. आमची गाडी चुकते कीं काय, अशी आतां मनांत धाकधूक वाटूं लागली. इतक्यांत आणखी एक अडचण उपस्थित झाली. टप्प्यावर घोडे मुळींच शिल्लक नव्हते ! कारण, आतां काश्मीर व मरीकडे जाणारे टांगे फार होते. येणारे तितके नव्हते. यामुळें ठाण्यावर घोडा नव्हता.

झालें ! आतां आमची गाडी चुकणार, व आमचा वेळेवर मुंबईस जाण्याचा बेत ढांसळणार, हें पाहून आह्मांला विलक्षण वाईट वाटलें. टप्प्याचा अड्डेवाला ह्मणाला, " एक घोडा आहे, पण तो अजून जोखडाला कधींहि जोडलेला नाहीं. " टांगा हांकणाराला बक्षीसीची लालुच होतीच. तेव्हां त्यानें असा घोडा प्रथमच टांग्याला जोडण्याचें कबूल केलें, व आपण आतां खास वेळेवर पोहोंचणार, अशी आशा आह्मांला वाटूं लागली ! आह्मी दोनतीन माणसांनीं टांग्यास आणलेला घोडा सोडला, व दुसरा घोडा जोडूं लागलों. तो प्रथम जोखडाखालीं उभाच राहीना ! पण मोठ्या प्रयासानें आह्मी त्याच्या मानेवर जूं ठेवलें; तोंडांत लगाम घातली, व हांकणाराच्या हातीं वादी दिली मात्र—टांग्यांत आह्मी आधींच बसलों होतों—तों घोडा वाऱ्यासारखा पळूं लागला; दुसऱ्या घोड्याची त्रेधा झाली; पण त्याच्याबरोबर तो चालत होता. या घोड्याचा वेग इतका विलक्षण होता कीं, आह्मी टांग्यांत घाबरून गेलों. आज कांहीं आपली धडगत नाहीं, टांगा कोठें तरी खड्डयांत पडून त्याचा चक्काचूर होऊन आह्मांला इजा होणार, असें क्षणोक्षणीं वाटूं लागलें; पण हांकणारा मोठा हिमतीचा माणूस होता. तो आह्मांला धीर देत लगामानें घोड्याला आवरण्याचा प्रयत्न करीत होता. पण व्यर्थ ! घोडा अगदीं बेफामपणें चालला होता. शेवटीं तो टप्प्याजवळ आला. हांकणारानें टांगा शिकस्तीनें थांब-

विला, व तो घोडा टांग्यापासून दूर केला, तेव्हां आमच्या जिवांत जीव आला. घड्याळांत पहातों तों आह्मी पंधरा मिनिटांच्या आंत या टप्याला आलों होतों.

आतां काय, रावळपिंडी फक्त दहा मैल होती, व आह्मांला अजून सवा तास होता. पुढला एक टप्पा आह्मी अर्ध्या तासाच्या आंतच गाठला व रावळपिंडीच्या स्टेशनांत आलों, तों गाडीला वीस मिनिटें अवकाश होता. आह्मी टांगा हांकणाराला दोन रुपये बक्षिस दिले. इतका त्रास व दगदग करून, अन्नपाण्याखेरीज बहुतेक प्रवास करून आह्मी शेवटीं वेळेवर येऊन पोहोंचलों. यामुळें आह्मांला फार आनंद झाला, व तहानभूक त्या वेळापुरती तरी आह्मी पार विसरून गेलों.

तिकीट ऑफिसांत चवकशी करतां या गाडीला तिसरा क्लास नाहीं, असें आह्मांला कळलें. तेव्हां आमच्या मनाची पुनः चलबिचल झाली. पण विचार करण्यास आतां वेळ नव्हता. इतक्या खटाटोपानें आल्यावर पैशाकरितां गाडी चुकाविणें बरोबर नव्हतें, व लाहोर पासून आह्मांला बी. बी. सी. आय. रेलवेनें तिसऱ्या क्लासानें जातां येत होतें. म्हणून रावळपिंडीपासून लाहोरपर्यंतचीं सेकंड क्लासचीं दोन तिकिटें काढून आह्मी गाडींत येऊन बसलों. मरीहून येण्याकरितां व ही गाडी मिळण्याकरितां आमच्या पैशाच्या पिशवीला पंचवीस रुपयांचा खार लागला; पण ब्रेत केल्याप्रमाणें सतत आठ दिवसांची दगदग सोसून शेवटीं आह्मी वेळेवर मुंबईस पोहोंचणार, या विचारानें आह्मांला अतोनात आनंद वाटला.

आतां लाहोरला थांबणें शक्य नव्हतें, म्हणून 'आह्मी एकदम देशीं निघून गेलों,' अशी आमच्या लाहोरच्या स्नेह्याला तार केली. गाडींत बसल्यावर मनाला एकदांचा धीर आला, व मग आह्मांला पोटोबाची आठवण झाली. सकाळपासून आम्ही दूध व केळीं यांखेरीज कांहीं खाल्लें नव्हतें; म्हणून आतां चांगला फराळ करून आम्ही यथेच्छ पाणी प्यालों. इतकें होत आहे, तों गाडीची वेळ होऊन भप्भप् करीत आमची गाडी चालू झाली.

आतां आह्मांला तो पंजाबचा रुक्ष प्रदेश व तेथचा तो भयंकर ऊष्मा यांचा अनुभव येऊं लागला, आणि नंदनवनाची शोभा व तेथली शीतल हवा यांची राहूनराहून आठवण होऊं लागली. आतां पुनः तें दुर्लभ स्थान आपल्याला अप्राप्त आहे, असें मनांत येऊन फार वाईट वाटलें. गाडी झपाट्यानें चालली होती. दोनअडीच तासांनीं झेलमनदी व झेलमस्टेशन हीं लागलीं. उगमाशीं एवढीशी असलेली नदी आतां केवढी प्रचंड झाली आहे, हें पाहून आम्हांला आश्चर्य व आनंद वाटला; आणि सहजगत्या 'उत्तररामचरित्रां'तील '**अहो ईदृश एष संवृत्तः**' या सीतेच्या उद्गाराचें स्मरण झालें. ही नदी आतां आम्हांला चिरपरिचित अशा सखीसारखीच वाटूं लागली होती. म्हणून स्टेशन सुटल्यावर वियोगदुःखासारखा मनोविकार आम्ही अनुभवला, यांत नवल नाहीं. असो.

आम्ही सातांच्या सुमाराला लाहोरास पोहोंचलों. पेशावरपासून लाहोरपर्यंत जी. आय. पी. रेलवेची पंजाब मेल व बी. बी. सी. आय. रेलवेची मेल एकच आहे, व तिला थर्ड किंवा इंटर क्लास नाहीं; म्हणूनच आम्हांला सेकंडक्लासचीं तिकीटें घ्यावीं लागलीं. लाहोरास मात्र या मेल वेगळ्यावेगळ्या होतात, व त्या वेगवेगळ्या मार्गानें जाऊन पुनः दिल्लीला एके ठिकाणीं येऊन दिल्लीपासून मथुरेपर्यंत एकाच रस्त्यावरून जाऊन मग पुनः वेगवेगळ्या मार्गांनीं मुंबईस पोहोंचतात. जी. आय. पी. रेलवे अमृतसर, अंबाला या शहरांवरून उत्तरपंजाबांतून दिल्लीस येते; तर बी. बी. सी. आय. रेलवे फिरोज, भाटिंडा या शहरांवरून दक्षिणपंजाबांतून दिल्लीस येते.

लाहोरास पोहोंल्यावर आम्हांला लागलीच बी. बी. सी. आय. रेलवेच्या गाडींत बसावयाचें होतें. पण आम्हांला आतां थर्ड क्लासचीं तिकिटें काढावयाचीं होतीं. येथें थर्ड क्लासचें तिकिट ऑफिस सेकंड क्लासपासून इतकें दूर आहे, कीं, नवख्या माणसाला तें सांपडणेंहि कठीण! कारण, रेलवेच्या एका कांपाउंडामध्यें दोन ऑफिसें नाहींत, तर या दोन ऑफिसमध्यें भली लांबलचक व अखंड भिंत आहे. यामुळें या सेकंड क्लासाच्या कांपाउंडांतून अगदीं उघड्या रस्त्यावर येऊन मग तिसऱ्या क्लासचें निराळें

ऑफिस लागतें. त्याला सभोंवार लोखंडी खांबाचें कुंपण असून आगगाडीच्या प्लॅटफॉर्मवर जाण्यास जमिनीखालून भुयारवजा जिन्यांतून वाट आहे. सेकंडक्लासकडून प्लॅटफॉर्म अगदींच जवळ व जावयाला फारच सोयीचा आहे. म्हणून आमचें सामान सेकंडक्लासांतून आयतें आलेलेंच होतें तें तसेंच बी. बी. सी. आय. रेलवेच्या प्लॅटफॉर्मकडे नेण्यास हमालाला सांगितलें. पण तिकीटकंडक्टर तसें करूं देईना. त्याच्या हातावर चार आणे ठेविले असते, म्हणजे त्यानें तेव्हांच परवानगी दिली असती. पण आम्हांला तशी गोष्ट कर्तव्य नव्हती; म्हणून आम्ही द्राविडी प्राणायाम करून त्या भुयारांतून आपलें सामान आल्या ठिकाणींच आणलें, व बी. बी. सी. आय. च्या गाडींत बसलों. या गाडीच्या थर्ड क्लासाला सुद्धां लोंबतीं बाकें असल्यामुळें निजावयाची सोय बरी असते. आम्ही दोनअडीच दिवसांच्या दगदगीनें दमून गेल्यामुळें गाडींतील बांकांवर अंग टांकतांच आम्हांला झोंप लागली. गाडी दिल्लीस पहाटेला येऊन पोहोंचली.

तारीख ४ जून–आम्हांला गाडी वगैरे कांहीं एक बदलावयाची नव्हती. आमची गाडी साडेपांच वाजतां दिल्लीहून निघाली, ती दोनअडीच तासांनीं मथुरेला आली. येथें गाडी बराच वेळ थांबत असल्यामुळें येथें आम्ही मुखमार्जन वगैरे करून मेवामिठाई व फराळाचें घेऊन पोटभर न्याहारी केली. मथुरेहून गाडी निघाल्यापासून पाऊण तासांत भरतपुर हें स्टेशन लागलें. यांच गांवाचें नांव काय तें ओळखीचें होतें. पुढें या रस्त्यावर एकहि गांव इतिहासप्रसिद्ध नाहीं. नागडा–मथुरा हा रस्त्याचा फांटा अगदीं रुक्ष कमी सुपीक प्रदेशांतून जातो, असें वाटतें. यामुळें हा सर्व रस्ता जरी आम्ही दिवसाचा चाललों, तरी सभोंवारचा देखावा पहाण्यालायक मुळींच वाटला नाहीं. या सगळ्या भागांत पळसाचें भुरटें रान मात्र बरेंच दृग्गोचर होत होतें. पळसाचें झाड हिंदुस्तानांत सर्वगामी आहे, असें आम्हांला दिसून आलें. नागडा या स्टेशनला आम्ही सायंकाळीं येऊन पोहोंचलों, व दिवसाच्या प्रवासांत आम्ही चारशें मैलांच्या वर मजल मारली.

आतां मुंबई फक्त चारशेंचवतीस मैल राहिली. हजारों मैलांच्या लांबी-

वरून आल्यामुळें आतां मुंबई जवळच आली असें आह्मांला वाटूं लागलें. कारण, आतां रात्रीचाच काय तो प्रवास राहिला. उद्यां सकाळीं आपण मुंबईस जाणार, म्हणून मन प्रसन्न झालें. येथेंहि आह्मी चांगला फराळ केला, व निद्रादेवीची वाट पहात राहिलों. तिनेंहि आमच्यावर लवकरच अनुग्रह केला. पहाटेला उठतों तों खरोखरीच आपण मुंबईनजीक आलों, असें कळून आल्हाद वाटला.

ता. ५ जून—गाडी पालघर स्टेशनवर सकाळीं आली. तेथें आह्मी चहा–केक घेतली. तेथून जी गाडी सुटली, ती एकदम ग्रॅन्टरोडशीं आली व तेथून गाडी थेट कुलाब्याला गेली. आह्मी कुलाब्याला नवांच्या सुमाराला आलों.

याप्रमाणें आह्मी श्रीनगराहून ता० १ जूनला सकाळीं पांच वाजतां निघालों, ते ५ जूनला नऊ वाजतां म्हणजे बरोबर १०० तासांत नंदन-वनांतून स्वस्थानीं आलों. इतका एकसारखा व तांतडीचा प्रवास आह्मी आजन्मांत केला नव्हता; पण इतका जलद प्रवास करून त्यांत कोणत्या-हि प्रकारचें विघ्न न येतां तो तडीस गेला, याबद्दल आह्मी परमेश्वराचे मनांत आभार मानले.

ता० ६ जून––सकाळीं माझ्या बंधूना मी बोटीवर पोहोंचविलें, व मी लगेच आठांच्या एक्स्प्रेसनें पुण्याला आलों. पंजाब व काश्मीरच्या प्रवासाला आह्मी पुण्याहून ता. ६ मेलाच निघालों होतों. बरोबर एक महिन्यांत आह्मी जातांयेतां मिळून एकंदर पसतीसशें मैल प्रवास केला, व लहानमोठ्या तीसपसतीस ठिकाणीं उतरलों, आणि तीं थोड्याफार बारकाईनें पाहिलीं. हा आमचा प्रवास फार जलद व त्रासाचा झाला, यांत शंका नाहीं. या सर्व महिन्यांत आमची एक प्रकारची धांदल––लग्नघाईच होती. या अल्पकालांत जे अनुभव आह्मांला आले, ज्या नव्यानव्या गोष्टी आह्मी पाहिल्या, त्या सर्वांमुळें आमच्या आयुष्याचा हा महिना म्हणजे गर्दीचा महिना होता, असें ह्मटलें पाहिजे. हा प्रवास आह्मी जास्त सावकाशीनें, जास्त सवडीनें व जास्त थबकतथबकत केला असता, तर तो सुखकर, सोयीचा व समाधानकारक झाला असता, हें

खरें; पण त्याला वेळाची आणि पैशाची मुबलकता पाहिजे होती, ती आमच्याजवळ कोठें होती ? या बाबतींत अंथरुण पाहून पाय पसरणें आह्माला अवश्य होतें, व त्याप्रमाणेंच आह्मी वागलों.

काश्मीर व पंजाबचा प्रवास संपून आतां चार वर्षें झालीं, व आमचा एका महिन्याचा प्रवास वाचकांना बारा लेखांत सादर करण्यास इतका काळ लागला. पण एकाअर्थीं हें बरेंच झालें. कारण, या अवकाशामुळें माझ्या या अपूर्व प्रवासाची जागृति इतक्या दिवस तरी कायम राहिली. जाण्यापूर्वीं बऱ्याच काळपर्यंत निदिध्यासरूपानें, तेथें गेल्यावर कांहीं काळ प्रत्यक्ष अनुभवानें व दर्शनानें आणि नंतर आजतागायत स्मृतिरूपानें ज्या नंदनवनानें माझें मन व्यग्र केलें होतें, त्या 'नंदनवनाच्या वर्णनाची समाप्ति' करून वाचकांची रजा घेतों.

